काही स्वाध्याय

जयदीप चिपलकट्टी

संपर्क: jaydeep.chipalkatti@gmail.com

अनुक्रमणिका

✘

अल्बाट्रॉस सँडविच

बेथ: तुला एखाद्या नवीन विषयावर संभाषण सुरू करायचं आहे असं तुझ्याकडे पाहिल्यावर वाटतं.

गिमेल: मी तुला एक गोष्ट सांगणार आहे, पण तिच्यातलं मुख्य पात्र तसं का वागतं ह्यामागची कारणसंगती त्यात स्पष्ट झालेली नसेल. गोष्ट सांगून झाल्यानंतर, ज्यांची 'हो' किंवा 'नाही' अशी उत्तरं देता येतील, असे प्रश्न तू मला विचार. आणि मग माझ्या उत्तरांच्या आधारे ही कारणसंगती तू शोधून काढ.

बेथ: मान्य आहे. निदान तूर्तास.

गिमेल: एक माणूस एका रेस्टॉरंटमध्ये आला, आणि त्यानं वेटरला अल्बाट्रॉस पक्ष्याच्या मांसाचं सँडविच मागितलं. सँडविच समोर आल्यानंतर त्यानं एक चावा घेतला, आपल्या कमरेचं रिव्हॉल्वर काढलं आणि स्वत:च्या कानशिलात गोळी मारून घेतली. त्यानं असं का केलं असेल?

❖

बेथ: हा माणूस वेडा होता का?

गिमेल: नाही.

बेथ: त्या सँडविचमध्ये असं काही होतं का, की ज्यामुळे खाणाऱ्याचं डोकं फिरेल?

गिमेल: नाही.

बेथ: या माणसाला काही तात्कालिक भ्रम झाला होता का?

गिमेल: नाही.

बेथ: त्याच्या मनात दुसऱ्या कुणाला मारायचं होतं, पण गोळी चुकून स्वत:लाच लागली असं झालं का?

गिमेल: नाही.

बेथ: हा काहीतरी बनावाचा किंवा नाटकाचा प्रकार होता का?

गिमेल: नाही.

बेथ: हे सिनेमाचं शूटिंग होतं का?

गिमेल: नाही.

बेथ: या माणसानं स्वत:ला मारून घेतली ती खरोखरीच बंदुकीची गोळी होती का?

गिमेल: हो.

बेथ: ती कानशिलात घुसल्यामुळे तो मेला का?

गिमेल: हो.

बेथ: या माणसानं डोक्याला हेल्मेट घातलं होतं का?

गिमेल: नाही.

बेथ: त्यानं स्वत:ला गोळी मारून घेतली तेव्हा आपण मरणार अशी त्याची अपेक्षा होती का?

गिमेल: हो.

❖

बेथ: मला प्रश्न सुचेनासे झाले आहेत. कोलरिजची 'राइम ऑफ द एन्शन्ट मरीनर' नावाची एक कविता आहे. तिच्यात अशी कल्पना आहे, की अल्बाट्रॉसची हत्या केली तर अपशकून होतो. या माणसाची तशी काही समजूत होती का?

गिमेल: नाही.

बेथ: हा माणूस एखाद्या राजकीय किंवा सामाजिक ध्येयाच्या प्रभावाखाली होता का?

गिमेल: नाही.

बेथ: हा माणूस शाकाहारी होता का?

गिमेल: नाही.

बेथ: त्या रेस्टॉरंटमध्ये टेबलखुर्च्या होत्या का?

गिमेल: हो.

बेथ: दोन आणि दोन चार होतात का?

गिमेल: हो.

बेथ: हा माणूस त्या वेटरला पूर्वीपासून ओळखत होता का?

गिमेल: नाही.

बेथ: वेटर त्या माणसाला पूर्वीपासून ओळखत होता का?

गिमेल: नाही.

बेथ: तो माणूस आणि वेटर यांचे यापूर्वी कसलेही परस्परसंबंध होते का?

गिमेल: नाही.

बेथ: सँडविच खाल्ल्यानंतर तो असं काही करेल याची वेटरला पूर्वकल्पना होती का?

गिमेल: नाही.

बेथ: ही घटना घडली त्या दिवशी मंगळवार होता का?

गिमेल: मला माझा नियम मोडावा लागणार आहे. या प्रश्नाचं 'हो' किंवा 'नाही' यापैकी कुठलंच उत्तर मला द्यायचं नाही.

बेथ: नियम तू केलेला होतास, तेव्हा तूच जर तो मोडणार असशील तर तुला खुलासा करावा लागेल.

गिमेल: बाब अशी आहे की त्या दिवशी कुठलाही वार असला तरी काही फरक पडत नाही. तेव्हा 'हो' किंवा 'नाही' याबरोबर 'असंबंधित' असं तिसरं एक उत्तर देण्याची मला मुभा हवी.

बेथ: का बरं?

गिमेल: हे बघ; माझ्या गोष्टीमध्ये काही माणसं, काही प्राणी, आणि काही वस्तू यांनी मिळून बनलेलं एक मर्यादित जग आहे. ग्रीकमध्ये 'Kόσμος' असा शब्द आहे, त्यावरून मी ह्या जगाला K असं नाव देणार

आहे. आता K मध्ये ज्या घटना घडतात, त्यांच्यामागे काही कारणसंगती असते; आणि ही कारणसंगती K मध्ये पूर्वी घडलेल्या इतर घटना, आणि K मध्ये वावरणाऱ्या माणसांची मानसिकता, अशा दोहोंनी बनलेली असते. ह्या सगळ्याची गोळाबेरीज मिळून जी काही व्हायची ती गोष्ट होते. पण K बाहेरच्या जगातल्या घटना किंवा वस्तू किंवा माणसं या कारणसंगतीमध्ये भाग घेत नाहीत. त्यामुळे तू जर त्यांच्याबद्दल प्रश्न विचारलेस तर मला 'असंबंधित' असं उत्तर देणं भाग आहे. उदाहरणार्थ, समज जर तू विचारलंस की 'त्या माणसाची आई मारकुटी होती का?' तर मी 'असंबंधित' असं म्हणेन.

बेथ: पण मग मी जेव्हा दोन आणि दोन चार होतात का, असं विचारलं तेव्हा तू 'हो' का म्हणालास? तेव्हा तुला 'असंबंधित' असं का म्हणावंसं वाटलं नाही?

गिमेल: कारण ते असंबंधित नाही. आपल्या जगात जे सर्वसाधारण तर्कशास्त्राचे नियम आहेत तेच K मध्येही लागू होतात, असं मी गृहीत धरलेलं आहे.

बेथ: पण तू तसं आधी म्हणाला नाहीस.

गिमेल: मी म्हणालो नाही हे खरं, पण ते अध्याहृत आहे. आपल्याच जगात नव्हे तर K मध्ये देखील दोन आणि दोन चारच होतात. समज असं एक जग आहे, की जिथे दोन आणि दोन पाच होतात. तर तिथलं आंतरिक तर्कशास्त्र आपल्या जगापेक्षा इतकं वेगळं असेल की त्याचा कुठेकुठे कायकाय परिणाम होईल याचा काही भरवसा देता येणार नाही. अशा जगात कदाचित माणसं आनंदात असल्यामुळे आत्महत्या करत असतील. किंवा कदाचित बंदुकीच्या गोळ्या माणसांना जखम न करता फक्त गुदगुल्या करून डोक्यातून आरपार जात असतील, तेव्हा करमणूक म्हणून त्या मारून घ्यायला कुणाला काही वाटत नसेल. गंगेच्या काठावर जशी पैसे घेऊन कान कोरून देणारी माणसं बसतात तशी तिथे कदाचित डोक्यात गोळ्या मारून देणारी माणसं बसत असतील. अशा जगाविषयी प्रश्नही विचारण्यात अर्थ नाही, आणि त्या प्रश्नांची उत्तरं देण्यातही नाही. पण वाराची गोष्ट तशी नाही. त्या दिवशी कुठला वार होता, यामुळे गोष्टीतल्या घटनांमागच्या कारणसंगतीवर काही फरक पडत नाही. म्हणून मी म्हणतो 'असंबंधित'.

बेथ: पण जर खरोखरीच काही फरक पडत नसेल तर तू 'नाही, त्या दिवशी मंगळवार नव्हता' असं उत्तर का देत नाहीस?

गिमेल: कारण मग तू मला पेचात पाडू शकशील. समज मी मंगळवाराला नाही म्हणालो, आणि मग बाकी सगळ्या वारांबद्दल तू नंतर असेच आणखी सहा प्रश्न विचारलेस तर? मला कुठल्यातरी एका वाराला 'हो' म्हणावं लागेल, कारण प्रत्येकाला 'नाही' म्हणत गेलो तर त्या दिवशी कुठलाच वार नव्हता असा त्याचा अर्थ होईल. त्या दिवशी K मध्ये कुठलाही विशिष्ट वार नव्हता, पण याचा अर्थ असा नव्हे की सोमवार ते रविवारपैकी कुठलाच वार नाही असा काहीतरी तो विलक्षण दिवस होता.

बेथ: मग यात काय अडचण आहे ते मला कळत नाही. मी जोपर्यंत वाराबद्दल काहीच विचारत नाही तोपर्यंत तुला काही निर्णय घेण्याची गरज नाही. पण जर मी विचारलं, तर कुठलातरी एक वार नक्की मनाशी ठरव आणि त्याला 'हो' म्हण.

गिमेल: ठीक आहे, सध्यातरी यात मला काही पेच लक्षात येत नाही. पण कदाचित पुढे येईल.

बेथ: मग एकसारखे एक सात प्रश्न विचारण्याऐवजी मी सरळ त्या दिवशी गुरुवार होता असं समजते. चालेल?

गिमेल: चालेल! अशासारखा प्रकार वाङमयाच्या इतिहासात पूर्वी घडलेला आहे. अ‍ॅडम आणि इव्ह इडनमध्ये राहात असताना सापाच्या आग्रहाला बळी पडून इव्हनं ज्ञानवृक्षाचं फळ खाल्लं. हे फळ नेमकं कसलं होतं याचा जेनेसिसमध्ये उल्लेख नाही, आणि त्या कथेत बाकी एकूणच गोंधळ इतका आहे, की तसा तो नसल्यामुळे काही बिघडतही नाही. पण नंतर काही कारणाने लोक समजू लागले की ते सफरचंद होतं, आणि तसं समजल्यामुळेही काही बिघडत नाही.

बेथ: मान्य. एकूण या प्रकारात मला दिलासा वाटण्यासारखी बाब इतकीच की त्या दिवशी कुठला वार होता हे कळून काही उपयोग नाही. पण आईप्रकरणाबद्दल मात्र माझी शंका राहून गेलेली आहे. तुझ्या मते 'त्या माणसाची आई मारकुटी होती का?' ह्या प्रश्नाला 'असंबंधित' हे उत्तर आहे. पण ही बाब खरंच असंबंधित आहे असं मला वाटत नाही. आई मारकुटी असती तर कदाचित त्यामुळे त्याची मानसिक

जडणघडण बिघडली असती, आणि सर्वसामान्य व्यक्तीला जी कारणं आत्महत्या करायला पुरेशी वाटत नाहीत, ती त्याला पुरेशी वाटली असती.

गिमेल: हे अशक्य आहे असं मी म्हणत नाही, पण मग त्या अर्थानं जगातली कुठलीच गोष्ट इतर कुठल्याच गोष्टीशी असंबंधित नसते. जेन ऑस्टिनच्या 'प्राइड अँड प्रेज्यूडिस' या कादंबरीत अगदी सुरवातीला असा प्रसंग आहे: मेरिटन या गावात एका संध्याकाळी एका बॉलमध्ये एलिझाबेथ बेनेट आणि फिट्झविल्यम डार्सी ह्या दोघांची भेट झाली. तिथे पुरुषांपेक्षा स्त्रिया जास्त संख्येने हजर असल्यामुळे प्रत्येक स्त्रीला प्रत्येक नाचाच्या वेळी पार्टनर मिळेलच अशी शाश्वती नव्हती. तेव्हा याच कारणापायी एका नाचाच्या वेळी एलिझाबेथला बाजूला बसून राहावं लागलं, आणि त्यावेळी डार्सीदेखील तिच्या जवळच थोडासा पुढे पण तिच्याशी न बोलता घुमेपणाने उभा होता. डार्सीच्या मित्राने त्याला नाचात भाग घ्यायचा आग्रह केला, आणि एक छान मुलगी मागेच बसलेली आहे असं सुचवलं. यावर डार्सी मागे वळून बघत तिला ऐकू जाईल इतपत मोठ्या आवाजात म्हणाला की मुलगी दिसायला बरी आहे, पण मला मोह पाडण्याइतकी नाही. एलिझाबेथला ह्याचा अपमान वाटला, आणि तिच्या पुढच्या सगळ्या निर्णयांवर या प्रसंगाचा मोठा प्रभाव पडला. पण ही बारीकसारीक कलाकुसर चालू होती, त्याच्या आगेमागे कित्येक वर्षं, युरोपखंडात कित्येक ठिकाणी, इंग्लंडचं नेपोलियनच्या सैन्याविरुद्ध सतत युद्ध सुरू होतं. ह्या युद्धाचा एलिझाबेथवर किंवा निदान कादंबरीतल्या इतर पात्रांवर काही प्रभाव पडला का? म्हटलं तर हो, आणि म्हटलं तर नाही. कादंबरीत कुठेही त्या युद्धाचा उल्लेख नाही, तेव्हा तसा काही थेट संबंध दाखवता येणार नाही. पण समज नेपोलियन इंग्लंडमध्ये घुसला असता तर सगळ्या इंग्लिश समाजावरच त्याचा निर्णायक प्रभाव पडला नसता का? आणि कदाचित सगळ्याच पात्रांच्या आयुष्यांत उलथापालथ झाली नसती का? बॉलडान्सिंगचे सगळ्यांचे सगळे बेत उलटेसुलटे नसते का झाले? तेव्हा तो तसा न घुसणं हाच मोठा प्रभाव आहे. किंवा असं समज की तू एकटी नाटकाला गेलेली आहेस. तुला नाटक आवडतं की नाही याचा निर्णय तुझ्या शेजारच्या खुर्चीवर कोण बसलं आहे यावर अवलंबून असत नाही. पण जर तोंडाचा घाण वास येणारा गलेलठ्ठ माणूस शेजारी बसला असेल, तर मात्र या निर्णयावर चांगलाच प्रभाव पडतो. नपेक्षा प्रभाव न पडणं

इतपतच प्रभाव पडतो. तेव्हा आईचा मारकुटेपणा असंबंधित आहे असं मी म्हणतो, त्याचा अर्थ हा घ्यायचा.

❖

बेथ: ठीक आहे. आपण प्रश्नोत्तरांना पुन्हा सुरुवात करू, पण त्याआधी मला एक संकेत सुचवायचा आहे. मी प्रश्न विचारणं आणि तू 'हो' किंवा 'नाही' उत्तर देणं, ही संभाषणाची एक पातळी झाली. पण समज आपल्यापैकी कुणा एकाला तिथे न राहता त्या पातळीच्या वर जाऊन काही शंका काढायची असेल किंवा भाष्य करायचं असेल, तर त्यानं 'मेटा' असं म्हणून परवानगी विचारावी. दुसऱ्यानं त्याला 'मेटा' असं म्हणून दुजोरा दिला की मग पहिल्या व्यक्तीला ते भाष्य करायला मुभा असेल. ग्रीकमध्ये μετά चा अर्थ 'पलीकडे' किंवा 'वर' असा होतो; इथे आपण तो 'चालू पातळीच्या वर' असा घ्यावा असं मी सुचवते आहे. अनेक शास्त्रांमध्ये अशा प्रकारचा संकेत वापरला जातो. उदाहरणार्थ, कोणत्या मानवी कृती चांगल्या आणि कोणत्या वाईट याचा नीतिशास्त्रामध्ये खल होतो. पण हा खल कुठल्या सैद्धांतिक आधारांवर करायचा ह्याच मुद्द्याचा जर खल करायचा असेल, तर त्याला मेटानीतिशास्त्र म्हणता येईल.

गिमेल: मला संकेत आवडला. पण तू संस्कृत शब्दाला ग्रीक उपसर्ग जोडते आहेस हे धाष्ट्यीचं आहे.

बेथ: त्यात काय गैर आहे? जर अरिस्टॉटल आणि चाणक्य एकमेकांना भेटले असते, तर हा शब्द तेव्हाच तयार झाला असता. आणि अशी बरीच उदाहरणं आहेत. एका इंग्रजी कॉमिक बुक सीरीजमध्ये 'नेक्रोमंत्रा' नावाची नायिका आहे. किंवा मला 'श्रीडेटा' नावाची एक सॉफ्टवेअर कंपनी ऐकून माहित आहे.

गिमेल: स्पृष्टोस्मि!

बेथ: पण एकूण तुला संकेत मान्य आहे?

गिमेल: हो. म्हणजे 'त्या दिवशी मंगळवार होता का?' असा मगाशी तू प्रश्न विचारलास, तेव्हा प्रत्युत्तर म्हणून मी 'मेटा' असं म्हणायला हवं होतं.

बेथ: तेव्हा तो संकेत अजून लागू झालेला नव्हता, पण हो.

गिमेल: तेव्हा मी तसं म्हणालो असतो तर कदाचित हा संकेत आपोआपच तयार झाला असता. संकेतांचं रहस्य हेच आहे. पण ते एक असो. मी असं सुचवतो की 'मेटा'नंतर होणाऱ्या चर्चेचा ज्याला शेवट करायचा असेल त्यानं 'मेटान्त' असं म्हणावं. त्याला दुसऱ्यानं दुजोरा दिला की आपण पुन्हा खालच्या पातळीवर आलो असं समजू. मेटान्त.

बेथ: मेटान्त.

❖

बेथ: रेस्टॉरंटमध्ये गेलेला माणूस तरुण होता का?

गिमेल: हो.

बेथ: वेटर तरुण होता का?

गिमेल: असंबंधित.

बेथ: ह्या तरुण माणसाचं लग्न झालेलं होतं का?

गिमेल: नाही.

बेथ: त्याचा प्रेमभंग झाला होता का?

गिमेल: नाही.

बेथ: हा माणूस गुन्हा करून फरारी झालेला होता का?

गिमेल: नाही.

बेथ: तो शिक्षा भोगून आलेला होता का?

गिमेल: नाही.

बेथ: त्याने गुन्हा केलेला नव्हता, पण त्याच्यावर आळ आला अशी काही परिस्थिती होती का?

गिमेल: नाही.

बेथ: या माणसाला कोणी शत्रू होते का?

गिमेल: नाही.

बेथ: प्रत्यक्षात जे या माणसाला शत्रू मानत नव्हते पण ज्यांना तो शत्रू मानत असे, अशा कोणी व्यक्ती होत्या का?

गिमेल: नाही.

बेथ: त्याचा कुणी पाठलाग करत होतं का?

गिमेल: नाही.

बेथ: हा माणूस मेला तेव्हा पैशाच्या अडचणीत होता का?

गिमेल: नाही.

बेथ: त्या सँडविचचं बिल भागवण्याइतके पैसे त्याच्या खिशात होते का?

गिमेल: हो.

बेथ: रेस्टॉरंटमध्ये जाण्यापूर्वी त्यानं रिव्हॉल्वर नुकतंच मिळवलेलं होतं का?

गिमेल: नाही.

बेथ: तो नेहमीच कमरेला रिव्हॉल्वर बाळगत असे का?

गिमेल: हो.

बेथ: तो लष्करात होता का?

गिमेल: नाही.

बेथ: तो कसल्याही सरकारी नोकरीत होता का?

गिमेल: नाही.

बेथ: हा माणूस रेस्टॉरंटमध्ये शिरला तेव्हा आत्महत्या करायचं ठरवून आला होता का?

गिमेल: नाही आणि मेटा.

बेथ: मेटा.

गिमेल: तू माझ्या ह्या उत्तराचा वापर अतिशय जपून करावास असं मला सुचवायचं आहे. मेटान्त.

बेथ: थँक यू, पण आपण प्रतिस्पर्धी आहोत अशी माझी समजूत होती.

गिमेल: आपण प्रतिस्पर्धी नव्हे तर सहप्रवासी आहोत. मेटान्त.

बेथ: मेटान्त. या माणसाला जर तिथे अल्बाट्रॉस सँडविच मिळालं नसतं, तरीही त्यानं आत्महत्या केली असती का?

गिमेल: नाही.

बेथ: अल्बाट्रॉस सँडविच हा या माणसाच्या आवडीचा पदार्थ होता का?

गिमेल: नाही.

बेथ: नावडीचा पदार्थ होता का?

गिमेल: नाही.

बेथ: त्यानं सँडविचचा चावा घेतला तो घास त्यानं गिळला का?

गिमेल: असंबंधित.

❖

बेथ: मला ओपनिंग सापडत नाहीय. ही गोष्ट पृथ्वीवर घडली का?

गिमेल: हो.

बेथ: ही गोष्ट उत्तर गोलार्धात घडली का?

गिमेल: नाही.

बेथ: ग्रीनिचच्या पूर्वेला घडली का?

गिमेल: हो.

बेथ: आफ्रिका खंडात घडली का?

गिमेल: नाही.

बेथ: आशिया खंडात घडली का?

गिमेल: नाही.

बेथ: ऑस्ट्रेलियामध्ये घडली का?

गिमेल: हो.

बेथ: लव्हली. ही गोष्ट ऑस्ट्रेलियात घडण्याला महत्त्व आहे का?

गिमेल: मेटा.

बेथ: मेटा.

गिमेल: कथानकातल्या एखाद्या घटकाला महत्त्व आहे की नाही याला काही निश्चित उत्तर असत नाही, कारण हा गुंतागुंतीचा आणि काही प्रमाणात तरतमभावाचा प्रश्न आहे. एलिझाबेथ आणि डार्सी यांचे एकमेकांबद्दल गैरसमज होणं याला अतिशय महत्त्व आहे. एलिझाबेथला अनेक बहिणी असणं ह्याला त्यापेक्षा कमी महत्त्व आहे, आणि तिच्या बहिणींची संख्या नेमकी चार असणं ह्याला त्याहीपेक्षा कमी महत्त्व आहे. तरुण अविवाहित स्त्रीपुरुषांनी एकमेकांशी एकान्तात बोलणं, एकमेकांबरोबर नाच करणं हे सगळीकडच्या रिवाजात बसत असेलच असं नाही, तेव्हा कादंबरी एकोणीसाव्या शतकातल्या इंग्लंडमध्ये घडण्याला निदान तितपत महत्त्व आहे. माझ्याही गोष्टीचं थोडंफार तसंच आहे. तिच्यामध्ये जशा घडल्या तशासारख्या घटना जगात इतर काही ठिकाणी घडू शकल्या असत्या, तेव्हा त्या अर्थाने ऑस्ट्रेलियाला महत्त्व नाही. पण ही गोष्ट जगात अगदी कुठेही घडू शकली असती हे मात्र खरं नाही, तेव्हा त्या अर्थाने ऑस्ट्रेलियाला महत्त्व आहे. अर्थात मला 'प्राइड अँड प्रेज्यूडिस'पेक्षा जास्त समर्पक उदाहरण देणं शक्य आहे, पण मग माझ्या गोष्टीमागचं रहस्य लागलीच उघडं पडेल.

बेथ: पण समज तुझी गोष्ट फ्रान्समध्ये घडली असती –

गिमेल: फ्रान्समध्ये ही गोष्ट घडू शकली नसती.

बेथ: ठीक आहे; गोष्ट पुरती माहित नसल्यामुळे तुझा निर्वाळा मान्य करणं मला भाग आहे. पण असं समज की आटपाट नगर नावाची दुसरी एक अशी जागा आहे, की जिथे ही गोष्ट घडू शकली असती. तर तिच्यात ऑस्ट्रेलियाऐवजी आटपाट नगरातले वेगळे स्थानिक संदर्भ मिसळले गेले असते, आणि ती एक वेगळी गोष्ट झाली असती.

गिमेल: स्थानिक संदर्भ दरवेळेला तितकेच महत्त्वाचे असतात असं नाही. स्थानिक संदर्भ बदलले की गोष्ट पूर्णपणे बदलली असं दरवेळेला मी म्हणणार नाही. व्लादिमिर नाबोकोव्हची 'करोल, दामा, व्हल्येत (राजा, राणी, गुलाम)' ह्या नावाची एक कादंबरी आहे. मूळ कादंबरी रशियनमध्ये आहे, पण बऱ्याच वर्षांनी लेखकाने स्वत:च तिचं इंग्रजीत भाषांतर केलं. भाषांतराच्या प्रस्तावनेत तो म्हणतो, की कादंबरी लिहिली तेव्हा मी बर्लिनमध्ये राहात होतो, बर्लिनमधले रस्ते आणि तिथलं हवामान यांची मला बऱ्यापैकी माहिती झालेली होती, म्हणून ती बर्लिनमध्ये घडते असं मी लिहिलं. पण तशी ती रोमानिया किंवा हॉलंडमध्येही घडू शकेल.

बेथ: मला हे म्हणणं बरोबर वाटत नाही. समज कादंबरी ॲमस्टरडॅममध्ये घडते आहे. आणि समज तिच्यातलं फ्रान्झ हे पात्र वेश्यावस्तीतून हिंडत असताना तिथली विमनस्क करणारी दृश्यं बघून त्याचा जीवनविषयक दृष्टिकोण पालटतो. असं जर झालं तर त्यामुळे पुढच्या सगळ्या घटना बदलणार नाहीत का?

गिमेल: पण लेखकाला यात स्वातंत्र्य आहे हे तू विसरतेस. फ्रान्झला वेश्यावस्तीत जाऊ द्यायचं की नाही हे ठरवणं त्याच्या हातात आहे.

बेथ: ॲमस्टरडॅममधली वेश्यावस्ती जगप्रसिद्ध आहे. ती टाळणं तितकं सोपं नाही. जर त्या शहरात फ्रान्झ एकटा राहात असेल आणि तरीही तिथे तो कधीच फिरकला नाही, तर यामागे काहीतरी भानगड आहे अशी वाचकाला नक्की शंका येईल.

गिमेल: आता यावर मी काय बोलणार? मी म्हणेन, की जगात अशी काही ठिकाणं आहेत की माझी गोष्ट ऑस्ट्रेलियात न घडता तिथे घडली तर थोडीशी बदलेल खरी, पण तिचा गाभा तोच राहील. अर्थात

एखाद्या गोष्टीचा गाभा ही अचूक बोट दाखवण्यासारखी वस्तू नाही, हे मला कबूल आहे. तो नेमका कुठे आहे याबद्दल वाद घालायला जागा असतेच.

बेथ: पण जर आपण खरंच तसा वाद घालायला लागलो, तर मला तुझ्या गोष्टीमागची कारणसंगती माहित नाही ही परिस्थिती माझ्या पथ्यावरच पडेल. मी वाटेल तसा वाद घालू शकेन, आणि याउलट तपशिलाचा उल्लेख न करण्याचं तुझ्यावर बंधन असल्यामुळे तुला फारसं बोलता येणार नाही. तेव्हा एकूण लढाई तुल्यबळ होणार नाही. म्हणून मी म्हणते मेटान्त.

गिमेल: थँक यू आणि मेटान्त.

❖

बेथ: जिथे अल्बाट्रॉस आढळत नाहीत, अशा ठिकाणी ही गोष्ट घडू शकली असती का?

गिमेल: नाही.

बेथ: ही गोष्ट न्यूझीलंडमध्ये किंवा दक्षिण अमेरिकेत घडू शकली असती का?

गिमेल: हो.

बेथ: अल्बाट्रॉस हा समुद्रपक्षी असण्याला त्यात महत्त्व आहे का?

गिमेल: हो.

बेथ: ही गोष्ट एखाद्या बंदरावर घडली का?

गिमेल: हो.

बेथ: हा माणूस खलाशी होता का?

गिमेल: हो.

बेथ: तो नुकताच समुद्रप्रवासावरून आलेला होता का?

गिमेल: हो.

बेथ: हा प्रवास निर्विघ्नपणे पार पडला का?

गिमेल: नाही.

बेथ: तो एकटाच समुद्रावर गेला होता का?

गिमेल: नाही.

बेथ: अनेक माणसांबरोबर गेला होता?

गिमेल: हो.

बेथ: ज्यातून तो प्रवास करत होता ते जहाज बुडालं का?

गिमेल: नाही.

बेथ: त्यांच्या जहाजाला काही हानी पोहोचली का?

गिमेल: नाही.

बेथ: त्यांच्यावर चाच्यांचा हल्ला झाला का?

गिमेल: नाही.

बेथ: जहाजावर बंडाळी झाली का?

गिमेल: नाही.

बेथ: ते एखाद्या वादळात सापडले होते का?

गिमेल: हो.

बेथ: पण त्यातून ते सुखरूप बाहेर आले?

गिमेल: हो.

बेथ: वादळामुळे त्यांची वाट चुकली असं काही झालं का?

गिमेल: हो.

बेथ: आणि ते समुद्रात भरकटले?

गिमेल: हो.

बेथ: इतर कुठल्या जहाजानं त्यांना मदत केली का?

गिमेल: नाही.

बेथ: ते भरकटल्यानंतर त्यांच्याकडचा अन्नसाठा संपला का?

गिमेल: हो.

बेथ: आणि त्यांच्यावर उपासमारीचा प्रसंग आला?

गिमेल: हो.

बेथ: आहा! आणि त्यांनी अल्बाट्रॉस खाऊन भूक भागवली?

गिमेल: नाही.

बेथ: नाही?! पण मग त्यांनी मासे किंवा इतर काही प्राणी खाऊन भूक भागवली का?

गिमेल: नाही.

❖

बेथ: त्यांनी माणसाचं मांस खाऊन भूक भागवली का?

गिमेल: हो.

बेथ: अनेक माणसं खाऊन?!

गिमेल: नाही.

बेथ: एकच माणूस खाऊन?

गिमेल: हो.

बेथ: क्यूरियसर अँड क्यूरियसर. मग हा जो एकच माणूस त्यांनी खाल्ला तो आपल्या खलाशाच्या ओळखीचा होता का?

गिमेल: मेटा.

बेथ: मेटा.

गिमेल: ही गोष्ट ऑस्ट्रेलियात घडण्याला किती महत्त्व आहे हा विषय मगाशी निघाला होता, पण आपली ही प्रश्नोत्तरं मराठीत असण्याला किती महत्त्व आहे हा विषय निघाला नव्हता. मेटान्त.

बेथ: मेटान्त. ही जी एकच व्यक्ती त्यांनी खाल्ली ती आपल्या खलाशाच्या ओळखीची होती का?

गिमेल: हो.

बेथ: ही व्यक्ती स्त्रीलिंगी होती का?

गिमेल: हो.

बेथ: आपल्या खलाशाची ती प्रेयसी होती का?

गिमेल: हो.

बेथ: खलाशानेही तिचं मांस खाल्लं का?

गिमेल: हो.

बेथ: तिला मुद्दाम ठार मारण्यात आलं होतं का?

गिमेल: नाही.

बेथ: ती अल्बाट्रॉस पक्ष्याचं मांस खाल्ल्यामुळे मेली का?

गिमेल: नाही.

बेथ: ती मरण्यात अल्बाट्रॉस पक्ष्यांचा काही हात होता का? – पंख होता का?

गिमेल: नाही.

बेथ: ती उपासमार झाल्यामुळे मेली का?

गिमेल: हो.

बेथ: ती मेली हे खलाशाला माहित होतं का?

गिमेल: हो.

बेथ: आणि ती कशामुळे मेली हेही माहित होतं का?

गिमेल: हो.

❖

बेथ: ह्या स्त्रीला अल्बाट्रॉस पक्षी आवडत होते का?

गिमेल: असंबंधित.

बेथ: पूर्वायुष्यात तिचा अल्बाट्रॉसशी काही संपर्क आलेला होता का?

गिमेल: असंबंधित.

बेथ: त्या जहाजावर काही अल्बाट्रॉस पाळलेले किंवा पकडलेले होते का?

गिमेल: नाही.

बेथ: जहाजाच्या आसपास कुठे अल्बाट्रॉस होते का?

गिमेल: हो.

बेथ: जहाजावरच्या माणसांनी त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला का?

गिमेल: हो.

बेथ: पण त्यांना ते सापडले नाहीत?

गिमेल: नाही.

बेथ: त्यांना अल्बाट्रॉस सापडले नाहीत, हे खलाशाला माहित होतं का?

गिमेल: नाही.

❖

बेथ: हं. खलाशाने जेव्हा आपल्या प्रेयसीचं मांस खाल्लं, तेव्हा आपण काय खातो आहोत हे त्याला माहित होतं का?

गिमेल: नाही.

बेथ: आपण अल्बाट्रॉस खातो आहोत असा त्याचा समज होता का?

गिमेल: हो.

बेथ: जहाजावरच्या इतर माणसांनी तसा त्याचा समज करून दिला होता का?

गिमेल: हो.

बेथ: हा माणूस रेस्टॉरंटमध्ये आला तेव्हा त्यानं पूर्वी कधी अल्बाट्रॉस खाल्लेला होता का?

गिमेल: नाही.

बेथ: मला वाटतं मला गोष्ट समजली. ह्या माणसानं आपल्या प्रेयसीचं मांस खाल्लं तेव्हा ते अल्बाट्रॉसचं आहे असं इतरांनी त्याला सांगितलेलं होतं, पण खऱ्या गोष्टीची त्याला कुणकूण होती. म्हणून मुद्दाम अल्बाट्रॉसची चव बघायला तो रेस्टॉरंटमध्ये आला. त्याची जेव्हा खात्री झाली, तेव्हा तो धक्का सहन न होऊन त्यानं आत्महत्या केली.

गिमेल: बरोबर ओळखलंस. पण खरं तर तसं करण्याचं कारण नव्हतं. त्याची प्रेयसी मेली यात खलाशाचा काही दोष नव्हता, तेव्हा तिचं मांस त्यानं खाल्लं यात अपराधी वाटून घेण्यासारखं काही नव्हतं. प्रेत नुसतं समुद्रात सोडून देण्यापेक्षा त्याचा निदान उपयोग तरी झाला.

बेथ: युटिलिटेरियन एथिक्स प्रमाण मानून ह्या प्रसंगाचा तू विचार करतो आहेस. पण गोष्ट सांगणाऱ्याचं तत्त्वज्ञान गोष्टीतल्या माणसाला बंधनकारक नसतं. तुझ्याइतका भावनिक बर्फाळलेपणा त्या खलाशामध्ये नसूही शकेल.

गिमेल: मान्य आहे; पण त्याचं वागणं मला पटलं नाही हेही तितकंच खरं. आता कदाचित त्याच्या आईने प्रेमाची ऊब दिल्यामुळे तो तसा झाला असेल. पण हे मला कसं माहित असणार?

❖ ❖

चौसष्ट्तेरा

एखादी कलाकृती चौसष्ट्तेरा असणं म्हणजे काय हे स्पष्ट करण्यासाठी दोन उदाहरणं देतो.

(१) पिएरो मान्झोनीची 'मेर्दा द आर्तीस्ता' ही कृती. यामध्ये त्याने काही पत्र्याच्या चपट्या डब्या आतमध्ये स्वत:ची विष्ठा घालून सीलबंद केल्या आहेत, आणि प्रत्येकीवर तारखेचं लेबल लावून सही केलेली आहे.

अनेक कलाकृतींच्या बाबतीत त्यांचा निर्माता कोण आहे याला फार महत्त्व असतं. उदाहरणार्थ, 'वीनर डॉग' या नावाचं एक कुत्र्याचं चित्र आहे. ते पिकासोने काढलेलं आहे अशी एकेकाळी समजूत होती, तेव्हा या चित्राची बाजारातली किंमत खूपच होती. पण ते खरोखरीच त्याचं आहे का यावर नंतर कुणीतरी शंका घेतली, तेव्हा ही किंमत एकदम खाली आली. भोळा विचार केला तर याची संगती लागत नाही. 'वीनर डॉग' हे एक चित्र म्हणून चांगलं आहे की वाईट एवढ्यावरच त्याची किंमत ठरायला हवी. चांगलं असेल तर किंमत चांगली येईल, नपेक्षा वाईट येईल. ते कुणी काढलेलं आहे याला महत्त्व असू नये. पण ते प्रत्यक्षात असतं याचं आश्चर्य कुणालाही वाटत नाही.

मान्झोनीने याची खिल्ली उडवलेली आहे. 'कलाकारा'ची विष्ठा ही तुमच्यामाझ्या विष्ठेपेक्षा अशी काय मूल्यवान असणार आहे? किंवा तिच्यामागची निर्मितीप्रक्रिया ही तुमच्यामाझ्यातल्या प्रक्रियेपेक्षा काय वेगळी असणार आहे? आणि डबी अपारदर्शक असल्यामुळे, त्याची विष्ठा खरोखरीच आत आहे की नाही, हे कलाकृती नष्ट न करता कसं समजणार? समजा अल्फा नावाच्या व्यक्तीने औत्सुक्यापोटी त्यातल्या एका डबीचं सील उघडलं, आणि डीएनए ॲनॅलिसिसवरून त्याला असा शोध लागला की आतली विष्ठा मान्झोनीची नव्हे तर 'कलाकार' नसलेल्या कोण्या सामान्य माणसाची आहे. अशा परिस्थितीत आपली (किंवा जगाची) फसवणूक झाली असं अल्फाला म्हणता येईल का? समजा डबी उघडली जाऊ नये अशीच मुळात बीटाची इच्छा होती; पण ती मी उघडली आणि माझा अपेक्षाभंग झाला, असं अल्फाने त्याला सांगितलं. तर आता या कलाकृतीचा अर्थ आपल्यासाठी बदलला असं बीटाला वाटेल का? इतर कोणत्याही कलाकृतीप्रमाणेच या पत्र्याच्या डब्यांची देखील कलावस्तूंच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत खरेदीविक्री होते. अल्फाने आपल्याला लागलेल्या या शोधाचा जर गौप्यस्फोट केला तर या डब्यांच्या बाजारू किंमतीत काय चढउतार होईल? जो काही होईल आणि ज्या कारणांसाठी होईल, त्याची खिल्ली उडवण्यासाठी एक नवी

कलाकृती निर्माण करता येईल का?

(२) अनेक वर्षांपूर्वी, म्हणजे माझ्या आठवणीप्रमाणे १९९० च्या सुमाराला, एस.टी. कर्मचाऱ्यांच्या आयुष्यातल्या प्रसंगांवर आधारित अशी एक सीरियल 'दूरदर्शन'वर होती. महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाने तिला थोडंफार अनुदानही दिलेलं होतं. या सीरियलमधल्या 'चौसष्ट्तेरा' या एपिसोडचं कथानक असं: आडगावातला लहानसा एस.टी. स्टँड होता. तिथे नेहमी त्याच त्या ठराविक बसगाड्या वावरत असल्यामुळे, आणि त्यांच्यावरचे ड्रायव्हरही नेहमीचेच असल्यामुळे प्रत्येकाला त्याच्या गाडीनंबरने हाक मारायची प्रथा पडून गेलेली होती. म्हणजे समजा, MHK 3897 बऱ्याचदा जाधव ड्रायव्हरकडे असत असेल तर त्याला अडतीस्सत्याण्णव म्हणत. तर चौसष्ट्तेराला दारू प्यायची सवय होती, आणि ताकीद देऊनही उपयोग झालेला नव्हता. एके दिवशी तो स्टँडवरून निघाल्यानंतर काही वेळाने अशी बातमी येऊन पोहोचली की चौसष्ट्तेराने बस झाडावर आदळली, पण नुकसान किरकोळ आहे. त्याच्या पाठीमागे शिव्यांचा भडिमार झाला, आणि चौसष्ट्तेराला डिसमिस केला पाहिजे असं सगळे म्हणू लागले. हे आपण आधीच का केलं नाही म्हणून डेपो कंट्रोलर कानकोंडा झाला. आणखी काही तासांनी बातमीचा तपशील कळला तो असा, की बस चालवताना चौसष्ट्तेरा पूर्ण शुद्धीवर होता. ओव्हरटेक करत समोरून ट्रक आला; तो चुकवण्यासाठी म्हणून त्याने झाड दिसत असतानाही बस जाणूनबुजून डावीकडे वळवली. छातीत स्टिअरिंग घुसून चौसष्ट्तेरा जागच्याजागी मेला, पण प्रवाशांचे प्राण वाचले. त्याला दिलेल्या शिव्या, देणाऱ्यांजवळ आयुष्यभर राहिल्या.

'मेर्दा द आर्तीस्ता' आणि हा एपिसोड, या दोन्ही कलाकृतींतलं साम्य असं की त्यांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला नाही तरी चालेल, किंवा जवळजवळ चालेल. वर मी मान्झोनीच्या कलाकृतीचं वर्णन केलेलं आहे, तिचा मला जाणवलेला अर्थ दिलेला आहे, आणि त्यातून माझ्या मनात उद्भवलेले काही प्रश्न (किंवा खरंतर Gedankenexperiments) विस्कळीत स्वरूपात मांडलेले आहेत. हा अर्थ न पटल्यास तुम्ही वेगळा अर्थ लावू शकता, किंवा या प्रश्नांत तुम्हाला रस न वाटल्यास स्वत:चे वेगळे प्रश्न विचारू शकता. जे काही करायचं ते करायला तुम्ही मुखत्यार आहात, पण डबी प्रत्यक्ष समोर बघितल्यामुळे याबाबतीत काही फरक पडेल असं वाटत नाही.

जिचा मी वर उल्लेख केला, ती सीरियल अस्तित्वात नाही. अनेक वर्षांपूर्वी, म्हणजे माझ्या आठवणीप्रमाणे १९९० च्या सुमाराला, कुठल्यातरी दिवाळी अंकात मी एक दीर्घकथा वाचली होती. त्यामधल्या एका पात्राला, अशा सीरियलची आणि विशेष म्हणजे त्यातल्या अशा एका एपिसोडची कल्पना सुचली होती, आणि ती त्याने दुसऱ्या एका पात्राला वर्णन करून सांगितली होती. तेव्हा त्या कथेतल्या पात्रांसाठीदेखील

ही सीरियल अजून प्रत्यक्षात आलेली नव्हतीच. पण म्हणून काहीच बिघडत नाही. 'एका चांगल्या माणसाला विनाकारण दोष दिला जाणं, आणि नंतर त्याबद्दल माफी मागण्याची संधी काही कारणाने निसटल्यामुळे हळहळ वाटत राहणं' ही थीम, माझ्या मते, या अस्तित्वात नसलेल्या एपिसोडमधून व्यक्त झालेली आहे. मी लावलेला हा अर्थ तुम्हाला न पटल्यास स्वत:चा अर्थ लावायला तुम्हाला पूर्ण मोकळीक आहे. दीर्घकथेत दिलेलं वर्णन ह्यासाठी पुरेसं होतं; आणि ती कथा जर तुम्ही वाचलेली नसेल, तर त्या वर्णनाचं मी केलेलं वर्णनही तितकंच पुरेसं आहे.

'ज्या कलाकृतीचा परिणाम तिच्या प्रत्यक्ष आस्वादावर बव्हंशी अवलंबून नसतो' त्या कलाकृतीला चौसष्ट्तेरा म्हणावं असं काहीसं मला अभिप्रेत आहे. (तो परिणाम कशावर अवलंबून असतो याबद्दल इथे काही म्हटलेलं नाही.) पण अशा प्रकारच्या व्याख्या निर्दोषपणे करणं अवघड आहे, आणि एवीतेवी त्यांच्या उपयुक्ततेबद्दल मला फार शंका आहेत. (इथे गुंतागुंत अशी की 'चौसष्ट्तेरा' हा एपिसोड जर अस्तित्वात असता तर तो बहुतेक चौसष्ट्तेरा राहिला नसता. कदाचित निळू फुल्यांनी चौसष्ट्तेराचं काम आवर्जून बघण्यासारखं केल्यामुळे ते बघणं आपल्याला भाग पडलं असतं.)

(३) 'चौसष्ट्तेरा' या कल्पनेचं हे सर्वांत सोपं उदाहरण असू शकेल. जॉन केजच्या 4'33" ह्या संगीतरचनेमध्ये कलाकार पियानोसमोर येतो, आणि घड्याळ लावून चार मिनिटं तेहतीस सेकंद स्तब्धपणे बसून राहतो. हा कालावधी शांततेचा त्रास व्हावा इतका मोठा आहे, पण ती असह्य व्हावी इतका मोठा नाही. अनेक कॉन्सर्ट हॉल्समध्ये या रचनेचे प्रयोग झालेले आहेत. अशा ठिकाणी महागाची तिकिटं काढून, भारीतले कपडे घालून, दाटीवाटीने बसावं लागल्यामुळे मनावर दडपण येतं; आणि परिणामी बूट घासल्याचे, कार्यक्रमपत्रिका चाळल्याचे, जड श्वासोच्छ्वासांचे किंवा हलक्या खोकल्याचे आवाज काढणं यापलीकडे या चार मिनिटं तेहतीस सेकंदांमध्ये ऐकणाऱ्यांचं योगदान असत नाही. पण जर 19" (एकोणीस सेकंद) किंवा 1°22'55" (एक तास, बावीस मिनिटं, पंचावन्न सेकंद) या अजून अस्तित्वात नसलेल्या संगीतरचनांचे असेच प्रयोग करायचे ठरवले, तर वेगळे अनुभव येऊ शकतील. तेव्हा 4'33" चा संपूर्ण परिणाम लक्षात घेण्यासाठी याही शक्यता मनात धरायला हव्यात; याचाच अर्थ 4'33" ही चौसष्ट्तेरा कलाकृती तितक्याच चौसष्ट्तेरा असलेल्या इतर अनेक कलाकृतींवर अवलंबून आहे.

(४) अमुक एक कलाकृती चौसष्ट्तेरा आहे की नाही, आणि असेल तर किती प्रमाणात, हे ठरवणं काही वेळा सोपं नसतं; उदाहरणार्थ, आन्द्रेस सेरानोचं 'इमर्शन (पिस क्राईस्ट)' हे छायाचित्र. यामध्ये त्याने स्वत:ची लघवी एका काचेच्या जारमध्ये भरून घेऊन, त्यात एक क्रुसिफिक्स बुडवून, फोटो काढलेला आहे.

इथे दोन वेगळे मुद्दे आहेत:

➤ यामागची sacrilege, म्हणजेच पावित्र्यहनन ही कल्पना. ती जाणवण्यासाठी फोटो पाहण्याची गरज नाही; क्रुसिफिक्स ही पवित्र वस्तू आहे, आणि लघवीचा स्पर्श घाणेरडा समजतात इतकं प्राथमिक ज्ञान यासाठी पुरेसं आहे.

➤ चमकत्या द्रवातून दिसणारी क्रुसिफिक्सवर खिळलेली येशू क्रिस्ताची अस्पष्ट आकृती. हा दृश्य परिणाम अनुभवण्यासाठी फोटो पाहण्याखेरीज गत्यंतर नाही असं सुरवातीला वाटतं, पण हे इतकं सरळ नाही. गूगलमध्ये या फोटोवर जर इमेज सर्च केला तर लघवीचा रंग काही प्रमाणात लालसर दिसतो. (सेरानोने फोटो री-टच केला होता, त्याची लघवी तशा रंगाची होती, की इतर काही कारण यामागे आहे, हे मला माहित नाही.) इतकंच नव्हे तर या लालपिवळ्या रंगछटा वेगवेगळ्या वेबसाईट्सवर वेगवेगळ्या दिसतात; तेव्हा मूळ रंग कोणता (आणि या प्रश्नाला काही अर्थ आहे का) याबद्दल अनिश्चिती राहतेच. एका प्रतिमेकडे दोन व्यक्तींनी पाहिलं तर त्यांना तोच रंग दिसतो का, या सैद्धान्तिक आडरानात न शिरताही हा मुद्दा स्पष्ट आहे. मग असं जर असेल, तर फोटोला बगल देऊन हा रंग मनातच पाहिला तर काय बिघडेल? आणि असं जर असेल तर 'पिस क्राईस्ट' ही कलाकृती पूर्णपणे नसली, तरी पुष्कळच चौसष्ट्तेरा आहे असं म्हणता येईल.

या प्रकरणाला एक पुस्ती आहे. फ्रान्समध्ये ॲव्हिन्यॉं शहरातल्या एका प्रदर्शनात हा फोटो ठेवला गेला होता, आणि क्रिस्ताचा अपमान झाल्याबद्दल चिडलेल्या एका माणसाने त्यावर हातोडा मारला. यामुळे तयार झालेल्या नव्या कलाकृतीलादेखील चौसष्ट्तेरा म्हणता येईल, कारण जाड पुठ्ठ्यावर हातोडा मारला तर कसं दिसेल याची ढोबळ कल्पना प्रत्येकाकडे असते.

(५) किरण नगरकरांच्या 'सात सक्कं त्रेचाळीस' या कादंबरीमध्ये शिरीन नावाच्या एका पारशी बाईचं वर्णन येतं:

त्या पारशी बाईच्या खोलीत अजून दिवा जळतोय. पंधरा वर्षं एकटी राहिलेली शिरीन रात्री दोन वाजता दिवा लावून काय करते? उरलेली पंधरा आणि अधिक वर्षं अशीच. लग्न नाही करणार ती. काटक्यांनी बनवलेली. साडीत बांधलेली. तिच्या चोळीच्या गळ्याबाहेर नवजोतपासून घालत आलेला सफेद सदरा. सोललेल्या कोंबडीसारखी. फक्त वरचा तुरा राहिलाय. लिहीत असेल. पुढच्या खेपेला भेटेल तेव्हा वाचावं लागेलच. कुठल्याही घोळक्यामधे तिचा एकलकोंडेपणा तिला हुडकून काढतो. तिच्या इच्छेनुसार, विरुद्ध, नकळत तिला वाळीत टाकतो. आता त्याचं

तिला व्यसन जडलंय. एकमेकांशिवाय त्या दोघांचं चालत नाही. इतकी वर्षं बेकार पडलेलं तिचं मिसळण्याचं इंद्रिय आता काम देईनासं झालंय. तिला एकांत चढतो. तंबाखू दाढांवर गिरवतात तसा ती त्याला स्वत:वर चोळते. मग तल्लफ आली की कविता करायला लागते. आपल्या अलिगढमधल्या बालपणावर. लढाईच्या दिवसांत पाहिलेल्या जय जवानाला उद्देशून एक टापटीप अलिप्त कविता. एकदाच जाणवलेल्या कदाचित प्रेमावर लेझबियनिझमचं दडपण आहे असा भास करून घेते. पॅरिसमधल्या आपल्या अकरा वर्षांना आळवते. शेजाऱ्यांच्या वैकुंठवासी मांजरावर कडवी रचते. एक पान. जास्तीत जास्त दीड पान... आखूड भावनांवर आखूड कविता... तिच्यासारख्याच रक्तहीन. किंचित बेचव. मोजूनमापून आयरनी...

शिरीन आणि कादंबरीचा नायक कुशंक यांच्यातलं जे संभाषण कादंबरीत यापुढे दिलेलं आहे ते इंग्रजीत आहे, आणि एकूण संदर्भावरून शिरीनला फारसं मराठी येत असावं असं वाटत नाही. तेव्हा तिच्या या कविता इंग्रजीत असाव्यात असं समजणं अतार्किक नाही. पण 'लेझबियनिझमचं दडपण' व्यक्त करणाऱ्या कवितेत अध्येमध्ये तुटक फ्रेंच ओळी असूही शकतील. ही कविता काय असेल याबद्दल वाटत असलेलं कुतूहल शमणं फार अवघड आहे. उपलब्ध सामुग्रीच्या आधारे ती स्वत: करून पाहणं हा एक उपाय यावर आहे, पण तोही अंमलात आणणं तितकंच अवघड आहे. एकतर शिरीनचं जे वर्णन दिलेलं आहे त्यावरून तिचं भावविश्व पूर्णपणे निश्चित होतं आणि ती कशा प्रकारच्या कविता करत असेल हे नेमकं समजतं, असं गृहीत धरणं धाष्ट्यीचं ठरेल. आणि जरी समजलं तरीही त्या भावविश्वाचा स्वत: अंगीकार करून तिच्यासारखी कविता करणं हा परकायाप्रवेश फार बिकट आहे. (सर्वसाधारणपणे तंबाखू दाढांवर गिरवल्यानंतर तल्लफ न येता जाते, पण याबाबतीत शिरीन चारचौघींपेक्षा वेगळी आहे. मग इतरही बाबतींत का असणार नाही?)

निष्कर्ष असा की शिरीनची ही कविता चौसष्ट्बारा आहे, कारण चौसष्ट्तेरा होण्यासाठी तिच्यात काहीतरी कमी आहे. पण हे एका आकड्याचं अंतर कितीही प्रयत्न केला तरी कापता येण्यासारखं नाही.

❈

अवतरण

एखादा विचार किंवा एखादी घटना, अल्फा बीटाला सांगतो. अल्फा असं म्हणाल्याचं बीटा गॅमाला सांगतो. हा सगळा प्रकार गॅमा डेल्टाला सांगतो. अशा लांब साखळ्या साहित्यामध्ये अनेक आढळतात.

आर्थर कॉनन डॉइलची 'द "ग्लोरिया स्कॉट"' ही गोष्ट. 'ग्लोरिया स्कॉट' हे इंग्लंडमधून जन्मठेपेच्या कैद्यांना ऑस्ट्रेलियाला घेऊन जाणाऱ्या एका जहाजाचं नाव होतं; या जहाजावर जॅक प्रेंडरगास्ट नावाचा एक कैदी होता. त्याच्या शेजारच्या कोठडीत असलेल्या जेम्स आर्मिटेज नावाच्या कैद्याला तो म्हणाला की माझ्या एका साथीदाराने आपण धर्मगुरू आहोत अशी बतावणी करून या जहाजावर नोकरी धरलेली आहे, आणि बंडाळी करून इथून पळून जाण्याच्या कामी तो आपली मदत करणार आहे. यानंतर अनेक वर्षांनी (मध्यंतरी बऱ्याच घडामोडी होऊन गेल्यानंतर) जेम्स आर्मिटेज इंग्लंडमध्ये परत आला, आणि ट्रेव्हर या बनावट नावाने राहू लागला. त्याने या सगळ्या घटनांचं वर्णन करणारं एक पत्र आपला मुलगा व्हिक्टर ट्रेव्हर याला उद्देशून लिहिलं, आणि तिजोरीत ठेवून दिलं. ट्रेव्हरच्या मृत्यूनंतर हे पत्र व्हिक्टरने आपला मित्र शेरलॉक होम्स याला दाखवलं. होम्सने ही सर्व कथा वॉटसनला सांगितली, आणि (अर्थात काल्पनिक) वॉटसनने लिहून ठेवलेली ही गोष्ट आपल्याला वाचायला मिळते.

मेरी शेलीची 'फ्रँकेन्स्टाईन' ही कादंबरी पत्रसंग्रहाच्या स्वरूपात लिहिलेली आहे. उत्तर ध्रुवावर चाललेला रॉबर्ट वॉल्टन नावाचा खलाशी प्रवासात असताना इंग्लंडमध्ये राहणाऱ्या मार्गारेट नावाच्या आपल्या बहिणीला पत्रं पाठवतो. तो लिहितो की मला व्हिक्टर फ्रँकेन्स्टाईन नावाचा एक माणूस भेटला. त्याच्या वृत्तांतानुसार त्याने प्रयोगशाळेमध्ये, मानवसदृश पण अत्यंत हिडीस दिसणारा असा एक प्राणी तयार केला होता. तो प्राणी नंतर निसटून गेला, आणि अनेक वर्षांनी ध्रुवीय प्रदेशात फ्रँकेन्स्टाईनला पुन्हा भेटला. त्यावेळी दोघांचं एक दीर्घ संभाषण झालं, तेव्हा निसटल्यानंतर आपण काय केलं हे प्राण्याने सांगितलं. प्राणी म्हणाला की द लेसी नावाच्या एका आंधळ्या शेतकऱ्याशी माझा स्नेह जडला, आणि तो मला म्हणाला की जगात तुला कोणी मित्र नाही हे दुर्दैव खरं, पण तरीही तू निराश होऊ नकोस.

अल्फा बीटाला जे सांगतो, ते बीटानेच गॅमाला सांगितलं पाहिजे असं नाही. येनकेनप्रकारेण गॅमाला ते कळलं तर साखळी पुढे चालू होते. बाणभट्टाच्या 'कादंबरी'मध्ये कपिंजल आणि पुंडरीक हे दोघे तरुण संन्यासी एकमेकांचे स्नेही असतात. पुंडरीकाला गंधर्वकन्या महाश्वेतेबद्दल कमालीची आसक्ती वाटू लागते आणि तो पिसाळून जातो. कपिंजलाला तो म्हणतो, " माझ्या अवयवांचा दाह होतो आहे. मी जिवंत आहे,

तोवर या मदनज्वरावर उपाय शोधला पाहिजे." ही हकिकत कपिंजल महाश्वेतेला सांगतो. तद्नंतर पुंडरीक मरतो, आणि कालांतराने ही आपली कर्मकहाणी महाश्वेता चंद्रापीडाला सांगते. जाबाली नावाच्या योग्याला चंद्रापीडाच्या आयुष्यातल्या घटना अंतर्ज्ञानाने ठाऊक होतात, आणि त्या तो वैशंपायन नावाच्या पोपटाला सांगतो. पोपट हे सर्व राजा शूद्रकाला सांगतो.

अध्याहृत असलेली संभाषणं जमेला धरली तर अशी साखळी काही वेळा आणखी मोठी होते. जहाजावरचा हा साथीदार धर्मग्रंथांच्या प्रती वाटण्याच्या मिषाने जेव्हा कैद्यांच्या कोठड्यांना भेट देत असे, तेव्हा बंडाळीसाठी उपयोगी पडावीत म्हणून कैद्यांना वाटायला तो शस्त्रं घेऊन येत असे. आपण असं करणार आहोत हे आधी त्याने प्रेंडरगास्टला सांगितलं आणि प्रेंडरगास्टने ते आर्मिटेजला कळवलं, असं जरी गोष्टीत उघड लिहिलं नसलं, तरीपण असा काही प्रकार घडला असणार हे समजून घेण्यासारखं आहे.

त्रिकोण तुलनेने दुर्मीळ असावेत. प्र. कृ. गाडगीळांच्या 'ऋणानुबंध' या कादंबरीत, पाण्याची पातळी वाढू लागताच पिल्लाला पायाखाली घालून स्वत: तरणाऱ्या माकडिणीची गोष्ट जगदीश निमाला सांगतो, आणि 'मरता मरता त्या पोराच्या मनात कोणते विचार आले असतील?' असा प्रश्न तिला विचारतो. हे संभाषण निमा पत्र लिहून अप्पांना कळवते. अशा मजकुराचं पत्र निमाकडून आपल्याला आल्याचं अप्पा पत्र लिहून जगदीशला कळवतात.

इथे मी महाभारताचा विचार केलेला नाही.

◆ ◆

बुद्धिबळं

१

वसंत कानेटकरांच्या 'गाठ आहे माझ्याशी' या नाटकातला एक प्रवेश. विश्वजित हा एक नामांकित वकिल आणि त्याच्या घरातला जुना नोकर पठ्ठे ही दोन पात्रं स्टेजवर आहेत. या दोघांनी सकाळीच बुद्धिबळं खेळायला सुरुवात केली होती, पण त्यानंतर डाव अर्धवट टाकून विश्वजित कोर्टात गेला होता. आता तो संध्याकाळी परतलेला आहे, आणि खेळ पुन्हा सुरू होण्याच्या बेतात आहे.

पठ्ठे: (गडबडून) डाव पुढे चालू करायचा साहेब?

विश्वजित: मग? मी काय तुझ्यापुढं आरती ओवाळून घ्यायला बसलोय?

[त्या बरोबर पठ्ठे – "तयारी साहेब" असे उद्गारत चटकन वळून आपली खेळी खेळतो. पहिल्या छूट विश्वजितचा उंट उडवून आपला घोडा त्या जागी ठेवीत, क्षणमात्र न थांबता तो बूट ठेवण्यासाठी आत पळतो. विश्वजित क्षणभर चकित होत डावातील ही पडझड न्याहाळत राहतो. तेवढ्यात पठ्ठे सपाता घेऊन परत येतो आणि विश्वजितच्या पायात सरकवतो. मग तो त्याला कोट आणि शर्टाची गळपट्टी काढायला मदत करू लागतो. हे चालले असतानाच –]

विश्वजित: चांडाळा, आपल्या घोड्यानं तू माझा उंट मारलास?

पठ्ठे: (काम करताना थंडपणे) होय साहेब.

विश्वजित: (डाव न्याहाळत) आणि दुष्टा, आता हत्तीनं माझा वजीर ठेचायचा तुझा बेत आहे?

पठ्ठे: तुम्ही वजिराला मागे घेतला नाहीत तर नक्कीच.

विश्वजित: (डाव पाहात) थांब, थांब...तेवढंच नाहीय. अरे चोरा ऽ ऽ ! पठ्ठ्या, तू एक नंबरचा इरसाल दगाबाज इसम आहेस. कट कारस्थान रचण्याच्या आरोपाखाली तुला आठ दिवस पोलिसांच्या लॉकपमधेच लटकावला पाहिजे.

पठ्ठे: (भोळी मुद्रा करून) काय झालं साहेब?

विश्वजित: इथून पुढल्या चौथ्या डावात (खेळीत? - जाणकार प्रेक्षकाचा भुवया आक्रसून स्वत:ला प्रश्न) तू माझ्यावर मात करण्याचा व्यूह रचला आहेस. (दरडावून) खरं आहे की नाही?

पठ्ठे: खरं आहे साहेब.

विश्वजित: हरामखोरा, मी कोर्टात गेलो म्हणजे आपलं काम टाकून तू इथं उभा राहतोस आणि फक्त पुढल्या डावपेचांचा विचार करीत बसतोस!

पठ्ठे: काम टाकून नाही साहेब, काम करता करता आणि त्यासाठी सतत इथं उभं राहायची गरज नसते साहेब. डोक्यात हा पट सदैव मांडून ठेवलेलाच आहे साहेब.

विश्वजित: (थक्क होत) आं? काय म्हणालास?

पठ्ठे: (जाण्यासाठी वळत) साहेब हा पट कोणीही उधळून टाकला तरी मी तो पुन्हा मांडू शकतो, जसाच्या तसा – केवळ स्मरणातून. [कोट घेऊन आत पळतो. विश्वजित चक्रावून बघतच राहतो. क्षणार्धात पठ्ठे कपडे घेऊन येतो आणि –] साहेब, हा आपला झब्बा, आणि हा पायजमा –

विश्वजित: (उसळून, हिसकावून घेत, भिरकावीत) फेकून दे गटारात... (त्याचं मनगट पकडीत) काय रे लुच्चा, पुढले चार चार डाव (खेळया? - जा.प्रे.) डोळयापुढं ठेवून खेळी खेळायची ही अक्कल कोणी शिकवली तुला? अं? कोण गुरू भेटला तुला?

पठ्ठे: आपणच साहेब.

विश्वजित: मी ऽ ऽ ऽ ? (उलगडा पडून, खुलून, मनगट सोडीत) हां हां ऽ ऽ म्हणजे जिमखान्यात टूर्नामेंटस् मधला माझा गेम पाहिला आहेस तू.


–

एकतर अत्यंत क्षमाशील, नाहीतर बुद्धिबळ या विषयात बिलकुल ठोंब्या, असा प्रेक्षक वगळता इतर कुणालाही हा प्रवेश पचनी पडणं अवघड आहे. खेळ पुन्हा सुरू करण्याच्या वेळी विश्वजितची पोझिशन इतकी वाईट असली पाहिजे की तो पुन्हा सुरू करण्याची तसदी घेतलीच का, हे कळत नाही. शिवाय प्रतिस्पर्ध्याची वाईट पोझिशन पठ्ठेच्या ताबडतोब लक्षात येऊ नये, आणि त्याने ती इतका वेळ विचार करण्याच्या योग्यतेची समजावी, हेही त्याला भूषणावह नाही. चार खेळयांनंतर आपल्यावर मात होणार हे गणित जर करता येत असेल, तर याचा अर्थ विश्वजितकडे थोडंफार तरी कौशल्य असणारच, पण मग तरीही तो आधी इतका भिकार का खेळला हे समजत नाही. ह्या 'जिमखान्यातल्या टूर्नामेंटस्' चा उल्लेख रहस्यमय वाटतो. असा खेळूनही जर विश्वजितचा या टूर्नामेंटस् मध्ये निभाव लागत असेल, तर जिमखान्याचे इतर मेंबर्स काय कुवतीचे असतील याची कल्पनाही करवत नाही. एकूण पदार्थ जमलेला नाही. प्रवेशातल्या आक्रस्ताळेपणामुळे त्यात जो थोडाफार विनोद उत्पन्न झालेला आहे, त्यामुळे प्रवेश जास्त सुसह्य होतो की कमी, यावर मी मत देत नाही.

मी नाटक वाचलेलं असलं तरी पाहिलेलं नाही. आपल्याला विचारी वाचक लाभावा अशी काही लेखकांची इच्छा असते, त्यानुसार मी ही पोझिशन कशी असू शकेल ह्यावर विचार केला आणि

एक शक्यता रचून पाहिली, ती पुढे देतो आहे. (पठ्ठे आणि विश्वजित यांच्या सामाजिक स्तरांतला फरक लक्षात घेऊन मी त्यांना अनुक्रमे काळे आणि पांढरे मोहरे दिलेले आहेत.)

पठ्ठे



विश्वजित

असं समजा, की सकाळी खेळ थांबला तेव्हा पठ्ठेचा घोडा d5 या घरावर होता, आणि f4 वर असलेला विश्वजितचा उंट आत्ता संध्याकाळी त्याने खाल्लेला आहे. त्यामुळे विश्वजितच्या वजिरावर d7 वरच्या हत्तीचा जोर पडलेला आहे. याखेरीज पठ्ठे आपला वजीर g2 वर नेऊन मात देऊ पाहात असल्यामुळे विश्वजितला त्या घराची राखण करणं भाग आहे. विश्वजितकडे फारसे पर्याय उरलेले नाहीत, पण तरीदेखील त्याने जर आपला वजीर h2 वर हलवला, तर मरण जास्तीतजास्त लांबणीवर पडतं. पण मग त्यापुढे

काळा हत्ती d2 वर,

पांढरा वजीर काळ्या हत्तीला खातो, काळा वजीर h1 वर जाऊन शह,

पांढरा राजा f2 वर, काळा वजीर g2 वर येऊन मात,

अशा प्रकारे काळ्याच्या चौथ्या खेळीला कारभार आटोपतो.

नाटक आणि सिनेमा यांत एक फरक आहे. सिनेमात बुद्धिबळाचा खेळ दाखवताना कॅमेरा बहुतेक अशा पद्धतीने लावला जातो की पट प्रेक्षकांना स्पष्ट दिसतो. नाटकाच्या प्रयोगातला पट सहसा प्रेक्षकांना इतका नीट दिसत नाही. तेव्हा या नाटकावर सिनेमा काढायचा झाला तर वरच्या चित्राचा उपयोग होऊ शकेल. पण यातला तोटा असा की प्रवेश अकुशलपणे लिहिलेला आहे, हे जास्त लवकर उघडकीस येईल.


२

मार्टिन एमिसच्या 'मनी (Money)' या कादंबरीचा नायक जॉन सेल्फ हा लंडनला एका जाहिरात कंपनीत काम करत असतो. फील्डिंग गुडनी नावाचा प्रोड्यूसर त्याला सिनेमा काढण्यासाठी न्यूयॉर्कला बोलावून घेतो. बऱ्याच घडामोडी होऊन या प्रकरणात जॉन पुरता बुचाडला जातो, आणि स्वत:कडचे सगळे पैसे गमावून कसाबसा लंडनला परततो. यानंतर त्याला लंडनमध्ये हिंडताना अधूनमधून एक तरुण ओझरता दिसू लागतो. आधी जॉनला या तरुणाचा तोरा आवडत नाही, आणि हा लेखक आहे असं कुठूनतरी कळल्यावर त्याचं मत आणखी वाईट होतं. या तरुणाचं नाव असतं 'मार्टिन एमिस'. एकदा एका रेस्टॉरंटमध्ये दोघांची ओळख होते, यानंतर दोघांचं एकमेकांशी थोडंफार जमू लागतं, आणि फील्डिंगने जॉनला कसकसा घोळात घेतला असणार हे एकदा त्याला मार्टिन तपशिलवार समजावून सांगतो.

कादंबरीच्या शेवटी हे दोघे पैसे लावून बुद्धिबळाचा डाव खेळतात. (बोली ठरवण्यासाठी ते

बॅकगॅमनमधला डबलिंग क्यूब वापरतात.) जॉनला स्वत:च्या हुशारीबद्दल माज असल्यामुळे खेळ चालू असताना तो अव्वाच्या सव्वा बोली वाढवत राहतो. मार्टिन खेळत राहतो. शेवटी पोझिशन अशी होते:

जॉन



मार्टिन

पांढऱ्या प्याद्यावर काळ्या राजाचा जोर आहे, आणि काळ्या प्याद्यावर पांढऱ्या राजाचा. प्रत्येक प्याद्याला आपापल्या राजाचा पाठिंबा आहे. पण काळ्या राजाला b5 वर आणि पांढऱ्या राजाला d4 वर मज्जाव असल्यामुळे, या क्षणी ज्या कुणाची खेळी असेल त्याला आपल्या प्याद्यामागचा पाठिंबा काढून घ्यावा लागेल, आणि पुढच्या खेळीला त्या प्याद्याचा बळी जाईल. थोडक्यात म्हणजे, ज्या कुणाची खेळी तो हरेल. अशा स्थितीला बुद्धिबळाच्या परिभाषेत zugzwang (त्सुगत्स्वांग) म्हणतात. शब्द जर्मन आहे, आणि त्याचा ढोबळ अर्थ 'जागा

सोडण्याची सक्ती'. प्रत्यक्षात कादंबरीत या पोझिशनमध्ये कुणाची खेळी असते आणि म्हणून कोण हरतो, हे मी इथे लिहित नाही.

कादंबरी वाचताना या सगळ्या प्रकारामुळे चिडचिड होते; निदान माझी झाली. आपण साहित्यकृती जेव्हा वाचतो जेव्हा त्यातलं जग (काही प्रमाणात) लेखकाने आपल्या लहरीनुसार निर्माण केलेलं आहे, आणि त्यातल्या पात्रांचं तो वाटेल ते करू शकतो, हे आपल्याला ठाऊक असतंच. पण त्याने आपल्याला पालथं पाडून बखोट्यावर बुटाची टाच ठेवून या गोष्टीची आठवण करून देऊ नये अशी वाचकाची अपेक्षा असते. लेखक जर दादागिरी करू लागला तर वाचकाला बंड करण्याची खुमखुमी येते. तोही हतबल नसतो. कादंबरीच्या कथानकात मनोमन फेरफार करून, म्हणजेच स्वत:च्या डोक्यात तिचं पुनर्लेखन करून, तो कादंबरीकारावर सूड घेऊ शकतो. 'मनी' बाबत मी हेच केलेलं आहे. म्हणजे मूळ कादंबरीत जो जिंकला त्याला मी मनोमन हरवलेला आहे, आणि जो हरला त्याला जिंकवलेला आहे. यासाठी कादंबरीच्या कथानकात करावा लागलेला बदल अगदी किरकोळ असल्यामुळे मला विशेष तोशीसही पडली नाही; म्हणजे नसलेल्या प्रसंगांची आणि पात्रांची तरतूद करावी लागणं आणि असलेल्यांना मनातून पुसावं लागणं, असं काही करावं लागलं नाही. सारांश, मार्टिन एमिस विरुद्ध मी, या चुरशीच्या डावात माझा प्रतिस्पर्धी हरलेला आहे.

३

अनिकेत कुरुंदकरांच्या 'कित्ता' ह्या कथासंग्रहात एकमेकांशी जोडलेल्या सहा कथा आहेत, पण त्यांना वेगवेगळी नावं नाहीत. यांपैकी दुसऱ्या कथेत सीतिदोस आणि सैतान यांतला बुद्धिबळाचा डाव आहे.

बायबलातल्या जुन्या करारातली इयोबची कथा थोडक्यात अशी: इयोब नावाचा एक गडगंज श्रीमंत माणूस देवाचा भक्त असतो. त्याचा छळ करण्याची देव सैतानाला परवानगी देतो. सैतान लुटारूंच्या टोळ्या पाठवून इयोबची सगळी गुरंढोरं चोरून नेतो आणि त्याच्या गुलामांची कत्तल करवतो; याखेरीज इयोबचे सात मुलगे आणि तीन मुली एकत्र जेवत असताना अख्खी इमारत कोसळवून सगळ्यांना ठार मारतो. इतकं होऊनही इयोब देवाला दोष देत नाही असं पाहून


सैतान त्याच्या अंगभर गळवं आणतो, आणि त्यांतून पू वाहायला लावतो. इयोब अंगाला राख फासून शोक करत असताना त्याचे तीन स्नेही त्याचं सांत्वन करायला येतात. हे चौघेजण 'देव चांगल्या लोकांचं वाईट का होऊ देतो' किंवा 'का करतो' या विषयावर, भ्रमिष्ट माणसाने लिहिलं असावंसं वाटणारं आणि वाचायला तापदायक संभाषण करतात. शेवटी देवाच्या कृपेने इयोबला गेलेली सगळी संपत्ती परत मिळते आणि नवीन दहा मुलंदेखील होतात. ही कथा इसवी सनापूर्वी पाचेकशे वर्षं आधी लिहिली गेली असावी, असा अंदाज आहे. इयोबच्या बायकोचा उल्लेख कथेत अगदी त्रोटकपणे आलेला आहे, पण तिचं नाव मात्र दिलेलं नाही. इयोबवर संकटं कोसळल्यानंतर ती त्याला म्हणते: देवाला शिव्या देऊन मरून जा. इयोब हा सल्ला मानत नाही. असा चुकीचा सल्ला दिल्याचं प्रायश्चित्त तिला आणखी दहा बाळंतपणं सहन करून घ्यावं लागतं हे उघड आहे.

यानंतर पाचसहाशे वर्षांनी (म्हणजे इसवी सन सुरू होण्याच्या एखादं शतक आगेमागे) या कथेचा आधार घेऊन दुसरी एक कथा लिहिली गेली. हिला इंग्रजीत 'The Testament of Job' असं नाव आहे. चर्चने ही apocryphal (अप्रमाण) ठरवली असल्यामुळे बायबलात अंतर्भूत नाही. या कथेतली पात्रं बहुतेक आधीचीच असली, तरी कथानक पुष्कळच बदललं आहे. इयोबच्या बायकोचं नाव सीतिदोस असं दिलेलं आहे, आणि कुटुंबाची वाताहत झाल्यानंतर ब्रेड विकत घेण्यासाठी पैसे नसल्यामुळे ती सैतानाबरोबर आपल्या डोक्यावरच्या केसांचा सौदा करते, असा प्रसंग घातलेला आहे.

कुरुंदकरांच्या कथांतून दिसून येणारा त्यांचा स्वभाव पाहता, त्यांच्यासाठी इतकी किल्ली पुष्कळ झाली. एकदा बदललेली कथा पुन्हा का बदलू नये? सीतिदोस, आणि सत्यवानाच्या प्राणासाठी यमाशी हुज्जत घालणारी सावित्री, या त्यांना बहिणी वाटतात. (नाहीतरी महाभारत त्याच काळाच्या आसपास लिहिलं गेलं असावं; म्हणजे या दोघी तशा समकालीन ठरतात.) त्यांच्या कथेतला सैतान देवाकडून इयोबच्या छळाची परवानगी घेऊन त्याच्या दाराशी हजर होतो. सीतिदोस सैतानाला म्हणते की आपण बुद्धिबळाचा डाव खेळू. जर तू मला हरवलंस तर माझ्या कुटुंबावर वाटेल ती संकटं आणायला तुला मुभा असेल, पण जर मी तुला हरवलं तर मात्र तू आमच्या केसालाही धक्का न लावता परत जायला हवंस. सैतान हे मान्य करतो, आणि डाव

सुरू होतो. सैतान स्वखुषीने काळे मोहरे पत्करतो. एका रात्रीत एक खेळी, अशा १०८ रात्रींनंतर (कुरुंदकरांना थोडासा मिस्टिसिझमचा सोस आहे), या पोझिशनमध्ये पुढची खेळी सीतिदोसची आहे:

सैतान



सीतिदोस

जर सीतिदोसने राजा g1 वर आणला, तर डाव बरोबरीत सुटतो तो असा: काळा राजा f3 वर, पांढरा राजा f1 वर, काळं प्यादं g2 वर येऊन शह, पांढरा राजा g1 वर. आता पुढच्या खेळीला काळ्या राजाला एकतर आपल्या प्याद्यामागचा पाठिंबा काढून घ्यावा लागेल (आणि प्यादं खाल्लं जाईल), किंवा g3 वर तरी यावं लागेल. पण मग तसं केल्यास पांढऱ्या राजाला एकही खेळी उरत नाही. याला बुद्धिबळाच्या परिभाषेत stalemate (शिळीमात) म्हणतात.

पण सीतिदोसने राजा f1 (किंवा h1) वर आणला तर ती डाव हरते. उदाहरणार्थ, f1 वर आणला तर काळा राजा f3 वर, पांढरा राजा g1 वर, प्यादं g2 वर; यानंतर आता पांढऱ्या राजाला नाईलाजाने h2 वर जावं लागतं, आणि काळ्या राजाला f2 वर येण्याची मुभा मिळते. त्याच्या पुढच्याच खेळीला प्याद्याचा वजीर होतो आणि मग लवकरच पांढऱ्यावर मात होते.

निर्णय अवघड आहे. डाव बरोबरीत सुटला तर काय करायचं याबद्दल करारात काहीच तरतूद नाही. त्यामुळे तशी परिस्थिती उद्भवली (आणि तीही परस्परसंमतीने नव्हे तर मार्ग खुंटल्यामुळे), तर सीतिदोस, सैतान आणि वाचक हे तिघेही संहितेबाहेर जातील. याउलट सीतिदोस हरली तर तिच्यावर संकटं येतील हे खरं, पण तिला ती नको आहेत हे आपल्याला नक्की ठाऊक नाही. शेवटी सीतिदोसच्या आणि इयोबच्या आयुष्यासमोरचा प्रश्न दु:ख टाळणं हा नसून, ते आपणहून ईश्वराभिमुख होऊन स्वीकारणं हा आहे. (कुंती श्रीकृष्णाकडे प्रार्थना करते की 'विपद: सन्तु न: – आमच्यावर विपत्ती येत राहोत, म्हणजे तू वारंवार भेटत राहशील'.) ही भूमिका एका अर्थी जाणतेपणाची आहे, आणि एका अर्थी हास्यास्पद आहे.

सीतिदोस विचारमग्न असताना कुरुंदकरांनी कथा तिथे संपवलेली आहे, त्यामुळे ती कुठली खेळी करते हे आपल्याला कळत नाही. एक लेखक म्हणून त्यांनी घेतलेला (किंवा वास्तविक मुद्दाम न घेतलेला) हा निर्णय मला एमिसविरुद्धच्या तुलनेत अधिक प्रगल्भ वाटतो.

⁕

संदर्भ

- एमिस, मार्टिन: 'मनी', जोनाथन केप प्रकाशन, लंडन, १९८४.
- कानेटकर, वसंत: 'गाठ आहे माझ्याशी', परचुरे प्रकाशन, मुंबई, १९८०.
- कुरुंदकर, अनिकेत: 'कित्ता', संवादिनी प्रकाशन, सागर, १९६९.

⁕ ⁕

स्थळ: दिवाणखाना

(स्टेजच्या डाव्या बाजूला स्वयंपाकघराकडे जाणारे दार. दाराजवळच्या स्टुलावर एक टेलिफोन आहे. त्यावरील रीडायलचे बटण इतर बटणांच्या मानाने जास्त झिजलेले दिसावे.)

नाटकाच्या संहितेत जसे पात्रांमधले संवाद असतात, तशा प्रयोग करणाऱ्यांसाठी सूचना देखील असतात. क्वचित प्रसंगी या सूचनांमध्ये अति बारकाई आढळते.

युजीन ओ'नीलच्या 'A long day's journey into night' या नाटकात, जेम्स आणि मेरी टायरोन हे आईबाप, आणि त्यांची दोन मुलं अशी पात्रं आहेत. नाटककाराने, मोठा मुलगा जेमी याचं वर्णन दिलेलं आहे ते असं: 'He has fine brown eyes, their color midway between his father's lighter and his mother's darker ones.' प्रयोगासाठी पात्रांची निवड करताना, जेमीच्या भूमिकेसाठी बाकी पूर्णपणे अनुरूप पण चुकीच्या रंगाची बुबुळं असणारा नट समोर आला, तर प्रश्न निर्माण होईल.

गो.पु. देशपांड्यांच्या 'अंधारयात्रा' मध्ये नायिका वसुंधरेचे, दौलतराव आणि श्रीपाद अशा (किमान) दोन पात्रांशी लैंगिक (आणि इतर बाबतीत गुंतागुंतीचे) संबंध आहेत. दुसऱ्या अंकाच्या पाचव्या प्रवेशात वसुंधरेच्या नाकाच्या धारेवरून दौलतराव बोट फिरवतो. पुढे सातव्या प्रवेशात वसुंधरेच्या नाकाच्या धारेवरून श्रीपाद तर्जनी फिरवतो. या ठिकाणी नाटककाराची सूचना अशी आहे की 'त्या दोघांच्या ते करण्यात फरक असला पाहिजे.' आता दोघांनी ही कृती एकसारखीच करण्यामुळे काँग्रेस पक्षातला राजकारणी आणि मार्क्सवादी विचारांचा प्राध्यापक यांच्यात ज्याची गल्लत होईल, असा कुणी प्रेक्षक असेलसं मला वाटत नाही.

◆ ◆

लोकशाही राज्यपद्धतीचे फायदे व तोटे

सूर्याच्या लालभडक वर्तुळावर समुद्राने आखलेली जीवा जसजशी अधिकाधिक लांब होऊ लागली, तसतशी शीडकाठीभोवतालची खलाशांची दाटी वाढत चालली. एकोणीसचाचाने एव्हाना पूजा संपवत आणली होती. ताम्हन खाली ठेवून त्याने डावा हात गलबताबाहेर काढला, आणि समुद्रफेसाचे तीन पुंजके तळहाताच्या खळग्यात उचलून घेतले. उजव्या हाताच्या तर्जनीने ते एकत्र करून नारळाच्या खरखरीत पृष्ठभागावर त्याने ओली परीघरेषा काढली. बदामी लाकडातून बनवलेल्या सहा आऱ्यांच्या चक्राची बोथटलेली कड त्याने त्या रेषेवर लावून धरली, आणि आता मागे उंचावलेला हात वेगाने खाली आदळताच बद्द आवाज होऊन एक रुंदट चीर नारळावर दिसू लागली. मूर्तीच्या पायाशी ठेवलेली साकळलेल्या रक्ताच्या रंगाची कापडी चंची त्याने नारळपाण्याने भिजवून काढली. भकले अर्धवट उघडी मांडून ठेवून त्याने हातांत दोन झांजा घेतल्या आणि स्वत:चा उंच किनरा आवाज इतरेजनांत मिसळून दिला.

सुखहर्ता दुखहर्ता वार्ता विघ्नाची ।
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।।
सर्वांगी सुंदर उटी शेंदुराची ।
कंठी झळके माळ कात्या कवत्यांची ।।

जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती ।
दर्शनमात्रे मन कामना पुरती जयदेव जयदेव ।।

...

आरत्या संपल्या आणि मंत्रपुष्पांजली म्हणून झाली. सराईत हातांमध्ये जडशीळ कोयता धरून एकोणीसचाचा खोबऱ्याचा पृष्ठभाग कोरू लागला. मूर्तीपासून पंधरावीस फुटांवर हातपाय बांधून बसवलेल्या आगंतुकाच्या अनुत्सुक तोंडात त्याने एक लहानसा तुकडा कोंबला. दोघाजणांनी पुढे होऊन

त्याच्या अवयवांना जखडणारे दोरखंड सैल करून काढून टाकले. मनगटे चेहऱ्यासमोर आणून आगंतुकाने त्यांच्यावर फुंकर घातली ही गोष्ट जरी खरी असली, तरीदेखील त्यांच्या भगभगत्या लालसरपणाचा त्याला विशेष त्रास होतो आहे असा समज पाहणाऱ्याचा झाला नसता.

※

“सूर्यास्त होऊन गेलेला आहे,” आठकाकू म्हणाली. “तासाभरात पानं मांडली जातील. ताज्या नारळाचे मोदक असतील. सगळ्यांबरोबर तूही जेव आणि शांत झोप घे. कोरडे कपडे, तीन दिवस पुरेल इतका शिधा, पखालभर पाणी आणि एक तराफा इतकं तुला उद्या सकाळी देण्यात येईल. आमच्याबद्दल कोणाहीकडे तू अवाक्षर काढणार नाहीस एवढं वचन आम्हाला दे, आणि तुझ्या वाटेने तू परत जा.”

“तुम्ही लोक कोण आहात?” आगंतुकाने विचारलं.

“तुझी नाव आम्ही अडवली आणि पंचवीस हिरे असलेली तुझ्याकडची चंची हस्तगत केली ह्या घटनेकडे पाहून आम्ही चाचे आहोत असा संशय कोणालाही येईल,” एकोणीसचाचा म्हणाला. “तो खरा आहे, पण आमची दहशत बाळगण्याचं तुला कारण नाही. तुझ्याकडून जे मिळण्यासारखं होतं ते आम्हाला मिळालेलं आहे. यापुढे तुला इजा करण्यात आम्हाला रस नाही.”

“पण असा विश्वास मी कशाच्या आधारे बाळगू?” आगंतुकाने विचारलं.

“कारण डोळस स्वार्थ हा आमचा धर्म आहे,” एकोणीसचाचा म्हणाला. “ऐहिक सुखाची प्राप्ती करून घेण्याकरता माणसाने आपली बुद्धी खर्ची घालावी असं आमचं जीवनविषयक तत्त्वज्ञान आहे, आणि ह्या उद्दिष्टासाठी जितकी गरजेची आहे तितकीच हिंसा आम्ही करतो. त्यापेक्षा जास्त नाही किंवा कमी नाही. आम्ही बुद्धिमत्तेचे आणि म्हणूनच गणपतीचे पूजक आहोत. पण आमच्या गणपतीच्या गळयात नररुंडांची माळ आहे हे तू पाहतोच आहेस. आमचा गणपती आम्हाला सबुद्ध निर्दयपणा शिकवतो. जर

लोकायतपंथीय लोक गणपतीचे भक्त असते तर जसे असते तसे आम्ही आहोत. पण चौथ्यापाचव्या शतकात जेव्हा गणपती हा देव प्रसिद्ध झाला त्याच्या कित्येक शतके आधीच ते होऊन गेल्यामुळे त्यांना हे शक्य नव्हतं. जावा बेटाजवळच्या समुद्रात आमचं गलबत असताना एका पडक्या देवळातून ही मूर्ती आम्ही उचलून आणली.”

“ठीक आहे, पण स्वसंरक्षण हा माझा धर्म मी पाळला याबद्दल तुम्ही मला दोष देऊ नये,” आगंतुक म्हणाला. “माझ्याजवळ बंदुक होती, तिच्यातून एक प्रतीकात्मक गोळी हवेत झाडायची तेवढी मी झाडली. अर्थात तिचा उपयोग असा होणार नव्हताच, आणि तुमच्या हाती मी सापडायचा तो शेवटी सापडलो.”

“असा दोष आम्ही तुला कधीही देणार नाही, कारण स्वसंरक्षणाचा हक्क आम्हा सर्वांना मान्य आहे,” आठकाकू म्हणाली. “तेव्हा ती काळजी नको. तू आता आमचा पाहुणा आहेस. आज गणेशचतुर्थीनिमित्त खास जेवण तर आहेच पण त्यानंतर वाढदिवसाचा केकसुद्धा आहे, तेव्हा पोटात जागा ठेव.”

“वाढदिवस?” आगंतुकाने विचारलं.

“हो, आज वाढदिवस आहे,” आठकाकू म्हणाली.

“कुणाचा?”

“आमचा.”

आगंतुकाला अर्थबोध झाला नव्हता.

“गणेशचतुर्थी हा आम्हा सर्वांचा तिथीप्रमाणे वाढदिवस असतो,” एकोणीसचाचा म्हणाला. “तुला आमचा थोडा विस्ताराने परिचय करून देतो, म्हणजे तुझा गोंधळ मिटेल. आमच्यातला सर्वात धाकटा १-चाचा. आज तो १८ वर्षांचा होतो आहे, आणि त्याची बायको २-काकू १९ वर्षांची होते आहे. यानंतरचं जोडपं म्हणजे ३-चाचा आणि ४-काकू, ते अनुक्रमे २० आणि २१ वर्षांचे होताहेत. यानंतर ५-चाचा, ६-काकू, ७-चाचा, ८-काकू असं पुढे जात जात आमच्यातलं सर्वात म्हातारं माणूस म्हणजे ८२-काकू. ती आज ९९ वर्षांची होते आहे. माझं नाव १९-चाचा, याचा अर्थ मी आज एकोणीस अधिक सतरा मिळून छत्तीस वर्षांचा होतो आहे. दर गणेशचतुर्थीला, म्हणजेच आमच्या वाढदिवशी, आम्ही शिलंगणाला बाहेर पडतो.

त्याप्रमाणे आमच्या तावडीत आज तू सापडलास, आणि तुझा पाडाव करून तुझ्याकडचे हिरे आम्ही काबीज केले. 'शिलंगणाचं सोनं' याचा अर्थ शब्दश: घ्यायचा नसतो."

"पण तुम्ही अनेकजण होता आणि मी एकटा होतो."

"मान्य, पण हा आमचा दोष नाही. धर्मयुद्धाचे जे नियम आम्हाला निर्बुद्ध वाटतात ते आम्ही पाळत नाही."

"पण आजच तुम्हा सर्वांचा वाढदिवस आहे हे कसं?"

"हा योगायोग नव्हे," ८-काकू म्हणाली. "तर त्यामागे निश्चित अशी योजना आहे. दर गीताजयंतीला, म्हणजेच मार्गशीर्ष शुद्ध एकादशीला, आम्ही गीतापठणाची स्पर्धा घेतो. इच्छुक तरुण जोडपी त्यात भाग घेतात. जे जोडपं पहिलं येईल त्याला बक्षीस म्हणून त्या रात्री संभोग करण्याची अनुमती मिळते. दुसऱ्या अध्यायातल्या सत्तेचाळीसाव्या श्लोकाप्रमाणे हा संभोग फलाची अपेक्षा न धरता करायचा असतो, पण आमचा अनुभव असा की त्याचं फळ नऊ महिन्यांनी म्हणजे गणेशचतुर्थीला हमखास मिळतंच. १२-काकू ओली बाळंतीण असल्यामुळे आज विश्रांती घेते आहे, नाहीतर ती स्वयंपाकात नेहमी पुढे असते."

"पण मग तुम्हा सर्वांची मुलं कुठे आहेत?"

"कोणताही धर्म स्वीकारायचा तर तो स्वेच्छेने स्वीकारायला हवा. ज्या वयात बुद्धी अजून परिपक्व झालेली नसते आणि स्वत:चीच इच्छा स्वत:ला नीट ठाऊक नसते असं वय त्याला योग्य नव्हे. आणि म्हणून अज्ञान मुलांना आम्ही शिलंगणात सहभागी करून घेत नाही," १९-चाचा म्हणाला. "आमच्यातली सर्वांत मोठी मुलगी पूज्या आज सतरा वर्षांची होते आहे. सगळ्या लहान मुलांसह एक होडी घेऊन ती सहलीला गेलेली आहे. उद्या पहाटे परतेल. पुढच्या गणेशचतुर्थीला जेव्हा ती सज्ञान होईल तेव्हा तिची इच्छा असल्यास ती आमच्याबरोबर येऊ शकते. त्यावेळी तिला १ क्रमांक मिळेल आणि बाकी सर्वांचे

क्रमांक पुढे जातील.”

“तुमच्या समाजाची घडी तुम्ही व्यवस्थित बसवलेली आहे,” आगंतुक म्हणाला.

“हो,” ८-काकू म्हणाली. “त्यामागे विचार आहे. आता तुझ्याबद्दल काही सांग, पण इथे तू आमच्या मर्जीने आलेला असल्यामुळे तुझा परिचय करून द्यायलाच हवास असा आग्रह आम्ही धरणार नाही.”

“माझ्याबद्दल सांगण्यासारखं थोडं आहे. मी समुद्रावर भटकतो, थांबावंसं वाटेल तिथे थांबून पुढे जातो. माझी संपत्ती अनेक आडनिड्या ठिकाणी मी विखुरलेली आहे. मी स्थितप्रज्ञ नाही आणि मला तसं व्हायचंही नाही, पण स्थितप्रज्ञ ह्या अवस्थेला जरी नव्हे तरी तिच्या जवळपास आपण पोहोचावं अशी एक आकांक्षा माझ्यामध्ये आहे. हिरा आणि कोळसा हे मला सारखे वाटावेत, पण इतरांसाठी ते सारखे नसतात ही माझी जाणही पूर्ण नष्ट होऊ नये अशी मन:स्थिती मला गाठायची आहे. पण ते काही असो. हे माझे पंचवीस हिरे आता तुमचे झाले. त्यांची वाटणी तुम्ही कशी करणार आहात?”

“आमच्यातली बुजुर्ग मंडळी याचा निर्णय घेतात. आम्ही तो मान्य करतो,” १९-चाचा म्हणाला. पण त्याच्या आवाजातली नाराजी आणि आजूबाजूच्यांशी त्याची झालेली नजरानजर आगंतुकाच्या लक्षात आल्यावाचून राहिली नाही.

आगंतुक सौम्य हसला. “तुम्ही स्वत:ला बुद्धिप्रामाण्यवादी म्हणवता आणि अशा शिळपट परंपरांना धरून राहता हे विसंगत आहे,” तो म्हणाला. “तुम्ही बहुमताने निर्णय का नाही घेत?”

“म्हणजे कसा?”

“हिऱ्यांची वाटणी कशी करायची याबद्दल तुमच्यापैकी एकाने प्रस्ताव मांडावा. जर तो बहुमताने मंजूर झाला तर त्याप्रमाणे करा नाहीतर दुसऱ्या प्रस्तावाचा विचार करा.”

सारे विचाराधीन झाले. “मला यात दोन अडचणी दिसतात,” १९-चाचा म्हणाला. “एकतर बुजुर्ग मंडळींच्या शब्दाला मान देण्याची रीत इतक्या सहजी आम्हाला मोडता येणार नाही. आणि दुसरं असं की ह्या योजनेत सावळा गोंधळ फार आहे. आधी कुणी प्रस्ताव मांडायचा आणि नंतर कुणी, हे ठरवणं अवघड आहे. पुरेसा विचार न करता जर लोक एकामागून एक प्रस्ताव मांडत राहिले तर त्यात हकनाक वेळ जाईल.”

“मान्य,” ८-काकू म्हणाली. “पण ह्या दोन्ही अडचणी एकाच वेळी दूर होतील असा तोडगा मला दिसतो. आपल्यातल्या सर्वांत ज्येष्ठ व्यक्तीने म्हणजे ८२-काकूने सुरवातीला प्रस्ताव मांडावा. तो जर बहुमताने मंजूर झाला तर त्याप्रमाणे हिऱ्यांची वाटणी होईल आणि प्रश्न सुटेल. नपेक्षा ८१-चाचाने त्याचा प्रस्ताव मांडावा. तो मंजूर झाला तर वाटणी त्याप्रमाणे होईल, नाहीतर ८०-काकू, ७९-चाचा, ७८-काकू अशी उतरंड चालू राहील, आणि कुणाचा तरी प्रस्ताव मंजूर होऊन एकदाची ही प्रक्रिया संपेल. ह्या योजनेमध्ये बुजुर्गांचा मान आपोआपच राखला जाईल, कारण प्रस्ताव मांडण्याची संधी त्यांना आधी मिळेल. पण नररुंडमाळ धारण करणाऱ्या गणपतीचे जर आपण खरे उपासक असू तर एक गोष्ट आपल्यावर बंधनकारक आहे. जर एखाद्या व्यक्तीचा प्रस्ताव नामंजूर झाला, तर समुदायाला आपल्याकडे वळवून घेण्यात तिची बुद्धी कमी पडली असा अर्थ निघतो. अशी निर्बुद्ध व्यक्ती आपल्यात नको. ह्या अपयशाचं प्रायश्चित म्हणून अशा व्यक्तीला मृत्युदंड द्यायला हवा. हातपाय बांधून आपण तिला समुद्रात टाकून देऊ. यामुळे बाकी राहिलेल्यांचा सरासरी बुद्ध्यंक आपोआपच उंचावेल, आणि समाजाचा फायदा होईल. अर्थात हिरे फक्त पंचवीसच असल्यामुळे बहुमत आपल्याकडे वळवून घेणं कदाचित वृद्धांना अवघड जाईल, पण त्याला इलाज नाही. नियम सर्वांसाठी सारखे आहेत.”

तरुण मंडळी एकमेकांकडे पाहत राहिल्यामुळे यानंतर काही काळ शांतता होती. “ही सूचना तुम्ही मताला का नाही टाकत?” आगंतुक म्हणाला. “ठीक आहे,” ८-काकू म्हणाली. यावर १-चाचा ते ४८-काकू यांनी हात वर केले. यांपैकी प्रत्येकाच्या मनातला हिशेब असा होता की प्रस्ताव मांडण्याची वेळ स्वत:वर जर आलीच, तर वाईटात वाईट म्हणजे पंचवीसातले चोवीस हिरे इतरांमध्ये वाटून बहुमत पदरात पाडून

घेता येईल. “सूचना मंजूर झालेली आहे,” ८-काकू म्हणाली.

“पण माझी एक सोपी शंका आहे,” १०-काकू म्हणाली. समजा प्रस्ताव मांडण्याची पाळी माझ्यावर आली. तर त्यावेळी १-चाचा ते ९-चाचा आणि मी असे दहाजणच जिवंत असू. बरोबर?”

“बरोबर,” १९-चाचा म्हणाला.

“मग माझा प्रस्ताव मंजूर व्हावा यासाठी किती मतं पुरतील?”

“**प्रस्तावाच्या विरुद्ध जितकी मतं पडतील, निदान तितकीच जर प्रस्तावाच्या बाजूने पडली तर तो मंजूर झाला असं आपण ठरवू.** याचा अर्थ तुला पाच मतांची गरज आहे, किंवा तुझं स्वत:चं मत जमेस धरून इतर चौघांची.”

“ठीक तर,” १०-काकू म्हणाली. “समजा माझ्या प्रस्तावामध्ये मी डोळे मिटून कुणातरी चौघांना प्रत्येकी पाच हिरे देऊ केले आणि पाच स्वत:साठी ठेवले. यात आपपरभाव नाही. तर ते चौघे मला मत का देणार नाहीत?”

“कदाचित देतीलही, मला माहित नाही,” १९-चाचा म्हणाला. “पण तुझा मूळ प्रस्ताव सध्या गुलदस्तात ठेव, आणि एका पर्यायी प्रस्तावाचा विचार कर: समज तू कुणातरी चौघांना फक्त दोनदोनच हिरे देऊ केलेस आणि सतरा स्वत:साठी ठेवलेस, आणि समज हा पर्यायी प्रस्ताव मंजूर झाला. तर याचा अर्थ असा की तुझा मूळ प्रस्ताव अतिउदार होता आणि स्वत:चा लभ्यांश साधण्यात तू कमी पडलीस. प्रस्ताव मांडण्याची तुला एकच संधी आहे, आणि तीदेखील तुझ्याआधीचे सगळे प्रस्ताव नामंजूर झाले तरच. तो मांडताना इतरांना शक्य तितकं कमी देऊनही बहुमत मिळवून दाखवणं हा तुझा धर्म आहे.”

“पण इतकंच नाही,” ४-काकू १०-काकूला म्हणाली. कोवळ्या वयातच तिने बुद्धिशरणतेचा झटून

पाठपुरावा सुरू केला होता. "तू कुठलाही प्रस्ताव मांडलास तरी माझ्यापुढचा प्रश्न हा असेल की त्यावर मी अनुकूल मत द्यावं की नाही? समज तुझा प्रस्ताव नामंजूर झाला आणि तुला मरावं लागलं, तर पुढचा प्रस्ताव ९-चाचा मांडेल. त्याच्या प्रस्तावात माझ्यासाठी किती आहे हे कळल्याखेरीज मी तुझ्या प्रस्तावाला हो-नाही कसं म्हणू? तू जर मला एक हिरा देऊ केलास आणि तो मला दोन देणार असेल, तर तुझ्या प्रस्तावाच्या बाजूने मी मत देणं हे स्वत:च्या पायावर कुऱ्हाड मारून घेण्यासारखं नाही का?"

"पण समज मी तुला एक हिरा देऊ केला आणि ९-चाचाच्याही मनात तुला एकच देऊ करायचा असेल तर?" १०-काकूने विचारलं.

"अशावेळी मी तुला मत देणं हा ९-चाचावर अन्याय होईल," ४-काकू म्हणाली. त्याचा आणि तुझा प्रस्ताव हे माझ्यासाठी सारखेच असताना फक्त तुला त्याच्याआधी संधी मिळाली म्हणून मी तुझ्या बाजूने मत देणं योग्य नव्हे," ४-काकू म्हणाली.

"बरोबर आहे तुझं," १९-चाचा ४-काकूला म्हणाला. "तर आता धर्मनियम ठरतो तो असा: **चालू प्रस्ताव नामंजूर झाल्यामुळे अमूकचा खात्रीने तोटा होणार असेल तरच अमूकने प्रस्तावाच्या बाजूने मत द्यावं, नाहीतर नाही.** किंवा ह्याचा व्यत्यास म्हणजे, **चालू प्रस्ताव जर अमूकसाठी नंतर येणाऱ्या कोणत्याही संभाव्य प्रस्तावापेक्षा जास्त किफायतशीर असेल, तरच अमूकने प्रस्तावाच्या बाजूने मत द्यावं, नाहीतर नाही.**

"निष्कर्ष असा निघतो," ४-काकू १०-काकूला उद्देशून पुढे म्हणाली, "की तुझा प्रस्ताव जर मंजूर व्हायचा तर तुला स्वत:चं सोडून आणखी चार मतं लागतील, पण ती तुला द्यायची की नाही हे ठरवण्यासाठी सर्वांना ९-चाचाच्या संभाव्य प्रस्तावाचा विचार करावा लागेल. तेव्हा ९-चाचाने त्याचा प्रस्ताव ठरवल्याखेरीज तू तुझा ठरवण्यात अर्थ नाही."

"आणि मला जी मतं हवी आहेत," ९-चाचा म्हणाला, "ती इतरांनी मला द्यायची की नाही हे

ठरवण्यासाठी त्यांना ८-काकूच्या संभाव्य प्रस्तावाचा विचार करावा लागेल. तेव्हा ८-काकूने तिचा प्रस्ताव ठरवल्याखेरीज मी माझा ठरवण्यात अर्थ नाही.”

“आणि ७-चाचाने त्याचा ठरवल्याखेरीज मी माझा ठरवण्यात अर्थ नाही,” ८-काकू म्हणाली. “आणि ६-काकूने ठरवल्याखेरीज ७-चाचा तरी काय कपाळ ठरवणार?”

“गंमत आहे. ज्याचा प्रस्ताव नंतर येणार त्याचा विचार आधी करायचा. आणि आधीचा प्रस्ताव जर मंजूर झाला तर नंतरचा मांडलाच जाणार नाही,” १०-काकू म्हणाली.

“गंमत आहे पण विसंगती नाही,” १९-चाचा म्हणाला. “चुकीचा पर्याय निवडला तर परिणाम काय होतील यावर विचार केल्याखेरीज योग्य पर्याय कधी निवडता येत नाही. आणि योग्य पर्याय एकदा निवडल्यानंतर चुकीच्या पर्यायांचे परिणाम कधीच दिसणारे नसतात. पण बुद्धिमान माणसाच्या डोक्यात ते असतातच.”

⁜

“सर्वांत धाकटा असल्यामुळे मी अजून तितकासा बुद्धिमान नाही,” १-चाचा म्हणाला. “पण काही निर्णय बुद्धी न वापरता घेतले तरी चालतात. आता माझंच पाहा. प्रस्ताव मांडण्याची पाळी माझ्यावर आलीच तर तेव्हा मी या प्रचंड गलबतावर एकटा उरलेलो असेन. माझा प्रस्ताव मी मनात उच्चारीन, मत देण्याकरिता उजवा हात मनातच वर करीन आणि डाव्या हाताने सरसकट सगळे पंचवीस हिरे माझ्या बाराबंदीच्या खिशात टाकून देईन.”

“असं वागल्याबद्दल मी तुला दोष देणार नाही, कारण तेव्हा मी जिवंत नसेन,” २-काकू म्हणाली. “बुद्धी वापरण्याची गरज मला तुझ्यापेक्षा जास्त आहे, पण थोडीच जास्त आहे. माझा प्रस्ताव मंजूर होण्यासाठी मला फक्त माझ्या स्वत:च्या मताची गरज आहे. तेव्हा तो असा असेल की १-चाचाला ० हिरे आणि

मला २५. गलबताची एक शेवाळलेली पायफळी रापीने घासून स्वच्छ करून तिने त्यावर तक्ता आखला:

प्रस्तावक	वाटणी	
	१-चाचा	२-काकू
१-चाचा	२५	
२-काकू	०	२५

“मला एकूण दोन मतांची गरज आहे, म्हणजे माझ्याव्यतिरिक्त आणखी एकाची,” ३-चाचा म्हणाला. हे एकुलतं मत शक्य तितक्या स्वस्तात मिळायला हवं. मी जर मेलो तर २-काकूला सगळं घबाड लाटता येईल, तेव्हा ती मला कधीच मत द्यायची नाही. याउलट १-चाचाला एक हिरा देऊ करून त्याचं मत विकत घेता येईल, कारण मी मेलो तर २-काकूच्या प्रस्तावात त्याच्यासाठी काही नाही. असं म्हणून ३-चाचाने तक्ता मोठा केला:

प्रस्तावक	वाटणी		
	१-चाचा	२-काकू	३-चाचा
१-चाचा	२५		
२-काकू	०	२५	
३-चाचा	१	०	२४

“मला नीट विचार केला पाहिजे,” ४-काकू म्हणाली. “स्वत:व्यतिरिक्त मला एका मताची गरज आहे, तेव्हा कुणालातरी एक हिरा देऊ करावा. तो ३-चाचाला देऊ करण्यात अर्थ नाही, कारण माझ्या मरणानंतर त्याला २४ हिरे मिळणार असल्यामुळे तो मला कधीच मत देणार नाही. तो १-चाचालाही देण्यात अर्थ नाही, कारण मग ३-चाचाचा आणि माझा प्रस्ताव त्याच्या दृष्टीने सारखेच पडतील आणि त्यापायी तो मला मत द्यायचा नाही. माझा प्रस्ताव ३-चाचापेक्षा त्याला जास्त फायद्याचा ठरणार असता तरच त्याने मला मत दिलं असतं. तेव्हा हा हिरा २-काकूला द्यावा हे उत्तम. मी मेले तर ३-चाचाच्या प्रस्तावात तिच्या हाती काहीच येणार नसल्यामुळे ती मला मत नक्की देईल. इतकं म्हणून तिने तक्ता मोठा केला:

प्रस्तावक	वाटणी			
	१-चाचा	२-काकू	३-चाचा	४-काकू
१-चाचा	२५			
२-काकू	०	२५		
३-चाचा	१	०	२४	
४-काकू	०	१	०	२४

“माझ्यापुढचा प्रश्न इतका सोपा नाही,” ५-चाचा म्हणाला. प्रस्ताव मंजूर होण्यासाठी मला तीन मतं हवीत, म्हणजे माझ्या साथीला दोघे हवेत. २-काकू माझ्याबरोबर यायला हवी असेल तर तिला किमान दोन हिरे द्यावे लागतील. पण तिच्या जोडीला एकजण लागेलच आणि त्यासाठी किमान आणखी एक हिरा खर्ची घालावा लागेल, म्हणजे निदान तीन जातील. पण दुसरा एक उपाय ह्यापेक्षा बरा आहे: २-काकूचा नाद सोडून देऊन १-चाचा आणि ३-चाचा यांना एकेक हिरा देऊ करावा. ४-काकूच्या प्रस्तावात त्यांना काही मिळणार नसल्यामुळे प्रत्येकी एका हिऱ्यात त्यांचं मत विकत घेता येईल. इतकं म्हणून त्याने तक्ता मोठा केला:

प्रस्तावक	वाटणी				
	१-चाचा	२-काकू	३-चाचा	४-काकू	५-चाचा
१-चाचा	२५				
२-काकू	०	२५			
३-चाचा	१	०	२४		
४-काकू	०	१	०	२४	
५-चाचा	१	०	१	०	२३

“माझ्या नवऱ्यापेक्षा मी बुद्धिमान असल्यामुळे विचार करायला मला कमी वेळ लागेल,” ६-काकू म्हणाली. मला फक्त आणखी दोघांची मतं हवीत, तेव्हा माझा मार्ग सरळ आहे: २-काकू आणि ४-काकू

यांना ५-चाचाने काहीच देऊ केलेलं नाही, तेव्हा त्यांना प्रत्येकी एका हिऱ्याचं आमिष दाखवून फितवून घेते म्हणजे झालं. तिने आणखी एक ओळ मांडली.

प्रस्तावक	वाटणी					
	१-चाचा	२-काकू	३-चाचा	४-काकू	५-चाचा	६-काकू
१-चाचा	२५					
२-काकू	०	२५				
३-चाचा	१	०	२४			
४-काकू	०	१	०	२४		
५-चाचा	१	०	१	०	२३	
६-काकू	०	१	०	१	०	२३

“चित्र असं दिसतं की बायका फक्त बायकांना हिरे देऊ करताहेत आणि पुरुष फक्त पुरुषांना,” आत्तापर्यंत काही न बोलणारा २३-चाचा म्हणाला. “चाळिशी गाठल्यामुळे जी प्रगल्भता आज माझ्यात आलेली आहे तिचा परिपाक म्हणून अशा गोष्टी माझ्या लवकर लक्षात येऊ लागल्या आहेत. हा क्रम आता असाच चालू राहणार, तेव्हा यापुढे तक्ता वाढवत नेण्याची गरज नाही.”

“कशावरून? मला सिद्धता हवी,” ४-काकू म्हणाली. सबळ पुराव्याखेरीज कुठलंही विधान स्वीकारायला ती नाखूष असे.

“देतो,” २३-चाचा म्हणाला. “पण प्रगती करायची तर नवी परिभाषा हवी. आत्तापर्यंत दिसतं ते असं: जर एखाद्याने प्रस्ताव मांडला तर तो काहींना शून्य तर काहींना एक हिरा देऊ करतो, आणि उरलेले स्वत:कडे ठेवतो. ज्यांना शून्य मिळतात त्यांना **खट्टू** म्हणू, आणि ज्यांना एक मिळतो त्यांना **खूष** म्हणू. तर माझी निरीक्षणं अशी आहेत:

(१) स्वत: प्रस्तावक आणि सारे खूष हे प्रस्तावाच्या बाजूने मत देतात, आणि खट्टू विरुद्ध मत देतात.

(२) जर काकूचा प्रस्ताव असेल तर सगळे खट्टू हे चाचा आहेत, आणि सगळ्या खूष ह्या काकू आहेत.

(३) जर चाचाचा प्रस्ताव असेल तर सगळ्या खट्टू ह्या काकू आहेत, आणि सगळे खूष हे चाचा आहेत.

(४) जर काकूचा प्रस्ताव असेल तर खूषांची संख्या खट्टूंपेक्षा एकाने कमी आहे.

(५) जर चाचाचा प्रस्ताव असेल तर खट्टू आणि खूष यांची संख्या समसमान आहे.

निदान ६-काकूपर्यंत तरी ही निरीक्षणं लागू पडतात. एका कुठल्यातरी प्रस्तावकापर्यंत ती खरी आहेत असं समजून पुढे जाऊ.

आता नव्या प्रस्तावकासमोर प्रश्न आहे तो बहुमत मिळवण्याचा. प्रस्ताव नामंजूर झाला तर सध्या जे खूष आहेत त्यांना एक हिरा मिळणार आहे, तेव्हा त्यांच्यापैकी कुणाचंही मत एका हिऱ्यात विकत घेता येणार नाही. याउलट सध्या जे खट्टू आहेत त्यांना एक हिरा देऊन फितवून घेता येईल. स्वत:चा जास्तीतजास्त स्वार्थ साधला जावा असा प्रस्तावकाचा हेतू असल्यामुळे जर खट्टूंच्या मतांवर भागत असेल तर तो खूषांना विचारायला जाणार नाही.

समजा नवा प्रस्तावक हा चाचा आहे. त्याने जर आधीच्या खट्टूना खूष केलं आणि आधीचे खूष अधिक पूर्वीची प्रस्ताविकाकाकू यांना खट्टू केलं तर नवे खूष आणि नवे खट्टू यांची संख्या समसमान होईल. प्रस्तावकचाचाचं स्वत:चं मत आहेच, त्यामुळे प्रस्ताव मंजूर होईल. याचा अर्थ (१), (३) आणि (५) ही विधानं नव्या चाचासाठी खरी आहेत.

समजा नवी प्रस्ताविका ही काकू आहे. तिने जर आधीच्या खट्टूना खूष केलं आणि आधीचे खूष अधिक पूर्वीचा प्रस्ताविकचाचा यांना खट्टू केलं तर नव्या खूषांची संख्या नव्या खट्टूंपेक्षा एकाने कमी आहे. पण प्रस्ताविकाकाकूचं स्वत:चं मत पारड्यात असल्यामुळे प्रस्ताव मंजूर होईल. याचा अर्थ (१), (२) आणि (४) ही विधानं नव्या काकूसाठीही खरी आहेत.

निष्कर्ष हा की जर कुणा एका प्रस्तावकाला आपली निरीक्षणं लागू पडत असतील तर त्याच्या पुढच्यालाही ती लागू पडतात. तेव्हा यापुढे हे असंच चालू राहणार ही गोष्ट एका झपाट्यात आपल्याला कळली. ज्ञान हे कणाकणानेच मिळवल्यामुळे त्याची किंमत टिकते असं नाही. खोऱ्याने ओढलं तरी ती राहतेच."

"माझी चाळिशी अजून यायची आहे, तेव्हा मला समजतं का बघू," २०-काकू म्हणाली. समजा माझ्यावर प्रस्ताव मांडायची वेळ आली तर मी २-काकू पासून १८-काकूपर्यंत नऊ बायकांना एकेक हिरा देऊ करीन, पुरुषांना काही देणार नाही, आणि स्वत:साठी सोळा हिरे ठेवीन. बरोबर?"

"बरोबर," २१-चाचा म्हणाला. पण तुझ्यावर तशी वेळ यायची नाही. कारण माझ्या प्रस्तावात मी १-चाचा ते १९-चाचा अशा दहाजणांना एकेक हिरा देऊ करून सगळ्या बायकांना खट्टू करीन, आणि स्वत:साठी पंधरा ठेवीन."

"२३-चाचाची तर्क करण्याची पद्धत मला आवडली," ४-काकू म्हणाली. "कापडावर सुईने धावदोरा घालत जाण्यासारखी ती मला वाटली. आपल्याला त्याने एकच टाका घालून दाखवला, पण निरखून पाहणाऱ्याला तेवढा पुरेल. ही पद्धत वापरून खूप काही करता येईल असा माझा विश्वास आहे, पण तशी मी अजून लहान आहे. अर्थात मला एवढं समजतं की केव्हा ना केव्हा तरी दोरा संपणारच. २३-चाचा, तू म्हणालास की खट्टूंच्या तोंडाला प्रस्तावक पानं पुसतो, खूषांना प्रत्येकी एक हिरा देऊ करतो, आणि उरलेले स्वत:साठी ठेवतो. पण हिरे कमी पडले तर?"

"बहुमताला पुरेसे होतील इतके खूष गोळा करण्याएवढे हिरे जर उरले नाहीत तर प्रस्तावकाला मरावं लागेल. हिरे फक्त पंचवीस आहेत, त्यामुळे प्रस्तावकाचं वय वाढत जाईल तशी केव्हा ना केव्हा तरी ही वेळ येणार. पण त्याला इलाज नाही. नियम सर्वांसाठी सारखे आहेत," २३-चाचा म्हणाला. हा सबुद्ध कठोरपणा ४-काकूला पसंत पडला. "२३-चाचा, आपण दोघे जाऊन इतरांना घेऊन येऊ," ती म्हणाली. "म्हणजे एकदाचा सोक्षमोक्ष लावून टाकता येईल."

"थांबा," ४२-काकू म्हणाली. बुद्धी नाठी व्हायला तिला अजून एक वर्ष अवकाश होता.

❋

"एका ठराविक वयानंतरच्या प्रस्तावकांना मरावं लागणार याचं मला तुझ्याइतकंच वाईट वाटतं आहे," ४२-काकू २३-चाचाला म्हणाली. "पण शेवटचा जगणारा कोण आहे याची मला शहानिशा करायची आहे. कारण त्याचा जो प्रस्ताव असेल त्याप्रमाणे हिऱ्यांची विल्हेवाट लागेल. अर्थात शेवटचा म्हणजे पहिला, कारण त्याच्यापेक्षा वयाने जे लहान ते सगळे जगणार आहेत."

"तू म्हणतेस त्यात खूपच तथ्य आहे," २३-चाचा म्हणाला. "गाडी कड्यावरून नेमकी कधी आणि कशी घसरते ते निरखून पाहायला हवं. ५०-काकूपासून सुरुवात करूया. तिचा प्रस्ताव असा असेल की आधीच्या चोवीस काकूंना एकेक हिरा देऊन खूष करायचं, स्वतःला एक ठेवायचा आणि सगळ्या चाचांना खट्टू करायचं. आता प्रश्न असा की ५१-चाचाने काय करावं? समज तो म्हणाला की मी प्रत्येक काकूला खट्टू करीन आणि १-चाचा ते ४९-चाचा अशा पंचवीस जणांना एकेक हिरा देऊन खूष करीन. माझ्यासाठी काही नको. तर स्वतःचं एक आणि बाकीची पंचवीस मिळून त्याला हवी तशी सव्वीस मतं मिळतील. हिरा न का मिळेना, त्याचा जीव तरी वाचेल."

"मान्य," ४२-काकू म्हणाली. "आता यापुढे समजा ५२-काकू म्हणाली की मी १-चाचा ते ५१-चाचा अशा सव्वीस जणांना खट्टू करीन आणि २-काकू ते ५०-काकू अशा पंचवीस जणींना एकेक हिरा देऊन खूष करीन. माझ्यासाठी काही नको. तर स्वतःचं एक आणि बाकीची पंचवीस मिळून तिला हवी तशी सव्वीस मतं मिळतील. हिरा न का मिळेना, तिचा जीव तरी वाचेल."

"तिला आणखी एक पर्याय आहे," ४-काकू म्हणाली. "सगळ्या काकवांना एकेक हिरा देण्याऐवजी तिच्यातला कुणातरी एकीला टांग मारून तो हिरा ५१-चाचाला दिला तरी हाच परिणाम साधेल.

स्वत:च्या प्रस्तावामध्ये ५१-चाचाला काहीच मिळणार नसल्यामुळे एका हिऱ्यासाठी तो ५२-काकूच्या पदरात मत टाकायला तयार होईल."

"बरोबर आहे," २३-चाचा म्हणाला. "आता प्रश्न असा की ५३-चाचाने काय करावं. पंचवीस हिरे त्याने इतर बावन्न जणांत कसेही जरी वाटले, तरी ज्यांना काहीच मिळणार नाही असे किमान सत्तावीस जण राहतील. ५३-चाचाच्या प्रस्तावाला मत देण्याचं त्यांच्यापैकी कुणालाही काही कारण नाही, कारण तो मेल्यामुळे त्यांचा कसलाच तोटा होणार नाही. याचा अर्थ ५३-चाचाने काहीही प्रस्ताव मांडला तरी तो नामंजूर होईल."

"याचा अर्थ ५३-चाचानंतरचे सगळे मरणार, पण ५२-काकू जगणार आणि तिच्या प्रस्तावाप्रमाणे वाटणी होणार," ४२-काकू चेहरा निर्विकार ठेवून म्हणाली. पण ५२-काकूच्या प्रस्तावामध्ये आपल्याला एक हिरा मिळण्याची पुष्कळ शक्यता आहे याची आठवण ताजी असल्यामुळे तिचं मन निर्विकार नव्हतं. ती उठली आणि इतरांना आणण्यासाठी आत जाऊ लागली.

"थांब," ४-काकू म्हणाली. "काहीतरी भानगड आहे. ५४-काकूला बहुमत मिळवणं शक्य नाही याची मला खात्री वाटत नाही. पुन्हा नीट बघूया. तिला सत्तावीस मतं हवीत, म्हणजे स्वत:चं सोडून सव्वीस हवीत. असं पाहा की ५४-काकूचा प्रस्ताव जर नामंजूर झाला तर ५३-चाचा एवीतेवी मरणारच असल्यामुळे ५२-काकूचा प्रस्ताव मंजूर होईल. आता ५२-काकूच्या प्रस्तावामध्ये १-चाचा ते ४९-चाचा अधिक खुद्द ५२-काकू हे सारे हिऱ्याशिवाय असतील. याचाच अर्थ असा की ह्या सव्वीसांपैकी कुणाही पंचवीसांना प्रत्येकी एक हिरा मिळाला तर ते ५४-काकूला मत द्यायला तयार होतील. इतकी मतं अपुरी वाटतात पण अपुरी नाहीत. याचं कारण असं की ५३-चाचाला मरायचं नसल्यामुळे ५४-काकूने काय वाटेल तो प्रस्ताव मांडला तरी तो तिच्या बाजूने मत देईल. तिने जात्यावरची ओवी म्हटली तरी तो मत देईल. त्याला हिरा नको तर जीवदान हवं आहे. तेव्हा निष्कर्ष असा की ५४-काकू मरणार नाही."

❊

“गाडी दरीत कोसळल्यानंतर पुन्हा रस्त्यावर येणार नाही अशी आपल्यापैकी काहींची समजूत होती,” ४-काकू सावधपणे म्हणाली. “पण हे इतकं सरळ दिसत नाही, कारण ५१, ५२, ५४ तगणार पण मधला ५३ मरणार.”

“इतकंच नव्हे तर दोन नवे घोटाळे उद्भवले आहेत,” ४२-काकू म्हणाली. “पूर्वी प्रत्येकासाठी एकच एक प्रस्ताव शक्य होता. आता तसं राहिलेलं नाही. उदाहरणार्थ, ५४-काकूपुढे सव्वीस आशाळभूत उमेदवार उभे आहेत, त्यातल्या कुणाही पंचवीसांना हिरा दिला तरी तिला व्यक्तिश: फरक पडणार नाही. म्हणजे प्रस्ताव मांडणाऱ्यासमोर ‘हेही करता येईल किंवा तेही करता येईल’ असे अनेक पर्याय आहेत. सन्मार्ग चिंचोळा असतो ह्या बायबलमधल्या वाक्याला छेद देणारी ही बाब आहे.

“पण दुसरं म्हणजे ५२-काकू ५१-चाचाला हिरा देण्याची थोडीफार शक्यता आहे, आणि ५४-काकू तर कितीतरी चाचांसमोर हिरे वाटणार आहे. बायकांनी पुरुषांना काही द्यायचं नाही हा पायंडा आता मोडलेला आहे. सूर्य रोज पूर्वेला उगवतो म्हणून उद्याही तो पूर्वेलाच उगवणार अशी भाबडी समजूत जे करून घेतात त्यांना विचार करायला लावणारी ही बाब आहे.”

“असं बोलू नकोस,” ४-काकू म्हणाली. “आपण गलबतावर आहोत. दिशा हरवल्या तर आपणही हरवू.”

❊

“मला थोडं थोडं कळायला लागलं आहे,” २३-चाचा म्हणाला. “पण प्रगती करायची तर नवी परिभाषा हवी इतकंच नव्हे तर प्रसंगी जुनी परिभाषा मोडायला हवी. लिंगभेद आता भ्रामक आणि अमंगळ ठरलेला आहे. त्यामुळे ५० हा आकडा ओलांडल्यानंतर ५१-चाचा, ५२-काकू, ५३-चाचा असं म्हणण्याऐवजी १-नाना, २-नाना, ३-नाना असं म्हणायला सुरुवात करूया. ‘नाना’ हा शब्द ग्रीकमध्ये स्त्रीलिंगी आहे आणि हिंदीत पुल्लिंगी आहे. यांपैकी एकही भाषा आपल्या कुणाला येत नसल्यामुळे दोन्ही

लिंगांसाठी आपण तो चालवून घेऊ. प्रस्तावाच्या विरुद्ध मत देणाऱ्यांना आपण **नाराज** म्हणू आणि बाजूने मत देणाऱ्यांना (मग प्रस्तावक स्वत: त्यात आलाच) **कबूल** म्हणू. कबूलांची संख्या जर नाराजांपेक्षा कमी नसेल तर प्रस्ताव मंजूर होईल.

आता असं गृहीत धरा की (२क्ष)-नानाने, म्हणजेच (५०+२क्ष)-काकूने, जर प्रस्ताव मांडला, तर

जितके लोक कबूल तितकेच नाराज असतील, आणि परिणामी तिचा प्रस्ताव मंजूर होईल.

हे अर्थात गृहीतक आहे, पण निदान ४-नानाच्या, म्हणजे ५४-काकूच्या बाबतीत खरं आहे. जे कबूल असतील ते दोनपैकी एका कुठल्यातरी कारणासाठी कबूल असतील: प्रस्तावाप्रमाणे त्यांना हिरा तरी मिळणार असेल, किंवा प्रस्ताव मंजूर झाल्यामुळे स्वत:ला प्रस्ताव न मांडावा लागून त्यांचा जीव तरी वाचेल.

तर असं असताना (२क्ष+१)-नानाने काय करावं? त्याच्या प्रस्तावात ज्यांना हिरा मिळेल ते कबूल होतील, पण (२क्ष+१)-नानाचा प्रस्ताव नामंजूर झाला तर ज्यांचा जीव जाईल असे कोणीच नाहीत. तेव्हा स्वत: धरून त्याला फारतर २६ कबूल मिळवता येतील, म्हणजेच किमान २५+२क्ष इतके लोक नाराज होतील. याचा अर्थ प्रस्ताव नामंजूर होणार आणि (२क्ष+१)-नाना मरणार.

(२क्ष+२)-नानाची गत निराळी नाही. पंचवीस हिरे देऊन त्याला पंचवीस कबूल मिळवता येतील, शिवाय जीव वाचेल या कारणाखातर (२क्ष+१)-नानाही कबूल होईल. प्रस्तावक स्वत: धरून एकूण २७ कबूल आणि २५+२क्ष नाराज असतील.

असं करत करत (२क्ष+य)-नानाच्या प्रस्तावाला २५+य लोक कबूल आणि २५+२क्ष लोक नाराज असतील. य ची किंमत जेव्हा वाढत वाढत २क्ष पर्यंत पोहोचेल, तेव्हा मात्र कबूल आणि नाराज या दोहोंचीही संख्या २५+२क्ष इतकी होईल आणि प्रस्ताव मंजूर होईल. याचाच अर्थ आपलं गृहीतक ४क्ष-

नानासाठी खरं ठरून ती जगेल. मधले मात्र मरतील.”

“पुन्हा एकदा २३-चाचाची धावदोरा पद्धत कामी आली!” ४-काकू बालिश उत्साहाने म्हणाली. “४-नाना जगली म्हणजे ८-नाना जगणार, ८-नाना जगली म्हणजे १६-नाना जगणार, आणि १६-नाना जगली म्हणजे ३२-नाना जगणार.”

सर्वांना अचानक ८२-काकूची आठवण झाली, कारण सर्व काही आता तिच्या प्रस्तावाप्रमाणे घडणार होतं. खालच्या डेकवरची एक अंधारी खोली बाजलं टाकून तिला विश्रांतीसाठी दिलेली होती, तिकडे सारेजण धावले.

८२-काकूची साडी रक्ताने चिंब भिजली होती. बंदुकीची गोळी खिडकीची काच फोडून भिंतीला आदळून काकूच्या पोटात घुसली होती. “अजून धुगधुगी आहे,” आगंतुक म्हणाला. “पण असाच रक्तस्राव होत राहिला तर ही नक्की मरेल. निर्मनुष्य बेटांवर एकटा राहून मला औषधोपचारांची माहिती झालेली आहे. हिची शुश्रूषा मी करू शकतो, पण याक्षणी मी तुमच्या आधीन असल्यामुळे तुम्हा सर्वांच्या अनुमतीखेरीज काही करणार नाही.” ही अनुमती साऱ्यांनी एकमुखाने ताबडतोब दिली असं मात्र झालं नाही. सर्वजण विचारात गढले होते, आणि गेरू, लाकूड तासायचे चाकू, चुना असं जे काही हाती लागेल ते घेऊन गलबतात जागोजागी आकडेमोड करत होते. अनुमती द्यावी की नाही ह्या मुद्द्यावरची मतभिन्नता हळूहळू उघड होऊ लागली.

१-चाचा ते ४९-चाचा, २-नाना, आणि ५-नाना ते ८-नाना गलबताच्या उत्तरेकडे गोळा झाले. जर ८२-काकू जगली, तर तिच्या प्रस्तावामध्ये यापैकी कुणालाही काही मिळण्याची शक्यता नव्हती.

२-काकू ते ५०-काकू, १-नाना, ३-नाना, ४-नाना आणि ९-नाना ते १६-नाना गलबताच्या पूर्वेकडे गोळा झाले. ८२-काकू जगली तर यापैकी कुणातरी पंचवीस जणांना एकेक हिरा मिळणार होता. १७-नाना ते ३१-नाना ही वृद्ध मंडळी त्यांना सामिल झाली. ८२-काकू जगली तरच हे सारे जगणार होते.

सरळ पात्यांच्या तलवारी, कमानदार जंबिये, पिस्तुलं, दुनळी बंदुका, देवमासे मारायचे भाले यांचा साठा बाहेर पडला. पूर्वपक्षाकडे जरी एक्कावन्नजण असले तरी त्यात स्त्रियांचा आणि वृद्धांचा भरणा पुष्कळ होता. उत्तरपक्षाकडे जरी फक्त तीसजण असले तरी त्यांत पुरुष मोठ्या संख्येने होते. दोन्ही पक्ष तुल्यबळ होते हे नंतरच्या घडामोडींवरून स्पष्ट झालं.

❊

दोन परीघांच्या मधोमध अडकलेल्या अशक्त चंद्रकोरीवर समुद्राने आखलेली जीवा जसजशी अधिकाधिक लांब होऊ लागली, तसतसा आगंतुकाचा शोध संपत चालला. कुणीही जिवंत उरलेलं नव्हतं. पावलांना घोट्यांपर्यंत लपेटणारा किळसकाळा द्रवस्पर्श सहन करीत तो गणपतीपर्यंत पोहोचला. मूर्तीच्या गळयातल्या रुंडमाळेला त्याने हात लावून पाहिला. जिचा रंग ताज्या रक्तासारखा असण्यामागचं कारण उघड आहे अशी ती चंची त्याने उचलली, तिच्यातले चार हिरे ताम्हनात काढून ठेवले, आणि बंद आवळून ती खिशात खोलवर घुसवली. तो ब्यांशीकाकूच्या बिछान्यापाशी आला. “तू आता जगायची नाहीस,” तो म्हणाला. “काही करायचं तर त्याला उशीर झाला. उद्या पहाटे जेव्हा पूज्यागौरी आणि सतरा बुटके परत येतील, तेव्हा त्यांना मोठ्या प्रमाणावर साफसफाई करावी लागेल. त्यांची काळजी घेणं हे माझं कर्तव्य आहे असं एकूण घटनाक्रम पाहता कुणीसुद्धा म्हणणार नाही, पण निदान काही काळ तरी त्यांचे फाके पडू नयेत म्हणून मी चार हिरे ठेवलेले आहेत. गणपतीचा प्रसाद म्हणून बाकीचे एकवीस मी घेऊन जातो आहे. जीवेत शरदः शतम्!” तो मिश्किल डोळयांनी म्हणाला, आणि धोतराचा काचा मारून त्याने समुद्रात उडी घेतली.

❊ ❊

थिअरी आणि प्रॅक्टिकल

नाटक कसं असावं ह्यावर ॲरिस्टॉटलच्या ‘De Poetica’ ह्या पुस्तकात तीन नियम सांगितलेले आहेत; ‘classical unities’ म्हणून ते ओळखले जातात. ह्या नियमांचा तथ्यांश असा की,

(१) नाटकातले प्रसंग,

(२) हे प्रसंग घडण्यासाठी नाटकाच्या अंतर्गत घड्याळाप्रमाणे लागणारा वेळ, आणि

(३) हे प्रसंग जिथे घडतात त्या जागा,

ह्या तिन्ही बाबींची आखणी करताना फापटपसारा किंवा विस्कळीतपणा येऊ देऊ नये. एक निश्चित ठिकाण निवडून, कथावस्तूला फाटे न फोडता, काही तासांच्या अवधीत जितके प्रसंग बसवणं शक्य आहे तितक्यांत नाटक गुंडाळावं. हे सगळे नियम उदाहरणार्थ ‘हॅम्लेट’ मध्ये मोडलेले आहेत. ‘शांतता कोर्ट चालू आहे’ मध्ये ते बव्हंशी पाळलेले आहेत. (ह्या विधानांचा अर्थ असा नव्हे की त्या त्या नाटककाराला हे नियम मान्य होते किंवा माहित होते.) ज्यात ते पाळलेले आहेत अशा नाटकाचा प्रयोग करणं जास्त सोपं असेल असा ग्रह प्रथमदर्शनी होणं शक्य आहे, कारण एक म्हणजे सेट्सची हलवाहलव फारशी करावी लागणार नाही, किंवा पात्रांची वेषभूषाही बदलावी लागणार नाही.

⁕

पोर्नोग्राफी ह्या साहित्यप्रकाराचा खापरपणजोबा मार्की द साद ह्याने लिहिलेल्या ‘La philosophie dans le boudoir’ ह्या नाटकामध्ये अतिशय पुस्तकीपणाने हे नियम पाळलेले आहेत. असं असूनही ह्या नाटकाचा प्रयोग करणं अवघड का आहे, ह्यामागचं कारण पुढे विनासायास कळेलच. **युजेनी** नावाच्या पंधरा वर्षांच्या मुलीची प्रौढांनी आणि सुज्ञांनी घेतलेली शिकवणी हा नाटकाचा विषय आहे. **मदाम द सांतांज** ह्या बाईला युजेनी एका कॉन्वेंटमध्ये भेटते, आणि मदाम लगोलग तिच्यावर लट्टू होते. पण तिथे कडक धार्मिक वातावरण असल्यामुळे आणि आजूबाजूला माणसांचा राबता फार असल्यामुळे मनात उफाळून आलेल्या कामना शांत करणं मदामला शक्य नसतं. यावर तोडगा म्हणून आणि युजेनी कोवळ्या वयाची असल्याकारणाने नीतिमत्ता ह्या प्रांतात

तिचे गैरसमज अनेक आहेत असं पाहून मदाम तिला आपल्या घरी आमंत्रण देते. युजेनी ते आनंदाने स्वीकारते, आणि एका दुपारी तिथे हजर होते. मदामचा वीस वर्षांचा धाकटा भाऊ **मिरवेल** आणि मिरवेलपेक्षा पंधराएक वर्षांनी मोठा असलेला त्याचा मित्र **दोलमांसे** यांनाही त्याच वेळी तिथे बोलावलेलं आहे. हे चौघेजण जमल्यानंतर संध्याकाळच्या जेवणापर्यंत म्हणजे पुढचे तीनचार तास ही शिकवणी चालते. आधी थिअरी, मग प्रॅक्टिकल, मग पुन्हा थिअरी, मग पुन्हा प्रॅक्टिकल अशी तिची सर्वसाधारण लय आहे. नीतिशास्त्र आणि समाजकारण ह्या विषयांत युजेनीला ज्या अनेक शंका आहेत, त्यांचं निरसन दोलमांसे आणि मदाम यांच्याकरवी केलं जातं. युजेनीच्या मनातल्या भ्रामक कल्पना झाडून टाकून तिला उपदेशाचे डोस पाजून तयार केलं जातं, आणि मग तिच्या विविधांगात वीर्याचे डोस दिले जातात. यामुळे थकवा आल्यानंतर विश्रांती घेत असताना हे चौघेजण अपुरी राहिलेली चर्चा पुढे नेतात, तशी आणखी काही मुद्द्यांची समाधानकारक उकल होत जाते. एव्हाना मंडळींना हुरूप येऊन ती पुन्हा एकदा कृतीला सुरुवात करतात, आणि आपापलं वैयक्तिक समाधान होईपर्यंत प्रत्येकाने ही कृती चालवल्यानंतर फिरून सगळेजण चर्चेला बसतात. जुन्या मुद्द्यांची उजळणी होते आणि नव्या गोष्टी युजेनीला शिकवल्या जातात तशी कृतीची वेळ पुन्हा येते इत्यादि इत्यादि इत्यादि. सुरवातीपासून शेवटापर्यंत सात प्रवेशांत सर्व काही बसवलेलं आहे.

✳

मदाम, मिरवेल आणि दोलमांसे ह्या तिघांनाही या प्रांतात कित्येक वर्षांचा अनुभव असला तरीदेखील त्यातल्या त्यात दोलमांसेचा अधिकार फार वेगळ्या पातळीवरचा आहे. ह्यामागचं मुख्य कारण असं की तो तत्त्वचिंतक आहे. माणूस आणि निसर्गशक्ती यांचं परस्परावलंबित्व, धर्म ह्या संस्थेला यात कुठे जागा आहे की नाही, नीतिमत्ता कशावर आधारित असावी किंवा मुळात असावीच का, लैंगिक आनंदासाठी एखाद्या व्यक्तीचा वापर करत असताना तिच्या बऱ्यावाईटाची काळजी करणं आपल्यावर बंधनकारक आहे की नाही, पुरेशी काळजी न घेतल्यामुळे जर बाई गर्भार राहिली तर आपलं पोर मारून टाकण्याचा हक्क तिला आहे का, तसा हक्क नाही असं जे लोक समजतात त्यांची वैचारिक गफलत कुठे होते, खून बेकायदेशीर असावा की नाही, ह्या आणि

अशासारख्या मुद्द्यांवर त्याने प्रदीर्घ आणि सखोल विचार केलेला आहे. आपण काढलेले निष्कर्ष कोणते हे अर्थात तो युजेनीला आणि त्या अनुषंगाने इतर पात्रांना सांगतोच. पण दोलमांसेचं लिंग मोठं म्हणून त्याचा अधिकार मोठा असं मात्र नाही. ते लांबलचक, जाडजूड आणि सहा इंच परीघाचं जरी असलं तरी मिरवेलचं लिंग यापेक्षा कितीतरी जास्त मोठं आहे. मुळात मिरवेलच्या ह्याच अंगभूत गुणामुळे पॅरिसमधल्या श्रीमंत सरदार-दरकदार लोकांच्या बैठकीत त्याचं स्वागत होत असावं असा अंदाज करता येतो. अशा एका ठिकाणी जेवायला गेलेला असताना त्याची दोलमांसेशी ओळख झालेली आहे, आणि एकमेकांशी गुदमैथुन करताना दोलमांसेचं मोजमाप त्याच्या लक्षात राहिलं आहे. आपल्या बहिणीला, म्हणजे मदाम सांतांजला, दोलमांसेच्या स्वभाववैशिष्ट्यांबद्दल, जीवनविषयक तत्त्वज्ञानाबद्दल आणि चेहरेपट्टीबद्दल सांगताना हाही उल्लेख विषयाला धरून असल्यामुळे तो करतो. परिणामी दोलमांसे नाटकात दिसण्याआधी वाचकाला त्याच्याबद्दल बरीचशी माहिती झालेली असते. युजेनीचं उद्घाटन दोलमांसेकडून होतं यात विशेष आश्चर्य नाही, पण त्यातही मेख अशी की दोलमांसे एक प्रकारचा व्रतबंध पाळत असल्यामुळे दोहोंपैकी एकाच दाराचं उद्घाटन तो करतो.

पण मिरवेलपेक्षाही आकाराने मोठं पात्र नाटकात आहे. एके ठिकाणी प्रात्यक्षिकासाठी जेव्हा आणखी एका पुरुषाची गरज पडते, तेव्हा ऑगस्तां नावाच्या मदाम द सांतांजच्या पोरसवदा माळ्याची मदत घेण्यात येते. मदामने केलेल्या शिफारसीप्रमाणे ह्याचं लिंग चौदा इंच लांब आणि साडेआठ इंच परीघाचं आहे. त्याचे तुषार दहा फूट अंतरावर पोहोचू शकतात. पण ऑगस्तांचा उपयोग तेवढ्यापुरताच आहे. तत्त्वचर्चा करण्याइतपत बुद्धी किंवा उत्सुकता त्याच्यामध्ये नसल्यामुळे जमावावर गुलाबपाण्याचा वर्षाव करणाऱ्या हत्तीसारखा वापरून सारेजण त्याला बाहेर हाकलून काढतात, आणि प्रसंगी पुन्हा आत बोलावतात. तेव्हा शारीर परिमाणाने सर्वांत थिटा पण बौद्धिक परिमाणाने सर्वांत उंच असा अंतर्विरोध दोलमांसे ह्या पात्रात आहे.

*

युजेनीचा बाप हा एक धनदांडगा व्यापारी असल्यामुळे युजेनीच्या शिकवणीला त्याची हरकत नसणं

अगत्याचं आहे. पण आपल्या मुलीला धोतराच्या सोग्याखाली झाकून ठेवणारा संकुचित मनाचा तो माणूस नव्हे. युजेनी लवकर जाणती व्हावी अशी त्याचीही इच्छा आहे. याखेरीज त्याच्या संमतीवर शिक्कामोर्तब व्हावं म्हणून मदाम सांतांजने आपला देह यापूर्वीच उदारमनाने अर्पण करून त्याला गटवलेला आहे. खुद्द युजेनी जरी भाबडी असली तरी आपण तशा आहोत हे तिला ठाऊक आहे, आणि ह्या अज्ञानतिमिरांध:कारातून बाहेर पडावं याकरिता तिची धडपड असते. मदामच्या नवऱ्याचीही आडकाठी नाही. संपूर्ण नाटक मदामच्या घरी होत असलं तरीसुद्धा तो आसपास कुठे असल्याचं चिन्ह नाही. एकतर तो तिच्याहून पुष्कळ म्हातारा आहे. लग्नाच्या पहिल्याच रात्री त्याने मदामला असं सांगून टाकलेलं आहे की माझा एक हट्ट जर तू पुरा केलास तर बाकी तू काय करतेस याकडे मी लक्ष देणार नाही. हट्ट असा की तो उताणा पडेल, आणि मदामने त्याच्यावर उलटं झोपून ढुंगण त्याच्या चेहऱ्यावर ठेवून त्याचं लिंग चोखावं. त्याचं वीर्य बाहेर काढण्याच्या प्रयत्नात असताना मदामने त्याच्या तोंडात शी करावी, आणि ती तो खाऊन टाकेल. हे ऐकून युजेनीला अर्थात अचंबा वाटतो, पण दोलमांसे तिचा हा पूर्वग्रह ताबडतोब दूर करतो. तो म्हणतो की ह्यात वावगं काही नाही; निसर्गाचाच हा भाग आहे. निसर्गप्रकृतीने कुणाला काही, तर कुणाला काही दिलेलं आहे. आपल्या सर्वांचे नाकडोळे वेगवेगळे दिसतात यामध्ये आश्चर्य करण्यासारखं काही नाही, तसंच आपल्या आवडीनिवडी वेगळ्या असतात यामध्येही आश्चर्य करण्यासारखं काही नाही. तेव्हा अशासारख्या बाबीत जर कुणी तुझी मदत मागितली तर तू नाही म्हणशील का? युजेनी लगोलग म्हणते की शिकवणी आत्ता कुठे सुरू होत असली तरी मी जेवढं शिकले आहे त्यावरून हे मला समजलेलं आहे की मी कशालाही नाही म्हणणं योग्य नव्हे. पण तरीदेखील अशा गोष्टी मला नव्या असल्यामुळे सुरवातीला मला थोडं आश्चर्य वाटलं तर ते तुम्ही समजून घ्यायला हवं. ह्या शिकवणीला जिचा विरोध आहे अशी एकमेव व्यक्ती म्हणजे युजेनीची आई. सहाव्या प्रवेशाच्या शेवटी ती तिथे येऊन पोहोचते, आणि सातव्या प्रवेशात तिचा प्रश्न सोडवण्यात येतो.

*

माणसाने स्वत:च्या संवेदनासुखांसाठी जगावं हे म्हणणं ठीक आहे, पण ते आचरणात जर आणायचं तर तपशीलात शिरायला हवं. दोलमांसेच्या वर्गवारीनुसार ह्या प्रांतात तीन जिल्हे आहेत:

(१) गुदमैथुनातून मिळणारा आनंद,

(२) पावित्र्यभंगातून मिळणारा आनंद, आणि

(३) क्रौर्यातून मिळणारा आनंद.

गुदमैथुन हे पाप नाही का असा युजेनीने उपचारापुरता घेतलेला आक्षेप दोलमांसे फुंकरीसरशी उडवून लावतो. गुदमैथुनात वीर्य फुकट जातं आणि नवीन जीव जन्माला येण्यासाठी त्याचा उपयोग होत नाही. देवाला हे मान्य नसल्यामुळे अशासारखी पापी कृत्यं करणारे लोक जिथे राहात होते त्या सॉडम आणि गमोरा या गावांचा त्याने नाश केला, अशी एका अडाणी ज्यू माणसाने बायबलमध्ये लिहिलेली भाकडकथा ऐकून लोक गुदमैथुनाविरुद्ध गहजब करतात. पण ह्यात काही तथ्य नाही. एकतर सॉडम आणि गमोरा ही शहरं ज्वालामुखीमुळे नष्ट झाली, देवाने आग लावून दिल्यामुळे नव्हे. आणि ते काही जरी असलं तरी आपण सतत पुनरुत्पादन करत राहिलं पाहिजे आणि माणसांची वैतागवाणी भाऊगर्दी वाढवत राहिलं पाहिजे, अशी काही कळकळीची निकड निसर्गाला असणं शक्य नाही. तेव्हा वीर्य फुकट गेलं तर जाऊ दे. आणि निसर्गामध्ये निर्मिती जशी आहे तसा विनाशही आहे. आता निसर्गाला जर विनाश चालत असेल इतकंच नव्हे तर तो आवश्यक असेल, तर निर्मिती करायला नकार देणं ही त्यामानाने खूपच मवाळ असलेली कृती न चालायला हरकत नाही. शिवाय निसर्गाने केलेल्या रचनेकडे आपण पाहिलं तर लंबगोलाकार योनीपेक्षा ढुंगणाचं वर्तुळाकार भोकच पुरुषलिंगाच्या आकाराशी जास्त चपलख जुळणारं आहे. गुदमैथुन करा अशी निसर्गाची आपल्याला आर्त विनवणी असते, हेच यातून सिद्ध नाही का होत?

मदाम सांतांजचं यावर म्हणणं असं की पुरुषाचं लिंग माझ्या शरीरात कुठेही जायला तयार असेल तर त्यात मला आनंदच आहे. पण ते गांडीत घालून घेण्यामुळे होणाऱ्या संवेदना ह्या पुच्चीतल्या संवेदनांपेक्षा कितीतरी श्रेष्ठ आहेत, असं स्वानुभव मला सांगतो. त्यामुळे ज्या स्त्रीने एकदा मागची चव घेतलेली आहे ती पुढचा पर्याय त्यातल्या त्यात नाराजीनेच पत्करेल ह्यात संशय नाही. युरोपात जिथे जिथे गुदसंभोगाची चाल होती तिथे तिथे हा अनुभव आलेला आहे. शिवाय हा मार्ग चोखाळण्यामुळे दिवस जाणं वगैरे संभाव्य कटकटी टळतात ही सोय आहेच. मदाम पुढे म्हणते की बाई जर चुकून अडचणीत सापडली तर पोट पाडण्यात काही गैर नाही; मी स्वत: हे दोनदा केलेलं

आहे, आणि पुढेमागे तुला जर तशी गरज भासलीच तर बेलाशक माझ्याकडे ये. पण ती वेळ येऊ न देणंच श्रेयस्कर. अशा प्रकारे मूळ मुद्दा सिद्ध झाल्यानंतर दोलमांसे अशी माहिती पुरवतो की गुदमैथुन करण्यासाठी जे दोघे खेळाडू लागतात त्यांच्यापैकी दुसऱ्याच्या ढुंगणात लिंग घालणाऱ्यापेक्षा ते स्वत:मध्ये घालून घेणाऱ्याकडे सुखाचा वाटा जास्त जातो. यामागचं कारण असं की घालून घेणारा एका अर्थाने स्त्रैणभाव परिधान करत असल्यामुळे वेष पालटून गुपचूप वागल्याचा आनंद त्याच्या शारीर संवेदनांमध्ये मिसळून गेलेला असतो.

दोलमांसेच्या व्रताचा मोघम उल्लेख आधी झालेला आहे. युजेनीचं मागचं दार तिसऱ्या प्रवेशातच उघडलेलं आहे, त्यामानाने समोरचं दार उघडण्याचा प्रसंग बऱ्याच उशीरा म्हणजे पाचव्या प्रवेशात येतो. दोलमांसे मिरवेलला म्हणतो की तू तयारीत दिसतोस, तेव्हा उद्‌घाटन करायला पुढे हो. यावर युजेनी कळवळून दोलमांसेला म्हणते की त्याचं लिंग फार मोठं आहे, तेव्हा मला दुखेल. त्यामानाने तुझं लहान आहे, तेव्हा तूच हे काम कर. यावर दोलमांसे म्हणतो, " … Je n'ai jamais foutu de con de ma vie! Vous me permettrez de ne pas commencer à mon âge. - आयुष्यात मी कधीही पुच्ची झवलेलो नाही, आणि ह्या वयात सुरुवात करण्याची माझी इच्छा नाही." मदाम सांतांज ह्यावर म्हणते की समोर चालून आलेली इतकी देखणी आणि कोवळी भेट नाकारायची म्हणजे काय! एवढी खडतर तत्त्वनिष्ठा म्हणजे फार झाली. ह्यावर दोलमांसे मदामला प्रत्युत्तर असं देतो की तुम्ही माझी बाजू नीट समजून घेतलेली नाही. माझ्यापेक्षा कडक पथ्य पाळणारे माझे अनेक स्नेही आहेत; स्त्रीची गांड ते कधीही मारणार नाहीत. मी तुमची मारलेली आहे, आणि पुन्हा मारायलाही माझी तयारी आहे. तेव्हा मी अतिरेकी भूमिका घेतो आहे असं म्हणता यायचं नाही. ह्या उत्तरावर मदामचं समाधान होतं, आणि शेवटी उद्‌घाटनाचं काम मिरवेल करून टाकतो. युजेनीच्या मनात यामुळे जी किंचित अवमानाची भावना उत्पन्न झालेली आहे ती बराच वेळ रेंगाळते असं दिसतं. दोलमांसेला ती अधूनमधून हे बोलूनही दाखवते; पण त्याचं पुन्हापुन्हा असंच म्हणणं पडतं की आम्ही गुदसंभोगी लोक आमच्या आवडीनिवडींबद्दल फार काटेकोर असतो, आणि स्वत:वर घालून घेतलेले निर्बंध असे आम्हाला सहजी मोडता येत नाहीत.

⁕

पवित्र वस्तूंची आणि पवित्र संकल्पनांची विटंबना करण्यात जो आनंद असतो त्याबद्दल मात्र दोलमांसेला विशेष उत्साह नाही. संतांच्या मूर्ती, क्रॉस, कम्यूनियनच्या वेळी खायचा वेफर असल्या गोष्टींचा झवताना उपयोग करून घेतल्यामुळे माणसाची कल्पनासृष्टी चाळवली जाते हे खरं आहे, आणि समाजमान्यतेची बंधनं झुगारून देण्यात ज्या पोरकट लोकांना शेखी वाटते अशांची यामुळे क्षण दोन क्षण करमणूक होतही असेल. पण प्रगल्भ अभिरुचीच्या माणसाचा ह्या प्रकारातला रस पटकन विरतो. धर्मविचार हा सरसकट चुकीचा आहे हे एकदा मान्य केलं की बेअक्कल लोकांना ज्या गोष्टी पवित्र वाटतात त्यांचा अपमान करण्यात काही गंमत उरत नाही. पण तरीदेखील, सुखाच्या बेहोशीत असताना रांगडे शब्द वापरणं ही एक तात्कालिक गरज असते, आणि देवाधर्माबद्दल घाण बोलण्यामुळे तो परिणाम साधला जातो हा एक उपयोग आहे. एकदा ही पार्श्वभूमी समजून घेतली की मग असे शब्द जितके भरभरून वापराल तितकं चांगलं. आजूबाजूचे लोक शरमून-हादरून जातात, आणि आपला अहंभाव त्यामुळे सुखावतो. अर्थात हा काही अवघड दिग्विजय नव्हे, पण म्हणून त्याला नाक मुरडावं असंही नाही. लिंग ताठरलेलं असताना देवाला करकचून शिव्या द्यायला दोलमांसेला फार आवडतं, पण ह्या ज्या घाणेरड्या वस्तूमुळे त्याला इतकी किळस येते ती अस्तित्वात नसावी ही बाब त्याला मनोमन खुपत राहते. घृणेला निदान ठोस काही लक्ष्य मिळावं म्हणून ती प्रत्यक्षात आणता आली असती तर बरं झालं असतं.

⁕

दाईचा स्तन कसा चावावा, खेळणं कसं मोडावं आणि पिंजऱ्यातल्या पक्ष्याचा गळा कसा दाबावा, हे बुद्धी चालवता येण्याच्या कितीतरी आधी लहान मुलाला ठाऊक असतं. निसर्ग आपल्याला पहिल्याप्रथम क्रौर्यच शिकवतो. समाजाने केलेल्या संस्कारांमुळे ह्या मूळप्रवृत्तीत नंतर भेसळ होते खरी, पण हे संस्कार निसर्गाचा भाग नव्हेत. निसर्गत: वाढणाऱ्या झाडाला माळ्याने कृत्रिम आकार दिल्यामुळे जशी त्याची नासाडी होते तशीच संस्कारांमुळे माणसाची होते. मानवी संस्कृतीने अजून पूर्णपणे नासवलेली नाही अशी एकमेव गोष्ट जी उरली आहे ती म्हणजे क्रौर्य. सारांश असा की माणसाची क्रौर्याकडे प्रवृत्ती होणं यात आश्चर्य नाही आणि ते अनैसर्गिक तर नाहीच नाही.

माणसाच्या संवेदनांवर सुखाचा परिणाम जितका होतो त्यापेक्षा वेदनांचा जास्त होतो हे उघड आहे. दोलमांसेचं म्हणणं असं की इतरांना वेदना देण्यामुळे माझ्यामध्ये त्यांचे जे प्रतिसाद उमटतात ते जास्त खोलवर जाणारे असतात, आणि माझ्यातल्या आदिम प्रवृत्ती त्यामुळे खडबडून जाग्या होतात. ह्या संवेदना संबंधित अवयवांत पोहोचल्यामुळे संभोगाच्या वेळी मला मिळणाऱ्या आनंदात गुणात्मक वाढ होते. स्त्रीला सुख देणं ही त्यामानाने फार डळमळीत बाब आहे. त्याचा परिणाम कितपत होतो याची कधी खात्री नसते. शिवाय पुरुष म्हातारा किंवा विद्रूप असेल तर असं सुख देणं त्याला अवघडच असतं. त्यामुळे तिला वेदना देणं हा मार्ग श्रेयस्कर ठरतो. आता काहीजण म्हणतील की आपल्या सुखासाठी इतरांना वेदना देणं बरोबर आहे का? तर याचं उत्तर असं की आपण स्वत:चा विचार इतरांपेक्षा जास्त करावा हे आपल्यात निसर्गाने निर्माण केलेल्या प्रवृत्तीला अनुसरूनच आहे. तुझा सोडून इतरांचा विचार आधी कर असं निसर्गशक्ती आपल्याला कधीही सांगत नसते. त्यामुळे हा प्रश्न निकालात निघतो. आणि म्हणूनच आनंद घेत असताना आनंद देणारी व्यक्ती माझ्या खिजगणतीत नसते.

क्रौर्याचे दोन प्रकार आहेत. बथ्थड माणूस जेव्हा क्रूरपणा करतो तेव्हा तो निव्वळ डोकं गमावल्यासारखा वागतो. सूक्ष्म विचार करायला असा माणूस लायक नसतो आणि म्हणून अशा कृतीतून त्याला कसलं सुखही मिळत नाही. अशा क्रौर्यापासून घाबरण्यासारखं काही नसतं, आणि स्वत:चा बचाव करणंही अवघड नसतं. पण याउलट अत्यंत बुद्धिमान आणि स्वत:च्या संवेदनांबद्दल अत्यंत सजग असणारे जेव्हा क्रौर्याने वागतात तेव्हा त्यामागे जाणकाराने घेतलेला रसास्वाद असतो. दुर्दैव असं की दोहोंतला हा फरक समजू शकणारी माणसं जगात फार थोडी आहेत, पण सुदैव असं की ती अगदीच नाहीत असं नाही. हे दुसऱ्या प्रकारचं श्रेष्ठ असं क्रौर्य खासकरून स्त्रियांमध्ये, पण सुप्तावस्थेत, असतं. अशा स्त्रियांची कल्पनाशक्ती सतत काम करत असते, आणि तल्लख बुद्धीची तिला जोड मिळाल्यामुळे त्या विलक्षण धोकेबाज बनतात. पण आपल्या समाजाचे नीतिनियम इतके सोवळे आहेत, किंवा खरं तर इतके भंपक आहेत, की त्यांच्या क्रौर्याला कधीच काही उत्तेजन मिळत नाही. आपल्या सुप्त उर्मींवर पांघरूण घालता यावं म्हणून अशा स्त्रिया मनोमन चडफडत कुठल्यातरी धर्मादाय परोपकारी कामात स्वत:ला गुंतवून घेतात. काही निवडक

जवळच्या मित्रांबरोबर असतानाच त्यांना आपली निकड भागवता येते. अशा स्त्रिया फार अतृप्त आणि दु:खी असतात.

क्रौर्याला जखडू पाहणारे कायदे रद्द व्हायला हवेत. क्रौर्याचे सगळे दुष्परिणाम यामुळे नष्ट होतील, कारण जिथे विरोध नाही तिथे क्रौर्य नाही. आणि जेव्हा विरोध होईलच तेव्हा तो परस्परविरुद्ध अशा दोन क्रौर्यांमध्ये होईल. विरोध करणारा यशस्वी झाला तर प्रश्नच नाही, आणि जर अपुरा पडला तर त्याने आपल्यापेक्षा बलिष्ठ माणसाच्या इच्छेपुढे मान तुकवायला हवी होती हा निसर्गनियम आपोआपच सिद्ध होईल. एकूण एकच आहे. इतरांना वेदना दिल्याबद्दल दुसऱ्याने माझा सूड घेतला तर घेऊ दे. जो प्रबळ असेल तो जिंकेल. अविरत संघर्षासाठीच निसर्गाने आपल्याला जन्माला घातलेलं आहे. आपल्याला जे सहन करावंसं वाटत नाही ते इतरांना सहन करायला लावू नये हा उपदेश दुबळ्या माणसासाठी आहे, शक्तिशाली माणसासाठी नव्हे. ख्रिस्ती लोकांचा धर्म जेव्हा स्थापन झाला तेव्हा तो हास्यास्पद आणि विसंगत असल्यामुळे सुरवातीच्या शतकांत त्यांचा छळ खूप झाला. तेव्हा तो होऊ नये आणि इतरांनी आपल्यावर दया दाखवावी या हेतूने त्यांनी हे रडतराऊत तत्त्व पसरून दिलेलं आहे.

दोलमांसे म्हणतो की स्वत:च्याच संवेदना ज्यांना ऐकू येत नाहीत आणि म्हणून माझा विचार ज्यांच्या पचनी पडत नाही अशा महामूर्खांचे ताफेच्या ताफे जगात आहेत, हे मला ठाऊक आहे. पण त्यांना जे समजत नाही त्यावर त्यांनी मत देऊ नये. जिवंत आणि सळसळती, अजूनपर्यंत संस्कारांच्या पायदळी तुडवली न गेलेली अशी ज्यांची कल्पनाशक्ती आहे, त्यांनाच ह्या विषयाची सैद्धान्तिक पायाभरणी करण्याचा अधिकार आहे.

⁂

युजेनी ही हुशार आणि नव्या कल्पना आत्मसात करायला आतुर असणारी मुलगी आहे. ह्या तत्त्वज्ञानाचा सर्वसाधारण रोख तिला सहजी लक्षात येतो, आणि त्यात अंतर्भूत असलेला तर्क आपल्याआपण ती पुढे नेऊ शकते. ती म्हणते की गुन्हा ठरतील अशा फारच थोड्या कृती जगात

आहेत असं ह्या सगळ्यावरून सिद्ध होतं. दोलमांसे म्हणतो की हे बरोबर आहे. समजा रामने आपल्या आनंदापोटी श्यामला इजा केली, तर त्याला गुन्हा केव्हा म्हणता येईल? तर ज्या निसर्गशक्तीने हे कृत्य करण्यासाठी रामला प्रवृत्त केलं तिच्या नजरेत श्यामचं सुखदु:ख रामपेक्षा जास्त महत्त्वाचं आहे असं सिद्ध केल्यानंतरच म्हणता येईल. पण असं सिद्ध करणं अर्थात शक्य नाही. निसर्गशक्तीच्या दृष्टीने दोघांचं स्थान सारखंच आहे, तेव्हा एकाच कृतीमुळे रामला सुख होतं आणि श्यामला दु:ख होतं ह्या गोष्टीचं तिला काहीच सोयरसुतक नसतं. इथे कुठेही गुन्हा नाही हे आपोआपच ठरतं. पण ह्यावर युनेजी अशी शंका विचारते की जर आपल्या एखाद्या कृतीमुळे कित्येक लोकांना इजा होणार असेल आणि आपल्याला थोडंसंच सुख होणार असेल तर काय? दोलमांसेच्या मते हा आक्षेप गैरलागू आहे. माझ्या संवेदना आणि इतरांच्या संवेदना या दोहोंत तुलना करण्यासाठी काहीही सामायिक मोजमाप नाही. दुसऱ्याचं दु:ख कितीही मोठं असलं तरी मला ते दु:ख म्हणून जाणवत नाही. पण याउलट त्याचा छळ केल्यामुळे जर माझ्या इंद्रियांना सुख होत असेल तर तो न केल्यामुळे त्या सुखाची चणचण मला जाणवते. ही चणचण दूर करण्यासाठी मी प्रयत्न करणं नैसर्गिक नाही का? सर्व मनुष्यमात्रांविषयी आपण बंधुभाव बाळगायला हवा आणि म्हणून त्यांना इजा करू नये ही शिकवण भ्रामक आहे. जेव्हा ख्रिस्ती धर्म फार लहान होता, ख्रिस्ती लोक हालअपेष्टा आणि छळ सोसून आपल्या धर्माला जेव्हा चिकटून राहात असत, तेव्हा आपल्यावर इतरांनी दया दाखवावी म्हणून त्यांनी बेरकीपणाने पसरवून दिलेलं हे मत आहे. अर्थात दोलमांसे पूर्वीही हे म्हणाला होता, पण एकदा वीर्य बाहेर टाकल्यानंतर काही मिनिटांत तो पुन्हा तितकंच वीर्य बाहेर टाकू शकतो, त्याप्रमाणे नुकतंच मांडलेलं मत तितक्याच जोरकसपणे तो पुन्हा मांडू शकतो.

धर्मसंस्थेबद्दल आणि विशेष म्हणजे ख्रिश्चन धर्माबद्दल दोलमांसेची वृत्ती तुच्छतेची जरी असली तरीदेखील वेळप्रसंगी बायबलमधल्या कथांचा युक्तिवादासाठी उपयोग करायला त्याची ना नसते. युजेनी मदामला सांतांजला विचारते की तुझा पहिला अनुभव कुणी घेतला? यावर मदाम म्हणते की माझ्या भावाने घेतला. त्यानंतरही आजतागायत सवड मिळेल तसे आम्ही अधूनमधून एकमेकांबरोबर असतो. युजेनीला ही योजना आवडते आणि ती तसं बोलूनही दाखवते. पण ती अशी शंका उपस्थित करते की अगम्यगमन हे नीतिमत्तेला सोडून नव्हे का? यावर दोलमांसे म्हणतो की

तसं जर असतं तर अ‍ॅडमचं किंवा नोहाचं कुटुंब क्षयाला गेलं असतं. ते वाढलं ते अगम्यगमनामुळेच वाढलं. बाप-मुलीला किवा बहिण-भावांना एकमेकांबद्दल लैंगिक आकर्षण वाटणं ही निसर्गाचीच शिकवण आहे. गुदमैथुन काय किंवा हस्तमैथुन काय किंवा अगम्यगमन काय, ह्या गोष्टी निसर्गाला अमान्य असत्या तर आपल्याला त्या केल्यामुळे इतकी मजा कशी वाटली असती?

⁕

▫ नीतिमत्तेची उभारणी धर्माच्या पायावर न करता धर्माची उभारणी नीतिमत्तेच्या पायावर करायला हवी. त्याकरिता आधी दुबळा, मिळमिळीत, ढोंगी आणि तकलादू असा ख्रिश्चन धर्म फेकून द्यायला हवा. रोमन लोकांसारखा निधड्या छातीचा, पुरुषी, शूर धर्म त्यापेक्षा जास्त लायकीचा आहे.

▫ नको असलेल्या माणसाचा खून करणं हा गुन्हा नव्हे. याउलट अशा कृत्यासाठी धीटपणा लागत असल्यामुळे आणि त्याच्या मुळाशी निसर्गदत्त उर्मी असल्यामुळे खुनाची वाखाणणी करायला हवी. अर्थात खुनाचा सूड घ्यायलाही कायद्याने बंदी असता कामा नये, कारण त्याच्याही मुळाशी निसर्गदत्त उर्मी असते आणि त्यालाही धीटपणा लागतो. पण तेच जेव्हा सरकार करतं तेव्हा त्यामागे अशी काही सबळ कारणं नसतात. त्यामुळे मृत्युदंडाची शिक्षा योग्य नाही, आणि कायद्यातून ती पुसून टाकायला हवी.

▫ स्त्री आणि पुरुष हे दोघेही सारखेच स्वतंत्र आहेत. पण डॉमिनीकला एमिली हवी असेल तर केवळ माझं दुसऱ्यावर प्रेम आहे अशा सबबीखातर तिला त्याला नाकारता येऊ नये. खऱ्या अर्थाने मुक्त झालेल्या समाजात अशा अप्पलपोटेपणाला वाव नाही. त्यामुळे एमिलीने डॉमिनीकशी संभोग करायलाच हवा, पण डॉमिनीकची तिच्यावर कायमस्वरूपी मालकी अर्थात नाही. तेव्हा सगळं संपल्यावर तिचं ती करायला एमिली मुखत्यार आहे.

ही आणि अशी अनेक मतं ज्यांना आधीच पूर्णपणे पटलेली नाहीत त्यांना ती पटवून घेण्याची

आणखी एक संधी नाटकाच्या पाचव्या प्रवेशात येते. ऑगस्तांकरवी पुढून आणि दोलमांसेकरवी मागून एकाच वेळी झवून घेतल्यानंतर युजेनी जरी थकून जाते, तरीदेखील अभ्यासात वेगाने प्रगती करत असल्याची प्रौढी तिला वाटल्याखेरीज राहात नाही. ती विश्रांतीसाठी बसून राहते आणि दोलमांसेला म्हणते की आत्ताच जो अतिचार मी केलेला आहे, त्याबद्दल क्षणापुरती का होईना पण वाटणारी खंत ज्यामुळे निघून जाईल असं काही मला सांग. दोलमांसे तिला विचारतो की तुझ्या मनात कुठला विषय आहे? तेव्हा युजेनी विचारते की समाजाला नीतिनियम आवश्यक आहेत का? आणि त्यांचा राष्ट्राच्या प्रकृतीवर प्रभाव पडतो का? ह्यावर दोलमांसे म्हणतो की आजच सकाळी मला एक माणूस भेटला; त्याच्याकडून हे पाहा मी एक पत्रक विकत घेतलेलं आहे. पत्रकाचं नाव आहे: 'Français, encore un effort si vous voulez être républicains - फ्रान्सच्या नागरिकांनो, राजेशाही झुगारून देण्याचा पुन्हा एकवार प्रयत्न करा!' हे वाचून युजेनीच्या शंकांचं समाधान होईल असं मला वाटतं. यावर मदाम सांतांज आपल्या भावाला म्हणते की तुझा आवाज चांगला आहे, तेव्हा तूच आम्हाला हे वाचून दाखव. ऑगस्तांला बाहेर हाकलून दिल्यानंतर पत्रकाच्या जाहीर वाचनाला सुरुवात होते. नाटकाचा जवळजवळ एक चतुर्थांश भाग त्याने व्यापलेला आहे. ते वाचून झाल्यावर युजेनी म्हणते की पत्रक फार विचार करून लिहिलेलं आहे, आणि त्याचा सूर दोलमांसेच्या विचारांशी इतका मिळताजुळता आहे की त्यानेच ते लिहिलं असावं असं वाटतं. हा आरोप दोलमांसे मान्य किंवा अमान्य करत नाही. पण तो म्हणतो की माझे विचार ह्या पत्रकातल्याशी पुष्कळसे जुळतात हे खरंच आहे, आणि त्यामुळे मिरवेल ते वाचत असताना द्विरुक्ती होते आहे असं वाटत होतं. युजेनीला हे मान्य होत नाही. ती म्हणते की उद्बोधक विचार कितीही वेळा ऐकले तरी त्यांचा कंटाळा येत नाही. ह्या द्विरुक्तीच्या मुद्द्याबाबत मी दोलमांसेशी सहमत आणि युजेनीशी असहमत आहे, त्यामुळे पत्रकात शिरत नाही.

*

सुधाकरची सनद कायमची रद्द झाल्याचा उल्लेख कुठल्या अंकातल्या कुठल्या प्रवेशात आहे, हे 'एकच प्याला' ज्यांनी अनेकदा वाचलेलं किंवा पाहिलेलं आहे त्यांना सहज आठवेल. पण 'La philosophie' चं तसं नाही. नाटक गोलगोलगोलगोल आहे. ज्यांचा सर्वसाधारण साचा तोच आहे

अशा चर्चा, आणि त्या तात्पुरत्या संपल्यानंतर, जिचा सर्वसाधारण साचा तोच आहे अशी सामुदायिक झवाझवी ही नाटकाची रचना असल्यामुळे तपशील आठवणं एकतर सोपं राहात नाही, आणि शिवाय त्याला किती महत्त्व द्यायचं याबद्दल अनिश्चिती वाटू लागते. उदाहरणार्थ, पाचव्या प्रवेशामध्ये असा एक प्रसंग आहे: दोलमांसेचं लिंग ताठर होतं. (यामागचं तात्कालिक कारण असं की दुसऱ्यावर बळजोरी करण्याची आदिम प्रेरणा निसर्ग माणसाला सदोदित कशी देत असतो, यावर आत्ताच त्याने एक लांबलचक भाष्य केलेलं आहे.) तो म्हणतो की मी बोलत असतानाही ऑगस्तांचे पांढरेशुभ्र आणि सुदृढ कुल्ले माझ्या मनातून काही केल्या हटत नव्हते. ऑगस्तांला तो घंटी वाजवून आत बोलावतो, आणि त्यापुढे पंधरा मिनिटं त्याचे कुल्ले कुस्करत कुरवाळत राहतो. तो म्हणतो की आता आपण सर्वांनी एक आकृतीबंध रचूया. मी ऑगस्तांच्या पार्श्वभागावर कूच करीन, आणि त्याचवेळी युजेनी गुडघे टेकून ऑगस्तांचं लिंग चोखेल. हे करत असताना ती स्वत:चं ढुंगण अशा प्रकारे पुढे काढेल की मिरवेलला त्यात घुसता येईल. याचवेळी मदाम सांतांजच्या ढुंगणाच्या मला पाप्या घेता याव्यात म्हणून ऑगस्तांच्या पाठीवर बसून ते ती माझ्यासमोर आणेल, आणि तिने किंचित प्रयास केले तर हातात काटेरी चाबूक घेऊन ओणवी होऊन तिला एकसमयावच्छेदेकरून मिरवेलला बदडत राहता येईल, जेणेकरून त्या झणझणीमुळे युजेनीचं शिक्षण तो हलगर्जीपणा न करता जोरकसपणे चालू ठेवू शकेल. ह्या प्रसंगाचं दिग्दर्शकाने काय करायचं हा त्याचा प्रश्न आहे. पण नाटक वाचणाऱ्यांपैकी शंभरातली नव्व्याण्णव माणसं हा प्रसंग आपल्या चर्मचक्षूंसमोर आणत नसावीत, किंवा हे सगळं शक्य आहे का आणि असल्यास त्यात भाग घेणाऱ्यांना ह्यातून कितपत आनंद घेता येईल याची फारशी स्पष्ट कल्पनाही करत नसावीत. नाटक पाहणं आणि वाचणं यात फरक असतो हे निरीक्षण नवं नाही, पण हा फरक काही वेळा विशेषच जाणवतो.

त्याउलट वाचण्यापेक्षा करायला सोपा असा एक प्रसंग ह्यानंतर लगेचच आहे. एकेकजण निजधामाला गेल्यानंतर हा आकृतीबंध जेव्हा मोडतो, तेव्हा ऑगस्तांबरोबर काही मिनिटं मला एकांतात घालवायला मिळावीत अशी परवानगी दोलमांसे मदाम सांतांजकडे मागतो. (तो तिचा नोकर असल्यामुळे परवानगी तिची मागायला हवी, ऑगस्तांची नव्हे हे समजण्यासारखं आहे.) ‘तुला नक्की काय करायचं आहे? करायचं ते सगळ्यांसमोर करता येणार नाही का?’ असं मदाम

आणि युजेनी विचारतात. दोलमांसे म्हणतो की अशासारखी गोष्ट लोकांसमोर करता येत नाही, आणि ती काय हेही मी सांगणार नाही. ती काय असावी हे मिरवेल ओळखतो आणि दोघींच्या कानात सांगतो. लागलीच त्यांना भयंकर किळस येते, आणि आढेवेढे न घेता त्या दोलमांसेला ऑगस्तांबरोबर आतल्या खोलीत जाऊ देतात. हा प्रसंग स्टेजवर करणं सोपं आहे. पण नाटक वाचणाऱ्याला मात्र ते दोघे काय करत असतील ह्याची कल्पना स्वत:च्या जबाबदारीवर मनात आणावी लागते, आणि ते त्रासाचं आहे.

⁕

एव्हाना नाटकाचा पाचवा प्रवेश संपलेला आहे. शिकवणी चालू असताना आत कुणाही उपऱ्या माणसाला येऊ द्यायचं नाही अशी स्पष्ट ताकीद मदाम सांतांजने देऊन ठेवलेली असते. पण तरीदेखील, सहाव्या प्रवेशाच्या सुरवातीला तिचा नोकर घाईघाईने आत येऊन एक पत्र देऊन जातो. युजेनीच्या बापाने घोडेस्वाराबरोबर तातडीने पाठवलेलं हे पत्र आहे. त्यातला मजकूर असा की 'युजेनी तिथे आलेली आहे हे युजेनीच्या आईला आवडलेलं नाही. तिची तिथे कायकाय थेरं चालू असतील याबद्दल तिला धास्ती वाटते आहे. माझ्या मुलीने काहीही थेरं केली तरी मला स्वत:ला काळजी नाही, आणि तिची शिकवणी पुरी झाल्याखेरीज तिला परत पाठवू नका. पण सांगण्याचा मुद्दा असा की युजेनीला परत आणायला तिची आई आत्ताच इथून निघालेली आहे. ह्या रांडेने मला जीव नकोसा केलेला आहे, त्यामुळे तिची तुम्हीच सोय लावलीत तर चांगलं होईल. तुम्ही काहीही केलंत तरी माझ्याकडून तक्रार यायची नाही.' यापुढच्या प्रवेशाचं वर्णन करण्याऐवजी मी केलेलं भाषांतर देतो आहे.

सातवा आणि शेवटचा प्रवेश

पात्रे: मदाम द सांतांज, मिरवेल, युजेनी, दोलमांसे, मदाम द मिस्तवाल (युजेनीची आई), ऑगस्तां, लापिएर (दोलमांसेचा नोकर)

मदाम द मिस्तवाल (मदाम सांतांजला उद्देशून): आधी न सांगता आले याबद्दल माफी मागते! माझी मुलगी इथे आहे असं मला असं कळलं. ती अजून लहान आहे आणि एकटी बाहेर पडण्याइतकी मोठी झालेली नाही. तेव्हा तिला माझ्या सुपूर्द कराल तर बरं होईल. माझ्या बोलण्याचा राग मानू नका–

मदाम सांतांजः मदाम, तुमचं हे वागणं मुळीच रीतीला धरून नाही बरं! बोलताय तर अशा की कुणाला वाटेल तुमची मुलगी वाईट संगतीत सापडली की काय!

मदाम द मिस्तवालः ती आणि तुम्ही ज्या अवस्थेत आहात तिकडे बघून तिचं इथे काही धड चाललेलं नाही हे दिसतंच आहे...

दोलमांसेः मदाम, हे उद्धटपणाचं बोलणं झालं! मदाम सांतांजची आणि तुमची कितपत उठबस आहे हे मला माहित नाही, पण तिच्या जागी मी असतो तर आत्तापर्यंत तुम्हाला खिडकीबाहेर फेकून दिलं असतं.

मदाम द मिस्तवालः खिडकीबाहेर फेकून दिलं असतं म्हणजे काय ते मला नीट समजलं नाही. हे पाहा, खिडकीबाहेर फेकून देता येईल अशातली मी नव्हे. तुम्ही कोण ते मला ठाऊक नाही, पण तुमची अवस्था आणि भाषा बघून काय लायकीचे तुम्ही आहात याचा अगदी उघड अंदाज येतो आहे. युजेनी, चल माझ्याबरोबर!

युनेजीः आई, मला माफ कर. मी तुझ्याबरोबर येऊ शकत नाही.

मदाम द मिस्तवालः काय? माझी मुलगी मलाच विरोध करते!

दोलमांसेः अहो, इतकंच नव्हे तर ती सरळसरळ तुमची इच्छा धाब्यावर बसवते आहे! मदाम, तुम्ही

हे मुळीच खपवून घेऊ नका. ह्या नाठाळ पोरीला शिक्षा करण्यासाठी मी चाबूक आणायला सांगू का?

युजेनी: माझा अंदाज असा की चाबूक जर आणवलेच, तर माझ्यापेक्षा आईसाहेबांवरच त्यांचा प्रयोग व्हायची शक्यता जास्त आहे.

मदाम द मिस्तवाल: मस्तवाल कारटी!

दोलमांसे (मदाम द मिस्तवालच्या जवळ जात): हे बघा मावशी, शिवीगाळ करू नका. आम्ही सगळे इथे युजेनीच्या बाजूनं आहोत, तेव्हा अविचाराने काही करून बसलात तर पस्तावाल..

मदाम द मिस्तवाल: म्हणजे माझी मुलगी मला धुतकारणार आणि तिच्यावर माझा जो अधिकार आहे तोही मी चालवून घ्यायचा नाही!

दोलमांसे: मावशी, असा नक्की काय अधिकार आहे तुमचा? आणि हा अधिकार काही भक्कम पायावर आधारित आहे अशी गोड समजूत तुम्ही करून घेतलेली आहे का? तुमच्या नवऱ्यानं, किंवा जो कुणी असेल त्यानं, रेताच्या चार पिचकाऱ्या तुमच्या योनीत फवारल्यामुळे युजेनी जेव्हा जन्माला आली, तेव्हा हीच विशिष्ट पोरगी तुमच्या मनात होती का? तर मी म्हणतो नाही. कित्येक वर्षांपूर्वी तुमची घाणेरडी पुच्ची कुणीतरी झवल्यामुळे तुम्हाला सुख वाटलं निव्वळ एवढ्यावरून युजेनी तुमच्या उपकारात बांधली गेली असं तुम्हाला का वाटतं? मदाम, आईबापांना मुलांविषयी वाटणारं किंवा मुलांना आईबापांविषयी वाटणारं प्रेम संपूर्णपणे भ्रामक आहे. ज्या प्रेमाचा एका देशात उदोउदो होतो आणि दुसऱ्या देशात छी थू होते, त्यामागे कसलाही तर्क नाही. काही देशांत आईबाप मुलांना मारून टाकतात, तर इतर काही देशांत मुलं आईबापांचे गळे कापतात. ह्या परस्परप्रेमाला जर निसर्गात काही आधार असता तर रक्ताच्या नात्याचा प्रभाव इतका भासमान नसता. न सांगता बापाला आपलं मूल ओळखू येऊन त्याबद्दल माया वाटली असती, न सांगता मुलाला बाप ओळखू येऊन तो त्याच्या बाहुपाशात झेपावला असता. हे तर सोडाच, पण

आपल्याला दिसतं काय तर एकमेकांविषयींचा तिरस्कार. कित्येक मुलं अजाण वयात असतानाच त्यांना आपल्या बापाच्या चेहऱ्याची शिसारी येते; किंवा मूल समोर नकोसं झाल्यामुळे बाप त्याला दूर पाठवून देतो... तेव्हा ह्या भावना तुम्ही म्हणता त्या एकजात बेगडी आणि हास्यास्पद आहेत. तुमच्या लोभामुळे त्या तुम्ही कल्पनेने रचलेल्या आहेत, रूढीचा त्यांना आशीर्वाद मिळालेला आहे, शिवाय जनरीत तशी असल्यामुळे त्या पुढे चालू राहिल्या आहेत इतकंच. निसर्गाने त्या आपल्या हृदयावर कोरलेल्या नाहीत.

प्राण्यांना अशा काही भावना असतात का? तर मुळीच नाही. पण निसर्गशक्तीच्या मनात डोकावायचं तर आधी प्राण्यांकडे पाहा. तेव्हा मी समस्त बापांना असं आवाहन करतो की तुमच्या रेताचे चार थेंब नसते तर जो अस्तित्वातच नसता, त्याच्यावर अन्याय होईल अशा खोट्या काळजीने तुमच्या सुखांना आणि वासनांना लगाम घालू नका. तुम्ही तुमच्या अपत्यांचं काहीही देणं लागत नाही. जगात तुम्ही आहात ते स्वत:साठी, त्यांच्यासाठी नव्हे. स्वत:चा सोडून इतरांचा विचार करत बसलात तर तुमच्यासारखे भोट तुम्हीच, कारण तुमचं जगणं फक्त स्वार्थासाठी आहे. आणि मुलांनो, 'आपण आईबापांचा मान राखला पाहिजे' ह्या भासमान समजुतीतून मोकळे व्हा. ज्यांच्या रक्तामुळे तुम्ही अंधारातून बाहेर आलात त्यांचे तुमच्यावर कसलेही उपकार नाहीत. त्यांच्याबद्दल कणव दाखवली पाहिजे, त्यांच्याबद्दल कृतज्ञ राहिलं पाहिजे, त्यांच्यावर प्रेम केलं पाहिजे, यातलं काहीही खरं नाही. ज्यांनी तुम्हाला प्रत्यक्षकोटीत आणलं त्यांचा यापैकी कशावरही हक्क नाही. त्यांनी जे केलं ते स्वत:साठी केलं, तेव्हा स्वत:ची काळजी त्यांची त्यांना घेऊ द्या. जी मदत देणं तुमच्यावर कुठल्याही नात्यामुळे बंधनकारक नाही, ती देणं यासारखा मूर्खपणा नाही. असा कोणताही कायदा तुमच्यावर बंधनकारक नाही. आणि जर चुकून तुमच्या आतल्या आवाजाची कुजबुज तुम्हाला ऐकू आलीच - मग तो आवाज केवळ जनरीतीच्या प्रभावाखाली उमटलेला असो की तुमच्याच स्वभावधर्मामुळे तुम्हाला कसनुसं होत असो - तर ह्या असल्या बनावट भावुकतेचा न कचरता, निर्दयीपणे गळा घोटा. केवळ तुम्ही आडगावऐवजी पेडगावला जन्मण्यामुळे आजूबाजूच्या समाजात जो फरक होतो, त्यातून उद्भवलेली ही भावुकता आहे. निसर्गशक्तीला ती मान्य नाही आणि तर्कासमोर ती कधीही टिकणारी नाही.

मदाम द मिस्तवाल: पण मी माझ्या मुलीसाठी खस्ता खाल्लेल्या आहेत, तिला शिकवलेलं आहे...

दोलमांसे: खस्ता खाल्लेल्या आहेत त्या एकतर जनरीत म्हणून किंवा तुम्हालाच काहीतरी मिळवल्यासारखं वाटावं म्हणून. ज्या समाजात तुम्ही आहात तिथल्या चालीरीतींप्रमाणे जसं वागावं लागतं तसं तुम्ही वागलात एवढ्याचमुळे युजेनी तुमच्या ऋणात राहावी असं नाही. आणि तिचं शिक्षण म्हणाल तर ते अगदीच भिकारडं निघालं. तिच्या डोक्यात तुम्ही घुसवलेली सगळी नीतितत्त्वं बाहेर काढून आम्हाला दुसरी घालावी लागली. त्यातलं एकही तिच्या हिताचं नव्हतं; सरसकट सगळी बनावट आणि निरर्थक होती. तुम्ही तिला परमेश्वराविषयी सांगितलंत, जणू काही अशी वस्तू खरोखरीच अस्तित्वात आहे. तिला सद्गुणांची शिकवण दिलीत, जणू काही त्यांचा उपयोग आहे. तुम्ही तिला धर्मशिक्षण दिलंत, जणू काही सरसकट ढोंग आणि बथ्थडपणा ज्याच्या मुळाशी नाही असा एखादा धर्म पृथ्वितलावर कुठे आहे. तुम्ही तिला येशू ख्रिस्ताविषयी सांगितलंत, जणू काही तो माणूस लुटारू आणि भामटा नव्हताच. झवणं हे पाप आहे असं तुम्ही तिला शिकवलंत, पण याउलट जीवनातलं परमोच्च सुख झवण्यातच आहे. तिला शालीनता शिकवण्याचा प्रयत्न केलात, जणू काही मुलीचा आनंद हा स्वैराचार सोडून दुसरीकडे कुठे असतो; जणू काही लोकापवादाला झुगारणाऱ्या आणि दुष्कीर्तीची पर्वा न बाळगता व्यभिचारात लिडबिडणाऱ्या स्त्रीपेक्षा जास्त सुखी कुणी असू शकतं. मावशी, तुमचा हा एक भ्रम दूर करा. तुम्ही आपल्या मुलीसाठी काहीही केलेलं नाही. निसर्गनियमांनुसार जी तुमची कर्तव्यं आहेत, त्यातलं एकही तुम्ही पार पाडलेलं नाही. मोबदला म्हणून युजेनी तुम्हाला फक्त घृणा देऊ लागते.

मदाम द मिस्तवाल: हाय रे दैवा! माझी युजेनी अनाचाराच्या विवरात सापडली रे! युजेनी, अगं ऐक माझं! माझा तुझ्यावर अधिकार आहे म्हणून नाही सांगत. भीक मागते तुझ्यापुढे... तुझ्या अवतीभवती इथे राक्षस आहेत गं राक्षस... त्यांची वाईट संगत सोडून दे आणि चल माझ्याबरोबर.. गुडघे टेकते गं तुझ्यापुढे.. (खरोखरीच गुडघे टेकते.)

दोलमांसे: वा! सुंदर! काय करुण दृश्य आहे! युजेनी, तूही कारुण्यशीलतेने वाग हं.

युजेनी (ही अर्धवट उघडी आहे हे वाचक विसरले नसणारच): आई, हे घे माझे दोन कुल्ले तुला अर्पण करते.. अगदी तुझ्या ओठांच्याच पातळीवर आणले आहेत. त्यांची पापी घे बरं. ते चोख बरं.. तुझ्यासाठी युजेनी इतकंच करू शकते. दोलमांसे, तुझ्या गुरुकुलाची उज्ज्वल परंपरा मी कधी खाली आणायची नाही.

मदाम द मिस्तवाल (युजेनीला त्वेषाने ढकलून देत): तू मेलीस मला! माझी मुलगी नव्हेसच तू!

युजेनी: अगं, हे जे म्हणतेयस त्याबरोबर चार शिव्याही द्यायच्या तर दे, म्हणजे प्रसंगाच्या उत्कटतेत भर पडेल आणि मी आपली राहायची तेवढीच थंड राहीन...

दोलमांसे: मदाम, जरा सांभाळून! मला वाटतं इथे कुठेतरी तुम्ही पातळी सोडून वागताय. युजेनीला तुम्ही फार घालूनपाडून बोललात. आम्ही तिचे पाठीराखे आहोत हे आधी सांगितलं होतं तुम्हाला. ह्या आगळिकीला शिक्षा झालीच पाहिजे. तेव्हा अगदी सगळे कपडे काढा बरं, म्हणजे आम्हाला नीट शिक्षा देता येईल.

मदाम द मिस्तवाल: कपडे काढू?!

दोलमांसे: ऑगस्तां, मदाम नाही म्हणताहेत, तेव्हा त्यांची दासी म्हणून तुलाच काम हाती घ्यायला हवं. (ऑगस्तां तडकाफडकी कामाला लागतो, मदाम स्वत:चा कसाबसा बचाव करू पाहते.)

मदाम द मिस्तवाल: कुठे येऊन पडले हो मी? (मदाम सांतांजला) तुमच्या घरात माझे हे काय धिंडवडे काढले जाताहेत ते दिसतंय ना? याची मी दाद मागणार नाही असं वाटलं का तुम्हाला?

मदाम सांतांज: तुम्हाला दाद मागता येईलच याची बिलकुल खात्री नाही.

मदाम द मिस्तवाल: देवा रे! म्हणजे मला तुम्ही इथे मारून टाकणार!

दोलमांसे: काय हरकत आहे?

मदाम सांतांज: एकच मिनिट थांबा. या मोहक सुंदरीचं शरीर न्याहाळण्याआधी ते काय अवस्थेत असणार आहे याची तुम्हाला पूर्वकल्पना देऊन ठेवते. युजेनीनं मला सगळी चित्तरकथा आत्ताच कानात सांगितलेली आहे. घरकामात काहीतरी चुकलं म्हणून कालच मदामच्या नवऱ्यानं तिला चाबकानं बडवलेली आहे. तिचा खांदाच मोडायचा थोडक्यात चुकलेला आहे. आणि ह्याखेरीज तिच्या कुल्ल्यांचे ओठ अगदी कुस्करलेल्या रेशमासारखे दिसणार आहेत.

दोलमांसे (मदाम द मिस्तवालला नागडी झालेली बघून): अगदी तसंच दिसतंय की! कुणाचे इतके हाल केलेले मी कधी बघितले नव्हते. येशूराया! मागे जितकं कापलंय तितकंच पुढेही कापलंय. पण तरीही या सगळ्यात कुठेतरी एक अत्यंत सौष्ठवपूर्ण ढुंगण दिसतंय मात्र! (त्याची पापी घेऊन ते कुरवाळतो).

मदाम द मिस्तवाल: मला जाऊ द्या, मला जाऊ द्या नाहीतर मी ओरडेन!

मदाम द सांतांज (तिच्या दंडाला धरून): रांडे, मी काय म्हणतेय ते नीट ऐक. तुझ्या नवऱ्यानं तुला बळीचा बकरा म्हणून इथे पाठवलेली आहे. तुझं जे काही होणार आहे, ते तुला निमूटपणे सहन करावं लागेल. तुला वाचवणारं कुणीही नाही. काय होणार आहे ते मला माहित नाही. तुला टांगून फाशी देतील, तुझे तुकडे करतील, तुला जिवंत जाळतील - तुझा काय छळ करायचा ते तुझ्या मुलीच्या मनावर आहे. हुकूम ती देईल. पण वेसवे, तुझे हाल मात्र होणार... सर्व तऱ्हा वापरून आधी तुझी लाज काढल्याखेरीज तुला जाळण्यात येणार नाही. तू ओरड, पण त्याचा उपयोग नाही. या खोलीत बळू जरी कापला तरी त्याचं रेकणं बाहेर ऐकू जायचं नाही. तुझी घोडागाडी घेऊन नोकर केव्हाच निघून गेलेले आहेत. पुन्हा सांगते - आम्ही जे काही करणार त्याला तुझ्या नवऱ्याची परवानगी आहे. तुला इथे आणणं हा एक सापळा होता. तू बावळट म्हणून त्यात आपसूक आणि पद्धतशीर फसलेली आहेस.

दोलमांसे: हे ऐकून मावशींचा जीव आता भांड्यात पडला असेल.

युजेनी: आम्ही आधीच इशारा देऊन ठेवला यात आमचा समंजसपणाच दिसतो.

दोलमांसे (मदाम द मिस्तवालचे कुल्ले चाचपडून थोपटत): मावशी, मदाम द सांतांज तुम्हाला अगदी जीवश्चकंठश्च मैत्रिणीसारख्याच आहेत. इतकं मनापासून अलिकडे कोण बोलतं? काहीही आडपडदा न ठेवता तिने सगळं तुम्हाला सांगितलेलं आहे. युजेनी, इकडे ये. तुझे कुल्ले तुझ्या आईशेजारी ठेव बरं. मला तुलना करून बघू दे. (युजेनी येते.) हं! तुझी गांड फारच मस्त आहे, पण आईसाहेबांची सुद्धा काही वाईट नाही ... आत्ता नाही... थोड्या वेळाने तुम्हा दोघींनाही मी झवून पाहणार आहे. ऑगस्तां, मावशीला धर बरं.

मदाम द मिस्तवाल: अगदी हद्द गाठलीस की रे!

दोलमांसे (बोलत असताना कृती चालूच ठेवतो. सुरवातच मातु:श्रींची गांड मारण्यापासून करतो.) यात हद्द कसली? अगदी सोपी गोष्ट आहे... काही तरी जाणवलं का तुला? तुझ्या नवऱ्यानं ह्या रस्त्यावर बऱ्याचदा येजा केलेली आहे हे उघड आहे. युजेनी, आता तुझी पाळी. बापरे, बराच फरक आहे की. ठीक आहे, सध्या एवढंच पुरे. मला जरासा आळस मोडायचा होता इतकंच. आता सारे जरा शिस्तीने वागा पाहू. मदाम सांतांज आणि युजेनी! तुम्ही दोघीही एकेक डिल्डो घेऊन या म्हणजे ह्या संभावित महिलेला गांडीत थोडे आणि पुच्चीत थोडे असे सणसणीत दणके देता येतील. याचवेळी मिरवेल, ऑगस्तां आणि मी आपापलं निसर्गदत्त देणं वापरून तुमच्याशी आळीपाळी करू. सुरुवात मी करणार आहे, आणि तीही तिच्या गांडीचं नमन करून. ह्या बाईचा छळ कसा करायचं हे प्रत्येकाने आपापलं ठरवायचं आहे, पण एक लक्षात ठेवा. तिच्या वेदना हळूहळू वाढायला हव्यात, नाहीतर ती अवेळीच मरून जायची. ऑगस्तां, ह्या म्हाताऱ्या गोमातेची गांड मारण्याचं काम माझ्यावर येऊन पडलेलं आहे, त्याबद्दल मला सांत्वनाची गरज आहे. तेव्हा माझी गांड मारायला लाग बरं. युजेनी, आईवर काम चालू असताना तुझ्या सुंदर पार्श्वभागाची मला पापी घेऊ दे. मदाम

सांतांज, तुमचाही माल जवळ आणा म्हणजे मला हात लावता येईल - बोट घालता येईल. कुल्ल्यात घुसलेलो असताना आजूबाजूला कुल्लेकोट हा असायलाच हवा.

युजेनी: ह्या शिंदळीचं काय करणार आहेस तू? रेत बाहेर टाकल्यानंतर हिला काय सजा देणार आहेस?

दोलमांसे (चाबूक चालवता चालवता): विशेष काही नाही, मी तिला भादरणार आहे आणि सांडशीने तिच्या मांड्या ओचकारणार आहे.

मदाम द मिस्तवाल: राक्षस मेला, छळ करतोय गं माझा... देवा, धाव रे!

दोलमांसे: अगं चिमणे, त्याला नको हाक मारूस. कुणाचीही हाक त्याला जशी ऐकू जात नाही, तशी तुझीही ऐकू जायची नाही. त्या महाशक्तिशाली इसमाने ढुंगण या मामुली विषयात आत्तापर्यंत कधीही दखल दिलेली नाही.

मदाम द मिस्तवाल: हाय! दुखतंय गं!

दोलमांसे: मानवी मनाचा व्यापार किती आगळा असतो! प्रियतमे, तिकडे तुला वेदना होताहेत, तू रडते आहेस तर इकडे माझा रेत पाझरतो आहे. अहाहा, महारांडे! तुझा गळा दाबण्याचा आनंद दुसऱ्यांना द्यायचं मी ठरवलं नसतं तर ते काम मीच केलं असतं. मदाम द सांतांज, ही आता तुमची आहे. (एक डिल्डो घेऊन मदाम सांतांज तो आळीपाळीने तिच्या पुच्चीत आणि गांडीत घालते. मुठीने तिला चारपाच दणके देते. यानंतर मिरवेलची पाळी. तोही त्या दोन मार्गांवर जाऊन येऊन, रेत बाहेर टाकता टाकता तिच्या कानफटात मारतो. यानंतर ऑगस्तां येतो. तोही आधीच्यांची री ओढत आपल्या बोटांनी तिला टोचतो आणि दोनचार ठोसेही मारतो. हा मारा चालू असताना दोलमांसेचं इंद्रिय प्रत्येक पात्रावर थोडंथोडं रेंगाळून पुढे जातं आहे, आणि सर्वांना तो चिथावणी देतो आहे.) युजेनी, आता तुझ्या आईला झव पाहू. सुरवातीला तिच्या पुच्चीत घाल.

युजेनी: माते, अशी इकडे ये. तुझं नवरेपण मला पत्करू दे. त्याच्यापेक्षा हे जास्त जाड आहे की नाही? पण काळजी करू नकोस, ते आत जाईलच. आहा! तुझीच मुलगी तुला झवत असताना बघ तू कशी ओरडतेयस. आणि दोलमांसे त्याचवेळी माझ्या गांडीत घुसलेला आहे. म्हणजे मात्रागमनी, व्यभिचारिणी, आणि गुदमैथुनी असे तीन बिल्ले एकाच वेळी मला मिळाले आहेत, आणि तेही स्वत:चा आडपडदा आजच गमावलेल्या मुलीला! प्रगतीचा हा झपाटा बघून घ्या! पापाच्या काटेरी रस्त्यावरून काय वेगाने प्रवास करते आहे मी... माझी वाट लागली म्हणजे अगदी पार लागली! आई, तुझा उत्कर्षबिंदू आलेला दिसतो! दोलमांसे, बघ तरी तिच्या डोळ्यांकडे. आतून ती पाझरते आहे हे नक्की! रांडे, लाज कशी सोडतात हे मीच तुला शिकवते बघ. सटवे, आता कसं वाटतं? (आपल्या आईचे स्तन करकचून पिळून काढते.) दोलमांसे, मला झवत राहा. मेले गं मी... (आणि उत्कर्षबिंदू गाठत असताना आईच्या अंगावर दहाबारा जबरदस्त ठोसे हाणते.)

मदाम द मिस्तवाल (बेशुद्ध पडण्याच्या बेतात आहे): दया करा हो माझ्यावर! मला बरं वाटत नाहीय... मला चक्कर येतेय.. (मदाम द सांतांज तिच्या मदतीला जाऊ पाहते; दोलमांसे हात उंचावून तिला थांबवतो.)

दोलमांसे: नको, तिला तशीच राहू दे. बेशुद्ध पडलेल्या बाईइतकं मादक काही नाही. आपण तिला फटके मारूया, म्हणजे मग ती हळूहळू शुद्धीवर येईल. युजेनी, सावजाच्या अंगावर पडून राहा. तुझा धीर किती टिकतो ते मी पाहणार आहे. मिरवेल, आपल्या आईवर झोपलेली असताना युजेनीला झवत राहा, आणि त्याचवेळी ऑगस्तांला आणि मला ती एकेका हाताने चाळवत राहील. सांतांज, ती झवली जात असताना तू तिला चाळवत राहा.

मिरवेल: दोलमांसे, हे असलं काहीतरी करायला सांगून निसर्गाचे, धर्माचे आणि माणुसकीचे दंडक एकाच वेळी तू आम्हाला मोडायला लावतो आहेस.

दोलमांसे: मिरवेलचा खवळलेला सात्विक संताप बघून जितकी माझी करमणूक होते तितकी इतर

कशानेही होत नाही. यात तुला निसर्गाविरुद्ध, धर्माविरुद्ध आणि माणुसकीविरुद्ध असा काय गुन्हा दिसतो? वत्सा, स्वत:ची वागणूक कशी ठेवायची ह्यामागचा तत्त्वविचार आमच्यासारखे कामपिपासू लोक निसर्गाकडूनच शिकतात. निसर्गशक्तीचा समतोल कायम टिकावा म्हणून तिला काही वेळा सद्गुणांची तर काही वेळा दुर्गुणांची गरज भासते, आणि तिला ज्या वेळी जे हवं त्याप्रमाणे ती एकदा अशी तर एकदा तशी प्रेरणा आपल्याला देते. आणि म्हणूनच या प्रेरणांबद्दल कुणाचंही वैयक्तिक मत काहीही असलं तरीदेखील त्यांना शरण जाण्यात वावगं काहीच नाही. हे सगळं मी तुला हजारदा सांगितलं आहे. आणि धर्माची चिंता सोड. त्यापासून घाबरण्यासारखं काही नाही. ह्या विश्वात एकच शक्ती कार्यरत असते आणि ती म्हणजे निसर्गशक्ती. मनुष्यजमातीची माता तीच आहे. ह्या शक्तीचे जे भौतिक आविष्कार असतात त्यांना चमत्कार समजून वेगवेगळे मानवसमाज त्यांचे वेगवेगळे अर्थ लावतात, आणि विविध तऱ्हांनी त्यांचं दैवीकरण करतात. काही लबाड आणि पाताळयंत्री मंडळींनी यातून चित्रविचित्र दिवास्वप्नं जन्माला घालून, त्यांचा डांगोरा पिटून, आपल्याभोवतालच्या भोळसट माणसांत ती पसरून दिलेली आहेत. यालाच मिरवेल धर्म समजतो आहे आणि त्याचे नियम मोडतील की काय म्हणून तो घाबरून गेला आहे. आज दुपारभर जे आपले पोरखेळ चालले आहेत त्यामुळे माणुसकीचे नियम मोडतात असं त्याला वाटतं.

तू भोळा आणि पेदरट आहेस. इतकं पक्कं लक्षात ठेव की मूर्ख लोक ज्याला माणुसकी म्हणतात तो एक भीतीतून आणि स्वप्रेमातून जन्मलेला दुबळेपणा आहे. हा बनावट सद्गुण फक्त कमकुवत माणसांनाच आपल्या कह्यात घेऊ शकतो. जे शूर असतात, वेदनांसमोर न डगमगणारे असतात, खरा तत्त्वविचार जे ओळखणारे असतात, त्यांच्यावर तो प्रभाव पाडू शकत नाही. तेव्हा मिरवेल, कृती कर, घाबरू नकोस. ह्या रांडेची कुटून पूड जरी केली तरी त्यात कसलाही गुन्हा नाही. अपराध करणं माणसाला शक्य नसतं. आपण अपराध करावा अशी उबळ जेव्हा निसर्गशक्ती त्याच्यात निर्माण करते, तेव्हा ज्यामुळे तिचं तंत्र बिघडेल किंवा तिच्या इच्छेत ढवळाढवळ होईल असं काहीही त्याला शक्य होणार नाही, ही खबरदारी तिने घेतलेलीच असते. तेवढं सोडून सगळं करायला परवानगी आहे, आणि तिला आव्हान देईल किंवा तिच्या चक्रात कोलदांडा घालेल अशी कृती मानवी आवाक्यात ठेवण्याइतकी निसर्गशक्ती मूर्ख नाही. तिच्या अदृश्य प्रेरणांसाठी आपण फक्त साधन आहोत. जगाला आग लावण्याची जर तिने आज्ञा केली तर तिला विरोध करणं हाच

अपराध होईल. जगातले सारे गुन्हेगार हे तिची लहर पुरवणारे नोकर आहेत. युजेनी, तुझी जागा घे पाहू. अरेच्या, पण ही फिकुटलेली दिसते...

युजेनी (आईच्या अंगावर झोपलेली आहे): छे छे! फिकुटली कसली? मी चांगली टुमटुमीत आहे. बघालच तुम्ही. (दोलमांसेच्या सूचनांप्रमाणे प्रवेश साजरा होतो. मदाम द मिस्तवाल अजून मूर्च्छेतच आहे. मिरवेलने रेत बाहेर टाकल्यानंतर सारेजण अलग होतात.)

दोलमांसे: रांड उठली नाही अजून? चाबूक! चाबूक घेऊन या. ऑगस्तां, बागेतून माझ्यासाठी मूठभर काटे घेऊन ये. (तो गेलेला असताना मदामच्या थोबाडीत देतो.) च्यायला, ही मेली की काय? काहीही केलं तरी हलत नाहीय.

युजेनी (वैतागून): मेली? कशी काय?! मी इतके छानछान ड्रेस शिवून घेतले होते, आणि उलट आता काळंकुट्ट काहीतरी घालून हिंडावं लागणार.

मदाम सांतांज: ही पोरगी म्हणजे सटवी आहे! (हसू लागते.)

दोलमांसे (ऑगस्तांकडून काटे घेत): आता हा शेवटचा उपाय चालतो का बघू. युजेनी, तुझ्या आईला परत आणण्याचा मी प्रयत्न करतो, तोपर्यंत माझा लवडा चोखत राहा. ऑगस्तां, ह्या बाईला मी झोडपणार आहे, तसतसा तूही मला झोडप. मिरवेल, तोपर्यंत तुझ्या बहिणीची गांड मारत राहिलास तर मला दु:ख होणार नाही. आणि अशा आसनात राहा की मला तुझ्या कुल्ल्यांची पापी घेता येईल.

मिरवेल: आपण काहीतरी भयानक करतो आहोत असं ह्या मवाल्याला पटवून देण्याचा कुठलाच मार्ग दिसत नाही, तेव्हा तो म्हणतो ते ऐकलं पाहिजे. (याप्रमाणे व्यवस्था होते. जसजसं मदामला बदडण्यात येतं, तसतशी ती शुद्धीवर येते.)

दोलमांसे: औषधाचा गुण आला की नाही? ते लागू पडणार हे तुम्हाला मी म्हटलंच होतं.

मदाम द मिस्तवाल (डोळे उघडत): त्या काळोख्या थडग्यातून का मला परत आणलंत?! जीवनाच्या त्या भयाण गर्तेमध्ये का रे मला पुन्हा ढकलता?!

दोलमांसे (एकसारख्या गतीने तिला बडवत राहात): माते, ह्यामागचं कारण असं की अजून खूप गप्पाटप्पा व्हायच्या आहेत. तुला काय शिक्षा सुनावली जाणार आहे ते ऐकायचं नाहीय का? आणि दिलेली शिक्षा अंमलात नको का आणायला? चला, साऱ्यांनी सावजाभोवती गोल करून उभे राहा. अंग कापत असताना वर्तुळाच्या मधोमध गुडघे टेकून तिला सुनावणी ऐकू द्या. मदाम द सांताज, सुरुवात तुम्ही करा - (ही पुढची भाषणं चालू असताना सारे कार्यरत आहेतच.)

मदाम द सांतांज: हिला फाशी देऊया.

मिरवेल: चिनी लोक करतात तसे हिचे सत्तरऐंशी हजार तुकडे करूया.

ऑगस्तां: फळीवर आडवी पाडून हिची हाडं तोडूया.

युजेनी: माझ्या लडिवाळ मातेच्या अंगात गंधक भरलेल्या वाती लावूया. एकेक करून त्या पेटवण्याचं काम मी पत्करते. (वर्तुळ मोडलं जातं.)

दोलमांसे: जनहो, मी तुम्हाला नेतृस्थानी आणि गुरुस्थानी असल्यामुळे तिच्या शिक्षेत मी सूट देणार आहे. पण तुम्ही केलेल्या मागण्या आणि माझं फर्मान यांत एक फरक असेल. तुमच्या शिक्षा म्हणजे टोकाला गेलेली टवाळी म्हणता येईल अशा आहेत, आणि याउलट मी अंमळ बदमाशी करणार आहे. माझा घोडागाडीवाला बाहेर उभा आहे. जगातला सर्वांत अकटोविकट लवडा त्याला प्राप्त झालेला आहे, पण गरमीने खाऊन टाकून 'परंतु यासम हा' अशी त्याची अवस्था बनवली आहे. थोडक्यात काय तर रोगाचा अगदी अर्क त्यातून गळतो आहे. त्याला मी आत बोलावतो, आणि आपण जोडी

जुळवू. ह्या लडिवाळ सुस्वभावी स्त्रीच्या दोन्हीही निसर्गदत्त विवरांमध्ये तो आपलं विष ओतेल. परिणाम असा होईल की जोपर्यंत ह्या रोगाची लक्षणं टिकतील तोपर्यंत युजेनीने कितीही झवाझवी केली तरी तिला अडवायचं नाही इतकं हिच्या लक्षात राहील. (सारेजण टाळ्या वाजवून अनुमोदन देतात. गाडीवान आत येतो.) लापिएर, ह्या बाईला झवायचं काम तुला दिलेलं आहे. ती चांगली निरोगी आहे, तेव्हा कदाचित तिच्यामुळे तू बरा होशीलही. निदान असा जो उपाय सांगतात तो खरा ठरतो का बघूया.

लापिएर: सगळ्यांसमोर?

दोलमांसे: सगळ्यांसमोर लवडा बाहेर काढायला घाबरतोस की काय?

लापिएर: छे छे, मुळीच नाही! चला, सुरू होऊ द्या. मदाम, तयार व्हा.

मदाम द मिस्तवाल: आई ग! वाटोळं झालं गं माझं!

युजेनी: मरायचीस त्यापेक्षा हे बरं! निदान पार्ट्या सुरू झाल्या म्हणजे मला छान छान कपडे तरी घालता येतील.

दोलमांसे: हे चालू आहे तोवर आपल्यालाही काही मनोरंजन हवं. माझ्या मते आपण एकमेकांना फटके मारू. मदाम द सांतांज, तुम्ही लापिएरला फटके मारा, जेणेकरून मदाम द मिस्तवालची पुच्ची चांगली बडवली जाईल. मी सांतांजना मारतो, ऑगस्तां मला चाबूक मारेल, युजेनी ऑगस्तांला मारेल, आणि मिरवेल जोर लावून युजेनीला मारेल. (याप्रमाणे व्यवस्था होते. लापिएरकरवी पुच्ची झवून झाल्यावर दोलमांसे त्याला मदाम द मिस्तवालची गांड मारायला सांगतो, आणि लापिएर तेही करतो. हे सगळं साग्रसंगीत पार पडल्यानंतर -) उत्तम! लापिएर, आता बाहेर चालता हो. (सोन्याची चारपाच नाणी त्याच्यावर फेकतो.) वा वा! एखादा गब्रू डॉक्टर करणार नाही अशी लसटोचणी झाली.

मदाम द सांतांज: आता मावशीबाईंच्या अंगात जे विष इकडून तिकडे सळसळतं आहे ते बाहेर सांडू नये हे सांभाळणं अगत्याचं आहे. (मदाम द मिस्तवलाला उद्देशून) तेव्हा युजेनीकडे काम असं की तुझी पुच्ची आणि गांडीचं भोक ही दोन्ही फार काळजीपूर्वक शिवून टाकायला हवी, जेणेकरून विषप्रकृती आणखी दाट होईल, हवेत फारशी उडून जाणार नाही, बाहेर मुळीच गळणार नाही आणि तुझी हाडं त्यामुळे लवकर वितळतील.

युजेनी: अत्यंत नामी कल्पना आहे. माझ्यासाठी लवकर सुईदोरा घेऊन या. आई, तुझ्या मांड्या फाकव म्हणजे मला नीट शिवता येईल - आणि मला यापुढे भाऊबहिणीसुद्धा होणार नाहीत. (युजेनीला मदाम सांतांज एक दाभण देते. एक जाडजूड आणि मेणचट लाल दोरा त्यातून ओवलेला आहे. युजेनी शिवते आहे.)

मदाम द मिस्तवाल: देवा! काय दुखतंय रे!

दोलमांसे (वेड्यासारखा खिदळतो आहे): काय मस्त कल्पना आहे! तुझं कौतुक करायला हवं... मला हे कधीही सुचलं नसतं!

युजेनी (पुच्चीच्या ओठांवर युजेनी सुई टोचून पाहते आहे. अधूनमधून आत टोचते तर अधूनमधून आईच्या पोटावर): आई, माझ्याकडे लक्ष देऊ नकोस. टोक अणकुचीदार आहे की नाही हे मी तपासून पाहते आहे.

मिरवेल: ही शिंदळकुमारी तिला रक्तपात करून मारणार.

दोलमांसे (शस्त्रक्रिया न्याहाळत असताना मदाम द सांतांजकडून चाळवून घेतो): हा सगळा राडा बघून माझा लवडा ताठरला आहे. युजेनी, बरेच टाके घाल म्हणजे शिवण चांगली घट्ट बसेल.

युजेनी: चांगले शेदोनशे तरी घालतेच. मिरवेल, माझं काम चालू असताना माझी पुच्ची चाळव बरं.

मिरवेल (आज्ञापालन करत): इतकी हिंस्र पोरगी कधी बघितली नव्हती.

युजेनी (डोकं भडकलेलं आहे): मिरवेल, मला काही म्हणू नकोस, नाहीतर तुलाच टोचीन! तुला सांगितल्या तशा मला बोटाने गुदगुल्या तेवढ्या कर. गांडीच्या भोकातही कर! तुला एकच हात आहे काय?! काही मला सुचत नाहीय, टाके वाटेल तिथे पडताहेत. बघितलंत माझी सुई कशी भरकटते आहे.. एकदा तिच्या मांड्यांवर, एकदा तिच्या गोळ्यांवर.. आई झवली! काय मजा येते आहे!...

मदाम द मिस्तवाल: हडळे! माझं अंग फाडतेयस तू!... तुला जन्माला घातली याची लाज वाटते गं मला!

युजेनी: आई, शांत हो बघू. संपतच आलंय.

दोलमांसे (मदाम द सांतांजच्या हस्तकौशल्यामुळे ह्याचं लिंग जबरदस्त ताठ झालेलं आहे): युजेनी, ढुंगण मला करू दे. त्याच्यावर माझा हक्क आहे.

मदाम द सांतांज: दोलमांसे, तू अतिच ताठ झालाहेस. अशाने तू बाईला धारातीर्थी पाडणार.

दोलमांसे: मग काय झालं? तिचं काहीही करायची आपल्याकडे लेखी परवानगी आहे! (मदाम द मिस्तवालला तो पोटावर पाडतो, आणि सुई हाती घेऊन ढुंगणाचं भोक शिवायला लागतो.)

मदाम द मिस्तवाल (चेटकिणीसारखी ओरडत): अयाई ग!

दोलमांसे (तिच्या मांसात सुई खोल घुसवत): गप्प बस थेरडे! नाहीतर तुझ्या कुल्ल्यांचा चुथडा होईल. युजेनी, मला चाळवणं सुरू कर बरं..

युजेनी: आनंदाने करीन, पण तिला जरा आणखी भोसक. तुझा कारभार फार जपून चाललाय. (त्याला चाळवते.)

मदाम द सांतांज (दोलमांसेला)**:** हे दोन भलेथोरले ओठ दिसताहेत, त्यांवर काम चालू ठेव.

दोलमांसे: हो, थांबा थांबा, दमानं घ्या. एखाद्या मटणाच्या फऱ्यासारखी हिला कोरून काढतो. युजेनी, शिकवलेलं तू विसरलीस. लवड्याच्या टोकावर तू हात झाकलास.

युजेनी: ह्या रांडेच्या विव्हळण्यामुळे माझ्या मनाचा असा आगडोंब उडाला आहे, की मी काय करतेय हे माझं मलाच कळत नाहीय.

दोलमांसे: देव झवला! माझं डोकं सैरभैर होतंय. सांतांज, ऑगस्तांला माझ्या डोळ्यांसमोर तुझी गांड मारू दे आणि त्याचवेळी तुझ्या भावाला तुझी पुच्ची झवू दे. आणि माझ्या अवतीभोवती कुल्ल्यांचा देखावा उभा करा. त्याखेरीज मला शेवटापर्यंत जाता येणार नाही. (ही रचना होत असताना मदाम द मिस्तवालचे कुल्ले टोचत राहतो.) मावशी, आणखी घ्या. (त्याची सुई पंधरावीस ठिकाणी तरी भरकटत जाते.)

मदाम द मिस्तवाल: नको रे! तुझी कळकळून माफी मागते रे! तू मला ठार मारणार...

दोलमांसे (आनंदातिरेकाने वेडा झाला आहे): मला आता... कित्येक वर्षांत इतका ताठ झालो नव्हतो. आत्ताच इतक्या वेळा सतत रेत बाहेर टाकल्यानंतर हे शक्य होईलसं वाटलं नव्हतं.

मदाम द सांतांज: दोलमांसे, देखावा कसा वाटतो?

दोलमांसे: ऑगस्तां, जरा उजवीकडे वळ. मला तुझं ढुंगण नीट दिसत नाहीय. त्याला पुढे वाकवा.

भोक दिसायला पाहिजे.

युजेनी: आहा! रांडेच्या अंगातून कसं रक्त पाझरतंय बघा.

दोलमांसे: आत बरंच रक्त दिसतंय. तुम्ही सगळे तयारीत आहात का? मीच केलेल्या ह्या सगळ्या जखमांवर मिनिटाभरातच मी जीवनसंजीवनी मलम उडवणार आहे.

मदाम द सांतांज: आहाहा! आपण सगळे अगदी एकत्रच येऊन पोहोचलो.

दोलमांसे (काम संपवत आणलं आहे. स्खलन होत असताना सावजाचे कुल्ले आणखीच खणत राहतो.) देवा, तुला त्रिवार झवलं रे! माझं रेत गळतं आहे. येशूच्या रक्तासारखं गळतं आहे रे अगदी! युजेनी, तुझ्या आईच्या मांड्यांवर धर बरं ते. एक थेंबही उरला नाही. मेलो रे देवा! इतक्या विलक्षण जिवंत संवेदनांनंतर असा थकवा यावा तो का रे?!

मदाम द सांतांज: भाऊराया, झव रे मला! पाझरते आहे रे मी. (ऑगस्तांला उद्देशून) सांडा, जरा हाल की. मी शेवटाला येतेय तेव्हाच तुझी पाचर माझ्या गांडीत खोलवर रुतवायची असते हे विसरलास की काय? हे दीनदयाळा! एकाच वेळी दोन पुरुषांकडून झवून घेण्यात काय मजा येते रे...

दोलमांसे: म्हणायचं ते आता म्हणून झालं. (मदाम द मिस्तवालला उद्देशून) ए! रांडे! तुला हवं तेव्हा कपडे घालून चालू लाग. जे काही आम्ही केलं त्याला तुझ्या नवऱ्याची पुरती परवानगी होती हे तुला सांगून ठेवतो. आधीच हे आम्ही म्हणालो होतो, पण तुझा विश्वास बसला नाही. (तिला पत्र दाखवतो.) यावरून धडा शिकशील तो असा की तुझी मुलगी तिला वाटेल ते करण्याइतकी मोठी झालेली आहे. तिला झवायला आवडतं, झवण्यावर तिची नितांत प्रीती आहे, झवण्यासाठीच ती जन्माला आलेली आहे. तुला स्वत:ला झवून घ्यायची इच्छा नसेल तर निदान तिला हवं ते करू द्यावंस हे उत्तम. आता चालती हो, मिरवेल तुला घरी घेऊन जाईल. रांडे, सगळ्यांना नमस्कार कर.

तुझ्या मुलीसमोर गुडघे टेक, आणि तिला इतकं वाईट वागवल्याबद्दल तिची माफी माग. युजेनी, तुझ्या आईला दोन सणसणीत थोबाडीत दे, आणि दारापाशी आली की तिच्या ढुंगणावर चारपाच जोरकस लाथा घालून तिला उंबरठा ओलांडायला मदत कर. (याप्रमाणे बेत पार पडतो.) मिरवेल, नंतर भेटू! आणि रस्त्याने जाताना मदामला झवू नकोस. एकतर तिला शिवलेली आहे आणि शिवाय तिला रोगही जडलेला आहे. (मदाम आणि मिरवेल जातात.)

आणि आता मित्रजनहो, जेवायला चला. त्यानंतर आपण चौघेही एकाच बिछान्यात झोपायला जाणार आहोत. आज दिवसभर चांगला व्यायाम झालेला आहे, तेव्हा भूकही कडकडून लागलेली आहे. बेअक्कल लोक ज्याला पाप म्हणतात ते मनसोक्त केल्यानंतर मला जशी छान झोप लागते तशी एरवी लागत नाही.

❋ ❋

मूळ फ्रेंच नाटक:

Sade, Marquis de, “La Philosophie dans le Boudoir”, Paris: La Musardine, 1997.
(प्रथमावृत्ती: १७९५)

इंग्रजी भाषांतर:

Sade, Marquis de, “Justine, Philosophy in the Bedroom, and Other Writings”, translated by Richard Seaver and Austryn Wainhouse, Grove Press, New York, 1990.

❋ ❋ ❋

सातशे

(वाचण्यासाठीचे एक नाटक)

अंक पहिला

पहिला: घे.

दुसरा: नको.

पहिला: घे रे.

दुसरा: नको.

पहिला: थोडीशी घे.

दुसरा: नको. थुंकायची पंचाईत होते.

पहिला: काहीसुद्धा पंचाईत नाही. मागे ओणवं होऊन दोन्ही चाकांमधोमध नेम धरून नि:शंकपणे पिचकारी मारायची. कुणी काही म्हणणार नाही, आणि तो रंग नंतर वेगळा उठूनही दिसणार नाही.

दुसरा: बरं, दे.

पहिला: घे. सुईच्या अग्रावर मावेल इतकीच दिली आहे.

दुसरा: (घेता घेता) रांडीच्या, तू असा वाह्यात बोलत जाऊ नको बरं! आजूबाजूला ऐकणारे खूप आहेत. हकनाक कुणाच्या भावना दुखावशील.

पहिला: हे पाहा, माझ्यावरचा स्नेह व्यक्त करण्यासाठी जर तू अपशब्द वापरणार असशील तर निदान पारिभाषिक चुका तरी करू नकोस. 'रांडीच्या' बरोबर नाही. मी रांडीचा नव्हे तर कांडीचा आहे. पैसे घेऊन संभोगासाठी शरीर देणं माझ्या आईला शक्य नव्हतं.

दुसरा: हो, आत्ता आठवलं. चुकलोच मी. तू म्हणतोस ते खरं आहे. दाती तृण धरून तुझी क्षमायाचना करायला हवी.

पहिला: नको! माझ्या आईला चावलास तर खराच रागावेन तुझ्यावर. पण आता थोडा वेळ विनोद स्थगित करूयात. दिलीय ती चाखून बघ.

दुसरा: (हुंगत) गोडमिट्ट वास आहे. मी काही ह्यातला दर्दी नव्हे, पण चांगल्या प्रतीची असावी.

पहिला: आहेच.

दुसरा: (कातरलेल्या सुपारीत मिसळून दोन्ही हात भरपूर चोळून फक्की मारत) पण तोंड अगदी कडूजार होतं बुवा.

पहिला: चांगल्या प्रतीची आहे असं मी म्हणालोच होतो. परिणाम अजून थोड्या वेळाने जाणवेल.

दुसरा: वाट पाहीन. ऐकलं आहे मी खूप, पण ह्या प्रांतात मला अनुभव बेताचाच आहे.

(यावर 'शू! ऐकू द्या हो जरा...' अशासारखे आवाज कुठूनकुठून येतात.)

पहिला: ऐकू काय द्या? सगळे एकजात मठ्ठ आहेत. इतक्या अंतरावरून ऐकू यायला ती काय गाईच्या गळ्यातली घंटा आहे?

दुसरा: पण किती वेळ चालणार आहे कुणास ठाऊक.

पहिला: किती वेळ चालणार आहे ते ठाऊक नाही, आणि नक्की काय चाललं आहे तेही ठाऊक नाही.

दुसरा: मला तशी घाई नाही. मी थांबायला तयार आहे.

पहिला: अर्थात मीही आहे, पण तरीदेखील एक ढोबळ अंदाज असलेला बरा.

दुसरा: विचारून पाहतो. (आजूबाजूला ओरडून) यादवांनो, काय चालू आहे ते काही कळतंय का?

(एक घोडेस्वार दौडत सामोरा येतो.)

घोडेस्वार: काही नीट समजत नाहीय, सेनाधिपती. मघाशी मी कोसभर पुढे जाऊन बघून आलो. थोरले गोपाळ अर्जुनाशी काहीतरी बोलताहेत. अर्जुनाने धनुष्य बाजूला फेकून दिलं आहे आणि तो गुडघ्यांत डोकं घालून नुसता बसून आहे.

पहिला: पण काय बोलताहेत ते ऐकू येत नाही?

घोडेस्वार: नाही, काही ऐकू येत नाही. सगळ्यांचा खोळंबा करून ठेवला आहे. सेनाधिपती, तुम्ही म्हणत असाल तर इथूनच एक बाण टाकून अर्जुनाचा प्रश्न सोडवतो. तसं करू का?

दुसरा (= कृतवर्मा): नको. धर्मयुद्धाच्या नियमांत ते बसत नाही.

घोडेस्वार: मग नाही करत. तुम्ही यादवांचे सेनापती आहात. हे नियम तुम्हाला जितके पक्के समजतात तितके मला अजून समजत नाहीत. पण मी प्रयत्न करत राहीन. हळूहळू मला ते पाठ होत जातील तसतसे आणखी चांगले समजत जातील.

पहिला (= कृपाचार्य): हे पाहा, आत्ताच्या प्रसंगी लागू होणारा नियम खूप सोपा आहे. रथातल्याने रथातल्याशीच आणि घोडेस्वाराने घोडेस्वाराशीच युद्ध करायला परवानगी आहे. अर्जुन रथात आहे आणि तू घोड्यावर आहेस. परस्परविरोधी सैन्यांत जरी असलात तरीदेखील तुम्ही थेट प्रतिस्पर्धी नव्हेत. सबब तुला त्याच्यावर बाण टाकता येणार नाही.

घोडेस्वार: समजलं.

(खट्टू होऊन धीम्या गतीने निघून जाऊ लागतो, पण थबकतो आणि वळून परत फिरतो.)

घोडेस्वार (कृतवर्मा आणि कृपाचार्य अशा दोघांनाही उद्देशून): आता विषय निघालाच आहे म्हणून विचारतो. हा एक नियम कळला, पण इतरही नियमांबद्दल मला राहून राहून शंका येतात. स्वस्थ बसवत नाही आणि लढण्याकरता मनाची पूर्ण तयारी झालेली आहे असं वाटत नाही. तुम्हाला विचारू का? तुम्ही दोघेही माझ्यापेक्षा मोठे आहात. तुमच्याशी बोलून फायदा होईल.

कृपाचार्य: तू विचार, आम्हाला ठाऊक आहे तेवढं आम्ही सांगू. पण तुझं मन अगदी निवळशंख होईल अशी अपेक्षा बाळगू नकोस. कारण शंका मलाही आहेत.

घोडेस्वार: तुम्हालाही आहेत म्हणजे मी काय परिस्थितीत असेन पाहा. पण म्हणूनच विचारून घेतो.

कृतवर्मा: मग चला तर. नियम डोळ्यांसमोर ठेवूनच बोलू.

(युद्धाच्या तयारीचा भाग म्हणून कुरुक्षेत्राच्या धुळीत लाकडी खुंट्या ठोकण्यात आल्या होत्या. दक्षिणोत्तर आणि पूर्वपश्चिम जाणारे लांबलचक सुंभ ह्या खुंट्यांना ताणून बांधून चौरसांची जाळी बनवण्यात आली. प्रत्येक चौरसाची लांबीरुंदी एक सप्तमांश कोस आहे. धर्मयुद्धाचे नियम जिच्यावर ठसठशीत अक्षरांत कोरलेले आहेत अशी दीड हात गुणिले दोन हात आकाराची सपाट दगडी फरशी प्रत्येक चौरसाच्या वायव्य कोपऱ्यात जमिनीलगत पुरण्यात आली. माणूस कुरुक्षेत्रात कुठेही असला तरीदेखील फार अंतर कापावं न लागता त्याला हे नियम संदर्भासाठी उपलब्ध व्हावेत, असा यामागचा हेतू आहे. सध्या दक्षिणायन चालू असल्यामुळे, नियम वाचत असताना माणसाचं तोंड उत्तरेकडे व्हावं अशी योजना आहे जेणेकरून दिवसाच्या कुठल्याही वेळी सूर्य डोळ्यांवर येऊ नये. फरशा लावण्याचं काम पुरं झाल्यानंतर अर्थातच आता खुंट्या आणि सुंभ काढून टाकलेले आहेत. यांपैकी सर्वांत जवळच्या फरशीकडे कृतवर्मा आणि कृपाचार्य आपापले रथ नेतात. घोडेस्वार त्यांच्या मागोमाग येतो. शिलालेख असा आहे -)

धर्मयुद्धाचे नियम

(१) घोडेस्वाराने घोडेस्वाराशी, हत्तीवर बसलेल्याने हत्तीवर बसलेल्याशी, रथीने रथीशी आणि पदातिने पदातिशीच युद्ध करावे.

(२) वार करण्यापूर्वी प्रतिस्पर्ध्याला पूर्वसूचना द्यावी.

(३) वार करण्यापूर्वी प्रतिस्पर्धी तुल्यबळ आहे की नाही, आपल्याच वयाचा आहे की नाही, व हातघाईवर येण्याला आपल्याइतकाच उत्सुक आहे की नाही याचे भान ठेवावे.

(४) एखाद्याला शब्दांनी युद्ध खेळावयाचे असल्यास त्याला शब्दांनीच प्रत्युत्तर द्यावे.

(५) लढाईतून विश्रांती घेतेवेळी उभयपक्षांनी परस्परांशी स्नेहभावाने वागावे. एकमेकांना त्रास देऊ नये.

(६) जो दुसऱ्याबरोबर युद्धात गुंतला असेल किंवा गांगरलेला असेल किंवा पाठमोरा असेल अशास ठार मारू नये.

(७) ज्याचे शस्त्र नीट चालत नसेल किंवा चिलखत निकामी झाले असेल अशास ठार मारू नये.

(८) मैदान सोडून गेलेल्याला अथवा स्वत:च्या सैन्यगटातून बाजूला पडलेल्याला ठार मारू नये.

(९) गाडे हाकणारी किंवा शस्त्रांची वाहतूक करणारी माणसे, ढोल किंवा शंख वाजवणारी माणसे, तसेच ओझ्याची जनावरे यांच्यावर वार करू नये.

३७-पश्चिम २२-दक्षिण

घोडेस्वार (कृतवर्म्याला उद्देशून): सेनाधिपती, हे नियम बनवण्यात तुमचा सहभाग होता अशी यादवसेनेत बोलवा आहे.

कृतवर्मा: दोन्ही बाजूच्या सेनापतींनी एकत्र वाटाघाट करून ते बनवलेले आहेत. त्यात मीही होतो, पण नियमांतले सगळे कंगोरे मला माहित आहेत असा ह्याचा अर्थ नव्हे. आठपंधराजण मिळून एखाद्या गोष्टीला जेव्हा संमती देतात तेव्हा आपण कशाला संमती देतो आहोत याबद्दलच्या त्यांच्या कल्पना एकमेकांशी तंतोतंत जुळतातच असं नाही.

घोडेस्वार: हे नियम मोडणाऱ्याला शिक्षा काय आहे? मी वेगवेगळ्या अफवा ऐकलेल्या आहेत. काहीजण म्हणतात नुसती कानउघाडणी होईल, काहीजण म्हणतात तुरुंगात टाकतील, काहीजण म्हणतात पैशांचा दंड होईल तर काहीजण म्हणतात मृत्युदंड होईल.

कृतवर्मा: एकतर कुठला नियम कितपत मोडला यावर शिक्षा अवलंबून आहे. आणि अफवा म्हणशील तर त्या आम्ही सेनापतींनी मुद्दाम पसरवलेल्या आहेत. फायदा होतो म्हणून माणूस नियम मोडतो. पकडले जायची शक्यता किती आणि शिक्षा काय होईल हे त्याला आधी खात्रीने कळलं तर तो उजवा-डावा हिशेब करून नियम मोडायचा की नाही ते ठरवेल. तसा हिशेब करता येऊ नये म्हणूनच शिक्षा जाहीर केलेल्या नाहीत.

घोडेस्वार: आता कारण कळलं, पण ते मी इतरांना सांगत नाही. अफवा तशाच राहू देत. पण ह्या शिक्षा देणार कोण?

कृतवर्मा: कुणा सैनिकाने नियम मोडला तर त्याचा गणनायक त्याला शिक्षा करील. सैनिकाला जर ही शिक्षा मान्य नसेल तर तो वाहिनीनायकाकडे फिर्याद करू शकेल. त्यापुढे मात्र फिर्याद नाही. अर्थात गणनायकानेच आगळीक केली तर ते प्रकरण थेट वाहिनीनायकाकडे जाईल, किंवा वाहिनीनायकाने केली तर पृतनानायकाकडे जाईल. अशी ती चढण आहे.

आता असं पाहा की आपली कौरवसेना अकरा अक्षौहिणी आहे, म्हणजेच तिच्यात आठ हजार नऊशेदहा गणनायक आणि दोन हजार नऊशे सत्तर वाहिनीनायक आहेत. शिक्षा देताना किंवा फिर्यादीची दखल घेताना हे सगळेजण एकसारखे निर्णय घेणार नाहीत. इथेतिथे विसंगती उद्भवणारच, आणि ही चांगलीच गोष्ट आहे. न्याययंत्रणेत थोडासा गोंधळ असला तर तिचा वचक वाढतो. ती फार शिस्तशीर झाली तर गुन्हेगार तिचा फायदा घेतात.

घोडेस्वार: पण आता उदाहरणार्थ दुसरा नियम घ्या: वार करण्यापूर्वी प्रतिस्पर्ध्याला पूर्वसूचना द्यावी. समजा आपल्या सैनिकाने पांडवांच्या सैनिकावर पूर्वसूचना न देता वार केला. तर त्याला शिक्षा कोण देणार? आपला गणनायक की त्यांचा?

कृतवर्मा: दोघांपैकी कुणीही चालेल. जो लवकर हजर होईल तो किंवा ज्याला कमी काम असेल तो. पण असे प्रसंगच जितके तुरळक येतील तितके चांगले. ह्यात अडचण अशी की समजा शूरसेनाने धैर्यधरावर वार केला. ह्यात जर धैर्यधर दगावला तर तो वार पूर्वसूचना देऊन केलेला होता की नाही हे कसं सिद्ध करणार? तर संकेत असा आहे की शूरसेनाने धैर्यधराला पूर्वसूचना द्यावी, ती आपण दिलेली आहे हे आजूबाजूच्यांना ओरडून सांगावं आणि आपल्याला पूर्वसूचना मिळालेली आहे हे धैर्यधराने आजूबाजूच्यांना ओरडून सांगावं. इतकं झाल्यानंतरच धैर्यधर आणि शूरसेन हातघाईवर येऊ शकतात. ह्यामुळे नंतर वाद राहणार नाही.

कृपाचार्य: हाच धडा तिसऱ्या नियमालाही लागू आहे. म्हणजे हातघाईवर येण्यापूर्वी हे दोघे तुल्यबळ होते की नाही याची आजूबाजूच्यांनी खात्री करून घ्यायला हवी. कारण नाहीतर समजा शूरसेनाच्या हातून धैर्यधर मारला गेला तर ते दोघे तुल्यबळ नव्हते, धैर्यधर कमकुवत होता म्हणून मारला गेला असा विपर्यस्त अर्थ नंतर कुणीतरी काढू शकेल.

घोडेस्वार: मी गणनायक नाही हे एकूण बरंच आहे तर. कारण वाद झाला तर निवाडा करण्याचं काम माझ्या आवाक्यातलं वाटत नाही.

कृतवर्मा: तसं ते थोडंसं गुंतागुंतीचं आहे खरं. आता तिसऱ्या नियमाचंच पाहा. हातघाईला येण्याकरिता दोन सैनिक एकमेकांइतकेच उत्सुक आहेत का हे ठरवण्याचा प्रश्न आहे. आम्ही जेव्हा हा नियम बनवला तेव्हा एका सेनापतीने काढलेली शंका सांगतो. कौरवांकडच्या सरासरी सैनिकाला सोयीसाठी आपण शंभू म्हणू आणि पांडवांकडच्या सरासरी सैनिकाला पंचू म्हणू. आता असं समजा की शंभू हा पंचूपेक्षा लढायला जास्त उत्सुक आहे. ह्यामागचं कारण काहीही असेल; कदाचित आपली बाजू जास्त न्यायाची आहे असं कौरवांना वाटत असेल, पण ते महत्त्वाचं नाही. नियमाप्रमाणे हे दोघे एकमेकांशी लढू शकणार नाहीत. शंभूला पंचूपेक्षा जास्त उत्सुक प्रतिस्पर्धी शोधून काढावा लागेल, आणि शंभूपेक्षा उत्सुक असलेल्या कौरवसैनिकाला पंचूपेक्षा खूपच जास्त उत्सुक पांडवसैनिक शोधून काढावा लागेल. होता होता होईल काय की कौरवसेनेतल्या अनेकांना जोडच मिळणार नाही. आधीच आपली कौरवसेना संख्येने जास्त आहे. त्यात असं होऊ लागलं तर आपल्यातल्या निम्म्यांना बसूनच राहावं लागेल.

कृपाचार्य: ही अडचण आहे खरी. आणि अशीही शक्यता आहे की नुसतं बसून राहिल्यामुळे कौरवसैनिकांचे हात शिवशिवत जाऊन ते हातघाईला आणखी जास्त उत्सुक होतील, आणि याउलट लढाई करून करून पांडवांचं औत्सुक्य कमी होईल. यामुळे ही तफावत वाढतच जाईल.

कृतवर्मा: तर यावर दुसऱ्या एका सेनापतीचं म्हणणं पडलं की औत्सुक्य हे आपापल्या सैन्याच्या सापेक्ष मोजावं, म्हणजे शंभू आणि पंचू एकाच पातळीचे समजावेत. मग ते एकमेकांशी लढतील, आणि शंभूच्या दीडपट उत्सुक असलेला कौरवसैनिक पंचूच्या दीडपट उत्सुक असलेल्या पांडवसैनिकाशी लढेल. ही मोजणीपद्धतही चुकीची म्हणता येण्यासारखी नाही. आणखी एका सेनापतीचं मत पडलं की जर प्रतिपक्षातला सैनिक तितकासा उत्सुक नसेल तर त्याला शिवीगाळ करून चिथवावं आणि उत्सुक बनवावं. चौथ्या नियमात ही तरतूद केलेली आहेच. पण एकदा ह्या आडरानात शिरलं की खूप फाटे फुटतात. समजा एखाद्या सैनिकाला लढण्यात काही रस नाही. तर तो इतरांना चिथावून आपल्यापेक्षा खूप जास्त उत्सुक बनवू शकेल, जेणेकरून त्याला स्वत:ला कुणाशीच युद्ध करावं लागणार नाही. शेवटी आम्ही असं ठरवलं की युद्धाचे पाच दिवस लोटल्यानंतर परिस्थितीची पाहणी करून तिसऱ्या नियमाचा अर्थ निश्चित ठरवावा. युद्ध मार्गी लागल्यानंतर जे औत्सुक्य टिकेल ते खरं. आधीचं खरं नाही.

घोडेस्वार: एकूण एवढं कळलं की नियमाचा अर्थ लिहिल्यालिहिल्या निश्चित होत नाही. तो सावकाश उलगडत जाईल. पण असं सगळ्याच बाबतीत होऊ लागलं तर मूळ सेनापतींच्या मनात जे अर्थ होते ते बाजूलाच राहतील.

कृतवर्मा: म्हटलं ना, मूळचे अर्थ असे पक्के नव्हतेच. सगळ्या सेनापतींनी सगळ्या नियमांना हो म्हटलं असलं तरी प्रत्येकाला अभिप्रेत असलेला अर्थ थोडाथोडा वेगळा होता.

घोडेस्वार: ठीक आहे, शेवटी तुम्ही जसं म्हणाल तसं. मी काही एवढा हुशार नाही. पण आता एक सोपा प्रश्न विचारतो. ढोल किंवा शंख वाजवणाऱ्या माणसावर वार करू नये असं नवव्या नियमात लिहिलेलं आहे. पण उदाहरणार्थ तुतारी वाजवणाऱ्यावर वार केलेला चालेल असा याचा अर्थ नसणार.

कृतवर्मा: नाही, तसा अर्थ नाही.

घोडेस्वार: पण मग 'वाद्य वाजवणाऱ्यावर वार करू नये' असं सरळ का नाही लिहिलं?

कृतवर्मा: कारण नियम बनवताना कोणत्या परिस्थितीत माणसं तो पाळतात याचा विचार करावा लागतो. 'वाद्य' हा अमूर्त शब्द आहे. तो वाचून डोळ्यांत निश्चित असं चित्र उमटत नाही किंवा कानांत निश्चित असा आवाज उमटत नाही. 'ढोल', 'शंख' असे स्पष्ट शब्द वापरण्यामुळे मनावर नेमका परिणाम होतो. ह्यामुळे होतं काय की रणधुमाळीत असतानाही हा नियम लक्षात राहतो. अमूर्त नियम तितक्या ठाशीवपणे लक्षात राहात नाही. पण अर्थात तुतारीचा आवाज जरी ढोलासारखा किंवा शंखासारखा नसला तरी तिलाही तोच नियम लागू आहे. तेवढं तारतम्याने समजून घ्यायचं आहे.

घोडेस्वार: पण मला शंका अशी आहे. समजा कुणीतरी एका सैनिकाने - त्याला बलवंत म्हणू - एका तुतारीवाल्यावर वार केला. इतरांनी त्याला जाब विचारला तेव्हा बलवंत म्हणाला की तुतारीचा उल्लेख तुम्ही केलेला नाही तेव्हा तुतारीवाल्यावर वार करण्याची मला मुभा आहे. तर मग काय?

कृपाचार्य: मला वाटतं हा बचाव आपल्याला स्वीकारावा लागेल, आणि बलवंतला निर्दोष सोडावा लागेल. यामागचं कारण असं की अध्याहृत नियम लादता येत नाही.

कृतवर्मा: ते मान्य आहे, पण अशीही एक शक्यता आहे की ह्या घटनेनंतर तुतारीवाले, ढोलवाले आणि शंखवाले हे सगळेच बलवंतला वाळीत टाकतील. तसं झालं तर तो लढाई करत असताना आजूबाजूला वाद्यं वाजवून त्याला प्रोत्साहन द्यायला कुणी नसेल, आणि बलवंतला ह्याची टोचणी लागेल. ढोलवाले, शंखवाले आणि तुतारीवाले ह्यांच्यात आपापसांत एक आपुलकीची भावना असते. आपण सारे एक असं ते समजतात. तसं पाहिलं तर बलवंत हा शब्दश: अर्थ घेऊन चालणारा माणूस असल्यामुळे शंखढोलवाल्यांना त्याच्यापासून धोका नाही. पण तरीदेखील आपल्यातल्या एकावर वार म्हणजे आपल्या सर्वांवर वार असं त्यांना वाटू शकतं.

कृपाचार्य: आता यापुढे समजा बलवंतला तुतारीशंखढोलवाल्यांनी वाळीत टाकल्याची बातमी सर्वदूर पसरली. तर त्यानंतर नववा नियम जो कोणी वाचेल त्याला 'कुणाही वादकावर वार करू नये' हे अलिखित कलम आपोआपच दिसायला लागेल. पण ह्या नियमापुरतीच ही बाब मर्यादित राहणार नाही, तर सगळीच अलिखित कलमं आवर्जून लक्षात ठेवायला हवीत ही जाणीव मूळ धरू लागेल. तेव्हा एक तुतारीवाला मरेल कदाचित, पण लोकजागृती करून मरेल. जर तुतारीवाल्यांचा उल्लेख आधीच केला असता तर हा परिणाम झाला नसता. तेव्हा नियम मुद्दाम अर्धवट लिहिण्यातून कधी कधी फायदा होतो तो असा.

घोडेस्वार: हो, तेवढं मला आधीच समजलं होतं. सगळ्याच गोष्टी लिहिता येणार नाहीत. तसं करायला गेलं तर शिलालेख फार मोठा आणि किचकट होईल. पण आता तुम्ही अलिखित म्हणता त्यावरून विचारतो. सातव्या नियमात असं आहे की एखाद्याचं शस्त्र नीट चालत नसेल किंवा चिलखत मोडलं असेल तर त्याला मारू नये. शंखढोलाबरोबर तुतारी अलिखित आहे तसंच चिलखताबरोबर शिरस्त्राण अलिखित आहे असं मी समजतो. पण अशी कल्पना करा की शूरसेन आणि धैर्यधर ह्या दोघांची जुंपलेली आहे आणि शस्त्रं, चिलखतं वगैरे ठीकठाक आहेत. अशावेळी समजा शूरसेनाने धैर्यधराच्या चिलखतावर वार करून ते मोडलं. तर आता ताबडतोब लढाई थांबवायची असा त्याचा अर्थ होतो का?

कृतवर्मा: नाही. मी म्हणेन की त्यांनी जर सगळे नियम पाळून लढाईला सुरुवात केली असेल तर नंतर नियम मध्ये येणार नाही. कारण कुणाचं तरी शिरस्त्राण किंवा चिलखत निकामी झाल्याखेरीज तो मरणं अवघड आहे. निकामी या शब्दाचा अर्थच तो आहे. पण युद्ध जर केव्हातरी संपायला हवं असेल तर सैनिक मरणं त्यासाठी आवश्यक आहे, म्हणजेच केव्हा ना केव्हा तरी शिरस्त्राण आणि चिलखतं निकामी होणं आवश्यक आहे. तेव्हा नियमांचा अर्थ लावताना आपल्याला व्यापक उद्दिष्टं विसरून चालणार नाहीत.

घोडेस्वार: हे चांगलं सांगितलंत तुम्ही. हीच पद्धत मी सगळीकडे लावत जाईन. म्हणजे समजा शूरसेन आणि धैर्यधर युद्धाला तितकेच उत्सुक होते, आणि सगळे नियम पाळून त्यांनी लढाई सुरू केली. आता समजा धैर्यधराची पीछेहाट होते आहे, आणि म्हणून हातघाई चालू ठेवण्याबद्दलचं त्याचं औत्सुक्य कमी व्हायला लागलेलं आहे. अशा वेळी शूरसेनाने थांबायचं का? तर नाही. कारण युद्ध जर केव्हातरी संपायला हवं असेल तर सैनिक मरणं त्यासाठी आवश्यक आहे, आणि एखाद्याचा उत्साह कमी पडतो आहे हे काही त्याला न मारायला सबळ कारण नव्हे. तेव्हा इथेही एक मार्गदर्शक तत्त्व म्हणून व्यापक उद्दिष्ट उपयोगी पडतंच. बरोबर आहे ना माझं?

कृतवर्मा: अगदी बरोबर आहे.

घोडेस्वार: चिलखत आणि औत्सुक्य ह्या गोष्टींना एकमेकांची उपमा देता येईल हे माझ्या आधी लक्षात आलं नव्हतं. प्राचीन काव्यातल्या अनेक प्रतिमा अशाच आहेत. आपल्याला त्या ओढीवताणीव वाटतात, पण त्यांच्यामागे विचार असतो.

कृतवर्मा: हो ना! काव्यरम्यता आणि युद्ध यांचा संबंध जुना आहे.

कृपाचार्य: मी तर याहीपुढे जाईन. ही जी व्यापक उद्दिष्टं तुम्ही म्हणता ती नियमांचा अर्थ लावतानाच उपयोगी पडतात असं नाही. आपण नियमांचा गैरफायदा घेऊ नये याबद्दल दक्षता म्हणून सैनिकांनी ती सतत मनात ठेवायला हवीत. आता चौथ्या नियमाचंच पाहा. जर धैर्यधराला शब्दांनीच युद्ध करायचं असेल, म्हणजे प्रतिपक्षाला नुसती शिवीगाळ करायची असेल तर शूरसेनाने त्याला मारू नये, फक्त उलटी शिवीगाळ करावी असा तो नियम आहे. पण सगळेच सैनिक जर नुसती शिवीगाळ करू लागले तर कोणी मरणार नाही आणि युद्ध कधी संपणार नाही. तेव्हा शिवीगाळीला परवानगी जरी असली तरी ती अधूनमधूनच करावी. हे नियमांत जरी उघडपणे लिहिलं नसलं तरी व्यापक उद्दिष्ट आणि नियम ह्यांच्या संयोगातून स्पष्ट होतं.

घोडेस्वार: एकूण तुम्हाला प्रश्न विचारत गेलो ते बरंच झालं. सगळंच जरी नाही तरी पुष्कळसं कळलं. युद्धात एकदा पडलो की अनुभव गोळा होत जाईल आणि माझी समजही वाढेल. तसंच व्हायला पाहिजे. माझा अंदाज असा आहे की दोन्ही बाजूंचं सैन्य जसजसं घटत जाईल तसतसे आम्ही उरलेले सैनिक धर्मयुद्धाच्या नियमांत जास्त जास्त निष्णात होत जाऊ. गर्दी कमी होत गेली की विचार करायलाही पोषक वातावरण मिळेल. आजूबाजूला धांदल-धबडगा असला की काही सुचत नाही.

कृतवर्मा: आणि युद्ध नाहीच झालं तरी आपण केलेली चर्चा वाया जाणार नाही.

कृपाचार्य: बिलकुल वाया जाणार नाही. शब्दच्छल करण्याचा सराव कधी वाया जात नाही.

कृतवर्मा: ते ठीकच आहे, पण युद्धाचं काय होणार याबद्दलची अनिश्चिती संपवायला हवी. असाच वेळ जात राहिला तर सैनिक बिथरतील. त्यांना कधीतरी काहीतरी ठाम सांगून टाकावं लागेल: युद्ध होणार आहे की नाही?

कृपाचार्य: संजयला ठाऊक असेल. दूरवरचं दिसतं किंवा दूरवरचं ऐकू येतं असा कसलासा वर त्याला मिळाला आहे म्हणे. धृतराष्ट्राचा नोकर म्हणून सध्या त्याची नेमणूक आहे. धृतराष्ट्राला युद्धाची हकिकत सांगण्याचं काम त्याच्याकडे सोपवलेलं आहे.

कृतवर्मा: त्याला विचारून येऊ का? नाहीतरी इथे करण्यासारखं दुसरं काही नाही.

कृपाचार्य: त्याला घेऊनच ये.

कृतवर्मा: पण त्याच्या कामाचं काय?

कृपाचार्य: धृतराष्ट्राला सतत झोप येते. ती त्याची जुनी सवय आहे. युद्धाची हकिकत त्याला नंतर ऐकवली तरी चालण्यासारखं आहे. आपल्याला काही गोष्टी इतरांपेक्षा उशीरा सांगितल्या जातील ह्याची आंधळ्या माणसाला सवय असते.

कृतवर्मा: ठीक तर, मी संजयला घेऊन येतो. पण तू इथेच थांब. नाहीतर तुला शोधणं फार अवघड होईल.

कृपाचार्य: तू ये, मी जागचा हलत नाही. (समोरच्या शिलालेखाकडे निरखून पाहून) सदतीस पश्चिम आणि बावीस दक्षिण हा संदर्भबिंदू लक्षात ठेव. पण सांभाळून जा. गर्दी खूप आहे.

कृतवर्मा: गर्दी माझ्या लक्षात आलेली नाही असं तुला वाटतं का?

घोडेस्वार: माझा घोडा घेऊन गेलात तर बरं पडेल. गर्दी फार आहे. रथ सहजी नेता येणार नाही.

(घोडेस्वार घोड्यावरून उतरतो, आणि लगाम धरून अदबीने उभा राहतो. कृतवर्मा घोड्यावर मांड ठोकतो.)

घोड्यावरून उतरलेला सैनिक: संजय बहुतेक त्या दिशेला कुठेतरी आहे. (बोट दाखवतो.) आपलं यादवसैन्य पुष्कळ मागे आहे, तेव्हा कुरुक्षेत्राच्या सीमारेषेपासून आपण फार लांब नसणार. तुम्हाला घटकाभरापेक्षा जास्त वेळ लागू नये. नाहीतर रस्ता चुकलात असं समजा.

कृतवर्मा: आलोच. (घोडा दौडत दूरवर निघून जातो.)

कृपाचार्य (घोड्यावरून उतरलेल्या सैनिकाला उद्देशून): कौरवसेनेमध्ये यादवांचं स्थान विशेष प्रतिष्ठेचं नाही, हे सगळ्यांना ठाऊक आहे. खोचक शेरे मारून त्याची आठवण करून दिली पाहिजे असं नाही.

सैनिक: चुकलो. तसं काही माझ्या मनात नव्हतं. मी आपला सहज बोललो. पण यापुढे सैन्याची शिस्त पाळत जाईन.

कृपाचार्य: आता तू स्वत:च्या गणाकडे परत जा. निश्चित काही कळलं तर सैन्यात बातमी पसरवण्याची व्यवस्था आम्ही करू. तुझा गणक्रमांक काय आहे?

सैनिक: पंधरा हजार सातशे सोळा. घोड्याच्या गळपट्टीवर लिहिलेला आहे.

कृपाचार्य: तुझा घोडा मी नंतर पाठवून देईन. नीघ तू आता.

(सैनिक नमस्कार करतो आणि चालत निघून जातो.)

❒

कृपाचार्य (स्वत:शीच): तजवीज पुरेशी आहे ना हे पाहावं. (कमरेची चंची काढून पाहतो, पण त्यात काही नाही.) हं! संपलेली दिसतेय. (आजूबाजूला आवाज देत) अरे, कुणाकडे शिल्लक आहे का रे थोडीशी?

(काहीजण आपापल्या चंच्या धुंडाळण्याचा अभिनय करतात, तर काहीजण त्या खरोखरीच धुंडाळतात. 'नाही, शिल्लक नाही. संपली आहे' अशी प्रत्युत्तरं येतात. 'साठा करून ठेवला पाहिजे. सीनूला बोलवा. तिच्याकडे असते.' असे आवाज जागोजागी निघतात. 'सीनू! सीनू! कुठे आहेस तू? सीनू!' अशासारख्या आरोळ्या सैन्यात पसरत जातात.)

(एक सैनिक दबक्या पावलांनी कृपाचार्याजवळ येतो.)

सैनिक: नमस्कार, आचार्य.

कृपाचार्य: नमस्कार.

सैनिक: आपलं दर्शन घ्यावं म्हणून आलो. मी गणक्रमांक बहात्तर हजार तीनशे पंचावन्नमध्ये असतो.

कृपाचार्य: आहे का थोडी?

सैनिक: थोडा आहे. हा घ्या. (एक सुरई पुढे करतो.)

कृपाचार्य: थोडा आहे?

सैनिक: तुम्हाला आवडतो हे मला ठाऊक आहे म्हणून आणला. चांगल्या प्रतीचा आहे.

कृपाचार्य (वास घेत): सोमरस?! मला सोमरस आवडतो म्हणून तुला कुणी सांगितलं?

सैनिक: नाही, मला ठाऊक आहे. आपण घ्या. मी कुणाजवळ बोलायचा नाही.

कृपाचार्य: अरे, मी त्यातला नाही.

सैनिक: नाही, आपण घ्या. मी कुणाजवळ बोलायचा नाही. नंतर आणखीही आणून देईन. मी गणक्रमांक बहात्तर हजार तीनशे पंचावन्नमध्ये असतो.

कृपाचार्य: तुला काही हवं आहे का?

सैनिक: नाही, माझी काही अपेक्षा नाही. मेलेला माणूस तुम्ही जिवंत करू शकता असं ऐकलं, म्हणून दर्शन घ्यायला आलो. अपेक्षा काही नाही. युद्धात मेलेला माणूस स्वर्गात जातो, तेव्हा उगीच पुन्हा जिवंत कशाला व्हायचं? माणसाला घराची ओढ वाटली, बायकोची ओढ वाटली तरी अशा मोहांत त्याने अडकून पडू नये. तळहातावर शीर घेऊन लढावं. इथे आलो आहे तो मरायच्या तयारीने आलो आहे. नंतर मला जिवंत वगैरे काहीही व्हायचं नाही. घ्या, आपण घ्या.

कृपाचार्य (त्रासिक चेहरा करून): बाबारे, सोमरस आवडतो आणि मेलेला माणूस जिवंत करू शकतो तो शुक्राचार्य. मी कृपाचार्य. तो मी नव्हे.

सैनिक: असं होय! चुकलोच की. आता आम्हाला अक्षरज्ञान नाही. जे कानी पडतं त्यावर विसंबून राहावं लागतं. त्यात कधीमधी घोटाळा होतो. आणि गर्दी खूप आहे हो. चेहरे लक्षात ठेवायला अवघड जातं.

कृपाचार्य: मी कौरवांचा शिक्षक होतो. त्यांच्या बाजूने लढतो आहे. पण इथे कुणी ओळखत नाही. विद्वान

माणसाची किंमत सर्वत्र पूज्य असते अशी जी एक शब्दचमत्कृती आहे, ती असायला नको तितकी खरी आहे.

सैनिक: चुकलो म्हणतोच आहे. माफ करा. पण ते राहू द्या. आपण घ्या. (सुरई पुढे करतो.)

कृपाचार्य (चेहरा आणखी त्रासिक करून): बाबारे, मी त्यातला नाही! तो सोमरस तुलाच ठेव, आणि मरण्यापूर्वी सगळा संपवूनच मर.

(सैनिक ओशाळा चेहरा करून परत जातो.)

कृपाचार्य (स्वगत): मला सोमरस नको. बुद्धीला बथ्थड बनवणारा तो सोमरस मला नको. स्वसंतुष्टतेची लिबलिबीत साय मनावर लिंपणारा तो सोमरस मला नको. संपूर्ण त्रिखंडामध्ये सोमवर्मा आणि गोमवर्मा हे दोघेच माझे मित्र असल्याचा आभास उत्पन्न करून, मध्यरात्रीच्या किर्र शांततेत गळ्यांत गळे घालून आम्हाला रडायला लावून, दुसऱ्या दिवशी सकाळी तिघांनाही तिघांचीही घृणा वाटायला लावणारा तो सोमरस मला नको.

मला अफू हवी. बुद्धीच्या नागिणीला डिवचून फणा काढायला लावणारी अफू मला हवी. इंद्रियांचे निरोप हृदयापर्यंत पोहोचवणाऱ्या नीलरज्जूंमध्ये ताण भरून त्यांच्या झणत्काराने विचारशक्तीला खणखणून जाग आणणारी अफू मला हवी. पायात लटपट भरणारा सोमरस मला नको, तर मनाच्या वारूवरची मांड पक्की करणारी अफू मला हवी.

सोमरस हा अस्वस्थ पदार्थ आहे. शरीरातल्या ज्या द्रवाच्या सान्निध्यात तो येतो त्यामध्ये खळबळ आणि बंडाळी माजवल्याखेरीज तो राहात नाही. सोमरस रक्तद्रवामध्ये क्षोभ माजवतो, जेणेकरून नाक लाल होतं आणि माणसाचा विदूषक बनतो. सोमरस हा चंद्राचा अंश आहे. शरीरातल्या समुद्राच्या अंशामध्ये तो क्षोभ माजवतो, जेणेकरून माणसाला लघुशंकेची भावना होते. पण ऐंद्रिय संवेदनांची सोमरसामुळे अशी हबेलहंडी उडते की कितीही वेळा जरी ती केली तरीदेखील पुन्हा लागायची म्हणून राहात नाही. शरीरातल्या वीर्यद्रवामध्ये सोमरस क्षोभ माजवतो, जेणेकरून माणसाचा कामज्वर उफाळून येतो. परंतु कामज्वर शमवणारा अवयव हाच नेमका लघुशंका करणारा अवयव असल्यामुळे दोन जिभांनी केलेल्या ह्या दुहेरी आर्जवासमोर बिचारा गोंधळून जातो, आणि एकाग्रतेची ज्या वेळी सर्वाधिक गरज असते त्याच वेळी ती अशक्य होऊन बसते. कामक्रीडा जर करायची तर त्यासाठी इंद्रिय टक्क जागं असायला हवं, आणि हे

इंद्रिय कोणतं तर बुद्धी. पण सोमरस नेमका ह्या बुद्धीलाच गोंधळून टाकून तिचा ताठर कणा लेचापेचा करून सोडतो. आणि म्हणूनच मला सोमरस नको.

पण याउलट अफूची मातब्बरी पाहा! मनातल्या शक्तींचा ती संमेळ करते, जे विखुरलं आहे ते सुरचित करते, आणि ज्याचा क्षोभ झाला आहे त्याचं शांतवन करते. बुद्धीवरची अभ्रं अफूमुळे विरून जातात आणि प्रखर सूर्यप्रकाशाने मन न्हाऊन निघतं. सोमरसातला आनंद हा रेम्याडोक्याचा आनंद आहे, तर अफूतला आनंद हा बुद्धिमंताचा आनंद आहे. मी बुद्धिमंत आहे. मला अफू हवी.

हे माझ्या डोळयांनो! आईच्या हिरव्या पदरावर आशाळभूतपणे दृष्टी खिळवून असणाऱ्या तृष्ण बालकासारखे वायव्येकडे काय पाहता?! हिंदुकुश पर्वताच्या पायथ्याशी योजनगणती पसरलेल्या शिवारांत डोलणारे ते कोवळे लुसलुशीत हिरवे अमृतकुंभ तुम्हाला इथून थोडेच दिसणार आहेत? ते आहेत गांधारात आणि आपण आहोत भारतात. इथून ते खूप लांब आहेत. आणि इथेच जरी असते तरी काय उपयोग होता? ह्या घुमटदार स्तनांमधून जो चिकट दुग्धस्राव पाझरतो तो लगबग करून तसाच नाही काही चुरूचुरू पिता येत! दगडी कलशामध्ये ह्या पयोधरांना दोहून, सूर्यनारायणाच्या भाजऱ्या किरणांखाली त्यांच्यातला सारा भावनेचा ओलावा बाष्पीभवित करून टाकावा लागतो; आणि अशा प्रकारे तर्ककठोर बनलेला तो किरमिजी घनपदार्थ, चिंचोळया आणि धोकेबाज अशा खैबरखिंडीतून, तीन पापण्या असणाऱ्या बेदरकार उंटांच्या पाठींवरून वाहून इथपर्यंत आणावा लागतो, तेव्हा कुठे त्या आईच्या पदराआडची गोड माया ह्या कडवट हृदयाच्या कृपाचार्याला प्राशून घेता येते. पण हरकत नाही. अठरा अक्षौहिणींच्या गराड्यात सापडलेलं आणि हत्तीघोड्यांच्या लीदेने व सहबांधवांच्या विष्ठेने लिडबिडलेलं हे वास्तव इतकं असह्य आहे की थोड्याशा मायेला मी नाही म्हणणार नाही.

नको, मला सोमरस नको. काहीही लभ्यांश न देणाऱ्या एका युद्धासाठी, आयुष्यात एकदोनदाच लांबून पाहिलेल्या कोण्या राजाच्या हुकुमावरून घरदार सोडून देऊन माझे भोळे सैनिक इथे जमले आहेत. त्यांनी जरूर प्यावा तो सोमरस आणि जरूर साजरे करावेत ते कृतकवीरश्रीचे सोहळे, पण त्यांच्यात रमणारा मी नव्हे. सोमरस पिणाऱ्याचा आनंद हा कळपात राहणाऱ्याचा आनंद आहे, तर अफू घेणाऱ्याचा आनंद हा एकट्या माणसाचा आनंद आहे. कुरुक्षेत्राच्या ह्या कोलाहलात सत्तेचाळीस लक्ष तेवीस हजार नऊशे एकोणीस माणसांनी वेढलेला असताना मनातून मात्र मी एकटा आहे. आणि म्हणूनच मला सोमरस नको, अफू हवी.

❐

('सीनू येते आहे! कुठे आहे? ती पाहा! सीनूला वाट सोडा! ह्या मातकट मैदानात आम्हाला मातेची ममता देणारी स्नेहाळ सीनू इकडेच येते आहे!' अशा आरोळ्या सैन्यात दूरवर जन्म घेऊन जवळ येऊ लागतात. लाकडाच्या हातगाड्याला चामड्याच्या वाद्या बांधून ओढत आणणारी लहान चणीची पण दणकट हाडापेराची एक स्त्री कृपाचार्याच्या दिशेने येते आहे. तिचा गोल चेहरा नेहमी हसरा असतो. तिने घातलेल्या पिवळ्याधमक रेशमी झग्यावर शेंदरी रंगाची आग ओकणारे लांबलचक हिरवे साप चितारलेले आहेत. उंच, शेलाटा आणि खिन्न चेहऱ्याचा एक पुरुष तिच्या सोबतीला आहे. त्याचा डगला आणि पाटलोण दोन्हीही मंद निळ्या रेशमाचे आहेत. पुरुषाच्या चेहऱ्यावर असलेल्या भाजल्याच्या खुणा त्याने पांढऱ्या दाढीमागे लपवल्या आहेत.

चामड्याच्या वाद्या खांद्यावरून उतरवून सीनू त्या सोडून देते आणि कृपाचार्यासमोर येऊन गाड्यापुढे उभी राहते. तिचे खांदे आपल्या लांबलचक बोटांनी अलगद दाबून धरत उंच शेलाटा माणूस तिच्या मागे येऊन थांबतो.)

स्त्री: नमस्कार, मी सीनू! आणि हा माझा खूप जुना मित्र मयाहुर. तुम्ही अडचणीत आहात असं कळलं.

कृपाचार्य: अडचणीत नाही, पण चणचणीत आहे. माझ्याजवळची अफू संपली आहे.

सीनू: काळजी नको! माझ्याकडे भरपूर आहे. गाड्यातली पुष्कळशी जागा मला तिच्यासाठीच राखून ठेवावी लागते. युद्धात इतकी भरभर खपणारी दुसरी वस्तू नाही. घ्या! (काळसर किरमिजी रंगाच्या चिकट पदार्थाची एक चौकोनी वडी त्याला आणून देते. तो कमरेच्या कशाचे बंद सोडू लागताच ती नम्रपणे 'नको' म्हणते.) तुमच्याकडून मी पैसे घ्यायची नाही. सैनिकांना किरकोळ वस्तू विकून मी पोट जाळते. अशा धंद्यात वरिष्ठांची मर्जी सांभाळावी लागते. तेव्हा तुमच्याकडून मी काही घ्यायची नाही. याला लाचलुचपत म्हणत नाहीत. याला जनरीत म्हणतात. अंगदेश असो, मद्रदेश असो की पांचालदेश असो, सगळीकडे ती एकच असते. घ्या!

(इतर सैनिक आजूबाजूला दाटी करू लागतात.)

(सैनिकांना) अरे, थोडा दम धरा. द्वाडपणा नका करू. सगळ्यांना देते. रीतसर रांग लावा पाहू. सैन्याला शिस्त हवी. हे बघा, माझा दर ठरलेला असतो. मी घासाघीस ऐकून घ्यायची नाही. सोन्यात देणार असाल

तर दोन माष आणि रुप्यात देणार असाल तर तीन शतमान असा दर एका वडीचा पडेल. तांब्यात देणार असाल तर रांगेच्या बाहेर व्हा. कुणाच्याही शिक्क्याची नाणी चालतील. अंगदेश असो, मद्रदेश असो, पांचालदेश असो की यवनदेश असो. धातूला किंमत आहे. त्याला द्राख्मा म्हणता की दिनार म्हणता ह्याला महत्त्व नाही. देश बदलतो तसे राजे बदलतात, पण धातू बदलत नाही. खरं नाणं दिलंत तर खरी अफू देईन, खोटं दिलंत तर टिर्रीवर फटका देईन. नाणं घेताना मी बघून घेते, वडी घेताना तुम्ही बघून घ्या.

(सीनू प्रत्येक सैनिकाकडून पैसे वसूल करते आणि आपल्या कमरेच्या थैलीत हात घालून सराईतपणे मोड देत जाते. पैसे मिळाले की एकेक सैनिकाला गाड्याजवळ मागे पाठवते. मयाहुर आता तिथे उभा आहे. प्रत्येक सैनिकाच्या हातात तो एकेक वडी ठेवत जातो.)

सीनू: सध्या मी माणसांसाठी देते आहे. घोड्यासाठी हवी असेल, हत्तीसाठी हवी असेल तर थांबा. त्यांच्या वड्या वेगळ्या आहेत. माणसाची वडी हत्तीला दिली तर फुकट जाते. हत्तीची वडी माणसाने खाल्ली तर धाडकन माणूस मरतो. आपापली शरीरप्रकृती असते. ती सांभाळायला हवी.

कृपाचार्य: बरीच कमाई केली आहेस.

सीनू: जमेल तितकी करते. माया विकून माया जमवते असं म्हणा!

कृपाचार्य: अफू सोडून आणखी कायकाय ठेवतेस?

सीनू: तसा नक्की नेम नाही. जे विकेल ते ठेवते. मला सीनू म्हणतात. उत्तरेला चीन नावाचा एक भलाथोरला देश आहे. तिथल्या भाषेत सीनू म्हणजे रेश्मा. चीनमध्ये मोठाले डोंगर आहेत, तिथून दऱ्याखोऱ्यांतून रस्ता खाली येतो आणि बख्तरमधून हिंदुकुश पर्वताच्या बाजूने निघून पुढे पर्सिकेपर्यंत जातो. महिनोनमहिने चाललं तरीदेखील संपत नाही. रेशीम वाहून नेण्यासाठी हा रस्ता तयार केला, म्हणून त्याचं नाव रेशीमरस्ता. तिथे माझा सततचा वावर असतो, म्हणून माझं नाव पाडलं रेश्मा. जे विकेल ते मी खरेदी करते, जे खरेदी होईल ते विकते. ह्या रस्त्यावर मिळत नाही असं काही नाही. खूप पैसे मिळतात आणि खूप शिकायला मिळतं. केव्हातरी काहीतरी जंमत हाती लागते. (गाडीकडे जाऊन एक चोपडं घेऊन येते.) हे बघा. मजेदार गोष्टी आहेत. विरंगुळा होईल तेव्हा वाचा.

कृपाचार्य: हे काय बाई?

सीनू: गोष्टी आहेत. एक राजा असतो म्हणे. त्याला पाच मुलगे असतात. पाचही ढङ्डोबा असतात, म्हणजे राजा स्वत: किती हुशार असेल ते दिसतंच आहे. पण राजपुत्रच ढङ्डोबा निघाले तर पुढे पंचाईत झाली असती. त्यांना शहाणं करायचं म्हणून तो एका साधूला बोलावतो. साधू काय करतो तर पोरांना गोष्टी रचून सांगतो. पहिल्या गोष्टीच्या पोटात दुसरी गोष्ट, दुसरीच्या पोटात तिसरी गोष्ट असा इब्लिसपणा तो मुद्दाम करतो. त्यामुळे झक मारत लक्ष द्यावं लागतं, नाहीतर मनात गोंधळ होतो. ढ राहून चालत नाही.

त्यांतली एक गोष्ट सांगते. एक गरीब बाई होती आणि तिचं पाळण्यातलं लहान मूल होतं. बाईने प्रेमापोटी एक अजगर पाळलेला होता. एकदा बाई पाणी भरायला गेली. आल्यावर बघते तर अजगर भलंमोठ्ठं पोट घेऊन अंगणात सुस्त लोळतो आहे. बाईला वाटलं की त्याने आपलं मूल गिळलं. तिला राग आला आणि डोक्यावरचा हंडा अजगराच्या तोंडावर फेकून तिने त्याला चेचून मारला. आत येऊन बघते तर मूल शांत झोपलं आहे आणि पाळण्याभोवती तरसाच्या पंजाचे ठसे आहेत. मुलाला खायला तरस आलेलं होतं आणि अजगरानं तरसाला गिळून मुलाला वाचवलेलं होतं. बाईला वाईट वाटलं आणि ती धाय मोकलून रडली. अविचाराने वागू नका अशी शिकवण यात आहे.

मयाहुर: शिकवण रास्त आहे. एकदा वस्तू गिळली की ती बाहेरून दिसत नाही हे अजगराला उमगायला हवं होतं. बाईला मूल आधी दिसेल आणि मग आपण दिसू इतकी दक्षता त्याने घ्यायला हवी होती.

('हा सुधारणेच्या पलीकडे गेलेला आहे' अशा आविर्भावात सीनू मयाहुराकडे पाहते. मयाहुर तिच्याकडे पाहून मंद हसतो.)

सीनू: आणखी एक अगोचर गोष्ट आहे. एका राजाला म्हणे मुलगी होते. पण तिला तीन अम्मे असतात. त्यामुळे तिचं लग्न होत नसतं.

कृपाचार्य: असं कसं होईल? मी तर म्हणतो की लग्न झटकन व्हायला पाहिजे. अधिकस्य अधिकं फलम्.

सीनू: चावट बोलू नका! अहो, तीन अम्मे असणं अशुभ असतं म्हणे. तर राजा दवंडी पिटतो की हिला बरं करील त्याला मी बक्षीस देईन. तर तिथून एक आंधळा आणि एक कुबडा चाललेले असतात. आंधळा काय करतो तर कुबड्याचे पाय धरून त्याला राजकन्येच्या मधल्या अम्म्यावर दाणकट आपटतो. त्या दणक्यानं कुबड सरळ होतं आणि अम्माही आत घुसून जिरून जातो. यानंतर राजाकडून बक्षीस घेऊन दोघेही

हिच्याशी लग्न करतात आणि सगळेजण सुखाने राहतात. आता तुम्हीच सांगा: असली गोष्ट ऐकून कुठल्या राजाचा कुठला मुलगा शहाणा होईल? तर तुम्हाला गंमत सांगत्ये. पहलवांच्या देशात हे पुस्तक मला मिळालं. पैसे देऊन मी त्याच्या प्रती काढून घेतल्या आणि बख्तरला जाऊन विकल्या. पाच वर्षांनी तिथे पुन्हा जाऊन बघते तो काय! सगळ्या गोष्टी लोकांनी बदलून टाकल्या होत्या. उंटाचा सिंह काय केला आणि मच्छीमाराचा शिंपी काय केला! मग मी नवीन पुस्तकाच्या प्रती काढून घेतल्या आणि उलट येऊन त्या पहलवांच्या देशात विकल्या. राजाचे पाच मुलगे बाजूलाच राहिले आणि मीच यातून शहाणी झाले. म्हटलं यात पैसा फार चांगला आहे. तर असेच सगळीकडचे लोक मनाला येईल तशा गोष्टी बदलत राहतात. नव्यानव्या घुसडतात, न आवडलेल्या वगळून टाकतात. मी आपली इकडचं तिकडे करते आणि सगळ्या बाजूंनी पैसे काढते. घ्या! मजा आहे.

कृपाचार्य: घेतो बाई! पण नंतर वाचतो. गोष्टी आवडल्या तर पैसेसुद्धा देईन. (चोपडं किंचित चाळून रथात काळजीपूर्वक ठेवून देतो.)

❒

(संजय आणि कृतवर्मा येऊन दाखल होतात. संजय कृतवर्म्याच्या मागे घोड्यावर बसला आहे. दोघेही उतरतात. घोडा थकलेला आहे. जवळचा एक सैनिक घोड्याच्या गळपट्टीवरचा क्रमांक बघून त्याचा लगाम धरून हलक्या हाताने त्याला योग्य दिशेला घेऊन जातो.)

कृतवर्मा: हा घे संजय. कबूल केल्याप्रमाणे आणला आहे. पण खूप सायास पडले. मला आधी वाटला तितका तो जवळ नव्हता. वाट काढत जायचा प्रसंग असेल तर भोवताली अठरा अक्षौहिणींची गर्दी फार त्रासाची होते.

कृपाचार्य: अठरा कुठले? आपले अकराच आहेत.

कृतवर्मा: आपले अकरा आणि त्यांचे सात. धृतराष्ट्राचा हेका असा की कौरवसेना समोरून दिसली पाहिजे. संजयाला घेऊन तो पार पांडवसेनेच्या पाठीमागे जागा धरून बसला होता. त्यामुळे मला शत्रुसैन्यातूनही वाट काढत जावं लागलं. धर्मयुद्धाचे नियम माझ्या पथ्यावरच पडले, आणि त्यांनी कुणी मला इजा अशी केली नाही. नपेक्षा माझं नखसुद्धा शिल्लक राहिलं नसतं. पण शत्रूला घाणेरड्या शिव्या देणं याविरुद्ध धर्मयुद्धाचा कुठलाच दंडक नसल्यामुळे त्या मात्र सतत ऐकून घ्याव्या लागल्या. (आपल्या रथात जाऊन बसकण मारतो.)

संजय: नमस्कार कृपाचार्य! (अचानक मयाहुराला पाहून त्याला आनंद होतो.) अरे बाबा, तू इथे कसा?! कित्तीक वर्षांनी भेटतो आहेस. (त्याला घट्ट मिठी मारतो. मयाहुर फारशी प्रतिक्रिया देत नाही.) तू मला ओळखणं शक्य नाही, पण मी तुला बिलकुल विसरलेलो नाही! पांडवांसाठी तू जी मयसभा बांधलीस तिचा मोठा गवगवा झाला होता.

मयाहुर: त्याला सत्तावीस वर्षे झाली.

संजय: मी त्यावेळी अगदी पोरगेलासा होतो. मयसभेची स्तुती करणारं एक ऐसपैस कवन रचण्यासाठी पांडवांनी पैसे देऊन माझ्या वडिलांना बोलावलं होतं, तेव्हा त्यांच्याबरोबर मीही तिथे आलो होतो. तुझ्याकडे बोट दाखवून वडील मला म्हणाले की ह्या माणसाच्या जिवावर बेतलं होतं, पण तो मनाने धसकला नाही. सगळ्या जगाने तोंडात बोट घालावं अशी इमारत त्याने बांधून दाखवली. असं स्वत:चं कर्तृत्व पाहिजे. दुसऱ्यांची खुशामत करणारी गाणी गाऊन पोट जाळण्यात अर्थ नाही. पण शेवटी वडिलांनी केलं तेच मीही केलं.

मयाहुर: मी इथेतिथे हिंडलेलो आहे. माझं निरीक्षण असं की बांधल्यानंतर दोनतीनशे वर्षांच्या आत बहुतेक इमारती लढाईत सापडून जमीनदोस्त होतात. गाणी त्यापेक्षा जास्त टिकतात. तेव्हा तुझा निर्णय चुकला नाही.

संजय: पण त्या दिवसानंतर तू हरवलास तो आज दिसतो आहेस. खूप बरं वाटलं तुला बघून!

मयाहुर: मी भारतात क्वचितच असतो. मयसभेची प्रसिद्धी होत गेली तसतशी पैसा ज्यांच्याकडे फार झाला आहे अशा अनेक घराण्यांतून मला बोलावणी येऊ लागली. त्यांच्या एकापेक्षा एक अचाट लहरी सांभाळून मी राजवाडे, किल्ले आणि तुरुंग बांधत गेलो. चीन, गांधार, पर्सिके, तूर्किया, त्रुविशा आणि त्यापुढे समुद्रमार्गाने यवनांची बेटं आहेत तिथपर्यंत माझा वावर असतो.

संजय: पण पुन्हा इथे आलास हे उत्तम केलंस.

मयाहुर: मला विश्रांती कमीच घेता येते. सहा महिन्यांपूर्वी मला असा निरोप मिळाला की कुरुकुलातला वाद विकोपाला गेलेला आहे, वाटाघाटी फिसकटल्या आहेत आणि युद्धाची तयारी सुरू आहे. अठरा

अक्षौहिणी सैनिक आणि त्यांच्याबरोबरचे युद्धसाहाय्याला लागणारे इतरेजन ह्यांची अठरा दिवस राहण्याची, जेवणाची, खंदकांची, सांडपाण्याची आणि अंत्यसंस्कारांची व्यवस्था करण्याचं काम तू पत्करशील का अशी विचारणा मला करण्यात आली. मोबदला पुरेसा वाटला आणि इतक्या मोठ्या कामातून जो अनुभव पदरी पडेल तोही मोलाचा वाटला. त्याप्रमाणे मी प्रस्ताव स्वीकारला आणि पाच महिन्यांपूर्वी इथे येऊन दाखल झालो. काम खूप होतं, पण ते वेळेत पुरं करता आलं ही समाधानाची बाब आहे. व्यवस्थेत काही कसूर राहिली असेल तर मला तसं सांगा, जेणेकरून यथाशक्ती सुधारणा करता येईल.

सीनू: हा मला रेशीमरस्त्यावरच भेटला. युद्ध म्हटलं की माझी बरकत असते. तेव्हा आम्ही दोघे एकत्र इथे आलो. बिचाऱ्याचा काही त्रास नाही. गोड माणूस आहे. (संजयाला उद्देशून) नमस्कार, मी सीनू.

संजय: तुला कोण ओळखत नाही बाई? दोन्ही सैन्यांची भिस्त तुझ्यावर तर आहे.

सीनू: अहो, मला लाजवताय काय असे?! जमेल तेवढं करते.

कृपाचार्य: पण संजया, माझा प्रश्न असा की युद्ध होणार आहे की नाही? काय चालू आहे हे समजणं अवघड होऊन बसलं आहे.

सीनू: मी सांगते. मघा मी समोरून चालले होते, तर एक मोठा रथ मोकळ्यावर आलेला दिसला. रथातला माणूस मागे कोसळला होता. त्याचं अंग कापत होतं. धनुष्य हातातून घरंगळून खाली पडलं होतं. मला वाटलं की याला फेफरं आलं. माझ्या गाड्यात एक औषधी नेहमी असते. सांबरशिंग आणि जुनं चामडं एकत्र ठेचायचं. अथर्ववेदात लिहिलेलं आहे. नाकाखाली कुपी धरली की गुण येतो. तर ती घेऊन मी पुढे झाले, पण रथ चालवणारा माणूस म्हणाला की याचा काही उपयोग व्हायचा नाही. हे मनाचं फेफरं आहे. खाली पडलेल्या माणसाला तो काहीतरी सांगू लागला. काय चाललंय मला कळेना, पण काहीतरी महत्त्वाचं आहे एवढं कळलं. माझी आठ वर्षांची पोरगी आहे. तिला तिथेच सोडून आले. रथाच्या मागच्या दोन चाकांमधोमध तिला लपवली आहे. मी तिला म्हटलं, काही कळो न कळो, कोण काय बोलतंय ते भराभर लिहून काढ. नंतर बघू. त्याच्या प्रती काढून विकल्या तर चार पैसे मिळतील. काय करतेय बघूया.

संजय: बाई, आता मी सांगतो.

सीनू: सांग बाबा! मी गप्पच बसते कशी...

संजय: बाब अशी आहे की अर्जुनाची युद्ध करायला तयारी नाही. तो म्हणतो की विरुद्ध पक्षात माझे चुलतभाऊ आहेत, मला गुरुस्थानी असलेली कितीतरी मोठी माणसं आहेत. ह्या सगळ्यांबद्दल माझ्या मनात खूप प्रेम आहे. आणि म्हणून निव्वळ राज्य घशात घालण्यासाठी त्यांच्याविरुद्ध मी हत्यार उचलावं हे काही मला पटत नाही. अर्जुन फार खिन्न झालेला दिसतो आहे. आजारी असावा तसा वागतो आहे.

कृपाचार्य: मी पांडवांचा शिक्षक होतो. कुणात फार गुंतून पडावं हा माझा स्वभाव नव्हे, आणि शिक्षकाचा पेशा संपल्यावर माझ्या मनातून तो विषय संपला. पण तरीदेखील अर्जुन मला गुरुस्थानी मानतो हे ऐकून बरं वाटलं.

संजय: त्याने तुमचा नाव घेऊन उल्लेख नाही केला. भीष्म आणि द्रोण ह्या दोघांचा केला.

कृपाचार्य: इतक्या तपशीलात कशाला शिरायचं? ते दोघे मानाने मोठे आहेत म्हणून त्यांचा केला असणार, पण बाकीचेही त्यात आलेच. पण ते काही असलं तरी त्याला युद्ध करायचं नसेल तर माझा आग्रह नाही.

सीनू: मला अर्जुनाचं बरोबर वाटतं. आपल्याच भाईबंदांना मारायला माणूस कचरणं हे समजण्यासारखं आहे. युद्धावर माझं पोट आहे हे मी कबूल करते. पण म्हणून काहीही किंमत देऊन युद्ध होवो असं मी म्हणायची नाही. दोन्ही पक्षांत समझोता झाला तर चांगलं होईल. माझा माल काय तसाही खपेल.

मयाहुर: हे मलाही पटतं. ह्या युद्धाचा माझ्याशी असलेला संबंध बाकी कुणाहीपेक्षा निराळा आहे. युद्धाच्या पायाभूत सोयी करून देण्याचं काम कुरुकुलाने मला दिलेलं होतं, ते मी पार पाडलं. पैसे आधी मिळायला हवेत असा मी आग्रह धरला होता, कारण युद्धानंतर ते चुकते करायला कोण शिल्लक असेल याबद्दल निश्चिती नव्हती. त्याप्रमाणे ते मला मिळाले, तेव्हा माझी तक्रार नाही. पण सगळ्या सोयी जरी आत्ताच जागेवर असल्या तरीसुद्धा युद्ध एकदाचं सुरू झाल्यावर त्या पुऱ्या पडतील ना ह्याची शहानिशा करून घ्यायला हवी. फक्त ह्या कारणासाठी मला युद्ध पाहायचं आहे. एक शास्त्री म्हणून माझी प्रतिष्ठा माझ्या कामात गुंतलेली असते. ते माझ्या दर्जाला साजेसं हवं. पण मी इथे एकटा नाही. युद्ध झालं तर खूप माणसं मरतील आणि मेलेल्यांच्या आप्तेष्टांना खूप दुःख होईल इतकं उघड आहे. ते जर टळलं तर मला आनंदच होईल. माझं काम वाया गेलं तरी चालेल.

कृतवर्मा: हे पाहा, अर्जुन जे म्हणतो आहे त्यात मलाही तथ्य दिसतं. पण कौरव आपले भाऊ लागतात हे त्याला आज सकाळी कळलं का? आधी का नाही सांगितलं? शेकडो योजनं अंतरावरून आम्हाला इथे बोलावून घेऊन आयत्या वेळी सगळ्यांसमोर गळा काढायचा तो कशाला? द्वारकेहून अख्खं यादवसैन्य घेऊन मला इथे यावं लागलं. अतिशय कटकट झाली. माझे सैनिक म्हणजे मूळचे गुराखी आहेत. गवताळ कुरणांत बागडत जरी असले तरी त्यांची बुद्धी कुशाग्र म्हणता येण्यासारखी नसते. गावंढळ सवयी त्यांच्या रक्तात मुरलेल्या आहेत. गुरं सोडून देऊन झाडाखाली लोळून वाईट कविता करण्यात ह्यांची आयुष्यं वाया जातात. असल्या माणसांमधून मला सैन्यभरती करावी लागली. दोनचा पाढा ज्यांच्या कधी लक्षात राहिला नाही, त्यांच्यासमोर तीन गुल्म म्हणजे एक गण, तीन गण म्हणजे एक वाहिनी, तीन वाहिन्या म्हणजे एक पृतना असले हिशेब घोकावे लागले. असल्या मेंघळटांच्या पलटणी उभ्या करून त्यांना कुरुक्षेत्रापर्यंत फरपटत आणावं लागलं. तीन गुराखी एका दिशेने शिस्तीत चालताना कधी बघितले आहेत का तुम्ही? अतिशय ताप झाला. एवढं करून आम्ही इथे येऊन ठेपलो न ठेपलो, तर हा म्हणतो मला आता लढायचं नाही.

कृपाचार्य: तेवढं आता आपण समजून घ्यायला हवं. अनेकदा होतं असं माणसाचं. आपल्याला अमुक हवं आहे असं वाटतं, पण समोर आल्यावर ते नकोसं वाटतं. शत्रुपक्षात आपले भाऊ आहेत हे अर्जुनाला अर्थात ठाऊकच होतं. आणि त्यांच्याशी युद्ध करायचं म्हणजे त्यांना मारायचा प्रयत्न करायचा हेही ओघाने आलंच. पण एखादी कृती तर्काला जरी पटलेली असली तरीदेखील जी एक भावना त्या कृतीला चिकटून येते ती काहींना सहन होत नाही. आता असं पाहा: काही माणसांना उंदरांचा त्रास होतो आणि उंदीर पकडायला ते पिंजरा लावतात. पण पकडलेला उंदीर समोर दिसल्यावर त्याला जेव्हा पाण्यात बुडवायचा प्रसंग येतो तेव्हा काहीजण कचरतात. तर अशा वेळेला जो कचरत नाही त्याने कचरणाऱ्याला समजून घ्यायला हवं.

कृतवर्मा: पण हा दाखला मला पुरता पटलेला नाही. जो माणूस उंदीर पकडायला निघतो त्याने तो पकडल्यानंतर पुढे काय करायचं याबद्दल मनाची तयारी आधीपासूनच करायला हवी. तो बुडवताना आपल्याला वाईट वाटेल ही भावना मूळ निर्णय घेतेवेळीच हिशेबात धरायला हवी. तेवढं स्वत:चं मन स्वत:ला ठाऊक असायला पाहिजे.

कृपाचार्य: तू म्हणतोस ते खूप लोकांना हे जमत नाही. मनाच्या रचनेतलाच हा काहीतरी दोष असावा.

कृतवर्मा: पण अर्जुन आयत्या वेळी कचरला हेच मला खरं वाटत नाही. तुम्हाला कारण सांगतो. पांडवांच्या वनवासाचं तेरावं आणि शेवटचं वर्ष चालू होतं, तेव्हाचा हा प्रसंग आहे. हे पाचजण आपल्या बायकोसह

विराटाजवळ आसरा घेऊन गुप्तपणे राहात होते. त्यावेळी भीष्म, कर्ण, दुर्योधन आणि इतर काही कौरवांनी विराटाच्या राज्यावर हल्ला करून त्याच्या गायी पळवल्या. पांडवांना डिवचण्याचा बहुतेक त्यांचा हेतू होता. तो वाखाणण्यासारखा नव्हता हे मान्य, पण खरा मुद्दा पुढेच आहे. त्यावेळी वेष पालटून अर्जुन रथात चढला आणि कौरव मंडळींना युद्धात हरवून त्याने गायी परत आणल्या. आता गाईंचा कळप परत मिळावा म्हणून जर तो आपल्या भावांशी लढायला तयार झाला असेल, तर राज्य मिळावं म्हणून का नाही? एखादी गोष्ट लहान फायद्यासाठी करणं त्याला जर गैर वाटत नसेल तर तीच गोष्ट मोठ्या फायद्यासाठी करणं गैर का वाटावं हे मला कळत नाही. म्हणून म्हणतो की हे कारण मला पटत नाही. भावना ही गोष्ट पूर्णपणे तर्कात सामावली जात नाही हे मी तात्पुरतं मान्य करतो. पण तरीदेखील भावनेने निदान आपली स्वत:ची तर्कसंगती पाळायला नको का? उंदीर बुडवायचा नसेल तर नका बुडवू. पण पहिला पद्धतशीर बुडवून झाल्यानंतर दुसरा बुडवताना कचरण्यात काय अर्थ आहे?

कृपाचार्य: मुद्दा चांगला काढलास. पण कौरवांनी त्यावेळी त्याला न ओळखल्यामुळे कदाचित अर्जुनाच्या मनाची टोच कमी झाली असेल. काहीजणांना उंदीर बुडवताना वाईट वाटत नाही, पण मरण्याआधी उंदराने त्यांच्या डोळयाला डोळा भिडवला तर मात्र वाटतं.

सीनू: बाई गं! केवढी ती चर्चा! उंदीर साध्या पाण्यात बुडवायचा की वाग्गंगेत बुडवायचा हे आधी ठरवा. मी काही एवढी हळुवार झाले नसते. टोपलीभर रेश्माचे किडे उकळत्या पाण्यात बुडवलेले मी इतक्या वेळा बघितले आहेत की माझं मन कठोर होऊन गेलं आहे.

संजय: सीनू, तुझ्या मनाला कुणी कठोर म्हणणार नाही. पण ते एक असो. हा विषय एवढ्यावर संपत नाही. युद्ध नको म्हणण्याचं दुसरंही एक कारण अर्जुनाकडे आहे. मला ते नीटसं कळलेलं नाही, पण त्याने कृष्णाला जसं बोलून दाखवलं तसंच तुम्हाला सांगतो. तो म्हणतो की जर मी माझ्या भावांना मारून टाकलं तर कुरुकुलाची पडझड होईल. पुरुष जर मोठ्या संख्येने मारले गेले तर कुलातल्या बायका वाईट नादाला लागतात. त्यांची कामवासना शमेनाशी होते आणि त्या बाहेरच्यांशी संग करू लागतात. अशातून वर्णसंकर होतो आणि हिणकस प्रजा निपजते. परिणामी सगळ्या बाजूंनी कुलाचं वाटोळं होतं.

सीनू: नुसता संग केला म्हणजे प्रजा होते असं नाही. मध्यंतरात खूप लटपटी करता येतात. पण हा विषय बायकांबायकांतला असतो आणि पुरुषांना त्याची नीट माहिती नसते. अर्जुनाचंही तेच झालेलं दिसतंय.

मयाहुर: तुझं म्हणणं काय आहे?

सीनू: माझं म्हणणं इतकंच की एकतर कामवासनेबद्दल बोला किंवा प्रजेबद्दल बोला. दोन्हींची गल्लत नका करू.

मयाहुर: आत्ताच्या घडीला आजूबाजूला फार लोक आहेत. निवांतपणा नाही. तेव्हा ह्या लटपटींबद्दल न बोललेलंच बरं.

सीनू: ह्या विषयावर माझ्याकडे एक छोटंसं पुस्तक आहे. पण ते विकण्यासाठी नाही. माझं मीच वाचून नडेल तिला मदत करते.

कृपाचार्य: पण अर्जुन जिथून सुसाट चालला आहे, तो रस्ता अंधारा आणि नागमोडी आहे. स्त्रीची कामवासना हा प्रांत पुरुषाला नुसता विचार करून माहित होण्यासारखा नाही. समजा एखाद्या बाईचा पुरुष युद्धात मारला गेला तर मनाला हादरा बसून तिची कामवासना कदाचित विझूनसुद्धा जाईल. निश्चित काय होईल हे त्या परिस्थितीतून गेलेल्या कुलस्त्रियांकडे बघूनच ठरवायला पाहिजे.

सीनू: काय होतं ते सांगते. कितीतरी लहानमोठी युद्धं मी पाहिलेली आहेत. घरचा पुरुष मेला तर बाईवर एकदम जबाबदाऱ्या कोसळतात. शेतीची कामं सांभाळावी लागतात, शिवाय पोरं वाढवावी लागतात. पैसे कमी पडतात. ओढाताण होते. त्यामुळे सुरवातीच्या दिवसांत कामवासना चांगलीच कमी होते. पण नंतर ती पहिल्या पातळीला आपसूक येते. अशा वेळी बाईला दुसरा पुरुष शोधावासा वाटला तर त्यात नवल नाही. पण हे सगळं जिच्यातिच्यावर अवलंबून आहे. काही बायका अशा असतात की घरचा पुरुष जिवंत असला तरीसुद्धा त्या बाहेर संग करतातच. तो मेलाच पाहिजे असं त्यांचं नसतं.

कृतवर्मा: पण बाहेरचा संग केल्यामुळे प्रजा हिणकस निपजेल हे मला पटत नाही. असं का होईल? म्हणजे अर्थात लटपटी न केल्यामुळे प्रजा निपजली तर. नाहीतर प्रश्नच नाही.

कृपाचार्य: मी कौरवपांडवांचा शिक्षक होतो, त्यामुळे मी कुरुकुल जवळून पाहिलेलं आहे. आमच्यापेक्षा श्रेष्ठ कुल दुसरं नाही असा त्यांचा गंड आहे. त्यांची दृष्टी अशी की कुरुकुलाबाहेरचे पुरुष हिणकस असतात, त्यांचं बीही हिणकसच असतं, आणि म्हणून प्रजाही हिणकस होईल.

मयाहुर: ठीक आहे, आपण वादासाठी असं गृहीत धरू की पुरु नावाचं दुसरं एक कुल कुरुकुलापेक्षा हिणकस

आहे. आता पुरुकुलातल्या पुरुषांनी जर कुरुकुलातल्या बायकांत बी टाकलं तर दोन्ही कुलांचा जो सरासरी दर्जा आहे तशी पुढची प्रजा होईल. यामध्ये पुरुकुलाचा उत्कर्ष नाही का होणार? एक कुल जरी खाली गेलं तरी दुसरं वर येईल. यात वाईट काही नाही.

कृपाचार्य: तसंही होईल कदाचित, पण इतरांच्या कुलापेक्षा स्वत:च्या कुलाबद्दल अर्जुनाला जास्त काळजी वाटणं साहजिक आहे.

मयाहुर: हो, तेही बरोबर आहे. पण वर्णसंकर झाला तर प्रजेच्या दर्जात फरक पडतो का हा मात्र अभ्यास करण्यासारखा विषय आहे. एकाच कुलातल्या दहा हजार बायका घेऊन त्यांतल्या पाच हजारांचा वर्णसंकर केला आणि बाकीच्या पाच हजारांना कुलातच फळवलं तर ह्या प्रजेची त्या प्रजेशी शेजारीशेजारी तुलना करता येईल. मगच कळेल. पण असा प्रयोग करणं अवघड आहे. अर्जुनालाही नक्की माहिती नसणारच, तो बहुतेक अंदाजानेच बोलतो आहे. पूर्वी यवनांचा एक तरुण राजा होता, तो पर्सिकेमधून पुढे बख्तरपर्यंत घुसला होता. त्यावेळी त्याचे सैनिक आणि स्थानिक लोक यांच्यात वर्णसंकर फार झाला. पण स्थानिक बायकांच्या राजीखुषीनेच तो दरवेळी झाला असं नाही. त्यातून झालेली प्रजा आता रेशीमरस्त्याच्या आसपास कुठेकुठे विखरून आहे. मी त्यांच्याबरोबर राहिलेलो आहे आणि ते लोक मला सरसकट हिणकस कधी वाटले नाहीत. याउलट शुद्ध कुलातले लोक हिणकसपणे वागलेले मला अनुभवाने माहित आहेत. पण माझ्या एकट्याच्या मतावर विसंबून चालायचं नाही. दोन्ही गट शेजारीशेजारी ठेवून पूर्वग्रह न बाळगता अभ्यास हवा. यात अडचण अशी असते की मोठ्या प्रमाणावर वर्णसंकर असा युद्धानंतरच होतो. आणि युद्धामुळे भोवतालची परिस्थिती इतकी बदलते की तुलना पार बिघडून जाते.

कृतवर्मा: ज्याला सवड असेल त्याने असा अभ्यास जरूर करावा, पण अर्जुनाच्या ह्याही आक्षेपात मला जीव दिसत नाही. वर्णसंकराबद्दल जर अर्जुनाचं इतकं वाईट मत असेल तर त्याने जन्माला यायला नकार द्यायला हवा होता. तो स्वत: वर्णसंकराचंच पिल्लू आहे. अर्जुन झालेला आहे तो कुंतीने इंद्राशी संग केल्यामुळे. इंद्र हा कुरुकुलातला मुळीच नव्हे. आता अर्जुनानेच हा विषय काढला म्हणून मी बोलतो आहे, नाहीतर त्याच्या आईच्या कामवासनेबद्दल मी आवर्जून मत द्यायला गेलो नसतो.

कृपाचार्य: काळजी करू नकोस. तो इथून खूप लांब आहे, त्याला काहीसुद्धा ऐकू जाणार नाही.

सीनू: मला काय दिसतं ते सरळ सांगते. अर्जुनाला युद्धात मरायची भीती वाटते आहे, आणि स्वत:जवळ त्याला ती कबूल करायची नाही. लपवाछपवी म्हणून तो कुलाची पडझड वगैरे अवांतर मुद्दे काढतो आहे.

त्याला म्हणायचं आहे ते इतकंच की युद्धात खूप माणसं मरणं ही वाईट गोष्ट आहे. आणि त्याने स्वत: मरणं ही आणखीन वाईट गोष्ट आहे.

कृतवर्मा: पण हे आधी नाही का सांगायचं?

सीनू: हो, ते बोललो आपण मघाशी, पण मी म्हणते राहू दे. निदान आत्तातरी सांगितलं ना? मी काय विचारते की ह्या अर्जुनाचं वय किती आहे?

कृपाचार्य: नक्की ठाऊक नाही, पण अंदाज करता येईल. लग्न झालं तेव्हा तो कोवळा होता, सोळासतराचा असेल. त्यानंतर एकदा युधिष्ठिर आणि द्रौपदी एकांतात असताना तिथे तो घुसला आणि प्रायश्चित्त म्हणून त्याला बारा वर्षं वनवासात जावं लागलं. परत आल्यानंतर युधिष्ठिर जेव्हा द्यूतात हरला तेव्हा आणखी तेरा वर्षं वनवासात जावं लागलं. सोळा अधिक बारा अधिक तेरा मिळून एक्केचाळीस झाली. मधली एखाददोन मिळून त्रेचाळीस समजा.

सीनू: मग साहजिक आहे. ह्या वयात पुरुषांना वाटतं की आपलं आयुष्य सगळं चुकलंच की काय. असं खूपदा झालेलं मी बघितलं आहे. मग त्यांना विरक्ती तरी येते, नाहीतर ते स्वत:चं पौरुष सिद्ध करायला जातात आणि काहीतरी आततायी करून बसतात. मी म्हणते विरक्ती आलेली जास्त चांगली. दुसऱ्यांना हानी पोहोचायची तरी टळते. तसंच काहीसं असावं. अर्जुनाला हे सगळं नकोसं झालं असावं, आणि स्वत:चा जीवही धोक्यात घालायचा नसावा. पण तसं थेट बोलून दाखवता येत नाही. म्हणून मग तो सुचतील ती कारणं देत सुटला आहे. तेवढं आपण समजून घ्यायला पाहिजे. कारणामागची कारणं म्हणतात ती बघितली पाहिजेत.

कृपाचार्य: पण हे आपण बोलून फायदा नाही. ती कृष्णाने बघितली पाहिजेत, कारण उपदेश करणारा तो आहे. त्याचं ह्या सगळ्यावर काय उत्तर आहे?

संजय: सुरवातीला तो अर्जुनाला म्हणाला की तू षंढपणा करू नकोस. तू लढवय्या आहेस आणि लढणं हे तुझं नेमून दिलेलं काम आहे, तेव्हा तू युद्धाला तयार हो.

सीनू: मी म्हणाले ते अगदी हेच. असल्या पुरुषांना कसं चिथवायचं हे बेरकी लोकांना बरोबर माहित असतं. शेवटी भरीला पडून ते हमखास आततायी वागून स्वत:चं पौरुष सिद्ध करायला जातात.

संजय: हो, पण अजून तरी अर्जुन बधलेला दिसत नाही. तो तसाच बसून आहे. त्यामुळे चर्चा आता फार भरकटली आहे. इकडचे तिकडचे खूपसे विषय एकत्र करून कृष्णाने मोठा काला केलेला आहे. आधी तो म्हणाला की प्रजापतीने देव आणि मनुष्य निर्माण केले. नंतर म्हणाला की माणसाने इंद्रियांचं दमन करायला पाहिजे. यापुढे अर्जुनाने त्याला विचारलं की योगी माणसाची लक्षणं काय आहेत, आणि कृष्णाने बऱ्याच तपशीलात जाऊन ती त्याला सांगितली. मला तरी ह्या सगळ्यांत सुसंगत धागा असा ओळखू येत नाही. आत्ताच्या घटकेला लढाई करायची की नाही हे ठरवण्यासाठी इतका पसारा घालण्याची गरज नव्हती. एकतर लढाई करून नंतर ही चर्चा करा, नाहीतर लढाई बरखास्त करून बाकीच्यांना घरी पाठवून मग करा. इतरांची अडवणूक कशाला करता?

कृतवर्मा: लढाई होईल असं मला वाटत नाही. का ते सांगतो. कृष्ण ह्या सगळ्यात अविचाराने घुसला असा माझा कयास आहे. पांडवांच्या वतीने तो कौरवांकडे शिष्टाई करायला गेला होता. त्यावेळी तो मुद्दाम ताणून धरून गुर्मीत बोलला, जेणेकरून शिष्टाई फसेल आणि युद्धाला तोंड फुटेल. पांडव जिंकले तर आपल्यालाही राज्यात वाटा मिळेल असं त्याचं गणित असावं. सीनू म्हणते आहे तशी पौरुष सिद्ध करायची उबळ त्यालाही आली असेल.

पण नंतर सगळा बेत फिसकटला. झालं काय तर हा म्हणे झोपला होता. तेव्हा दुर्योधन येऊन त्याच्या डोक्याशी बसला आणि युधिष्ठिर पायाशी बसला. कृष्ण झोपेतून उठला तेव्हा त्याला युधिष्ठिर आधी दिसला, आणि दुर्योधन नंतर दिसला. म्हणून त्याने आधी युधिष्ठिराला विचारलं की तुला काय हवं आहे? तर युधिष्ठिर म्हणाला की तू हवा आहेस. यानंतर त्याने दुर्योधनाला विचारलं की तुला काय हवं आहे? तर दुर्योधन म्हणाला की मला तुझी यादवसेना हवी आहे. त्यामुळे कृष्ण एकटा तिकडे गेला आणि यादवसेना कौरवांकडे आली. हा सगळा ठार वेडेपणा झाला. जर कौरव हरले तर ह्याचंच सैन्य खलास होईल, आणि द्वारकेला परत गेल्यानंतर मेलेल्या सैनिकांच्या बायका ह्याला आईमाईवरून शिव्या देतील. याउलट जर कौरव जिंकले तर ह्याचं सैन्य जिंकलं पण हा हरला अशी विनोदी परिस्थिती येईल. आपल्याच सैन्याला विरुद्ध पक्षासाठी लढायला पाठवणं ही चक्रमपणाची परिसीमा नाही का झाली? आणि कहर म्हणजे यादवसेनेचं नेतृत्व माझ्यावर लादून माझी कात्री करून ठेवली आहे. माझे सैनिक मला विचारतात की मोठे गोपाळ विरुद्ध पक्षात का आहेत? हा प्रकार काय आहे तो आम्हाला समजावून सांगा. आता काय कर्म समजावून सांगा?! मलाच तो समजलेला नाही. तेव्हा माझा धोशा हाच आहे. आम्हाला मोकळं करा. मनात राग न ठेवता आम्ही आपले घरी जाऊ. इंद्रियांचं दमन करत तुम्ही दोघे इथेच राहा.

कृपाचार्य: एक शंका अशी येते की समोर जे चाललं आहे ते पाचही पांडव आणि कृष्ण यांच्यामधलं साटंलोटं असावं. कृष्ण पेचात सापडलेला आहे हे त्यांना कळलेलं आहे, आणि अब्रू न गमावता त्याला युद्धातून बाहेर आणता यावं म्हणून अर्जुन धडपड करतो आहे. अर्जुनाने कच खाल्ल्यासारखं करायचं, कृष्णाने त्याला युद्धाला प्रवृत्त केल्यासारखं करायचं, आपला धीर होत नाही असं कबूल करून अर्जुनाने युद्धातून माघार घ्यायची, आमचा भाऊ लढत नसेल तर आम्हीही लढत नाही असं बाकीच्यांनी म्हणायचं आणि शेवटी कृष्णाने नाईलाज झाल्यासारखं दाखवायचं असा हा बनाव दिसतो. इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलून सध्या ते दोघे वेळ काढताहेत.

संजय: मलाही तसं वाटतं, पण तरीदेखील एक गोष्ट मनात खुपते आहे ती बोलून दाखवतो.

सीनू: आता काय आणखी? 'मला का लढायचं नाही' ह्याचं अजून तिसरं एक कारण अस्तनीतून बाहेर काढलंन की काय?

कृतवर्मा: शक्य आहे. अर्जुन सव्यसाची आहे, त्यामुळे त्याला डाव्याउजव्या दोन्ही अस्तन्या तितक्याच सफाईने वापरता येतात.

संजय: नाही, तिसरं कारण नाही. मुद्दा वेगळाच आहे. मघाशी जे मी म्हणालो की कृष्णाने खूप विषयांना हात घालून फापटपसारा केलेला आहे, ते खरं आहेच पण नंतरचा भाग बुचकळ्यात टाकणारा आहे. कृष्ण म्हणतो की माझं वय सूर्यापेक्षा जास्त आहे. सूर्याला मी योग शिकवला होता, सूर्याने तो मनूला शिकवला आणि मनूने इक्ष्वाकूला शिकवला. तोच मी आता पुन्हा सांगतो आहे, म्हणून फापटपसारा आहे.

सीनू: काही कळलं नाही.

संजय: मलाही नाही. ही बोलणी तिकडे चालू असताना मी कृतवर्म्याच्या मागे घोड्यावर बसण्याच्या प्रयत्नात होतो, त्यामुळे नीट लक्ष दिलं नाही. द्यायला हवं होतं. पण त्यापुढे कृष्ण असंही म्हणाला की सगळ्या माणसांचा, जनावरांचा आणि वनस्पतींचा मी मालक आहे. दुर्जनांना ठार मारण्यासाठी आणि सज्जनांचं रक्षण करण्यासाठी मी अधून मधून जन्म घेतो. आता ह्याचा अर्थ काय घ्यायचा?

कृतवर्मा: काही अर्थ लागत नाही. तो द्वारकेचा राजा आहे इतपत मान्य आहे, पण सगळ्या माणसांचा मालक केव्हापासून झाला? आणि झाला असेल तर आम्हाला आधी सांगायचं नाही का?

मयाहुर: मीही तेच म्हणतो. इथून तीनशे कोसांवर तुम्ही खैबरखिंडीतून एकदा पलीकडे गेलात की तिथे ह्या कृष्णाचं नावसुद्धा कुणी ऐकलेलं नाही.

संजय: मालक म्हणजे गुलामांचा मालक किंवा शेतजमिनीचा मालक ह्या अर्थाने नव्हे. त्याच्या म्हणण्याचा रोख असा दिसला की निसर्गसृष्टीला आणि माणसांना त्याने निर्माण केलेलं आहे.

मयाहुर: केव्हा?

संजय: ते माहित नाही.

सीनू: हे काही पटण्यासारखं नाही. जर त्याने आपल्या सगळ्यांनाच निर्माण केलं असेल तर जाहीरपणे तसं स्वच्छ सांगितलं का नाही? अर्जुनाला एकट्यालाच का सांगतो आहे?

संजय: तेही माहित नाही.

कृतवर्मा: आणि मारायचेच होते तर दुर्जन तयार कशाला केले? खरोखरीच ह्या गृहस्थाच्या बोलण्यात बोलणं नसतं. घोळ न घालता काहीसुद्धा त्याला करता येत नाही.

कृपाचार्य: दुर्जन म्हणजे आपणच बहुतेक, कारण तो अर्जुनाला आपल्यालाच मारायला सांगतो आहे. तेव्हा दिसतं असं की वेळ जात नव्हता म्हणून त्याने दुर्जन तयार केले आहेत, आणि ते मारताना आणखी वेळ जावा, काम फार पटकन संपू नये, म्हणून आपलीच फौज दुर्जनांची मदत करायला विरुद्ध पक्षात पाठवली आहे.

सीनू: तुम्हाला काय वाटतं? काही कारणाने कृष्ण भ्रमिष्ट झाला नसेल ना? उन्हाचा तडाखा बसला असेल म्हणावं तर वातावरण तसं नाही. थंडीचे दिवस आहेत आणि सकाळ आहे.

संजय: म्हणजे कृष्ण म्हणतो आहे त्यातलं तुम्हाला कुणालाच काही खरं वाटत नाही? खात्री करून घेतलेली बरी. कारण खरं निघालं तर पंचाईत होईल.

सीनू: नाही, काही खरं नाही. तू उगीच घाबरू नकोस. तुम्हाला सांगते काय चाललंय ते. माझी पोर पाचेक वर्षांची असतानाची गोष्ट आहे. शेजारच्या एका पोराशी तिची घट्ट मैत्री झालेली होती, आणि त्या दोघांनी मिळून आपापसांत एक सांकेतिक भाषा तयार केली होती. काही शब्द नेहमीचेच होते, काही नवे बनवले होते, आणि काही नेहमीच्या शब्दांचा अर्थ बदलून टाकला होता. एकमेकांबरोबर ते तासनतास काही ना बाही बोलत राहायचे, पण तिऱ्हाईत माणूस ऐकू लागलं तर दुग्ध्यात पडत असे. कृष्णाचं आणि अर्जुनाचं मिळून तेच चालू आहे. प्रजापती, इक्ष्वाकू, इंद्रियदमन वगैरे त्यांचे आपल्या-आपल्यातले गंमतीचे शब्द असणार. संजय त्यांचं बोलणं चोरून ऐकून आपल्याला सांगेल हे त्यांना कुठे माहित आहे? ते आपले आपापसात मस्करी करताहेत.

कृतवर्मा: पण मग हा समोरचा खोळंबा किती वेळ चालणार आहे? निदान ते समजलं तरी बरं होईल.

मयाहुर: नक्की ठाऊक नाही, पण संजयची मदत झाली तर आपल्याला ठोकताळा बांधता येईल. ह्या युद्धासाठी तजवीज करत असताना काही बाबी माझ्या लक्षात आल्या आहेत. अठरा दिवस युद्ध चालावं असा तुमचा बेत आहे. सैन्य अठरा अक्षौहिणी आहे. एका अक्षौहिणीत २१८७० हत्ती, ६५६१० घोडे आणि १०९३५० पदाति असावेत असं तुम्ही नेमून दिलेलं आहे; ह्यापैकी प्रत्येक संख्येतल्या आकड्यांची बेरीज अठरा येते. थोडक्यात अठरा हा आकडा जिथे तिथे आणण्याचा तुम्हाला सोस आहे. हा शहाणपणा नव्हे. हा एककल्लीपणा झाला. शत्रूची ताकद काय आहे ह्याचा विचार करून कोणतं दळ किती हवं ते ठरवायचं असतं. मनात घट्ट धरलेला एकच एक आकडा चिवडत बसून नव्हे.

कृतवर्मा: तुझं म्हणणं मला शंभर हिस्से मान्य आहे, पण आम्ही सैन्यातले लोक असेच असतो. रूढीने जे चालत आलेलं आहे तेच आम्हाला बरं वाटतं. आणि असं पाहा: हा एककल्लीपणा तू म्हणतोस तो दोन्ही सैन्यांनी केलेला आहे. तेव्हा फिट्टंफाट होऊन कुठल्याच बाजूचा विशेष तोटा होणार नाही.

कृपाचार्य: पण ह्या सगळ्याचा रोख कुणीकडे आहे? यावरून वेळेचा हिशेब कसा करणार?

मयाहुर: सांगतो. तर माझा कयास असा आहे की ह्या रूढीच्या प्रभावाखालून कृष्णसुद्धा सुटणार नाही. ह्या दोघांचं जे काही बोलणं चालू आहे ते अठरा तुकड्यांत विभागलेलं असणार असं मी गृहीत धरून चालतो आहे. अर्थात इथून आपल्याला काहीच ऐकू येत नाही, ते फक्त संजयला येतं. म्हणून त्याची मदत हवी.

संजय: ठीक तर. (कानोसा घेतो.) हे जे तू तुकडे म्हणतोयस ते अध्याय आहेत. आत्ताच सहावा अध्याय

संपला आहे. आपल्या गृहीतकाप्रमाणे अजून बारा व्हायचे आहेत. तेव्हा आत्तापर्यंत जितका वेळ गेला त्याच्या दुप्पट आणखी लागेल असं समजूया का?

मयाहुर: ह्यापेक्षा जास्त नेमकं गणित करण्याचा प्रयत्न करू. ह्या अध्यायांमध्ये काय आहे?

संजय: अनुष्टुभ छंदांमधले श्लोक आहेत. त्रिष्टुभ छंदामधलेही आहेत, पण ते तुरळक आहेत.

मयाहुर: किती?

संजय: प्रत्येक अध्यायात वेगवेगळे आहेत. पहिल्यात ४६, दुसऱ्यात ७२, तिसऱ्यात ४३, चौथ्यात ४२, पाचव्यात २९ आणि सहाव्यात ४७ आहेत. पुढचं अर्थात माहित नाही.

मयाहुर: आत्तापर्यंतचे २७९ झाले. जर याच दराने पुढेही असतील तर एकूण २७९ गुणिले ३ म्हणजे ८३७ होतील. पण माझ्या मते प्रत्यक्षात तितके होणार नाहीत. अठरा भाग करायचेच असा जर हट्टाग्रह असेल आणि आपल्याला काय सांगायचं आहे ह्याचं नियोजन जर नीट नसेल तर हमखास सुरवातीचे भाग मोठे होतात. नंतर बोलायला फारसं उरत नाही, तेव्हा छोटे भाग करून प्रसंग साजरा करून न्यावा लागतो. जर शेकडा पंधरा ते वीसची घट धरली तर याचा अर्थ असा की ६७० ते ७११ यादरम्यान श्लोकांची संख्या येईल. गोळाबेरीज सातशे धरून चालू. एक श्लोक म्हणायला किती वेळ लागतो ते ठरवायला हवं.

संजय: मी एक म्हणून दाखवतो.

मयाहुर: थांब. (मयाहुर गाड्यात शिरतो आणि शोधाशोध करून एक तांब्या घेऊन बाहेर येतो. अणकुचीदार पात्याने त्याच्या आतल्या बाजूला ठराविक अंतरावर खुणा केलेल्या आहेत. तांब्याच्या तळाला असलेलं लहान भोक त्याने आपल्या तर्जनीने बंद केलं आहे. जवळच्या एका घोड्याजवळ जाऊन त्याच्या पार्श्वभागावर तो विशिष्ट पद्धतीने थापटतो. घोडा धार सोडू लागताच मयाहुर ती तांब्यात भरून घेतो.)

संजय: कृतवर्मा, तुझा इथे उपयोग होणार आहे. तू सतत यादवसेनेत वावरत असल्यामुळे द्वारकेतले लोक कसे बोलतात हे तुला माहित आहे. तशासारखा हेल काढून मी जे म्हणतो ते माझ्यामागोमाग म्हण.

कृतवर्मा: सांग.

संजय: हतो वा प्राप्स्यसि स्वर्गम्

कृतवर्मा: हतो वा प्राप्स्यसि स्वर्गम्

संजय: जित्वा वा भोक्ष्यसे महीम्

कृतवर्मा: जित्वा वा भोक्ष्यसे महीम्

संजय: तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय

कृतवर्मा: तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय

संजय: युद्धाय कृतनिश्चय:

कृतवर्मा: युद्धाय कृतनिश्चय:

संजय: आता हे सगळं पुन्हा एकसंध म्हण. (मयाहुराला खूण करतो.)

कृतवर्मा: हतो वा प्राप्स्यसि स्वर्गम् जित्वा वा भोक्ष्यसे महीम् तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चय:

(कृतवर्म्याने श्लोक म्हणायला सुरुवात करताच मयाहुर तांब्याखालचं बोट दूर करून जमिनीवर धार पडू देतो. श्लोक संपताक्षणीच बोट पुन्हा धरतो आणि किती द्रव बाहेर गेला ते आतल्या खुणेने पाहतो. हे सारं चालू असताना भोवताली मोठा घोळका जमत आलेला आहे.)

मयाहुर: एक श्लोक म्हणायला तुला तीस लिप्त इतका वेळ लागला. असे सातशे श्लोक म्हणजे तीस गुणिले सातशे बरोबर एकवीस हजार लिप्त झाले. छत्तीसशे लिप्तांची एक घटका होते, तेव्हा - (खाली वाकून धुळीत आकडेमोड करीत) पाच पूर्णांक पाच सष्ठांश घटका होतात. यातल्या एक तृतीयांशापेक्षा थोडासा जास्त वेळ सरलेला आहे, ह्याचा अर्थ आणखी पावणेचार घटका पुढे आहेत असं समजा.

(आजूबाजूच्यांना एकदम वाचा फुटते. 'अजून पावणेचार घटका - अजून पावणेचार घटका' असे सार्वत्रिक उद्गार निघतात आणि मोठमोठ्या होत जाणाऱ्या वर्तुळातून सैन्यात पसरत जातात. अनेकजण रथातून उतरतात आणि आळोखेपिळोखे देत इकडेतिकडे फिरू लागतात. मैदानाच्या परीघालगत जे चर खणलेले आहेत तिकडे अनेकजण चालू लागतात. 'समोरच्यांना सांगायचं का?' असं कुणीतरी विचारतो. 'सांगा - त्यांनाही सांगा' असा ओरडा होतो, आणि लागलीच 'अजून पावणेचार घटका - अजून पावणेचार घटका' असे उद्गार पांडवसेनेतही पसरतात. उरलेला द्रव मयाहुर जमिनीवर ओतून देतो, आणि तांब्या गाड्यात परत ठेवून देऊन त्याच घोड्याच्या शेपटाला हात पुसतो.)

❒

सीनू: पावणेचार घटका म्हणजे खूप वेळ आहे अजून. मी आपली इथेच बसते. कुणाला काही हवं झालं तर इथेच येऊ देत. (पायातल्या वहाणा काढून ठेवून युद्धाचे नियम कोरलेल्या शिलालेखावर ऐसपैस मांडी घालून बसते.) बाई गं! दगड चांगलाच गार पडला आहे.

मयाहुर: यांगझीमधून मी मुद्दाम मागवून घेतलेला तो ज्वालामुखी खडक आहे. अंगातली उष्णता तो शोषून घेतो. दगडाला स्पर्श करणारा अंगाचा भाग जितका जास्त तितकी जास्त उष्णता बाहेर जाते. त्यामुळे जरत्कारूपेक्षा रंभोरुला त्यावर जास्त गार लागेल.

सीनू: पुरे! उगीच माझ्या मांड्यांवर टीकाटिपणी कशाला करायची ती? (दगडाशेजारीच धुळीत फतकल मारून बसते.) पण संजया, तुला इतक्या दुरून ऐकू येतं ही बरीक मोठी सोय आहे.

संजय: तितकीशी मोठी नाही.

सीनू: अरे, तितकीशी मोठी काय नाही? तुला व्यासाकडून तसा वर मिळाला आहे ना?

संजय: हो.

सीनू: मी काय म्हणते ते ऐक. वर म्हणजे फायद्याचं कलम. नाहीतर त्याला वर म्हणायचं कशाला? हे बघ, माझी अफूची खरेदीविक्री सतत चालू असते. ह्या धंद्यात फार कटकटी आहेत. बख्तरमध्ये अफू पिकते. शेतकऱ्याकडून ती विकत घेऊन उंटांवरून वाहून न्यावी लागते. तिथे सगळ्या डोंगरदऱ्याच आहेत, आणि

रस्ते फार खराब आहेत. तेव्हा होतं काय की ह्या वस्तीत काय चाललं आहे त्याची त्या वस्तीला बातमी नसते. चार कोस ह्या दिशेला गेलं तर दीडपट भाव, चार कोस त्या दिशेला गेलं तर निमपट भाव असं असतं. अशा ठिकाणी दूरवरचं ऐकू शकणारं माणूस मिळालं तर ते फार किफायतशीर होईल. मी तुला भागीदारी देते. दोघे मिळून आपण सगळा धंदा काबीज करू. बघ, विचार कर. नाहीतरी भाटगिरी करत राहून तुझी भरभराट होणार नाही. आपलं चांगलं होईल तिकडे माणसाने जावं. आपल्यापाशी जे कसब आहे ते वापरून घ्यावं.

संजय: नाही, ते तसं नाही. मला असं तिन्ही त्रिकाळ दूरवरचं ऐकता येत नाही. कसं झालं ते सांगतो. युद्धात काय घडतं ते धृतराष्ट्राला समजून घ्यायचं होतं. आता तो आंधळा असणं ही अडचण आहे. पण तरीदेखील त्याला युद्धापुरतं दिसेल असा वर द्यायला व्यास राजी होता. पण धृतराष्ट्र म्हणाला की इतकी मोठी कत्तल झालेली मला पाहवणार नाही. त्यामुळे युद्ध स्वतः बघून त्याचं वर्णन धृतराष्ट्राला सांगायचं काम माझ्यावर येऊन पडलं. ह्यात मला आनंद काही नाही. पण बोलूनचालून मी राजेलोकांच्या आसपास घोटाळणारा, त्यांच्या सदिच्छेवर पोट भरणारा माणूस. नाही म्हणण्याचा पर्याय माझ्यासमोर नव्हता.

कृपाचार्य: पण तुला लांबचं ऐकू येतं की दिसतं की दोन्ही? वर नेमका काय आहे?

संजय: धृतराष्ट्राशेजारी मी उभा होतो. तेव्हा व्यास धृतराष्ट्राला उद्देशून म्हणाला की 'हा संजय तुला युद्धाचं वर्णन करून सांगेल. युद्धामध्ये त्याच्या अपरोक्ष असं काहीसुद्धा घडणार नाही. त्याला मी दिव्यदृष्टी देतो आहे, जेणेकरून तो तुला युद्धाचा वृत्तान्त सांगेल. त्याला सर्व काही कळेल, मग ते गुप्त असो की सुप्त, रात्री घडो की दिवसा. मनातले विचारही त्याला समजतील. त्याला थकवा येणार नाही, आणि शस्त्रं त्याला जखम करू शकणार नाहीत. युद्धातून त्याची जिवंत सुटका होईल.'

कृतवर्मा: म्हणजे हा वर तुला थेट न देता धृतराष्ट्राला परस्पर सांगून टाकला आहे.

संजय: त्याचं मला नवल वाटलं नाही. मी काय करावं हे इतरांनी आपापसांत ठरवलेलं आहे असं पुष्कळदा घडतं.

सीनू: चांगला घसघशीत वर आहे.

संजय: वर अगदी सढळ जिभेने दिलेला आहे, पण म्हणावा तसा मला धार्जिणा नाही. आता हेच पाहा.

युद्धाला सुरुवात झालेली आहे का? म्हटलं तर हो आणि म्हटलं तर नाही. शंख फुंकले गेलेले आहेत याचा अर्थ औपचारिक सुरुवात झालेली आहे, पण हातघाईला सुरुवात झालेली नाही. अर्धवट परिस्थिती आहे. पण ह्याचा वाईट परिणाम म्हणजे मला दिलेला वरही सध्या अर्धवटच लागू आहे. कृष्ण आणि अर्जुन तिथे काय बोलताहेत हे मी इथून ऐकू शकतो, पण अधलेमधले उच्चार पुसट आहेत. अंदाजाने अर्थ लावून सध्या मी सगळं लक्षात ठेवायचा प्रयत्न करतो आहे.

कृतवर्मा: तुला पुसट ऐकू येतं हे तू आम्हाला आत्ता सांगतो आहेस?

संजय: अंमळ पुसट.

कृपाचार्य: अंमळ म्हणजे किती ते मला ठाऊक नाही, पण मी म्हणतो जाऊ दे. नाही स्पष्ट ऐकू आलं तरी बिघडत नाही. संगनमत करून दोघे वेळ काढताहेत अशी माझी खात्री झालेली आहे. एकदाचं हे संपलं की युद्ध रद्द करतील आणि आपल्याला परत जाता येईल.

संजय: ते ठीक, पण हे दोघे काय बोलले ते धृतराष्ट्राला नंतर सांगावं लागेलच. म्हातारा खमक्या आहे. आणि माझी बिदागी त्याच्या मर्जीवर अवलंबून आहे. पण हे सोपं नाही. एकतर ऐकू नीट येत नाही, आणि शिवाय कृष्ण फार विस्कळीत बोलतो आहे.

सीनू: मग मी माझ्या पोरीला तिथे रथाखाली बसवली आहे ते चांगलंच झालं. एकदाचं हे संपल्यावर कृष्ण आणि अर्जुन कायकाय म्हणाले ते तू आठवून लिहून काढ. माझी पोरगी लिहिते आहेच. दोन्ही आपण ताडून बघू. मग त्याच्या प्रती काढून त्यातली एक धृतराष्ट्राला भेट देऊ. बाकीच्या खपवायचा पत्कर मी घेते. त्याचा अर्थ कसा लावायचा ते वाचणारे बघून घेतील. लोक बाकी कायकाय वाचतात ते एक नवलच आहे. काहीही लिहा, वाचणारे सापडतात.

कृतवर्मा: पण सीनूच्या मुलीने लिहिलं आहे ते आणि संजयला आठवतं आहे ते यात जर तफावत निघाली तर कुणाचं बरोबर ते कसं कळणार?

संजय: नाही ना कळणार. ती अडचण आहेच.

कृपाचार्य: आणि सातेकशे श्लोक म्हटले म्हणजे इथेतिथे तफावत ही निघणारच.

मयाहुर: अशा वेळी काय करायचं ह्याचं एक शास्त्र आहे. गणिताइतकं अचूक नाही, पण उपयोगाचं आहे. हे शास्त्र का शोधून काढावं लागलं ते सांगतो. बाबीलची वसाहत मागे सोडून पुढे दक्षिणेला गेलं की फिलेस्तान नावाचा देश लागतो. तिथे एक तरुण माणूस होऊन गेला. तो चक्रम होता पण स्वभावाने गोड होता. एके ठिकाणी तो फारसा राहिला नाही; गोष्टी सांगत एका गावातून दुसऱ्या गावात असा तो सतत हिंडत असे. नंतर त्याला कुणीतरी आकसाने मारून टाकला. त्याने कुठल्या गोष्टी सांगितल्या, तो कसा जगला ही हकिकत त्याच्या जवळच्या माणसांनी तो मेल्यानंतर काही वर्षांनी चामड्याच्या तुकड्यांवर लिहून काढली. फिलेस्तानच्या सगळ्या बाजूंनी समुद्र असल्यामुळे हे तुकडे दमट हवेने खराब व्हायला लागले. त्यामुळे त्यांच्या नव्या प्रती काढाव्या लागल्या, आणि त्याही नंतर कुठेकुठे नेऊन लोकांनी प्रतींवरून प्रती काढल्या. पण एकीवरून दुसरी प्रत काढणं हे काम कंटाळवाणं असतं, आणि लिहिताना चुका होतात. चुकीच्या प्रतीवरून नवी प्रत काढली की चुका वाढत जातात. तर असे चामड्याचे तुकडे आता खूप झालेले आहेत, आणि ते एकमेकांशी जुळत नाहीत. जागोजागी तफावत निघते. पण ह्या तरुण माणसाच्या बोलण्यात शहाणपण होतं असा लोकांचा विश्वास आहे, आणि त्यामुळे तो नक्की काय म्हणाला हे ठरवण्यासाठी खूप कष्ट घ्यायची त्यांची तयारी असते. आणि म्हणूनच, प्रती काढताना चुका का होतात आणि त्या दुरुस्त कशा करायच्या ह्याचं एक वेगळं शास्त्रच त्यांनी उभं केलं आहे.

कृपाचार्य: इथे आपल्यालाही ह्या शास्त्राची गरज पुढेमागे पडेलच. असं पाहा, कृष्ण आणि अर्जुन यांच्यामध्ये काय बोलणं होतं ते संजय लिहून काढणार आहे. आपल्याकडे चामड्यावर लिहिण्याची पद्धत नाही. भुजीच्या झाडाची साल काढून आपण त्यावर लिहितो. इथली हवा गरम असते, वाळवी असते, पाऊस पडतो, आणि ह्या सगळ्यामुळे झाडाच्या साली लवकर कुजतात. तेव्हा आपल्यालाही प्रतींवरून प्रती काढाव्या लागणारच, आणि कितीही काळजी घेतली तरी चुका होणारच.

सीनू: खरं आहे. मी तर म्हणते हे शास्त्रसुद्धा आपण लिहून काढायला पाहिजे. पण त्याच्याच प्रती काढताना चुका झाल्या तर काय घ्या?

संजय: हुशार आहेस हो बाई तू. तुझ्या तावडीतून काही सुटत नाही.

सीनू: पण मी म्हणते तसं तू सगळं लिहून तर काढ. आपण ते मयाहुराला दाखवू. त्याची नजर तिखट आहे. त्याला पटकन चुका काढता येतात.

मयाहुर: ह्या शास्त्राची मला खोलात जाऊन माहिती आहे असं मी म्हणत नाही. पण त्यातली काही तत्त्वं अशी आहेत की आपली आपण बुद्धी लढवून ती शोधून काढू शकतो. तुम्हाला एक किस्सा सांगतो. युद्धाचे नियम जेव्हा तयार झाले तेव्हा त्याचे शिलालेख बनवावेत आणि कुरुक्षेत्रावर ते ठराविक अंतराने लावावेत ही कल्पना माझी आहे. पण दगड खूप लागतात. तुम्हाला नेमकं सांगतो. कुरुक्षेत्र हे एक लंबवर्तुळ आहे. त्याचा मोठा व्यास तेरा कोस आहे, आणि त्याला काटकोन करून लहान व्यास नऊ कोस आहे. मोठा व्यास, लहान व्यास आणि तीनशे पंचावन्न अशा तीन आकड्यांचा गुणाकार करून त्याला चारशे बावन्नचा भाग दिला की लंबवर्तुळाचं क्षेत्र ठरतं. ही पद्धत मी यवनांकडून शिकलो. तर हिशेब असा होतो की कुरुक्षेत्र झाकायला एक कोस लांबीरुंदीचे ब्याण्णव चौरस लागतील. मी असं ठरवलं की संपूर्ण कुरुक्षेत्राचे एक सप्तमांश कोस लांबीरुंदीच्या चौरसांत तुकडे करून प्रत्येक चौरसाच्या वायव्य कोपऱ्यात एक शिलालेख लावावा. असे सुमारे साडेचार हजार शिलालेख मला तयार करून घ्यावे लागणार होते.

मूळ शिलालेख मी स्वत:च्या हाताने कोरून घेतला. बाकीच्या प्रती ह्या मूळ शिलालेखाची नक्कल करून बनवाव्या लागणार होत्या, पण इतके दगड आणि इतके पाथरवट एकाच ठिकाणी आणणं सोयीचं नव्हतं. त्यामुळे मी योजना अशी केली की मूळ लेखाच्या तीन प्रती काढून मैदानात त्या तीन ठिकाणी न्याव्यात. त्यातल्या प्रत्येकीवरून पुन्हा तीन प्रती काढून त्या आणखी दूर न्याव्यात आणि हा शिरस्ता असाच पुढे चालू ठेवावा. पण माझ्या लक्षात आलं की प्रतींवरून प्रती काढताना चुका होऊ लागल्या आहेत. चुकांचा अभ्यास म्हणजे मनाचा अभ्यास असतो. तुम्हाला उदाहरण देतो.

सहावा नियम असा आहे:

जो दुसऱ्याबरोबर युद्धात गुंतला असेल, गांगरलेला असेल किंवा पाठमोरा असेल अशास ठार मारू नये.

हे वाक्य आधी संपूर्ण पाठ करून मग फरशीवर कोरून काढायचं अशी आमची कामाची पद्धत होती. पण 'गुंतला' आणि 'गांगरलेला' यामध्ये तोच ध्वनी तीनदा येत असल्यामुळे पाठ चुकत असे आणि कित्येक पाथरवट 'गुंतला' ऐवजी 'गुंगला' लिहीत असत. ह्या दोन क्रियापदांचा अर्थ सारखा नाही. युद्ध करणारा पूर्ण तरतरीत मनाने ते करत नव्हता अशी जी अर्थछटा 'गुंगला' मध्ये येते ती नको आहे. त्यामुळे मी

गुंतला असेल किंवा गांगरलेला असेल

असा बदल केला. पहिला 'ग' आणि नंतरचे दोन 'ग' यांच्यात जास्त अंतर पडल्यामुळे ही चूक होईनाशी झाली. काम वाढलं पण त्याबद्दल तक्रार नाही. हे वाक्य आत्ता जसं आहे त्यात 'किंवा' ची विनाकारण पुनरुक्ती झाली आहे असं काहींना वाटतं. पण ती विनाकारण नाही.

अशी खूप उदाहरणं सापडतात. त्यांच्यातला सामाईक गुण कुठला हे ओळखून यवनांनी ह्या शास्त्राचा एक नियम बनवला आहे. तो असा की जर पाठभेद असेल तर जास्त आडनिडा पाठ हा बरोबर समजायचा, म्हणजेच जास्त सोपा पाठ चुकीचा समजायचा. कसं ते सांगतो: 'गुंगला असेल, गांगरलेला असेल' हा पाठ सोपा आहे कारण चार 'ग' मिळून म्हणायला सोपे होतात. पण याउलट 'गुंतला असेल, गांगरलेला असेल' हा पाठ आडनिडा आहे, कारण साऱ्या बाजूंनी 'ग' असताना मधला एक 'त' तगवून धरावा लागतो. यवनांचं म्हणणं असं की माणूस चूक करताना आडनिड्याचं सोपं करतो पण सोप्याचं आडनिडं करत नाही. म्हणून आडनिडा पाठ हाच खरा पाठ असायची शक्यता जास्त असते.

संजय: आडनिडा पाठ हाच खरा पाठ. नियम मजेदार आहे. मी आवर्जून लक्षात ठेवीन. कृष्ण आणि अर्जुन आपसांत काय बोलले हे मला नेमकं आठवेनासं झालं तर अर्धवट जे आठवतं आहे ते मुद्दाम आडनिडं करून लिहीन. लोकांना तेच खरं वाटेल. सीनूची मुलगी अजून कोवळी आहे, तिला वेगाने लिहिता येत नसणारच. ती आपलं सगळं सोप्पंसोप्पं करून टाकेल. म्हणजे जिंकणार मीच.

सीनू: तसं नाही हं. माझी पोरगी खूप झरझर लिहू शकते. भोवताली ऊन असो, पाऊस असो, गोंगाट असो, तिचं मन चळत नाही. ती आपली लिहीत जाते.

मयाहुर: हे खरं आहे.

सीनू: पोट राहण्याच्या वेळी बाईचं अंग जसं असतं तसं तिचं मूल होतं. त्या वेळी मी श्रीनगरीला एका तरुण संन्याशाबरोबर राहात होते. त्यानं स्वत: एकदाही कुणा बाईचा भोग घेतला नाही. पण त्याचा अभ्यास खूप होता. तो म्हणायचा की बाई आणि पुरुष जुगत असताना दोघांनाही त्यातून आनंद मिळायला हवा. इंद्रियांचं दमन करा असं कधी तो म्हणाला नाही. बायापुरुषांची बिनचूक मोजमापं घेऊन बायांचे किती प्रकार पडतात, पुरुषांचे किती पडतात, कुणाची जोडी कुणाबरोबर जमवली म्हणजे आनंद वाढतो ह्याचे त्याने ठोकताळे बसवले होते. मी खाली चिंचोळी आहे म्हणून मला तो हरणी म्हणायचा. माझ्यापेक्षा रुंद असलेली बाई म्हणजे घोडी, आणि खूप रुंद असेल तर हत्तीण. बाप्यांमध्ये जो खाली तोळामासा असेल तो ससा, त्यापेक्षा जाड असेल तो बैल आणि खूप जाडजूड असेल तो घोडा. नुस्ता आकार बघितला तर जुगण्याचे तीन त्रिकं नऊ प्रकार होतात. पण चिंचोळी विरुद्ध जाडजूड अशी जोडी असेल तर बाईला त्रास होतो. याउलट रुंद विरुद्ध तोळामासा अशी जोडी असेल तर बाईची खाज पुरती भागत नाही. पण हे सगळं नीट समजून घ्यायचं म्हणजे खूप प्रयोग करावे लागतात. तर असे वेगवेगळे पुरुष तो मला भेटायला घेऊन यायचा. जुगत असताना प्रत्येक क्षणी किती सुख होतं आणि किती त्रास होतो हे तो मला नोंद करून

ठेवायला लावत असे. आसन कुठलंही असो, डाव्या हातात तालपत्र आणि उजव्या हातात लेखणी धरून मी आपली लिहीत राहायची. खाली काहीही चालू असलं तरी मन चळू न देता लिहायची सवय मला तेव्हापासून लागली. त्याच दिवसांत कधीतरी मला पोट राहिलं. म्हणून माझ्या पोरीला जन्मापासून लिहिता येतं. दूध पीत असताना अम्म्यावर बोटांनी रेघा ओढायची तेव्हा मला शंका आली.

कृतवर्मा: एकूण ह्या संन्याशानं तुला बरंच सहन करायला लावलं.

सीनू: नाही, तसं नाही. मलाही मजा आली. ही सगळी माहिती एकत्र करून त्यानं नंतर एक पुस्तक लिहिलं. ते तर मी वारेमाप खपवलं. माझ्या पोरीला त्यातून सोन्याचे डूल घेतले. माझाही फायदा झाला आणि इतरांच्याही आनंदाची सोय झाली. एकूण पाहता माझ्या खाजगी रेशीमरस्त्याचा फार चांगला उपयोग झाला. तर सांगत काय होते की पोट राहतेवेळी बाईने आपलं अंग सांभाळायला पाहिजे. कारण मूल तसं होतं.

कृतवर्मा: तू म्हणतेस तसा अनुभव अनेकांना आलेला आहे. आमचा हा कृपाचार्य असा एकलकोंडा होण्यामागचं कारण तेच असावं.

सीनू: म्हणजे?

कृतवर्मा: त्याची जन्मकथाच तशी आहे.

कृपाचार्य: माझी जन्मकथा इथे जगजाहीर केलीच पाहिजे का?

कृतवर्मा: जगजाहीर नाही करत, पण तोंडी लावण्यापुरती सांगतो आहे. ती मनोरंजक असल्याबद्दल तुला कुणी दोष देणार नाही.

कृपाचार्य: ठीक आहे, सांग तर. पण फार रोखठोक शब्द वापरू नकोस.

कृतवर्मा: सांगायचं ते असं की शरद्वान नावाचा एक ऋषी होता. तो शस्त्रविद्येत तरबेज होत चालला होता, आणि त्यामुळे इंद्राला त्याची धास्ती वाटू लागली. शरद्वानाचं ब्रह्मचर्य मोडून काढण्यासाठी त्याने एक अप्सरा पाठवली. अप्सरेने शरद्वानासमोर येऊन आपले सगळे कपडे उतरवले आणि लांबून काही नखरे

करून ती परत गेली. इकडे शरद्वानाला राहवेना. एका पाणथळ जागेत रानगवत माजलेलं होतं तिथे तो लपतछपत गेला, आणि हाताने हलवू लागला. एकच गवताची कांडी वर आलेली होती, तिच्यावर नेमका शरद्वानाच्या पांढऱ्याचा फवारा उडाला आणि कांडी मधोमध सोलून निघाली. एका भागातून कृपाचार्य जन्माला आला आणि दुसऱ्या भागातून त्याची बहिण कृपी जन्माला आली. नेमक्या वेळी त्याची आई आपल्या मैत्रिणींपासून अशी फटकून राहिल्यामुळे कृपाचार्याच्या मनाचा कल जमावापासून वेगळं राहण्याचा झालेला आहे.

सीनू: बघा, मी म्हणत नव्हते?

कृपाचार्य: पण हे काहीच्या बाही स्पष्टीकरण झालं! माझा स्वभाव मी घडवलेला आहे. गर्भधारणेच्या वेळी माझी आई कशी वागली ह्याच्याशी त्याचा बादरायण संबंध कशाला जोडता?

कृतवर्मा: पाहिलंत?! म्हणजे फिरून फिरून आपण पुन्हा व्यासावर आलो. त्याचा ससेमिरा काही सुटत नाही. पण सीनूचा सिद्धान्त मला केव्हाचाच पटलेला आहे. धृतराष्ट्र आणि पंडूच्या आयांना तो ठाऊक असता तर आपल्यावर ही वेळ आली नसती.

सीनू: हा काय किस्सा आहे? इथे सगळ्यांना माहित आहे की काय? मी हिंडते खूप, त्यामुळे कुठे ना कुठे काही ना काही ऐकत असते. पण नेमक्या वेळी दुसरीकडे असले तर काहीतरी चविष्ट बातमी ऐकायची राहून जाते.

कृतवर्मा: तुला आणि मयाहुराला ही चित्तरकथा नवी असेल, पण इथे कित्येक वर्षे तो टवाळीचा विषय झालेला आहे. तू व्यासाला पाहिलं आहेस का?

सीनू: नाही.

कृतवर्मा: एकदा पाहिलंस तर पुन्हा पाहावंसं वाटणार नाही. त्याच्या दाढीचे केस डुकरासारखे राठ आहेत, आणि डोळे गुंजेसारखे तांबडेभडक आहेत. शिवाय अंगाला घाणेरडा वास येतो.

सीनू: मी एक चांगला साबण विक्रीला ठेवते. अंगाला वाईट वास असेल तर त्यानं लगेच जातो. मघाशी मी तुम्हाला तरुण संन्याशाबद्दल सांगितलं तो हे नेहमी म्हणायचा. पुरुषमाणसाने रोज दात घासावेत, आंघोळ

करावी, छान वासाचं तेल लावावं. नाहीतर बाईला किळस येते. काखेत घामाचा वास राहून गेला तर फार उबग येतो.

कृतवर्मा: तुला हकिकत ऐकायची असेल तर पुढे सांगतो. आमच्या भरतकुलामध्ये शंतनू नावाचा राजा होता, तिथून हे सगळं सुरू झालं. त्याची बायको सत्यवती. तिला चित्रांगद आणि विचित्रवीर्य नावाचे मुलगे होते. त्यांतला थोरला चित्रांगद लवकर वारला, आणि शंतनूनंतर विचित्रवीर्य गादीवर बसला पण तोही नंतर लगेचच वारला. विचित्रवीर्याला अंबिका आणि अंबालिका नावाच्या दोन राण्या होत्या, पण राज्याला वारस नव्हता. व्यास हा सत्यवतीचा आधीचा मुलगा. तिने त्याला बोलावून घेऊन सांगितलं की अंबिकेत तू बी टाक म्हणजे तिला मुलगा होईल. पण तो रात्री जेव्हा तिच्या खोलीत गेला तेव्हा त्याचा किळसवाणा अवतार बघून ती घाबरली आणि तिने डोळे घट्ट मिटून घेतले. व्यास तसाच तिला जुगला. त्यामुळे तिचा मुलगा आंधळा निपजला. तोच धृतराष्ट्र. आंधळा मुलगा राजा म्हणून चालत नसल्यामुळे सत्यवतीने व्यासाला पुन्हा बोलावून घेतला आणि अंबालिकेत बी टाकायला सांगितलं. त्याला बघून तिचा चेहरा फिकट पडला, म्हणून तिचा पोरगा पंडुरोगी झाला.

सीनू: काय अभंड गोष्ट आहे! पण माझ्या धंद्याला उपयोग होईल. एकेक गबाळग्रंथी बाप्या गाठून त्याला सांगते की हा वस्तरा घे, साबण घे आणि स्वच्छ राहात जा. नाहीतर बायकोला किळस येईल आणि तिला आंधळं पोरगं होईल. धंद्याचं असंच असतं. आपल्याला काय पाहिजे ते लोकांना नीट माहित नसतं. थोडं घाबरवलं की आपसूक विकत घेतात. आता व्यास हा मोठा माणूस. त्याला साबण विकायची माझी टाप नाही. पण माझ्यासारखीचं आधीच ऐकलं असतं तर चांगलं झालं असतं. धृतराष्ट्राची पोरं आणि पंडूची पोरं यांच्यात हेवेदावे झाले नसते आणि हा एवढा मोठा युद्धाचा डांगोरा वाजला नसता.

मयाहुर: यहुदी लोकांत ही चाल आहे हे मला माहित होतं. त्यांच्यात मोठा भाऊ मेला तर लहान भावाला त्याच्या विधवेचा भोग घ्यावा लागतो. भारतात पूर्वी कधी असं ऐकलं नव्हतं. पण व्यास हा सत्यवतीचा आधीचा मुलगा कसा हे मला समजलं नाही.

कृतवर्मा: सत्यवती ही पूर्वी कोळीण होती. ती एकदा पराशर ऋषीला बोटीतून यमुनेच्या पैलतीरावर घेऊन चालली होती. सत्यवतीला बघून तो पाघळला आणि त्याने तिला जोराचा आग्रह करकरून बळेच जुगायला तयार केली. ती बिचारी भेदरली होती, पण पराशर तिला म्हणाला की तुझ्या अंगाला जो माशांचा घाणेरडा वास येतो आहे तो घालवून तुला चांगला वास येईल अशी मी व्यवस्था करीन. त्याखेरीज तुझी फाटलेली योनी मी पुन्हा दुरुस्त करीन, म्हणजे तू नंतर दुसऱ्याशी लग्न करायला मोकळी

राहशील. एवढ्या आमिषावर ती तयार झाली. पराशराने बोटीत अंधार केला आणि तिला तो जुगला. त्याचीही ती पहिलीच वेळ होती, त्यामुळे सगळं पटकन झालं. सत्यवती गरोदर राहिली आणि तिला जो मुलगा झाला तो व्यास. माशांचा वास तिच्या कातडीवरून उडाला खरा पण पिशवीतून गेलेला नसल्यामुळे व्यासाच्या अंगाला अजूनही येतो. सत्यवतीने नंतर शंतनूशी लग्न केलं, पण आपला पूर्वेतिहास त्याला सांगितला नसावा.

कृपाचार्य: अंगाचा वास आईकडून आलाही असेल. पण समोरची बाई गर्भगळित झाली तरी आपलाच हेका दामटणं हा गुण थेट बापाकडून आलेला दिसतो आहे.

संजय: व्यास हा इतरांची तमा बाळगणारा माणूस नव्हे. आता माझंच पाहा: जर धृतराष्ट्राला युद्धाचं वर्णनच हवं असेल तर डोळ्यांनी बघून ते मी करू शकतो. त्यासाठी मला लांबचं दिसायला हवं आणि लांबचं ऐकू यायला हवं इथपर्यंत ठीक आहे. पण 'मनातले विचारही त्याला समजतील' हा जो वर मला न मागता दिलेला आहे, त्याची काहीसुद्धा आवश्यकता नव्हती. आणि तोदेखील नीट लागू पडत नाहीच. ही गुंतागुंत व्यासाने निष्कारण वाढवून ठेवली आहे.

कृपाचार्य: मी तुला हे विचारणारच होतो. इतरांच्या मनातले विचार तुला नेमके समजतात तरी कसे?

संजय: म्हटलं ना, नेमके समजत नाहीत. फार निसटते समजतात.

सीनू: पण तरीदेखील हे होतं कसं? बघायला डोळे असतात, ऐकायला कान असतात तसं मन समजायला काय असतं?

कृतवर्मा: माहित नाही. पण ह्याच्या उलट्या टोकाकडून पाहायला हवं. ऐकण्यासाठी आवाज हवेत असतो, बघण्यासाठी वस्तू प्रकाशात असते, तसं मन कुठे असतं हे माहित नाही. तिथून सुरवात करायला हवी.

मयाहुर: मला काय वाटतं ते सांगतो. मन हृदयात असणार इतकं उघड आहे. कान, नाक, डोळे, हात, पाय अशा सगळ्या अवयवांतून हृदयाकडे रक्त जातं. अवयवांत ज्या संवेदना उमटतात त्या हृदयाकडे नेण्याकरता ते असणार, कारण नाहीतर वीसपंचवीस फुलपात्रं भरून हा लाल द्रवपदार्थ अंगात सगळीकडे असायचं काहीच कारण नाही. मला जेव्हा समोर घोडा दिसतो तेव्हा डोळ्यातून त्याचं चित्र आणि कानातून त्याचा आवाज हे दोन्ही रक्ताबरोबर हृदयाकडे जातात. हृदयात हे दोन प्रवाह एकत्र येतात

आणि घोडा खिंकाळलेला मला कळतो.

सीनू: पण रक्तात जर संवेदना असतील तर सांडलेल्या रक्तात त्या दिसत का नाहीत?

मयाहुर: त्या दिसत नाहीत याचं मला आश्चर्य वाटत नाही. रक्त दाट आणि चिकट असतं, तेव्हा त्या सहज कुठेही लपत असतील.

कृपाचार्य: इथपर्यंत मला बरोबर वाटतं. समजा जखम होऊन अंगातलं पुष्कळ रक्त निघून गेलं तर हृदयाचा बाकी अवयवांशी संपर्क तुटत असणार. त्यामुळे मन थांबून माणूस मरतो.

कृतवर्मा: पण ठार मारलेल्या माणसाचं हृदय मी कापून काढून आतून पाहिलेलं आहे. त्यात मन मावलेलं मला कुठे दिसलं नाही.

मयाहुर: पण त्याने काही सिद्ध होत नाही. समजा एका दमलेल्या माणसाला आपण ठार मारला आणि त्याचे हातपाय चिरून पाहिले, तर त्याच्या स्नायूंतला थकवा डोळयांना दिसणार नाहीच. स्नायूंत थकवा असतो तसंच हृदयात मन असणार.

कृतवर्मा: मला अजून पटलेलं नाही. लढाई करतानाचा माझा एक अनुभव सांगतो. शत्रूने माझ्या हृदयावर बाण सोडला तर तो माझ्या हृदयाच्या रोखाने येतो आहे अशी जाणीव मला होते. पण माझ्या डोळयांवर सोडला तर तो माझ्या रोखाने येतो आहे अशी जाणीव होते. म्हणून मला वाटतं की मन हे दोन डोळयांच्या मधोमध डोक्यात असावं, हृदयात नाही.

मयाहुर: ह्या वाटण्यावर मी फार भिस्त ठेवणार नाही. का ते सांगतो. माणसाच्या पाच ज्ञानेंद्रियांपैकी चार, म्हणजे डोळे, नाक, कान आणि जीभ ही निव्वळ योगायोगाने डोक्यात आहेत. पाचवं अंगभर विखुरलेलं आहे. त्यामुळे डोकं फार महत्त्वाचं आहे असं आपल्याला विनाकारण वाटतं. बाण तुला डोळयांनीच दिसत असल्यामुळे डोळयांकडे येताना तो तुझ्याकडे येतो आहे असं वाटतं. पण तुझं मन कुठं आहे याच्याशी त्याचा संबंध नाही. तुझं मन तुझ्या अंडकोषात जरी असतं तरीसुद्धा डोळयांच्या रोखाने येणाऱ्या बाणाची तुला तितकीच भीती वाटली असती.

सीनू: पण मग मेंदूचा उपयोग काय? त्याचा हृदयाशी काही ना काही संबंध असणार. कारण डोक्याला

जोरात लागलं तरी माणूस मरतोच.

मयाहुर: मी यवनांच्या देशात असताना काय ऐकलं ते सांगतो. अशा गोष्टींवर ते सतत चर्चा करत असतात. त्यांचा तर्क असा आहे की संवेदना वाहून वाहून रक्त गरम होतं, आणि ते मेंदूत जाऊन थंड होऊन बाहेर येतं. मेंदूचा उपयोग हा आहे. पण जर मेंदू निकामी झाला तर खूपसं गरम रक्त हृदयात एकदम घुसून मनही निकामी होतं. म्हणून माणूस मरतो.

संजय: इथपर्यंत थोडंसं समजलं. पण मला वर मिळाल्यानंतर ह्यात काय फरक पडला असेल?

मयाहुर: ते मलाही नीट समजलेलं नाही. पण एक सर्वसाधारण तत्त्व म्हणून असं सांगता येईल की काही वस्तू इतर वस्तूंवर लांबवरून प्रभाव पाडू शकतात. चंद्राचा समुद्रावर प्रभाव पडून त्याला फुगवटा येतो, किंवा सूर्याचा गवतावर प्रभाव पडून ते वाळतं. व्यासाने जेव्हा तुला वर दिला तेव्हा तुझ्या कानांवर आणि डोळ्यांवर प्रभाव पाडून ते त्याने जास्त तिखट केले असावेत. म्हणूनच तुला लांबचं ऐकू येतं आणि लांबचं दिसतं. पण असा प्रभाव सगळ्याच वस्तूंचा सरसकट नसतो. सूर्याचा समुद्रावर प्रभाव पडत नाही, किंवा चंद्राला गवत वाळवता येत नाही. वर हा प्रकारही तसाच असावा. विशिष्ट माणसांना विशिष्ट कामीच तो देता येत असणार. कुणीही देऊन उपयोग नाही.

संजय: मला पुरतं कळलं असं वाटत नाही.

मयाहुर: हे पाहा, ह्या सगळ्याचा शक्य तितका सुसंगत अर्थ लावता यावा एवढाच माझा प्रयत्न आहे. तो लागला आहे असं मी म्हणत नाही. आपल्या हातात दुसरं काही आहे का?

कृपाचार्य: ठीक आहे, तूर्तास असं समजू की मयाहुर म्हणतो ते बरोबर आहे. पण मग दुसऱ्या माणसाच्या मनातलं संजयला कसं समजू शकेल? हा काही संजयच्या एका कुठल्या अवयवावर व्यासाने पाडलेला प्रभाव नव्हे. तर संजयचं हृदय आणि दुसऱ्या माणसाचं हृदय ह्यांच्यात संबंध जोडून आणायचा असा हा वेगळ्याच जातकुळीतला प्रश्न आहे. पण तसं कसं करणार?

मयाहुर: ढोबळपणे बोलायचं म्हणजे पिकलेला आंबा कैरीशेजारी ठेवला तर कैरी पिकते तशासारखं काहीतरी हे आहे. संजयचं मन ही कैरी आहे असं समजलं तर ह्या कैरीला असा वर दिलेला आहे की जवळ असलेल्या आंब्यांचं पिकलेपण तू वेगाने आत्मसात करू शकशील. आता ह्यापेक्षा जास्त चांगली उपमा मला

तरी सुचत नाही, कारण उपमेयातच गोंधळ आहे.

संजय: हा वर मिळाल्यापासून तो पडताळून पाहण्याचा मी थोडाफार प्रयत्न केला आहे. माझा निष्कर्ष सांगतो. पिकलेल्या आंब्याशेजारी कैरी ठेवली तर ती पिकते, आणि पिकलेल्या केळ्याशेजारी ठेवली तरीही पिकते. पण तुपाच्या हंड्यात बुचकळली तर पिकत नाही. कैरीच्या सालीत तुपाचा वास शिरून तिची चव फक्त किंचित बदलते. दुसऱ्याचं मन समजावून घेणं हा प्रकार मला काहीसा असाच वाटतो. कधीकधी ते जमतं, पुष्कळदा जमत नाही. जमायचं तर रसायन जुळलं पाहिजे.

मयाहुर: पण हे काही स्पष्टीकरण नव्हे. आपण नुसती उपमा पुढे रेटतो आहोत.

संजय: खरं आहे, पण मी तरी आणखी काय करू शकतो? मघाशीच घडलेला एक प्रसंग आहे, थोड्या विस्ताराने सांगतो. कृतवर्मा आणि मी इथे येत असताना घोड्याला तहान लागल्यामुळे आम्ही थांबलो. आम्हाला पाणी देणारा सैनिक इरावानाच्या सैन्यातला, म्हणजे पांडवांकडून लढणारा होता. तो जातीने भिल्ल आहे आणि पोषाखही तसाच करतो. घोडा पाणी पीत असताना हा माणूस अदबीने माझ्यासमोर उभा होता. एक चाळा म्हणून त्याच्या मनातले विचार समजून घेण्याचा जेव्हा मी प्रयत्न केला तेव्हा माझ्या लक्षात आलं की तो असातसा नसून एक विशिष्ट भिल्ल आहे.

हे कळण्यासाठी तुम्हाला लाक्षागृहाची हकिकत सांगावी लागेल. खूप पूर्वीची म्हणजे पांडवांचं अजून लग्न व्हायचं होतं तेव्हाची गोष्ट. पांडव खूप बलाढ्य होऊ लागल्यामुळे धृतराष्ट्राला वाटू लागलं की त्यांचा काटा काढावा. वारणावतामध्ये त्याने एक लाखेचं घर बांधून घेतलं, आणि पांडवांना कुंतीसह तिथे राहायला पाठवलं.

मयाहुर: मला त्या घराबद्दल खूप कुतूहल होतं, म्हणून ते बांधणाऱ्याला मी शोधून काढून भेटलो. त्याचं नाव आता मी विसरलो, पण तो मूळचा चीनमधला. लाखेला मजबुती आणता यावी याकरिता चतुराई वापरून त्याने वेगवेगळे प्रयोग करून पाहिले होते. त्याच्याशी बोलून मला खूप शिकायला मिळालं. मी हे घर कधी पाहिलं नसल्यामुळे माझी कल्पना होती की ते नुसतं लालेलाल असेल. पण तसं नव्हतं. तो मला म्हणाला की लाखेत कितीतरी रंग आणता येतात. त्या घराच्या दिवाणखान्यात त्याने रेशीमरस्त्यावरच्या वेगवेगळ्या देखाव्यांची भित्तिचित्रं काढली होती. पण नंतर ते सगळं जळाल्याचं ऐकून त्याला फार वाईट वाटलं.

संजय: ते जळण्यासाठीच बांधलेलं होतं. पांडव त्यात राहायला गेल्यानंतर एके रात्री ते पेटवून द्यावं असा दुर्योधनाचा कट होता. पण युधिष्ठिराला हे आधीपासून ठाऊक होतं. त्याने त्या रात्री एक भिल्लीण आणि तिचे पाच मुलगे ह्यांना एकत्र जेवायला बोलावलं आणि सरसकट सगळ्यांना खूप दारू पाजून झोपवलं. रातोरात पांडव कुंतीसह पळून गेले. घर एकदाचं जळाल्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी जी प्रेतं सापडली ती काही ओळखता येण्यासारख्या परिस्थितीत नव्हती. एक बाई आणि पाच पुरुष आहेत इतकंच दिसलं, तेव्हा दुर्योधन खूष झाला. पांडव जिवंत आहेत हे त्यानंतर कित्येक दिवस त्याच्या लक्षात आलं नाही.

कृतवर्मा: त्यावेळी पांडवांना खूप यातायात झाली म्हणतात. हवी तशी बाई मिळायला फार शोधावं लागलं. एका बाईला पाच मुलगे होते पण ती दारू पिणाऱ्यातली नव्हती. दुसरी एक दारू पिणारी मिळाली पण तिला तीनच मुलगे होते. तिसरी एक दारूबाज होती आणि तिला पाच मुलगेही होते पण त्यांतला एक थोटा निघाला. जळाल्यानंतर एका प्रेताचा हात संशयास्पद दिसला असता, आणि पांडवांना तो धोका पत्करायचा नव्हता. एक ना दोन. पण शेवटी जमलं.

संजय: तर मला भेटलेला सैनिक म्हणजे त्या दिवशी जळून मेलेल्या भिल्लिणीचा नवरा. त्या रात्री तो शिकारीला गेलेला होता आणि मचाणावरच झोपला होता. आल्यानंतर त्याला सगळी हकिकत कळली. त्याच्या मनात मला दिसलं ते असं की शेजारच्या गावात त्याने दुसरी एक भिल्लीण ठेवलेली होती. जुनी बायको दारू पिऊन कजागपणा करत असे आणि पोरंही त्याच नादाला लागलेली होती. त्यांना पैसा पुरवून पुरवून बापाच्या कमरेचा काटा ढिला झालेला होता. हे लोढणं रातोरात आपसूक गळ्यातून उतरल्यामुळे तो भलताच खूष झाला, आणि आठवडाभरातच राजरोस दुसरीबरोबर राहायला गेला. पांडवांचे उपकार मानून तो आता त्यांच्या बाजूने लढतो आहे.

ह्या भिल्लाच्या जागी मी असतो तर बायकामुलं मेल्याचं मला प्रचंड दु:ख झालं असतं. त्याला ते थोडंसुद्धा झालेलं नाही. माझ्या मनात पांडवांविरुद्ध प्रचंड सूडाची भावना असती. ती त्याच्यात थोडीसुद्धा नाही. ह्या भिल्लाचं मन मला अगम्य वाटलं. मी कैरी असेन तर तो तुपाचा हंडा आहे. वरून वास लागेल पण आतल्या गराचं तूप होणार नाही. माझ्या आजूबाजूला असे तुपाचे हंडे खूप आहेत आणि पिकलेले आंबे थोडेच आहेत. व्यासाला हे आधी कळायला हवं होतं, पण अघळपघळ वर देऊन तो मोकळा झाला आहे.

कृतवर्मा: मी तर म्हणतो की व्यासाला काय अभिप्रेत होतं हे तुला समजलेलं नाही याचाच अर्थ वर फसला आहे. कारण नाहीतर त्याचं मन तुला समजायला हवं होतं. तो स्वत: तुपाचा हंडा नव्हे तर कुजलेल्या मासळीची टोपली आहे. त्याचा वाससुद्धा न लागलेला बरा.

मयाहुरः हे पाहा, व्यासावर तरी आपण कशाला इतकी धार धरायची? माणूस हुशार आहे म्हणतात, पण ह्या प्रांतात तोही चाचपडत असणार. तुम्हाला मी मघाशी म्हणालोचः यवनांना ह्या विषयाचा कधी कंटाळा येत नाही. मन कशाचं बनलेलं असतं, त्यात विचार कसे येतात, मनाला गोष्टी लक्षात कशा राहतात आणि विसरतात कशा, बायकांचं मन वेगळं असतं का, अशा मुद्द्यांवरून त्यांच्याकडे खूप धुमश्चक्री चालते. कुणाच्या मतात कुठे भेग आहे ह्याची डोळ्यात तेल घालून छाननी होते. पण इतकं करूनही त्यांना स्वच्छ उलगडा कशाचाच झालेला नाही.

माझा एक अनुभव सांगतो. तिथले लोक 'सुराशार समुद्र' असं खूपदा म्हणतात. हा शब्दप्रयोग त्यांच्या नाटकांत येतो, कवितांत येतो. मला चमत्कारिक वाटला. समुद्र निळाशार असेल, काळाशार असेल, पण सुराशार कसा असेल? एकतर त्यांची सुरा जगावेगळी नसते. वेगवेगळ्या द्राक्षांपासून बनवलेली सुरा इथे जशी वेगवेगळ्या प्रकाशांत वेगवेगळी दिसते तशीच त्यांच्याहीकडे दिसते. त्यांचा समुद्र दिसायला जगावेगळा नसतो. वेगवेगळ्या प्रकाशांत जसा भारतातला समुद्र वेगवेगळा दिसतो तसाच त्यांच्याहीकडे दिसतो. म्हणून माझ्या ओळखीतल्या कितीतरी यवनांना मी खोदून खोदून विचारलं की 'सुराशार समुद्र' म्हणजे काय? पण सगळ्यांना मान्य होईल असं एकच एक उत्तर मला काही मिळालं नाही. काहीजण म्हणाले की मावळतीच्या समुद्राचा रंग सुरेसारखा दिसतो. काहीजण म्हणाले की समुद्राकडे पाहिल्यावर जो एक गहिरा खिन्न भाव मनात येतो तो सुरा प्यायल्यावरही येतो. रंगाशी त्याचा संबंध नाही. काहीजण म्हणाले की हा शब्दप्रयोग कवितेत ऐकायला छान वाटतो आणि वृत्तात घट्ट बसतो म्हणून आम्हाला तो आवडतो, पण त्याला नक्की असा अर्थ नाही. म्हणजे 'सुराशार समुद्र' असं जेव्हा दोन यवन एकमेकांसमोर म्हणतात तेव्हा त्यांना बहुतेक वेळा परस्परांचं मन समजलेलं नसतं. पण हे ठाऊक असूनही ते म्हणतातच याचा अर्थ त्यांना त्याची विशेष पर्वाही नसते. तसंच दामटून नेतात पण बिघडत काही नाही.

कृपाचार्यः एखादा यवन पकडून इथेच आणला पाहिजे. संजयचं हे मनसामुद्रिक त्याच्यावर कितपत चालेल ते बघायची मला फार उत्सुकता आहे.

संजयः मला तर काहीच समजणार नाही, कारण मी कधी समुद्र पाहिलेला नाही. इंद्रप्रस्थ आणि हस्तिनापुराच्या पंचक्रोशीबाहेर मी अजून पडलेलो नाही.

सीनूः म्हणतोस काय?! संजया, तुझं आयुष्य नुस्तं वाया चाललं आहे! समुद्र बघितल्याखेरीज माणसाचं खरं नाही. मघाशी मी म्हणाले ते धंद्यातल्या भागीदारीचं वगैरे राहू दे. हे सगळं संपलं की तू माझ्याबरोबर

समुद्र पाहायला चल. एकदा बघितलास की विसरणार नाहीस.

कृतवर्मा: सीनू, 'सगळं संपलं' हा शब्दप्रयोग करून माझा अंत पाहू नकोस. हा पटांगणातला प्रकार कुठवर आला आहे? आधी तो संपल्याखेरीज सगळं कसं संपेल?

कृपाचार्य: माझ्याही मनात तोच प्रश्न होता. कितवा अध्याय सुरू आहे?

संजय: नववा आत्ताच सुरू झाला आहे.

सीनू: नऊ दुणे अठरा. हात्तिच्या! म्हणजे निम्मासुद्धा काथ्या अजून कुटून झालेला नाही. अजून खूप वेळ जायचा आहे!

कृतवर्मा (भुवया आक्रसत): हो. जायचा आहे खरा. पण तो जाणार कसा?

सीनू: तर माझा प्रस्ताव ऐका. आत्ताच्या आपल्या चर्चेचं सार काय होतं? हेच की माणसांना एकमेकांचं मन समजणं अवघड जातं. याहीपुढे जाऊन मी म्हणते की दुसऱ्याचंच काय तर स्वत:चंही मन स्वत:साठी अंधाऱ्या फडताळासारखं असतं. तिथे शोधल्यावर काय सापडेल ह्याचा आधी अंदाज नसतो आणि जे सापडतं ते नकोसं वाटतं. अर्जुनाचं तुम्ही बघताच आहात. तर ह्या विषयावरची एक छोटेखानी गोष्ट माझ्याकडे आहे. बाबीलमध्ये ती मी ऐकली आणि लगोलग लिहून घेतली. तुम्हाला ऐकायची असेल तर वाचून दाखवते. वेळ छान जाईल.

कृपाचार्य: मी तयार आहे.

कृतवर्मा: मीही तयार आहे.

सीनू: मग थांबा, मी आलेच. (उठून गाड्याकडे जाते आणि एक चोपडी घेऊन येते.) तर ऐका! गोष्टीचं नाव आहे 'समद्विभुजा.'

कृतवर्मा: समद्विभुजा?

सीनू: समद्विभुजा.

(गोष्ट वाचली जात असताना आपलं लक्ष नाहीसं दाखवत मयाहुर शून्यात नजर लावून बसला आहे.)

समद्विभुजा

दमास्कस शहरामध्ये सायरस आणि घनीम हे दोघे तरुण मित्र राहत होते. एकमेकांना वरचेवर भेटल्याखेरीज त्यांना चैन पडत नसे, आणि गप्पा मारण्यात त्यांचे तासनतास खर्च होत असत.

एके दिवशी अथीना नावाच्या एका देखण्या मुलीशी सायरसची ओळख झाली. दोघे पटकन प्रेमात पडले, आणि ह्यानंतर लवकरच त्यांनी लग्न करून एक टुमदार घर घेतलं. सुरवातीच्या काही दिवसांत घनीम दोघांना भेटून जात असे, पण हळूहळू तो येईनासा झाला. सायरस म्हणाला, “बाबारे, आपली दोघांची इतक्या वर्षांची मैत्री आहे. ती इतक्या सहजासहजी अडगळीत टाकणं तुला कसं जमतं?” यावर घनीम म्हणाला की मला मैत्री नको आहे असं नाही, पण लग्नानंतर तरुण जोडप्याला आपल्यात तिसरं कुणी नसावंसं वाटतं. म्हणून मी चार हात लांब राहतो आहे. आणि त्याखेरीज अथीना चारचौघांत उठून दिसण्यासारखी असल्यामुळे तिऱ्हाइताने तुमच्या घरी वारंवार येणं प्रशस्त नव्हे. ह्यावर सायरस म्हणाला की तू असा ग्रह करून घेऊ नकोस. तू आपला येत जा. तुझ्याशी बोलल्याखेरीज मला बरं वाटत नाही.

एके दिवशी ठरवून सायरस घनीमला घराबाहेर भेटला. तो म्हणाला, “मी तुला इथे बोलावलं ह्यामागे तसंच कारण आहे. अथीना माझ्यावर प्रेम करते आणि ती माझ्याशी एकनिष्ठ आहे याबद्दल माझी पक्की खात्री आहे. परंतु तिच्या निष्ठेची पुरेशी कसोटी लागली आहे असं मला वाटत नाही. कदाचित फारसे पुरुष तिने जवळून पाहिलेले नसल्यामुळे तिला मी आवडलो आणि तिने माझ्यापलीकडे विचार केला नाही असं शक्य आहे. एखाद्या गबाळ्या माणसावर ती लट्टू होणार नाही हे मान्य. पण सरासरीच्या खूपच वरचा असा कुणी तरुण जर तिच्याकडे लक्ष पुरवू लागला तर तिच्या मनात चलबिचल होणार नाही याचा काय भरवसा आहे? तेव्हा माझी इच्छा अशी आहे की तू तिच्याकडे प्रेमयाचना करून पाहावीस.” हे ऐकून घनीम अवाक झाला. तो म्हणाला, “अशी विषाची परीक्षा बघणं हा शुद्ध वेडेपणा आहे. आणि मी असं करणं हा अथीनाचा अपमान नाही का होणार?” ह्यावर सायरस म्हणाला की काही बायकांना गरोदर असताना लाकूड, चिखल, खडू असल्या विचित्र गोष्टींची खावखाव सुटते. त्यावर काही इलाज नसतो. माझी तशीच अवस्था आहे असं समज. ही चाचणी मला घेऊन बघायचीच आहे, तेव्हा माझी तेवढी एक हौस तू पुरी कर. पण घनीम ह्याला तयार होईना. तेव्हा सायरस खिशात हात घालून म्हणाला की आपण

नाण्याचा कौल घेऊन बघू. जर एनकिडू आला तर तू माझ्या मनासारखं कर, आणि सिंह आला तर मी माझा हट्ट सोडून देईन. ह्यामागचा सांकेतिक अर्थ स्पष्ट आहे. एनकिडू आणि गिलगामेश यांची मैत्री प्रसिद्ध आहे, तेव्हा एनकिडू आला तर तू तुझ्या मित्राचं म्हणजेच माझं ऐकायला हवंस. ह्याउलट सिंह हा निष्क्रिय प्राणी असल्यामुळे तो आला तर आपण सध्याची परिस्थिती बदलू नये असा त्याचा अर्थ होईल. घनीम याला कसाबसा तयार झाला. सायरसने नाणं वर उडवलं, ते खाली पडताच एनकिडू दिसला. सायरस घनीमला म्हणाला की उद्याच तू चाचणीला सुरुवात कर.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी जेव्हा घनीम ह्या जोडप्याला भेटायला आला तेव्हा सायरस त्यांना म्हणाला की काही तातडीच्या कामासाठी मला बाहेर जाऊन यावं लागेल, तोपर्यंत तुम्ही बोलत बसा. कुणाला काही प्रत्युत्तर करण्याची सवड न देताच तो तडकाफडकी निघून गेला. प्रत्यक्षात तो घराला एक वळसा घालून किल्लीच्या भोकातून बघत बसला होता. यानंतरच्या दिवशी जेव्हा घनीम आणि सायरस भेटले तेव्हा घनीम म्हणाला की मी तुझ्या म्हणण्याप्रमाणे अथीनाकडे प्रेमयाचना करून पाहिली पण तिने मला मुळीच दाद दिली नाही. यावर सायरस म्हणाला की तू खोटं बोलू नकोस. माझ्यावरच्या प्रेमापोटीच तू खोटं बोलतो आहेस हे मला ठाऊक असलं तरीसुद्धा बोलू नकोस. मी घर सोडताक्षणीच तू आरामखुर्चीत झोपून गेलास आणि माझी चाहूल लागताच खडबडून उठलास हे मला चांगलं ठाऊक आहे. तू मला शब्द दिलेला आहेस, तेव्हा पुन्हा रीतसर आणि निकराचा प्रयत्न करून बघ. या फंदात कुठून पडलो असं घनीमला वाटत राहिलं, पण आता वेळ निघून गेलेली होती. पण त्याने विचार असा केला की हे सगळं संपल्यानंतर मी अथीनासमोर सफाई देऊन तिची सपशेल माफी मागेन. त्यामुळे ह्या प्रकरणावर पडदा पडेल आणि सारं काही पूर्वीसारखं होईल.

त्या दिवसानंतर ही ना ती सबब सांगून सायरस सतत प्रवासावर जाऊ लागला, जेणेकरून घनीमला पुरेसा वेळ मिळावा आणि हा प्रयोग नीट राबवता यावा. त्याच्या ह्या वागणुकीमुळे अथीना बुचकळ्यात पडली. घनीम तिला भेटत राहिला, आणि आपल्या नवऱ्याचा मित्र म्हणून ती त्याचं आदरातिथ्य करत राहिली. घनीमने असं ठरवलं की प्रेमयाचनाच जर करायची तर ती कशीबशी उरकून घेण्यापेक्षा नीट करावी. ह्या त्याच्या बेतानुसार तो अथीनाकडे भरभरून लक्ष देऊ लागला. अथीनाने आपल्या नवऱ्याला एकदा हे बोलून दाखवलं की घनीम माझ्याशी फार संशयास्पद वागतो आहे, आणि मला काही हे आवडत नाही. सायरसला कळून चुकलं की घनीमने चाचणी मनावर घेतलेली आहे. तो अथीनाला म्हणाला की मला कामासाठी बाहेरगावी जावं लागत असल्यामुळे घनीमला एकटं वाटत असेल, म्हणून तो आपल्या घरी येतो. त्याला तू दूर लोटू नकोस. स्वत:च्या वागण्यात सायरसने तसूभरही फरक केला नाही, आणि पूर्वीसारखाच तो वारंवार शहर सोडून जात राहिला.

घनीम येतच राहिला. तो दिसायला उमदा असल्यामुळे आणि बोलण्यात चतुर व कोटिबाज असल्यामुळे हळूहळू अथीनाच्या मनाचा कल त्याच्या दिशेने होऊ लागला. ती स्वत:शी असं म्हणाली की माझ्या नवऱ्याचं बहुतेक काहीतरी प्रकरण आहे आणि म्हणूनच तो नेहमी बाहेर असतो. त्याला जर माझ्याबद्दल काही वाटत नसेल आणि हा इतका छान माणूस जर माझ्या प्रेमात असेल तर मी नाही का म्हणावं? आणि अशा रीतीने अथीना घनीमला वश झाली. घनीमला हे पूर्णपणे अनपेक्षित होतं, पण सायरसला ते सांगितल्यामुळे त्याला दु:खच होईल अशा विचाराने तो काही बोलला नाही. सायरसला तो म्हणाला की तुझी बायको तुझ्याशीच एकनिष्ठ आहे, आणि माझ्या प्रियाराधनामुळे संतापून जाऊन तिने मला तुझ्या घरी यायची बंदी केलेली आहे.

एके दिवशी सायरस शहर सोडून गेलेला असताना घनीम अथीनाच्या घरी आला. पण सायरस प्रत्यक्षात गेलेलाच नव्हता तर आपल्याच घराच्या दिवाणखान्यावर बाहेरून पाळत ठेवून होता. अथीना घनीमचं चुंबन घेताना त्याला नेमकी दिसली. ह्या वेळी घनीम पाठमोरा असल्यामुळे सायरस तिथे असल्याचं त्याला कळलं नाही, पण अथीनाला मात्र सायरस तिच्याकडे पाहताना ओझरता दिसला. तिने आपल्याला पाहिलं आहे हे सायरसच्या लक्षात आलं नाही. सायरस जेव्हा परत आला (अर्थात तो खरा गेलेला नव्हताच) तेव्हा पोटात बाकबूक होते आहे अशा अवस्थेत अथीनाने त्याचं स्वागत केलं. आता कोणत्याही क्षणी तो आपल्याला जाब विचारणार ह्या भीतीमुळे अथीनाचं मन तिला खाऊ लागलं. पण प्रत्यक्षात जेव्हा तसं काहीच झालं नाही, तेव्हा आता कसं वागावं हे अथीनाला समजेना. तिने तर्क असा केला की सायरस स्वत: बाहेरख्याली असावा आणि या गोष्टीची शरम वाटत असल्यामुळे बायकोला जाब विचारण्याची त्याची हिंमत होत नसावी. आपली प्रतारणा सायरसला ठाऊक असल्याचं तिने घनीमला सांगितलं नाही. ती सायरसला म्हणाली की घनीम माझ्याशी संशयास्पद वागतो आहे असं जे मी पूर्वी बोलले होते तो माझाच गैरसमज होता, प्रत्यक्षात तसं काही नाही.

एक व्यक्ती म्हणून घनीमला अथीना आवडत असली तरीदेखील तिच्यावर त्याचं प्रेम नव्हतं. पण सायरसच्या वागण्यामुळे ती अधिकाधिक दु:खी झालेली पाहून तिला सोडून देणं त्याला आता शक्य राहिलेलं नव्हतं. खोटं भांडण काढून आपण अथीनाला तोडून टाकण्याचा प्रयत्न केला तर तिला आणखी वाईट वाटेल ह्या कल्पनेने तो हतबल झाला. आपण पुरते फसलो ही भावना त्याच्या मनात बळावत चालली.

एके दिवशी संध्याकाळी सायरसने घनीमला निरोप पाठवला की अथीना बाजारहाट करायला गेलेली आहे,

तेव्हा तू घरी यायला हरकत नाही. घनीम आला. तो सायरसला म्हणाला की मला थोडाच वेळ थांबता येईल, कारण अथीनाने मला इथे बघितलं तर डोक्यात राख घालून ती मला हाकलून देईल. एक बाब तुला आवर्जून सांगायची आहे ती अशी की ही सत्वपरीक्षा आता आपण दोघांनी निष्कारण ताणू नये. तुझ्या बायकोची तुझ्यावरची निष्ठा अढळ आहे याबद्दल मला खात्री कधीचीच होती, पण तुझ्याही मनातला किंतू आता तू कायमचा सोडून द्यायला हवास. तिला तू सगळा बनाव सांग, त्यानंतर आपण दोघेही तिची क्षमा मागू आणि पूर्वीसारखे राहायला लागू. ह्यावर सायरसने खिशातून सुरा बाहेर काढला आणि चवताळून तो घनीमच्या अंगावर धावून गेला. घनीम जास्त चपळ असल्यामुळे त्याने सायरसकडून सुरा हिसकावून घेतला, पण हातापायीमध्ये सायरसला वर्मी जखम झाली. घनीम घाबरून गेला, आणि पळ काढण्याच्या बेतातच होता तेवढ्यात अथीना हजर झाली. ती घनीमला म्हणाली की इथे थांबलास तर तुला शिपाई धरून नेतील. आणि मलाही आता ह्या घरात राहणं जिवावर आलेलं आहे. तेव्हा तू मला घेऊनच चल. नाही म्हणणं घनीमला शक्य नव्हतं. खर्चाला पैसे असावेत म्हणून त्याने बेशुद्ध पडलेल्या सायरसच्या खिशातलं एकुलतं एक नाणं हस्तगत केलं. जीव मुठीत धरून दोघेही रातोरात शहराबाहेर पळाले.

दुसऱ्या दिवशी रस्त्यालगतच्या एका भटाऱ्याकडून घनीमने पाव विकत घेतला. खिशात घातलेला हात बाहेर काढताच त्याच्या लक्षात आलं की नाण्याच्या दोन्ही बाजूंना एनकिडू आहे. परंतु नाण्यात चांदी असल्यामुळे भटाऱ्याने ते किंमत पाडून का होईना पण घेतलं.

अथीना आणि घनीम ह्यांना घर करावं लागलं. सायरसने त्या दोघांना चोरून बघितल्याचा प्रसंग अथीनाने जेव्हा घनीमला सांगितला, तेव्हा सायरस का संतापला हे त्याला कळून चुकलं. मात्र ह्या संपूर्ण प्रकरणाची सुरुवात कशी झाली ह्याबद्दल तो अथीनाकडे अवाक्षरही बोलला नाही. तिला आनंदात ठेवण्याचा तो यथाशक्ति प्रयत्न करू लागला, आणि आपल्या चतुर बोलण्याचं प्रमाण त्याने वाजवीपेक्षा जास्तच वाढवलं. पण दिवसांगणिक घनीमचा उमदेपणा कमी झाला होता, आणि जो कोटिक्रम अथीनाला आधी आवडत असे तो सतत ऐकावा लागल्यामुळे कंटाळा येत चालला होता. घनीमचं आपल्यावर प्रेम नाही हे अथीनाला लवकरच कळून चुकलं, पण त्याने तशी बतावणी का करावी हे मात्र तिला कधी कळलं नाही. इतक्या चांगल्या माणसाला सापळ्यात अडकल्यासारखं वाटावं ह्याला आपण काही अंशी कारणीभूत झालो ह्या भावनेने ती कायमची दु:खी झाली. आपली जी मैत्रिण होती ती प्रेयसी असल्याचं ढोंग करून तिला आपण फसवलं आणि स्वत:देखील फसलो ह्या भावनेने घनीमही कायमचा दु:खी झाला. ज्या व्यक्तीवर आपलं प्रेम नाही तिच्याबरोबर आयुष्य काढण्याचा प्रसंग अशा प्रकारे दोघांवर येऊन ठेपला. परंतु संसार तसाच पुढे ढकलत राहण्याव्यतिरिक्त त्यांच्यासमोर पर्याय उरलेला नव्हता.

सायरसची जखम हळूहळू बरी झाली. पण त्याला दारूची सवय लागली आणि लवकरच तो कफल्लक झाला. चिडचिडेपणा हा त्याचा स्थायीभाव बनला, आणि स्त्रीजातीविषयीचं त्याचं मत कायमचं बिघडून गेलं.

❒

कृपाचार्य: गोष्ट आवडली. 'तिघेही सुखी होते' पासून 'तिघेही दुःखी झाले' पर्यंतचा प्रवास गंमतीचा आहे. अर्थात गोष्ट ऐकणाऱ्यासाठी गंमतीचा आहे, त्यातल्या पात्रांसाठी गंमतीचा नाही.

कृतवर्मा: गोष्टीमागची कल्पना मला अशी दिसते की पांढऱ्या रंगाचा एक समद्विभुज त्रिकोण होता, आणि तो मधोमध उंचीवर पलटवताच त्याचा काळा त्रिकोण झाला. अथीना हा त्रिकोणाचा शिरोबिंदू आहे आणि दोघे पुरुष हे तिच्यापासून समान अंतरावर असलेले पायाचे दोन बिंदू आहेत. आधी तिची एका बिंदूशी जोडी होती, ती तुटून दुसऱ्या बिंदूशी झाली. हा संकेत गोष्टीतच आहे, कारण नाणं पलटवलं तरी एनकिडूचा एनकिडूच राहतो. काटेकोर विचार करणाऱ्या कुणीतरी ही गोष्ट रचलेली आहे.

कृपाचार्य: मयाहुरा, तू काहीच कसा बोलत नाहीस? गोष्ट तू पूर्वी वाचली होतीस की काय?

सीनू: तो लाजतो आहे. गोष्ट त्यानेच लिहिलेली आहे. बाबील वगैरे ती माझी थाप होती.

संजय: हे मला आधीच ठाऊक होतं, पण म्हटलं आपण कशाला बोला?

सीनू: अरे हो! तुला समोरच्याचं मन वाचता येतं नाही का? मी विसरलेच होते. पण ह्याचा अर्थ तुला गोष्टीत काय होणार हे आधी कळलं असेल.

संजय: नाही. माणसांच्या मनातलं ओळखताना जिथे पुरेवाट होते, तिथे गोष्टीतल्या माणसांच्या मनातलं ओळखणं शक्य नाही. मी गोष्टीच्या आत असतो तर वेगळं होतं. मग अथीनाला आधीच सगळं सांगून सावध केलं असतं.

❒

(‘अरे, तिकडे बघा!’, ‘कुठे?’, ‘तिथे समोर बघा!’, ‘दिसतंय का?’, ‘काय झालं?’, ‘काही कळत नाहीय’ असे आवाज अचानक चोहोबाजूंनी येऊ लागतात. सीनू उठून मागे पळत जाते. अनेक सैनिक तिच्या गाड्यावर चढून एकटक दूरवर पाहताहेत. इतर काही सैनिक त्यांच्या खांद्यावर चढले आहेत.)

सीनू: अरे, आधी खाली उतरा बघू! माझा गाडा मोडाल तुम्ही. (सैनिक दाद देत नाहीत.) अरे, उतरा म्हणते ना! माझा धंदा बंद पडला तर अफूच काय फुटाणेदेखील मिळायचे नाहीत.

(हे ऐकून सैनिक नाईलाजाने खाली उतरू लागतात.)

कृतवर्मा: काय झालं?

एक सैनिक: अर्जुन उताणा पडून एकटक सूर्याकडे बघतो आहे. त्याला उर्ध्व लागला आहे. मोठे गोपाळ ओणवे होऊन उजव्या हाताचा तळवा त्याच्या डोळ्यांसमोरून फिरवताहेत.

कृपाचार्य: हा पुन्हा ढेपाळलेला दिसतोय! आता मात्र युद्ध होत नाही एवढं नक्की आहे. कुणीतरी त्याला बाजूला घेऊन जा म्हणावं, आणि आम्हाला रीतसर मोकळं करा. आम्ही आपापल्या घरी जाऊ.

संजय: मी बघतो काय चाललंय ते. (भुवया कुस्करत मन एकाग्र करतो.) काहीतरी विचित्रपणा चालू आहे. मलाही नीट समजत नाहीय.

(सीनू गाड्याकडे जाऊन पाहणी करते आहे.)

सीनू: मेल्यांनी गाड्याचं चाक पार जमिनीत रुतवलं. आता हे काढणार कसं? (सैनिकांना) काय रे ए शिंदळीच्यांनो, मी तुमच्यासाठी इतकं ओझं वाहते त्याचे असे पांग फेडता का?

(सैनिक ओशाळे होऊन चाक बाहेर काढायचा प्रयत्न करतात, पण त्यांना फारसं यश येत नाही.)

एक सैनिक: जमीन ओलसर आहे. जितकं ओढावं तितकं चाक आतच चाललं आहे.

सीनू: माझ्यावरचा शाप भोवला ग!

कृतवर्मा: तुला कोण शाप देईल बाई? इतके लोक तुझ्यावर प्रेम करतात.

सीनू: मला भूमातेचा शाप आहे हो!

कृपाचार्य: भूमाताने तुला का म्हणून शाप द्यावा?

सीनू: खूप वर्षांपूर्वी रेशीमरस्त्यावर घडलेली गोष्ट आहे. मी गाडा ओढत चालले होते. रस्त्याच्या कडेला एक म्हातारा रडताना दिसला. जवळ जाऊन बघितलं तर तो झिंगलेला होता. मला म्हणाला की सोमरसाचा एक बुधला मी सकाळी विकत घेतला होता. अर्धा लगेच प्यायलो आणि अर्धा रात्रीसाठी ठेवला होता. पण चालताना अडखळलो आणि सगळा सांडून गेला. नवा घ्यायला माझ्याकडे पैसे नाहीत. मी त्याला म्हणाले की रडू नकोस. जिथे सांडला होता तिथली माती मी गोळा केली, हंडाभर पाण्यात घातली आणि एका तलम रेशमी शेल्यातून ते मिश्रण गाळून घेतलं. माती शेल्यात राहिली आणि सोमरस पाण्याबरोबर खाली आला. चव गेलेली होती पण म्हाताऱ्याला काही फरक पडत नव्हता. मला दुवा देऊन तो निघून गेला. पण भूमातेच्या वाट्याचा सोमरस मी चोरून घेतला म्हणून मला शाप लागला. तिनेच माझं चाक गिळलं आहे.

(सैनिक निकराचा प्रयत्न करताहेत. 'अश्वत्थाम्याला बोलवा. त्याला नक्की जमेल. अश्वत्थाम्याला बोलवा' असा ओरडा होतो. सीनूने गाड्यातलं एक मडकं बाहेर आणलं आहे. ती धुळीत गुडघे टेकून बसते आणि क्षमायाचना पुटपुटत मडकं हळूहळू जमिनीवर रिकामं करते.)

सीनू: माते, क्षमा कर! तू आधार दिला नाहीस तर माझा गाडा चालायचा नाही. तू बाई आहेस, मी बाई आहे. मला मदत कर.

मयाहुर (अर्धवट स्वगत आणि अर्धवट इतरांना उद्देशून): युधिष्ठिराचा रथ जमिनीपासून दोन बोटं वर हवेत चालतो. असं का असावं ह्याची वेगवेगळी स्पष्टीकरणं मी ऐकली आहेत. काहीजण म्हणतात की तो पुण्यवान असल्यामुळे त्याला मिळालेलं हे बक्षीस आहे. काहीजण म्हणतात की आपण जगापासून अलिप्त आहोत असं दाखवण्याचा त्याचा हा मार्ग आहे. सीनूला पुण्यवान कुणी म्हणणार नाही आणि जगाला इतकी लिप्त असलेली बाई दुसरी मिळणार नाही. पण अशी सोय करून घ्यायची गरज तिलाच जास्त आहे, कारण मग चिखल असला किंवा जमीन भुसभुशीत असली तरी तिचा गाडा रुतणार नाही. ह्या

युद्धातून एकदाचा बाहेर पडलो की तसं काही करता येतं का ह्यावर मी विचार करणार आहे.

(‘अश्वत्थामा येतो आहे, वाट द्या!’ असा ओरडा होतो. ‘आला, आला’ असे आवाज येतात, आणि मग ‘बाजूला व्हा. जागा करा. आस्ते! शाबास’ असे आनंदोद्गार ऐकू येतात. स्वत:ची प्रचंड ताकद लावून अश्वत्थामा चाक बाहेर काढतो, आणि काही अंतर गाडा ओढत नेऊन एका कातळावर अलगद ठेवून देतो. सीनूचे डोळे पाण्याने भरले आहेत.)

सीनू (अश्वत्थाम्याला): अरे, वा! वा! माझं खूप मोठं काम केलंस तू!

अश्वत्थामा: मला सवय आहे. इथे येण्यापूर्वी हे माझ्यासाठी नेहमीचं होतं.

सीनू: बस. विश्रांती घे. (अश्वत्थामा खाली बसतो. सारेजण त्याच्याकडे टक लावून पाहताहेत.)

कृपाचार्य: कपाळावरची जखम बरी आहे का आता?

अश्वत्थामा: बरी आहे. पण अधूनमधून दुखते.

सीनू: पाणसापाच्या रक्तात शतावरीचा मध घालून केलेली एक दवा माझ्याकडे आहे. थोडीथोडी लावत राहिलास तर नक्की गुण येईल.

अश्वत्थामा: नको. इतकी जुनी जखम जायची नाही. मी आहे तोपर्यंत ती आहे.

❒ ❒

अंक दुसरा

(कुरुक्षेत्राच्या धुळीमध्ये, गेल्या अंकातले संवाद जिथे झाले त्याच्याच जवळपास, अंदाजे वीस हात व्यासाचं एक गोलाकार रिंगण आखण्यात आलेलं आहे. दाटीवाटी करून उभ्या असलेल्या सैनिकांनी त्याचा परीघ वेढलेला दिसतो. रिंगणाच्या मधोमध अश्वत्थामा एकटा बसला आहे, आणि आजूबाजूला कोणीसुद्धा नसून आपलेच आपण विचारात गढलो आहोत असा अभिनय करतो आहे.

कृपाचार्याने डोळयांवर काळ्या रंगाच्या रेशमी रुमालाची पट्टी बांधली आहे. रिंगणात शिरून तो अश्वत्थाम्याच्या पाठीवर चढतो आणि त्याचा कान कुरवाळतो.)

कृपाचार्य: हत्ती सुपासारखा असतो.

(सैनिक खिदळतात. कृपाचार्य खाली उतरतो आणि रिंगणाच्या कडेला येऊन स्तब्ध उभा राहतो. संजयने डोळयांवर पांढऱ्या रंगाच्या रेशमी रुमालाची पट्टी बांधली आहे. रिंगणात शिरून तो अश्वत्थाम्याचा पाय चाचपडतो.)

संजय: हत्ती तुळईसारखा असतो.

(सैनिक खिदळतात. संजय बाजूला होऊन कृपाचार्याच्या डावीकडे स्तब्ध उभा राहतो. मयाहुराने डोळयांवर तांबड्या रंगाच्या रेशमी रुमालाची पट्टी बांधली आहे. रिंगणाच्या मध्यभागी जाऊन तो अश्वत्थाम्याच्या ढुंगणावर हाताने थापटतो.)

मयाहुर: हत्ती दगडासारखा असतो.

(सैनिक खिंकाळतात. मयाहुर बाजूला होऊन संजयच्या डावीकडे स्तब्ध उभा राहतो. सीनूने डोळयांवर हिरव्या रंगाच्या रेशमी रुमालाची पट्टी बांधली आहे. रिंगणाच्या मध्यभागी जाऊन ती अश्वत्थाम्याची शेपटी ओढते.

सीनू: हत्ती सापासारखा असतो.

(सैनिक खिदळतात. सीनू बाजूला होऊन मयाहुराच्या डावीकडे स्तब्ध उभी राहते. कृतवर्म्याने डोळ्यांवर पिवळ्या रंगाच्या रेशमी रुमालाची पट्टी बांधली आहे. रिंगणाच्या मध्यभागी जाऊन तो अश्वत्थाम्याच्या दातावर आपला हात घासतो.)

कृतवर्मा: हत्ती भाल्यासारखा असतो.

(सैनिक खिदळतात. कृतवर्मा बाजूला होऊन सीनूच्या डावीकडे स्तब्ध उभा राहतो. कृपाचार्य, संजय, मयाहुर, सीनू आणि कृतवर्मा हळूहळू अस्वस्थपणे हलू लागतात. नीट दिसत नसल्यामुळे त्यांना एकमेकांचा अडथळा होऊ लागतो आणि अस्वस्थता वाढत जाते. आता पाचहीजण घोळका करून एका ठिकाणी जमतात आणि एकमेकांशी भांडण करण्याचा मूकाभिनय करू लागतात. सैनिक मोठ्याने खिदळताहेत. भांडण विकोपाला पोहोचताच अश्वत्थामा उठून उभा राहतो, आणि सोंड पुढे काढून एकेकाच्या रुमालाची गाठ मागून सोडवत जातो. पाचहीजण मागे वळून अश्वत्थाम्याकडे चकित होऊन पाहिल्याचा अभिनय करतात.)

कृपाचार्य: अरेच्चा! आता समजलं! अख्खा हत्ती सुपासारखा नसतो.

संजय: मलाही समजलं! अख्खा हत्ती तुळईसारखा नसतो.

मयाहुर: मलापण समजलं! अख्खा हत्ती दगडासारखा नसतो.

सीनू: मलासुद्धा समजलं! अख्खा हत्ती सापासारखा नसतो.

कृतवर्मा: मलादेखील समजलं! अख्खा हत्ती भाल्यासारखा नसतो.

(पाचहीजण एकमेकांची गळाभेट घेतात.)

अश्वत्थामा: सैनिकांनो! ह्या प्रसंगातून तात्पर्य निघतं ते असं की हत्ती सुपासारखा, तुळईसारखा, दगडासारखा, सापासारखा आणि भाल्यासारखा अंशाअंशाने जरी असला तरी पुरता नसतो. आणि म्हणूनच कोणत्याही गोष्टीबद्दल मत बनविण्यापूर्वी तिचा सर्वांगीण विचार करा. ज्याच्याशी आपलं दुमत

असेल त्याच्याशी मुद्दाम बोलणं काढा, जेणेकरून तुमचे पूर्वग्रह विरून जातील आणि तुम्हाला सम्यक ज्ञान होईल.

(सैनिक जोराने टाळ्या वाजवतात. कृपाचार्य, संजय, मयाहुर, सीनू, कृतवर्मा आणि अश्वत्थामा पुढे येऊन सर्वांना नाटकीपणे नमस्कार करतात आणि रिंगणाबाहेर पडतात. खाली पडलेले पाच रुमाल उचलून घेण्यासाठी सैनिकांची झुंबड उडते. 'अरे! अरे!' असं सीनू ओरडतेच आहे, तेवढ्यात ते सगळे गायब होतात. एक ढोलकीवाला आणि एक शीघ्रकवी आता रिंगणात उतरतात, तसं सैनिकांचं लक्ष तिकडे वेधलं जातं. हा शीघ्रकवी जाताजाता संजयकडे पाहून ओळखीने नमस्कार करतो.)

संजय (शीघ्रकवीला उद्देशून): मोकाट सुटू नकोस.

शीघ्रकवी: नाही. तसा जपून वागेन. पण उत्स्फूर्त रचना करायची म्हणजे कधीकधी तोल जातोच. त्यातच मजा असते.

(हे सहाजण गलक्यापासून हळूहळू दूर जातात.)

अश्वत्थामा: (चाचरत) तात्पर्य मी बरोबर सांगितलं ना? मला खात्री वाटत नव्हती.

कृपाचार्य: हो, बरोबर सांगितलंस. पण शेवटी ती एक लोककथा आहे. अमुक तात्पर्य तिच्यातून निघतं अशी परंपरा ठरून गेलेली आहे. ती आपण जशीच्या तशी पाळावी हेच उत्तम.

अश्वत्थामा: म्हणजे?

कृपाचार्य: म्हणजे असं की कथेचं तात्पर्य काय असायला हवं हे स्वतंत्र बुद्धीने ठरवायला गेलं तर उगीच गोंधळ वाढत जातो. त्यापेक्षा ते आपलं घोकून म्हणून टाकावं. उदाहरणार्थ असं पाहा की सर्वांगीण विचार हत्तीचा करणं सोपं आहे, कारण त्याचं भलंथोरलं अंग समोर दिसतच असतं. पण प्रत्यक्ष व्यवहारात ज्यांचा करावा लागतो त्या अमूर्त संकल्पना असतात. त्यांना किती अंगं असतील याची मोजदाद अवघड असते आणि ती सगळी आपण तपासलेली आहेत ह्याचा भरवसा नसतो. आणि म्हणूनच त्यांचा सर्वांगीण विचार इतक्या सहज करता येत नाही.

कृतवर्मा: आणि त्याचबरोबर असंही आहे की डोळ्यांवर बांधून घेतलेला रुमाल पटकन काढता येतो. पण व्यवहारात आंधळ्या माणसाला डोळस करता येत नाही. तेव्हा तू सांगितलेलं तात्पर्य एक तत्त्व म्हणून जरी वाईट नसलं तरी ह्या कथेतून नेमकं सिद्ध होत नाही.

मयाहुर: समजलं. म्हणजे निदान ह्या चर्चेचं तात्पर्य असं की सर्वांगीण विचार जरूर करावा पण लोककथांचा करू नये.

सीनू: जाऊ द्या रे! (अश्वत्थाम्याला उद्देशून) तुझं काम बाकी तू छान केलंस. पाव घटका विरंगुळा झाला यात सगळं आलं. माझे पाच रुमाल तेवढे गेले.

मयाहुर: बाकीचे चार दिसत नाहीत, पण पांढरा समोर दिसतो आहे.

सीनू: कुठे?!

मयाहुर: तो बघ. त्या माणसाच्या डोक्यावर आहे.

(समोर एक सैनिक दिसतो. पांढरा रुमाल दुमडून दोन कोपरे दोन कानांमागून वर येतील अशा प्रकारे त्याने तो डोक्यावर थापला आहे. तो खाली पडू नये म्हणून रुमालाला दोन भोकं पाडून त्यांच्यामधून एक बाण केसांत आरपार ओवला आहे. त्याच्या बाजूने चालणाऱ्या सैनिकाने पाठीला ढाल बांधून घेतली आहे.

कृतवर्मा: (दोघांना उद्देशून) हा काय प्रकार आहे?!

पाठीवर ढाल घेतलेला सैनिक: आम्हाला कंटाळा आला आहे. वेळ चांगला जावा म्हणून ससा आणि कासवाची शर्यत हे सूत्र धरून आम्ही एक नाट्यप्रयोग करणार आहोत. प्रयोग असा आहे की कुरुक्षेत्रातून मी धीम्या गतीने उलटासुलटा चालत राहणार. त्यातला काही वेळ ससा माझ्या सोबतीला असेल, आणि तेव्हा आम्ही दोघे गप्पाटप्पा, हास्यविनोद असं काहीबाही करत राहू. ऐकणाऱ्यांची करमणूक व्हावी असा उद्देश आहे. गप्पांना अध्येमध्ये मुद्दाम थोडं गंभीर वळण लावू, आणि ह्यामुळे आपल्या बुद्धीला आता शीण आला आहे असा अभिनय करून ससा तिथल्या तिथे झोपून जाईल. मी एकटाच पुढे जाईन आणि नुकत्याच सुरू केलेल्या गंभीर विषयावर अंतर्मुख होऊन स्वगत बोलत राहीन. थोड्या वेळाने सशाला जाग येईल आणि पळत येऊन तो मला गाठेल, तशा आमच्या गप्पा पुन्हा सुरू होतील. असा एकूण विचार आहे.

प्रयोगाला निश्चित संहिता नाही, ज्या वेळी जसे संवाद सुचतील तसे आम्ही बोलू. जे उत्स्फूर्तपणे जमेल ते खरं. शर्यत मी जिंकणार असल्यामुळे माझी इच्छा होईल तेव्हा खेळ थांबेल.

कृतवर्मा: ठीक आहे! काय वाटेल ते करा. पण नंतर आपापल्या गणात परत जा. सैन्याला शिस्त पाहिजे.

सैनिक: ती आता कशाला पाहिजे? नंतर घरीच जायचं आहे. येतो बरं का! (कासवासारखी मान हलवत निघून जातो. ससा त्याच्या पुढे दुडक्या चालीने पळत जातो.)

सीनू: नुसता थिल्लरपणा चालू आहे. जो तो म्हणतो नंतर घरीच जायचं आहे.

कृपाचार्य: ते साहजिक आहे. सुरवातीला जेव्हा अर्जुन आजारी झाला तेव्हा त्याच्याबद्दल दोन्हींही सैन्यांतून थोडीफार सहानुभूती होती. लढायला तो जे नको म्हणत होता ते प्रत्येकालाच मनातून थोडंसं म्हणायचं होतं, आणि त्यामुळे आपली लढाई अर्जुन लढतो आहे अशी एक सार्वत्रिक भावना होती. पण कृष्णार्जुनांची बडबड जी एकदा सुरू झाली ती काही केल्या थांबेना. हळूहळू सैनिक वैतागले. आणि नंतर जेव्हा अर्जुन पुन्हा जमिनीवर उताणा पडला, पुन्हा उभा राहिला आणि बडबड पुन्हा सुरू झाली तेव्हा मात्र ही सहानुभूती पुरती संपली. कधी हा प्रकार आटोपतो आणि कधी आपण घरी जातो असं ज्याला त्याला होऊन गेलं आहे.

संजय: हो, तो विषय मी काढणारच होतो. (घुटमळतो.) युद्ध रद्द होणार आहे आणि लवकरच आपण घरी जाणार आहोत असं सगळे समजताहेत. पण मला तशी शाश्वती वाटेनाशी झाली आहे.

सीनू: म्हणजे?

संजय: हा सगळा प्रकार आपण जितका मनावर घ्यायला हवा होता तितका घेतलेला नाही.

सीनू: असं का म्हणतोस?

संजय: आपण बरेच तर्कवितर्क केले. आपण म्हणालो की कृष्ण आणि अर्जुन यांचं काहीतरी साटंलोटं आहे आणि संगनमत करून ते दोघे वेळ काढताहेत. किंवा लहान मुलांची भाषा असते तशी ह्या दोघांनी गंमतीची भाषा बनवली आहे. फार धडपड करून अर्थ लावावा असं त्यात काही नाही. पण मला आता

ह्यातलं काहीच बरोबर वाटेनासं झालं आहे.

कृपाचार्य: मघाशी जेव्हा अर्जुन दुसऱ्या वेळेला जमिनीवर पडला तेव्हाच नेमका सीनूच्या गाड्याचा गोंधळ झाला, आणि आपलं लक्ष तिकडून उडालं ते उडालंच. त्यावेळी ह्या दोघांचं तिथे काय चाललं होतं ते नीट बघायला हवं होतं.

संजय: इथून मला जेवढं समजलं तेवढं सांगतो. नेहमीचा घोळ इथेही झालाच. म्हणजे अर्जुनाच्या मनात काय चाललं होतं ते मला नीट कळलं नाही आणि तो जे बोलला तेही पुसटच ऐकू आलं. पण अर्जुन खाली कसा पडला ते सांगतो. मी तुम्हाला आधी म्हणालोच होतो की कृष्णाच्या मते सगळं जग त्याने निर्माण केलेलं आहे. आपल्यापैकी कुणाला ते खरं वाटलं नाही, पण अर्जुनाला बहुतेक ते पटलेलं आहे. तर आता ह्या जगात कुठले पदार्थ आहेत आणि ते कसे तयार झाले हे मध्ये केव्हा तरी कृष्णाने अर्जुनाला सांगितलं. तो तपशील फार किचकट आहे आणि मलाही नीट समजलेला नाही, म्हणून सध्या राहू दे. पण कृष्णाचं म्हणणं असं की हे सगळे पदार्थ मिळून जे काही जग बनतं ते माझ्या अंगात सामावलेलं आहे. अकरावा अध्याय जेव्हा ह्या दोघांनी सुरू केला तेव्हा अर्जुनाने विचारलं की मला तसं दिसत का नाही? यावर कृष्ण म्हणाला की साध्या डोळ्यांनी तुला ते दिसणार नाही, तेव्हा मी तुला दिव्यचक्षू देतो. याच वेळी अर्जुन जमिनीवर उताणा पडला. यापुढे त्याला जे काही दिसलं ते मला दिसलं नाही, पण त्याची प्रतिक्रिया काय झाली तेवढं तुम्हाला सांगतो.

कृतवर्मा: मला इथून काहीसुद्धा दिसलं नाही. संजयला दिव्यदृष्टी दिली आहे आणि अर्जुनाला दिव्यचक्षू दिले आहेत. आम्हा पामरांना कुणी काही देत नाही.

संजय: अर्जुन कृष्णाला उद्देशून म्हणाला की तुला कितीतरी डोळे, कितीतरी तोंडं, कितीतरी दाढा, कितीतरी पोटं, कितीतरी मांड्या आणि कितीतरी पाय आहेत असं मला दिसतं आहे –

कृतवर्मा: म्हणतोस काय?!

संजय: आणि तुझ्या अंगातून कसलातरी वेगळाच सुगंध येतो आहे.

कृतवर्मा: म्हणजे त्याला नुसते दिव्यचक्षू दिले नसणार. दिव्यनासिकाही दिली असणार. मला तरी इथून तो म्हणतो तसं काही दिसलंही नाही किंवा कसला सुगंधही आला नाही. हत्तीघोड्यांनी कंटाळून जाऊन

शेणामुताचे जे सडे इथेतिथे टाकले आहेत त्यांची दुर्गंधी मात्र येते आहे. तेही जगाचाच भाग आहेत. असं असूनही कृष्णाच्या अंगातून तो वास का आला नाही हे मला समजत नाही.

अश्वत्थामा: तुम्हा माणसांना लढाईसाठी हत्तीघोडे राबवून घ्यायला हवेत, पण त्यांचा वास नको. कृतघ्न आहात.

मयाहुर: वासाचं एक राहू दे, पण जग निर्माण करणाऱ्याला कितीतरी मांड्या आणि कितीतरी पाय का असावेत? मडकी तयार करण्यासाठी पायांनी माती मळतात तशी जग ही काही मळून तयार करायची वस्तू नव्हे.

संजय: पुढे ऐका. अर्जुन कृष्णाला म्हणाला की तुला ही जी कितीतरी तोंडं आहेत त्यांच्यात कौरवसैनिक शिरून तुझ्या दाढांखाली चिरडले जाताहेत, आणि ह्या सगळ्यांचा चट्टामट्टा करून तू जिभल्या चाटतो आहेस असं मला दिसलं. ह्यावर कृष्ण म्हणाला की कौरवसैनिक दुष्ट आहेत, आणि ते मरावेत असं मी ठरवूनच टाकलेलं आहे. त्यांची जी वासलात शेवटी लागणारच आहे, ती तुला आधी दिसली. आता तू फक्त निमित्ताला पुढे हो आणि आपल्या हाताने त्यांना मारून टाक.

कृपाचार्य: 'निमित्ताला पुढे हो' म्हणजे काय?!

संजय: मला माहित नाही. व्हायचं ते आधीच होऊन गेलेलं आहे, तू फक्त त्याचं श्रेय घे असा अर्थ असावा.

कृतवर्मा: पण समजा अर्जुन निमित्ताला पुढे झाला, तर त्याला काही हातपाय हलवावे लागणार आहेत की आम्ही कौरव आपसूक समोर येऊन त्याच्यासमोर मान उतरून देणार आहोत? कारण तशा काही सूचना आम्हाला मिळालेल्या नाहीत. आणि याउलट समजा अर्जुन म्हणाला की मी निमित्ताला पुढे व्हायला नकार देतो आहे, तर काय? मग अशा परिस्थितीत कौरव मरणार की नाही?

सीनू: कृष्ण काहीच्या बाही बोलतो आहे! ह्या 'निमित्ताला पुढे हो' मध्ये काही अर्थ नाही.

कृपाचार्य: इथे मला धोका असा दिसतो की कृष्ण काहीच्या बाही जरी बोलत असला तरीदेखील अर्जुनाला जर ते पटलं तर तो युद्धाला तयार होईल. मग काही आपण लवकर घरी जाणार नाही.

संजय: अर्जुनाचा आविर्भाव मला तसाच दिसला. कृष्णाच्या कितीतरी मांड्या आणि कितीतरी दाढा बघून तो सटपटलेला दिसला. लाचार होऊन त्याने कृष्णासमोर धुळीत लोळण घेतली आणि 'बाबारे! तुला मित्र समजून तुझ्या गळ्यात गळे घातले हे माझं चुकलं!' अशी सपशेल माफी मागितली. अर्जुन पुरता कह्यात आला आहे असं बघून कृष्णाने सगळा देखावा विझवून टाकला, तेव्हा कुठे अर्जुन पुन्हा उठून बसला. आता ह्या सगळ्याची काय संगती लावायची ते तुम्ही सांगा. माझा तर्क चालत नाही.

(भिल्ल आणि गवळणीची एक अश्लील कथा ढोलकीच्या तालावर रचून सांगणाऱ्या शीघ्रकवीचा आवाज दूरवरच्या रिंगणामधून अजूनही ऐकू येतो आहे. पण तिथली गर्दी आता रोडावत चालली आहे. कृपाचार्य, कृतवर्मा, संजय, अश्वत्थामा, मयाहुर आणि सीनू ह्या सहाजणांभोवती आता सैनिकांचं नवं रिंगण तयार झालं आहे. सारेजण दाटीवाटीने बसून लक्षपूर्वक ऐकताहेत.)

मयाहुर: पुष्कळदा होतं काय की हृदयात खोल रुतून बसलेल्या इच्छा वेडंवाकडं रूप घेऊन बाहेर येतात. इथे हेच झालेलं आहे. अर्जुनाला बहुतेक राज्य मिळवण्याचा हव्यास आहे, पण कौरवांना मारल्याखेरीज ते मिळणार नाही. कौरव हे त्याचे चुलतभाऊ असल्यामुळे त्यांना मारवत तर नाही. तेव्हा अशा वेळी पळवाट काय? तर त्यांना मारण्याचा निर्णय दुसऱ्या कुणीतरी परस्पर घेतलेला आहे, ती जबाबदारी आपल्यावर नाही, आपण निमित्त आहोत अशी मनाची समजूत करून घेणं. माणसं जेव्हा वाईट वागतात तेव्हा आपण जे केलं ते हुकमाचे ताबेदार होतो म्हणून केलं असं त्याचं समर्थन करतात. त्यामुळे मनाला अपराधाची बोच लागत नाही आणि व्हायचं ते काम होऊनही जातं.

कृतवर्मा: म्हणजे तुला नेमकं काय म्हणायचं आहे? हे दिव्यचक्षू मिळाल्यानंतर अर्जुनाला जे काही दिसलं तो त्याच्या मनाने तयार केलेला देखावा होता की त्याला काय दिसावं हे कृष्णाने ठरवलेलं होतं?

मयाहुर: हे दिव्यचक्षू खरोखरीच आहेत यावर माझा विश्वास नाही. कुठलीही वस्तू आपल्याला कशी दिसते? त्या वस्तूवर प्रकाश पडून नंतर आपल्या डोळ्यांत शिरतो, आणि डोळ्यांतून ती संवेदना रक्तावाटे हृदयात पोहोचल्यानंतर आपल्याला वस्तू दिसते. पण वस्तू जर समोर नसेलच तर तिच्यावर प्रकाश पडणार नाही, आणि अशा प्रसंगी तुमचा चक्षू कितीही दिव्य असला तरी प्रकाशाअभावी काही करू शकणार नाही. संजयलादेखील दूरचं दिसतं पण नसलेलं दिसत नाही. कृष्णाच्या ह्या कितीतरी जिवण्या आणि कितीतरी दाढा अर्जुनासमोर प्रत्यक्ष नव्हत्या हे उघड आहे, कारण असत्या तर आपल्यालाही दिसल्या असत्या. म्हणून म्हणतो की 'तुला दिव्यचक्षू देतो आहे' ह्याचा शब्दश: अर्थ घ्यायचा नाही. कृष्णाने अर्जुनाला दिलेली ती एक प्रकारची परवानगी आहे. तुझ्या मनात कितीही वेड्याविद्र्या कल्पना असल्या

तरी त्या बाहेर आणायची लाज बाळगू नकोस, कारण खरं म्हणजे त्या तुझ्या मनात नाहीतच, त्या बाहेरच्या जगात आहेत आणि दिव्यचक्षूंमुळे तुला दिसताहेत, असं तो अर्जुनाला आडून सांगतो आहे. अर्जुनासाठी हे सोयीचंच आहे.

कृपाचार्य: तसंही असेल. मयाहुराचं मत मला पटत नाही असं नाही. पण माझीही एक कल्पना ऐकून घ्या. हा जो प्रकार चालू आहे त्याच्याकडे आपण एक हत्ती म्हणून पाहायला हवं. म्हणजे त्याचा सर्वांगीण विचार करायला हवा. तसा तो आपण अजून केलेला नाही. आपण असं समजून चाललो आहोत की कृष्ण एकतर खोटं बोलतो आहे किंवा निरर्थक बोलतो आहे. पण जे काही तो बोलतो आहे ते खरं असेल ही शक्यता आपण विचारात घेतलेली नाही. ती घ्यायला हवी.

अश्वत्थामा: कल्पना उत्तम आहे. मघाशी मी जे तात्पर्य सांगितलं त्याचा रोख हाच होता.

मयाहुर: पण कृष्ण खरं बोलतो आहे असं समजलं तर सगळं चित्रच बदलेल.

कृपाचार्य: तसं वादाखातर समजायचं. ते संयुक्तिक नाही असं लक्षात आलं तर सोडून द्यायचं.

मयाहुर: ठीक आहे, पण मग हे काळजीपूर्वक करायला हवं. कृष्ण जे म्हणाला त्याची फोड करून पाहायला हवी. (धुळीत खाली बसतो आणि बोटाने जमिनीवर लिहू लागतो.)

(१) कृष्णाने जग निर्माण केलेलं आहे.

(२) एखाद्याने मरावं हे ठरवण्याचा नैतिक अधिकार त्याला आहे.

कृपाचार्यांचा प्रस्ताव असा की ही विधानं आपण तात्पुरती मान्य करावीत. पण वास्तविक हे दोन मुद्दे स्वतंत्र आहेत. ह्यातलं पहिलं विधान खरं आहे असं जरी गृहीत धरलं तरी दुसरं खरं आहे असा निष्कर्ष आपोआप निघत नाही. कृष्णाने जग निर्माण केलंच असेल तर कौरवही निर्माण केले आहेत हे कबूल. पण जो वस्तू निर्माण करतो तो तिचं काहीही करू शकतो असं नाही. तेव्हा त्यांनी सरसकट युद्धात मरून जावं हे ठरवण्याचा अधिकार त्याच्याकडे कुठून आला हे मला समजत नाही. याउलट कृष्णाने जग नसेल जरी निर्माण केलं तरीदेखील युद्धात कुणी जिंकावं आणि कुणी मरावं हे ठरवण्याचा अधिकार काही कारणाने त्याच्याकडे आलाही असू शकेल. पण असं कुठलंच कारण त्याने जाहीर केलेलं नाही.

कृपाचार्य: नाही, आत्तापर्यंत ह्यातलं काहीच स्पष्ट झालेलं नाही.

मयाहुर: पण ते काही असलं तरी पहिला मुद्दा मला सध्या तरी गौण वाटतो. जग कुणी निर्माण केलेलं आहे ह्याची पंचाईत आपल्याला नंतर करता येईल. पण कौरवांनी मरावं असं जर कृष्णाने ठरवून टाकलं असेल आणि हे खरं करण्याची ताकद त्याच्यामध्ये असेल तर तुम्हाला असलेला धोका उघड आहे. मी आणि सीनू इथून केव्हाही बाहेर पडू शकतो, पण तुमचं तसं नाही.

(हे ऐकून भोवताली जमलेले सैनिक कुजबुजू लागतात. 'आपण मरणार का?', 'अजून नक्की नाही', 'सेनापती काय म्हणताहेत ते बघूया', 'हो, बघा आणि लवकर सांगा' अशासारखे आवाज निघतात. एक सैनिक अर्धवट स्वत:शी पण मुद्दाम मोठ्याने म्हणतो, 'पण निदान मुहूर्त नीट ठरवायचा होता. तेवढीही आमची काळजी कुणाला नाही.')

कृतवर्मा: कोण म्हणतंय ते? तुमची काळजी मला आहे. मी यादवांचा सेनापती आहे.

तोच सैनिक: नाही, त्याबद्दल आम्हाला शंका नाही. पण मला एक प्रश्न विचारायचा आहे. परिस्थिती अशी आहे की आपण बाकीचे कौरव लगेच मरू, पण भीष्म नाही. तो आपल्या सोयीने मरेल. मग माझा प्रश्न असा की ही सोय आम्हा सगळयांचीच का नाही केली?

कृतवर्मा: म्हणजे?

सैनिक: भीष्म मागे आम्हाला म्हणाला होता की माझ्या मरणाची वेळ मी स्वत: ठरवू शकतो. सध्या दक्षिणायन चालू आहे. मरायला ही वेळ शुभ नाही. उत्तरायण जास्त शुभ आहे. तेव्हा भीष्माने आम्हाला सांगितलं की मी युद्धात जखमी झालो तरी तडकाफडकी मरायला राजी होणार नाही. कुरुक्षेत्रात तसाच एका बाजूला पडून राहीन आणि उत्तरायण आलं की माझा मी शुभ वेळेला मरेन. आता हे उत्तरायण केव्हा सुरू होणार ते कुणालाच छातीठोक माहित नाही. काहीजण म्हणतात संक्रांतीच्या दुसऱ्या दिवशी सुरू होणार. काहीजण म्हणतात रात्रीच्या आकाशात चांदण्यांनी बनलेला जो मेंढा दिसतो तिथून सूर्य गेला की सुरू होणार. काहीजण म्हणतात की तो ठोकताळा पूर्वी बरोबर होता, पण सूर्याला अलिकडे दरवर्षी थोडा थोडा उशीर व्हायला लागला आहे. त्यामुळे तो मेंढ्याजवळून नव्हे तर माशाजवळून गेला की सुरू होणार. आता ह्यातलं काहीही खरं असलं तरी आपलं युद्ध अठराच दिवस चालणार आहे. तेवढ्यात काही हे

उत्तरायण सुरू होत नाही. तेव्हा ह्या युद्धात जर आम्ही मरणार असू तर हटकून अशुभ वेळेलाच मरणार. भीष्म जसा ताणून धरू शकतो तसं आम्ही कुणी करू शकत नाही. मग आता माझा प्रश्न असा की युद्ध उत्तरायणातच का नाही ठेवलं? म्हणजे आपण सगळेच शुभ वेळेला मेलो असतो. सेनापतीने आपल्या सैनिकांसाठी निदान एवढं करायला नको का?

कृतवर्मा: तू म्हणतोहेस त्यातलं मला काहीच माहित नव्हतं.

मयाहुर: मलाही माहित नव्हतं. युद्ध केव्हा होणार ती तिथी मला सांगितलेली होती, आणि त्याप्रमाणे सगळ्या सोयी वेळेत झाल्या पाहिजेत अशा सूचना मला दिलेल्या होत्या. मरणाऱ्यांसाठी अंत्यसंस्कारांची सोय यात आहे. पण अशुभ वेळेला माणूस मेला तर अंत्यसंस्कार वेगळे असतात का हे आता मला शोधून काढायला हवं.

कृतवर्मा: (सैनिकाला उद्देशून) तुझा आक्षेप बरोबर आहे, पण मला या क्षणी निश्चित काही सांगणं शक्य नाही. युद्धाचे नियम ठरवण्यात माझा सहभाग होता, पण ते केव्हा होणार हा निर्णय माझ्या हाती नव्हता. त्यामध्ये कुठेतरी गलथानपणा झालेला दिसतोय. मी चौकशी करून सांगतो काय ते. (ह्या उत्तराने सैनिकांचं समाधान झालेलं दिसत नाही, पण ते गप्प राहतात.)

मयाहुर: पण वेळ शुभाशुभ कशीही असली तरी माझं म्हणणं तेच आहे. आपण तातडीने विचार करायला हवा तो दुसऱ्या मुद्द्याचा. तुम्ही कौरवांनी मरावं हे ठरवण्याचा नैतिक अधिकार कृष्णाला कसा मिळाला असेल? आणि त्यातदेखील इतकी माणसं मारण्यासाठी मुद्दाम अशुभ वेळ निवडणं हे जखमेवर मीठ चोळण्यासारखं आहे. अर्थात असा अधिकार त्याच्याकडे आहे असं मी वादाखातर गृहीत धरलेलं आहे; तो खरोखरीच आहे का हे मला ठाऊक नाही.

कृतवर्मा: तू 'नैतिक अधिकार' म्हणतो आहेस. म्हणजे ज्याच्यामागे नैतिक अधिष्ठान आहे असा अधिकार. पण नैतिकता हा जगाचाच भाग आहे. समजा कृष्ण म्हणाला की जग मीच निर्माण केलं असल्यामुळे नैतिकतेचे नियम मला लागू होत नाहीत, तर काय उत्तर देणार? थोडक्यात तो असं म्हणू शकतो की हा अधिकार मी हातात घेतला म्हणून माझ्याकडे आहे. मला विचारणारे तुम्ही कोण?

कृपाचार्य: पण तो तसं म्हणताना दिसत नाही. आपल्या निर्णयाचं काहीतरी स्पष्टीकरण द्यायला हवं असं त्यालाही वाटत असणार, कारण आपण कौरवसैनिक दुष्ट असल्यामुळे मरणार आहोत असं तो अर्जुनाला

म्हणतो आहे.

अश्वत्थामा: (ठामपणे) मी दुष्ट नाही. कौरवांच्या सैन्यात मी स्वेच्छेने आलेलो नाही, आणि असलं गैरलागू विशेषण मी स्वत:ला चिकटवून घेणार नाही. मी इथला नव्हे. इथियोपियाच्या माळरानावर माझा जन्म झालेला आहे. एक दिवस जंगलात फिरत असताना मला जमिनीवर बरीच पानं पडलेली दिसली. हा काय प्रकार आहे ते पाहायला मी पुढे झालो आणि खोल खड्डयात तोंडघशी पडलो. अर्धवट तुटलेली झाडाची मुळी माझ्या कपाळात घुसली. मला दोरखंडांनी जखडून ओढून काढण्यात आलं आणि आक्सूमच्या बाजारात विकून टाकण्यात आलं. एकामागून एक असे माझे अनेक मालक झाले. प्रेमळ असा त्यांतला एकही निघाला नाही. भारतात मोठं युद्ध होणार अशी वदंता जेव्हा पसरली तेव्हा सगळीकडे हत्तीघोड्यांचे भाव वधारले. माझ्या तेव्हाच्या मालकाला लोभ सुटला आणि त्याने मला फुंकून टाकलं. पराण्या टोचून सहाशे योजनं चालवत मला इथे आणण्यात आलं. भारतातले हत्ती मला सामावून घेत नाहीत. त्यांच्यापेक्षा माझं वजन जास्त आहे, त्यांच्यापेक्षा माझे कान मोठे आहेत, आणि त्यांच्यापेक्षा माझी कातडी सुरकुतलेली आहे. ते मला उपरा समजतात आणि घाबरतात. मला इथे करमत नाही. ह्या युद्धातून मी बाहेर पडेन का ते मला माहित नाही, पण मी दुष्ट होतो म्हणून मेलो असं म्हणू नका.

सीनू: खरं तर जग तुझ्याशी दुष्टपणे वागलेलं आहे.

अश्वत्थामा: ते तुम्ही ठरवा. मी हत्ती आहे. मी काही विसरत नाही, पण आठवणींचे कढ काढून रडतही बसत नाही.

कृतवर्मा: दुष्ट मीही नाही आणि माझे सैनिकही नाहीत. आम्ही कुणीही इथे स्वेच्छेने आलेलो नाही. ह्या कृष्णाची जगावरच नव्हे तर भाषेवरही सत्ता असावी. कुठलाही शब्द कुठल्याही अर्थाने तो वापरू शकत असावा. जर मी कुणाला दुष्ट म्हणालो तर तसं का म्हणालो हे सांगण्याची जबाबदारी माझ्यावर येऊन पडते. तो शब्द ज्या अर्थाने मी वापरतो आहे तो समोरच्याला पटला नाही, तर दोघांनाही मान्य होईल असा अर्थ शोधण्याचा प्रामाणिक प्रयत्न आम्हाला करावा लागतो. कृष्णाचं तसं नसावं. कुणालाही तो काहीही म्हणू शकतो.

कृपाचार्य: पण म्हणजे गोळाबेरीज परिणाम तोच झाला. माणूस काय किंवा हत्ती काय, कुणालाही विनाकारण दुष्ट ठरवून मारणं आणि कारण न देता मारणं ह्यात मला फरक दिसत नाही.

सीनू: मला हे सगळं चुकीचंच वाटतं. का ते उदाहरण घेऊन सांगते. चीनमध्ये एक खेळ चालतो. लाकडाची एक सपाट चौकोनी फळी घेतात आणि तिच्यावर आडव्या उभ्या रेषा आखून घरं बनवतात. घरांना आलटून पालटून लालपिवळे रंग देतात. फळीच्या एका बाजूला एक खेळाडू बसतो आणि दुसऱ्या बाजूला दुसरा खेळाडू बसतो. घरांमध्ये हस्तिदंती सोंगट्या ठेवतात. डुक्कर, अजगर, वेश्या, भाला, गोगलगाय, व्यापारी असे सोंगट्यांचे वेगवेगळे आकार असतात. कुठली सोंगटी कशी हलते आणि कुठल्या सोंगटीची ताकद किती ह्याचे ठरलेले नियम आहेत. भाला तिरका जातो आणि डुक्कर अजगरावरून उडी घेऊ शकतो. गोगलगाय एक घर डावीकडे, उजवीकडे किंवा समोर जाऊ शकते. अजगर डुकराला गुदमरून मारू शकतो आणि भाला वेश्येला भोसकू शकतो. वेश्या व्यापाऱ्याला विष घालू शकते. आणखी खूप नियम आहेत. समोरच्या गोगलगाईला जो मारेल तो डाव जिंकला. खेळणारे हुशार असतील तर गुंतागुंत वाढत जाते आणि अशा वेळी फार कौशल्य लागतं.

उत्तर चीनमधला एक राजा आणि त्याची आई अशा दोघांचा हा आवडता खेळ आहे. राजवाड्याच्या आवारात त्यांनी एक मोठा दगडी पट तयार करून घेतला आहे. मयाहुरानेच तो हवा तसा करून दिला आणि नंतर एकदा मला नेऊन दाखवला. दोन्ही बाजूंना दोन उंच मनोरे बांधले आहेत. एका मनोऱ्यात राजा आणि त्याच्या समोरच्या मनोऱ्यात आई असे बसतात, आणि खाली पटांगणात बघून खेळातल्या चाली ओरडून सांगतात. दरबारी मंडळी भोवताली बसून पाहात असतात. सोंगट्या म्हणून कैदी वापरतात. डुक्कराचं नाहीतर अजगराचं कातडं पांघरलेला, हातात भाला घेतलेला असे ते कैदी असतात. बाई कैदेत असेल तर तिला गडद रंग लावून वेश्या म्हणून उभी करतात. वेश्या जेव्हा व्यापाऱ्याला विषाचं मडकं देते तेव्हा त्याला ते एका घोटात पिऊन टाकावं लागतं. अजगरडुकराचं असंच असतं. डुकराला विरोध करायची परवानगी नसते. रक्त टिपून घ्यायला आणि प्रेतं उचलायला नोकर ठेवलेले असतात. यामध्ये बघणाऱ्यांना विरंगुळा होतो आणि कैद्यांना जो एवीतेवी मृत्युदंड द्यायचाच असतो तेही काम होऊन जातं.

पण विनाकारण माणसं मारू नयेत असा आईमुलाचा दंडक आहे. आपण डाव खात्रीने जिंकणार असं जर समजा आईला वाटलं, तर आपले पुढचे डावपेच काय असणार आहेत याची समोरच्या मनोऱ्यात निरोप्या पाठवून ती राजाला सूचना देते. ह्यातून आपण वाचत नाही असं जर राजाला वाटलं तर तो हार कबूल करतो आणि डाव तिथे संपतो. अशा वेळी जिवंत राहिलेल्या सोंगट्यांना घरी जाऊ देतात. उरलेल्या आयुष्यात कसलीही आगळीक त्या कधी करत नाहीत. राजाला नाही मान्य झालं तर डाव पुढे चालू राहतो, पण त्याला इलाज नाही.

इथेही काहीसं असंच आहे. रथीने अमुक करावे आणि पदातिने तमुक करू नये असे लांबलचक नियम तुम्ही बनवलेले आहेत. दगडावर कोरलेले मला समोरच दिसताहेत. पण कृष्ण म्हणतो आहे ते जर खरं असेल आणि सगळे कौरव जर मरणारच असतील, तर हे नियम आतून पोकळ आहेत आणि ही लढाई बनावट आहे. एवढं समजण्याइतकी अक्कल कृष्णाला असायला हवी. अर्जुनाला जे काही रूप त्याने दाखवलं ते वास्तविक सगळ्या कौरवांना जाहीरपणे दाखवायला हवं. त्यांना पटवून द्यायला हवं की लढाई करू नका, केलीत तर तुम्ही जगणार नाही. मग ते शरणागती पत्करतील आणि निमूटपणे घरी जातील. आपापल्या बायकामुलांशी यापुढे फार चांगले वागतील. विनाकारण माणसं मरायची यामुळे टळतील. कृष्णाने जग निर्माण केलेलं असेल तर कौरवांच्या मनावरही त्याचं नियंत्रण असायला हवं. त्यामुळे कौरवांना इतकं पटवून देणं त्याच्या शक्तीबाहेर असू नये.

संजय: सीनू, तू म्हणतेस ते पूर्णपणे मान्य आहे. पण कृष्ण असं काही करेल अशी चिन्हं दिसत नाहीत. अजूनही तो एकट्या अर्जुनाशीच बोलतो आहे.

कृतवर्मा: पण हेच मला कळत नाही. बोलण्यासारखं आता राहिलं काय आहे? युद्ध करायला हवं हे जर अर्जुनाच्या गळी उतरलेलं असेल तर तो लागलीच युद्धाला सुरुवात का नाही करत?

मयाहुर: तुम्हाला म्हटलं ना? हा सगळा एककल्लीपणा आहे. सांगायचं ते सांगून झालेलं आहे, पण कसे ना कसे तरी अठरा अध्याय करायचे असा कृष्णाने चंग बांधला आहे. तेव्हा भारुडभरती करण्याखेरीज त्याच्यासमोर दुसरा मार्ग राहिलेला नाही.

संजय: तसंच वाटतं. आता ह्या दोघांचा वेगळाच विषय चालू आहे. कृष्णाने जग निर्माण केलं असेल तर त्याची मर्जी सांभाळायला हवी हे अर्जुनाला कळलेलं आहे. म्हणून त्याने कृष्णाला विचारलं की तुला कशा प्रकारचा चेला पसंत आहे? कृष्ण म्हणाला की सर्वांशी मैत्री करून असणारा आणि कनवाळूपणे वागणारा चेला मला पसंत आहे. वास्तविक जर अर्जुनाचा पक्ष युद्ध खात्रीने जिंकणार असेल तर ही चर्चा करायला मागाहून खूप वेळ आहे. त्यात आत्ता शिरण्याची गरज नव्हती.

कृतवर्मा: कनवाळूपणे वागून युद्ध कसं करणार? अर्जुनाला हे युद्ध झाल्यानंतर सांगायला हवं. आधी नाही.

संजय: इतकंच नव्हे तर कृष्णाचं म्हणणं असं की सुख आणि दु:ख ह्या दोन्ही गोष्टी ज्याला सारख्याच आहेत, किंवा जय आणि पराजय याही गोष्टी सारख्याच आहेत असा चेला मला पसंत आहे.

कृतवर्मा: पुन्हा तेच म्हणतो. हे नंतर सांगायला हवं. जय आणि पराजय ह्यात जो फरक करत नाही अशा माणसाच्या लढण्यात कितीसा जोर असणार आहे?

संजय: कदाचित कृष्णाला असं म्हणायचं असेल की जय आणि पराजय आधी वेगवेगळे समजा, पण एकदा व्हायचं ते होऊन गेल्यावर सारखेच समजा. किंवा सुख आणि दु:ख वाटण्याआधी वेगवेगळे समजा पण नंतर सारखेच समजा.

कृपाचार्य: असं करणं अवघड आहे.

मयाहुर: अवघड नाही, अशक्य आहे. आणि सुखदु:ख आम्ही सारखेच समजावे अशी त्याची इच्छा असेल तर जग निर्माण करतानाच तशी तरतूद का नाही केली? एखादा चितारी असं कधी म्हणेल का की इथे मी जांभळा रंग दिलेला आहे आणि तिथे पोपटी दिलेला आहे, पण चित्राकडे बघताना तुम्ही ते सारखेच समजा?

सीनू: कृष्णाचा हा जो कोणी चेला असेल तो स्वत:चं सुख आणि स्वत:चं दु:ख सारखं समजतो आहे तोपर्यंत ठीक आहे. पण इतरांचं सुख आणि इतरांचं दु:ख जर तो सारखं समजू लागला तर आजूबाजूचे लोक लागलीच तक्रार नाही का करणार?

कृपाचार्य: हे सगळं कृष्णाने आधी सांगितलं असतं तर धर्मयुद्धाच्या नियमांत आपण तसे बदल करून घेतले असते. आम्ही असं म्हटलं असतं की 'ज्याचे शस्त्र नीट चालत नसेल किंवा चिलखत निकामी झाले असेल अशास ठार मारू नये. परंतु जय आणि पराजय ही आपल्याला सारखीच आहेत असे प्रतिस्पर्ध्याने आधी जाहीर केले असल्यास हे कलम लागू होणार नाही.' युद्ध लवकर संपायला यामुळे थोडी मदत झाली असती.

कृतवर्मा: आणि ह्या दोघांना जर वेळच काढायचा असेल तर निदान अर्जुनाचं आणि पर्यायाने आमचंही मनोरंजन होईल अशी काही सोय कृष्णाने करायला हवी. आमच्या द्वारकेला एक गप्पिष्ट म्हातारा आहे. त्याची नेहमीची युक्ती अशी की कुठल्याही घोळक्यात असला की तो माणसांचे तीन प्रकार पाडतो. एकदा तो म्हणाला की जगात तीन प्रकारचे लोक असतात. समुद्राकाठी रमणारे, पर्वतावर रमणारे आणि बाजारात रमणारे. आता ह्या बोलण्यात चातुर्य असं फार नाही, पण जमलेल्यांनी ह्यातून इतके वेगवेगळे लाक्षणिक अर्थ काढले की पुढच्या दोन घटका कशा गेल्या ते कुणाला कळलं सुद्धा नाही. कृष्णाला ह्यातून काही शिकण्यासारखं आहे.

सीनू: मीही तेच म्हणते. इथे तीन प्रकारचे सैनिक आहेतः लागलीच मरणारे, हाल होऊन मरणारे आणि धास्तीने मरणारे. हा समोरचा प्रकार असाच चालू राहिला तर बहुतेक सगळे तिसऱ्या वर्गात जमा होतील.

संजय: सीनू, हा विनोदाचा विषय आहे का?

सीनू: मग मी तरी काय करू? वेळ नको का जायला? लोक कंटाळलेले मला बघवत नाहीत.

संजय: सैनिक खरोखरीच मरणार आहेत, पण मला संशय असा आहे की ह्या मुद्द्याला कृष्णाच्या लेखी महत्त्व नाही. तुम्हाला मी जेव्हा इथे भेटलो तेव्हा पाचेक अध्याय होऊन गेलेले होते, आणि त्यांमध्ये कृष्ण पुष्कळ काही म्हणून गेला होता. ते सगळंच मला समजलेलं नाही, पण माणसं मारणं वाईट का नाही याचा त्यातून उलगडा होतोसं दिसतं. तुम्हालाही सांगतो, पटतं का बघा.

कृतवर्मा: सांग. पटलं तर चांगलंच होईल, कारण मग मला समाधानाने मरता येईल.

संजय: त्याआधी आत्मा म्हणजे काय हे तुम्हाला सांगायला हवं, तेव्हा थोडं सबुरीने घ्या. कृष्ण म्हणाला होता की आपल्या अंगात आत्मा नावाची काहीतरी वस्तू असते. तिच्यामुळे आपण जिवंत राहतो. आता एकतर ही वस्तू अंग सोडून गेली की आपण मरतो, किंवा आपण मेलो की ही वस्तू अंग सोडून जाते. दोहोंपैकी नक्की काय होतं याबद्दल अजून माझ्याच मनात गोंधळ आहे. पण ते काही असलं तरी आपण मेल्यानंतर हा आत्मा दुसऱ्या अंगात शिरतो आणि ते अंग जिवंत होतं. कृष्णाचं म्हणणं असं की माणूस जसा जुने कपडे टाकून देऊन नवे कपडे घालतो तसा आत्मा जुनं अंग टाकून देऊन नव्या अंगात शिरतो.

मयाहुर: हे महत्त्वाचं आहे. मला नीट समजून घ्यायला हवं. पण हा आत्मा अंगात राहून काय करतो?

संजय: कृष्णाने ते काही सांगितलं नाही. त्याने आत्म्याचं जे वर्णन केलेलं आहे ते आत्मा काय करत नाही आणि आत्म्याला काय होत नाही अशाच धाटणीचं आहे. कृष्ण म्हणतो की आत्म्याला हत्याराने इजा होत नाही, आग त्याला जाळू शकत नाही, पाणी त्याला भिजवू शकत नाही आणि वारा त्याला वाळवू शकत नाही. हे व्यापक अर्थाने घ्यायला हवं असं संदर्भावरून दिसतं. म्हणजे उदाहरणार्थ, तसं जरी स्पष्ट म्हटलं नसलं तरी आत्म्याला गंज चढत नसणार किंवा रुमालात बांधता येत नसणार.

अश्वत्थामा: मलाही आत्मा आहे का? तसं जाणवत तरी नाही.

सीनू: जाणवत मलाही नाही.

संजय: हो, प्राण्यांनाही आणि बायकांनाही असतो. माणूस मेल्यावर त्याचा आत्मा प्राण्यात जाऊ शकतो, प्राणी मेल्यावर माणसात जाऊ शकतो किंवा एका प्राण्यातून दुसऱ्या प्राण्यात जाऊ शकतो. तेव्हा आपल्या सगळ्यांमधले आत्मे एकमेकांपेक्षा निराळे नसावेत. ते परस्परांना कसे ओळखतात हे माहित नाही. वनस्पतींमध्ये असतो का हे मात्र नीट कळलं नाही. उदाहरणार्थ, वडाचं मोठं झाड असेल तर त्याचा काही भाग मेलेला आणि काही जिवंत असू शकतो. अशा वेळी त्यामधला आत्मा झाडाच्या काहीच फांद्यांमध्ये वावरू शकतो आणि काही फांद्यांमध्ये शिरायला त्याला मज्जाव आहे असंही असू शकेल. महत्त्वाचं असं की माणसाला किंवा प्राण्याला मारलं तरी त्याचा आत्मा मरत नाही. मेलेलं अंग सोडून तो दुसऱ्या अंगात निघून जातो. त्यामुळे कृष्णाचं म्हणणं असं की माणूस मेला तरी त्यात दु:ख करण्यासारखं काही नाही, कारण आत्म्याला त्यात कुठेच धक्का पोहोचलेला नसतो. आणि म्हणूनच कृष्ण अर्जुनाला म्हणतो की तू माणसं मारायला कचरू नकोस.

मयाहुर: हे खूपच महत्त्वाचं आहे. मला मुळातूनच समजून घ्यायला हवं. तू म्हणालास की माणूस आत्म्यामुळे जिवंत राहतो. असं जर असेल तर जिवंतपणी तो माणूस केव्हा काय करतो हे आत्मा ठरवत असणार.

संजय: नाही, तसं वाटत नाही. असं पाहा की आपल्या अंगात ज्या संवेदना निर्माण होतात त्या रक्तातून हृदयात वाहून नेल्या जातात. याबद्दल आपण मघाशी बोललोच आहोत. रक्तात खूप पाणी असतं. आत्म्याला जर पाणी भिजवू शकत नसेल तर आपल्या संवेदना त्याच्यापर्यंत पोहोचतच नसणार. म्हणजे समजा मला ह्या क्षणी थंडी वाजत असेल तर माझ्या आत्म्याला ते ठाऊक नसतं. आणि तेच जर ठाऊक नसेल तर थंडी भागावी म्हणून पुढे काही करण्याचा प्रश्न येत नाही.

सीनू: तुला खरंच थंडी वाजते आहे का?

संजय: थोडीशी.

(सीनू आपल्या गाड्यात जाऊन एक धाबळी घेऊन येते आणि संजयला आणून देते.)

सीनू: तूरानमध्ये एक दाट पांढरे केस असलेली गरगरीत मेंढी असते. समरकंदला तिच्या लोकरीचा मोठा बाजार भरतो. तिथून मी ही घासाघीस करून स्वस्तात मिळवली. ठेव तुझ्याजवळ.

(संजय ती आपल्याभोवती लपेटून घेतो.)

संजय: ऊब छानच आहे. धाबळी पाहिली की मला लहानपणची आठवण होते. आई आणि बाबांनी जोडीने म्हणायचं एक जुनं गाणं होतं. बाबा खोगीर पाठीवर बांधून घोडा व्हायचे आणि आई धाबळी पांघरून मेंढी व्हायची. मेंढी घोड्याची थट्टा करत असे की 'बाबारे! काय हे हाल तुझे! माणूस तुझ्या पाठीवर बसून तुला दामटतो आणि सामानाने भरलेले जड खटारे तुला ओढायला लावतो.' यावर उलट घोडा म्हणतो, 'बाई गं! किती हे हाल तुझे! तुझ्या अंगावर इतकी सुंदर लोकर असते, पण माणूस ती सगळी ओरबाडून घेतो आणि तुला नागडी करून सोडून देतो.' एक कडवं घोड्याचं आणि एक कडवं मेंढीचं असं ते चालायचं. समोर ऐकणारे कोण आहेत याचा अंदाज घेऊन हे गाणं कितीही आर्त बनवता येत असे. बायाबापड्यांच्या अंत:करणाला पीळ पाडता येत असे. तितकाच खुर्दाही जास्त मिळायचा.

सीनू: गाणं लिहून दे नंतर मला.

संजय: देईन.

मयाहुर: पण आपला विषय सोडूया नकोत. तुला आत्ता जेव्हा थंडी वाजली तेव्हा तुझ्या त्वचेतून हृदयाकडे रक्त गेल्यामुळे ती तुला कळली. पण तू जेव्हा तसं बोलून दाखवलंस, तेव्हा कशी हालचाल करायची हे तुझ्या ओठातल्या स्नायूंना कुणीतरी सांगितलं असलं पाहिजे. आणि नंतर स्वत:भोवती धाबळी लपेटून घेतलीस, तेव्हाही कशी हालचाल करायची हे तुझ्या हातातल्या स्नायूंना कुणीतरी सांगितलं असलं पाहिजे. पण हे सांगतं कोण?

संजय: आता ते मला काय ठाऊक? पण आत्मा सांगत नाही हे निश्चित. कारण मुळात थंडी वाजणं म्हणजे काय हेच त्याला समजत नाही आणि नंतर अंगाला ऊब मिळालेलीही समजत नाही. निदान कृष्णाच्या बोलण्यावरून तसा स्पष्ट तर्क करता येतो. असं सगळ्याच बाबतीत आहे. आत्म्याला दु:ख होत नाही आणि आनंदही होत नाही. त्याला तहान किंवा भूक लागत नाही. तेव्हा माणसाने काय खायचं आणि प्यायचं हे तो ठरवत नाही.

कृपाचार्य: ठीक आहे, पण मेलेली माणसं बोलत नाहीत किंवा हालचालही करत नाहीत. तू म्हणालास की जिवंत माणूस जिवंत असतो तो त्याच्यात आत्मा असल्यामुळे. पण जिवंत माणसाच्या कुठल्याच संवेदनेत आणि कुठल्याच हालचालीत तो भाग घेत नसेल तर आत्म्याचा उपयोग काय?

मयाहुर: मलाही हाच प्रश्न पडला होता. जिवंत माणूस जेव्हा मरेल तेव्हा ही अडचण येईलच. असं समज की कौरवांच्या बाजूचा धैर्यधर नावाचा एक सैनिक आहे. अर्जुनाने त्याच्या पोटात समज बाण मारला. परिणामी धैर्यधर भयंकर कासावीस होईल आणि त्याच्या अंगातलं रक्त जखमेतून बाहेर सांडायला लागेल. थोड्या वेळाने धैर्यधर मरेल. पण तू म्हणतोस की दुखल्याची संवेदना आत्म्याला कळत नाही आणि रक्ताशीही त्याचा संबंध येत नाही. पण मग धैर्यधराचं अंग केव्हा सोडून जायचं हे त्याच्या आत्म्याला कसं कळतं?

कृतवर्मा: आणि समज धैर्यधर एकदाचा मेला. आता त्याच्या आत्म्याला काही इजा झालेली नाही आणि तो दुसऱ्या अंगाच्या शोधात निघाला असेल हे मान्य. पण म्हणून धैर्यधराच्या बायकोने रडू नये असं मुळीच नाही. कारण तिचं प्रेम होतं धैर्यधरावर, त्याच्या आत्म्यावर नव्हे. आणि तो मेल्यामुळे वाईट वाटणार आहे ते तिला, तिच्या आत्म्याला नव्हे. तेव्हा तिने अर्जुनाच्या आत्म्याला शिव्या देऊ नयेत फारतर, पण अर्जुनाला द्यायला काहीच हरकत नाही. आणि असं असेल तर धैर्यधराला मारण्यासाठी अर्जुनाकडे सबळ नैतिक कारण हवं. त्याचा आत्मा मरत नाही हे कारण नव्हे.

सीनू: मला हे सगळं विचित्रच वाटतं. का ते संजयनेच दिलेलं उदाहरण पुढे चालवून सांगते.

संजय: माझं उदाहरण असं इथे काही नाही. मी पदरचं सांगितलेलं नाही. कृष्ण जे म्हणाला ते तसंच्या तसं तुम्हाला सांगतो आहे.

सीनू: हो रे! उगीच फुरंगटू नकोस. तर कृष्णानेच दिलेलं उदाहरण पुढे चालवून सांगते. माणूस जुने कपडे टाकून देऊन नवे घेतो. पण का घेतो? जुन्या कपड्यांचा रंग विटतो, ते फाटतात असं काही ना काहीतरी होतं. त्यामानाने नवे कपडे चांगले दिसतात. म्हणून माणूस नवे कपडे घेतो. पण आता इथे बघ. समज एक दिसायला छान मुलगी आहे. आपण तिला छान म्हटल्यामुळे तिला स्वत:ला आनंद होतो. पण यात तिच्या आत्म्याला काही फरक पडत नाही. पुढे ती म्हातारी झाली की आपलं सौंदर्य गेलं असं म्हणून खट्टू होते. पण यातही तिच्या आत्म्याला काही फरक पडत नाही. मग असं असेल तर हा आत्मा जुनं अंग टाकून देऊन नवं

अंग घेण्याचा खटाटोप कशासाठी करतो? तो नेहमी अंगाबाहेरच का राहात नाही? म्हणजे अंगाला आत्म्याचा उपयोग नाही एवढंच नव्हे तर आत्म्यालाही अंगाचा उपयोग नाही.

संजय: ह्यावर एक उत्तर आहे. म्हणजे कृष्णाने दिलेलं उत्तर आहे, मी नव्हे. माझ्यावर धार धरणार नसाल तर सांगतो.

सीनू: नाही धरत रे! घाबरू नकोस. तू आपला सांगत राहा.

संजय: हा जो आत्मा एका अंगातून दुसऱ्या अंगात आणि दुसऱ्या अंगातून तिसऱ्या अंगात जातो, तसं त्याला वास्तविक करायचंच नसतं.

कृतवर्मा: करायचंच नसतं?!

संजय: ह्या तोचतोचपणातून त्याला कायमची मोकळीक मिळवायची असते. याला मोक्ष म्हणतात. हा मोक्ष मिळाल्यानंतर आत्मा कायमचा कृष्णाजवळ जाऊन राहतो. आणि हा मोक्ष मिळावा यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करायला हवेत असं कृष्णाचं म्हणणं आहे.

कृतवर्मा: म्हणजे काय करायला हवं?

संजय: बऱ्याच वेगवेगळ्या मार्गांनी मोक्ष मिळवता येतो असं दिसतं. ज्याचा जसा स्वभाव असेल तसा मार्ग त्याने निवडावा असं कृष्णाचं म्हणणं आहे. हे मार्ग कुठले ते मी तुम्हाला सांगूही शकेन, पण त्यात किचकटपणा खूप आहे. तरीदेखील ह्या सगळ्या मार्गांमधलं समान सूत्र असं की स्वत:चे चोचले पुरवायचे नाहीत. किमान एवढं पथ्य पाळायचं.

सीनू: म्हणजे काय करायचं?

संजय: उदाहरणार्थ, समज तुला आंबा आवडतो. तर तो खाल्ल्यामुळे जीभ चाळवते आणि आंबा आणखी खावासा वाटतो. तर अशा वेळी जिभेचं ऐकायचं नाही. एकतर आंबा आधी खायचाच नाही, किंवा खाल्ला तरी तो चवीला चांगला लागू द्यायचा नाही. असं सगळ्यांच बाबतीत आहे. समुद्र मी कधी पाहिलेला नाही, पण पाहणारे सांगतात की समुद्रात सूर्य मावळताना फार छान दिसतो आणि रोज त्या वेळेला पाय

तिथे ओढ घेतात. पण हे वाईट आहे, कारण जितक्या वेळा समुद्रावर जाल तितकी ही तलफ वाढत जाते. गाण्याचंही असंच आहे. चांगलं गाणं ऐकावं लागलं तर त्यात आनंद मानू नये. यामागचं कारण असं की जितक्या वेळा तुम्ही चवीने आंबा खाल, किंवा कान देऊन गाणं ऐकाल तितका तुमचा जगण्यावरचा लोभ वाढत जातो. पण यामुळे मोक्ष आणखी अवघड होतो, कारण जिवंत अंगापासून आत्म्याला दूर नेणं ह्याच उद्दिष्टाचा त्यात बोजवारा उडतो.

कृतवर्मा: पण मोक्ष कशासाठी मिळवायचा?

संजय: कृष्णाजवळ कायमचं जाऊन राहता यावं यासाठी.

(कृतवर्मा निश्वास सोडतो.)

कृपाचार्य: (कृतवर्म्याला उद्देशून) ह्या कल्पनेने तू हर्षभरित झालेला दिसत नाहीस.

कृतवर्मा: नाही. निखळ आनंद व्हावा असं ह्या प्रस्तावात मला काही दिसत नाही. यादवांचा मी सेनापती असल्यामुळे कृष्णाशी माझा अनेकदा जवळून संपर्क आलेला आहे.

अश्वत्थामा: कृतवर्म्याचं एक राहू दे. काही वैयक्तिक अनुभवांमुळे ही मोक्षाची कल्पना त्याला आकर्षक वाटत नसेल. पण माझी शंका वेगळी आहे. जेव्हा केव्हा मी मरेन तेव्हा माझा आत्मा माझ्या अंगातून बाहेर जाईल. बरोबर?

संजय: बरोबर.

अश्वत्थामा: तो कुठे जाईल ह्यावर माझं नियंत्रण नाही. कुठल्याही प्राण्याच्या किंवा माणसाच्या अंगात तो जाऊ शकेल.

संजय: बरोबर.

अश्वत्थामा: असं समजून चला की तो एका वेश्येच्या अंगात गेला. वेश्याच का समजायची याला कारण नाही, पण उदाहरणादाखल समजून चला. आता मी मेल्यानंतरच ही वेश्या जन्माला आलेली असल्यामुळे

तिची आणि माझी ओळख नसणार. एवढंच नव्हे तर तिने माझं नावही ऐकलेलं नसणार. तेव्हा मी म्हणेन की ह्या आत्म्याचं पुढे काय होतं हे त्या वेश्येने बघावं. त्याला मोक्ष मिळावा ह्यासाठी मी का म्हणून प्रयत्न करावेत? मी मेल्यावर माझा संबंध संपला.

संजय: ठीक आहे, हा तिढा सुटतो का बघूया. पण 'हा आत्मा' असं म्हणत राहणं त्रासाचं आहे. त्याला रीतसर नाव पाहिजे.

मयाहुर: आउटिस! आत्म्याला मी 'आउटिस' हे नाव सुचवतो. यवनांकडचा हा रुळलेला शब्द आहे. एखाद्याची ओळख नक्की नसेल तर ते त्याला 'आउटिस' म्हणतात.

संजय: हरकत नाही. तर अश्वत्थाम्याच्या आत्म्याचं नाव 'आउटिस'. आणि वेश्येचं नाव 'योजनगंधा'.

कृपाचार्य: व्यासाला टपली मारून जायची एकही संधी तू सोडत नाहीस. योजनगंधा हे त्याच्या आईचं, म्हणजे सत्यवतीचं टोपणनाव आहे.

संजय: तसं समजा. तर वेश्येचं नाव 'योजनगंधा'. सारांश काय तर अश्वत्थामा मेल्यानंतर त्याचं कलेवर सोडून देऊन आउटिस योजनगंधेच्या अंगात शिरेल. आता इथे कृष्णाचं म्हणणं असं की अश्वत्थाम्याने आपण अश्वत्थामा आहोत आणि योजनगंधेने आपण योजनगंधा आहोत असं समजू नये. तो भ्रम आहे. याउलट आपण आउटिस आहोत असं दोघांनी समजावं. आउटिसला जो मोक्ष मिळवायचा आहे त्यासाठी अश्वत्थामा आणि योजनगंधा ह्या दोघांनीही प्रयत्न करायला हवेत, कारण ते दोघेही आउटिस आहेत.

सीनू: (कपाळाला आठ्या घालत) हे शक्य नाही.

कृतवर्मा: (भुवया कुस्करत) नाही.

अश्वत्थामा: हे मुळीच शक्य नाही. मी आउटिस नव्हे. मी कोण आहे ते सांगणं माझ्यासाठी सोपं नाही; सांगायला गेलोच तर ढग चाचपडून पाहण्यासारखं ते होईल. पण मी आउटिस नव्हे इतकं उघड आहे. तुम्हाला म्हणालो होतो की इथियोपियाच्या जंगलात मी लहानाचा मोठा झालो. मला तिथल्या आठवणी आहेत आणि त्या आता माझा भाग झालेल्या आहेत. माझे मोठे कान मला आवडतात आणि माझी सुरकुतलेली कातडी मला आवडते, कारण आपण इथले नाही, आपल्याला इथे राहायचं नाही, एक ना एक

दिवस आपण इथियोपियात परत जाणार आहोत असा एक विश्वास त्यांच्यामुळे माझ्यापाशी आहे. खरा असो किंवा खोटा असो, पण आहे. माझे कान अधिक माझी कातडी अधिक माझ्या आठवणी, असं सगळं ओबडधोबड कडबोळं होऊन मी बनतो. योजनगंधेजवळ यापैकी काहीही नाही. माझ्या आठवणी तिला आठवणार नाहीत. योजनगंधेचे कान मोठे नसतील आणि योजनगंधेचं अंग सुरकुतलेलं नसेल. नाहीतर तिचा धंदाच चालायचा नाही. तिची स्वत:ची ओळख निर्माण करणारे तिच्या अंगचे अवयव वेगळे असणार. ते कोणते ह्यात मी शिरत नाही. पण असं पाहा की ह्या बिनआठवणींच्या, बिनकानाच्या, बिनकातडीच्या आउटिसचा यापैकी कशातही सहभाग नाही. तेव्हा मी काय किंवा योजनगंधेने काय, आपापली दाट ओळख विसरून जाऊन आउटिसची ओळख सांगावी ह्यात काहीसुद्धा हशील नाही. आउटिसचा मी कुणी लागत नाही. त्याला मोक्ष हवा असेल तर तो त्याचा प्रश्न आहे, माझा नाही.

कृपाचार्य: मीही तेच म्हणतो. आपण आउटिस आहोत असं अश्वत्थाम्याने वाटून घ्यावं अशी जर कृष्णाची इच्छा असेल तर तशी जाणीव त्यानेच अश्वत्थाम्यामध्ये निर्माण का नाही केली? त्याने जर जगातलं सगळं निर्माण केलं असेल तर हे त्याला का जमू नये? जी ओळख आपल्याला आपसूक जाणवत नाही ती पढवून कशी जाणवेल?

अश्वत्थामा: अगदी मान्य आहे. आणि त्यातूनही समजा मला मोक्ष मिळवावासा वाटलाच. आता आंबा राहू द्या, कारण तो मला कधी कुणी खायला दिलेला नाही. पण मला ऊस आवडतो. डोळ्यांना थांग लागणार नाही इतकी प्रचंड उसाची शेतं इथियोपियामध्ये असतात. एकेकाळी मी त्यांची वाटेल तशी नासधूस केलेली आहे. मोक्ष मिळवायचा तर हे जिभेचे चोचले मी बंद करायला हवेत. पण माझा प्रश्न असा आहे की जग निर्माण करताना ऊस चवीला इतका चांगला निर्माण केलाच का? ऊस खाऊन पोट भरेल आणि अंगात ताकद येईल, पण चवीला तो विशेष चांगला लागणार नाही अशी व्यवस्था आधीपासूनच का नाही केली? जर समुद्र दिसायला सुंदर नसता किंवा ऊस चवीला चांगला नसता तर मोक्ष जास्त सोपा झाला नसता का?

मयाहुर: मी तर ह्याच्याही पुढे जाईन. मुळात माणसांच्या आणि प्राण्यांच्या अंगांमध्ये आत्मे बंदिस्त करून नंतर त्यांना मोक्षासाठी प्रयत्न करायला लावणं हा द्राविडी प्राणायाम कशासाठी? सगळ्या आत्म्यांना सुरवातीलाच मोक्ष देऊन टाकला असता तर ही वायफळ गुंतागुंत वाढलीच नसती.

कृपाचार्य: कृष्णाने जग निर्माण केलंही असेल कदाचित, पण खूप विचार करून ते केलेलं आहे असं म्हणवत नाही.

कृतवर्मा: ह्या मुद्द्यावरून मी तुझ्याशी वाद घालेन अशी अपेक्षा धरू नकोस.

मयाहुर: पण मुद्दलात ह्या ठिकाणी आपण कसे येऊन पोहोचलो ते तरी पाहा. अर्जुन म्हणत होता की राज्य मिळवण्यासाठी मी स्वतःच्या चुलतभावांना मारणार नाही. आता कुणी म्हणेल की मारायला हरकत नाही, तर कुणी म्हणेल की हरकत आहे. हा पेच अवघड आहे. पण त्यांना मारलं तरी त्यांचे आत्मे मरत नाहीत असं म्हणून तो सुटायला थोडीदेखील मदत होत नाही. तेव्हा आत्म्याकडे नेणाऱ्या ह्या आडरस्त्याला लागून आपल्याला काहीही मिळालेलं नाही. तिथे जायला नको होतं.

संजय: तिथे काही मिळेल अशी हमी मी दिलेली नव्हती.

कृतवर्मा: हे कबूलच आहे. आम्ही तुझ्यावर रागावलो आहोत असं समजू नकोस. तुझं स्वतःचं यात काही नाही.

संजय: ते एक राहू द्या. आत्मा नको तर नको, पण आणखीही एक वेगळं कारण कृष्णाने सांगितलं होतं, तेसुद्धा तुम्हाला सांगतो. नंतर तुमची तक्रार येऊ नये.

कृतवर्मा: हा माणूस प्रश्नाचे लचके तोडतो. थेट गळा पकडत नाही.

सीनू (संजयला): तो तुला उद्देशून म्हणत नाहीय. कृष्णाला उद्देशून म्हणतो आहे.

संजय: ठाऊक आहे.

सीनू: मग पुढे सांग.

संजय: कृष्णाने जेव्हा जगातली माणसं निर्माण केली तेव्हा त्यांच्या जाती पाडल्या. प्रत्येक जातीला तिचं काम नेमून दिलेलं आहे. क्षत्रिय, शूद्र, ब्राह्मण आणि वैश्य अशा त्या चार जाती आहेत. अर्जुनाची जात क्षत्रिय अशी आहे, आणि युद्ध करणं हे क्षत्रिय जातीच्या माणसाला नेमून दिलेलं काम आहे. पण युद्ध करायचं तर माणसं मारावी लागणारच, मग ते चुलतभाऊ असोत की आणखी कुणी असोत. म्हणूनच अर्जुनाने न कुरकुरता ते करायला हवं. नाहीतर त्याची नाचक्की होईल.

कृपाचार्य: बाकीच्यांची कामं काय आहेत?

संजय: मालाची खरेदीविक्री हे वैश्यांचं काम आहे. माणसांची लग्नं लावून देणं आणि नंतर त्यांना झालेल्या मुलांना शिकवणं हे ब्राह्मणांचं काम आहे. शूद्रांची कामं खूप वेगवेगळ्या प्रकारची आहेत. कृतवर्मा मघाशी म्हणाला होता की हत्तीघोड्यांनी खूप घाण करून ठेवली आहे. ही घाण काढून नाल्यात सोडून देणं हे शूद्रांचं काम आहे. किंवा सैनिक मेल्यावर त्यांना जाळणं हेही शूद्रांचंच काम आहे. कुठल्या कामात कोण चांगला आहे हे पाहून त्याची जात ठरवलेली असते. उदाहरणार्थ, हा शेणामुताचा वास कृतवर्म्याला फार त्रासदायक वाटला होता, पण शूद्रांना तो तसा वाटत नाही. त्यामुळे किळस न येता स्वच्छतेचं काम ते करू शकतात. किंवा सीनू जात्याच बेरकी असल्यामुळे खरेदीविक्रीचं काम चांगलं करू शकते. अशी ही योजना आहे.

कृतवर्मा: कौरवसैनिकांची जात काय आहे?

संजय: अर्थात क्षत्रियच. तेव्हा अर्जुनाच्या उलट्या बाजूने युद्ध करणं हे त्यांचंसुद्धा काम आहे.

कृपाचार्य: पण कौरव मरणार हे कृष्णाने आधीच ठरवलेलं आहे, म्हणजे ही दोन्हीकडची कामं लुटूपुटूचीच आहेत.

संजय: हो, तसं म्हणायला हरकत नाही. नाटकात एका पात्राला भोसकण्याचं काम दुसऱ्या पात्राला द्यावं आणि धुळीत विव्हळत लोळत पडायचं काम पहिल्या पात्राला द्यावं तसं ते आहे.

कृतवर्मा: पण मग मघाचाच प्रश्न पुन्हा विचारतो. असं असेल तर कृष्णाने पांडवांतर्फे कौरवांकडे येऊन शिष्टाई केली ती कशासाठी?

कृपाचार्य: तोही नाटकाचाच भाग असावा. आणि युद्ध संपल्यानंतर कुरुकुलाची जी पडझड होईल आणि बायकांना माज येऊन वर्णसंकर होईल, तोही नाटकाचाच भाग असावा.

कृतवर्मा: पण मग नाटकात काय होणार हे आधीच ठरून गेलेलं आहे की त्यात बदल करण्याचा काही मार्ग शिल्लक आहे?

संजय: माहित नाही.

मयाहुर: थांबा. तुम्ही उगीच भरकटत चालला आहात. हे सगळं नाटक आहे असं कृष्ण स्वत: म्हणाला आहे का?

संजय: स्पष्ट शब्दांत तसं नाही म्हणालेला.

मयाहुर: मग आपण तसं समजूया नको. कारण तसं जर असतं तर क्षत्रिय जातीचं काम अमुक आहे ह्याला काही अर्थ उरला नसता. नट हीच प्रत्येकाची जात असती.

संजय: तेही बरोबर आहे.

अश्वत्थामा: माझी जात काय आहे?

संजय: प्राण्यांना जात असते का ह्यावर कृष्ण काही बोललेला नाही. कदाचित माणसांच्या जाती प्राण्यांना तशाच्या तशा लागू होत नसतील. हत्ती हीच तुझी जात असू शकेल.

अश्वत्थामा: पण मी नूबियातला हत्ती आहे. भारतातल्या हत्तींची जात माझ्याहून वेगळी असणार. नाहीतर मी त्यांच्यापेक्षा वेगळा दिसलो नसतो.

संजय: असेलही तसं. नक्की ठाऊक नाही, पण माणूस काय किंवा प्राणी काय, त्याची जात काही वेळा त्याच्या अंगाकडे बघून कळते आणि काही वेळा नाही. ती नेमकी ओळखणं अवघडच दिसतं. पण आपल्या आईवडिलांची जात ती आपली जात असं सोपं समजून चालायला हरकत नाही. माझे वडिल भाट होते आणि आई त्यांना सोबत करत असे. मीही तेच करतो.

अश्वत्थामा: पण असं असेल तर मला नेमून दिलेलं काम कुठलं हे कळत नाही. कारण माझे आईबाबा काम असं काहीच करत नसत. दोघेही खुशालचेंडू होते. त्यामानाने कामाचा अनुभव मला खूप आहे.

संजय: तुला नेमून दिलेलं काम कुठलं हे मलाही सांगता यायचं नाही. माणसांची सेवा करणं असं ते नसावं.

कारण नाहीतर तू जन्मापासूनच माणसांच्या ताब्यात असशील अशी व्यवस्था कृष्णाने केली असती. पण तसं झालेलं नाही.

अश्वत्थामा: नाही. तसं झालेलं नाही.

मयाहुर: पण हा नेमून दिलेल्या कामाचा मुद्दा आधीच्या मुद्द्याशी मेळ खात नाही. कसं ते सांगतो. अर्जुनाची जात क्षत्रिय आहे, आणि त्याला नेमून दिलेलं काम माणसं मारायचं आहे. तेव्हा त्याबद्दल त्याने उगीच शंकाकुशंका काढू नयेत असं कृष्णाचं म्हणणं.

संजय: बरोबर.

मयाहुर: पण कृष्णाचं हेही म्हणणं होतं की आत्मा मरत नसल्यामुळे माणसं मारण्यात वाईट काही नाही. पण असं असेल तर अर्जुन क्षत्रिय आहे की नाही हा मुद्दा गैरलागू आहे. माणसं मारण्याचं काम वैश्याने केलं तरीदेखील त्यात वाईट काही नाही. आणि याउलट माणसं मारणं जर वाईट असेल तर अर्जुनाला ते काम मुळात नेमून द्यायलाच नको होतं.

संजय: आता यावर मी काय बोलणार? काम ज्याने नेमून दिलं त्याला विचारायला हवं. पण ते काही जरी असलं तरी नेमून दिलेलं काम आपण करावं एवढ्यावर हे प्रकरण संपत नाही. तुम्हाला मोक्ष हवा असेल तर कामातून काही निश्चित फायदा व्हावा अशी अपेक्षा न ठेवता ते करावं लागतं.

मयाहुर: पण अर्थात मोक्ष हवा की नाही किंवा कशाला हवा हे वेगळेच प्रश्न आहेत. ते आपल्याला सुटलेले नाहीत.

सीनू: नाहीत सुटलेले. पण समजा ते सुटले, आणि मी ठरवलं की आपण मोक्ष मिळवायचा. तरीदेखील माझं काम करत असताना किमान इतका फायदा आपल्याला व्हायला हवा अशी अपेक्षा जर मी ठेवत गेले नाही तर ते होणार नाही. मी तुम्हाला म्हणाले होते की अफू बख्तरमधून आणावी लागते. इतक्या मणाच्या बदल्यात इतकी चांदी असा भाव सांगतात. तिथले शेतकरी लुच्चे आहेत. तागडीत मारतात. हिशेबात तसं धरूनच चालावं लागतं. अफूत डिंक मिसळावा लागतो, नाहीतर वड्या नीट पडत नाहीत. किती अफूला किती डिंक याचा हिशेब काटेकोर करावा लागतो. उंट हाकणाऱ्यांना वड्या चाराव्या लागतात. अध्येमध्ये बड्या माणसांना फुकट द्याव्या लागतात. एका वडीमागे मला जितका खर्च येतो त्याच्यापेक्षा जास्त भावाने

ती विकावी लागते. तसं नाही केलं तर माझा धंदा बसेल. एकदा माझ्याकडचे पैसे संपले की पुढे यातलं काहीच करता यायचं नाही. तेव्हा किती फायदा व्हायला हवा याचा हिशेब आधी न करून चालायचं नाही. नाहीतर मला मोक्ष मिळेल, पण इतरांना अफू मिळायची बंद होईल. मग तेच म्हणतील की मोक्षाच्या मागे लागून तू आमची गैरसोय केलीस.

संजय: हे सुख आणि दु:खासारखंच असावं. म्हणजे फायदा किंवा तोटा होत नाही तोवर ते वेगवेगळे समजायचे, पण एकदा यापैकी काहीतरी झाल्यावर ते सारखेच समजायचे. फायद्याची अपेक्षा ठेवायची नाही याचा अर्थ हा.

सीनू: पण तसं नाही. तोटा झाल्यावर जर मला दु:ख झालं नाही, तर हिशेबात कुठे गफलत झाली किंवा बाजारातला कुठला अंदाज चुकला हे शोधायला मी जाणार नाही. त्यामुळे माझं धंद्यातलं कसब सुधारणार नाही. ते जर सुधारायचं तर अपेश आल्याबद्दल थोडं तरी वाईट वाटायलाच हवं. गांधारात पिढ्यानपिढ्या हे अफूचं काम चालतं. त्यांचंही तसंच आहे. वाईट अफू आणि चांगली अफू ते सारखीच समजून चालले असते तर आत्ताइतकी तिची प्रत सुधारली नसती. मग तुम्हाला वाट्टेल ते खावं लागलं असतं.

कृपाचार्य: तुझं बरोबर आहे. काही वस्तू ह्या चांगल्या प्रतीच्याच असायला हव्यात.

मयाहुर: काम काय आहे त्यावर बहुतेक हे सगळं अवलंबून आहे. पण संजय जे म्हणतो ते मला अगदीच पटत नाही असं नाही. माझाही एक अनुभव मांडतो. लंबवर्तुळाचं क्षेत्र कसं काढतात ते तुम्हाला सांगितलं. मोठा व्यास, छोटा व्यास आणि तीनशे पंचावन्न यांचा गुणाकार करायचा आणि चारशे बावन्नने भागायचं. सोपं सूत्र आहे. यवनांना ते खूप आधीपासून माहित होतं. पण आता समजा आपल्याला लंबवर्तुळाचं क्षेत्र काढायचं नाही, तर कड किती लांब असते हे काढायचं आहे. त्याला परिमिती म्हणतात. गंमत अशी की लंबवर्तुळाची परिमिती किती असते याचं सूत्र कुणालाही माहित नव्हतं. यवनांमध्ये यावर खूप उलटसुलट चर्चा चालत असत. एकाच्या मते अमुक सूत्र बरोबर आहे, दुसऱ्याच्या मते दुसरं आहे असं त्रांगडं होतं. पण ही सूत्रं अचूक कधी नसायची. ती वापरून उत्तरं अदमासे बरोबर येत असत, पण थोडी ना थोडी चूक रहातच असे. काही वेळा उत्तर थोडं जास्त तर काही वेळा थोडं कमी येत असे. हे कुणालाच नीट समजत नव्हतं, पण इथे बरंच पाणी मुरतं आहे अशी शंका बळावत चालली होती. हा प्रश्न मी सोडवायला घेतला. तो हत्ती आहे असं समजून त्याचा सगळीकडून विचार केला, पण आपल्याला काय सापडायला हवं याबद्दल निश्चित अपेक्षा अशी मुद्दामच ठेवली नाही. मनात पूर्वग्रह न बाळगता गणित जिथे नेईल तिथे गेलो. खूप श्रम घेतले. शेवटी मी असं सिद्ध केलं की लंबवर्तुळाची परिमिती काढण्यासाठी अचूक सूत्र अस्तित्वात

नाही. आणि हे सिद्ध करत असताना जे नव्या प्रकारचं गणित माझ्यासमोर आपोआप उलगडत गेलं ते अतिशय घाटदार होतं. तेव्हा मला वाटतं असं की निश्चित अपेक्षा न ठेवता काम करत गेलो हे चांगलं झालं. जंगलात रानडुकराच्या पाठीमागे लागतात तसा एकच एक हव्यास धरून अचूक सूत्राच्या पाठीमागे लागलो असतो, तर सूत्रही सापडलं नसतं आणि ह्या खुसखुशीत नव्या गणिताचा शोधही लागला नसता.

कृपाचार्य: हे पटण्यासारखं आहे.

कृतवर्मा: सीनूचंही बरोबर आहे आणि मयाहुराचंही बरोबर आहे. काम काय आहे त्यावर ते अवलंबून आहे. मी म्हणेन की फायद्याची अपेक्षा न ठेवता काम करा हा एक सल्ला आहे. जी परिस्थिती तुमच्यासमोर असेल तिला हत्ती समजा, आणि हा सल्ला लागू आहे की गैरलागू हे तुमचं तुम्ही ठरवा. मोक्षाशी ह्या कशाचा काही संबंध नाही. मोक्ष नको असेल तरीसुद्धा सल्ला म्हणून तो शिल्लक राहतोच.

कृपाचार्य: कृष्णाच्या म्हणण्याचा असा अर्थ करता येईल का याबद्दल मला शंका आहे, पण विपर्यासच जर करायचा तर असा करायला हरकत नाही.

सीनू (मयाहुराला उद्देशून): तू गणिताचं तेवढं सांगितलंस. त्यापुढचा भाग मला माहित आहे, पण इतरांना सांगितलेला नाहीस.

मयाहुर: सांगण्यासारखं फार नाही.

सीनू: पण तरीही सांगूनच टाक.

मयाहुर: सांगतो. दडवण्यासारखंही त्यात काही नाही. मला जे काही शोध लागत गेले ते मी यवनांच्या पद्धतीप्रमाणे चामड्याच्या तुकड्यांवर लिहून ठेवले होते. त्याखेरीज मी जमवलेली कितीतरी पुस्तकं माझ्याजवळ होती. अथेनाईमध्ये एक हुशार माणूस होऊन गेला. नायक आणि नायिका शेवटी सुखी होतात असं नाटक जर लिहायचं असेल तर ते चांगलं कसं लिहावं ह्यावर त्याचं पुस्तक आहे. त्याचीही प्रत होती. यवनांचं नाटक इथल्यापेक्षा वेगळं असतं. तेव्हा मी खांडववनात राहात होतो. तिथेच हे सगळं होतं. अर्जुन आणि त्याचे भाऊ यांनी ठरवलं की त्यांना ती जागा गाव वसवायला हवी आहे. एक दिवस कुणाला काही न सांगता त्यांनी रानाला आग लावली. माझं सगळं त्यात गेलं. अंगाचा डावा भाग आणि चेहरा खूप भाजला पण जीव वाचला. पण नुकतंच मला हे समजलं की माझ्या आत्म्याला मात्र आगीमुळे काही इजा

झालेली नाही. तेवढी एक बातमी चांगली आहे.

कृपाचार्य: जे गेलं ते नंतर पुन्हा लिहून काढलंस का?

मयाहुर: नाही. मी शोधलेलं गणित बरोबर असेल तर कुणाला तरी ते पुन्हा सापडेलच. आणि नसेल तर जळलेलंच बरं.

सीनू: विक्षिप्त माणूस आहेस.

कृतवर्मा: तो विक्षिप्त असेल, पण कुणाच्या अध्यात नाही की मध्यात नाही असं त्याचं काम असतं. अर्जुनाचं तसं नाही. त्याला नेमून दिलेलं काम माणसं मारण्याचं आहे, तेव्हा ते तू निमूटपणे कर इतकं सांगणं पुरेसं वाटत नाही.

मयाहुर: हे कबूल आहे. तुझं काम निमूटपणे कर असं मीच स्वत:ला सतत सांगत असतो. पण अर्जुनाचं तसं नाही.

कृतवर्मा: हे युद्ध कसं आहे ते पाहा. धैर्यधर आणि शूरसेन हे दोघेही क्षत्रिय आहेत आणि एकमेकांना मारण्याचं काम त्यांना नेमून दिलेलं आहे. हे जर त्यांनी निमूटपणे केलं तर दोघांनाही इजा होईल. याउलट त्यांनी हे करायचं नाकारलं तर दोघेही आनंदाने घरी जाऊ शकतील.

अश्वत्थामा: म्हणजे पुन्हा निष्कर्ष हाच निघतो की जग निर्माण करताना नीट विचार केलेला नाही. हा संशय मला फार पूर्वीपासून आहे. तुम्ही एकदा नूबियामध्ये येऊन पाहा. मोजता येणार नाहीत इतके कावळे आणि मोजता येणार नाहीत इतकी घुबडं तिथे एकाच टापूत राहतात. एकमेकांचा प्रचंड दुस्वास करतात. कावळ्यांना दिवसा दिसतं पण रात्री नाही आणि घुबडांना रात्री दिसतं पण दिवसा नाही. दुपार झाली की कावळे जमा होतात आणि एकट्या पडलेल्या घुबडाला शोधून काढून घेराव घालून चोचींनी त्याचं रक्त बाहेर काढतात. याचा सूड घुबड मध्यरात्री घेतं. झाडाच्या फांदीवर रांगेने झोपलेल्या कावळ्यांवर झडप टाकून त्यांची डोकी फाडून ते आतला मेंदू बाहेर काढतं. दोन्ही जाती नेमून दिलेली कामं करतात. ती नेमून दिलेली असणार हे उघड आहे, कारण घुबडांचे आणि कावळ्यांचे आईबाप अगदी हेच करत होते. पण ती एकमेकांच्या जिवावर उठून करतात, आणि म्हणूनच मी म्हणतो की ही अख्खी योजना वेडेपणाची आहे. दोघे एके ठिकाणी राहणार नाहीत याची जग निर्माण करतानाच सोय बघायला हवी होती. निदान त्यांना

एकत्र का आणलं हे शांतपणे समजावून द्यायला हवं होतं. यातलं काहीच केलेलं नाही.

कृपाचार्य: घुबड हुशार असतं.

कृतवर्मा: मी असं म्हणणार नाही, कारण ते फक्त नेमून दिलेलं काम करतं. पण घुबडापासून माणसानं काही शिकणं ह्याला मात्र मी हुशारी म्हणेन. (कृपाचार्यांकडे रोखून पाहतो.)

कृपाचार्य: (थोड्या वेळाने) विचार करण्यासारखी बाब आहे. पण पाचवा नियम?

(कृतवर्मा जिवणीला मुरड घालून हसतो. आपली स्वत:ची हसण्याची उबळ दाबून धरून कृपाचार्य त्याला प्रत्युत्तर देतो. हे दोघे काहीतरी खाजगी बोलत असल्याचं इतरांच्या लक्षात येतं, पण विचारायला कुणी धजत नाही.)

कृतवर्मा: (सावरून बसत) मयाहुरा, तू काही म्हणण्याच्या बेतात होतास.

मयाहुर: खरं तर नव्हतो, पण म्हणून टाकतो. कदाचित आपण कृष्णावर अनाठायी टीका करत असू. जग निर्माण करताना त्याने अमुकअमुक करायला हवं होतं अशा पठडीतल्या आपल्या तक्रारी आहेत. पण त्याने ते निर्माण केलेलं आहे असं मला वाटत नाही.

कृपाचार्य: तसं फक्त वादाखातर गृहीत धरावं असं मी म्हणालोच होतो.

मयाहुर: जे काही तो म्हणतो आहे त्यातल्या कितीतरी बाबींची संगती लागत नाही. त्याने जर खरोखरीच जग निर्माण केलं असतं तर जगाची रचना आहे तशी का आहे यामागचं सुसंगत स्पष्टीकरण त्याला देता आलं असतं. पण त्याने ते आपल्याला दिलेलं नाही.

कृतवर्मा: कदाचित त्याला ते द्यायचं नसेल.

कृपाचार्य: पण मग आम्ही त्याचे चेले बनावं अशी अपेक्षा धरू नये.

मयाहुर: बऱ्याच गोष्टी जुळत नाहीत. मी तुम्हाला मघाशी म्हणालो होतो की फिलेस्तानमध्ये एक तरुण

माणूस होता, आणि तो गोष्टी सांगत फिरत असे. आपल्या बापाचं नाव याहवे असं तो सांगत असे, पण ह्या बापाला तिथे कुणीच पाहिलेला नाही. फिलेस्तानमधल्या लोकांची अशी समजूत आहे की जग याहवेने निर्माण केलं. त्यांच्या पुस्तकात तसं तपशीलवार लिहिलेलं आहे. तिथल्या लोकांना कृष्ण माहित नाही, आणि इथल्या लोकांना याहवे माहित नाही. शिवाय जगाची रचना अशी आहे की दोघाजणांनी एकमेकांना कळू न देता ते अर्धवट निर्माण करणं शक्य नाही. कारण तसं असतं तर फिलेस्तानमधले डोंगर इथल्यापेक्षा अगदी वेगळे असते, किंवा तिथल्या पाण्याची चव इथल्यापेक्षा अगदी वेगळी असती. पण तसं नाही. तेव्हा काहीतरी गोंधळ आहे. कृष्ण आणि याहवे यापैकी किमान एकजण खोटं बोलतो आहे हे नक्की.

कृपाचार्य: अशीही शक्यता आहे की याहवेने कृष्णाला निर्माण केलं असेल, पण ही गोष्ट त्याला भारतातल्या लोकांना कळू द्यायची नसेल. का ते माहित नाही. अर्थात ह्याच्या उलटही असू शकेल. कृष्णाने कदाचित याहवेला निर्माण केलं असेल, पण ही गोष्ट त्याला फिलेस्तानमधल्या लोकांना कळू द्यायची नसेल.

कृतवर्मा: किंवा ह्या दोघांमागचा सूत्रधार वेगळाच असू शकेल. जग कसं असायला हवं ह्याचा आराखडा तयार करून याहवे आणि कृष्ण ह्या दोघांना जगाच्या वेगवेगळ्या भागांत तो अंमलात आणायला त्याने सांगितला असेल. आपण नामानिराळे राहावं अशीच त्याची इच्छा असेल. याहवे फिलेस्तानमध्ये सांगतो की जग मी निर्माण केलं आणि कृष्ण भारतात सांगतो की जग मी निर्माण केलं. दोघेही अर्धसत्य सांगताहेत, पण आपापल्या जागी त्यांची प्रतिष्ठा टिकून राहावी म्हणून सूत्रधार कदाचित हे खपवून घेत असेल.

मयाहुर: याहवेने लिहिलेलं पुस्तक वरवर जरी वाचलं तरी हे लगेच कळतं की स्वत:चं कौतुक करून घ्यायची त्याला मोठी हौस आहे. कृष्णाचाही स्वभाव यापेक्षा फार वेगळा दिसत नाही. तेव्हा तू म्हणतोस ते शक्य आहे. आणि एकदा ह्या दिशेने विचार सुरू केला की काही परस्परसंबंध आपोआप लक्षात येत जातात. संजय मघाशी म्हणाला की कृष्णाने सूर्याला योग शिकवला आणि सूर्याने मनूला शिकवला. योग म्हणजे काय ते मला ठाऊक नाही आणि सूर्याचा इथे संबंध काय हेही ठाऊक नाही. पण ते महत्त्वाचं नाही. काही जरी असलं तरी मनू हा कृष्णाचा चेला आहे इतकं यावरून उघड होतं. ह्या मनूबद्दल मला थोडीफार माहिती आहे. असं सांगतात की एकेकाळी खूप मोठा पूर आला आणि सगळी माणसं बुडून मेली. त्यावेळी मनूने एक गलबत तयार करवून घेतलं आणि एका देवमाशाच्या शिंगाला ते दोरखंडाने बांधून पुरातून तरून नेलं. पूर ओसरल्यानंतर पाण्यातून बाहेर आलेल्या एका अप्सरेला तो जुगला. त्यातून पुन्हा माणसं जन्माला आली. आता नवलाची गोष्ट अशी की फिलेस्तानमध्ये नोहा नावाचा एक याहवेचा चेला होता. त्यानेही एक गलबत तयार करवून घेतलं आणि पूर ओसरल्यानंतर तशीच पुन्हा माणसं जन्माला घातली.

तेव्हा तर्क असा करता येतो की फिलेस्तानपासून भारतापर्यंत व्याप्ती असणारा एकच मोठा पूर आला असणार. ह्या दोघांनीही तो आपापलं अवडंबर माजवण्यासाठी वापरून घेतला. भारतातल्या माणसांना वाटतं की आपण कृष्णाच्या चेल्याची मुलं आहोत आणि फिलेस्तानमधल्या माणसांना वाटतं की आपण याहवेच्या चेल्याची मुलं आहोत. इकडचा पत्ता तिकडे नाही.

सीनू: पण असं असेल तर ह्या सूत्रधाराने फिलेस्तानातून भारतात यायला रस्ता ठेवायला नको होता. तसा तो ठेवल्यामुळेच हे गुपीत उघड झालं.

मयाहुर: कदाचित हा रस्ता मूळ आराखड्याचा भाग नसेलही. नंतर कुणीतरी तो काढला असू शकेल. आपण म्हणतो आहोत की जग निर्माण करण्याचं काम एका सूत्रधाराने दोघांना वाटून दिलं असेल. ढोबळ कल्पना म्हणून हे ठीक आहे, पण अर्थात ते दोघे नव्हेत तर अनेकजण असावेत. कारण उदाहरणार्थ चीनमध्ये कुणी याहवेचं नाव ऐकलेलं नाही आणि कृष्णाचंही नाही.

कृपाचार्य: पण हा आराखडा किती जुना आहे हेही आपल्याला माहित नाही. त्यामुळे हा सूत्रधार आज जिवंत असेलच असं खात्रीने म्हणवत नाही. मध्ये केव्हातरी तो मेला असू शकेल. आणि एकदा त्याचा प्रभाव मागे पडल्यानंतर इतरांनी आपापल्या बुद्धीने जगाच्या रचनेत फेरफार केले असंही शक्य आहे.

कृतवर्मा: पण असं असेल तर काय करायचं हे ठरवणं फार अवघड आहे. कारण कुठल्या बाबतीत कुणाकडे जबाबदारी आहे याबद्दल निश्चित काही समजत नाही.

सीनू: अजून किती वेळ राहिला आहे?

संजय: सतरावा अध्याय संपत आला आहे. अठराचा आपला अदमास बरोबर असेल तर आता हे लवकरच आटपेल. पण कृतवर्म्याचा सल्ला कृष्णाने मानलेला दिसतो. नुकताच तो म्हणाला की माणसांचे तीन प्रकार पडतात. ताजं खाणारे, शिळं खाणारे, आणि तेलकटतिखट खाणारे. आपल्यापैकी कोण कुठल्या वर्गात मोडतो ह्यावर चर्चा घडवून आणता येईल.

कृतवर्मा: नको. मनोरंजन करून घेण्याची वेळ आता मागे पडलेली आहे.

कृपाचार्य: पण पुढचं ठरवायला हवं.

सीनू: मला एक शंका येतेय ती बोलून दाखवते. मग मला तर्कटी म्हणा, काही म्हणा.

कृपाचार्य: बोल.

सीनू: अर्जुन भेदरट आहे आणि मनाने डळमळीत आहे. शिवाय कृष्णासमोर तो आता पुरता गयाळ होऊन गेलेला आहे. पण मी म्हणते की तो बुद्धीने मंद नाही. आपल्याला पडलेले प्रश्न त्यालाही पडले असणार, पण कृष्णाला ते समोरासमोर विचारायचा त्याला धीर होत नसावा.

कृतवर्मा: पण मग यावर आम्ही काय करणार?

सीनू: सांगते. संजयला जो वर मिळालेला आहे त्याबद्दल अर्जुनाला ठाऊक असणार.

संजय: हो, ठाऊक आहे.

सीनू: म्हणजे अर्जुनाला हा अंदाज असणार की आपलं आणि कृष्णाचं संभाषण खाजगी नाही. कृष्ण जे म्हणतो आहे त्याचा नीट अर्थ त्यालाही लागत नसावा. तेव्हा संजयने हे सगळं ऐकून इतरांना सांगावं अशी त्याचीही इच्छा म्हणा किंवा अपेक्षा म्हणा, पण असावी. मुखदुर्बळ असल्यामुळे तो स्वत: काही करू शकत नाही. पण इतरांनी आपल्या ह्या बिकट अवस्थेची दखल घ्यावी आणि योग्य वाटेल ते करावं अशी एक कळकळ त्याच्या मनात असणार. माझा तर्क मी थोडा ताणते आहे, पण हे अगदीच अशक्य वाटत नाही.

कृपाचार्य: नाही, अशक्य मुळीच वाटत नाही.

कृतवर्मा: मी एक सुचवतो. सगळे धैर्यधर आणि सगळे शूरसेन इथेच आपल्याभोवताली आहेत. त्यांना गटागटाने एकत्र आणता येईल. एकूण परिस्थिती समजावून देऊन युद्ध करायचं की नाही हे आता तुम्हीच ठरवा असं सौम्य शब्दांत आपल्याला म्हणता येईल. त्यांचा कल काय होतो हे पाहून पुढचं ठरवता येईल.

सीनू: कल्पना चांगली आहे. मी आणि मयाहुर इथून केव्हाही बाहेर पडू शकतो. पण तुमची काळजी वाटते.

अश्वत्थामा: दोन्ही सैन्यांतले कितीतरी हत्ती माझ्या ओळखीचे आहेत. त्यांच्यापर्यंत निरोप पोहोचवण्याचं

काम माझ्याकडे लागलं. आणि हे एकदा झालं की घोड्यांनाही तो आपसूक कळेलच. ह्या चर्चेमध्ये त्यांचंही मत घेता येईल. पण तसं पाहिलं तर घोडे कधीच हत्तींच्या शब्दाबाहेर नसतात.

मयाहुर: कल्पना खरंच चांगली आहे. पण मला वाटतं की त्याआधी एक शेवटची संधी देऊन बघावी.

कृपाचार्य: कुणाला?

मयाहुर: ज्या कुणाच्या हाती अंतिम सूत्रं असतील त्याला. मग तो कृष्ण असो की आणखी कुणी असो. आपले प्रश्न त्याच्यापर्यंत पोहोचले असतील आणि उत्तरं त्याच्याकडे असतील तर ती त्याने आपल्याला कळवायला हवीत. नसतील तर इलाज नाही. म्हणजे पोहोचले नसतील तर किंवा उत्तरं नसतील तर किंवा असून द्यायची नसतील तर.

कृतवर्मा: माझी हरकत नाही.

कृपाचार्य: माझीही नाही.

सीनू: मग एक करून बघूया. (आपल्या गाड्यात जाते. तिथे शोधाशोध करून तालपत्रांची एक चळत आणि मघाचाच तांब्या घेऊन परत येते. चळत समोर ठेवते.) सगळी कोरी आहेत. माझ्याकडे नेहमी साठा असतो. इथे मी ही मांडलेली आहेत, लिही म्हणावं काय लिहायचं ते. उत्तरं बरोबर वाटली तर आपण लागलीच प्रती काढून घेऊ. (तांब्या मयाहुराकडे सोपवते.) किती वेळ द्यायचा?

(मयाहुर अश्वत्थाम्याच्या ढुंगणावर हाताने थापटतो, तसा अश्वत्थामा धार सोडू लागतो. मयाहुर ती तांब्यात भरून घेतो. तांब्याच्या तळाला असलेलं लहान भोक त्याने आपल्या तर्जनीने बंद केलं आहे. चळत मध्यभागी ठेवून तिच्याभोवती रिंगण करून सगळेजण उभे आहेत.)

मयाहुर: अठरा क्षण देऊया. त्याचा अठराचा आग्रह आम्ही पाळतो, आमचा उत्तरांचा आग्रह त्याने पाळावा. (तांब्याखालचं बोट बाजूला करून धार पडू देतो. आतल्या खुणांकडे तो बारीक लक्ष ठेवून आहे. 'अठरा क्षण' हा अवधी उत्कंठा ताणली जावी इतका मोठा आहे, पण कंटाळा यावा इतका मोठा नाही. रिंगणाभोवतालची गर्दी वाढते आहे. मयाहुर तांब्याखाली पुन्हा बोट धरतो तशी धार पडायची थांबते.) वेळ संपली.

(अश्वत्थामा पुढे होतो आणि एकेक पान आपल्या सोंडेने काळजीपूर्वक बाजूला करत जातो.)

अश्वत्थामा: (त्यांची पुन्हा व्यवस्थित चळत करून सोंडेने सीनूपुढे धरतो.) घे. सगळी कोरी आहेत.

(कृपाचार्य आणि कृतवर्मा एकमेकांकडे दीर्घकाळ पाहत राहतात.)

सीनू: मला नकोत ती आता.

अश्वत्थामा: ठीक आहे. (सोंड मागे घेऊन पानं तोंडात ठेवतो आणि चावून चावून खाऊन टाकतो.) माफ करा हं मंडळी! पण राहवत नाही. (शेणाचा पो टाकतो.)

(काहीसा लांब जाऊन मयाहुर तांब्या ओतून देतो आणि हाताची बोटं झाडत राहतो. भोवतालचे सैनिक अवघडून स्तब्ध उभे आहेत. 'मातर! मातर! तू कुठे आहेस? मातर!' अशा आरोळ्या दूरवरून येऊ लागतात. सीनू त्या दिशेला तोंड वळवते आणि उत्साहाने हात हलवत राहते.)

सीनू: माझी पोरगी इकडेच येते आहे. म्हणजे ह्या दोघांचं बोलणं संपलेलं दिसतंय.

संजय: हो, नुकतंच संपलं.

कृपाचार्य: कोण काय म्हणालं शेवटी?

संजय: अर्जुन म्हणाला की आता मी युद्धाला तयार आहे. काय करायचं ते मला नेमकं समजलं आहे आणि माझा गोंधळ नाहीसा झाला आहे.

अश्वत्थामा: माझा नाही.

❒ ❒ ❒

इमले अक्षरतेचे,

अर्थात अष्टाश्वमेध नाटक

अंक पहिला

(स्थळ: दिवाणखाना. संपूर्ण नाटक इथे घडतं. बाहेरचं जग, बंगल्याचा वरचा मजला आणि खालच्या मजल्यावरचा आतला भाग यांना जोडणारी अशी एकूण तीन दारं दिवाणखान्याला आहेत. अमुक पात्र अमुक प्रसंगी यांपैकी कुठल्या दारातून ये जा करतं हे संदर्भावरून स्पष्ट व्हावं.

दिवाणखान्यात एकोणीसाव्या शतकातल्या इंग्रजी पद्धतीचं शिसवी फर्निचर आहे. पायाखाली भारी गालिचा आहे. छताला झुंबर आहे, ह्यातला दिवा लावण्या-विझवण्यासाठी भिंतीलगत जाड दोर आहे. याखेरीज नेपथ्यासाठी गरजेच्या असलेल्या वस्तू पुढीलप्रमाणे: टेलिफोन, बुद्धिबळाचा मोठ्या आकाराचा भपकेबाज सेट, पुरुषभर उंचीची प्रशस्त अलमारी, भिंतीवर लटकवलेली लांब नळीची बंदूक, ड्रिंक्स कॅबिनेट, ग्रॅन्डफादर क्लॉक. यात पाचला एक मिनिट कमी आहे.

पडदा उघडतो तेव्हा पन्नाशीचा नोकर रावजी एका कुंच्याने फर्निचरवरची धूळ झटकताना दिसतो. पांढरा सदरा आणि धोतर असा त्याचा पेहराव आहे. फोन वाजतो. तो घेण्याची रावजीला विशेष घाई नाही. सावकाश चालत ग्रॅन्डफादर क्लॉककडे जाऊन तो निरखून वेळ पाहतो आणि मग फोन उचलतो.)

रावजी: गुड आफ्टरनून! नो-नो-नो-नो. आय मीन येस, धिस बॅरिस्टर जातेगावकर्स बंगलो. धिस मोस्ट डेफिनेटली बंगलो ऑफ एमिनंट बॅरिस्टर जातेगावकर फ्रॉम मिडल टेंपल. बट गुड इव्हिनिंग नो. गुड आफ्टरनून येस, बट गुड इव्हिनिंग नो. अकॉर्डिंग टू रेनमार्टिन्स मोस्ट लर्नेड गाईड ऑन द यूसेज ऑफ इंग्लिश लँग्वेज, टिल फाइव्ह ओ क्लॉक इट इज गुड आफ्टरनून. आफ्टर फाईव्ह ओ क्लॉक गुड इव्हनिंग इज ॲप्रोप्रिएट. (घड्याळाकडे वाकून पाहतो.) नाउ येस! नाउ ॲप्रोप्रिएट. नाउ मोस्ट गुड इव्हिनिंग सर!

येस-येस-येस. आय मराठी ऑल्सो स्पीक. आय अनस्टम्बल्ड मराठी स्पीक. आय द रावजी ऑफ मराठी लँग्वेज. नो-नो-नो. शिवाजी नो. रावजी. आय नॉट द शिवाजी ऑफ मराठी लँग्वेज. मी मराठी भाषेचा रावजी आहे. शिवाजी नाही. मराठी भाषेचे शिवाजी म्हणजे विष्णुशास्त्री चिपळूणकर. ते मेले. ते जुन्या पुण्यात राहायचे. इथे नाही. लकडी पुलाच्या पलिकडे जे कळकट्ट पुणं आहे तिथे ते राहायचे. आम्ही तिथे राहात नाही. आमच्या सरांचा बंगला नव्या पुण्यात आहे. डेक्कन जिमखान्यावर. नाही, सर घरी नाहीत. हो, सरांचा बंगला पुण्यात आहे, पण सर पुण्यात नाहीत. दि मोस्ट एमिनंट बॅरिस्टर जातेगावकर इज इन बॉम्बे. ही विल रिटर्न टु पूना इन द इव्हिनिंग बाय डेक्कन क्वीन. आपले कंत्राटदार मोटवानी आहेत ना, त्यांच्यावर लाच दिल्याचा आरोप आहे. त्यांची केस आहे बॉम्बे हाय कोर्टात. म्हणून गेलेत. ते एक झालं. आणि इथे पुणे मंडईत एक माथाडी कामगार संघ आहे, त्याच्यावर बेकायदा संप केल्याचा आरोप आहे. ती पण केस त्याच कोर्टात त्याच दिवशी आहे. सर इज किलिंग टू बर्ड्स इन वन स्टोन. दोन्ही केसेसची आर्ग्युमेंटस् एकापाठोपाठ करून ते परत येणार आहेत. पण दोन्हीत तसा चांगलाच फरक आहे बरं का! अल्दो दे आर किल्ड विथ वन स्टोन, दे आर नॉट बर्ड्स ऑफ वन फेदर. माथाडी कामगार म्हणजे एकजात लेकाचे भणंग. त्यामुळे त्यांची केस प्रो-बोनो आहे — सर त्यांच्याकडून पैसे घेणार नाहीत. पण मोटवानी काही भणंग नव्हेत; बक्कळ पैसेवाले आहेत. तेव्हा त्यांची केस ॲन्टिबोनो आहे — त्यांच्याकडून आमचे सर दाबून फी घेणार. असं ते एकूण आहे.

ओके देन. मला इथे बरीच कामं आहेत. तुमच्याशी बोलत बसलो तर कामं कोण करेल? ओके देन. उद्या या, परवा या, केव्हाही या. डेक्कन जिमखान्यावर 'तमसा' बंगला म्हणून विचारा. कुणीही सांगेल. 'त-म-सा'. काय तुम्ही तरी?! तुम्हाला तमसा नदी माहित नाही? अहो, टॉवर ब्रिजच्या खालून वाहते ती तमसा. आपल्या लंडनमधल्या जुन्या दिवसांची आठवण राहावी म्हणून सरांनी बंगल्याचं नावच तसं ठेवलं. त्याचं असं आहे की बाईसाहेबांचं नाव सावित्री. म्हणजे लग्नापूर्वीचं नाव गोदावरी, पण साहेबांनी लग्नात बदलून 'सावित्री' केलं. लग्नानंतरच्या पहिल्याच रात्री सर बाईसाहेबाना म्हणाले की आपल्याला दोन मुलं असणार. आणि तसंच झालं. बॅरिस्टरसरांचा होरा कधीही चुकत नाही. पहिला मुलगा झाला. त्याचं नाव 'तनय' ठेवलं. त्यानंतर सहा वर्षांनी मुलगी झाली. तिचं नाव 'मधुरा' ठेवलं. तनय-मधुरा-सावित्री म्हणजे 'त-म-सा'. आहे की नाही?

काय म्हणता? छे-छे! मी कसला जातोय? इथे सगळ्या घराचा डोलारा मीच पेललेला आहे. मला कुठे सवड होतेय ते लंडन आणि फिंडन बघायला? बट नूक-ॲन्ड-क्रॅनी ऑफ लंडन आय नो व्हेरी वेल. समजा मला सर नुसते म्हणाले की 'चिसविक मॉलपासून टूट्वेंटीवन बी बेकर स्ट्रीटपर्यंत घेऊन चल', तर एकाही बॉबीच्या डोक्यावरच्या घमेल्याला धक्का न लावता डोळे झाकून व्हिक्टोरिया हाकत सरांना घेऊन जाईन. एव्हरी पार्ट-ॲन्ड-पार्सल ऑफ द ग्रेट मेट्रॉपोलिस ऑफ लंडन आय नो व्हेरी वेल.

ओके देन. या मग. किंवा असं करा, आधी रीतसर पत्र पाठवा. तुमची केस काय आहे ते स्वच्छ शब्दांत लिहून कळवा. पत्र वाचून सर तुम्हाला सांगतील केस घेणार की नाहीत ते. काय? पत्ता? घ्या, पत्ता नीट लिहून घ्या: 'बॅरिस्टर यदुनाथ वामन जातेगावकर, 'तमसा' बंगलो, डेक्कन जिमखाना, पूना-अपॉन-मुठा.' गॉट इट? ओके देन. सरांनी अपॉइंटमेंट दिली तर या. तसेच नका येऊ. पण येणार असाल तर बंगला सापडायला अगदी सोपा आहे. 'तमसा' म्हणून विचारलंत तर कुणीही सांगेल. अक्रोडाच्या लाकडात ठसठशीत देवनागरी अक्षरांनी नाव लिहिलेलं तुम्हाला दिसेल. शेजारच्या बंगल्याचं नाव 'श्रमसाफल्य'. पण ती खूण लक्षात ठेवू नका. डेक्कनवर 'श्रमसाफल्य' नावाचे किमान एक डझन बंगले आहेत. तेव्हा ती खूण लक्षात ठेवून काही उपयोग नाही. उगीच भरकटाल. ओके देन. गुड इव्हिनिंग.

(फोन ठेवतो.)

कुणीही लुंगेसुंगे उगीच फोन करत राहतात. सरांच्या नावाचा दबदबाच असा आहे की सगळ्यांना वाटतं आपली केस त्यांनीच घ्यावी. मग त्यांची फी काय, आपल्याला परवडेल का, त्यांचे बाकी अशिल किती आहेत याचा काही विचार नाही. पण ते असायचं ते असो. मी आपला सगळ्यांशी मऊपणाने वागतो. कुणाचं वकिलपत्र घ्यायचं आणि कुणाचं नाही हा निर्णय सरांचा. हां. तर इथे काय करत होतो मी? सफाई करत होतो. हा बुद्धिबळाचा सेट साहेबांनी जाकेस ॲन्ड सन्सकडून दोनशे गिन्न्या मोजून घेतला. याच्यावर धूळ चढलेली सरांना मुळीच खपत नाही. (कुंचा नाजुकपणे फिरवत मोहरे साफ करू लागतो.) आज रात्री ते परत येतील तेव्हा झुंबराच्या प्रकाशात कसा लखलखीत दिसायला हवा.

३

(मोठा मुलगा तनय आत येतो. त्याने जांभळ्या रंगाचा सिल्क शर्ट आणि गुलाबी रंगाची सलवार घातली आहे. पायात मोजड्या आहेत. केस भरघोस आहेत. आळोखेपिळोखे देतो.)

तनय: रावजी, अरे रावजी. चहा आण बाबा. मोठी मेहेरबानी होईल.

रावजी: उठलात का एकदाचे?

तनय: आत्ताच उठलो. अजून दात घासायचे आहेत. ते नंतरच केव्हातरी घासेन. चहा आण.

रावजी: आणतो. संध्याकाळचे पाच वाजताहेत म्हणजे आपल्या हिशेबाने झुंजूमुंजू झालंच आहे. व्हेन मॉर्निंग बिकम्स इव्हिनिंग इट इस ओन्ली प्रॉपर दॅट इव्हिनिंग बिकम्स मॉर्निंग.

तनय: मान्य आहे रे बाबा. पण नेमाने झोपून नेमाने उठायला मी काही अभ्यासू आणि कष्टाळू कॉलेजतरुण नव्हे. अभ्यास करून, कष्ट करून आयुष्यात मला काही मिळवायचं आहे का? नाही. जरी कष्ट केले तरी काही मिळणार आहे का? नाही. तशी धमक माझ्यात आहे का? नाही. मला महत्त्वाकांक्षा नाही. यापूर्वी नव्हती आणि आत्ताही नाही. मग निष्कारण सकाळी लवकर उठून आपल्या उर्वरित आयुष्याचा हा पहिला दिवस आहे असं स्वत:ला बजावून सांगून पुढे मी काय करणार आहे? काही नाही. म्हणून मग कालची रात्र अशीच काहीबाही वाचत विचार करत मनन करत जागून काढली. या निशा सर्वभूतांना तस्यां जागर्ति संयमी. शितावर जमलेली भुतं जेव्हा झोपलेली होती तेव्हा संयमाने निशापाणी करीत विश्वाची चिंता करीत मी आपला जागा होतो. ह्या चिंतेचं ओझं जेव्हा पेलवेनासं झालं तेव्हा श्रान्त आणि क्लान्त मनाने रामप्रहरी जो डोळा लागला तो हा आत्ता उठतो आहे. माझ्या उर्वरित आयुष्याची ही पहिली संध्याकाळ आहे. तेव्हा चहा घेऊन ये.

रावजी: निशापाणी केलंत हे मला ठाऊक आहेच. काल संध्याकाळी मी डीकॅन्टर भरून ठेवला होता तो आता बराच खाली गेलेला दिसतो आहे. तुम्ही त्याला संयम म्हणा हवं तर, पण डीकॅन्टरकडे पाहता तसं वाटत नाही.

तनय: अरे, संयम-संयम म्हणजे तरी शेवटी काय? निशापाण्याचा खळाळ असा जबरदस्त असतो की संयमाच्या खडकाची भुसभुशीत माती करून सोडल्याखेरीज त्याचं शांतवन होत नाही. तेव्हा त्या मातीतच देह टाकावा आणि ह्या खळाळातून उमटणाऱ्या अनाहत नादाची बेहोशी अंगावर लपेटून घ्यावी इतकंच काय ते शेवटी आपल्यापाशी उरतं:

कुशीत आली जेव्हा अलगद ओली उत्तररात्र
शरीर माझे अवघे बनले मदिरेचे पात्र

थोडक्यात सांगायचं तर काल जास्त झाली. तेवढं कबूल करतो.

रावजी: ही ओली बेहोशी की काय जी म्हणता ती स्वत:च्या खर्चाने साजरी झाली तर बरं होईल.

तनय: कबूल आहे बाबा, कबूल आहे. पण निदान या जन्मी ते होणार नाही. पैशांतलं मला काही कळत नाही. ते मला लागतात इतकंच कळतं. तेवढे जो कुणी देईल त्याचा मी आभारी असतो. आमचे आबा उर्फ बॅरिस्टर जातेगावकर यांच्या पैशावर मी जगत आलो आहे, तेव्हा त्यांचा आभारी आहे. त्यांनी आम्हाला जन्म दिला, आभारी आहे. पैसे देताहेत, आभारी आहे. स्वत्व मात्र दिलं नाही, पण आभारी आहे. आमच्या आबांनी ठरवूनच टाकलं होतं की आपण शरीराने पुण्यात आणि मनाने लंडनला राहायचं. डेक्कन जिमखान्यावर त्यांचा बंगला असणार आणि त्याचं नाव 'तमसा' असणार हे आमच्या जन्माआधीच ठरून गेलेलं होतं. त्यामुळे माझं नाव 'त' ने सुरू होणार हेही ओघाने आलंच. ह्या बेताला अनुसरून अस्मादिकांचं नाव ठेवलं काय तर मारे 'तनय'! म्हणजे 'मुलगा'! आपल्या मुलाचं नाव मुलगा ठेवावं इतकीच आमच्या आबांच्या लेखी आमची किंमत. 'बाबारे, तू खास कुणी नाहीस' असं मला सांगण्याचा हा त्यांचा मार्ग. पण ठीक आहे. जे आहे ते आहे. आभारी आहे.

रावजी: स्वत:ची किंमत स्वत: ठरवायची असते. द वर्ल्ड इज ॲज इज. मॅन हू इज नथिंग हॅज नो प्लेस इन इट. रिमेंबर दॅट.

तनय: I always remember that, Raoji. I never forget that. जीवनाची लढाई सुरू होण्यापूर्वीच ती हरलेला मी माणूस आहे. बाहेरच्या जगात मला स्थान नाही इतकं मला चांगलं ठाऊक आहे. ह्या घराच्या सांदीकोपऱ्यातच फक्त कुठेतरी माझी जागा आहे. आमच्या उच्चशिक्षित, धनदांडग्या बापाच्या जिवावर मी जगणार, यकृताला शिलिंगच्या नाण्याएवढी मोठ्ठाली भोकं पडेपर्यंत त्याच्या खर्चाने दारू पिणार आणि शेवटी मरून जाणार. हेच माझ्या नशिबी आहे. त्यात बदल होणार नाही. आबांनी हाकलूनच दिलं तर शेजारच्या बंगल्यात जागा मागेन. पण सकाळी साध्या भाताबरोबर फोडणीचं वरण आणि संध्याकाळी फोडणीच्या भाताबरोबर साधं वरण खाणारे ते निरुपद्रवी आणि पापभीरू लोक मला त्यांच्यात सामावून घ्यायचे नाहीत. तेव्हा जा रावजी, कषायपेय घेऊन ये, जेणेकरून तिच्यात पडलेल्या मक्षिकेप्रमाणे मला माझी दु:खं बुडवून टाकता येतील. पण ती तसली टी-सर्व्हिस वगैरे विलायती नखरे नकोत. सावित्री हे पवित्र नाव धारण करणाऱ्या अतिसात्विक स्त्रीच्या अंगावरील गर्भरेशमी नऊवारी साडीतून ह्या पृथ्वितलावर आम्ही पडलेलो आहोत. झग्यातून नव्हे. तेव्हा चहा नुसत्या कपात घेऊन ये. आबा तर इथे नाहीत ना?

रावजी: ते मुंबईला गेले आहेत. डेक्कन क्वीनने परत येतील.

तनय: उत्तम. म्हणजे त्यांच्याकडून पाणउतारा करून न घेता मला चहा पिता येईल. पण त्यात आता कंजुषी करू नकोस. काठोकाठ भरू दे प्याला, फेस भराभर उसळू दे!

रावजी: आणतो, पण कवित्व आवरा.

३

(कपाळाला आठ्या घालत रावजी आत जातो. तनय अलमारीतली पुस्तकं चाळतो, पण थोड्याच वेळात कंटाळून खिडकीबाहेर विमनस्कपणे पाहात राहतो. पोटात कळ येते आहे असं त्याच्या चेहऱ्यावर दिसतं, पण तो भाव चेहऱ्यावरून पटकन पुसून घेतो. बॅडमिंटनची उघडी रॅकेट हातात घेतलेली मधुरा येते. हिने खेळायचे कपडे घातले आहेत, पण लिपस्टिक लावली आहे आणि केस लांबसडक आहेत.)

मधुरा: मेरे प्यारे भैया!

तनय: मेरी प्यारी बेहेना! आलीस का क्लबातून? How was the tournament?

मधुरा: फॅन्टॅस्टिक! मस्त! सुपर! काय खेळलेय मी! अरे, ती फॅनी डिसूझा ना मॅचच्या आधी सॉलिड भाव खात होती. म्हणे माझी रॅकेट विलोवूडची आहे, मेड इन जलंधर आहे, यंव आहे आणि त्यंव आहे. मी म्हटलं बघतेच तुला. आज ना दादा, तिला मी लव्हगेमच दिला. अस्से एकेक स्मॅश मारले की तिला घेताच येईनात! (बॅडमिंटन खेळल्याचा अभिनय करते.) खटॅक-खटॅक-खटॅक-टॉक! नुसती जीव खाऊन पळतेय इकडून तिकडे. गेमपॉइंटला तिच्या नाकाडावरच शटल मारलं. फटॅक-टपॅक! फिफ्टीन-लव, गेम अॅन्ड मॅच मिस मधुरा जातेगावकर. क्लॅप-क्लॅप-क्लॅप! सॉलिड मज्जा आली. नंतर तिला मी माझ्या रॅकेटवरचा लोगोच दाखवला: Made in England by Appointment to His Royal Highness the Duke of Cambridge! काय पण तोंड उतरलं तिचं! दादा, you should have seen it ! नंतर कोच मॅडमनी कित्ती कौतुक केलं माझं. त्या म्हणाल्या की अशीच खेळलीस तर बॉम्बेला जिमखाना टूर्नामेंटमध्ये नक्की सिलेक्ट होशील. दादा, मी सिलेक्ट झाले ना तर पप्पा आणि तू दोघांनी पण माझा गेम बघायला बॉम्बेला यायचं. आपण चौपाटीवर मस्त भेळ खायची, एअर कंडिशनिंगमध्ये बसून सिनेमा बघायचा आणि मग कफ परेडला शॉपिंग करायचं! त्या रीना ओबेरॉयचा कसा कश्मीरी एम्ब्रॉयडरी केलेला आकाशी रंगाचा ड्रेस आहे ना अगदी तसाच मला पण पाहिजे. And I want new red shoes! ड्रेसवर काय मस्त दिसतील! (काल्पनिक ड्रेस चिमटीत उचलून धरून दिवाणखान्यात इकडून तिकडे मिरवत चालत जाते.) पप्पांच्या सुटाच्या खिशाला भोकच पाडणार आहे मी. But he loves me! He won't mind a bit. आणि त्यांना काय, मोटवानीसारखा आणखी एक क्लाएंट मिळाला की भोक पुन्हा आपोआप बुजेल.

तनय: Don't worry, मेरी बेहेना. We will go to Bombay together. पण आबांच्या खिशाला भोक पडेल का याची काळजी करू नकोस. त्याआधी माझ्या यकृताला भोक पडणार आहे. पिऊनिया व्हिस्की, जाई माझा झोक, यकृताला भोक, पडले गा!

मधुरा: झालं का तुझं सुरू?! काही भोकबीक पडत नाही. तू चांगला ठणठणीत आहेस. आणि पप्पांना सारखं आबा-आबा का म्हणतोस? किती घाटी आहेस! त्यांना आवडत नाही हे तुला माहित

आहे.

तनय: अगं, त्यांना आवडत नाही म्हणूनच म्हणतो. मी जीए कुलकर्णी वाचायला सुरुवात केली ना, तेव्हा त्यांचं संपूर्ण नाव काय असेल याबद्दल मला फार उत्सुकता होती. 'ए' म्हणजे एकनाथ असं मी ठरवून टाकलं होतं, पण 'जी' म्हणजे काय ते सुचेना. 'जीवाजी' असं एक सुचलं, पण ते बरोबर वाटेना. मग विचार केला 'जीमूतवाहन' असेल का? तू कल्पना कर: 'जीमूतवाहन एकनाथ कुलकर्णी' आत आहेत स्लॅश नाहीत अशी पट्टी बाहेर दारावर लावायची! शेजारी हबकतील की नाही? पण शेवटी एकदाचं कळलं: जीए कुलकर्णी म्हणजे गुरुनाथ आबाजी कुलकर्णी! त्यांच्या वडिलांचं 'आबाजी' हे नाव मला इतकं आवडलं की आपल्या बाबांचं मी तेच नाव ठेवून टाकलं. आता जरासे चडफडले, पण मी पडलो त्यांचा कुलदीपक. सांगणार कुणाला?! सारांश काय तर तुझे जे पप्पा तेच माझे आबा. मधुरा is to पप्पा as तनय is to आबा. After cross multiplying, मधुरा times आबा is equal to तनय times पप्पा. म्हणजे मधुरा times आबा minus तनय times पप्पा is equal to zero. A big big zero. माझ्या यकृतावर कोरला गेला आहे तेवढा मोठा झीरो! पण आता हे समीकरण कसं सोडवणार? Who will solve this equation?! And what is the point of solution when it leads to dissolution? समीकरण सुटताना विरघळत जाणारे कंस जर पुन्हा एकदा हातमिळवणी करून तुमच्या गळ्याभोवतीच वेढा देणार असतील —

(रावजी खाकरतो तसं तनयला भान येतं. मधुरा सुटकेचा निश्वास सोडते. रावजीच्या हातात चांदीची टी-सर्व्हिस आहे. 'हे काय?' असा चेहरा करून तनय रावजीकडे बघतो.)

रावजी: दोघांसाठी आणला आहे. तोंड वाईट करू नका. मुकाट्याने प्या. तुम्ही लाख म्हणाल मला नुसता कपात चहा आण म्हणून. आम्हाला तसं कसं करता येईल? या घराचं काही एक वळण म्हणून आहे की नाही? (मधुराला उद्देशून) टी फॉर टू, मिस जातेगावकर. विथ स्कोन्स ॲन्ड क्रीम. ऑल्सो कुकुंबर सॅन्डविचेस.

मधुरा: रावजी, तुला किती वेळा सांगितलं आहे: 'क्यूकंबऽ' असं म्हणायचं. 'कुकुंबर' नव्हे. तो काय औदुंबर आहे का?

रावजी: येस मिस, सॉरी मिस. परवा त्या गाडगीळमॅडम आल्या होत्या तेव्हा मी असंच म्हणालो. पण मी काय बोलतोय ते त्यांना कळलं नाही.

मधुरा: नाही तरी ती गाडगीळीण जरा बॅकवर्डच आहे. नवरा साधा डेप्युटी कलेक्टर आहे तर मिजास किती मारते! परवा क्लबात आली होती मारे बॅडमिंटन खेळायला. सिंगलची लॉबी आणि डबलची लॉबी कळत नाही आणि म्हणे मी बॅडमिंटन खेळते!

रावजी: येस, मिस.

मधुरा: रावजी, तू उगीच आगाऊपणा करू नकोस. You may go now. I will make the tea. इथे होस्टेस मी आहे.

रावजी: येस, मिस. (जातो. ती दिवाणावर बसून सराईतपणे चहा तयार करू लागते. तनय पुढे होऊन एक सॅन्डविच उचलतो.)

मधुरा: ई! कसला घाणेरडा वास येतोय?! दादिटल्या, आंघोळ केली नाहीयस ना?

तनय: आत्ताच झोपेतून उठलो. अजून दात घासायचे आहेत.

मधुरा: शी! तरीच शिळ्या दारूचा वास येतोय. असा कसा रे तू? सगळे पुरुष मेले असेच घाणेरडे असतात. Dirty fellows all and one.. अगदी किळस येते मला!

तनय: बबडे, फार शेफारली आहेस हं तू! तुला उजवून टाकून, लाल साडीच्या बोंग्यात कोंबून, हातात मसाला दुधाचा पेला सोपवून छपरी पलंगावर ढकलून द्यायला पाहिजे. झुळझुळीत सदऱ्यातल्या मिशाळ बाप्याने गच्चम मिठी मारली म्हणजे सगळी किळस कुठल्या कुठे पळून जाईल! मग अगदी लाजत लाजत दुसऱ्या दिवशी उखाणा घेशील:

पहाटेच्या साखरझोपेत होते गं मी कशी

सुभानरावांनी जवळ घेऊन टोचली मला मिशी!

मधुरा: ई! घाणेरडा आहेस! (चेहरा झाकून घेते.) मला लग्नच करायचं नाहीय. मी आपली तशीच राहणार. (स्वप्नाळू चेहऱ्याने) मला एक मुलगी असेल मात्र.

तनय: (चहा पिताना ठसका लागतो.) बबडे, लग्न नाही केलंस तर मुलगी कुठून होणार तुला?

मधुरा: मला नाही माहित. पण होईल.

तनय: अगं, अशी कशी होईल? नुसता तो झारा घेऊन बुंद्या पाडायला जातेस त्याऐवजी कोकशास्त्र वाचत जा जरा. इथेच अलमारीत कातडी बांधणीतली व्हिंटेज एडिशन असेल कुठेतरी. आबांनी चेरिंग क्रॉसहून आणलेली. म्हणून तर आपला जन्म झाला, बबडे!

मधुरा: शी! घाणेरडं बोलू नकोस! मला तसलं काही नको आहे. (खट्टू होते.) पण मला माझं असं मूल हवं आहे. (स्वत:मध्ये हरवून जाते.) दाद्या, मला एवढं म्हणतोस तर तूच पहिल्यांदा लग्न का नाही करत? एवढा मोठ्ठा घोडा वाढला आहेस तो. माझ्यापेक्षा सहा वर्षांनी मोठे आहात आपण दादासाहेब. क्यूमध्ये तुमचा नंबर आधी आहे.

तनय: कर, तू पण माझी चेष्टा कर! अगं, माझ्याशी कोण लग्न करणार? तुम्ही मुली म्हणजे सगळ्या इथून तिथून सारख्याच असता. तुम्हाला गाडी पाहिजे, बंगला पाहिजे, मानसन्मान पाहिजे, क्लबात मिरवायला पाहिजे म्हणून नुसतं संसाराचं सोंग आणता झालं. हे सगळं पुरवायला म्हणून फक्त तुम्हाला नवरा हवा असतो. शरीरसुखाचे चार चव्वल त्याच्या अंगावर फेकून हे सगळं तुम्ही घाऊक भावानं विकत घेता. सरसकट नुसतं बेगडी, बाजारू, मुलामा दिलेलं आयुष्य! अरे, शिसारी येते शिसारी मला तुमची! तुमच्यावर प्राण ओवाळून टाकून जो जीव लावतो त्याची तुम्हाला कवडीची किंमत नसते. जो पैसे मिळवू शकत नाही, ज्याच्या नावावर पार्टीला जाऊन मिरवता येत नाही तो पुरुष तुमच्या लेखी अगदी कुचकामी! काळ्याशार डोहात असा पाय टाकून शांत बसलेला औदुंबर तुमच्या लेखी भिकारी! कारण काय तर तुमच्या ह्या चकचकीत झगमगीत खोट्या दुनियेत तो रमत नाही म्हणून! नको. नकोच मुळी! मला यातलं काही नको. मी आहे तसाच बरा आहे —

नको क्षुद्र संभोग तो दुर्बळांचा
तुझी दूरता त्याहुनी साहवे

दूरच राहा माझ्यापासून! दूरच राहा! मला लग्न नको, प्रेम नको, काही नको. मूर्खांनो, द्विभार्याप्रतिबंधक कायदा कसला आणता? एकभार्याप्रतिबंधक कायदा आणा! राष्ट्राला त्याचीच आज गरज आहे! एकल्या वाटेवरी सूर माझा एकला —

(हे बोलत असताना तो तिच्यापासून दूर चालत जाऊन तिला पाठमोरा झाला आहे. ती मागून जाऊन त्याच्या खांद्यावर हात ठेवते.)

मधुरा: दादा, तू असा का रे वागतोस? का असा स्वत:ला दुखवून घेतोस? पप्पा आणि आई किती काळजी करतात तुझी. त्यांना वाटतं तू नीट अभ्यास करावास, पप्पांसारखं बॅरिस्टर व्हावंस, त्यांना अभिमान वाटेल असं काही करावंस. चारचौघात त्यांची मान खाली होईल असं वागू नयेस. दोघांचं किती प्रेम आहे तुझ्यावर. पण तू दारू पितोस, एवढ्या सोन्यासारख्या शरीराची हेळसांड करतोस यामुळे त्यांना किती त्रास होतो. आई तुझ्या काळजीपोटी रात्र रात्र रडत असते. का बरं असं तिच्या मनाला दु:ख देतोस?

तनय: पण मग मी काय करू? मी फार एकटा आहे गं. मला माझं असं कुणी नाही. (रडू लागतो.)

मधुरा: हे बघ, तू माझा मोठ्ठा दादा आहेस ना?! मग असं रडायचं नाही. डोळे पूस बघू. छान हसून दाखव मला. (हसतो.) आणि हे बघ. इतकी दारू नको रे पीत जाऊ! हे व्यसन म्हणजे माणसाला आतून पोखरून टाकतं अगदी. दादा, मी तुझी छोटी बहिण आहे की नाही?! पण आजच्यापुरती तुझी आई होऊन सांगते. ही दारू म्हणजे वास्तवापासून पळून जायचा एक भ्याड आणि भेकड मार्ग आहे. तसं नको करू. शहाण्यासारखा वाग. निरोगी हो. बलदंड हो. पुरुषासारखा पुरुष ना तू? मग असं रडतभेकत नाही जगायचं. आयुष्याला निधड्या छातीने सामोरं जायचं. आम्ही सगळे तुझ्या पाठीशी आहोत. कुटुंबाच्या प्रेमाची पाखर हीच शेवटी वैफल्याच्या कटुतेवर साखर म्हणून गुणकारी ठरते.

तनय: पण मला मरून जावंसं वाटतं गं.

मधुरा: वेडा कुठला! असं नाही बोलायचं. काही कुणी मरूनबिरून जात नाहीय. मी म्हटलं की नाही तुला, मला एक गोड मुलगी असणार म्हणून? मग तिचा तू मामा असणार की नाही? तिचे तू लाड करायचेस, तिला चित्र काढायला शिकवायचंस, कविता म्हणायला शिकवायचंस, रोज रात्री झोपताना तिला गोष्ट सांगायचीस! आणि तिचे डोळे मिटायला लागले की पापण्यांची हळूच पापी घ्यायचीस..

३

(दाराच्या फ्रेममध्ये बसवण्णा दिसतो. त्याच्या डाव्या हातात विडी, उजव्या हातात फुलांची परडी आणि डाव्या खांद्याला कापडी पिशवी आहे.)

बसवण्णा: कुणाची पापी घेतं म्हटलं तर मधुराताई?! आमची घेतं का? पाहिजे तितकं घ्या हो. आमचं काहीपण ऑब्जेक्षन नसतं. आमच्या गावात एक फादर होतं. आमचं फादर नव्हे हो. चर्चात राहतं ते फादर म्हटलं तर. ते फादर आम्हाला येशूचं शिकवण बोलून सांगायचं: एका गालाचं पापी घेतलं तर दुसरा गाल पुढे करा म्हणून. तेव्हापासून आम्ही पण तसंच करतं. (याला विडी उलटी ओढायची लकब आहे, म्हणजे जळतं टोक तोंडात धरून. आत येऊन फुलांची परडी आणि पिशवी टेबलावर ठेवतो.) हे पारिजातकचं परडी आणलंय. मॅडमच्या इव्हिनिंग डिव्होशनसाठी.

मधुरा: बसवण्णा, शी घाणेरड्या! इथून दूर हो बघू. आणि ती बिडी इथून बाजूला घे आधी. काय घाणेरडा वास आहे पण! तुम्ही सगळे पुरुष म्हणजे असेच: नुसते घामाचे आणि धुराचे वास.

तनय: बसवण्णा, लेका तू फार माजला आहेस हं!

बसवण्णा: अहो, आता माजायचंच की. आमचं प्रेष्टीज असतं की हो तसं. मायसोर कंट्री क्लबात मी चीफ गार्डनर होतं. माझं रोज असं रेडभडक असायचं बघा म्हणजे आल मायसोर स्टेट आफिसर्स ॲन्युअल कॉम्पिटिशनमधे सहा वर्षं फर्स्ट प्रैझ मिळवलं. तुमचं बॅरिस्टरसर मायसोर हायकोर्टात केससाटी आलं तेव्हा क्लबात रेसिडेन्ट होतं. ही वॉज सो इम्प्रेस्ड टू सी माय रोजबेड. मला म्हटलं यू

कम टू पूना विथ मी. माझं तिथे विराट बंगला असतं. मी सरांना बोलून म्हटलं की स्वामी, ननगे पूना ग्वत्तिला. मायसोर कंट्री क्लबाचं गार्डन करायचं ते सोडून बंगल्याचं गार्डन करायचं म्हणजे डिमोशन की हो. बट सर वाज इम्पॉर्च्युनेट. सर प्रपोज्ड की ड्रायव्हरची ड्यूटीपण तुलाच देतं. आय आस्क्ड सर की विच कार यू हॅव्ह. सर म्हटलं ओरिजनल इंग्लिश ऑस्टिन समरसेट असतं. देन आय सेड येस. नीन होगित्री स्वीकार बेकु. तेव्हापासून मी डबल ड्यूटी करतं. हिकडे पूना जिमखाना क्लबचं फॉर सेवन स्ट्रेट इअर्स फर्स्ट प्रैझ मिळवतं तर तिकडे डेक्कनवर ऑस्टिन समरसेट चालवतं. पूना ड्रैव्हिंग म्हणजे नुसतं वैताग माडी. सगळीकडे रोडवर नुसतं सायकली असतं नाहीतर टॉमी नावाचं अल्सेशियन असतं. बट आय ड्रैव्ह ग्रेसफुली. आय ॲम प्रौड ऑफ मायसेल्फ. तेव्हा जरा माजायचंच की हो. (विडीचा झुरका घेतो.)

मधुरा: शी! घाणेरडा! एकदा बिडीचं जळतं टोक घुसून जिभेला भोक पडेल तेव्हा कळेल.

बसवण्णा: अहो, बिडीचं काय हो ते? माझं जन्म निपाणीचं असतं. तिथलं बेबी म्हटलं तर मदर्स मिल्कनंतर एकदम टोबॅकोच सुरू करतं. आमचं टोबॅको आम्हाला कडकच लागतं की हो. कडक पाहिजे म्हटलं तर बिडीचं पापीच घ्यावं लागतं. विथ फुल्ल कान्सन्ट्रेशन गार्डनिंगचं काम करायचं तर बिडीचंच काय ते एक कंपॅनियनशिप असतं. कडक धूर आत घुसलं की रोज कसं एकदम रेडीरेड फ्लरिश होतं की हो. यू नीड ए रीअल मॅन टु ग्रो अ रोज.

(रावजी येतो.)

रावजी: यू डॅम फूल! इथे आत विडी ओढत आलास? काय घाण वास येतोय —

बसवण्णा: तुमच्या सरच्या पाईपचं ते स्ट्रांग फ्रेग्रन्स चालतं तर विडी का नाही चालत म्हणतो मी? हे घ्या हो, पारिजातकचं परडी आणलं आहे. मॅडमला इव्हिनिंग प्रेयरला पाहिजे म्हणून. पारिजातक उगवायला गार्डनर कशाला पाहिजे हो? साधं माळी चालतंय की. मायसोर कंट्री क्लबचं चीफ गार्डनर असतंय की हो मी. पारिजातक उगवायचं म्हणजे वेष्ट ऑफ माय प्रेशस टॅलेंट झालं की हो. नशीब माझं वडाचं झाड उगवून त्याला सूत गुंडाळायला कापूस उगव म्हणून सांगितलं नाही. इतकं सतत डिवोशन म्हणजे कोण करणार?! सर म्हणून सहन करतंय बघा ते. ही इज अ व्हेरी पेशंट मॅन.

३

(सावित्रीबाई आत येतात. ह्या तुडतुडीत आहेत. हिरवं नऊवारी पातळ, अंबाडा आणि गळ्यात ठसठशीत मंगळसूत्र असा वेष आहे. ह्या संपूर्ण प्रवेशात तनय काहीच बोलत नाही. घुम्यासारखा दिवाणावर बसून राहतो.)

सावित्रीबाई: (हसून टाळ्या वाजवत) बबडी, तन्या आणि बसवण्णा! सगळे रिकामटेकडे मेले इथेच जमलेत! रावजी, अरे बाबा पानसुपारीचं तस्त आणि पिकदाणी घेऊन ये बरं! पाहुणचार कसा व्यवस्थित व्हायला हवा. आपल्या घरचं वळणच आहे तसं. पुण्यात राहात असलो म्हणून पुणेरी का वागायचं?

मधुरा: ई! मम्मा! पानसुपारी कसली खातेस?! तू म्हणजे अशी घाटी आहेस ना!

सावित्रीबाई: हे बाकी बरोब्बर ओळखलंस गं बाई! अगं, मेणोलीच्या त्र्यंबकशास्त्री नामजोशांची मी मुलगी. तुला सांगते, माझे खापरपणजोबा नशीब काढायला म्हणून पेशवाईत रत्नाग्रीहून मेणोलीला आले ते तिथ्थंच राहिले. त्यांचा पोरगा तिथ्थंच उपजला, पोराचा पोरगा तिथ्थंच उपजला आणि पोराच्या पोराचा पोरगा पण तिथ्थंच उपजला. तेव्हा तशी मी जन्माआधीपासून घाटीच की गं.

मधुरा: आहेस्सच मुळी. पण माझी लाडकी मम्मा आहेस. म्हणून आहेस तश्शी चालवून घेते तुला.

सावित्रीबाई: न घेऊन सांगशील कुणाला बबडे?

बसवण्णा: मॅडम, ते गार्डनमधलं पारिजातकचं परडी आणलं आहे.

सावित्रीबाई: हो हो. चाललेच आहे मी पूजेला. आणि मंडईत जाऊन अळीव, खोबरं, कोल्हापुरी गूळ आणि बदाम आणायला सांगितले होते ते सारं आणलंस का? आज रात्री बसून लाडू वळायचे आहेत मला.

बसवण्णा: येस मॅडम, ते सगळं पिशवीत ठेवलं आहे.

मधुरा: (तिच्या जवळ जाऊन) आई, केव्हा बाळंत होते आहेस गं? लब्बाडच आहेस. आम्हाला एवढं नवं भावंड येणार पण तू बिलकुल पत्ता लागू दिला नाहीस ना? (तिच्या पोटावरून हात फिरवते.)

सावित्रीबाई: हात मेले! म्हातारीची चेष्टा करतेस होय गं? मी कसली बाळंत होतेय या वयात? फार सोकावली आहेस बरं तू. आता मीच तुझ्यासाठी एक गोरागोमटा पोरगा शोधून देणार आहे. दोघं मिळून लगेच कामाला लागा आणि मांडीवर मुतायला एक छानसा नातू द्या मला. (तिला जवळ घेते.) ह्या तन्याला सांगून सांगून थकले पण तो काही लग्नाचं मनावर घेत नाही. बघ कसा शुंभासारखा कोपऱ्यात तोंड खुपसून बसलाय. माझ्याशी एक शब्द तरी बोलतोय का बघ! आता तुझ्यावरच सगळी भिस्त आहे गं बाई.

मधुरा: असं गं काय आई?! मी नाही जा —

सावित्रीबाई: अगं वेडाबाई, 'मी नाही जा' काय? इतकी घोडी वाढलीस तरी अल्लडपणा गेला नाही तुझा. मी तुझ्या वयाची होते तेव्हा पदरात एक पोर पडलेलं होतं.

मधुरा: (तनयला वेडावून दाखवत त्याच्या तोंडासमोर ओवाळते.) त्या पोरानं असे काय दिवे लावलेत ते दिसतंच आहे.

(सर्वत्र अवघडलेली शांतता पसरते. फोन वाजतो.)

सावित्रीबाई: यांचाच असणार. मीच घेते — हॅलो. न्हायीत, बालिष्टरसर घरी न्हायीत. म्या त्यांची गावाकडनं आनलेली बाईल बोलत्येय. सर ममईला गेल्यात. कोडतात दोन केसी हरून मग येत्याल. काय म्हनता? बालिष्टरसरच बोलताय? अगं बया! आवाज वळिकलाच न्हायी की हो म्या.. (खळखळून हसत) बोला! डेक्कन क्वीननेच येताय ना? (बराच वेळ ऐकत राहात) ठीक, ठीक. रावजीला सांगून ठेवते. अहो ऐका, तो जमशेद भेटेल तुम्हाला. त्याला म्हणावं बायकोला वेळेवर दवाखान्यात नेण्यात हलगर्जीपणा करू नकोस. वेडा पारशीपणा दाखवायची ही वेळ नव्हे. (आणखी

थोड्या वेळाने) हो, हो. ते काय तुम्ही द्यालच. सढळ हाताने द्या मात्र. बिचारा गरीब आहे हो. हे पारशी मेले गब्रू तरी असतात नाहीतर गरीब तरी असतात. अधलंमधलं काही नाही. (आणखी थोड्या वेळाने) बरं, बरं. अहो, त्यात काय एवढं मेलं? विलायतेत होतात तेव्हा तीन वर्षं नाही का वाट पाहिली मी? (आणखी थोड्या वेळाने) बरं, बरं. ठेवते. या तुम्ही.

मधुरा: तू म्हणजे अगदी जगाची काळजी वाहतेस बाई! हा जमशेद कोण आता?

सावित्रीबाई: अगं, तो डेक्कन क्वीनमध्ये खानसामा आहे. तुझ्या पप्पांची आणि त्याची जुनी ओळख आहे. दर खेपेला यांना मावा केक आणून देतो. त्याच्या बायकोला नववा म्हैना लागलाय आता. पुढच्या वेळी हे मुंबईला जातील तेव्हा अळवाचे लाडू पाठवीन त्यांच्याबरोबर. म्हणून तर हे एवढं सामान मागवलं. बरं का रावजी, सरांचा फोन आला होता.

रावजी: हो, ते कळलंच.

सावित्रीबाई: आगाऊपणा करू नकोस. माथाडी कामगारांचा खटला जिंकले म्हणे. जिंकतील नाहीतर काय. फर्डं इंग्रजी बोलून जज्जाची कानशिलं पांढरी केली असतील. तेव्हा स्टेशनवरून परस्पर कामगार कचेरीतच मीटिंगला जाणार आहेत. जेवणबिवण तिथंच करून येतील. बोकड खाणार असतील मेले. नंदिनीपण आहे त्यांच्याबरोबर. तेव्हा मी यांना म्हटलं की तिला रात्री इथेच घेऊन या. इतक्या उशीराची लेडीज हॉस्टेलात परत कुठे जाईल ती? उद्या रविवारच आहे. झोप घेऊन सावकाश दुपारचं जेवणबिवण करून मग जायची तेव्हा जाईल. तेव्हा मी काय म्हणते रावजी, नीट ऐक. तिच्यासाठी गेस्ट बेडरूम साफसूफ करून घे.

रावजी: ती नेहमी साफसूफच असते मॅडम. आपल्या घराचं वळणच तसं आहे.

सावित्रीबाई: आगाऊपणा करू नकोस. गेस्ट बेडरूम पुन्हा साफसूफ करून घे आणि मधुरेचा एखादा चांगलासा गाऊन तिला झोपताना घालायला काढून ठेव. (मधुराला उद्देशून) चालेल ना गं तुला? ती मेली लेडीज हॉस्टेलात राहणारी झुंजार पत्रकारीणबाई आहे. माझ्या काकूबाई थाटाच्या साड्या काही नेसायची नाही.

मधुरा: (गोरीमोरी होत) इश्श! चालेल की.

सावित्रीबाई: आता यात 'इश्श' करण्यासारखं काय आहे गं? ती काय पुरुष आहे? तुम्हा अलिकडच्या पोरींना 'इश्श' केव्हा वापरायचं हे पण मीच शिकवायचं का? बरं, मी येते आता. दर शनिवारचा खुन्या मुरलीधराचा नेम असतो माझा. (फुलांची परडी उचलते.) रावजी, ते लाडवांचं सामान स्वयंपाकघरात नीट ठेव. बसवण्णा, मंडईचा हिशेब काय झाला तो रावजीला सांगून ठेव.

बसवण्णा: येस मॅडम. फोर्टी नाईन रुपीज ट्वेन्टी फाईव्ह पाईस लागले. चेंजपण पिशवीतच ठेवलं आहे.

सावित्रीबाई: दुकानदारानं मागितले तेवढे पैसे तडकाफडकी देऊन टाकले असशील. तू तरी काय तुझ्या सरांचाच ड्रायव्हर.

बसवण्णा: नो मॅडम. मंडईत जोराचं घासाघीस केलं. हे पुण्याचं दुकानदार म्हणजे - व्हाट इज द वर्ड - नाट थीफ ॲज सच. हां! हे पुण्याचं दुकानदार म्हणजे एक नंबरचं भामटा असतं. नॉन-पूनाऐट गिऱ्हैक दिसलं की काय पण रेट सांगतं. पण मी निपाणीचं असतं हे त्या पाप बिचाऱ्याला माहितच नसून नसतं! देन आय सेड टु मैसेल्फ — अडिगी वेंडु प्रामाणिक मनुष्यं तर्री. तू पुण्याचं भामटा असलं तर मी निपाणीचं लखोबा लोखंडे असतं. रेट पाडून घेतलं आणि वर त्या दुकानदारालाच एक बनावट पावली खपिवलं.

सावित्रीबाई: चांगलं केलंस हो. तू तरी काय तुझ्या सरांचाच ड्रायव्हर. वकील आणि भामटे. दोन्ही मेले एकाच माळेचे मणी. चला, मला उशीर होतोय बाई.

बसवण्णा: पण मॅडम, कशाला तुम्ही इतकं धोका पत्करून तिकडे नदीच्या पलिकडे जातं म्हणतं मी. ओल्ड पूना इज अ व्हेरी डेंजरस प्लेस. ते मुरलीधर स्वत:च एक मर्डरस असतं! आणि देऊळच्या बाजूला सगळं नुसतं भामटा असतं, बुधवारातलं ते वाईट-साईट बाई असतं. व्हेरी डेंजरस प्लेस. मी म्हणतो हितेच डेक्कन जिमखान्यात एक देऊळ शोधून सोडा की. डेक्कन इज व्हेरी सेफ. सगळीकडे

नुसतं अल्सेशियन कुत्रा हिंडत असतं. भामटा हिम्मतच करायचं नाही इथे यायचं.

सावित्रीबाई: हात मेल्या. मला रे कसली भामट्यांची भीती दाखवतोस?! माझे खापरपणजोबा मेणोलीच्या वाड्यात कारकून होते. तिथे खुद्द नाना फडणवीसालाच हिशेबात कापायचे. त्याच्याकडे येणाऱ्या सगळ्या वाईट-साईट बायांची बिदागी ह्यांच्याच हातून तर जायची. रंगीला इतके द्यायचे न कमळीला तितके द्यायचे. त्यातसुद्धा रुपयातले दोन आणे ह्यांच्याच खिशात पडायचे. तेव्हा सारांश काय तर मला फसवणाऱ्या भामट्याची आयशी अजून जन्माला आलेली नाही. चला, येते मी. बसवण्णा, तू गाडीत पेट्रोल भरून हवा भरून तयार ठेव. कामगार कचेरीतून फोन आला की तिथे जाऊन त्या दोघांना घेऊन ये. (बसवण्णा जातो.) आणि शुंभांनो, तुम्ही दोघे पटापट आंघोळी करून घ्या. काय पण पोरं दिलीत मला तुमच्या बापानं. आणि तन्या, तू आधी दात घासून घे रे बाबा. शिळ्या दारूच्या वासात घामाचा वास मिसळून मळमळायला लागलंय मला इथे. जा! निघा!

मधुरा: मम्मा, तू म्हणजे ना कजाग आहेस अगदी! (फुरंगटून पाय आपटत निघून जाते.)

सावित्रीबाई: बेटा तनय, आता मी जास्त काही बोलत नाही. आंघोळ करून घे बेटा. आणि दुपारी मी तुपातला शिरा केलाय तो थोडासा खाऊन घे. देवळातून परत आले की तू, मी आणि बबडी एकत्र जेवायला बसूयात. एवढं कर बाबा माझ्यासाठी. म्हाताऱ्या आईला उगीच त्रास नको देऊस.

तनय: मला भूक नाहीय. (निघायला उठतो, पण पोटात कळ येते. ती लपवण्यासाठी एक मोठ्ठालं पुस्तक पोटाशी धरतो.) हे इथेच विसरत होतो. (हळूहळू चालत निघून जातो. सावित्रीबाई त्याच्या मागोमाग दाराच्या चौकटीपर्यंत जातात आणि डोळ्याला पदर लावतात.)

सावित्रीबाई: रावजी —

रावजी: येस मॅडम.

सावित्रीबाई: सर यायच्या आत तो डीकॅन्टर पुन्हा पहिल्यासारखा भरून ठेव.

रावजी: येस मॅडम.

सावित्रीबाई: तुझे सर आणि नंदिनी रात्री उशीरा येतील. दिवसभर कोर्टकचेऱ्या आणि मीटिंगा करून दमून आलेले असतील. गाडीचा आवाज आला की ताबडतोब दार उघडायला जा. त्यांचा खोळंबा करू नकोस. जाते मी. (फुलाची परडी उचलून सावित्रीबाई जातात.)

रावजी: (स्वत:शीच, मान हलवत) ऑस्टिन सॉमरसेटचा कधी आवाज येतो का?

सावित्रीबाई: आगाऊपणा करू नकोस. इथून ऐकू येतंय मला. (रावजी जीभ चावतो.) पण आता जातेच रे..

३

(रावजी बसवण्णाने ठेवलेली पिशवी उचलतो. त्यातल्या एका रुमालाच्या पुरचुंडीतली मोड बाहेर काढतो आणि ती नीट मोजून अलमारी उघडून एका डबीत ठेवून देतो. त्याच अलमारीतून एक भपकेबाज कातडी बांधणीची कीर्द-खतावणी आणि फाउंटन पेन बाहेर काढतो. पानावर आकडेमोड करता करता..)

रावजी: फोर्टी नाईन रुपीज ट्वेंटी फाईव्ह पाईस. एकूणपन्नास पूर्णांक पंचवीस शतांश गुणिले अठरा म्हणजे आठशे शहाऐंशी पूर्णांक पाच दशांश. आठशे शहाऐंशी भागिले दोनशे चाळीस म्हणजे तीन पूर्ण आणि बाकी राहिली एकशे सहासष्ट. एकशे सहासष्ट भागिले बारा म्हणजे तेरा पूर्ण आणि बाकी दहा. झालं तर. अळवाच्या लाडवांचे साहित्य घेतले. खर्च: तीन पाउंड, तेरा शिलिंग, दहा पेन्स, दोन फार्दिंग. (इतकी नोंद करून पेनसह कीर्द-खतावणी व्यवस्थित परत ठेवतो आणि अलमारी बंद करून निघून जातो.)

३

(दिवाणखान्यातल्या घड्याळात अकराचे टोले पडतात. झुंबरातले दिवे उजळलेले आहेत. नंदिनी आणि बॅरिस्टर जातेगावकर दाराच्या फ्रेममध्ये दिसतात. नंदिनी निळी किनार असलेली पांढऱ्या

रंगाची साडी नेसलेली आहे. खांद्याला शबनम पिशवी आणि पायात कोल्हापुरी चपला आहेत. बॅरिस्टर थ्री-पीस सूटमध्ये आहेत. पायात पॉलिश केलेले काळे बूट आहेत.)

बॅरिस्टर: After you!

(नंदिनी आधी येते आणि तिच्यामागून बॅरिस्टर येतात.)

बॅरिस्टर: बस, नंदिनी. सकाळपासून आपली धावपळ खूप झाली. पण कामगार संघाचा निकाल मनासारखा लागला हे उत्तम झालं. सन्मानाने जगता यावं यासाठी वेळप्रसंगी संप करण्याचा कामगारांना घटनात्मक हक्क आहे असा निकाल हायकोर्टाने दिला. फार चांगलं झालं.

नंदिनी: येस, सर. तुम्ही फार ब्रिलियंट आर्ग्युमेंट केलंत सर. जस्टिस नरीमन म्हणजे एरवी अगदी निर्विकार माणूस. पण तोही भारावून गेलेला दिसला.

बॅरिस्टर: तुला सांगतो, मी विशेष असं काहीही केलं नाही. (बोलता बोलता टाय सैल करून स्वत:साठी एक स्कॉचचा पेग सावकाशीने ओतून घेतात. पण हे करण्याआधी एका छोट्या क्रिस्टल ग्लासमध्ये शेरी ओतून नंदिनीला देतात.) Some cream sherry for you. (ती ग्लास ओठाला न लावता तसाच समोर ठेवते. मात्र बॅरिस्टर स्कॉचचे घुटके घेत राहतात.) अशा हक्काला घटनेत आणि कायद्यात अधिष्ठान आहे इतका साधा मुद्दा मी कोर्टाला पटवून दिला. पण नंदिनी, एकोणीसशे एकवीस सालच्या बकिंगहॅम अॅन्ड कर्नाटक मिल्समधल्या संपाबद्दल तू जी कात्रणं शोधून काढलीस त्यांचा मात्र आपल्या आर्ग्युमेंटला बळकटी आणण्यासाठी खूप उपयोग झाला. जस्टिस नरीमननी आपल्या जजमेंटमध्ये म्हटलं सुद्धा की 'The historical data uncovered by the indefatigable journalist Ms Nandini Gokhale has proved to be of immense value et cetera et cetera.. '

नंदिनी: काय लाजवताय सर.

बॅरिस्टर: लाजवत नाही, तुला फक्त तुझ्या वाट्याचं श्रेय देतो आहे. पण प्रांजळपणे सांगायचं तर

माझ्या पोटात जराशी बाकबूक होतीच. अगं, जस्टिस नरीमन म्हणजे इनर टेंपल. मी मिडल टेंपल. आम्हा दोघांची लंडनमधली जुनी खुन्नस! तेव्हा म्हटलं म्हातारा तीच तेवढी लक्षात ठेवून बसतो की काय! पण तसं काही झालं नाही. शेवटी न्यायाची बाजू खरी ठरली. मी म्हणेन की असे न्यायाधीश जोपर्यंत न्यायासनावर आहेत तोपर्यंत ह्या देशाची अगदीच वासलात लागलेली नाही. असेंब्लीत बसून तंबाखू चघळणाऱ्या गावंढळ खाबूंच्या ताब्यात तो पूर्णपणे गेलेला नाही. थोडासा तुकडा अजून कुठेतरी शिल्लक आहे. पण आम्ही आता थकत चाललो. आमची उमेद संपत चालली. आता तुमच्या नव्या पिढीवरच आमच्या सगळ्या आशा केन्द्रित झालेल्या आहेत.

नंदिनी: असं म्हणू नका सर. उलट तुम्ही आम्हाला स्फूर्तिस्थानी आहात. कायद्याचं आणि घटनेचं सखोल ज्ञान असलेले वकिल म्हणून तुमचं केवढं नाव आहे सर.

बॅरिस्टर: तू असं म्हणतेस हा तुझा मोठेपणा झाला, पण यात माझं श्रेय फार थोडं आहे. पहिल्यापासून आम्ही घरचे तसे बरे होतो. वडिलोपार्जित जमीनजुमला थोडाफार होता; मागे भावंडं कुणी नाहीत, त्यामुळे त्यांच्या जबाबदाऱ्या नव्हत्या. इतकं सगळं पाठबळ होतं म्हणूनच मला इंग्लंडला पाठवणं बाबांना शक्य झालं. सासऱ्यांचाही हातभार लागला. ज्याला वकिली डोकं म्हणतात ते सुदैवाने मला मिळालेलं आहे, त्यामुळे तिथून शिकून आल्यानंतर ह्या क्षेत्रात थोडंफार नाव झालं, पैसा मिळाला. पण नंदिनी, याबाबतीत माझ्याइतके भाग्यवान सगळे नसतात हे मी विसरलेलो नाही. स्वतःच्या कुटुंबाला उर्जितावस्था यावी म्हणून जिवापाड कष्ट करणाऱ्या, हातावर घट्टा उठवून घेणाऱ्या माणसांबद्दल मला कणव वाटते, त्यांच्या हक्कांसाठी झगडावंसं वाटतं यामागचं कारण इथे कुठेतरी आहे.

नंदिनी: पण तुम्हाला एक विचारू सर? असं असेल तर मोटवानीसारख्या भ्रष्टाचारी माणसाचं वकिलपत्र तुम्ही का घेता? अशा माणसाला कायद्याच्या कचाट्यातून सोडवण्यासाठी तुम्ही आपली कुशाग्र बुद्धी का खर्ची घालता? याची तुम्हाला कुठे बोच नसते का? सॉरी सर, लहान तोंडी मोठा घास घेते आहे, पण विचारल्याखेरीज राहवत नाही म्हणून विचारते.

बॅरिस्टर: असते ना, बोच असतेच. नोटांची मऊमऊ थप्पी खाली अंथरली की ती बोच जराशी कमी होते इतकंच. पण बोच अजूनही असते. या व्यवसायात कितीही पावसाळे काढले, स्वतःची कातडी

कितीही जाड करून घेतली तरी ती पूर्णपणे जात नाही. लंडनला असताना आम्हाला क्रिमिनल लॉ शिकवणारे एक विद्वान प्राध्यापक होते: प्रोफेसर जॉन ॲशवर्थ नावाचे. नेहमी बो बांधायचे, टाय नाही. नेमका हाच प्रश्न त्यांना मी एकदा विचारला होता. ते मला म्हणाले होते की तुला पुस्तकी उत्तर देतो, पटतं का पाहा. तर नंदिनी, आता तेच पुस्तकी उत्तर मी तुला देतो. पटतं का पाहा.

नंदिनी: सांगा सर.

बॅरिस्टर: मी म्हणेन की मोटवानी भ्रष्टाचारी आहे की नाही हे ठरवण्याचं काम माझं नाही. सरकारी यंत्रणेने त्याच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप केलेला आहे इतकं मला मान्य आहे. पण तो आरोप अजून सिद्ध झालेला नाही. जोपर्यंत तो सिद्ध होत नाही तोपर्यंत न्यायासनासमोर स्वत:चा बचाव करण्याचा कायदेशीर हक्क मोटवानीला आहे. आता असं पाहा की कायदा ही वस्तू एखाद्या प्रचंड जुनाट राजवाड्यासारखी आहे. हा राजवाडा एकाच वेळी एकाच माणसाने बांधलेला नाही. इकडचा सज्जा एका शतकात एकाने बांधला, तिकडचं दालन दुसऱ्या शतकात दुसऱ्या कुणीतरी बांधलं असा तो एकूण प्रकार आहे. त्यामुळे ह्या राजवाड्यात शिरलेला माणूस म्हणा, किंवा ढकलला गेलेला माणूस म्हणा, एकदा आत गेला की वाट चुकणार हे नक्की. पण असं जर असेल तर आत आलेल्या माणसाचं बोट धरून त्याला घेऊन जाणारा कुणीतरी वाटाड्या पाहिजे. हे काम मी करतो. आता हा वाटाड्या जितका निष्णात तितकी तो बिदागी जास्त मागणार हे साहजिक आहे. तर एकूण मी पुस्तकी उत्तर म्हणालो ते हे!

नंदिनी: थोडंसं पटलं, सर.

बॅरिस्टर: (हसत) तू चाणाक्ष आहेस हे मी केव्हाच हेरलेलं आहे. मलाही ते पुरतं पटलेलं नाहीच. पण शेवटी होतं काय की तत्त्व आणि व्यवहार यांची कुठेतरी तडजोड ही करावी लागते. ह्या मोटवानीबरोबर मी काव्यशास्त्रविनोद करत बसणार नाही, पण त्याच्याबरोबर काम करायचं म्हणजे मनातल्या मनात नाक धरून का होईना पण ते पार पाडावं लागतं. तेवढं मी करतो. तेव्हा एकूण मी काय म्हणतो नंदिनी, की हा आपला पैसेबाज पण भोळाभाबडा मोटवानी राजवाड्यात भरकटून हरवू नये इतकी दक्षता मी घेतो आहे. याबद्दल मला जी रीतसर बिदागी मिळते, त्यातला अल्पसा हिस्सा खर्च करून ही स्पॅनिश शेरीची बाटली मी विकत घेतली आहे. तुला ती चाखून

बघायला हरकत नाही. आजच्या दिवसात तू खूप झुंजारपणा केलेला आहेस, तेव्हा आता थोडी चैन केलीस तर तुला कुणी बोल लावणार नाही.

नंदिनी: (चाखून बघते.) चव छान आहे! (पुन्हा चाखून बघते.) तुम्ही माझ्या सवयी बिघडवताय सर. अशा गोष्टी माझ्या पगारात मला परवडत नाहीत. (थांबून) लहान होते तेव्हा आमच्या घरी काही नव्हतं. वडिल लवकर गेले. आई साधी नर्स होती. तिचा सगळा वेळ काबाडकष्टांत जायचा. फार त्रासलेली असायची. तिची इच्छा होती मी मोठ्या घरात पडावं अशी. ही मी पत्रकार-बित्रकार झाले ना, ते काही तिला आवडलं नव्हतं सर. ती म्हणायची पोरीच्या जातीनं सासरचे गाकर भाजावेत. लष्करच्या भाकऱ्या भाजू नयेत. पण मला माझं काम आवडतं. खूप लोक भेटतात. खूप बघायला मिळतं.

बॅरिस्टर: पण अशी पोटात आग असलेली तुझ्यासारखी कुणीतरी आहे हे बघून बरं वाटतं. ती नसेल ना तर जगण्यात काही मजा नसते. माझी दोन्ही पोरं तशी नाहीत. तनयनं फार निराशा केली. अहोरात्र दारूच्या नशेत राहून वैफल्याच्या आहारी जाऊन उभ्या आयुष्याची माती करून घेतली. मन लावून कधी अभ्यास केला नाही की आईबापांनी तळतळून सांगितलेलं ऐकलं नाही. सबब काही नव्हती. सगळ्या सुखसायी होत्या, कुटुंबाचं प्रेम होतं. तुला सांगतो नंदिनी, यशस्वी माणसाच्या हृदयात सर्वात खोलवर रुतणारं शल्य कोणतं असेल तर ते म्हणजे पोटचा पोरगा नालायक निपजणं.

नंदिनी: असं म्हणू नका सर. त्याला समजून घेणारं कुणी मिळालं तर अजूनही तो यातून बाहेर पडू शकेल.

बॅरिस्टर: त्याला समजून घ्यायचा मी काही थोडा प्रयत्न केला का? पण नाही. बापाशी काही बोलायचं नाही, बापाला काही सांगायचं नाही असं जे एकदा त्याने एकतर्फी ठरवून टाकलं ते टाकलं. काय त्याच्या मनात चालत असतं काही कळत नाही.

नंदिनी: तुमच्यासमोर यायची त्याला लाज वाटत असेल सर.

बॅरिस्टर: असेलही तसं. त्याच्या भावना मी समजू शकतो कारण त्याला मुलगा म्हणायची मलाही

लाज वाटते. पण जाऊ दे तो विषय. काही प्रश्न निधड्या छातीने तोंड देऊन सोडवायचे असतात, तर काही प्रश्न असे असतात की त्यांच्याकडे मुर्दाडपणे पाठ फिरवल्याखेरीज ते सुटत नाहीत. चल बेटा. उशीर झालाय. रावजीने तुझ्यासाठी गेस्ट बेडरूम तयार ठेवली असेल. छान आराम कर. मुळीच लवकर उठू नकोस. उद्या ब्रेकफास्टला भेटू.

नंदिनी: (शेरी पिऊन टाकत) Yes sir. Good night.

बॅरिस्टर: Good night, नंदिनी. (जाताना दोर खेचून झुंबरामधला दिवा विझवतात.)

३

(दुसऱ्या दिवशीची सकाळ. रावजी बटलरच्या वेशात आहे. सकाळी आलेल्या 'टाईम्स ऑफ इंडिया'च्या अंकाला इस्त्री करतो आहे. बॅरिस्टर खुर्चीवर बसून एक जाडजूड ग्रंथ वाचताहेत. त्यांच्या अंगात सिल्कचा महागडा गाऊन आहे. तोंडात पाईप आहे. दाराच्या फ्रेममध्ये सावित्रीबाई आणि डॉक्टर दिसतात. डॉक्टर साठीचे आहेत. अंगात सफारी सूट आहे आणि गळयात स्टेथोस्कोप. हातात ब्रीफकेस. सावित्रीबाई साध्या साडीत आहेत.)

बॅरिस्टर: गुड मॉर्निंग डॉक्टर, या.

डॉक्टर: अहो, येणारच! रविवारी सकाळी बॅरिस्टर जातेगावकरांकडे ब्रेकफास्टला यायचं हा आमचा इतक्या वर्षांचा वहिवाटीचा हक्कच आहे मुळी! तेव्हा आम्ही येणारच. (बसतात.) मी काय म्हणतो की सरळ कूळकायदा लागू करून तुमच्या डायनिंग टेबलाची एका खुर्ची मी चक्क माझ्या नावे करून घेतो. बघा चालतं का! माई, इतकी वर्षं बॅरिस्टरांशी मैत्री असल्यामुळे कायद्यातल्या खाचाखोचा आम्हालाही थोड्याशा समजायला लागल्या! काय?! हो की नाही?

सावित्रीबाई: (बॅरिस्टरांना उद्देशून) मी डॉक्टरांना म्हटलं की सरांना एकदा तपासून घेतलेलं बरं. सुखाचा जीव दु:खात घालून उगीच तिकडे मुंबईला जायचं. तिथे कोडतात जाऊन तो डोमकावळयासारखा गाऊन पांघरायचा आणि बाकीच्या डोमकावळयांशी शिरा ताणून भांडायचं.

अशानं मेलं ब्लडप्रेशर वाढलं तर काय घ्या.

डॉक्टर: तपासतो, माई, तपासतो. पण वकिल म्हणजे शेवटी दुसऱ्याचं ब्लडप्रेशर वाढवणारा माणूस. हे स्वत: आपले नामानिराळे राहणार. (दोन्ही दंडांचं ब्लडप्रेशर तपासतात.) मी काय म्हणतो माई, की कामगार संघाचा निकाल मनासारखा लागला हे ठीक झालं. पण मोटवानीची भ्रष्टाचाराची केस काही बरी चाललेली नाही. कितीही अंग घुसळलं तरी तो लेकाचा त्यात अडकणार. याचा परिणाम म्हणजे बॅरिस्टरांच्या डाव्या दंडातलं प्रेशर कमी झालेलं आहे आणि उजव्या दंडातलं वाढलेलं आहे! डाव्या आणि उजव्या! आलं की नाही लक्षात? झाला की नाही मर्मभेद?!

बॅरिस्टर: (माफक हसत) डॉक्टर, अहो विनोद राहू द्या. आम्ही केव्हा मरणार ते सांगून टाका एकदाचे. म्हणजे आम्ही सुटलो आणि आमचं कलत्रही सुटलं.

डॉक्टर: छ्या! तुम्ही कसले इतक्यात मरताय? ब्लडप्रेशर वगैरे सगळं नॉर्मल आहे. तुम्हाला काहीही झालेलं नाही आणि काळजीचं काही कारण नाही. पण एक सांगतो, तो पाईप थोडा कमी करा आणि वजनावर ताबा असू द्या. मटणबिटण बेताने खात जा.

बॅरिस्टर: काळजी नको. ते मी बेतानेच खातो. आता केस जिंकल्याप्रीत्यर्थ माथाडी कामगार संघवाल्यांनी काल रात्री आग्रह करकरून वाढलं तेव्हा त्यांचं मन मोडवेना. मग काय करणार? थोडंसं खाल्लं.

डॉक्टर: थोडंसंच खाल्लंत ना, मग हरकत नाही. शिवाय विजयानंद साजरा करायचा म्हणून थोडीशी स्कॉचपण घशाखाली उतरवून झाली असणारच. कबूल करा. झाली की नाही?

बॅरिस्टर: झाली ना. मी कुठे नाही म्हणतोय? आता इथेतिथे आम्ही थोडेसे देहाचे चोचले पुरवतो हे मान्य आहे. पण स्कॉच प्यायल्याचं पापक्षालन म्हणून तुमच्या माई आम्हाला कसले कसले कडू काढे पाजतच असतात.

डॉक्टर: त्या जे काही देतील ते डोळे झाकून पीत जा. कडू काढ्यामुळे संसाराचा गोडवा वाढत

असेल तर काय हरकत आहे म्हणतो मी?!

(रावजी पेपर बॅरिस्टरांना देतो आणि खाकरतो.)

रावजी: सर, तुम्ही मुंबईला गेलात तेव्हापासूनची डाक अजून साचलेली आहे. बऱ्याच संभाव्य अशिलांची पत्रं आहेत. तुम्ही म्हणाला होतात की अजून काही महिने तरी प्रो-बोनो केसेस घ्यायच्या नाहीत म्हणून.

बॅरिस्टर: हो, ते बरोबर आहे. ह्या कामगार संघ प्रकरणात पुष्कळ श्रम झालेले आहेत. आणि शिवाय आमच्या बबडीला खरेदीसाठी एकदा मुंबईवारी घडवून आणायची आहे. तिथे गेल्यावर पप्पाला लाडीगोडी लावून ती त्याचा खिसा कापणार हे नक्की! एकूण काय तर थोडेफार पैसे मिळवणं हे आजच्या घटकेला अत्यंत गरजेचं आहे.

सावित्रीबाई: (डॉक्टरांकडे बघून हसत) बघा! काय पण आव आणताहेत! (यावर डॉक्टर 'चालायचंच' असा आविर्भाव करतात.)

रावजी: तुम्ही सूचना दिल्या होत्यात त्याप्रमाणे पाठवणाऱ्यांची आडनावं बघून पत्रांचं वर्गीकरण केलं आहे सर. लेले, आपटे आणि करंदीकरांची पत्रं केराच्या टोपलीत टाकली आहेत. श्रॉफ, मेहरा आणि डिसूझांची तुमच्या टेबलावर ठेवली आहेत. मे आय ब्रिंग टी, सर?

बॅरिस्टर: हो, घेऊन ये.

सावित्रीबाई: आणि देवाघरची फुलं कुठे आहेत? उठलीत की नाही? मला मेलीला एवढीच ऱ्हायमिंग स्लँग येते.

रावजी: नंदिनीताई आणि मधुराताई उठल्या आहेत. थोड्या वेळात खाली येतील. चिरंजीव खूप रात्रीपर्यंत जागे होते. ते अजून झोपले आहेत.

बॅरिस्टर: यात काय आश्चर्य?

सावित्रीबाई: तुम्ही त्याच्यावर सारखे धार धरू नका हो.

बॅरिस्टर: मी कुठे काय म्हणालो? धार धरायला तो समोर तर यायला हवा ना?

(अवघडलेली शांतता. नंदिनी येते. हिच्या अंगात फुलाफुलांचं डिझाईन असलेला रेशमी गाऊन आहे.)

सावित्रीबाई: (त्यांची नंदिनीकडे अर्धवट पाठ आहे.) बस मधुरा. (नंदिनीकडे बघून खळखळून हसत कपाळावर हात मारून घेतात.) अगं, तू आहेस होय! गाऊनमुळे फसलेच मी. छान दिसतोय गं तुला.

नंदिनी: हो, मला आवडला. (बसते. गाऊन स्वत:भोवती लपेटून घेते.)

सावित्रीबाई: झोप लागली का छान? कामगार क्रांतीची स्वप्नं नाही ना पडली?

नंदिनी: हो. नाही. म्हणजे हो, झोप छान लागली. पण स्वप्नं नाही पडली.

(नंदिनी बसते.)

सावित्रीबाई: मधुरा आली की सगळे ब्रेकफास्टला एकत्रच जाऊ.

नंदिनी: हो.

सावित्रीबाई: इतकं रोखून काय बघतेयस?

नंदिनी: बंदूक! (हसते.)

डॉक्टर: जे कुणी अशिल फी देणार नाही त्याला धमकावण्यासाठी बॅरिस्टरांनी ती अशी ढळढळीत समोर लटकवून ठेवली आहे. काय बिशाद आहे कुणी चुकारपणा करेल?!

(बॅरिस्टर ती भिंतीवरून खाली काढून नंदिनीच्या हातात देतात.)

बॅरिस्टर: ही कसली बंदूक आहे माहित आहे का नंदिनी? हिला म्हणतात पॅटर्न एटीन फिफ्टी थ्री एनफील्ड रायफल-मस्केट. नळीखाली पाहिलंस तर 34BNI अशी अक्षरं कोरलेली तुला दिसतील. सहा मे अठराशे सत्तावन्न रोजी इंग्रज सरकारने जेव्हा थर्टीफोर्थ बेंगॉल नेटिव्ह इन्फन्ट्री बरखास्त केली तेव्हा या बंदुकी कुठे कुठे विखुरल्या गेल्या. लंडनला एका अँन्टीक डीलरकडे ही मला मिळाली. एका मोठ्या खटल्याची सगळी फी यात खर्ची पडली!

नंदिनी: नुसती हातात घेऊनच मनावर सावट येतं सर.

बॅरिस्टर: (हसतात) घाबरू नकोस, तिच्यात गोळी नाहीय.

(रावजी चहाचा ट्रे घेऊन येतो आणि टेबलावर ठेवतो.)

रावजी: इट्स अँन एनचॅन्टिंग स्टोरी, मॅडम. याचं काडतूस म्हणजे एक कागदाचं निमूळतं आवरण असतं. दातानं त्याचं टोक फाडून काढायचं आणि आतली दारू बंदुकीच्या नळीत ओतायची. त्याच आवरणात एक शिशाची गोळी असते ती मागोमाग नळीत टाकायची आणि बंदुकीला लावलेली ही सळई आहे ती आत खुपसून गोळी घट्ट बसवायची. तर काय झालं की त्या कागदाला डुकराची आणि गाईची चरबी लावलेली आहे अशी सैन्यात अफवा पसरली. गाईची चरबी म्हणून हिंदू बिथरले आणि डुकराची चरबी म्हणून मुसलमान बिथरले. त्याचमुळे सत्तावन्नचं बंड झालं. मंगल पांडे हा थर्टीफोर्थ बीएनआयचाच होता मॅडम. त्याला फाशी दिला आणि त्याची अख्खी रेजिमेंट बरखास्त करून टाकली. इट वॉज डिसऑनरेबली डिसबँडेड! सगळ्या शिपायांच्या बंदुकी काढून घेऊन त्यांना घरी हाकलून दिलं. सरांनी ही विकत घेतली तेव्हा त्याबरोबर काडतूस मात्र नव्हतं. कसं असतं ते मला एकदा पाहायचं आहे. इट इज द गन विच इग्नायटेड द ग्रेट सिपॉय म्यूटिनी.

(नंदिनी बंदूक रावजीकडे परत देते. ती रुमालाने नीट पुसून तो पुन्हा भिंतीवर लावून ठेवतो. मधुरा येते.)

मधुरा: सॉरी पप्पा, उशीर झाला.

बॅरिस्टर: Never mind, my girl ! बस, चहा घे.

(मधुराचा आणि नंदिनीचा रेशमी गाऊन खूपच एकमेकांसारखे आहेत. मधुरा नंदिनीशेजारी येऊन किंचित अवघडून बसते.)

मधुरा: गाऊन फार गोड दिसतोय गं तुला.

(नंदिनी लाजून हसते.)

डॉक्टर: तुला सांगतो नंदिनी, उशीर करणं ही मधुराची जुनीच सवय आहे. तनय झाला त्यानंतर बॅरिस्टर आणि माई दोघेही वाट बघून थकले, पण आमची मधुराणी काही येईना. सरांना काळजी वाटायला लागली की बंगल्याचं नाव 'तमसा' ऐवजी 'तसा' ठेवावं लागतं की काय! म्हणजे आजूबाजूचे म्हणणार की आमचा बंगला असा तर यांचा 'तसा'. काय?! झाला की नाही मर्मभेद?! शेवटी सहा वर्षांनी एकदाची आली आणि सगळ्यांना हुश्श झालं! तर सांगायचा मुद्दा काय की उशीरा येणं ही तिची जुनीच सवय आहे.

मधुरा: डॉक्टर, you are sometimes so silly! आता उशीरा तर उशीरा. आले की नाही मी शेवटी? पण तन्या कुठे आहे?

(अवघडलेली शांतता.)

सावित्रीबाई: अगं, त्याला भूक नाहीय म्हणाला. आपण कशाला त्याच्यासाठी खोळंबून राहायचं? आपण आपली खळगी भरून घेऊ. काल रात्री जागून मी अळवाचे लाडू केलेत, त्यातला एकेक

मिळणार आहे प्रत्येकाला.

डॉक्टर: मग उशीर कशाला? चलूयाच! रावजी, ब्रेकफास्टचा बेत आपला नेहमीचाच ना?

रावजी: हो डॉक्टर. खिचडी आणि केजरी.

नंदिनी: केजरी? म्हणजे काय?

सावित्रीबाई: अगं, तो नुसता अगोचरपणा आहे. त्याचं काय आहे तुला सांगते. आपल्याकडचे लोक खूप आधीपासून मुगाच्या डाळीची खिचडी खायचे. टोपीकर हिंदुस्तानात आले तेव्हा त्यांना आमचं सुख बघवेना. म्हणून त्यांनी खिचडीचा विचका केला. त्यात आधी हाडूक टाकलं आणि वरून उकडलेली अंडी कुस्करून टाकली. पण इतकं करून समाधान होईना म्हणून नावाचा विचका केला. आता दाईचं दूध प्यायले म्हणून काय ह्यांना खड्ड्यातला ख, चरकातला च आणि डग्ग्यातला ड म्हणता येणार आहे? म्हणून मग खिचडीचं झालं केजरी.

नंदिनी: हे हाडूक म्हणजे कसल्या प्राण्याचं असतं?!

मधुरा: नाही गं. आमची मम्मा ना पूर्ण घाटी आहे. हाडूक कसलं आलंय? त्यात हॅडक मासा असतो. फार मस्त लागते केजरी. तू आज खाऊन बघ. माझ्याच शेजारी बसायचंस तू.

नंदिनी: बरं बाई!

बॅरिस्टर: चला तर. (सगळे जायला निघतात.)

रावजी: फॉर युअर काइंड परयूजल, नंदिनी मॅडम..

(नंदिनीच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह उमटतं.)

रावजी: सर कॉलिन कॅम्पबेल सरांनी सत्तावन्नच्या बंडावर फार चांगलं पुस्तक लिहिलंय मॅडम. गेस्ट बेडरूमच्या टेबलवर मी कॉपी ठेवतो. जरूर वाचून बघा. काडतुसाला लावलेल्या चरबीचं प्रकरण चौथ्या पानावर आहे. पेज फोर.

नंदिनी: पेज फोर?

रावजी: येस मॅडम. जरूर वाचून बघा.

❇

अंक दुसरा

(त्याच दिवसाची दुपार. दिवाणखान्यात कोणीही नाही. ग्रॅन्डफादर क्लॉकमध्ये चारला पाच मिनिटं कमी आहेत. नंदिनी येते आणि घड्याळाकडे निरखून पाहात राहते.)

नंदिनी: (स्वत:शी) मस्त आहे! आपल्याला आवडलं. टिक-टॉक! टिक-टॉक! हे-वा! हे-वा! (स्वत:शीच हसते. मग घड्याळासमोरून बाजूला जाऊन दिवाणखान्यात इकडेतिकडे निरुद्देश हिंडते. बुद्धिबळाच्या मोहऱ्यांशी चाळा करते. बंदुकीला हलकेच बोट लावून पाहते. अचानक मधुरा आत येते. ती पोपटी रंगाची साडी नेसलेली आहे.)

नंदिनी: मधुरा! तू इथे कशी? (चूक उमगून चेहरा झाकून घेत) अगं, सॉरी! मला तसं म्हणायचं नव्हतं. तुझंच तर घर आहे.

मधुरा: उगीच तुझ्या मागोमाग आले! (तिच्या जवळ जाऊन तिच्या साडीला हात लावत) छान दिसतेय तुला. (ही काल रात्रीचीच साडी आहे.)

नंदिनी: अगं, कसलं काय? आम्हा झुंजार पत्रकार मंडळींचा हा युनिफॉर्म असतो. त्याशिवाय अन्यायाविरुद्ध लढा द्यायला स्फुरण येत नाही. पण आज तू सुद्धा कशी काय साडी नेसलीस? किती क्यूट दिसतेयस!

मधुरा: असंच. तू नेसतेस म्हणून. (दोघी काही वेळ एकमेकींची नजर चुकवण्याचा प्रयत्न करत नि:शब्द उभ्या राहतात. मग तंद्री मोडते.) नंदिनी, एकदा मी तुझ्याबरोबर येऊ?

नंदिनी: कुठे?

मधुरा: असंच. तुझं काम बघायला?

नंदिनी: अगं, त्यात काय बघायचंय?

मधुरा: मला एकदा बघायचंय. (थांबून) तुला सांगू का नंदिनी, मी रोजचा पेपरपण धड वाचत नाही. त्यातल्या बऱ्याच गोष्टी माझ्या डोक्यावरून जातात. ते राजकारण मला कळत नाही. बाहेरच्या जगात एवढं काही ना काहीतरी चालू असतं त्याची मला नीट माहिती नसते. आज ब्रेकफास्टला तू आणि पप्पा इतकं भरभरून बोलत होतात. लेबर लॉ, कॉन्स्टिट्यूशनल राईट्स असं काही काही. मी आपली केजरीचा तोबरा भरून तुमच्याकडे टकमक बघत बसले होते. पण नुसतं ऐकत राहायला इतकी मजा आली. तुझं खूप कौतुक वाटतं गं. इतकं करतेस तू. You have such charge. मी आपली वेड्यासारखी नुसती बॅडमिंटन खेळते आणि पप्पांचे पैसे खर्च करते. असं काय उपयोगाचं ना? म्हणून म्हणतेय. तुझं काम कसं असतं मला खरंच समजून घ्यायचं आहे. कुठेकुठे फिरतेस, काय पाहतेस, इतक्या माणसांशी बोलतेस कशी, काय लिहायचं ते कसं ठरवतेस — सगळंच. मला नेशील?

नंदिनी: अगं, त्यात काय?! जरूर नेईन. पण एक सांगू का, त्यातलं खूपसं काम किचकट आणि तेच तेच असतं. ग्लॅमरस असं काही नसतं त्यात..

मधुरा: प्लीज, तसं समजू नकोस. मी काही सारखी ग्लॅमरच्या मागे धावते असं नाही.

नंदिनी: तसं नाही, तू कंटाळशील म्हणून म्हटलं..

मधुरा: (हसून) तू बरोबर असताना कंटाळेन कशी?

(अचानक दोघी नाक वाकडं करतात आणि एकमेकींकडे बघून हसत 'बसवण्णा!' असं एकदमच म्हणतात. बिडीचा धूर पांगावा म्हणून हातवारे करतात. नंदिनी मधुराला 'पटकन लप कुठेतरी' अशा अर्थाची खूण करते. मधुरा बावचळते आणि अलमारीत शिरून दार लावून घेते. बसवण्णा बिडी ओढत आत येतो. त्याच्या उजव्या हातात तीन वेगवेगळया रंगाच्या गुलाबांचा गुच्छ आहे.)

बसवण्णा: मॅडम, हे तुमच्यासाठी रोजचं बुके आणलं आहे. माथाडी कामगार संघात आमचं जमखंडीकडचं दोस्त असतं. ते म्हणालं तुम्ही त्यांना खटला जिंकून दिलंत म्हणून. आय वांट टु थँक यू

ऑन देअर बिहाफ, मॅडम. दे आर पूअर पीपल, मॅडम. लेबर मिळतं म्हणून घरदार सोडून इथे येतं. पुण्यात फिट बसायचं म्हणजे त्यांचं अवघडच की हो. काय चार पैसे मिळेल त्यातलं एक पैशात भागवून तीनचं बायकोला मनीऑर्डर घालून सोडतं. तुम्ही बॉम्बेला जाऊन त्यांच्यासाठी स्ट्रगल केलं म्हणजे मोठं काम केलं बघा.

नंदिनी: थँक यू, बसवण्णा! फार छान आहेत फुलं.

बसवण्णा: मॅडम, रोज इस माय स्पेशल्टी. पूना जिमखाना क्लबचं फॉर सेवन स्ट्रेट इअर्स फर्स्ट प्रैझ मीच मिळवतं.

नंदिनी: येस, बसवण्णा. तुझी स्पेशल्टी सगळ्यांना ठाऊक आहे.

बसवण्णा: आमच्या गावात एक फादर होतं. आमचं फादर नव्हे हो. चर्चात राहतं ते फादर म्हटलं तर. ते बोलून सांगायचं की दि नंबर थ्री स्टॅन्ड्स फॉर परफेक्शन इन द आईज ऑफ गॉड. म्हणून तीन कलरचं रोज कंबाईन केलं: पिंक रोज, यलो रोज अॅन्ड व्हाईट रोज.

नंदिनी: खरंच छान दिसताहेत फुलं.

बसवण्णा: पुढच्या वेळी होम व्हिजिटला जातंय तेव्हा तुमच्यासाठी बेळगावचं कुंदा घेऊन येईन बघा. कसं प्रिप्रेशन करायचं ते इथे पुण्यात कुणाला पण नॉलेज नाही बघा. बट आय विल गो बॅक टु माय गार्डन नाऊ. थँक यू अगेन, मॅडम. कीप फैटिंग.

नंदिनी: येस, बसवण्णा.

(बसवण्णा जातो. नंदिनी हळूच अलमारीकडे जाऊ लागते, पण तेवढ्यात हाक येते.)

तनय: नंदिनी! नोनो! माझी लाडाची जाज्वल्य पत्रकारिणी ती! कुठे आहेस?!

(तनय आत येतो. तो आणि नंदिनी एकमेकांना आवेगाने मिठी मारून चुंबन घेतात. मधुरा अर्थात अलमारीतच अडकलेली आहे.)

तनय: माथाडी कामगारांचा खटला जिंकलीस याबद्दल अभिनंदन बरं का!

नंदिनी: थँक यू.

तनय: त्यासाठी खूप काम केलं होतंस गं! आणि आबांनीही अर्थात. त्याचं चीज झालं.

नंदिनी: हो.

तनय: चार वाजता भेटायचा निरोप रावजीने तुला दिला असणार ना?

नंदिनी: हो, म्हणून तर आले.

तनय: मी त्याला म्हटलं होतं की तू एकटी नसशील तर आडवळणाची भाषा वापरून निरोप दे. तसा तो हुषार आहे.

नंदिनी: हो.

तनय: बरोब्बर चारला मी इथे आलोच होतो, पण बसवण्णाचा आवाज ऐकू आला. तो लेकाचा केव्हा कटतो याची बाहेर दबा धरून वाट बघत होतो. त्याची बडबड एकदा सुरू झाली की थांबत नाही.

नंदिनी: हो, पण आज लवकर आटोपलंन.

तनय: नोनो, तू आज काही बोलत नाहीयस.

नंदिनी: तसं नाही रे. कसा आहेस?

तनय: फार बरा नाहीय गं. (हातात हात घेऊन दोघे दिवाणावर बसून राहतात.) पोटात खूप दुखतं. सकाळी डॉक्टर आले होते ते नंतर मला गुपचूप भेटून गेले. रिपोर्ट्स वाईट आहेत. लिव्हर सिर्होसिस झालेला आहे. इथून पुढे सगळी घसरणच आहे.

नंदिनी: (कसंबसं रडू आवरत) यातलं आईबाबांना किती सांगितलं आहेस?

तनय: थेट काहीच सांगितलेलं नाही. त्यांचं त्यांनी जितपत ओळखलं असेल ते असेल. डॉक्टरांनाही मी बजावून ठेवलं आहे माझ्या अपरोक्ष त्यांच्यासमोर काही बोलू नका म्हणून. तुला सांगू का नोनो, आईआबांवर मी इतका काही खूप उखडलो आहे असं नाही. पण तसा आव आणणं हेच सध्या बरं वाटतं. त्यामुळे मग कुठलाच विषय फार वाढत नाही.

नंदिनी: मधुराला किती सांगितलं आहेस? (अलमारीकडे चोरून पाहते.)

तनय: बबडीला तर काहीच माहित नाही. तिला कळलं तर खूप वाईट वाटेल. ती माझी फार काळजी करते गं. तुझ्याबद्दलही मी तिला काहीसुद्धा बोललेलो नाही. धीर होत नाही आणि काय बोलावं ते कळत नाही. माझ्या लग्नाबिग्नाचा विषय काढते अधूनमधून. माझ्यावर प्रेम करणारं कुणीतरी हवं असं तिला फार वाटतं. पण मग मी स्त्रीद्वेष्टा कसा आहे, मला कुणीच कसं नको आहे, मी कुणालाच कसा नको आहे असं सगळं शिरा ताणून बोलून टाकतो. तेच सोपं वाटतं.

नंदिनी: तनय, मीही माझ्याबद्दल तुला सगळं सांगितलेलं नाही.

तनय: हे आणि काय आता?! सांगायचं ते सांगून टाक ना प्लीज.

नंदिनी: आज नको रे. एकदा नीट विचार करून सांगेन.

तनय: असं कितीसं वाईट असणार आहे? You are my sweetheart, Nandini.

नंदिनी: I know.

तनय: तू अशी तुटक का वागतेयस? तुला माझ्याशी बोलायचं नाहीय का?

नंदिनी: तसं नाही. (अस्वस्थपणे उठून बसत) छे! काय वेडेपणा आहे हा. अरे, असं नाही चालायचं. ती आत आहे —

तनय: कोण आत आहे?

(नंदिनी अलमारी उघडते. आतून मधुरा ओक्साबोक्शी रडत बाहेर येते. नंदिनी तिला मिठीत घेते. मधुरा तिच्या छातीवर अंग घुसळते आणि क्षणभर घोटाळून अचानक दोघी एकमेकींचं चुंबन घेतात. काही सेकंद तिघेही एकमेकांकडे अवाक होऊन पाहात राहतात आणि मग तिघांनाही अतोनात हसू फुटतं. हळूहळू हे हसू विरत जातं. दोघांचा एकेक हात धरून नंदिनी त्यांना दिवाणाकडे घेऊन जाते. तिघे शेजारी-शेजारी बसतात. नंदिनी मध्ये आहे. तिच्या उजवीकडे तनय तिला बिलगून बसला आहे आणि डावीकडे मधुरा बिलगून बसली आहे. काही काळ तिघेही निःशब्द राहतात.)

नंदिनी: तन्या, मला काय सांगायचं होतं हे तू ओळखलं असणार. मी बायसेक्शुअल आहे.

तनय: हो, ते दिसतंच आहे. पण मी मात्र एक धोपटमार्गी हेटरोसेक्शुअल आहे. चालेल ना तुला?

मधुरा: आणि मी एक अभिजात वळणाची हाय मेन्टेनन्स लेस्बियन आहे. नंदिनीवर माझं प्रेम आहे. मला नुकतंच कळलं.

(तिघे एकमेकांकडे बघून खिदळतात.)

नंदिनी: त्रांगडंच आहे हे!

तनय: 'त्रांगडं' हा शब्द समर्पक आहे.

मधुरा: मला फार छान वाटतंय. पुढे केव्हातरी आपल्याला अवघड गोष्टींवर बोलावं लागेल, पण तेव्हाचं तेव्हा बघू. आज नको. आज आनंदात राहूया.

(एकमेकांत हात गुंतवून ठेवून तिघेही मग्नपणे बसून राहतात. मधुरा नंदिनीचा चष्मा काढून स्वत:च्या डोळ्यांना लावते आणि हातातल्या काल्पनिक नोटपॅडवर काहीतरी लिहित असल्याचा अभिनय करते.)

मधुरा: (चष्मा सारखा करत) मिस नंदिनी गोखले, आमच्या हजारो वाचकांच्या मनात उद्भवलेला एक प्रश्न मी तुम्हाला विचारते: ही वेगळी वाट चोखाळण्याची प्रेरणा तुम्हाला कशी मिळाली?

नंदिनी: हा फार चांगला प्रश्न विचारलात तुम्ही! झालं कसं ते सांगते. माझा प्रियकर तनय जातेगावकर आणि माझी प्रेयसी मधुरा जातेगावकर यांच्या दिवाणखान्यात एक बुद्धिबळाचा संच आहे. तो फार देखणा असल्यामुळे येता जाता त्याच्याकडे नजर टाकण्याचा मोह होतो. त्यातून ही प्रेरणा मला मिळाली. जीवनाच्या पटावर प्रत्येक मोहऱ्याची चाल ठरलेली असते. हत्तीने सरळच जायचं आणि उंटाने तिरकंच जायचं. हत्तीला उंटासारखं तिरकं जाता येत नाही किंवा उंटाला हत्तीसारखं सरळ जाता येत नाही. हे असं का याला उत्तर नाही. त्यांचा तो स्वभावधर्म आहे इतकंच म्हणता येईल. But I am the queen on the board of life. मी हत्तीसारखी सरळही जाऊ शकते आणि उंटासारखी तिरकीही जाऊ शकते. हीच माझी स्वत:ची खरी ओळख आहे. ती मला पटवून दिल्याबद्दल मी जातेगावकर कुटुंबाचे मनापासून आभार मानते.

(तिघे पुन्हा खिदळतात.)

तनय: तू माझी नंदूराणी आहेस. (तिच्या उजव्या गालाची पापी घेतो.)

मधुरा: तू माझा नंदूवजीर आहेस. (तिच्या डाव्या गालाची पापी घेऊन तिला परत चष्मा घालते.)

तनय: माझी गुणाची बाय ती. तुझ्यावरून मीठमोहरे ओवाळून टाकायला हवेत.

(रावजी दारात येऊन खाकरतो.)

रावजी: चहा आणू का?

मधुरा: रावजी, बाहेर हवा खूप छान आहे. आजचा चहा आम्ही बागेतच बसून पिऊ. तिथेच आम्हाला तीन खुर्च्या टाकून दे.

रावजी: येस, मिस. (तिघांना उद्देशून) बागेत वेस्ट-पॅव्हिलियनमध्ये बसायची व्यवस्था करतो. अजून एकोणीस मिनिटांनी सूर्यास्त होणार आहे. तिथून चांगला दिसेल.

तनय: मग चला तर.

रावजी: कसं जायचं ते ठाऊक आहे ना? ह्या दारातून दिवाणखान्याबाहेर पडलात की आधी सरळ जा आणि मग तिरके जा.

मधुरा: रावजी, आगाऊपणा करू नकोस. आमचाच बंगला आहे.

३

(मध्ये काही दिवस लोटले आहेत. स्थळ, अर्थात दिवाणखाना. बॅरिस्टर आणि डॉक्टर अबोलपणे बुद्धिबळ खेळताहेत. एका टेबलावर चहाचा ट्रे मांडलेला आहे. तनय मांडी घालून जमिनीवर बसला आहे आणि एकाग्र चित्ताने नंदिनीची वेणी घालतो आहे. सावित्रीबाई विणकाम करताहेत. डॉक्टर एक चाल करतात. त्यावर थोडा विचार करून बॅरिस्टर त्यांची चाल करतात तशी डॉक्टर लागलीच पुढची चाल करतात. बॅरिस्टरांचा चेहरा व्यग्र होतो. काही वेळाने ते किंचित हसून मान डोलावतात आणि शेकहँड करून दोघे पटापासून दूर होतात. प्रत्येकी एकेक कप चहा ओतून घेऊन खुर्च्यांवर बसतात.)

सावित्रीबाई: कोण जिंकलं?

बॅरिस्टर: डॉक्टर.

सावित्रीबाई: म्हणजे तुमच्यावर मात झाली?

बॅरिस्टर: मी हार कबूल केली.

सावित्रीबाई: मला कळलंसुदीक नाही ते? सारं कसं शांत शांत चाललं होतं.

डॉक्टर: तसं नसतं, माई. न खेळणाऱ्यांची समजूत अशी असते की ओरडा करून बघ्यांचं डोकं उठवणं हा बुद्धिबळाचा भाग आहे. 'हाणा! मारा! बंडूनाना, वाचवा तुमचा वजीर! पांडूतात्या, गेला तुमचा उंट! बंडूनाना, हा घ्या शह! पांडूतात्या, हा मी शह काढला. हा घ्या तुम्हाला प्रतिशह!' That is not how gentlemen play. एकतर अशी सततची लाकूडतोड नसते. आणि दुसरं म्हणजे मात होईपर्यंत लांबवायचं नसतं. समजा एका खेळाडूने अशी चाल केली की तिथून पुढे मात देईपर्यंत त्याला सरळ हमरस्ता आहे. तर शिष्टसंकेत असा असतो की दुसऱ्याने ते कबूल करून हार मानावी. रस्ता दोघांनाही स्वच्छ दिसला म्हणजे पुरे. त्याच्यावर चालायची गरज नसते. चेहऱ्यावर एक सुरकुती पाडून आणि सेकंदापुरती नजर भिडवून तेवढा निरोप समोरच्याला कळवायचा असतो.

सावित्रीबाई: मग तर मला सहज जमेल. शिकवा एकदा.

(मधुरा आतून एका चांदीच्या ट्रे वर कापूस आणि नेलपॉलिशच्या अर्धा डझन बाटल्या घेऊन येते. नंदिनीच्या पायाशी ठिय्या मारून बसते.)

मधुरा: नंदी, तुझा पाय दे इकडे. रंग मी निवडणार. (नंदिनीचं पाऊल हातात घेऊन एकेक नेलपॉलिशची बाटली त्वचेलगत लावून पाहते. त्यातली एक निवडून पाऊल मांडीवर घेऊन तिच्या नखांना काळजीपूर्वक पॉलिश लावू लागते.) पप्पा, तुम्हाला हे यापूर्वी माहित नसणार, पण तुमची

एक प्रो-बोनो क्लाएंट आहे: मधुरा जातेगावकर नावाची. तुमची फी तिला परवडणार नाही, पण कायदेशीर सल्ला हवा आहे. विचारू का?

बॅरिस्टर: बोल बेटा.

मधुरा: तुम्ही आणि मम्मानं लग्न केलंत आणि आम्हाला जन्माला घातलंत. मला बॅडमिंटनची रॅकेटपण घेऊन दिलीत, त्याबद्दल थँक यू सो मच! आता इश्यू काय आहे ते तुम्हाला सांगते: तन्या, नंदी आणि मी अशा आम्हा तिघांचं एकमेकांवर प्रेम आहे. ह्या घरात आम्ही एकत्र राहणार आहोत. तन्या आणि नंदी कोकशास्त्र वाचून मूल करणार आहेत. ते मूल आम्ही तिघे मिळून वाढवणार आहोत. तुमच्या पैशांनी त्याला बॅडमिंटनची रॅकेट, पतंग आणि गोष्टींचं पुस्तक घेऊन देणार आहोत. तर आता माझा प्रश्न असा की आम्हा तिघांना एकमेकांशी लग्न करता येईल का?

बॅरिस्टर: बेटा, तशी कायदेशीर तरतूद नाही.

मधुरा: म्हणजे करता येणार नाही?

बॅरिस्टर: नाही. तू म्हणत असशील तर यावरची सगळी कलमं मी तुला दाखवू शकेन. हिंदू कोड बिल, स्पेशल मॅरेज ॲक्ट अशा कितीतरी नावांची जंत्री म्हणता येतील. पण त्यांत काही मिळणार नाही याची मला खात्री आहे. तशी कायदेशीर तरतूद नाही. एक पुरुष आणि एक स्त्री अशा दोघांनाच एकमेकांशी लग्न करता येतं. त्यापलिकडे नाही.

मधुरा: का नाही?

डॉक्टर: बॅरिस्टर, मर्मभेद झालेला आहे! सुकन्येचा प्रश्न बरोबर आहे: तशी कायदेशीर तरतूद का नाही? By golly, the occasion is just right! तुम्हाला सांगतो बॅरिस्टर, इतकी वर्षं तुमची न् माझी ओळख आहे पण एक गोष्ट मला कधीही नीट कळलेली नाही. मुळात कायदा म्हणजे काय हेच आम्हाला समजावून सांगा. त्यानंतर मग कायदेशीर तरतूद म्हणजे काय ते सांगा. रक्ताभिसरण कसं होतं हे मी तुम्हाला समजावून सांगितलं की नाही? Now you have to pay me in kind.

(बॅरिस्टर लगेच काही बोलत नाहीत.)

बॅरिस्टर: कायदा म्हणजे काय ते मला माहित नाही.

सावित्रीबाई: माहित नाही?! बाई गं! आता काय म्हणावं याला?! स्वत:ला कायदेपंडित म्हणवून घेऊन खोऱ्याने पैसे ओढलेत! त्यातून आमच्या डोक्यावर छत आलं, पोरीला बॅडमिंटनची रॅकेट आली, मला अळवाच्या लाडवांचं साहित्य विकत घेता आलं. पण कायदा म्हणजे काय ते माहित नाही! कुठे फेडाल हो हे पाप?! देवा, कशा माणसाशी जन्मगाठ बांधलीस रे?!

(बॅरिस्टर लगेच काही बोलत नाहीत.)

बॅरिस्टर: पण मला खरंच माहित नाही. मी लंडनमध्ये शिकायला होतो तेव्हा 'कायदा म्हणजे काय' यावर उलटसुलट चर्चा करत आम्ही लॉ स्टूडंट्स रात्रीच्या रात्री जागवायचो. खूप समरस होऊन बोलायचो. पण चर्चा करून एकदाच कायमचा सुटेल असा हा प्रश्न नव्हे. समजा तुम्ही लाडवासाठी गूळ खरेदी करायला मंडईत गेलात. तर त्या गुळात भेसळ असू नये असा कायदा आहे. जर कुणी भेसळ केली तर त्याला दंड होतो. हा कायद्याचा एक अर्थ झाला. पण आता दुसरं असं पाहा की डेक्कन जिमखान्यावर जमीन घेऊन आपण आपला बंगला बांधलेला आहे. त्यात आपल्या मालमत्तेची हद्द कुठे संपते आणि 'श्रमसाफल्य'ची कुठे सुरू होते याचा एक सर्व्हे असतो. घड्या घालून तुकडे पडायला आलेला हा एक जुनाट कागद असतो. तर आता हा सर्व्हे कुणी करायचा आणि झाल्यावर त्याची नोंद कुठल्या कचेरीत करायची यामागे लँड सर्व्हे ॲक्टचं पाठबळ आहे. कायद्याचा हा थोडा वेगळा अर्थ झाला, कारण यात दंडाचा किंवा शिक्षेचा थेट संबंध नाही. आता तिसरं असं पाहा की वयात आलेला हिंदू मुलगा वयात आलेल्या हिंदू मुलीशी लग्न करू शकतो, पण एका वेळी दोन मुलींशी लग्न करू शकत नाही. कायद्याचा हा आणखीनच भानगडीचा अर्थ झाला, कारण भेसळ म्हणजे काय हे ठरवण्यापेक्षा हिंदू कोण हे ठरवणं जास्त अवघड आहे. असे बरेच अर्थ होतात. ते सगळे आपण समोर मांडून ठेवले आणि त्यांच्यातलं समान सूत्र शोधायचा प्रयत्न केला तर फार गोंधळ होतो. म्हणून आमचे प्रोफेसर आम्हाला सांगायचे की 'कायदा म्हणजे काय' याचा फार विचार करू नका. कायद्यातल्या ठराविक मुद्द्यांचा विचार करा. बहुतेक वेळा तेवढ्याने भागतं.

तनय: ठीक आहे आबा, तुम्ही म्हणता ते बरोबर वाटतं. मग आता ठराविक मुद्द्याचाच विचार करूया. तुम्ही म्हणता की तीन माणसांना एकमेकांशी लग्न करता येईल अशी कायदेशीर तरतूद नाही. मान्य. पण माझा प्रश्न त्याच्या आधीचा आहे. एकच बाप्या आणि एकच बाई यांना एकमेकांशी लग्न करता येईल अशी कायदेशीर तरतूद का आहे?

बॅरिस्टर: का आहे म्हणजे?

तनय: मला एक गोष्ट कळत नाही. समजा आपल्या शेजारी 'श्रमसाफल्य' मध्ये राहणारी कुणीतरी ज्योती नाडकर्णी आणि सदाशिव पेठेत राहणारा कुणीतरी अशोक कुलकर्णी अशा दोघांना एकमेकांशी लग्न करायचं आहे. तर मी म्हणेन त्यांच्या कलाने त्यांना करू द्यावं. आता ते लग्न अंतरपाट धरून करायचं की रानफुलांच्या माळा घालून करायचं, भटजी बोलवायचा की समाजसुधारक बोलवायचा, पंक्तीला मठ्ठा असणार की नाही, लग्नानंतर कुठे राहायचं, संसार कुणाच्या पैशाने चालवायचा हे त्यांचं ते ठरवतील. मला हे कळत नाही की ह्या सगळ्याशी सरकारचा काय संबंध आहे? लग्नाबद्दल काहीतरी कायदा असला पाहिजे असा अट्टाहास सरकार का करतं? ज्योती नाडकर्णीने समजा भोंडला घातला तर सरकारला त्याच्याशी देणंघेणं नसतं. सरकारी कचेरीत जाऊन तो काही ती रजिस्टर करत नाही किंवा तिला करता येणार पण नाही. मग लग्न वेगळं का आहे?

डॉक्टर: एक कारण असं आहे की त्यांच्या शरीरसंबंधांना लग्नामुळे समाजमान्यता मिळते.

तनय: डॉक्टर, हे काही उत्तर नव्हे. एकतर समाजाची मान्यता आणि कायद्याची मान्यता या वेगळ्या गोष्टी आहेत. उदाहरणार्थ, वि. स. खांडेकर वाईट लिहितात हे सगळ्या समाजाला मान्य आहे. पण म्हणून असेंब्लीने तशा अर्थाचा ठराव पास करून घ्यायची काही गरज नसते. समाजमान्य असलेली गोष्ट कायद्याने मान्य केली पाहिजे असं काही नसतं. आणि मुळात अशा मान्यतेची गरज काय आहे? एकमेकांशी शरीरसंबंध ठेवायचे की नाही आणि ठेवायचे तर कसे ठेवायचे हे ज्योती आणि अशोक त्यांचं ते बघून घेतील. सरकारचं इथे काय काम आहे? कुणी असं का नाही म्हणत की खिरापतीला समाजमान्यता मिळावी म्हणून भोंडला रजिस्टर केला पाहिजे?

डॉक्टर: ठीक आहे, पण समज तुझ्या ज्योतीने आढेवेढे घेत अशोकशी शरीरसंबंध केला. आता त्यातून जर त्यांना मूल झालं तर पुढे काय?

तनय: तर पुढे काय? झालं तर होऊ दे. कायदा त्यांना बजावून सांगेल की त्या मुलाला खाऊपिऊ घालण्याची आणि गोष्टींचं पुस्तक घेऊन देण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे. ती टाळलीत तर तुम्हाला शिक्षा करू. त्या मुलाच्या आईबापाचं लग्न झालं होतं की नाही याच्याशी ह्या सगळ्याचा काही संबंध नाही. ते झालं काय आणि नाही झालं काय, जबाबदारी तीच आहे.

सावित्रीबाई: म्हणजे तुला म्हणायचंय की लग्नाबद्दल काहीच कायदा करायला नको? लोकांना हवं ते करू द्यावं?

तनय: हो! माझं मत नंतर चुकीचं वाटलं तर ते मी मागे घ्यायला तयार आहे. पण तूर्तास तरी म्हणतो की काहीच कायदा नको.

(थोडा वेळ घेऊन) आई, तुला एक उदाहरण पटतं का बघ. लग्न बाजूला ठेव. 'मैत्री' या संकल्पनेबद्दल आपण बोलूया. तसं पाहिलं तर हा फार ढगाळ विषय आहे. बऱ्याच गोष्टींचा नीट उलगडा होत नाही. म्हणजे समज विकास आणि विलास एकमेकांना ओळखतात. तर आता प्रश्न असा आहे की हे दोघे एकमेकांचे मित्र आहेत की नाहीत? नक्की काय असलं म्हणजे ते मित्र आहेत असं म्हणता येईल? म्हणजे बुवा आपण मित्र आहोत हे त्यांनी एकमेकांना स्पष्टपणे किंवा अस्पष्टपणे बोलून दाखवणं गरजेचं आहे का? तर याला निश्चित उत्तर नाही. समज विकास विलासला मित्र समजतो पण विलास विकासला मित्र समजत नाही. तर हे दोघे एकमेकांचे कितपत मित्र आहेत? याला निश्चित उत्तर नाही. ते एकमेकांना मित्र समजत असतील तरीदेखील मदन नावाचा तिसरा एखादा माणूस म्हणू शकतो का की त्यांची मैत्री खोटी आहे किंवा हा मैत्रीचा आभास आहे? समज तो तसं म्हणाला तर विकासविलास बरोबर की मदन बरोबर हे कसं ठरवायचं? याला निश्चित उत्तर नाही. हे सगळं तारतम्यावर अवलंबून आहे. पण निश्चित उत्तरं नाहीत म्हणून काही कुणी मैत्री करायचं किंवा तोडायचं थांबत नाही. चुकतमाकत का होईना लोक करायचं ते करतातच. 'मैत्री' ह्या संकल्पनेची प्रत्येकाची जाण थोडी वेगवेगळी असते, पण सगळेजण हे समजून सांभाळून घेतात.

मग लग्नाचं तसंच का नको? ज्योती आणि अशोकचं लग्न झालेलं असणं म्हणजे काय हा त्या दोघांचा, त्यांच्या नातलगांचा आणि शेजाऱ्यापाजाऱ्यांचा प्रश्न आहे. यात जी काही मतमतांतरं असतील ती हे लोक आपापल्या बुद्धीने सांभाळून घेतील. सरकारची यात लुडबूड कशाला?

नंदिनी: तन्या, तुझं पटत नाही असं नाही, पण मला काय वाटतं ते सांगते. तुला म्हणायचं असं की ज्योती आणि अशोकला लग्न करायचं असेल तर ते करू द्यावं. अर्धवट झोपेत गोपाळ मुहूर्तावर करायचं असेल तर तसं करू द्यावं. काडीमोड घ्यावीशी वाटली तर आपली काडीमोड झाली असं मावळत्या सूर्याच्या साक्षीने एकमेकांना सांगून ती घेऊ द्यावी. एकत्र सामानसुमान घेतलं असेल तर ते कसं वाटून घ्यायचं हे त्यांचं त्यांनी बघावं. ज्योतीला मध्येच तिसऱ्या कुणाशी लग्न करावंसं वाटलं तर तो त्या तिघांचा अंतर्गत प्रश्न आहे. सरकारचा आणि कायद्याचा यात काही कुठे संबंध नाही. बरोबर?

तनय: बरोबर.

नंदिनी: एक पटतं का पाहा. तन्या, समज तू एक कादंबरी वाचतोयस. तुला कंटाळा आला, शेवटच्या पानापर्यंत वाचण्यात अर्थ नाही असं वाटलं तर ती तू सोडून देशील. बरोबर?

तनय: बरोबर.

नंदिनी: आता समज तू थिएटरमध्ये जाऊन एक नाटक बघतोयस. तुला कंटाळा आला, शेवटच्या अंकाचा पडदा पडेपर्यंत बघण्यात अर्थ नाही असं वाटलं तर ते तू सोडून देशील. बरोबर?

तनय: बरोबर.

नंदिनी: पण या दोन्हींत फरक आहे. तू कादंबरी सोडून दिलीस ह्याची कुणाला फिकीर नसते. पण नाटक सोडून देताना दोन गोष्टी होतात: एक तर थिएटरच्या बाहेर जाताना इतरांचे गुडघे खात जावं लागतं. आणि दुसरं म्हणजे तू नाटक सोडून चाललायस हे इतर लोक टक लावून बघतात.

चाललेलं नाटक सोडून जाणं हा अशिष्टपणा आहे असं त्यातल्या काहींना वाटतं आणि असं वाटणारे लोक तिथे असणार आहेत हे तुला आधीपासूनच ठाऊक असतं. यामुळे फरक पडतो. हा सगळा अप्रियपणा टाळण्यासाठी तू कंटाळवाणं नाटकसुद्धा पंधरा मिनिटं जास्त बघशील. आणि त्या पंधरा मिनिटांत कदाचित तुला ते आवडायला लागेल.

तनय: शक्य आहे.

नंदिनी: लग्नाचं असंच असणार. अगदी परस्परसंमतीने जरी घेतला तरी कायदेशीर घटस्फोट हा त्रास असतो. मावळत्या सूर्याकडे नुसतं तोंड करून तो होत नाही. तेव्हा ज्योती आणि अशोकचं लग्न समज डुगडुगायला लागलं तर घटस्फोटाचा त्रास वाचावा म्हणून दोघे मिळून ते सावरायचा थोडा जास्त प्रयत्न करतील. हा त्रास पुरता काढून टाकला तर अगदीच बेतासबात प्रयत्न करतील. तेव्हा सरकारी लुडबूड ही काही सदासर्वकाळ वाईट गोष्ट नव्हे.

तनय: (मान डोलावतो.) मान्य. तू म्हणतेयस त्यात तथ्य आहे. पण याला आणखी एक बाजू आहे. मी असं म्हणेन की मैत्रीभोवताली कायदे असे काही नसल्यामुळे ती संकल्पना जास्त श्रीमंत होत जाते. मैत्री करणं म्हणजे काय किंवा मैत्री तोडणं म्हणजे काय ह्याबद्दल प्रत्येकाला स्वत:चा विचार करावा लागतो. लग्नाबाबतीत होतं काय की सगळ्यांसाठी एकाच मापाची चड्डी मायबाप सरकारने विकायला काढल्यामुळे लोक ती घालून घेतात, आणि आपापलं ढुंगण नीट मोजून घेऊन त्याप्रमाणे व्यवस्थित बेतलेली चड्डी कशी शिवता येईल याचा विचार करेनासे होतात. पण ते आता राहू दे. आपण म्हणालो म्हणून काही सरकार इतक्यात दुकान बंद करणार नाही. नोनो, तुझा स्वत:चा कल काय आहे? तुला लग्न करावंसं वाटतं की नाही? किंवा कसं?

नंदिनी: (म्हटलं तर हो, म्हटलं तर नाही असा आविर्भाव करते.) नुसत्या आपल्या दोघांना करता येईलच. पण मला तसं करायचं नाहीय. मधुराच्या मनात खूप आहे. तेव्हा करायचं तर तिला घेऊन करायचं, नाहीतर नाही.

हवी गं हवी, मला माझी मधुरा
तिच्याविना वाटे, संसार अधुरा

बघा डॉक्टर, तन्याच्या संसर्गानं मी यमक जुळवायला शिकले आणि तुमच्या संसर्गानं वाईट कोट्या करायला शिकले!

मधुरा: उगी, उगी! (नंदिनीच्या पावलावर प्रेमाने थापटते.)

तनय: (नंदिनीला उद्देशून) Thank you for the compliment, love.

नंदिनी:

You are welcome, mister
My beloved poetaster!

मधुरा: फार सुंदर काव्यपंक्ती आहेत! (टाळ्या वाजवल्याचा अभिनय करते.) नंदी, तू इथेच बसून राहा. नाहीतर नेलपॉलिश फिसकटशील. (तिला दिवाणावर बसवून पायांखाली एक उशी ठेवून तिच्यासाठी चहा घेऊन येते.) पप्पा, मला तुमचे हे जडजंबाल विषय कळत नाहीत. तन्या म्हणतो की लग्नाचे कायदे ही आपल्या खाजगी आयुष्यात सरकारची लुडबूड आहे. असेल. पण मला सरकारची लुडबूड हवी आहे. इतरांच्या आयुष्यात सरकार लुडबूड करतं तर माझ्या आयुष्यात का नये करू त्यानं? इतरांना हवं तेच मला हवं आहे. आता माझं थोडं वेगळं आहे. मला पुरुषाचं आकर्षण वाटत नाही, पण बाईचं वाटतं. नंदीचं तिसरंच काहीतरी असतं. तिला पुरुषाचं वाटतं आणि बाईचंही वाटतं. कसं काय जमतं तिला कळत नाही. पण आता इतके किरकोळ फरक तुमच्या सरकारला सांभाळून का घेता येत नाहीत? तेव्हा पप्पा, तुम्ही आमचं वकिलपत्र घ्या. सरकारात दाद मागा आणि आम्हा तिघांना लग्न करता येईल अशी कायदेशीर तरतूद करून आणा.

नंदिनी: तसं शक्य आहे, आबा? (जीभ चावते.) सॉरी, तन्याच्या संसर्गानं तेच तोंडात आलं!

बॅरिस्टर: You too, Nandini?! Then die Barrister!

नंदिनी: सॉरी सर, पण सांगा ना!

बॅरिस्टर: बबडे, त्याआधी तू मला एक सांग. तुला नंदिनीशी लग्न करायचं आहे की दोघांशी?

मधुरा: दोघांशी. मला आणि तन्याला काही शरीरसंबंध करायचा नाहीय. पण त्याचा, माझा आणि नंदीचा संसार एकच असणार आहे. म्हणून मला त्या दोघांशी लग्न करायचं आहे.

बॅरिस्टर: मला अवघड वाटतं. पण बबडीने कायदेशीर सल्ला मागितला आहे तर तो रीतसर द्यायला हवा. (स्वत:साठी आणखी एक कपभर चहा ओतून घेतात. तुम्हालाही हवा असेल तर पुष्कळ आहे, असा आविर्भाव करतात. तनय नंदिनीचा कप पुन्हा भरतो.)

नंदिनी: अशी एका जागी खिळून बसून चहा पीत राहिले तर शू लागेल.

सावित्रीबाई: अगं, तेवढाच सराव होईल. चहा ढोसत राहिल्याशिवाय का कुठे पत्रकार होता येतं? आणि बाईच्या जातीला शू दाबून ठेवायची सवय हवीच.

बॅरिस्टर: झालं तुमचं?!

सावित्रीबाई: हो.

बॅरिस्टर: ठीक. तर आपल्यासमोरचा प्रश्न असा आहे की तीन सज्ञान व्यक्तींना एकमेकांशी लग्न करता येईल अशी कायदेशीर तरतूद सध्या नाही, तर ती कशी करून घ्यायची. यात दोन अडचणी आहेत: एकतर बबडी लेस्बियन आहे आणि स्वत: स्त्री असून तिला दुसऱ्या स्त्रीशी लग्न करायचं आहे. सध्या हे कायद्याने शक्य नाही. दुसरं म्हणजे नंदिनी बायसेक्शुअल आहे आणि तिला एका पुरुषाशी आणि एका स्त्रीशी एकाच वेळी लग्न करायचं आहे. हेही सध्या शक्य नाही. तर मग काय करायचं?

अशी कायदेशीर तरतूद अर्थात पार्लमेंट करू शकतं. तेव्हा ती करा बाबांनो, अशी पार्लमेंटमध्ये बसलेल्या लोकांना — म्हणजेच खासदारांना — गळ घालणं हा एक मार्ग आहे. पण 'खासदार' ह्या जमातीतले शंभरांपैकी पंचाण्णव लोक बेअक्कल असतात. त्यांच्या नादी लागण्यात अर्थ नसतो,

तेव्हा तो विचार नको.

दुसरा मार्ग म्हणजे कोर्टात फिर्याद करणं. तिथे बेंचवर बसलेले लोक जास्त शहाणेसुरते असतात. हेकट माणसं तिथेही आहेतच, पण तीच फक्त भरलेली नाहीयत. त्यामुळे हा मार्ग जास्त बरा वाटतो. तर फिर्याद अशी करायची की अमुक प्रकारची कायदेशीर तरतूद नसणं हा माझ्या अशिलावर अन्याय आहे. न्याय देणं याच कामासाठी कोर्ट बसवलेलं असल्यामुळे अन्याय झाला असं म्हटलं की त्याला दखल घ्यावी लागते. पण अन्याय झाला असं नुसतं म्हणून चालत नाही, तर ते म्हणायचा एक ठराविक साचा असतो. आपल्या देशाच्या घटनेत काही वेचीव शब्दप्रयोग आहेत: आपण सगळे कायद्यासमोर समान आहोत असं त्यात म्हटलेलं आहे. किंवा आपल्या सर्वांना सन्मानाने जगता येईल अशी हमी दिलेली आहे. नक्की शब्दप्रयोग महत्त्वाचे नाहीत आणि घटनेत ते कुठे येतात हेही महत्त्वाचं नाही. प्रीअँबल बघा किंवा पार्ट थ्री आर्टिकल फिफ्टीन बघा असं लोक एकमेकांना सांगतात, पण प्रत्यक्षात तिथे बघून काही जास्त कळतं असं नाही. तर मी साचा म्हणालो तो असा की सध्याचा कायदा ज्या भाषेत लिहिलेला आहे त्यामुळे अमुक पानावर नमूद केलेल्या माझ्या तमुक घटनात्मक हक्काचा भंग होतो असं कोर्टाला म्हणायचं. आता हे जर रिवाजाला धरून म्हणायचं तर कुरूप आणि क्लिष्ट इंग्रजीत शे-दोनशे पानं खरडावी लागतात. जुन्या केसेस शोधून काढून त्या त्या जजमेंटातले उतारे द्यावे लागतात. पण तो सगळा कंटाळवाणा कारकुनी भाग झाला. बेंचवर बसलेले लोक इतके शहाणेसुरते असतात की ही दोनशे पानं ते वाचत नाहीत.

नंदिनी: You sound cynical, Sir.

बॅरिस्टर: Do I? Well, I am being pragmatic, that's all. तुपकट चेहरा करून ब्रह्मानंदी टाळी लागल्याच्या आविर्भावात घटनेबद्दल भरभरून बोलण्याचा आपल्याकडे प्रघात आहे. तो मी पाळत नाही.

नंदिनी: (हसू दाबत) All right. Do go on, Sir.

बॅरिस्टर: तर आपल्या घटनेत असं म्हटलेलं आहे की अशोक कुलकर्णी आणि बबडी जातेगावकर

कायद्यासमोर समान आहेत. मुख्य म्हणजे ते भिन्नलिंगी आहेत म्हणून त्यांना वेगळं वागवता येत नाही. अशोक पुल्लिंगी आहे म्हणून त्याने कमी टॅक्स द्यायचा आणि बबडी स्त्रीलिंगी आहे म्हणून तिने जास्त द्यायचा असं सरकारला करता येत नाही. तसं केलं तर समानता ह्या तत्त्वाचा भंग होईल. पण मेख अशी की काही बाबतींत त्यांना वेगळं वागवलेलं कायद्याला चालतं. अशोकला सैन्यात शिरून लढाईवर जाता येतं तसं बबडीला जाता येत नाही. तिला सैन्यात डॉक्टर होता येतं, पण सीमेवर जाऊन लांड्यांना थेट गोळ्या मारता येत नाहीत. हे असं का याला सरकार बरीच कारणं देतं. सरकार म्हणतं की बबडीला एकतर इतकी जड बंदूक उचलणार नाही. शिवाय सीमेवर तंबू ठोकून राहात असताना अशोकला उघड्यावर कुठेतरी आंघोळबिंघोळ करावी लागते तेव्हा बबडी तिथे आसपास नसलेलीच बरी. म्हणजे एकूण सरकार असं म्हणतं की प्राणाची बाजी लावून देशाचं संरक्षण करण्याची परवानगी आम्ही बबडीला देत नाही, पण यामुळे समानता ह्या तत्त्वाचा भंग होतो असं काही म्हणता येणार नाही.

आता होतं काय की 'समानता' हा शब्द फार अमूर्त आहे, आणि सामान्य लोकांच्याच नव्हे तर न्यायाधीशांच्याही मनात त्याला स्पष्ट अर्थ असा नसतो. त्यामुळे सरकारचं बरोबर की चूक हे ठरवणं अवघड जातं. यावर उपाय म्हणजे जो काही विशिष्ट मुद्दा विचाराधीन असेल त्यावरची तुमची भावनिक किंवा नैतिक प्रतिक्रिया वापरणं. बबडी स्त्री आहे म्हणून तिला टॅक्स जास्त लावला तर 'अरेच्चा, हे बरोबर नाही बरं का' अशी प्रतिक्रिया मनात पटकन उमटते. 'समानतेच्या तत्त्वाचा भंग झाला' हे त्या प्रतिक्रियेचं कपडे घातलेलं रूप आहे. कोर्टात युक्तिवाद करताना लोक तत्त्वाची भाषा वापरतात, कारण पद्धत तशी आहे. पण खरं काम त्यामागची प्रतिक्रियाच करत असते. याउलट बबडीला लढाईवर न्यायला सरकार नाही म्हणालं तर अशी काही प्रतिक्रिया बहुतेक लोकांच्या मनात उमटत नाही. उलट लोकांना बबडीबद्दल काळजी वाटते आणि 'कशाला बाई तिथे जातेस' असंच ते मनातल्या मनात म्हणतात. त्यामुळे मग समानतेचं तत्त्व आपोआपच बाजूला पडतं. लढाईवर जायची बबडीला स्वत:ला खूप उबळ असली तरी इतरांवर तिचा म्हणावा तसा परिणाम होत नाही.

आपला प्रश्न हाच आहे. अशोक कुलकर्णीला एका स्त्रीशी लग्न करता येतं तर मग बबडी जातेगावकरला का नाही? यामुळे समानतेच्या तत्त्वाचा भंग का होत नाही? आणि इथेही अडचण तीच आहे. एका बाईला दुसऱ्या बाईबरोबर संभोग करावासा वाटू शकतो किंवा संसार थाटावासा

वाटू शकतो हे बहुतेक लोकांच्या मनाआड असतं. त्यांना ते आतून कळत नाही. आणि त्यामुळे बबडीची तक्रार ऐकूनही कुणाला त्याबद्दल फारशी सहानुभूती वाटत नाही. आता जर तुम्ही इथे समानतेचा आग्रह धरलात तर त्यामागे सहानुभूतीचं पाठबळ नसल्यामुळे होतं काय की एकतर लोकांना तो दुराग्रह वाटतो किंवा एकूणच त्या प्रश्नात दात कुठून रोवावेत ते कळत नाही.

नंदिनी: पण म्हणजे सर, 'समानता' किंवा 'सन्मान' हे शब्द इतक्या व्यासंगी चश्मिष्ट लोकांनी घटनेत आवर्जून लिहून ठेवले आहेत, त्यांना स्वत:चा असा अर्थ काही नाही?

बॅरिस्टर: (अनिश्चितपणे मान हलवतात.) मला तसं म्हणायचं नाही. निदान उघडपणे म्हणायचं नाही. पण नंदिनी, असं बघ की शब्द आणि त्यांचे अर्थ यावर सेमिनार भरवून काही निष्पन्न होत नाही. समानता म्हणजे काय किंवा सन्मान म्हणजे काय यावर काथ्याकूट करण्याऐवजी कायद्याच्या विशिष्ट मुद्द्यात समानतेचा संबंध कसा येतो इतकंच पाहणं सोयीचं पडतं. आपलं आर्ग्युमेंट समोरच्याला पटवून द्यायचं असेल तर उपयोग त्याचा होतो. जज्जच्या डोक्यातली अमूर्त कल्पना आणि तुमच्या डोक्यातली अमूर्त कल्पना ह्या दोघी एकमेकींत बसवायला गेलात तर ते बापजन्मी शक्य होत नाही. माथाडी कामगारांना सन्मानाने जगण्याचा हक्क आहे हा मुद्दा आपण मुंबईला हायकोर्टासमोर मांडला. त्याला बळकटी यावी म्हणून इंग्लंडमधल्या औद्योगिक क्रांतीपर्यंत मागे जाऊन ऐतिहासिक दाखले दिले. मँचेस्टर गार्डियनचे पिवळे पडलेले अंक तपासले. ह्या विषयावर हाउस ऑफ लॉर्ड्समध्ये किती साली कोण काय म्हणालं होतं ते भिंग लावून हॅन्सर्डमध्ये बघून आपल्याला हवा तो त्यातला भाग वापरून घेतला. ह्या सगळ्याचा उपयोग झाला आणि आपण केस जिंकलो. पण सन्मानाने जगणं म्हणजे काय किंवा त्यात कशाचा अंतर्भाव होतो आणि कशाचा होत नाही हे मोघम विचारलंस तर मला तसं सांगता येणार नाही.

नंदिनी: मान्य आहे, सर. पण मग माझ्या किंवा मधुराच्या बाबतीत असं आर्ग्युमेंट यशस्वी होईल असं तुम्हाला वाटत नाही?

बॅरिस्टर: नाही. मी म्हणालो की बेंचवर बसलेली माणसं जास्त शहाणीसुरती असतात. पण त्यांच्या जजमेंटमध्येही भावनिक प्रतिक्रियेचा वाटा असतोच. तसं ते कबूल करणार नाहीत, पण म्हणून तो नाहीसा होत नाही. आणि ही प्रतिक्रिया कुणाची काय असेल ते सद्यपरिस्थितीत सांगवत नाही. पण

जरी ती आपल्याला धार्जिणी असली तरीसुद्धा ज्या वाटेने त्यांना आपण जायला सांगतो आहोत ती इतकी बिकट आहे की ही शहाणी माणसंही कचरतीलच. मग अशा वेळी प्रश्न टाळण्याचा एक हुकमी आणि ठरीव मार्ग कोर्टासमोर असतो. अमुकतमुक निर्णय हा न्यायालयाच्या कक्षेत येत नाही तर तो पार्लमेंटने घ्यावा असा एक संकल्प म्हणता येतो. प्रत्यक्षात काय असतं की पार्लमेंटमध्ये बसणाऱ्या मंडळींच्या सुज्ञपणाबद्दल बेंचवर बसणाऱ्यांचं मत फारसं चांगलं नसतं. असा निर्णय घेण्यासाठी जो विचारीपणा लागतो तो पार्लमेंटकडे आहे असं त्यांना मनातून वाटत नसतंच. पण तसं कुणी बोलून दाखवत नाही. म्हणजे आपापसांत व्हिस्की पिताना ठीक आहे, पण चारचौघांत नाही.

नंदिनी: मग आम्ही काय करायचं सर? ही भावनिक प्रतिक्रिया म्हणा किंवा सहानुभूती म्हणा, आमच्या बाजूला वळावी म्हणून आम्ही काय करायचं? वर्तमानपत्रातून लेख लिहून आम्ही आहोत, आमच्याकडे लक्ष द्या, असं सांगायचं? मोर्चे काढायचे?

बॅरिस्टर: हो. अगदी आत्ताच नको. पायाची नखं वाळू देत. पण त्यानंतर हो.

नंदिनी: पण असं असेल तर मला तन्याचं म्हणणं जास्त जास्त पटायला लागलं आहे. तुम्ही म्हणता तसे दोन वेगळे मुद्दे यांत गुंतलेले आहेत. मधुरा लेस्बियन आहे म्हणून तिला एका बाईशी लग्न करायचं आहे. आता लेस्बियन बाया एकतर दुर्मीळ आहेत आणि शिवाय चारचौघींसारख्याच दिसतात. बॅडमिंटन खेळताना मधुरा काही वेगळी ओळखू येत नाही. पण त्यामुळे कायद्याने त्यांना एकमेकींशी लग्न करता येत नाही ही अडचण कुणी मनावर घेत नाही. मग त्यांनी काय करायचं? तुम्ही म्हणता की मोर्चे काढायचे, लेख लिहायचे, बेअक्कल खासदारांची मनधरणी करायची, डेक्कन क्वीनने मुंबईला जाऊन जज्ज नरीमनसमोर पदर पसरायचा. कित्येक वर्षं उन्हाळ्यामागून पावसाळ्यामागून हिवाळे हे सतत करत राहिल्यानंतर केव्हा तरी ही कायदेशीर तरतूद होईल. जेव्हा होईल तेव्हा त्या पेढे वाटतील. ठीक आहे.

मी बायसेक्शुअल आहे, म्हणून मला एका बुवाशी आणि एका बाईशी एकाच वेळी लग्न करायचं आहे. आता बायसेक्शुअल माणसं एकतर दुर्मीळ आहेत आणि शिवाय चारचौघांसारखीच दिसतात. लेडीज हॉस्टेलात मी काही वेगळी ओळखू येत नाही. पण त्यामुळे कायद्याने आम्हाला एकाच वेळी

दोन माणसांशी लग्न करता येत नाही ही अडचण कुणी मनावर घेत नाही. मग आम्ही काय करायचं? तुम्ही म्हणता की मोर्चे काढायचे, लेख लिहायचे, बेअक्कल खासदारांची मनधरणी करायची, डेक्कन क्वीनने मुंबईला जाऊन जज्ज सोराबजीसमोर पदर पसरायचा. कित्येक वर्षं उन्हाळ्यामागून पावसाळ्यामागून हिवाळे हे सतत करत राहिल्यानंतर केव्हा तरी ही कायदेशीर तरतूद होईल. जेव्हा होईल तेव्हा आम्ही बर्फी वाटू.

पण हे ठीक नाही, सर. ह्यात अतोनात वेळ फुकट जातो आणि अतोनात शक्ती फुकट जाते. तोच तो प्रश्न आपण किती वेळा सोडवत राहणार? म्हणूनच तन्याचं म्हणणं बरोबर वाटतं, सर. तुमच्या कायद्याला आम्ही म्हणतो की बाबारे, आमच्या अंथरुणातून तुझी सोंड काढून घे. तुझ्या तरतुदी आम्हाला नकोत. आमचं आम्ही बघून घेऊ.

(थोडा वेळ कुणी काही बोलत नाही.)

डॉक्टर: आणि कोर्टकचेऱ्या करायच्या तर तितका वेळही आपल्याकडे नाही.

तनय: डॉक्टर —

डॉक्टर: तितका वेळ आपल्याकडे नाही.

सावित्रीबाई: हो, ते तुकड्यातुकड्यांनी माझ्या लक्षात यायला लागलं आहे. तन्या स्वत:ला खूप हुशार समजतो. पण मी काही खुळी नाही. त्याच्या पोटात दुखतं, डोळे पिवळे दिसतात हे काही त्याला नीट लपवता येत नाही.

बॅरिस्टर: डॉक्टर, तितका वेळ नाही म्हणजे किती आहे?

डॉक्टर: तसं निश्चित कधीच सांगता येत नाही. पण ही सगळी डीकॉम्पेन्सेटेड सिऱ्होसिसची लक्षणं आहेत. यातून तो कायमचा उठेल अशी शक्यता कमी आहे. दीडदोन वर्षं मिळाली तर मिळाली.

(थोडा वेळ कुणी काही बोलत नाही.)

तनय: आबा, आई, सज्जनहो, सगळे ऐका. मी जसा जगलो तसा जगलो; जे प्यायलो ते प्यायलो. आता जे व्हायचं ते होईल. त्याबद्दल रडत बसूया नको. माझ्याकडे जितका वेळ उरला आहे तो वापरून घेऊया. मी म्हणतो की कायदा आणि त्याची तरतूद दोघेही काशीत जावोत. आम्ही तिघे घरगुती लग्न करू. सरकारदरबारी ते रजिस्टर होणार नाही आणि आम्हाला करायचंही नाही. तुम्ही आशीर्वाद द्या, तेवढं आम्हाला पुष्कळ होईल.

बॅरिस्टर: ठीक आहे.

सावित्रीबाई: मी तयारीला लागते.

मधुरा: (उत्साहात येऊन) I like tradition! मी आणि नंदी शालू नेसणार आहोत. तन्याला आपण झुळझुळीत झब्बा घालूया. सगळं कसं वेदोक्त आणि पारंपारिक करायचं!

सावित्रीबाई: बबडे, शब्द 'पारंपरिक' असा आहे. 'परंपरा' पासून 'पारंपरिक'.

मधुरा: मम्मा, तू म्हणजे अशी पंतोजीण आहेस ना! पण माझी लाडकी मम्मा आहेस. म्हणून आहेस तश्शी चालवून घेते तुला.

सावित्रीबाई: न घेऊन सांगशील कुणाला बबडे?

तनय: मग ठरलं तर! बार उडवूनच टाकू. Let us make an honest woman out of you, Nandini.

नंदिनी: Thank you, dear. But I would rather be doubly honest.

डॉक्टर: बॅरिस्टर, ही तुम्हाला अडचणीत आणणार! A doubly honest woman may prove

doubly dangerous in a lawyer's house.

बॅरिस्टर: आता विनोद पुरेत. तयारीला लागूया.

डॉक्टर: पौरोहित्य मी करणार, त्यामुळे माझे विनोद तुम्हाला सहन करावे लागतील.

३

(लग्नाचा दिवस. मधुरा, नंदिनी आणि सावित्रीबाई शालूत आहेत. तनयने वेलबुट्टी काढलेला झुळझुळीत सदरा आणि धोतर असा वेष केला आहे. बॅरिस्टरांनी सूट घालून मिडल टेंपलचा नेकटाय लावला आहे. रावजीने बंद गळ्याचा कोट घातला आहे तर बसवण्णाने दक्षिणी पद्धतीचा पंचा गुंडाळला आहे. डॉक्टर सोवळ्यात आहेत. रावजी ग्रॅन्डफादर क्लॉकपाशी उभा राहतो. बसवण्णा एक वेताची टोपली घेऊन येतो आणि नंदिनीला दोन पिवळे, तनयला दोन पांढरे आणि मधुराला दोन गुलाबी रंगाचे हार काढून देतो. नाटकातली आठही पात्रं ह्या घटकेला रंगमंचावर आहेत. रावजीने वेळ झाल्याची खूण करताच डॉक्टर आपल्या हातातला इंग्रजी 'वाय' अक्षराच्या आकाराचा अंतरपाट उलगडतात. त्याचे तीन पदर डॉक्टर, रावजी आणि बसवण्णा हातात घेतात, तर तीन कोनांमध्ये तनय, मधुरा आणि नंदिनी उभे राहतात.

स्वस्ति श्री गणनायकम् गजमुखम् मोरेश्वरम् सिद्धिदम्
बल्लाळो मुरुडम् विनायकमहम् चिंतामणिम् थेऊरम्

असा उंच किनरा आवाज लावून रावजी सुरुवात करतो, तसे डॉक्टर, बसवण्णा, बॅरिस्टर आणि सावित्रीबाई त्यात सूर मिसळतात. ह्या नाटकाचा प्रयोग कुणाला करावासा वाटला तर मंगलाष्टकं म्हणण्यात प्रेक्षकांना सहभागी करून घेता येईल.

तदेव लग्नम् सुदिनम् तदेव
ताराबलम् चंद्रबलम् तदेव
विद्याबलम् दैवबलम् तदेव
लक्ष्मीपते तेंऽघ्रियुगम् स्मरामि

हा श्लोक झाल्यानंतर ‘शुभमंगल सावधान’ होऊन अंतरपाट दूर होतो. तिघांपैकी प्रत्येकजण आपल्या हातातले दोन हार इतरांच्या गळयांत घालतो, जेणेकरून तीन वेगवेगळया रंगसंगती तयार होतात. तिघेजण उपस्थितांच्या पाया पडून आशीर्वाद घेतात.)

तनय: (किंचित झोकांड्या देत बरळल्यासारख्या सुरात) डॉक्टर, हिला शपथ घ्यायला लावा! (त्याच्या आविर्भावावरून हे थट्टेत चाललं आहे हे स्पष्ट व्हावं.)

नंदिनी: घेईन ना पतिराज! पण मी एकटीच नाही. आपण सगळे घेऊ.

डॉक्टर: सगळयांनाच घ्यावी लागणार आहे. असे ओळीने उभे राहा. शपथ देतो तुम्हाला —

(तनय, नंदिनी आणि मधुरा ओळीने उभे राहतात.)

डॉक्टर: धर्मे च, अर्थे च, कामे च —

तनय: नातिचरामि

नंदिनी: नातिचरामि

मधुरा: नातिचरामि

डॉक्टर: धर्मे च, अर्थे च, कामे च —

तनय आणि **नंदिनी:** नातिचराव:

नंदिनी आणि **मधुरा:** नातिचराव:

मधुरा आणि **तनय:** नातिचराव:

(रावजी एका चांदीच्या प्लॅटरवर दाट किरमिजी रंगाचा फ्रूट-केक घेऊन येतो.)

रावजी: माय हार्टिएस्ट कॉन्ग्रॅच्युलेशन्स ऑन युअर वेडिंग, सर अ‍ॅन्ड मॅडम्स! ‘मिसेस बीट-ऑन्स बुक ऑफ हाउसहोल्ड मॅनेजमेंट’ मध्ये वाचून मी हा फ्रूट-केक तयार केला आहे. इट्स अ व्हेरी कलेक्टिबल बुक. बॅरिस्टरसरांनी चेरिंग क्रॉसला विकत घेतल्याची त्यांच्याच हस्ताक्षरातली नोंद आहे.

(सगळे केक खाऊन पाहतात.)

मधुरा: आहाहा! रावजी, केक झकास झाला आहे! पण तुला किती वेळा सांगितलं की ‘मिसेस बीट्न’ असं म्हणायचं. ‘बीट-ऑन’ नव्हे. तो काय क्रिकेटमधला फॉलो-ऑन आहे का?

रावजी: येस मिसेस, सॉरी मिसेस. गेल्या पंधरवड्यात त्या कर्वेमॅडम आल्या होत्या तेव्हा मी असंच म्हणालो. पण मी काय बोलतोय ते त्यांना कळलं नाही.

मधुरा: नाही तरी ती कर्वीण जरा मंदबुद्धीच आहे. तिला वाटतं की आपल्या पोराशी सारखं इंग्लिशमधून बोललं तर त्याला जगन्नाथ शंकरशेट मिळेल. इथे आली होती तेव्हा मला म्हणाली की आपण बुद्धिबळं खेळूयात. वजिराच्या बाजूचा किल्लेकोट कसा करतात ते माहित नाही आणि म्हणे मी बुद्धिबळं खेळते!

रावजी: येस, मिसेस.

मधुरा: रावजी, आजचा दिवस म्हणून तुला आगाऊपणा माफ करते आहे.

रावजी: थँक यू, मिसेस! मग मी म्हणेन की केक फार खाऊ नका, नाहीतर जेवायला भूक राहणार नाही. (उरलेला केक घेऊन तडकाफडकी आत जातो. बसवण्णा येतो.)

बसवण्णा: माय कॉन्ग्रॅच्युलेशन्स ऑल्सो ऑन युअर वेडिंग, सर ॲन्ड मॅम्स! बॅरिस्टरसर, पूना मंडई माथाडी कामगार संघात आमचं जमखंडीकडचं दोस्त असतं. त्यांचं निरोप आलं होतं. आज रात्री संघातर्फे ग्रॅंड वेडिंग पार्टी अरेंज केलं आहे. गुलाबजाम आणि बोकड असं डिनर-मेन्यू असतं. मी ऑस्टिन समरसेट स्वच्छ करून पेट्रोल टाकून रोज पेटल्सचं डेकोरेशन करून तयार ठेवलं आहे.

सावित्रीबाई: अरे मेल्या, मंडई शुक्रवारात आहे. संध्याकाळी तिथे नुस्ती सायकलींची आणि टांग्यांची तोबा गर्दी असते. एवढी मोठी गाडी नेणार कशी? वाट काढता काढता पुरेवाट होईल!

बसवण्णा: तसं विचार करायचं नसतं, मॅडम. आजूबाजूला सायकल आणि टांगा गर्दी करून असलं म्हणून ऑस्टिन समरसेट सोडून द्यायचं नसतं. आपण आपलं गाडी चालवायचं. गाडीला अकोमडेट कसं करायचं दॅट इज देअर प्रॉब्लेम.

❋ ❋

अंक तिसरा

(रात्रीची वेळ. ग्रॅन्डफादर क्लॉकमध्ये दहाचे टोले पडतात. सावित्रीबाई विणकाम करत दिवाणखान्यात एकट्याच बसल्या आहेत. वरच्या मजल्यावरून डॉक्टर येतात. शिणलेले आहेत.)

सावित्रीबाई: डॉक्टर! बसा.

डॉक्टर: बॅरिस्टर इथे नाहीत?

सावित्रीबाई: दिल्लीला गेले आहेत. बार काउन्सिलची मीटिंग आहे. तेरवा परत येतील.

डॉक्टर: नाहीत हे एका दृष्टीने बरं आहे.

सावित्रीबाई: हो. (थोडा वेळ थांबून) तुमचं रात्रीचं जेवण झालं नसणार —

डॉक्टर: नाही. तुमचा फोन आला तसा लागलीच निघालो.

सावित्रीबाई: मी रावजीला सांगून आले आहे. तो इथेच काहीतरी घेऊन येईल.

डॉक्टर: ठीक आहे.

सावित्रीबाई: कसं आहे आता?

डॉक्टर: त्याला मॉर्फीनचं मोठं इंजेक्शन देऊन आलो आहे. तेवढ्याने झोपेल. पण माई, आता हे असं वारंवार होत राहणार. पोटात दुखणं, थकवा येणं, डोक्यात गोंधळ होणं — ही सगळी एन्ड-स्टेजची लक्षणं आहेत. (सावित्रीबाई डोळ्याला पदर लावतात.) माई —

(थोडा वेळ दोघेही अबोलपणे बसून राहतात.)

सावित्रीबाई: तुम्हाला सांगते डॉक्टर, दारूची लत त्याला नंतर लागली. आधी अपेशाची आणि दु:खाची लत लागली. सगळं चुकतच गेलं हो —

डॉक्टर: च्च! तुम्ही त्रास नका करून घेऊ.

सावित्रीबाई: ह्यांच्या अपेक्षा होत्या. आणि ते साहजिक आहे. एकुलता मुलगा. सगळं समोर मांडून ठेवलेलं. पण प्रत्येक माणूस तेवढं हुशार नसतं ना. बिचारा घुसमटून गेला. आणि मग काय? मला तुमचा तो अभ्यास जमतच नाही, यशाची तुमची ती व्याख्याच मला मान्य नाही, मला ह्यात पडायचंच नाही असं म्हणत म्हणत तेच घट्ट होऊन गेलं.

डॉक्टर: हो. बॅरिस्टर देखील बोलून दाखवायचे मला.

सावित्रीबाई: कधी कधी वाटतं की त्याला शिकण्यात रस नाही हे आधीच ओळखून समजून घेतलं असतं तर बरं झालं असतं. मी म्हणते जाग्रणं करत काहीतरी सटरफटर वाचत बसला असता. चार सुमार कविता केल्या असत्यान. अधून मधून थोडी प्यायला असता. तेवढ्याने काही बिघडलं नसतं. असल्या फुळकावणी वाईट सवयी सांभाळायची आमची ऐपत होती. पण आम्ही उगीच त्याला ढकललं आणि शेवटी दरीत पडला.

डॉक्टर: हो. आता इतकी वर्षं त्याला समोरच बघतो आहे. तुम्ही म्हणता तसंच थोडंबहुत झालं. पण शेवटी असं आहे माई, की चूक कुणाची न् काय ह्यात आत्ताच्या घटकेला शिरण्यात अर्थ नाही. आणि तसं ते ठरवणं शक्यही नसतं. पोरांनाही त्यांची त्यांची इच्छाशक्ती असतेच. एका प्रमाणाबाहेर ती हवी तशी वाकवता येत नाही.

सावित्रीबाई: खरं आहे.

(रावजी आत येतो. त्याच्या हातातल्या ट्रे मध्ये चिनी मातीचं सूप वाढायचं निळं भांडं आहे. बरोबर चांदीचा चमचा आहे.)

रावजी: तूपवरणभात. बाजूला थोडीशी काल्याची भाजी वाढली आहे.

डॉक्टर: थँक यू.

रावजी: येस डॉक्टर. (जातो.)

डॉक्टर: (चवीने खात) बॅरिस्टर इथे असते तर हे बघून त्यांनी मला तुमचं घर कायमचं बंद केलं असतं! अब्रह्मण्यम्! वेजवूडच्या सूप टरीनमधून तूपवरणभात खातो म्हणते काय?!

सावित्रीबाई: खा हो. काय त्याचं एवढं? विलायतेतून हे परत आले तेव्हा तिथून आणलेल्या ह्या साहेबी सवयी मला रुचायच्या नाहीत. मी सतत त्यांना खिजवायला बघायची. आता आठवून लाज वाटते. एकदा मुद्दाम ह्यांच्यासमोर चांदीच्या ताटात राईस पुडिंग वाढून घेऊन त्याच्या चित्रावती घातल्या. फार चिडले होते.

डॉक्टर: तुम्हाला मानलं पाहिजे. इतकी वर्षं त्यांच्याबरोबर घालवून तुम्ही काही मेमसाहेब झाला नाहीत —

सावित्रीबाई: नाही हो, तो माझा पिंड नव्हे. झालं काय तर मला अठरावं लागलं तेव्हा बरीच स्थळं सांगून यायला लागली. मेणोलीला आमचा जमीनजुमला खूप होता. आता मुळात नानाला गंडा घालून मिळवलेले नंतर पठाणी व्याजाने देऊन फुगवले होते ते सोडा. पैसा जुना झाला की कुणी विचारत नाही कसा आला ते. ह्यांचंही घरचं बरं होतं पण आमच्याएवढं नाही. पोरगा खूप हुशार आहे, इंग्लंडला जायचं म्हणतो इतकं बघून बाबांनी स्थळ पसंत केलं. लग्न झालं. मग हेच म्हणाले की तिथे माझ्याबरोबर तू एका खोलीत कुडकुडत राहणार. शिवाय दोघांचा खर्च. त्यापेक्षा माहेरीच का राहीनास? म्हणून मी काही गेले नाही. मी कृष्णाकाठची वांगी खाल्ली तोवर यांनी तमसेकाठी बाजारचं खाल्लं. मोठे बालिष्टर होऊन आले. पुण्याला बस्तान बसवलं. पण माझ्यातली मेणोली काही गेली नाही.

डॉक्टर: हो. आता इतकी वर्षं बॅरिस्टरांना जवळून बघतोय म्हणून. नाहीतर हे साहेबी वागणं उपऱ्या माणसाला शिष्टपणाचं वाटतं.

सावित्रीबाई: मलाही आधी वाटलंच. पण तुम्हाला सांगू का, तसं सगळ्याच बाबतीत असतं. लहानपणापासून तुम्ही चित्पावन असलात तर ठीक. नाहीतर तो कद नेसून मळकट जानव्याशी चाळा करत नाकात बोलत फणसाची भाजी चिवडायची हेही शिष्टपणाचंच वाटतं.

डॉक्टर: बरोबर आहे.

सावित्रीबाई: पण काय झालं माहित नाही. ब्रिटिश जेंटलमन व्हायचं म्हणून करायची ती सगळी सोंगं केली. पण करता करता कुठेतरी ती आत झिरपली. हुशार होतकरू मुलगा म्हणून जाताना गेले होते. एक विचारी माणूस तिथून परत आला. एकूणात काय तर मला त्रास देत नाहीत आणि माझा करून घेत नाहीत. काही गोष्टी सांभाळून घ्याव्या लागतात, पण त्या आता असायच्याच. पोराचं जमलं नाही हे मात्र एक गालबोट आहे.

डॉक्टर: माई, तसं सगळीकडे यश कुणालाच मिळत नाही. कुठलीतरी बाजू लंगडी राहतेच.

सावित्रीबाई: खरं आहे. पण डॉक्टर, तुम्ही आधी चार घास खाऊन घ्या. इतक्या रात्रीची तुम्हाला धावपळ झाली.

डॉक्टर: (चवीने खात) काल्र्याची भाजी छान आहे हो. मस्त कुरकुरीत लागते आहे.

सावित्रीबाई: नंदिनीच्या हातची आहे.

डॉक्टर: वा! (आणखी खात) माई, बाकी तुम्हाला कर्तबगार सून मिळाली.

सावित्रीबाई: हो. तनयला सांभाळून घेते, पण चिकटून बसत नाही. एकीकडे तिचं आपापलं काम धडाक्यात चालू असतं. वाचते खूप, लिहिते खूप. कसल्याशा पुस्तकासाठी अलिकडे टिपणं करते

आहे. बबडीला कुठे कुठे घेऊन जाते. तिघं एकमेकांना धरून असतात.

डॉक्टर: एकूण सगळं रुळलं आहे तर. (हनुवटी वर करून छतावर नजर फिरवतात.)

सावित्रीबाई: (तोंडाला पदर लावून हसत) असंच म्हणायचं! वरच्या मजल्यावर तिघांच्या तीन खोल्या आहेत. मी काही चौकशी करत नाही. दृष्टीआड सृष्टी!

डॉक्टर: अहो, हसताय काय अशा?!

सावित्रीबाई: बरीक कुतूहल असतं हो! पण आता असले प्रश्न काय पोटच्या पोरीला विचारत बसू?! तुम्हाला एक सांगू का डॉक्टर, नाही म्हटलं तरी थोडं कसंसंच वाटतं. आमच्या स्वयंपाकघरात एक मोठ्ठाला चांदीचा झारा आहे. डोळ्यासमोर फार स्पष्ट चित्रं यायला लागली तर तो असा पंख्यासारखा हलवून झाडून घेते! (अजून हसतातच आहेत.)

डॉक्टर: मी काय म्हणतो माई, ह्या बाबतीतल्या आवडीनिवडी ज्याच्या त्याच्या असणार. त्यातलं काही स्वत:ला हवंसं वाटलं पाहिजे असं नाही. त्यांचं त्यांना आवडलं म्हणजे बास झालं!

सावित्रीबाई: मीही तेच म्हणते! पण एक आहे मात्र. आपलं आणि समोरच्याचं सारखं असलं म्हणजे कुणाला काय हवं ते पटकिनी कळत असणार. हेवा वाटावा अशीच गोष्ट आहे हो. नाहीतर आम्हाला काय आवडतं याची एरवी पत्रास कोण करतो? आमच्या पिढीत बाईच्या फार अपेक्षा नसायच्याच. उपद्रव नाही झाला म्हणजे सुख मिळालं असं समजायचं.

डॉक्टर: बघा माई, एकदा आडून विचारून बघा. तेवढीच तुमच्या वाक्चातुर्याची कसोटी लागेल. आम्हालाही सांगा काय काय कळतं ते. तसं डॉक्टर माणसाला तरी यातलं सगळं कुठे माहित असतं? आपण आपलं आयुष्यभर किडुकमिडुक शिकत राहावं.

सावित्रीबाई: डॉक्टर! काय तुम्ही तरी?! वरणभात संपवा आधी. इतकं धीट संभाषण आपल्या वयाला फार वेळ झेपायचं नाही. पण आपसूक काही समजलं तर सांगेनच तुम्हाला. मी काय

म्हणतेय? इतक्या रात्री आता घरी परत नका जाऊ. आमची गेस्ट बेडरूम तयारच असते. आज इथेच झोपा, उद्या सकाळी तनयला एकवेळ बघून माझ्या हातचे कांदेपोहे खाऊन जा कुठे जायचं ते.

डॉक्टर: ठीक आहे.

सावित्रीबाई: बॅरिस्टरांचं धोतर देते तुम्हाला नेसायला.

डॉक्टर: बॅरिस्टर धोतर नेसतात?!

सावित्रीबाई: कुणी बघत नसेल तेव्हा नेसतात. अगदीच काही वीस शिलिंगी साहेब झालेले नाहीत.

३

(दिवाणखान्यात कोणीही नाही. मधुरा बॅडमिंटन खेळण्याच्या वेषात येते. हातातल्या रॅकेटला कव्हर आहे. दारापाशी एका स्टुलावर बसून बूट आणि मोजे काढून ठेवते. रावजी एका चांदीच्या थाळीत काचेचा उंच ग्लास घेऊन येतो.)

रावजी: मधुरा मॅडम, लेमोनेड इथे ठेवतो आहे.

मधुरा: थँक यू, रावजी.

रावजी: येस, मॅडम. (बूटमोजे आणि रॅकेट घेऊन आत जातो. आजूबाजूला नजर टाकून मधुरा अलमारीकडे जाते आणि एक गडद लाल रंगाचं पुस्तक बाहेर काढते. पुस्तकाची जाडी फार नसली तरी लांबीरुंदी ऐसपैस आहे. खुर्चीत रेलून बसून समोरच्या टेबलावर पाय ठेवून लेमोनेडचे घुटके घेत पुस्तक चाळू लागते. नंदिनी आत येते. आजूबाजूला नजर टाकून मधुराच्या जवळ जाते, तिच्या पापण्यांचं चुंबन घेते आणि किंचित जीभ बाहेर काढून घामाची चव घेते. मधुरा ह्याला विरोध करत नाही पण डोळे मिटून घेण्यापलिकडे प्रतिसादही देत नाही. मधुरासमोर बसून नंदिनी तिचे पाय आपल्या मांडीवर ठेवते, पण लागलीच मधुरा ते खाली काढून घेते.)

मधुरा: नको गं.

(नंदिनी काही न बोलता सरळ समोर पाहात शांतपणे बसून राहते. पंधरावीस सेकंद थांबून मधुरा पुन्हा दोन्ही पाय तिच्या मांडीवर ठेवते.)

मधुरा: चेप ना. (नंदिनी किंचित हसून तिचे पाय चुरू लागते.) आहा! काय छान वाटतंय. आज सॉलिड बॅडमिंटन खेळून झालं. पाय जाम दुखताहेत. (पुस्तक चाळत राहता राहता एकदम खुसखुसू लागते.)

नंदिनी: काय वाचते आहेस?

मधुरा: असंच. (पुस्तकाचं कव्हर दाखवते.) Winnie-the-pooh! पप्पा आणि मी लहानपणी एकत्र वाचायचो. मी फर्माईश केली की त्यांचा तो खास घोगरा इंग्लिश ॲक्सेंट काढून दाखवायचे! जुन्या कागदाचा वास आणि तो ॲक्सेंट. It was a deadly combination. काय मस्त वाटायचं! (नंदिनी तिच्याकडे रोखून पाहते आहे.) अगं, यात एक अस्वल असतं. अत्यंत मठ्ठ असतं —

नंदिनी: मधुरा, थापा मारू नकोस! मला तुझा चेहरा वाचता येतो. काय वाचते आहेस ते मुकाट्याने सांग! नाहीतर मी येतेच बघ तिथे— (हात लांब करून पुस्तक खेचून घेतल्याचा अभिनय करते. मधुरा किंचाळून पुस्तक मिटते, तसं त्यातून दुसरं एक पुस्तक खाली पडतं. नंदिनी ते उचलते.) कोकशास्त्र!

मधुरा: (तळहातांनी चेहरा झाकून घेत) धरणीमाते! मला पोटात घे —

नंदिनी: तू म्हणजे बाई चक्रमच आहेस! हे आणि कशाला वाचतेयस?

मधुरा: मग?! तुम्ही काय करता ते माझ्यासारख्या निरागस लेस्बियन युवतीला माहित व्हायला नको? चोरून चोरून मी सगळं इत्यंभूत वाचून काढते आहे. हे बघ. ह्यात लिहिलंय की म्हशीचं तूप,

दंतपाल तेल, मध आणि पांढऱ्या कमळाचे तंतू समप्रमाणात मिसळायचे. घरातली एक चिमणी पकडून आणून त्यात बुडवायची आणि ती ब्रशसारखी वापरून तो लेप पुरुषाच्या बेंबीत लावायचा म्हणजे त्याला जास्त वेळ धरून ठेवता येतं. असं काही करता का तुम्ही?

नंदिनी: नाही, असं करायची गरज नसते — (हसत हसत तीही दोन्ही तळहातांनी तोंड झाकून घेते. थोडा वेळ दोघी एकमेकींची नजर चुकवतात.)

मधुरा: (तिच्याकडे पाहात) कसं वाटतं?

नंदिनी: (अनिश्चित मान हलवते.) तुला पुस्तकी उत्तर देते. तो एक अनुभव आहे. मला आवडतो पण माझ्यातून तसाच्या तसा काढून तुला दिला तर तू नको म्हणशील. तो शब्दांत वर्णन करून सांगता येत नाही असं म्हणण्याचा प्रघात आहे, पण त्याला काही अर्थ नाही. घेण्यालायक सगळे अनुभव समोर मांडून ठेवले तर त्यांपैकी शंभरातले पंचाण्णव शब्दांत वर्णन करून सांगता येणार नाहीत.

मधुरा: मी कधी घेतलेला नाही पण मला आवडेल असं वाटत नाही. कसं असतं बघ. अमुक एक भाजी आपल्याला आवडेल का हे खाण्याआधी खात्रीने सांगता येत नाही. पण ह्यातलं कळतं. मला आधी वाटायचं की हा प्रकार इतक्या जणींना आवडतो मग आपल्याला का नकोसा वाटत असेल? पण एखादी गोष्ट बिलकुल न आवडणं हाही आपल्या व्यक्तिमत्त्वाचाच भाग असतो ना. म्हणजे कसं, की रंगमंचावर ह्या पाहा मधुरा जातेगावकर: मी तुम्हाला त्यांची ओळख करून देतो. ह्यांना कार्ल्याची कोरडी भाजी आवडते, पण रामफळ आणि बाईपुरुषांतलं आवडत नाही. का ते विचारू नका.

नंदिनी: हो. तसंच काहीसं. अर्थात त्यातल्या स्थानिक घडामोडी आपल्या आपण करून बघू शकतो. खरं तर जास्त कौशल्याने करून बघू शकतो. पण शेवटी तेवढंच नसतं ना. ते सगळं गाठोडंच असतं — दुसऱ्या शरीराची जवळीक असते, भावना गुंतलेल्या असतात.

मधुरा: म्हणून तुला आवडतं?

नंदिनी: तसं समज. पण आपल्या तुलनेत म्हणशील तर गडबडधडपड फार असते. त्यामुळे घेतल्यानंतर त्या अनुभवाची मनात पुनर्रचना करावी लागते.

मधुरा: धूर्त आणि पाताळयंत्री आहेस तू! (हे बोलता बोलता नंदिनीकडे जाऊन तिला बिलगून बसते.) खरं बोल. अशीच आपल्या संयुक्त अनुभवाची पुनर्रचना नाहीस ना करत तू?

नंदिनी: नाही! (मधुराचं चुंबन घेते.) करायचीच झाली तर एकमेकींना सांगूनसवरून दोघी मिळून करूयात. (पायात पाय गुंतवून दोघी काही वेळ नि:शब्द बसून राहतात.)

मधुरा: पण अवघड होतं गं कधी कधी. आज दुपारी —

नंदिनी: हो. अलिकडे तो फार लहरी झालाय.

मधुरा: म्हणून मी घरी नाहीच थांबले. क्लबमध्ये जाऊन खूप सणसणून खेळले.

नंदिनी: ते सगळंच माझ्या लक्षात आलं.

मधुरा: आत कुठेतरी मला शरम वाटते गं. माझा तो भाऊ आहे. मला त्याची असूया वाटायला नको. आणि आपण तिघे यात जाणूनबुजून आहोत. पण मन काबूत ठेवता येत नाही ना. अंगाला मुंग्या आल्यासारखं होतं — (नंदिनी तिचा हात हातात घेते.) डोळ्यासमोर फार स्पष्ट चित्रं यायला लागली तर मी बॅडमिंटनच्या रॅकेटने झाडून घेते!

नंदिनी: माझंही अवघड होतंच. आणि हे असं छापाकाटा करून तर ठरवता नाही येत —

मधुरा: नाही. तन्या म्हणाला तेच: आपलं दुंगण स्वयंभू आहे. मापाची चड्डी बेतणं सोपं नाही.

नंदिनी: आणि तन्याकडे फार वेळही नाहीय आता. त्यामुळे मला वाटत राहतं की त्याचं मन मोडू नये. (मधुरा रडू लागते. नंदिनी तिला आणखी जवळ घेते.)

मधुरा: नको मोडूस. नंतर मला वाईट वाटेल.

नंदिनी: (थोडा वेळ नि:शब्द राहून) पण ते राहू दे आता. संध्याकाळी काय करूया ते सांग!

मधुरा: कुठलातरी वेळखाऊ आणि किचकट पदार्थ करूया! म्हणजे मला खूप वेळ तुझ्या मागे मागे हिंडता येईल. उकडीचे मोदक करायचे?!

नंदिनी: येस! चालेल!

मधुरा: मी आंघोळ करून घेते. सगळा घाम घाम झाला आहे.

नंदिनी: पाठ स्वच्छ करायला मदत लागणार नाही ना?

मधुरा: (मिश्किलपणे हसत) आता तुझा आग्रहच असेल तर —

नंदिनी: आहे ना आग्रह. (काही क्षण थांबून) मधुरा, विषय निघाला आहे तर एक विचारते. रागावू नकोस आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे एकदम किंचाळू नकोस. प्रॉमिस?

मधुरा: ओके. प्रॉमिस.

नंदिनी: स्पष्ट चित्रं तुला एकदा प्रत्यक्ष बघायची आहेत? अर्थात तन्याची संमती असेल तर —

मधुरा: (आधी गोंधळते. मग विचारमग्न होते.) हं! अशा प्रश्नाचं पटकन उत्तर देणं अवघड आहे. पण का? त्यानं काय साधेल?

नंदिनी: तुझं कुतूहल शमेल. तन्या म्हणत असला तर त्यालाही स्पष्ट चित्रं दाखवू. त्याचंही शमेल.

मधुरा: कुतूहल त्यालाही आहे?

नंदिनी: अर्थात.

मधुरा: तुला तसं म्हणाला?!

नंदिनी: अर्थात.

मधुरा: हं. As they say, curiouser and curiouser. पण समज, मला शिसारी आली तर?

नंदिनी: बाहेर जा.

मधुरा: विनोदी वाटलं तर?

नंदिनी: वाटलं तर वाटलं.

मधुरा: ठीक आहे. नंदी, आत्ताच्या घटकेला मी हो म्हणत नाही आणि नाहीही म्हणत नाही. विचार करून सांगते.

नंदिनी: (मान डोलावत) सांगोपांग विचार करून सांग. हो म्हणालीस तर मी तन्याला विचारते.

मधुरा: तोवर मी बसवण्णाला सांगून ठेवते पांढऱ्या कमळांची लागवड सुरू कर म्हणून. उपाय लागू पडला तर चित्र स्पष्टपणे मनावर उमटायला जास्त वेळ मिळेल.

नंदिनी: कल्पना चांगली आहे. पण तुला चिमणी पकडता येते का?

(मधुरा हसत हसत नकारार्थी मान डोलावत राहते. दोघी हातांत हात घालून वरच्या मजल्यावर जातात.)

३

(संध्याकाळची वेळ आहे. बॅरिस्टर आणि डॉक्टर आपापली वर्तमानपत्रं वाचताहेत. सहा महिन्यांची गरोदर नंदिनी गालिचावर मांडी घालून बसली आहे. सावित्रीबाई तिचे केस विंचरताहेत. तनय निर्विकार चेहऱ्याने खुर्चीवर स्वस्थ बसला आहे. त्याच्या शेजारी भिंतीला टेकवून ठेवलेली वॉकिंग स्टिक आहे.)

सावित्रीबाई: सूनबाई, पुस्तक लिहित होतीस ते कुठवर आलं?

नंदिनी: तीन वह्या भरून टिपणं तयार आहेत. शिवाय सुट्या कात्रणांचा पसारा खूप आहे. एकदाची बाळंत झाले की गादीत बसून सगळं एकटाकी लिहून काढीन. सहाव्या दिवशी सटवाई येईल त्या निमित्तानं मला नवं फाउंटन-पेन घेऊन द्यायचं सासरेबुवांनी कबूल केलं आहे.

डॉक्टर: कशावर लिहिते आहेस?

नंदिनी: महाराष्ट्रातल्या कामगार चळवळीचा इतिहास लिहिते आहे. माथाडी कामगार संपाचं निमित्त झालं. मग त्याआधीचं कम्युनिस्टांचं काम, सत्यशोधक समाजाचं काम असा धागा पकडून मागे मागे जात राहिले तशी पुष्कळ माहिती मिळत गेली. नारायण मेघाजी लोखंडे हे यातले आद्यपुरुष, त्यामुळे पुस्तकाची सुरुवात त्यांच्यापासून करणार आहे. मुंबईला एका कापड गिरणीत स्टोअरकीपर होते. तिथल्या कामगारांचे जे हाल व्हायचे ते ह्यांच्या डोळ्यांसमोरच व्हायचे. भयंकर उकाड्यात रोज तेराचौदा तास हातमाग चालवायचा. दुपारचं जेवण आणि शी-शू ह्या सगळ्याला मिळून मध्ये पंधरावीस मिनिटं मिळाली तर मिळाली. सुट्ट्या नसायच्या. कामात चूक झाली, तागा खराब निघाला तर मालक पगारातून कापून घ्यायचा. मग लोखंडेकाकांनी गिरणी कामगारांची संघटना केली. दर आठवड्याला एक लंगोटीपत्र काढायचे. त्याला 'दीनबंधू' असं हृदयाला पीळ पाडणारं नाव ठेवलं होतं. तिथेही तोटा व्हायचाच. इकडे गिरणीमालकांची वेगळी संघटना होती तिचा उलट दट्ट्या असायचा. एकूण काय तर गणपतीच्या मेळयासाठी साने गुरुजींनी लिहावी तशातली रडारड कथा आहे.

सावित्रीबाई: ही सगळी केव्हाची गोष्ट?

नंदिनी: जोतिराव फुल्यांच्या नंतरच्या पिढीतले. म्हणजे अठराशे ऐंशी-पंच्याऐंशीचा काळ. पण फार रुक्ष विषय आहे हो. कुठे बाँबस्फोट नाहीत की संडासाच्या भोकातून खाली जाऊन समुद्रात पंधरा मिनिटं पोहणं नाही. अमुक संघटनेचे ठराव, मायबाप इंग्रज सरकारपुढे तमुक निवेदन असलीच सगळी पानभरती आहे. पण नाही म्हणायला एक गंमतीदार नैतिक प्रश्न समोर आला.

डॉक्टर: सांग ना.

नंदिनी: म्हणजे समजा एखाद्यानं एक कृती अप्पलपोटेपणानं केली पण त्यातून आपसूक दुसऱ्याला फायदा झाला, तर त्या कृतीची कितपत वाखाणणी करायची? काय झालं ते सांगते. हा अठराशे साठ-सत्तरचा सुमार. मुंबईच्या ह्या कापड गिरण्यांमध्ये आठदहा वर्षांची पोरं कामाला असायची. त्यांना दिवसभर चोपून घेऊन वर मजुरी कमी द्यायचे, त्यामुळे कापड स्वस्तात विणून व्हायचं. परिणामी इंग्लंडमधल्या गिरणीमालकांचं पोट दुखायला लागलं. तिकडचे फॅक्टरी ॲक्ट्स जास्त कडक असल्यामुळे त्यांना असं काही करता यायचं नाही. मग त्यांनी दबाव आणून इथे भारतातही एक फॅक्टरी ॲक्ट पास करून घेतला. यामुळे इथल्या कामगार पोरांचा एका अर्थाने फायदा झाला, कारण त्यांचे काबाडकष्ट हलके झाले. पुढे मोठा होऊन जो माणूस चाळीसाव्या वर्षी टीबीने मेला असता तो पंचेचाळीसाव्या वर्षी मरायला लागला. पण दुसऱ्या अर्थाने तोटा झाला कारण कामाचे तास कमी झाल्यामुळे मिळकतही कमी झाली. पण मी म्हणेन की आणखी पुढे जाऊन तिसऱ्या अर्थाने उलट फायदाच झाला. कारण सुरवातीचा फॅक्टरी ॲक्ट जरी फार हिणकस असला तरी निदान त्याच्यावर कागदोपत्री शिक्कामोर्तब झाल्यामुळे त्यापेक्षा जास्त बरा ॲक्ट पुढे केव्हातरी पास व्हायला एका प्रकारे दार उघडलं गेलं. असं सगळं ते आहे. श्रेय कुणाला द्यायचं आणि दोष कुणाला द्यायचा हे पटकन कळत नाही. तन्यापाशी हा विषय काढला की त्याला किल्ली बसते. मग तो consequentialism आणि deontology वगैरे शब्द वापरून पुढे सुरू करतो.

तनय: हो. एकेकाळी थोडीफार फिलॉसॉफी वाचली ती आता उपयोगी पडायला लागली आहे. When my troubles were small, I was a whiner. Now that they are large, I have

become a stoic.

बॅरिस्टर: दुखतं का रे?

तनय: सतत.

(काही काळ शांतता. एका चांदीच्या ट्रे वर निळा लखोटा आणि कात्री घेऊन रावजी येतो. बॅरिस्टर बसले आहेत त्यांच्याशेजारी टेबलावर ठेवतो.)

रावजी: सर, हा दुपारच्या डाकेने आला.

बॅरिस्टर: थँक यू, रावजी.

रावजी: येस, सर. (जातो.)

बॅरिस्टर: डॉक्टर, हा तुमच्यासाठी आहे.

(डॉक्टर लखोटा उघडून आतला कागद वाचतात. स्वत:शी हसतात आणि नंदिनीच्या कानात काहीतरी सांगतात. तीही स्वत:शी हसते.)

डॉक्टर: माई, तुम्हाला नातू होणार की नात ह्यावर प्रयोगशाळेतून रिपोर्ट आला आहे.

सावित्रीबाई: अहो, मग सांगा ना! ताणून कसलं धरताय?!

डॉक्टर: नंदिनीला कानात सांगितलं आहे. ती सगळ्यांना एकदमच सांगेल. (ग्रॅन्डफादर क्लॉककडे पाहात) मधुरा मुंबईहून यायचीच फक्त खोटी आहे. एव्हाना डेक्कन क्वीन आली असणार.

बॅरिस्टर: बसवण्णाला मी गाडी घेऊन स्टेशनवर जायला सांगितलं आहे. डेक्कन क्वीन नेहमी

वेळेवर येते.

सावित्रीबाई: (घड्याळाकडे बघतात.) मग आता काही उशीर नाही. पण डॉक्टर, प्रयोगशाळेला कसं कळतं? आमच्या मेणोलीला एक आलवणातली बाई होती. पोटाची गोलाई कुठून कशी आहे ते निरखून बघून सांगायची. शेरभर तांदूळ आणि सव्वा रुपया घ्यायची.

नंदिनी: पण बरोबर सांगायची का?

सावित्रीबाई: आता अधीमधी चुकायचं. पण तेवढ्याचं काय? भावाकडे आश्रित म्हणून राहायची. तेवढाच तिला आधार होतो म्हणून लोक आपले बोलवत असत. पण डॉक्टर, तुम्हाला कसं कळलं ते सांगा.

डॉक्टर: माई, ते थोडं किचकट आहे पण गोळाबेरीज पद्धत सांगतो. असं बघा की आपल्या शरीरात हजारो-लाखोंच्या संख्येने पेशी असतात. तर यातली प्रत्येक पेशी म्हणजे एक लहानशी पिशवी समजा. ह्या पिशव्या एकमेकींवर रचून आपला प्रत्येक अवयव बनवलेला असतो.

सावित्रीबाई: प्रत्येक अवयव?

डॉक्टर: प्रत्येक अवयव. हात-पाय-पोट-डोकं सगळं. ह्याच पिशव्या रक्तातसुद्धा पोहत असतात. तर आता मुद्द्याची गोष्ट म्हणजे यापैकी प्रत्येक पिशवीत दुपेडी सुंभ ठेवलेले असतात.

सावित्रीबाई: सुंभ?!

डॉक्टर: हो. काथ्याचे सुंभ असतात तसेच थोडेसे हेही दिसतात. पण अतिशय लहान कणांचे बनवलेले असतात, त्यामुळे प्रयोगशाळेत भिंगाखाली बघावे लागतात. तर आता मेख अशी की बाईच्या शरीरातले आणि पुरुषाच्या शरीरातले सुंभ वेगवेगळे दिसतात. पण हे ओळखायला त्यातला माहितगार माणूस पाहिजे. म्हणजे असं पाहा माई की स्वयंपाकात तुमची नजर बसलेली आहे, त्यामुळे बासमती तांदूळ आणि चमेली तांदूळ यांतला फरक तुम्हाला पटकन ओळखू येतो.

बरोबर की नाही? तर प्रयोगशाळेतल्या माणसांची नजर अशीच बसलेली असते. त्यामुळे बाईच्या शरीरातले आणि पुरुषाच्या शरीरातले सुंभ त्यांना पटकन वेगळे ओळखू येतात.

सावित्रीबाई: थोडं थोडं समजतंय! छान सांगता हो तुम्ही.

डॉक्टर: तर याचा उपयोग कसा करतात ते सांगतो. नंदिनीचं बाळ आत्ता तिच्या पोटात आहे. त्या बाळाच्या अंगातले काही सुंभ विलग होतात आणि वारेतून उलट्या दिशेने नंदिनीच्या अंगात झिरपत राहतात. म्हणून आपण तिचं थोडंसं रक्त काढून घेऊन प्रयोगशाळेत पाठवून दिलं. त्यातले नंदिनीच्या स्वत:च्या अंगचे सुंभ आणि बाळाकडून आलेले सुंभ पहिल्यांदा वेगळे वेगळे करायचे. एकदा हे झाल्यानंतर बाळाकडून आलेले सुंभ तेवढे निरखून पाहिले की मुलगा आहे की मुलगी आहे ते सांगता येतं.

सावित्रीबाई: सोपं आहे हो! ही प्रयोगशाळा कुठेशी असते मला पण सांगून ठेवा! मी मुरलीधराला जाते तिथल्या कितीतरी बायका माझ्या ओळखीच्या झाल्या आहेत. त्यांनाही उपयोग होईल.

बॅरिस्टर: पूल ओलांडलात की लगेच डावीकडे एक लाल विटांची इमारत आहे. सापडायला अगदी सोपी आहे.

सावित्रीबाई: (विचारात पडतात. तळहातावर आकृती काढून बघतात.) काही लक्षात येत नाहीय बाई. लकडी पुलावरून मी हजारदा गेले असेन. पण अशी इमारत कुठे दिसली नाही हो.

तनय: आई, आबा तुझी थट्टा करताहेत. तो लकडी पूल नव्हे.

सावित्रीबाई: मग कुठला पूल?

तनय: टॉवर ब्रिज. तमसा नदीवर आहे.

डॉक्टर: माई, अशी काही प्रयोगशाळा अजून आपल्या देशात नाहीय. त्यामुळे बॅरिस्टरांच्या

ओळखीनं आपण नंदिनीचं रक्त जहाजाने लंडनला पाठवून तपासून आणलं.

सावित्रीबाई: बाई गं! एवढा आटापिटा कशाला करायला हवा?! आणि खर्च केवढा आला असेल तो. तीनेक महिन्यांत आपसूकच कळलं नसतं का?

तनय: आई, माझ्याकडे तेवढा वेळ आहे याची खात्री वाटत नाही. जाण्यापूर्वी मला माहित करून घ्यायचं होतं.

(थोडा वेळ कुणी काही बोलत नाही. मधुरा आणि बसवण्णा आत येतात तसे सगळेजण वेगवेगळ्या आविर्भावांत तिचं स्वागत करतात. नंदिनी जमिनीला टेकू देऊन सावकाश उठते. तनय आधाराला काठी घेऊन उभा राहतो. मधुरावर मिठ्या आणि पाप्यांचा वर्षाव होतो. मधुराच्या कानाशी काहीतरी पुटपुटून बसवण्णा लगबगीने गायब होतो.)

मधुरा: (समोर एक चषक ठेवते. त्यात एक लाल पुडकं आहे.) पप्पा आणि मम्मा! हा चकचकीत चषक मी आपल्या चरणी अर्पण करते. बॉम्बे जिमखान्याची सिंगल्स टूर्नामेंट जिंकून आले! फिरंगी रॅकेटनं साथ दिली.

(सगळेजण उत्साहाने टाळ्या वाजवतात.)

सावित्रीबाई: बबडे, फायनल आज दुपारीच होती ना?

मधुरा: हो. कुलाब्याच्या झीझी खंबाटाबरोबर होती. फार छान खेळली. तिची रॅकेट जपानी होती. पहिला गेम तिनं घेतला आणि दुसरा मी घेतला. तिसऱ्यात आम्ही दोघींनीही खूप जोर केला. पण गेमच्या मध्यावर कुठेतरी बिचारीनं माझा एक शॉट सोडून दिला तो लॉबीच्या अगदी गुंजभर आत पडला. ती संधी साधून मी नाक पुढे काढलं आणि ढकलाढकली करत इलेव्हन-एटनं जिंकले. She was very gracious about it. मला म्हणत होती एक दिवस माझ्याच घरी राहा, तुला मुंबई दाखवते म्हणून. पण इथल्या सगळ्यांची फार आठवण आली गं. म्हणून मग मी बक्षीस समारंभ झाल्या झाल्या व्हीटीला जाऊन थडकले. पप्पांनी शॉपिंगला दिलेले सगळे पैसे तसेच्या तसे परत

आणले. इच्छाच नाही झाली.

सावित्रीबाई: आणि हे पुडकं कसलं?

मधुरा: येताना डेक्कन क्वीनमध्ये जमशेद भेटला. त्याने बाळासाठी नवे कपडे दिले आहेत. खास पारशी डिझाईनचे.

तनय: बबडे, तू आलीस तेव्हा आमचा तोच विषय चालू होता. पास-नापास कळलेलं आहे. आम्हा कुणालाच माहित नाही. नोनो सगळ्यांना एकदमच सांगणार आहे.

मधुरा: येस! स्टेशनवरून येताना मला बसवण्णाने बातमी दिली. तो म्हणाला की दुपारच्या डाकेनं एक फिकट निळ्या रंगाचं पाकीट आलं आहे. पाकिटाला स्टँप्स चिकटवले आहेत पण त्यांच्यावर कुठल्याच देशाचं नाव लिहिलेलं नाही त्यामुळे कुठून आलंय ते कळत नाही. एवढ्यावरून मला ताबडतोब कळलं कुठून आलंय ते! (नंदिनी काही बोलू लागणार तोच —) नंदी, फक्त एक मिनिट थांब! बसवण्णा परत येतो आहे —

नंदिनी: बरं बाई!

(आधी रावजी आणि त्याच्यापाठोपाठ बसवण्णा येतो. रावजीच्या हातात एका ट्रेवर बोन चायनाचा मोठा वाडगा आहे. बसवण्णाच्या हातात वेताची टोपली आहे. त्यातून तो एक निळा आणि एक गुलाबी पुष्पगुच्छ काढून नंदिनीसमोर एकेका हातात एकेक धरतो.)

बसवण्णा: मॅडम, आता सांगा!

नंदिनी: (त्याच्या हातातून गुलाबी पुष्पगुच्छ घेत) मला मुलगी होणार आहे! (सगळेजण टाळ्या वाजवतात. आता तिच्यावर मिठ्या आणि पाप्यांचा वर्षाव होतो.)

मधुरा: नंदीनं आणि मी ठरवलंय की बाळाचं नाव ठेवायचा हक्क तन्याचा असणार. तो आपल्याला

आत्ताच सांगणार आहे. कारण —

तनय: हो. माझ्या मनात तसं पक्कं आहे, पण तरीदेखील पुन्हा एकदा मिनिटभर विचार करतो.

बसवण्णा: तनयसर विचार करतंय तोवर थोडंसं स्वीट खाऊन घ्या म्हणतो मी! (रावजी चांदीच्या चमच्याने प्रत्येकाच्या तळहातावर थोडं थोडं वाढतो.) बेळगावचं कुंदा आणलं आहे. असल्या ऑकेजनला अगदी फिट बसतंय की हो. कुंदा शब्द म्हटलं तर मराठीत पुल्लिंगी पण असतंय आणि स्त्रीलिंगी पण असतंय. रिझल्ट काही पण लागलं तरी चालतंय की!

डॉक्टर: (तळहात चाटून पुसून खात) फक्कड चव आहे.

बसवण्णा: असं प्रिप्रेशन फक्त बेळगावातच जमतंय हो. इथे पुण्यात कुणाला पण नॉलेज नाही बघा.

सावित्रीबाई: ठीक आहे बाबा, तू म्हणतोस तर तसं. मार टोमणे!

तनय: आबा, आई, सगळे. मी दोन्ही नावं ठरवली आहेत; आवडतात का सांगा.

बॅरिस्टर: दोन्ही?

तनय: दोन्ही. माझ्यानंतर आपल्या बंगल्याचं नाव बदलून टाका कारण त्यातला ‘त’ ठेवायचं काही कारण उरलेलं नसेल.

बॅरिस्टर: अरे पण —

तनय: प्लीज बदलून टाका. आणि कुटुंबातले सगळेजण नव्या नावात सामावून घ्यायला हवेत. मुलीचं नाव आपण ‘गार्गी’ ठेवूया, आणि बंगल्याचं नवं नाव ‘सामगायन’ असं ठेवूया: सावित्री-मधुरा-गार्गी-यदुनाथ-नन्दिनी.

बॅरिस्टर: दोन्ही छान आहेत. मला फार आवडली.

डॉक्टर: सगळ्यांनाच आवडली आहेत. चेहऱ्यांवर दिसतंच आहे.

तनय: बंगल्याचं नाव 'सामगायनं' असं ठेवलंत तरी चालेल. टिळक इथून जवळच राहायचे, त्यामुळे आपल्याला अनुस्वारित 'नंदिनी' चालेल किंवा 'न' मोडलेली 'नन्दिनी' चालेल.

मधुरा: तन्या, इतकी गुंतागुंत कशाला वाढवायची? मला वाटतं नुस्तं 'सामगायन' असंच नाव छान आहे. आधीच आपण सानुनासिक शहरात राहतो. त्यात उगीच माकडाच्या हाती कोलीत देऊया नको.

सावित्रीबाई: मग ठरलं तर. दोन्ही नावं गोड आहेत! मनातल्या मनात गुणगुणत राहावीत अशी आहेत.

नंदिनी: 'गार्गी' आणि 'सामगायन'. कशी वैदिक आणि गूढरम्य वाटतात!

तनय: हो ना. मागेच जायचं तर थोडंथोडकं कशाला? तीन हजार वर्षं का नको?

नंदिनी: तन्या, पोरगी मोठी झाली की एखाद्या मुंडण केलेल्या तिरसट गुरूकडे पाठवून तिला सामगायन शिकवूनच आणायचं. अवघड गोष्ट जमायला लागली की मजा येते. (तनय नि:शब्दपणे हसतो.)

बसवण्णा: बॅरिस्टरसर, एक रिक्वेष्ट आहे बघा.

बॅरिस्टर: बोल, बसवण्णा.

बसवण्णा: मी मायसोर कंट्री क्लबात चीफ गार्डनर होतं तिथलं क्लबाचं चीफ कॅबिनेट मेकर माझं दोस्त असतं. बंगल्याचं नवीन लेटरिंग ते टॉप ग्रेड मायसोर सॅंडलवूड मध्ये कार्व्हिंग करून देईल

बघा. चंदनचं लाकूड म्हणजे बेष्ट चॉईस! किती पण वर्ष गेलं तरी फ्रेग्रन्स टिकून राहतं.

बॅरिस्टर: थँक यू, बसवण्णा. छान कल्पना आहे.

रावजी: माझी पण एक रिक्वेस्ट आहे, सर.

बॅरिस्टर: बोल, रावजी.

रावजी: बंगल्याचं जुनं लेटरिंग टाकून देऊ नका. माझ्याकडे सांभाळायला द्या. आय ॲम व्हेरी अटॅच्ड टु इट. (रडू लागतो. त्याची समजूत कशी घालावी ते कुणाला कळत नाही.)

३

(रात्रीचे अकरा वाजले आहेत. अंगात एक ढगळ गाऊन घालून नंदिनी दिवाणावर पहुडली आहे. मधुरा तिच्या शेजारी बसली आहे. टेबलाचा आधार घेऊन उभा असलेला तनय तिघांसाठी ड्रिंक्स तयार करतो आहे. तो खूप आजारी आणि अशक्त असल्याचं त्याच्या हालचालींवरून स्पष्ट व्हावं.)

नंदिनी: दमले बाई!

मधुरा: हो ना. मला तर तुझ्या कवायतींकडे नुस्तं बघूनच दमायला झालं.

नंदिनी: पण माझ्या प्रयत्नांना शेवटी फळ आलं. सात पाउंड एक औंस वजनाची पोटची गोळी सुखरूप बाहेर निघाली.

मधुरा: गोळीकडे बघताक्षणीच मी प्रेमात पडले. पुढची वीस वर्षं मी तिचे सॉलिड लाड करणार आहे.

नंदिनी: दमणूक झाली, पण छान वाटतंय.

मधुरा: मला पण.

तनय: नोनोच्या पोटच्या गोळीचा, उर्फ आपल्या सर्वांच्या लाडक्या गारगोटीचा, उर्फ गार्गीचा आज पृथ्वीतलावरचा पहिला दिवस आहे. आणि तिच्या उर्वरित आयुष्याचाही पहिला दिवस आहे. This calls for a celebration.

नंदिनी: जन्मल्या जन्मल्याच बिचारीच्या नावाची मोडतोड सुरू झाली.

मधुरा: येस. आपल्या घराचं वळणच तसं आहे.

तनय: बबडे, some cream sherry for you. नोनो, तुझ्यासाठी मंडईतल्या ताज्या मोसंब्यांचा रस. आणि माझ्यासाठी बोटभर स्कॉच. किंवा, कदाचित, दोन बोटं स्कॉच.

मधुरा: तन्या, सांभाळून.

तनय: असू दे गं. या घटकेला काही फरक पडायचा नाही. (दोघींना त्यांचे ग्लासेस देऊन काठीचा आधार घेत नंदिनीच्या दुसऱ्या बाजूला बसतो. तिघेही न बोलता ग्लासला ग्लास भिडवतात.)

नंदिनी: (रसाची चव तोंडात घोळवत) नव्या सवयी जडत चालल्या होत्या त्या पुन्हा बदलाव्या लागल्या.

मधुरा: अजून वर्षभर समज.

नंदिनी: ते आता गार्गीच्या लहरीवर आहे.

मधुरा: (क्रीम शेरी नंदिनीच्या नाकाजवळ नेते.) नुसती हुंगून बघायला हरकत नाही.

नंदिनी: (नाक भरून वास घेत) छान वास येतोय गं.

मधुरा: तुला पण.

(तिघेही आरामात रेलून घुटके घेत राहतात. बॅरिस्टर आत येतात. ते हाउस-गाऊनमध्ये आहेत. हातात एक ब्रीफकेस आहे.)

बॅरिस्टर: अरे! नवी पिढी इथे जमलेली दिसतेय.

नंदिनी: आम्ही यथाशक्ती सेलिब्रेशन करतो आहोत. आबा, do have a nightcap with us! पण इतक्या उशीरा तुम्ही जागे कसे काय?

बॅरिस्टर: (स्वत:साठी थोडीशी स्कॉच ओतून घेत) मोटवानीच्या केसवर काम करत होतो. खरं सांगायचं तर मला त्याचा कंटाळा यायला लागला आहे. केसचाही आणि माणसाचाही. पण मध्येच सोडून देता येत नाही ना. ह्या खटल्याचा एकदा सोक्षमोक्ष लागला की असल्या अप्रिय अशिलांशी संपर्क तोडूनच टाकावा म्हणतो. आयुष्यात खूप पैसे मिळवून झाले. बास झालं! यापुढे आता मी फक्त निरपराध लोकांचंच वकिलपत्र घेणार आहे.

मधुरा: पप्पा, असं नका करू. गार्गीचं सगळं शिक्षण अजून व्हायचं आहे.

बॅरिस्टर: बबडे, त्याची काळजी करू नकोस. आपल्याकडे खूप आहेत.

मधुरा: बघा हं! तुमच्यावर भिस्त ठेवून राहतेय.

बॅरिस्टर: बेशक राहा. (नंदिनीला उद्देशून) माझी नात झोपली का व्यवस्थित?

नंदिनी: हो. अर्थात रात्री केव्हातरी उठून सामगायन सुरू करेलच. पण आबा, स्त्रीराज्यातल्या काही घडामोडी वर्णन करून सांगायला अडचणीच्या असतात. तेव्हा त्यांत शिरूया नको. कल्पनेने समजून घ्या—

बॅरिस्टर: बरोबर आहे तुझं. Let us keep it Victorian.

तनय: पण एवीतेवी स्त्रीराज्यात राहायची आबांना आता सवय करून घ्यावी लागेल. चार बायकांच्या घरात त्यांचा एकुलता पुरुष लांबोडा होणार आहे.

(काही क्षण अवघड शांतता.)

मधुरा: पप्पा, मी आणि नंदी झोपून टाकू? खूप दमणूक झाली आहे. उद्या सकाळी किंवा दुपारी किंवा संध्याकाळी भेटू.

बॅरिस्टर: Of course. Goodnight, my girls.

नंदिनी: Goodnight, आबा.

मधुरा: Goodnight, पप्पा. आणि तन्या, तूही फार जागू नकोस.

तनय: नाही जागत. Goodnight, dears.

(तनयच्या आणि बॅरिस्टरांच्या कपाळाचं चुंबन घेऊन दोघी हातात हात घालून आत जातात. ते दोघे एकमेकांकडे थेट न पाहता काही क्षण अबोलपणे स्कॉच पीत राहतात.)

बॅरिस्टर: कसा आहेस?

तनय: (अनिश्चित मान हलवतो पण थोडा वेळ काही बोलत नाही. क्षणभर डोळे मिटून घेऊन चेहरा शांत करण्याचा प्रयत्न करतो.) चांगली बातमी अशी काही नाही.

बॅरिस्टर: Sorry to hear that. तुझ्यासाठी भेटवस्तू आणली आहे. मला नात दिल्याबद्दल. खूप

वर्षांपूर्वी घेऊन ठेवली होती. (ब्रीफकेस उघडून कातडी बांधणीचं एक जुनं पुस्तक त्याला देतात.) एडवर्ड फिट्झजेरल्डच्या 'रुबायत' ची लिमिटेड एडिशन आहे. कवितेत मला फार गम्य नाही, पण तुला आहे. मी लंडनला असताना तिथे एक 'उमर खय्याम क्लब' होता. 'रुबायत' मधल्या कविता आणि आयुष्याबद्दलचा एकूणच तो पवित्रा ह्या सगळ्याचा जबरदस्त पगडा मनावर असलेली ही मंडळी होती. मिडल टेंपलमधला माझा एक मित्र त्यांच्यात असायचा. दिवसा वकिली, रात्री कविता. तेव्हाच केव्हातरी ही शंभर प्रतींची आवृत्ती क्लबने छापून घेतली. It was meant for private circulation. वशिला लावून मी पण एक घेतली. आतला बुकमार्क फार छान आहे. केशरी रंगाचा एक धागा बाइंडिंगमध्ये शिवून टाकून त्याच्या दुसऱ्या टोकाला जांभळ्या रंगाची मखमली थैली बांधली आहे. They chose classic Oriental colours. थैलीत ग्लेनद्रोनाखची छोटी बाटली आहे. सांभाळून काढ. It's a 21-year old Cask Strength Limited Edition. Hope you like it.

तनय: Thank you, आबा. It means a lot to me.

बॅरिस्टर: And you know, I am sorry for —

तनय: It's all right.

बॅरिस्टर: Okay. Goodnight then. फार वेळ जागू नकोस.

तनय: नाही जागत. Goodnight, आबा.

(बॅरिस्टर जातात. तनय तिथेच थांबतो.)

३

(दिवाणखान्यात आता फक्त झुंबरातून येणारा प्रकाश आहे. तनय एकाग्रतेने पुस्तकाची पानं उलटतो आहे.)

तनय: आहा! (कविता आवडली आहे अशा आविर्भावात मान डोलावत) अस्मादिक, कान देऊन ऐका. उमर खय्यामला सुरईत घुसळून एडवर्ड फिट्झजेरल्डने पृष्ठभागावर आणलेली रुबाई क्रमांक एकूणपन्नास:

It's all a chequer-board of nights and days!

अरेच्या! हा काय समोरच आहे! अभिधा असताना लक्षणा कशाला हवी? (उठून बुद्धिबळाच्या संचाकडे जातो.) चेस-बोर्डवरच्या पात्रांना हलवून आपण त्याचा चेकर-बोर्ड करूया. (बुद्धिबळाच्या पटावरचे सगळे मोहरे बाजूच्या टेबलावर ठेवून पट रिकामा करतो. पुढली काही मिनिटं ह्या पटाचा टेबल म्हणून वापर होईल.)

It's all a chequer-board of nights and days
Where destiny with men for pieces plays
Hither and thither moves, and mates and slays
And one by one, back in the closet lays.

It is a quatrain, love. यमकांची अशी रचना जमवायला अंमळ अवघड असते:

days-plays-slays-lays

अडगुलं-अडगुलं-अडगुलं-अडगुलं. A-A-A-A.

चार-ओळी. ही चार-ओळी आहे. चारोळी आहे. पण कवितेची चव चारोळीसारखी नाही. कवितेची चव कडू आहे. तोंड कडू होतं. तसं नको. तोंडची ही चव पुसून टाकायला हवी. रुचिपालट करायला हवा. सुदैवाने रुचिपालट करण्याची सोय आहे. (पुस्तकातला धागा हाताळतो. थैली उघडून स्कॉचची बाटली पटावर सावकाश ठेवतो. तिच्यावर डकवलेली चिठ्ठी वाचतो.)

Glendronach. ग्लेन-द्रोनाख. द्रोनाख-दरी. सुंदर, सुरम्य स्कॉटलंडमधली ही पाहा द्रोनाख-दरी. ग्लेन-द्रोनाख. (काहीसा अतिशयोक्त स्कॉटिश हेल काढून 'ख' म्हणण्याचा प्रयत्न करत, खाकरत-

खोकरत हा शब्द पुन्हा पुन्हा उच्चारतो. या प्रयत्नात त्याला ठास लागते पण सावरतो.) बापरे! शब्द धोकादायक आहे. जपून उच्चारायला हवा. (यानंतर तोच शब्द मृदु आवाजात 'ख' म्हणत उच्चारतो.) तर ह्या दरीतली दारू. (एका क्रिस्टल ग्लासमध्ये बाटली उपडी करतो. ग्लास नाकाशी धरून हुंगतो आणि चव घेऊन पाहतो.) चवींच्या लाटा येताहेत. एकामागून एक. (किंचित थांबत थांबत एकेक चव ओळखतो.) मनुकेची चव. दालचिनीची चव. तापवलेल्या काळ्या गुळाची चव. (हे म्हणत असताना सतत स्कॉच पितो आहे.)

अस्मादिक, पुढे ऐका. रुबाई क्रमांक एक्कावन्न:

The moving finger writes; and having writ,
Moves on: nor all thy piety nor wit
Shall lure it back to cancel half a line
Nor all thy tears wash out a word of it.

This too is a quatrain, love. पण यमकरचना थोडी वेगळी आहे:

writ-wit-line-it

अडगुलं-अडगुलं-मडगुलं-अडगुलं. A-A-B-A.

(शेवटचा घोट घेतो.) संपली. दारू संपली. दरीतली दारू संपली. पण दारूची बाटली मात्र मोठी घाटदार आहे बरं का. (ती उचलून निरखून पाहतो.) थैलीत जपून परत ठेवून देऊया. (बाटली ठेवू लागतो.) अरेच्या?! हाताला काहीतरी निमूळतं लागतंय. आत दुसरी एक बाटली आहे की काय? (थैलीत हात चाचपडून आतली वस्तू बाहेर काढून पटावर ठेवतो.) हं! Curiouser and curiouser. (हे Pattern 1853 Enfield Rifle-Musket चं काडतूस आहे.) वस्तू धोकादायक आहे. जपून हाताळायला हवी! आबांनी बंदूक विकत घेतली तेव्हा हे देखील घेतलं असणार. इथे ठेवून विसरून गेलेले दिसतात. कुणास ठाऊक.

(काडतूस पटावर उभं करतो. मान तिरपी करून त्यावर लिहिलेली अक्षरं वाचतो.) The Royal

Gunpowder Mills, Lea valley, England. ली-व्हॅली. ली-दरी. आबांच्या आवडत्या इंग्लंडमधली ही पाहा ली-दरी. (काडतूस हातात घेऊन चाटून पाहतो.) चवींच्या लाटा येताहेत. एकामागून एक. सिगरेटभोवतालच्या कागदाची चव. मधमाशांनी रिकाम्या केलेल्या पोळ्यातल्या मेणाची चव. हं! पण तिसरी चव नीट ओळखू येत नाहीय. फोडणीच्या डुकराबरोबर साधी गोमाता की साध्या डुकराबरोबर फोडणीची गोमाता? अशीच काहीशी चव. (भिंतीकडे जाऊन तिथली बंदूक खाली काढून घेऊन येतो. दातांनी काडतूस फाडून आतली दारू बंदुकीच्या नळीत सावकाश ओततो.) दरीतली दारू अजून शिल्लक होती! (कागदी आवरणातली शिशाची गोळी नळीत टाकून बंदुकीला लावलेली सळई आत खुपसून गोळी घट्ट बसवतो.) आता ऐका, अस्मादिक यदुनाथ जातेगावकर ह्यांनी रचलेली एक अप्रकाशित रुबाई:

The moving bullet; having done its deed
Moves no more: and disgorges its speed
Into coagulations of soft flesh; which enclose,
Lovingly, the contours of a deadened seed.

A-A-B-A. आऽबा.

(बंदुकीची नळी तोंडात धरतो आणि दोर खेचून झुंबराचा दिवा मालवतो. दिवाणखान्यात पूर्ण अंधार आहे. गोळी झाडल्याचा आवाज.)

❊ ❊ ❊

एका निनावी प्राण्याचा मृत्यू

ज्येष्ठाची पौर्णिमा होती. चांदोबाची मुशाफिरी आत्ता कुठे सुरू झाली होती. "भेंडेकाका! इथे या." मोगूबाईंची हाळी आली. जुन्या पिढीच्या आणि ऐषारामी चालीरीतींच्या मोगूबाई बाळेकुंद्री सोळा साली जेव्हा पाचोद्याला आल्या, तेव्हाही त्यांच्या मैदानी आवाजाची आजूबाजूच्या गावोगावी ख्याती होती. त्या काळी बाई साऱ्यांच्या कौतुकाच्या होत्या. त्यांची कीर्ती मुलाबाळांच्या आणि थोरांच्या तोंडी होती. त्याही तेव्हा मोठ्या जिज्ञासू आणि मुमुक्षू होत्या. त्यांच्या डौलाला साजेसा मेणा दारी होता. ऋद्धिसिद्धी दासी होत्या. उष:काळी त्यांच्या आशीर्वादासाठी सारी आळी रांगा लावी. आणि एका सैतानी रात्री हे सारे धुळीला मिळाले. एकाकी तारुण्याच्या धुंदीमुळे बाईंना दुर्बुद्धी झाली. त्यांच्या निम्मेशिम्मे हिवाळे पाहिलेल्या एका उफाड्याच्या ऐदी सोद्यापायी त्यांच्या काचेच्या भांड्याचा चुराचुरा झाला. त्या पोराने बाईंच्या पुंजीसुद्धा पुण्याच्या दिशेने सूंबाल्या केला, आणि इथे बाईंच्या लौकिकाला ओहोटी आली. बाईंच्या शीलाची जी हानी झाली की, झाडूवालाही थारा देईना. पोराटोरांची कुचेष्टा भाळी आली. पूर्वायुष्याची सारी चिह्ने काळाच्या क्षितिजाखाली गेली. कानीच्या कुड्या गेल्या आणि भोके राहिली. सारी दैना दैना झाली.

'मेले! मेले! धावा! धावा!' पुन्हा बाईंची किंकाळी ऐकू आली. 'हा आलो!', काकांचा दुजोरा आला. तेही आता म्हातारे झाले होते. 'माझ्या चितेच्या शेणी कावेरीच्या घाटी नेण्याची आता पाळी आली आहे', ही आयुष्याच्या सांजेला सांगाव्याविना येणारी धास्ती आताशा त्यांनाही वेडावी. कुणी सांगे की, पूर्वी त्यांचा जुना चौसोपी वाडा रौलेट् ॲक्ट्पायी माँटेग्यूसाहेबांनी स्वाहा केला होता. वाड्याच्या जोडीने काशाची मोठाली भांडी गेली. देवादिकांच्या मूर्ती गेल्या. विक्तूरिया राणीच्या शिक्क्यांची पेटीही गेली. आता त्या गावी त्यांच्या नातेवाईकांपैकी कोणी नाही. आई आमांशाच्या विकाराने मेली. मोठा भाऊ होता तो नामानिराळा राहिला. गाठीला भोकाचा पैसाही नाही. विद्या नाही की युक्ती नाही. बोजा मोठा, नि चिंधी थोटी. भुकेच्या

वेळेला सुपारीच्या खांडाचेही वांधे. थोबाडाचे टाळे वेंगाडावे ते कुठे? रिकाम्या पानी उठावे की कोंड्याचे मांडे खावे? दारिद्र्याची गाथा कुणाच्या कानी घालावी? सोनेनाणे नाही तो भार्या रुसे. माहेरी जाई ती येण्याची खात्री नाही. दोन्ही मोठी मुले भांगेच्या आणि दारूच्या आहारी गेलेली. काकांची छोटी दुहिता शालिनी बिगारीच्या मुलांसाठी हिब्रू भाषेचे क्लासेस् घेई तेंव्हा कुठे मेटाकुटीला आलेल्या त्यांच्या संसाराचा गाडा रुटूखुटू चाले. ती पोटुशी राहिली की तोही थांबे. सारी त्रेधा उडे. जाऊ द्या ते आता. आसू किती ढाळावे आणि कोणी पुसावे? हे घ्या काका बिगीबिगी आले.

बाईंच्या आरोळीने दामूही तिथे आला. दामूमागे त्याची छोटीशी मालूदीदी आली. मालूच्या जोडीने काळा कुलुंगा टिपू कुत्रा आला. टिपूच्या जोडीने मिजाशी मिशांची भाटी आली. भाटीच्या पाठीमागे टोकेरी चोचीची मैना आली. औत्सुक्याने सारे शेजारी आले. होमिओपॅथीवाले डॉ. कुट्टीमुनी (डी.जी.ओ. बॉम्बे) आले. त्यांच्या शुश्रूषागृहाला भिणाऱ्या मोकाशीवैनी आल्या. श्री. बाबासोा शेट्टी आणि त्यांची 'भांडीवाली' सौ. निशा गुर्टू निराळे निराळे आले. (गेल्या साली पोलिओने मेल्यामुळे कै. बिनीवाले, पै. इमामुल्ला आणि ख्रि. डिसोझा या तिघांना येता आले नाही. सेनेच्या प्रीतिमेळाव्यासाठी हिं. हृ. बाळाभाई मुन्शी दिल्लीला गेलेले होते, त्यामुळे तेही नाही आले.) नैऋत्येला पोलिसांच्या निळ्या गाडीचा भोंगा ऐकू आला. त्यामागे दाढीमिशांचा फुगा केलेल्या शिपायांचा मोठा ताफा आला. तोबा दाटी झाली. बाईंच्या कांगाव्याने साऱ्यांच्या चित्ती भीतीने ठिय्या दिला. चिळीमिळी झाली. कुणाला काही सुचेना. कुणाची बुद्धी चालेना. फौ. जेधे चौकोनी गाडीपुढे उभे होते ते घाईघाईने बाईंपाशी आले. त्यांच्या आवेशापुढे कुणाला वाचा फुटेना.

✳

जेधे: (आवेशाने) मारा, ठोका त्याला! बाई, कुठे आहे तो? गुंगारा दिला का त्याने?

मोगूबाई: कुणी?

जेधे: गेला कुठे तो काळू रामोशी? त्याला फाशी देण्याची सुपारी घेणारा नावाचा सुभान्या जेधे आहे मी!

मोगूबाई: काळू? मी नाही बाई पाहिला त्याला! बाकी काळूचा सुगावा कुणाला लागावा? तो का खुळा आहे?

जेधे: आँ!? काळू इथे नाही ?! ही चेष्टा नाही ना? बाई, तुम्ही माझा पुरा मोरू केला बुवा!?

जेध्यांच्या रागाचा पारा काही खाली येईना.

जेधे: (क्रोधाने) रांडे, आम्ही फुकाचे इथे आलो ते माशा मारा-

मोगूबाई: थांबा हो! उगा शिव्या का देता? मी किनी...

जेधे: बोला ना! आता का? तुम्ही किनी...

मोगूबाई: मी किनी तिथे पुरोहितांच्या विहिरीमागे एका सापाची आकृती पाहिली.

जेधे: सापाची?

मोगूबाई: हो! मोठ्ठ्या वेटोळ्यावेटोळ्यांचा आहे तो. जाडाजुडा. चिचुंद्र्या खाणारा. बारा फुटी लांबीचा! त्याच्या क्रौर्याला मी भ्याले आणि ढेबेवाडीच्या कोण्णुस्वामींचा धावा केला, ते माझ्या हाकाटीमुळे तुम्ही आला.

जेधे: हात्तिच्या! बारा इंची वा बारा फुटी. मी आता इथे आहे तेव्हा भीतीला थारासुद्धा नाही. सापाच्या बापाचाही काही तोरा नाही माझ्यापुढे. वाघिणीच्या दुधाची बासुंदी पिणारा पांडू आहे मी. पाहूया कुठे आहे तो सापुर्डा! या माझ्यामागे!

✳

सारा तांडा ईशान्येच्या वाटेने विहिरीमागे गेला. काकांनी काठीच्या टोकाने इशारा केला. सुरूच्या झाडापुढे भिंतीच्या आडोशाला ती मोठाली वेटोळी लोकांनी पाहिली. साऱ्यांच्या ओठी आले - 'छे! हा प्राणी सापापेक्षा निराळा आहे.' ह्या गोंगाटाने प्राणी जागा झाला. त्वेषाने

उताणा झाला. जेध्यांनी जिभेखाली थुंकी गोळा केली. शिर्डीच्या साईबाबांनी दिलेल्या रुद्राक्षाच्या माळेची स्मृती जागी केली, आणि पिस्तुलाच्या एका गोळीने त्याची खांडोळी केली. काही उत्साही लोकांनी त्याच्या पार्थिवाला चोहोबाजूंनी मोहाच्या पानांचा वेढा दिला. जेध्यांनी विडीच्या टोकाने ज्वाला सुरू केली. तासापूर्वी जिथे त्रिकोणी डोक्याचा माजोरी प्राणी होता, तिथे आता राखेचा ढिगारा बाकी राहिला. 'वासांसि जीर्णानि–' या कृष्णोक्तीचा हा पुरावा आहे.

हा प्राणी ज्या जातीचा होता, तिच्या उच्चाराची इथे आम्हाला मुभा नाही. ती का नाही, हे चाणाक्षांच्या खात्रीने ध्यानी आले आहे. (ज्यांच्या ध्यानी आलेले नाही, त्या मूढांनी हा सारा उतारा पुन्हा वाचावा!) वाग्देवीने माथी दिलेल्या ह्या ओझ्यामुळे लिहिणाऱ्याच्या बोरूलाही आता ग्लानी आली आहे. तेव्हा ह्या मुमूर्षू आख्यानाची इथे इतिश्री व्हावी, ही वार्ता त्याला दिलासा देणारी नाही का?

* *

समष्टी व अभिव्यक्ती

कवींविषयी प्लेटोचे मत बरे नव्हते. 'रिपब्लिक' मध्ये तो म्हणतो की कवी हे सर्व असत्यवचनी व छद्मपूजक असून, ही सगळी झुंड अथेन्समधून हुसकून हद्दीपलीकडे पोहोचवणे हेच धोरण योग्य होय. उलटीकडून प्लेटोविषयी कवींचे मत कितपत बरे होते हे कोणीही ओळखू शकेल. एकूण कसे तर कोणते लेखन समष्टीस पोषक व कोणते अनिष्ट, ही वर्दळ तशी जुनीच. एकीकडे लेखक व दुसरीकडे स्वयमेवमृगेंद्र असलेले संस्कृतिरक्षक हे दोन पक्ष प्रस्तुत चर्चेत प्रतिस्पर्धी असणे हेही नैसर्गिकच होय.

अमुकतमुक लेखन हे धर्मसंस्थेची व कुटुंबसंस्थेची खिल्ली उडवते, अमुकतमुक लेखन हे ओंगळ होय, अमुकतमुक लेखन लैंगिकतेने लिडबिडलेले होय, व म्हणूनच अमुकतमुक लेखन बंद करणे निकडीचे होय अशी ओरड नेहमीच ऐकू येते. जो लेखक प्रस्तुत टीकेचे लक्ष्य बनतो तो भेद्रटपणे असे मुळमुळीत समर्थन देतो की 'हे तुमचे म्हणणे पूर्णपणे खरे नव्हे, लक्षपूर्वक परीक्षण केले तर असे दिसते की अमुकतमुक दोष हे गुणच होत व तसे तसे लेखन तेथे तेथे रसोत्कर्ष म्हणून गरजेचेच होय.' पण 'हो, मी लिहिले ते लिहिले, न रुचेल तर ते पठण न करणे हेच इष्ट' असे बेफिकीर प्रत्युत्तर ऐकू येणे तसे दुर्मीळ! शेपूट दुमडून बसलेलेच अधिक. पण खूप पूर्वी ऐकलेली अशी एक गोष्ट इथे नमूद करतो. तेंडुलकरलिखित 'गृध्र' नटकथेतील एक प्रसंग: रूबी ही लग्न न केलेली एक मुलगी गरोदर असते. तिची बहिण लक्ष्मी तीस जमिनीवर फेकते, व तेणेकरून रूबीचे पोट पडते. रक्त येऊन तिची चड्डी भिजते. इथे सेन्सॉर कमिटीने म्हटले की योनीतून स्रवलेले रक्त स्टेजवर दिसणे अवैध होय; तेणेकरून संस्कृती नष्ट होईल. तर दिग्दर्शक श्रीधर वर्टींनी स्वत:शी असे म्हटले की कमिटीस सरळसरळ विरोध करणे हे मोठे जिकिरीचे प्रकरण, व तसे केले तरी यश मिळेल न मिळेल. उलट तिची टोपी उडवणे हेच सोपे व संयुक्तिक ठरेल. खेळ सुरू होणेपूर्वी ते स्पीकरवरून निवेदन करीत की 'अमुकतमुक प्रसंगी रूबीची चड्डी हिरवी दिसेल. तेच रक्त असे समजणे!'

सोवळे नेसून कोणतीही बोली वृद्धिंगत होत नसते. सर्व तऱ्हेचे लेखन बोलीत असणे हे समृद्धीचे लक्षण होय. जर वैखरी प्रगल्भ होणे असेल तर तीत जसे ललितगद्य उत्पन्न होणे गरजेचे, निसर्गपद्य उत्पन्न होणे गरजेचे, तत्वचिंतन उत्पन्न होणे गरजेचे, बीजगणित उत्पन्न होणे गरजेचे, तसेच पोती भरभरून

डिटेक्टिव पुस्तके, पिवळी पुस्तके, चटोर पुस्तके उत्पन्न होणे हेही गरजेचे होय. जितकी भंकस व रद्दी पुस्तके इंग्रजीत असतील तितकी ती अन्यत्र कुठेही नसतील. पण हे इंग्रजीचे वैगुण्य नसून शक्तिस्थळ होय. एक असुर शी करून स्वत:चे ढुंगण कसकसे पुसतो हे वर्णन एक फ्रेंच लेखक चवीने करतो. एक इंग्रजी लेखक दशसहस्र शब्द असलेली एकच ओळ लिहितो. एक अमेरिकन लेखक रोमन लेखनपद्धतीतील एक स्वर संपूर्णपणे अव्हेरून अख्खी गोष्ट लिहितो. बीभत्स लेखन, अवघड लेखन, विक्षिप्त लेखन हे सर्व स्वत:चे बळ घेऊन येते, व बोलीस दणदणीत बनवते. हीच तिची खरी धट्टीकट्टी श्रीमंती असते.

जसजशी बोलीवरील बंधने कमी होतील तसतशी समष्टीची सहनशक्ती मोठी होते. जे लेखन पूर्वी रुचत नसे ते रुचते. जशी जुनी पिढी 'नभी लोळती इंद्रधनूची जुळी दुहेरी वेटोळी' हे कवन ऐकून मुग्ध होते, तशी नवी पिढी 'उंदिर मेले बिडी पीउनि' हेही कवन स्वीकृत करते. जी गोष्ट 'ऊन मी म्हणत होतं' इथून सुरू होते, ती पलिते विझत येतेवेळी 'मी असे सुचवतो की धृतशरधनुष्य अशी जी देवस्वरूप विभूती तीस तुम्ही निमूळते टोकेरी शस्त्र घेऊन जखम करणे इष्ट होईल' इथपर्यंत पोहोचते. जुने मरते, पण फेस भर्कन उसळतो तसे पुन:श्च जिवंत होते.

इंग्लंडमधील थोर तत्त्वज्ञ जॉन स्टुअर्ट मिल्लचे 'ऑन लिबर्टी' हे पुस्तक प्रस्तुत चर्चेत अत्यंत महत्त्वपूर्ण व उल्लेखनीय होय. 'हवे तसे लेखन करणेस किती मोकळीक असणे संयुक्तिक' ही चर्चेतील मेख नसून 'लेखन करणेवर निर्बंध बसवणेस समष्टीकडे किती दमनशक्ती उपलब्ध असणे संयुक्तिक' ही होय, असे तो सूचित करतो. तो म्हणतो की, विशिष्ट लेखन अनिष्ट समजून ते करणेस अडसर उभे करणे, म्हणजे 'मी सत्य ओळखून असून इतर सर्व मते खोटी समजतो' अशी अहंमन्य वृत्ती प्रदर्शित करणे होय. 'मी चुकू शकतो, समष्टी चुकू शकते, विरुद्ध मतही बरोबर असू शकते' हे जो समजतो, तोच सहिष्णु असतो. 'सर्व मते ऐकू, तोलून बघू व बुद्धीस योग्य तीच घेऊ' असे तो म्हणतो. अप्रिय सत्य ऐकणे व बोलणे हे दोन्ही समष्टीस अत्यंत हितकर होय. जिथे लेखक बंधमुक्त असतो, जिथे अभिव्यक्तीस गिळंकृत करणेस दंडशक्ती सदोदित तोंड उघडून उभी नसते, तिथेच समष्टीतील प्रत्येकजण निर्भयपणे श्वसन करू शकतो.

* *

हे ऐकल्यावर राजपुत्र रुधिरबिंदू म्हणाला - "नियतीची लीला अगाध आहे. गुरुभद्राने वेळीच मोठा पराक्रम गाजवून आणीबाणीचा प्रसंग निभावून नेला असंच म्हणायचं." आणि त्याने हसत हसत आपले आनंदाने विस्फारलेले डोळे गुणशेखरावर रोखले. गुणशेखराने कालच रात्री आपल्या प्रेयसीच्या आग्रहाला बळी पडून टोपलीभर गोड लुसलुशीत काजूफळं फस्त केली होती, त्यामुळे त्याचा घसा आज चांगलाच खवखवत होता. पण तशाही स्थितीत त्याने आपल्या कथनाला सुरुवात केली.

सातवा उच्छ्वास

"हे राजपुत्रा, पर्वतातल्या त्या विहिरीत उतरून तू पाहता पाहता अदृश्य झालास, तेव्हा अर्थातच मी मोठ्या चिंतेत पडलो आणि तुझ्या शोधात हिंडत हिंडत शेवटी पांड्य राज्याच्या हद्दीत येऊन पोहोचलो. राजधानीबाहेरच्या स्मशानाजवळ मोठं झाड दिसलं. त्या झाडाच्या वाढलेल्या मुळाशी ओलसर मऊ पानांचा बिछाना तयार झाला होता, तिथे मी जाऊन बसलो. अतिश्रमाने डोळ्यांवर झापड आली. मरणाची थंडी होती, आणि रात्रीच्या जटाच अवनीवर याव्यात त्याप्रमाणे अंधार चोहोबाजूंनी ओतत होता. सर्वत्र भूतपिशाच्चांचा राजरोस वावर सुरू होता, टपटप दवाचे थेंब पडत होते आणि सारी मनुष्ये आपापल्या बिछान्यांत दाट झोपेत होती. अशा वेळी पिशाच्च आणि पिशाच्चिणीचा वाटावा असा हृदय फाडणारा अत्यंत विव्हल सूर पिंपळाच्या फांद्यांमधील फटींतून माझ्यापर्यंत पोहोचला आणि माझ्या डोळ्यांवरची झोप त्याने उडवून लावली. 'वासनेच्या ज्वाळांमध्ये मी आणि माझी प्रेयसी होरपळत असताना, इंद्रजाल जाणणाऱ्या या पाताळयंत्री डोंबाने आमच्या रतनामध्ये अडथळा आणून आम्हाला आत्ताच बोलवावं ना?! आपल्या मायावी विद्येचा पाश आवळून आम्हाला दास बनवणाऱ्या या दुष्टाला जो नरवीर ठार मारील, त्याचे आम्ही फार ऋणी होऊ.'

"हा डोंब आणि त्याचा हा दास यांना पाहण्याची प्रबळ ऊर्मी येऊन थोड्या अंतरापर्यंत मी या पिशाच्चाची पाठ धरली, तसा हा डोंब माझ्या दृष्टीस पडला. त्याने आपल्या शरीराला जळलेल्या फांद्यांचं भस्म फासलं होतं, माणसाची हाडे तोडून बनवलेली दीप्तिमान आभूषणे माळली होती, आणि विजेप्रमाणे झळाळणाऱ्या त्याच्या तांबूस लालसर झिंज्या जमिनीपर्यंत लोंबत होत्या. डाव्या हाताशी पेटलेला विस्तव चोहोबाजूंनी अंधाराला शोषीत होता, आणि जसजशी त्याला तिळाची आणि

मोहरीची आहुती मिळे तसतसा हपापून जिभल्या चाटीत होता. हात जोडून तो पिशाच्च डोंबासमोर उभा राहिला आणि म्हणाला, 'स्वामी, आपण आज्ञा द्या, आणि तिची अंमलबजावणी झालीच असं समजा.' त्या पाषाणहृदयी डोंबाने आज्ञा दिली - 'पांड्यदेशीचा राजा पृथू, याच्या मुलीला, पूर्णचंद्रेला ताबडतोब उचलून इथे आण.' त्याप्रमाणे पिशाच्चाने राजपुत्रीला तिथे आणलं. तिने हौसेने शिरावर माळलेली पारिजाताची वेणी चुरडली होती. भीतीने हादरलेल्या धपापत्या हृदयाने ती आपल्या आईवडिलांना बोलावू पाहत होती, पण अश्रूंमुळे तिच्या तोंडून वाचा फुटत नव्हती. त्या चांडाळाने सहाणेवर तलवारीला धार लावली, राजपुत्रीचा बुचडा धरला आणि तिचे शिर तोडण्याच्या पवित्र्यात तो उभा राहिला. त्याचवेळी निमिषार्धात ते शस्त्र मी त्याच्या हातून हिरावलं आणि त्या चांडाळाचं शीर उडवलं. त्या झिंज्यांच्या जंजाळासह ते शीर उचलून मी जवळच्या पिंपळाच्या ढोलीत ठेऊन दिलं. हे पाहून पिशाच्चाच्या साऱ्या चिंता मावळल्या आणि त्याला आता हर्षवायू होईल अशी भीती मला उत्पन्न झाली. तो म्हणाला - 'स्वामी, या दैत्याच्या छळामुळे मला रोज डोळाभर झोपही मिळाली नाही. आपल्या मंत्रसामर्थ्याच्या जोरावर मला हा सतत जरबेत ठेवी. याच्या प्रभावामुळेच माझ्या इच्छेविरुद्ध माझा रांजण पापाने भरला आहे. ह्या नरपशूला यमसदनीच्या यातनांची चव पाहायला धाडणं ही आपल्या हातून माझ्यावर फार मोठी मेहेरबानी झालेली आहे. आपण मूर्तिमंत दयानिधी आहात, तेव्हा परतफेडीची संधी त्वरेने आपण मला द्यावी हीच माझी प्रार्थना आहे. आपल्या ऋणाचा बोजा आता मला थोडाही सहन होत नाही.' असं म्हणून तो पिशाच्च लीनपणे माझ्यासमोर धुळीत आडवा झाला. मी त्याला म्हणालो - 'वीरपुरुषांची ही नेहमीचीच अडचण असते. एवढ्याशा फालतू बाबीसाठी त्यांना सारेजण हे भलं थोरलं श्रेय देऊ पाहतात. या सुंदर राजपुत्रीचा थोडाही दोष नसताना ह्या चांडाळामुळे तिची झोपमोड झाली, हे बरं झालं नाही. तेव्हा तू फार दमला नसतील तर तिला वाड्यावर परत नेऊन सोड. यातच मला सारं मिळालं.'

"माझ्या ह्या बोलण्याचा पूर्णचंद्रेवर फार परिणाम झाल्याचं दिसलं. तिच्या लोंबत्या पाळीच्या छिद्रात शोभेसाठी ठेवलेल्या निळ्या पद्मफुलाचं प्रतिबिंब ज्यांच्यात पडलं आहे अशा थरथरत्या बुबुळांनी व्यापलेले डोळे तिने विस्फारले. विस्तीर्ण भाळावर नाचणाऱ्या आणि मदनाच्या धनुष्याप्रमाणे ताणलेल्या भुवया वादळातल्या वेलीप्रमाणे थरथरल्या. तिचा चेहरा आलटून पालटून लाजेने आणि रतिज्वराने लाल झाला. आपल्या अनवाणी पावलांच्या बोटांनी तिने जमिनीवर बऱ्याच अर्थशून्य रेषा

उमटवल्या. तिच्या विशाल स्तनद्वयांवर लावलेला जो चंदनाचा लेप आनंदाश्रूंनी भिजला होता, तो तिच्या उष्ण श्वासांमुळे वाळून पोपडे आले. आपल्याच उसाशांनी आपल्याच मंजुळ आवाजाला अडथळा आणीत पूजेच्या झारीच्या देठाप्रमाणे असलेल्या ओठांच्या चंबूतून ती म्हणाली - 'राजन, मला मृत्यूच्या पाशातून ओढून आणलंत ते वासनेच्या वादळामुळे ज्याच्यावर विरहवेदनेच्या लाटा आल्या आहेत अशा प्रेमसमुद्रात लोटून देण्यासाठीच वाटतं. माझी तुम्हाला थोडी जरी दया येत असेल, तरी आपण मला आपल्या पायाची दासी माना. आपण आत्ताच्या आत्ता माझ्याबरोबर प्रासादातल्या अंत:पुरातच राहायला चला ना! तिथल्या साऱ्या स्त्रिया माझ्या पुऱ्या मुठीत आहेत, त्यामुळे आपलं रहस्य फुटण्याची थोडीही धास्ती नाही.' मदनाने थोडीही दयामाया न ठेवता प्रत्यंचा ताणून मर्मी बाण मारावा अशी माझी अवस्था झालेली होती, आणि तिच्या चोरट्या नजरेच्या पोलादी बेड्यांनी मी बद्ध होऊन पडलो होतो. मी पिशाच्चाला म्हणालो - 'महारथी वीराच्या ढालीप्रमाणे जिचे नितंब वाटोळे आहेत अशा या रमणीची इच्छा जर मी शमवली नाही, तर माराच्या तावडीतून ही जिवंत सुटत नाही. तेव्हा पाडसाप्रमाणे डोळे असणाऱ्या या स्त्रीसह मला तिच्या अंत:पुरात ने.' हे मी म्हणताच पळार्धात पिशाच्चाने आम्हाला राजवाड्यापाशी आणून ठेवलं. वाडा शरद ऋतूतल्या नभातील जलदांच्या समूहाप्रमाणे दिसत होता. तिथे माळ्यावरच्या आडोशाला त्या चंद्रबिंबी चेहऱ्याच्या राजपुत्रीच्या इच्छेनुसार मी थोडा वेळ थांबलो. तिने आपल्या मऊ हाताच्या तळव्याने आपल्या मैत्रिणींना झोपेतून उठवलं. त्यांना सारा वृत्तांत समजला. रडव्या डोळयांनी त्या बाहेर आल्या, आणि माझ्या पायांवर त्यांनी आपले हात ठेवले. पुष्पमाळांतील पुंतंतूंवर डवरलेल्या मधमाशांचे अनुसरण वाटावे अशा आवाजात त्या मला म्हणाल्या - 'सूर्याप्रमाणे ज्याची आभा आहे, असे आपण पुरुषोत्तम तिच्या पाठीशी होतात म्हणूनच आमच्या मैत्रिणीचा जीव वाचला. हिचा पुण्यपिता मदन ह्यानेच प्रेमरूपी अनलाला जामीन ठेऊन हिचं दान आपल्या पदरी सोपवलं आहे, तेव्हा उमललेल्या पद्मफुलांप्रमाणे डोळे असलेल्या आपणच हिला आता सांभाळावं. मेरू पर्वतावरील अभेद्य पाषाणाप्रमाणे असलेल्या आपल्या हृदयावर हा दैदीप्यमान पाचू फार शोभून दिसेल.'

तेव्हापासून त्या सुंदर राजपुत्रीबरोबर मी बरेच दिवस राहिलो. तिच्या मैत्रिणींमुळे आमचे प्रेमसंबंध विशेषच दाट झाले.

"वसंत ऋतू आला. पोटासाठी देशोदेशी हिंडणारे प्रवासी आपापल्या प्रेयसींच्या आठवणीने अस्वस्थ झाले. फुलांच्या ताटव्यांवर हावरट मधमाशांचा हल्ला झाला. मलय पर्वतावरून येणाऱ्या वाऱ्याने बहरलेल्या आंब्यावर मधमाशा झेपावल्या. एरवी शालीन असलेल्या स्त्रिया सारी लाजलज्जा सोडून प्रेमचाळयांना आतुर झाल्या. दर्दूर पर्वतावरच्या चंदनाच्या स्पर्शाने थंडावलेल्या वाऱ्याने आपल्या शिष्यिणींना, म्हणजे वेलींना नृत्याची संथा दिली. पांड्यदेशीच्या राजाला पशुहत्त्येला जाण्याची उबळ आली. जनान्यातल्या साऱ्या स्त्रिया आणि स्वतःच्या मुलीसह राजा समुद्रतटीच्या दाट बनात तेरा दिवस ठिय्या मारून बसला. तिथे शिरण्याचे धार्ष्ट्य सूर्याजवळही नव्हते, आणि मधमाशांच्या ओझ्याने दबलेल्या फांद्या तुषारांमुळे थंड झालेल्या पुळणीला स्पर्शीत होत्या. हजारो स्त्रिया अविरत नृत्यवादनात चूर होत्या. सारेजण वासनेच्या डोहात ओठांपर्यंत बुडाले होते. ह्या बेसावधपणाचा फायदा उठवून चोलदेशीचा राजा अथर्वबिंदू याने समुद्री तराफ्यांचा तांडा आणून तळावर जोरदार हल्ला चढवला, आणि सारे त्याच्या बंदिवासात पडले. भीतीने जिच्या बुबुळांचा तोल जात होता, अशी माझी प्रेमळ पूर्णचंद्राही दिसेनाशी झाली. माझ्या चेहऱ्यावरचं तेज उडालं. अन्नावरची वासना नाहीशी झाली. मी स्वतःशी म्हणालो - 'माझी प्रेयसी या अथर्वबिंदूच्या तावडीत सापडली आहे. तिला पाहूनच त्या पिसाटाशी बुद्धी चळेल, आणि तो जबरदस्तीने तिच्याशी रत होऊ पाहील. हे तिला सहन न होऊन ती विष पिऊन मरून जाईल. असं झालं तर मदनज्वरामुळे माझाही प्राण जाईल. मोठी अडचणच आहे सारी!'

"ह्याचवेळी चोलदेशीच्या राजधानीतून बाहेर येणारे दोन ब्राह्मण मला भेटले. ते म्हणाले - 'बंदिवासात पडलेल्या पृथूच्या सतत अवमानास्पद बोलण्यामुळे चिडून राजा अथर्वबिंदू त्याला फाशीच देणार होता, पण पूर्णचंद्रेला पाहून ऐन वेळी तो चळल्यामुळे पृथूचा जीव वाचला. पण त्या राजपुत्रीला चेड्याने पछाडलं आहे, त्यामुळे राजाच नव्हे तर सामान्य पुरुष जरी समोर पाहिला तरी तिला वांतीची भावना होते. त्या चेड्याला तिच्या शरीराबाहेर ओढण्यासाठी अथर्वबिंदूने जारणमारण जाणणारे हजारो भुत्ये बोलावले आहेत, पण आत्तापर्यंत ह्या साऱ्याचा शून्य परिणाम झाला आहे.' या वृत्तांतामुळे मला बराच हुरूप आला. मी परत स्मशानाला भेट दिली, पिंपळाच्या ढोलीत ठेवलेल्या झिंज्या बाहेर आणल्या, त्यांना तांदळाची लापशी लावून स्वतःच्या माथ्यावर थापल्या आणि उन्हात वाळवल्या. साऱ्या शरीरावर मळलेल्या चिंध्या आच्छादल्या आणि इंद्रियावर फाटलेलं चामडं आडवं लावलं. दहाबारा

भोळसट माणसं भोवती जमा झाली. त्यांच्यासमोर रमलविद्येचे चार डाव मांडले, तेव्हा भारून जाऊन त्यांनी मला बऱ्याच भेटवस्तू आणि फळफळावळ दिली. शिते येताच भोवती भुतेही जमली. हा हा म्हणता अर्धवट बुद्धीचे शिष्य जमा झाले. थोड्या दिवसांनी चोलदेशीच्या राजधानीच्या दिशेने माझा प्रवास सुरू झाला. राजधानीबाहेर सहा योजनांवर सरोवराशेजारच्या अरण्यात मी शिष्यांसह स्वतःचं बस्तान बसवलं. सरोवर समुद्राप्रमाणे भासत होतं. पाण्यावर राजहंसांनी चोचींनी तोडलेल्या पद्मफुलांच्या तंतूंचा सडा पडला होता. माझ्या सामर्थ्याच्या अतिरंजित बातम्या शिष्यांनी सर्वत्र पसरवल्या होत्या. जिथेतिथे चर्चा चालू होती - 'हे जे सरोवरापल्याड राहणारे मुनी आहेत त्यांना चारी वेद आणि सत्तावीस ब्राह्मणे पाठ आहेत. आर्यावर्तात जेव्हा दोन पंडितांमध्ये शास्त्रार्थाबद्दल मतभेद होतो, तेव्हा या मुनींचा निवाडा प्रमाण मानला जातो. असत्याने आपली जीभ त्यांनी अजून विटाळलेली नाही. ते दयेचा स्रोतच आहेत. ते स्थितप्रज्ञ आहेत. त्यांच्या पायाची धूळ माथी शिंपडल्याने अतिसार बरा होतो, त्यांचे पाय धुऊन ते पाणी माथी शिंपडल्याने साडेसाती टळते.'

"ही चर्चा अथर्वबिंदूच्या दरबारी पोहोचली. अर्थातच त्याच्या मनात पूर्णचंद्रेशिवाय दुसरा विषय नव्हता. तो रोज माझ्या भेटीला येई, पाया पडे, आणि शिष्यांना उपहार देई. आठवडाभराने तो मुद्द्यावर आला. तो अस्वस्थ होईल इतपत वेळ दवडल्यावर मी म्हणालो - 'हे राजन्, तू माझ्यापाशी आलास हे उत्तम झालं. तू या राजपुत्रीचा हात जर मिळवलास तर त्यानंतर तुला पृथ्वीचंच राज्य मिळायला उशीर नाही. अर्धवट उमललेल्या निळ्या पद्मफुलांप्रमाणे डोळे असलेल्या या राजपुत्रीवर दुसऱ्या पुरुषाची दृष्टी जावी, हे त्या चेड्याला मुळीच आवडत नाही, हीच तेवढी अडचण आहे. तू तीन दिवस थांब.' राजा आनंदाने परतला. त्यानंतरची रात्र अमावस्येची होती. सारे झोपेत असताना मी बाहेर पडलो आणि रात्रभर श्रम वाहून सरोवराच्या तीराजवळ पात्राच्या तळाशी मोठं भुयार बनवलं. पाण्यात सूर मारून पळभरात तिथे सहज पोहोचणं साध्य होतं. भुयाराचं तोंड पाषाणाने बंद झाल्यानंतर तीरावर उभ्या असलेल्या माणसाला संशय यावा असा संभव नव्हता. तिसऱ्या दिवशी, स्नानाने शरीर पवित्र झाल्यावर, सारे बरेवाईट मानवी व्यवहार न्याहाळणाऱ्या, सरोवरातील लाटांतून सुसर पोहत जावी त्याप्रमाणे नभातील जलदांतून पोहत जाणाऱ्या, लाल चंदनाचा लेप लावलेल्या पुष्ट स्तनाप्रमाणे दिसणाऱ्या आणि अंधाररूपी हत्तीला ठार मारणारा जणू सिंहच अशा सूर्याला ओंजळभर लाल पद्मफुले वाहून मी माझ्या झोपडीत परतलो आणि राजाची वाट पाहत बसलो. राजा आला

आणि त्याने आपला शिरपेच माझ्या पायाशी ठेवला. मी त्याला म्हणालो - 'मला तुझ्या अडचणीतून रस्ता सापडला आहे. आळशी माणसाला नशीबाचीही मदत होत नाही, पण तू हातपाय हलवलेस तर तुझी इच्छा आजच पूर्ण होईल. या सरोवराला मी आशीर्वाद दिलेला आहे. आज रात्री तू त्यात बुडी मार, आणि पाण्याच्या तळाशी जमेल तेवढा वेळ पडून रहा. नंतर लाल डोळयांनी आणि ओल्या शरीराने या मंतरलेल्या तळयातून जेव्हा तू बाहेर येशील तेव्हा तो चेडा तुझ्यासमोर उभा राहू धजणार नाही. राजपुत्रीच्या शरीरातून तो ताबडतोब चालता होईल, आणि तिचं हृदय वितळून तुझ्याशिवाय पळभरही राहवत नाही अशी तिची अवस्था होईल. हा उपाय जर तुला मान्य असेल तर आज रात्री तिळाच्या तेलाने सहस्र मशाली पेटवून राजधानीतून सरोवराच्या दिशेने ये, आणि आत बुडी मार.'

"मी त्या भुयारात शिरलो आणि राजाची वाट पाहत बसलो. मध्यरात्री राजाने नि:संशय मनाने सरोवरात बुडी मारली. जेव्हा तो हत्तीच्या उंचीएवढ्या पाण्यात आला तेव्हा मी सुसरीच्या नि:शब्द हालचालीने त्याच्यापर्यंत पोहोचलो, रुमालाने त्याची मान आवळली आणि हातापायांनी त्याला सणसणीत मार दिला. त्याची धडपड थांबल्यावर प्रेताला भुयारात ठेऊन मी पाण्याबाहेर आलो. राजाच्या या नव्या रूपाला पाहून सारे स्तंभित झाले. दोन्ही हातांनी भाले उंचावून माझे शिपाई प्रजेला रस्त्यामधून हटवीत असल्याचे दृश्य पाहत मी पांढऱ्या चामरांच्या छायेत राजहस्तीच्या पाठीवरून राजधानीत आलो. त्या रात्री आनंदामुळे मला झोप आली नाही. दुसऱ्या दिवशी, जेव्हा पूर्वदिशेच्या अंत:पुरातील आरसाच वाटावा, अथवा सैन्यदळातील हत्तीचा भंडारा फासलेला माथाच वाटावा असा सूर्य जेव्हा वर आला, तेव्हा प्रातर्विधी आटोपून मी सर्वांसमोर आलो आणि रत्नजडित सिंहासनावर बसलो. आश्चर्याने आणि भीतीने थरथरणाऱ्या प्रजाजनांना उद्देशून मी म्हणालो - 'जडदेहाबरोबर अटळपणे येणाऱ्या वासनांना जो बळी पडला नाही, ज्याला राजस आणि तामसाचा विटाळ झाला नाही अशा मुनींनी ज्याला आशीर्वाद दिला त्या मधमाशांच्या आवडत्या पद्मफुलांनी भरलेल्या तळयात बुडी मारल्यामुळे मला पद्मफुलांप्रमाणे ताजी त्वचा प्राप्त झाली आहे. जे मूढजन वेदविद्या निंद्य मानतात त्यांना लाज वाटावी असा हा दिवस आहे. शिव, विष्णू आणि ब्रह्मदेव यांना नैवेद्य अर्पण होऊ द्या. नृत्य आणि वादन सतत चालू राहू द्या.' हे पाहून आश्चर्याने भांबावून जाऊन माझे मंत्री म्हणाले - 'आमचा विश्वविजेता राजा चिरायू होवो. या आधीच्या सर्व राजांची स्मृती पुसली जाऊन आपलाच झेंडा दाही दिशांना रोवला जावो.'

"माझ्या भार्येची सर्वात विश्वासू मैत्रिण शिशिरदुहिता माझ्या दालनात आली असताना, आजूबाजूला माणूस नाही असे पाहून मी तिला म्हणालो - 'मला पूर्वी पाहिलं आहेस ना?' तिने माझा चेहरा पाहिला मात्र, सुरमा नसलेल्या तिच्या डोळयांतून आनंदाश्रूंचा पूर आला. हात जोडून आणि आपले चंबूप्रमाणे असलेले ओठ आपल्या हाताच्या बोटांनी लपवून ती मला म्हणाली - 'ही जादू तर नाही ना?' मी सारा वृत्तांत तिला समजावला, आणि तिच्याद्वारे तो पूर्णचंद्रेपर्यंत पोहोचवला. बंधनांतून बाहेर पडलेल्या पृथूने समारंभाने मला पुत्रीदान दिलं, आणि माझी प्रेयसी मला परत मिळाली. अशा रीतीने मी चोल आणि पांड्य अशा दोन्ही राज्यांचा राजा झालो.

"शरद ऋतू आला. उमललेल्या पद्मफुलांच्या दाटीमुळे ज्यातील पाण्याचे दर्शन दुर्लभ झाले आहे, अशा तळयाच्या बाजूने पूर्णचंद्रा आणि मी हिंडत होतो. बाजूच्या झुडुपातून शिपायाप्रमाणे वेष असलेला माणूस तलवारीसह माझ्या दिशेने धावून आला. डाव्या मांडीला तीव्र वेदनेची जाणीव होताच मी त्याच्या हातावर लाथ मारून त्याचे शस्त्र उडवून दिले, आणि त्याला जमिनीवर पाडले. पण पळून जाण्याची त्याची इच्छा नव्हती, त्यामुळे त्याला बंदिवासात डांबण्यास अडचण आली नाही. या माणसाचे इमान अथर्वबिंदूशी असावे आणि माझे रहस्य याला माहीत झाले असावे अशी प्रथमत: माझी समजूत झाली. त्याच्या इतर साथीदारांची बातमी समजावी या हेतूने सतत अठ्ठावीस दिवस मी स्वत: त्याला यातना दिल्या, पण त्या व्यर्थ ठरल्या. मी अथर्वबिंदू नसल्याचे त्याला माहीत नव्हते. माणूस अर्धवट होता आणि मला मारल्यास माझ्यावरील मुनींचा आशीर्वाद त्याला लाभेल अशी त्याची धारणा होती. त्याचे नाव दमनसिद्धी असल्याचे समजले.

"महिने लोटले. चैत्र शुद्ध सप्तमी आली. सोमवारचा दिवस होता. जमाव डोळयांत मावत नव्हता. हत्तीच्या पाठीवरून, उत्तरीयाशिवाय शरीरावर दुसरे वस्त्र नाही अशा अवस्थेत हातात जळत्या मेणाचा जडशीळ पलिता देऊन दमनसिद्धीला मैदानात आणण्यात आले. संथबाहू नावाच्या निष्णात डोंबाने त्याला चबुतऱ्यावर आवळून बांधले. विशेष बनविलेली पोलादी सांडशी लाल होईपर्यंत तापवून त्याचे दंड, मांड्या, पोट आणि इंद्रिय येथील मांस हळूहळू ओरबाडण्यात आले. नंतर पितळी डावाने तेथे तेथे मोहरीचे तापलेले तेल ओतण्यात आले. ज्या हाताने त्याने माझ्यावर तलवार चालविली होती, तो हात

शिशाच्या रसाने जाळण्यात आला. संथबाहूच्या मदतनीसांनी दमनसिद्धीस उताणे पाडून त्याचे दोन्ही हात आणि दोन्ही पाय चार दिशांना तोंडे असलेल्या चार अश्वांना जुंपले. इशारा होताच अश्व पुढे चालले, पण बराच वेळ जाऊनही इच्छित परिणाम होईना. नंतर दोन अश्व मांड्यांनाही जुंपण्यात आले तरीही यश येईना. उजव्या मांडीला जुंपलेला अश्व अतिश्रमाने मैदानात आडवा झाला. आता हा उपाय थांबवावा असे संथबाहूचे अनुभवी मत पडले. त्याने न्यायाधीश बृहलशास्त्री यांचा सल्ला विचारला, व तद्नंतर आपल्या वस्त्रातून लांब निमूळता सुरा बाहेर आणून दमनसिद्धीच्या दोन्ही मांड्यांजवळचे स्नायू चिरले, तसे दोन्ही पाय अश्वांबरोबर पुढे आले. यानंतर दोन्ही बाहूंचे सांधे चिरताच हातही सुटे झाले. आतापर्यंत दमनसिद्धी मेला असावा असा सर्वांचा समज झाला, पण अजून त्याचे ओठ हलत आहेत असे राजपुरोहितांच्या ध्यानी आले. शेवटी त्याचे धड व हातपाय वाळलेल्या भुशावर रचून पेटवून देण्यात आले. सर्व जळेपर्यंत रात्रीचा दुसरा प्रहर लोटला असे नंतर समजले. राजवाड्याच्या बुरुजातील अंधाऱ्या स्थळी उभी राहून पूर्णचंद्रा हे सारे पाहत होती, व तिच्या नितंबावरील वस्त्र दूर सारून मी तिच्याशी रत झालो होतो. यानंतर मला राजद्रोहापासून भीती राहिली नाही.

"सिंहल देशाच्या राजावर शत्रूचा हल्ला होणार आहे अशी बातमी जेव्हा मला समजली तेव्हा मी माझ्या प्रचंड सैन्यासह त्याच्या मदतीला आलो, तसा हे रुधिरबिंदू, माझ्या हरवलेल्या मित्रांसह तू मला इथे वाटेत भेटलास. त्यामुळे आज आश्चर्य आणि आनंद या दोन्ही भावना माझ्या मनात तुल्यबळ झाल्या आहेत."

"आणि माझ्याही! एकूण काय तर तुझ्या खडतर योगसाधनेला याच जन्मी घसघशीत फळं आली यात शंका नाही," रुधिरबिंदू हसत हसत म्हणाला.

❊ ❊

घाला

हा बाटाकाका. काऱ्या काकाचा हा साधासा माळा. हा त्याच्या श्वानाचा, 'राजा' चा गाळा. काळा राजा काकाचा प्यारा. म्हातारा काका साऱ्या गावाचा प्यारा.

काकाला डांग्या झाला. आजाराचा गाजावाजा झाला. साऱ्या बाया भ्याल्या. काकाच्या दाराला आल्या. काकाचा त्रागा थांबावा हा त्यांचा चाळा झाला. त्यांच्या ज्या वार्ता झाल्या त्याचा हा आढावा:

राधा: द्राक्षाचा काढा प्या.

श्यामा: काका, माझ्या बापाचा सांगावा माना. पारा जाळा, त्याचा साका चाटा.

आशा: वांग्याच्या काड्या चावा.

आकांक्षा: गालाला आंब्याच्या झाडाच्या पानांचा पाला थापा.

वामा: हा घ्या काशाचा तांब्या. गारांच्या पाण्याचा साठा घ्या. ताज्या लाह्या टाका. हा सारा काला खा.

तारा: हाडाच्या काड्यांचा मांडा खा. मासा भाजा, त्याचा वाफारा घ्या. वाघाचा पापा घ्या. हा, हा, हा!

काका: थांबा, थांबा. हा मारा जादा झाला. जा आता कामाला. आत्ताच्या आत्ता पांगा!

काकाचा डांग्या जावा हा ज्याचा त्याचा धावा. काटा बाराला आला. काकाला श्वासाचा वांधा झाला. प्राणांना काळाचा हाकारा आला. बाटाकाकाला साऱ्या गावाचा टाटा. काकाला खांदा द्या. राजाला सांभाळा. बाराव्याला या. काकाला भाताचा वाटा द्या.

※

असभ्य

सरल मगन बघ. मगन सरल बघ. सरल अंमळ बस. दम धर. चल मगन, लगबग कर. पटपट हल. अडसर सरकव. झडप बंद कर. हं. असंच दमट व थंड हवं. रखरख व भगभग नसणंच बरं. चल सरल. वस्त्रं हटव. अबब! मगन अवजड स्तन बघ. म्म! मस्त. घट्ट व प्रचंड. खरंच मस्त. चल मगन, हल बरं लवकर. फक्त बघत न बसणं बरं. सर्व वस्त्रं हटव झटपट. अबब! सरल, अगं बघ तर. अगडबंब लठ्ठ लंड. वधस्तंभच समज. रंग बघ, चमक बघ, संगमरवरच प्रत्यक्ष. अगं पण दडपण कसलं? अलगद पकड. हलव. अस्संच. मर्दन कर. हं, मस्त. अत्यंत अलगद. मगन, घट रगड पण तग धर. हं, बस्स. सरल, अगं बस्स. असं कर. वर बघ व अलगद पड. मगन, सरक जवळ. बघ तर. गच्च दंड. गरम अंग. मंद तरल घर्मगंध. पंचरससंपन्न पंगतच. स्स! संयम करणं अवघड, पण वखवख नसणंच बरं. मगन, अंक अलग कर. कडक नळ घट्ट पकड. गवत हटव. फट बघ व सरळ वर चढ. चपखल बसव. च्च! रक्त? पण सरल, भय कसचं? प्रथम असंच असतं. मगन, मस्त झव. मन दगड कर व भरभर हलव. सतत कर्तव्यरत असणंच बरं (पठक, द्व्यर्थ बघ!). हं, वंगण बरंच झरतंय. कर घर्षण! गड सर कर. स्खलन जवळ असलं तर खंडन कर. अस्सं. धरणं शक्य नसलं तर झड. सरल, धवल रस बघ. बक्कळ रस. चव बघ. जसं कडवटसर लवणच. सगळं फस्त कर बरं. बस्स. फडकं धर व सर्व स्वच्छ कर. हं, असंच. मगन सरलजवळ बस. म्हण – "फक्कड जमलं." मगन सरलचं तरट पसर. सरल दंतमंजन कर व शयन कर. चल. संपलं सगळं. बघ मगन, म्हटलं नव्हतं? ब्रह्मचर्यव्रत धरलंस खरं, पण जतन करणं अवघड असतं.

❊

विचार

'दे इकडे,' रागिणी म्हणाली, तशा हातात घेतलेल्या चपला सुशीलेने तिच्याकडे सुपूर्द केल्या. तिचा आणि स्वत:चाही जोड रागिणीने आपल्या खांद्यावरच्या झोळीत ठेवून दिला, आणि खाली वाकून दोन्ही हातांचे तळवे समुद्राच्या पाण्यात बुचकळून घेतले. हात झाडत ती वाळूतून चालू लागली.

'गुप्तधनाचा नकाशा कुठे आहे?' सुशीलेने विचारलं.

'चावटपणा नको,' रागिणी म्हणाली.

रागिणी आणि सुशीला ह्या सख्ख्या बहिणी आहेत. रागिणी तेवीस वर्षांची तर सुशीला अठरा वर्षांची आहे. लांबचा समुद्रप्रवास करून दोघी इथे येऊन पोहोचल्या होत्या. बोटीतून उतरताना कप्तानाने रागिणीच्या हाती एक कापडी थैली सोपवली होती.

पुळणीवर मांडी घालून बसून रागिणीने थैलीचे बंद सोडले. एक लखोटा आणि खुडखुड वाजणारी पितळी डबी अशा दोन वस्तू त्यातून बाहेर पडल्या. तिच्या शेजारी बसलेली सुशीला हे औत्सुक्याने पाहात होती. रागिणीने लखोटा फोडला. 'बाबांनी आपल्या दोघींना उद्देशून लिहिलेलं पत्र आहे,' ती म्हणाली. 'नकाशा मात्र दिसत नाहीय.'

*

बाबांचे पत्र

चि. रागिणी व चि. सुशीला यांस बाबांचे अनेक आशीर्वाद. हे पत्र तुमच्या हाती पडेल तेव्हा तुम्ही

दोघी नुकत्याच एका बेटावर पोहोचला असाल. तुमचा प्रवास सुखरूप झाला असेल असं समजतो. हे बेट निर्जन आहे अशी तुमची प्रथमदर्शनी समजूत होईल, परंतु बाब तशी नाही. माझे तीन भाऊ, म्हणजेच तुमचे तीन काका, अनेक वर्षे या बेटावर वसती करून आहेत. त्यांना तुमची मदत व्हावी ह्या एकमेव हेतूने तुम्हाला इथे आणण्यात आलेलं आहे. इतक्या मोठ्या समुद्रप्रवासावर तुम्हाला धाडण्याआधी मी तुमची संमती घेतली नाही, किंवा तोंडदेखली घेतली जरी असली तरीदेखील तुम्हाला कशासाठी धाडतो आहे हे नीट समजावून सांगितलं नाही याबद्दल मी तुमचा दिलगीर आहे. पण तुम्ही विचारी आहात. परिस्थितीचं स्वरूप लक्षात येताच मला क्षमा कराल असा विश्वास वाटतो. हे तिघे इथे कसे आले व कशा प्रकारची मदत त्यांना तुमच्याकडून अपेक्षित आहे ह्याचा तपशील खालीलप्रमाणे:

हे माझे भाऊ तिळे आहेत आणि त्यांच्याशी दीर्घ व सूक्ष्म परिचय नसेल अशा व्यक्तीला ते वेगळे ओळखू येत नाहीत. माझ्याहून ते पाच वर्षांनी मोठे आहेत. थट्टेखोरपणा आणि समोरच्याच्या रागलोभाची पर्वा न करता चुरचुरीत बोलण्यात आनंद मानणं ही स्वभाववैशिष्ट्यं त्यांच्यात पहिल्यापासून होती. तिघांमध्ये सारख्याच प्रमाणात होती असं मी म्हणत नाही, पण होती.

माझे भाऊ सोळा वर्षांचे होते तेव्हाची ही गोष्ट. वेदपठण करून भिक्षा मागत फिरणारा एक कानडी ब्राह्मण त्या दिवशी आमच्या दारावर आला. तो जुन्या वळणाचा आहे हे उघड होतं. काष्ट्याचं लुगडं नेसलेल्या त्याच्या दोन पोरसवदा मुली सोबत होत्या. ह्या तिघांनी त्या मुलींची हलकी मस्करी सुरू केली. 'मुलींनो, इतका मोठा वितंडवाद होऊन गेला याची तुम्हाला गंधवार्ताही नाही की काय? सकच्छ नेसणं म्हणजेच कुलीन वागणं, विकच्छ म्हणजे थिल्लरपणा आणि पारंपरिक मूल्यांची पायमल्ली हा सनातन विचार आता कालबाह्य झाला आहे. तो काष्टा कशाला वागवता? पायात नाही का येत? गोल पातळ नेसायला सुरुवात करा. छान दिसाल. आणि प्रत्येकी चार वारांची बचत होईल ती वेगळीच.' ही थट्टा अशा सुरात काही वेळ चालली तसा ब्राह्मण संतापला. तो म्हणाला की आम्ही परदेशी माणसं. तुमची भाषा आम्हाला नीट येत नाही. याचा गैरफायदा घेऊन आणि मुद्दाम जडजंबाल शब्द वापरून तुम्ही आमची मस्करी करावी हे सभ्यपणाचं लक्षण नव्हे. इतकी जर तुम्हाला आपल्या वाक्चातुर्याची घमेंड असेल तर मी तुम्हाला शाप देतो की तुम्ही मराठी विसरून

जाल. अनवट शब्द वापरण्याचा जर तुम्हाला सोस आहे तर यापुढे 'सकच्छ' आणि 'विकच्छ' हे दोनच शब्द तुम्हाला वापरता येतील. वास्तविक ही आगळीक करण्यातला तिघा भावांचा वाटा अगदी समसमान नसावा. चारगटपणा करायला कुणा एकाने सुरुवात करावी आणि दुसऱ्याने त्याची री ओढावी अशासारखं ते झालं असणार. पण मी वर म्हटल्याप्रमाणे तिऱ्हाईताला एकतर हे तिघे सहज वेगवेगळे ओळखू येत नसत, आणि त्यातदेखील संतापलेला तिऱ्हाईत माणूस असा प्रयत्न करण्याची शक्यता नव्हतीच. त्यामुळे परिणाम असा झाला की उडदामाजी काळंगोरं न होता हा शाप तसाच्या तसा तिघांच्या डोक्यावर बसला.

इतकं करून ब्राह्मण निघून गेला. माझ्या तिघा भावांची मोठी पंचाईत झाली. समोरच्याचं मराठी त्यांना व्यवस्थित समजत असे पण बोलता मात्र येत नसे. तुम्ही त्यांना भेटाल तेव्हाही अशीच परिस्थिती असेल. आपल्या मुलांची ही दशा पाहून तुमचे आजीआजोबा हवालदिल झाले. अनाहूत सल्ला देणारे रिकामटेकडे लोक आमच्या दारासमोर भाऊगर्दी करू लागले. 'मराठी विसराल' हा शाप 'नि:संतान व्हाल' किंवा 'तुमचं दिवाळं वाजेल' अशा शापांइतका प्रचलित नसल्यामुळे त्यावरचा उपाय कुणालाच ठाऊक नव्हता. आम्ही अथर्ववेदही चाळून पाहिला पण त्यातून काही मिळालं नाही. मग कुणीतरी सुचवलं की तिघांना नेवाशाला घेऊन जा, तिथे उपाय निघू शकेल.

आम्ही नेवाशाला गेलो. तिथे एक देवरुशी भेटला. तो म्हणाला की आज रात्री मी यावर चिंतन करीन, त्यातून कदाचित तोडगा निघेल. दुसऱ्या दिवशी सकाळी तो म्हणाला की तोडगा सापडला. ब्राह्मणाच्या त्या दोन मुली माझ्या स्वप्नात आल्या होत्या. त्यांनी मला एक कूटप्रश्न सांगितला. त्यांचा जो पाणउतारा झाला होता त्याची भरपाई म्हणून तुमच्या घराण्यातल्या दोन मुली कुणाचाही सल्ला न घेता जर हा कूटप्रश्न सोडवू शकल्या तर ह्या तिघांवरचा शाप विरघळून जाईल. मी तर तेव्हा फक्त अकरा वर्षांचा होतो, पण माझ्याकडे बोट दाखवीत देवरुशी म्हणाला की ह्या पोराच्या पोटी दोन हुशार मुली नक्की जन्माला येतील.

माझ्या तिघा भावांना देवरुशाने समोर बसवलं. त्यांना उद्देशून तो म्हणाला की ह्या कूटप्रश्नाची दोन अंगं आहेत. पहिलं असं की भाषा ही बोलता यायला हवीच. म्हणून तर तिला भाषा म्हणतात. पण

ते जर शक्य नसेल तर निदान रुकार किंवा नकार समोरच्याला कळवता यायला हवा. त्यामुळे 'सकच्छ' आणि 'विकच्छ' हे जे दोनच शब्द तुमच्या पोतडीत आहेत ते तुम्ही 'हो' आणि 'नाही' या अर्थाने वापरत चला. यातल्या कुठल्या शब्दाचा अर्थ काय हे तुमचं तुम्ही ठरवा पण चौथ्या कुणाला सांगू नका.

दुसरं असं की मी तुम्हा तिघांनी नवीन नावं देतो. मोहनदास, शकुनी आणि चकोर अशी ती नावं असतील. कुठल्याही प्रश्नाला मोहनदास नेहमी खरं उत्तर देईल. तो 'हो' किंवा 'नाही' म्हणू शकणार नाही, पण 'सकच्छ' किंवा 'विकच्छ' हे शब्द वापरून उत्तर देईल. अर्थात हो-नाही पैकी उत्तर देता येईल असाच प्रश्न हवा. कुठल्याही प्रश्नाला शकुनी नेहमी खोटं उत्तर देईल. तोही 'हो' किंवा 'नाही' म्हणू शकणार नाही, पण 'सकच्छ' किंवा 'विकच्छ' हे शब्द वापरून उत्तर देईल. चकोर मात्र एकच एक नेम धरून बसणार नाही. मनातल्या मनात नाणेफेक करून तो 'सकच्छ' की 'विकच्छ' ते ठरवील.

देवरुशी मला म्हणाला की तुझ्या पोरींना स्वच्छ विचार करायला शिकीव. ते महत्त्वाचं आहे. त्यांना सकच्छ नेसवायचं की विकच्छ ह्या घोळात पडू नकोस. मोहनदास कोण, शकुनी कोण आणि चकोर कोण हे जर त्या तीन प्रश्नांत ओळखू शकल्या तर ह्या शापातून तिघांची सुटका होईल. मी तुम्हाला तीन मंतरलेले जर्दाळू देतो. यातला एक जर्दाळू एकाला खायला दिला की त्याच्याकडून एका प्रश्नाचं उत्तर मिळेल. अशा तीन प्रश्नांसाठी तीन जर्दाळू कामी येतील. ह्या तीन उत्तरांवरून तिघे कोण ते ओळखायचं आहे.

आम्ही सारेजण घरी परतलो. माझे तिघे भाऊ जगाला कंटाळले आणि एका दूरवरच्या बेटावर निघून गेले याबद्दल मी त्यांना दोष देणार नाही. या घटकेला तुम्ही दोघी त्या बेटावर आहात.

*

'अचानकच संपलं पत्र', कागद उलटसुलट करून पाहात रागिणी म्हणाली. सावधपणे डबीचं झाकण

उघडून तिने आतले जर्दाळू हुंगले आणि 'वाईट वास येत नाहीय' असा निर्वाळा दिला. पत्राची घडी करून ते तिने लखोट्यात घातलं आणि डबीसकट तो लखोटा थैलीत अलगद परत ठेवून बंद आवळले. तिला अबोल झालेली पाहून सुशीलेने विचारलं, 'ताई, आता काय करायचं?'

'आपल्याला स्वच्छ विचार करावा लागणार आहे,' रागिणी म्हणाली. 'पत्रात तसं लिहिलंच आहे.'

'सुदैवाने आपल्याला तशी शिकवणही आहे,' सुशीला म्हणाली. 'तिला अनुसरून स्वच्छ आणि सुसूत्र विचार करूया.'

चमचमत्या पाण्याकडे पाहात दोघीही काही वेळ स्तब्ध बसून होत्या.

'माझा फार गोंधळ व्हायला लागलाय गं,' सुशीला म्हणाली.

'माझाही,' रागिणी म्हणाली. 'आपण एकमेकींना धरून ठेवून विचार करूया? सुसूत्रपणा त्यात नंतर आणता येईल.'

'असं पाहा की 'सकच्छ' आणि 'विकच्छ' या शब्दांचे अर्थ आपल्याला ठाऊक नाहीत,' सुशीला म्हणाली. 'यांतल्या एकाचा अर्थ 'हो' आणि एकाचा 'नाही' इतकंच ठाऊक आहे. ते शोधून काढावे लागतील. पण मी काय म्हणते की 'सकच्छ'चा अर्थ 'हो' आणि 'विकच्छ'चा 'नाही' असं तात्पुरतं गृहीत धरून चालूया. कारण नाहीतर मनात फार उलटसुलट होत राहील आणि प्रगती व्हायची नाही. पण हे फक्त एक गृहीतक आहे, खरे अर्थ आपल्याला ठाऊक नाहीत हेही आपण विसरता कामा नये.'

'खरं आहे तुझं,' रागिणी म्हणाली. तिने आपल्या तर्जनीने समोरच्या पुळणीत एक आयत आखला, आणि रेघा मारून लांबीचे समान तीन व उंचीचे समान दोन भाग केले. 'हा घे तक्ता,' ती पुढे म्हणाली.

शब्द	सकच्छ	विकच्छ
अर्थ	हो	नाही

‘काळ्या दगडावर न काढता वाळूत काढला आहे. जेणेकरून हा अशाश्वत आहे याची जाणीव आपल्या मनात ताजी राहील.’

‘मला तरी इथे काळा दगड एकही दिसत नाहीय,’ सुशीला म्हणाली. ‘पण ठीक आहे. भरती येईपर्यंत हाच तक्ता चालवून घेऊ. तर आता निदान काही सोप्या गोष्टी आपल्याला नीट समजल्या आहेत याची शहानिशा करून घेतलेली बरी. मी म्हणते ते बरोबर वाटतं का बघ. समज आपण मोहनदासकाकाला विचारलं की सूर्य पूर्वेला उगवतो का? तर तो मनातल्या मनात ‘हो’ म्हणेल. पण तो खरं बोलणारा माणूस आहे, त्यामुळे तोंडाने ‘सकच्छ’ म्हणेल. बरोबर?’

‘बरोबर.’

‘आता समज की हाच प्रश्न आपण शकुनीकाकाला विचारला, तर तोसुद्धा मनातल्या मनात ‘हो’ म्हणेल. पण तो खोटं बोलणारा माणूस आहे, त्यामुळे तोंडाने ‘विकच्छ’ म्हणेल. बरोबर?’

‘बरोबर.’

‘आता समज आपण विचारलं की ‘उंटाला उडता येतं का?’ तर मोहनदासकाका ‘विकच्छ’ म्हणेल आणि शकुनीकाका ‘सकच्छ’ म्हणेल. बरोबर?’

‘बरोबर.’

‘चकोरकाकाचं मात्र काही कळत नाही.’


‘चकोरकाकाचं काही कळत नाही, हे मान्य,’ रागिणी म्हणाली. ‘जर कुणी डोक्यातल्या डोक्यात नाणेफेक करून खरंखोटं बोलत असेल तर अशा माणसाच्या उत्तरांतून आपल्याला काहीसुद्धा माहिती मिळणार नाही. असला कसला हा काका? नाणेफेक निदान आपल्या समोर करणार असता तर बाब वेगळी होती.’

‘अगं, आपल्या समोर करणार असता तरी छापाचं अर्थ काय न् काटाचा काय हे आपल्याला कुठे माहित आहे?’ सुशीला म्हणाली. ‘नाण्याला काही खरं आणि खोटं अशा बाजू नसतात. छापा आणि काटा अशाच असतात. खोटं असायचं तर अख्खं नाणंच खोटं असतं. तेव्हा नाणेफेक उघड्यावर करूनही काही फरक पडला नसता.’

‘पण एकूण त्याच्यापासून लांब राहावं हेच बरं,’ रागिणी म्हणाली.

‘कबूल,’ सुशीला म्हणाली. ‘म्हणून निदान सध्या विचार करताना आपण असंच धरून चालू की जो काही प्रश्न विचारतो आहोत तो एकतर मोहनदासला किंवा शकुनीला. चकोरला नव्हे. चकोरकाका नेमका ओळखून वेगळा कसा काढायचा हा स्वतंत्र प्रश्न आहे. तो कसा सोडवायचा ते आपण नंतर बघूया.’

‘अगदी, अगदी,’ रागिणी म्हणाली. वाळूत आखलेल्या तक्त्याच्या बाजूला तिने एक गुबगुबीत पक्षी काढला. पक्षिजगताचं बारकाव्याने ज्ञान असणाऱ्याच्या दृष्टीला तो हुबेहूब चकोरासारखा दिसला नसता, परंतु प्राप्त परिस्थितीत तशी गरज नव्हती. दोन बाळसेदार कंसांमधोमध त्याला बंदिस्त करून जोरकस उभ्या रेघा ओढताच पक्षी पिंजऱ्यात अडकला.



‘एकूण पाहता इथपर्यंत आपली समजूत बरोबर वाटते,’ सुशीला म्हणाली. ‘उदाहरणार्थ, ‘सूर्य पूर्वेला उगवतो का?’ हा प्रश्न घे. याचं प्रामाणिक उत्तर ‘सकच्छ’ हे आपल्याला ठाऊक आहे. जर समोरच्यानं ते दिलं तर तो मोहनदास, नाहीतर तो शकुनी हे आपल्याला ओळखता येईल. अर्थात समोरचा तक्ता बरोबर आहे असं गृहीत धरून.’

‘किंवा उलट समज की मोहनदास कोण आणि शकुनी कोण हे आपल्याला ठाऊक आहे,’ रागिणी म्हणाली. ‘आता मोहनदासला हा प्रश्न विचारला आणि तो ‘सकच्छ’ म्हणाला तर समोरचा तक्ता बरोबर आहे हे आपल्याला कळेल. जर ‘विकच्छ’ म्हणाला तर तक्ता उलट करावा लागणार हे कळेल. म्हणजे तक्त्यावरून काका ओळखता येईल किंवा काकावरून तक्ता.’


‘पण सध्या आपल्याला काकाही ओळखता येत नाहीत आणि तक्ताही नाही. मग कसं करणार?’ सुशीलेने विचारलं.

‘हो ना. आणि शिवाय हे सगळं चकोरकाकाला आपण आधीच वेगळा पाडलेला आहे असं गृहीत धरून. ते अजून करायचंच आहे.’ रागिणी म्हणाली.

‘आणि ते कसं करायचं हे आपल्याला मुळीच ठाऊक नाही,’ सुशीला म्हणाली.

‘ठाऊक नाही हे खरंच,’ रागिणी म्हणाली. ‘पण मी म्हणते की चकोरकाकाला वेगळा पाडलेला आहे हे गृहीतक आपण घट्ट पकडून ठेवू. सोडूया नको. नाहीतर फार अनागोंदी माजेल.’

‘बरं बाई,’ सुशीला म्हणाली, आणि पिंजऱ्याशी ज्याचा यांत्रिक संबंध अस्पष्ट आहे अशा एका कुलपाची तिने चित्रात भर टाकली.



‘माझं चित्र तू खराब करते आहेस,’ रागिणीने तक्रार केली.

‘ते अशाश्वत आहे असं तूच तर म्हणाली होतीस. त्याच्यावर फार जीव लावून घेऊ नकोस,’ सुशीला म्हणाली.

रागिणीने होय-नाही अशा अर्थाची मान हलवली, आणि दोन्ही हाताच्या तळव्यांत गाल झाकून घेऊन ती विचार करत राहिली.

*

‘एक गोष्ट माझ्या लक्षात यायला लागली आहे,’ सुशीला म्हणाली. ‘सूर्य, उंट अशा वस्तूंबद्दल प्रश्न विचारून उपयोग नाही. कारण अशा प्रश्नांचं प्रामाणिक उत्तर आपल्याला माहित जरी असलं तरी समोरच्या काकाने दिलेलं उत्तर कळत नाही. त्यामुळे दोहोंची तुलना करता येत नाही. तक्ता मध्ये अडमडतो.’

‘हे माझ्याही लक्षात यायला लागलं होतं,’ रागिणी म्हणाली. ‘पण समज आपण प्रश्नाबद्दल प्रश्न विचारला तर?’

‘म्हणजे कसा? ‘काका, तुम्हाला एक प्रश्न विचारू का’ असा?’ सुशीलेने विचारलं.

‘तसा नाही. ‘तुम्हाला एक प्रश्न विचारू का?’ हा वास्तविक प्रश्न नव्हे. ते घसा खाकरणं आहे. माझ्या मनात आहे तो वेगळ्या प्रकारचा प्रश्न. उंटाचं उडणं हा ज्याचा विषय नसून उंटाच्या उडण्यासंबंधी प्रश्न हा ज्याचा विषय आहे असा प्रश्न.’

‘कोड्यात बोलू नकोस,’ सुशीला म्हणाली.

‘खवचट बोलू नकोस,’ रागिणी म्हणाली. ‘आपण कोडंच सोडवतो आहोत. हे बघ, उंटाला उडता येत नाही आणि गरुडाला उडता येतं इतकं तुला मान्य आहे ना?’

‘मान्य आहे.’

‘पण असं सरळ विचारायचं नाही,’ रागिणी पुढे म्हणाली. ती उठून उभी राहिली आणि पुळणीवर पुरेशी सपाट जागा शोधून तिने आपल्या तर्जनीने वाळूत एक प्रश्न लिहून काढला. त्यापुढे पायाच्या अंगठ्याने कंस काढून त्यात एक चांदणी भरली, आणि ती म्हणाली, ‘याला मी तारांकित प्रश्न असं नाव देते. हा बघ:

‘गरुडाला उडता येतं का’ असा प्रश्न जर मी तुम्हाला विचारला
तर तुम्ही ‘सकच्छ’ असं उत्तर द्याल का? (✳)

‘तर आता आपल्यासमोरचा प्रश्न असा की तारांकित प्रश्न विचारला तर कुठला काका काय म्हणेल?’ रागिणी पुढे म्हणाली. ‘काका म्हणजे मोहनदास किंवा शकुनीकाका. चकोरकाका नव्हे.’

‘नीट विचार करायला हवा. मीच मनोमन एकेक काका बनून पाहते,’ उभी राहून तारांकित प्रश्नाला सामोरी जात सुशीला म्हणाली. ‘गरुडाला उडता येतं का?’ याला मी परप्रश्न म्हणते. असं सुटसुटीत नाव सोयीचं पडेल. पहिल्यांदा मी स्वत:ला मोहनदासकाका समजते. परप्रश्नाला माझं मनोमन उत्तर ‘हो’ असं असेल. पण मी खरं बोलणारा काका आहे, त्यामुळे उघड उत्तरही ‘हो’ या अर्थाचं म्हणजे ‘सकच्छ’ असं असेल. तात्पर्य काय तर तारांकित प्रश्नालाही माझं उत्तर ‘हो’ या अर्थाचं म्हणजेच ‘सकच्छ’ असं असेल.

‘आता मी स्वत:ला शकुनीकाका समजते. परप्रश्नाला माझंही मनोमन उत्तर ‘हो’ असं असेल. पण

मी खोटं बोलणारा आहे, त्यामुळे उघड उत्तर ‘नाही’ या अर्थाचं म्हणजेच ‘विकच्छ’ असं असेल. म्हणजे तारांकित प्रश्नाला माझं मनोमन उत्तर ‘नाही’ असं असेल. पण मी खोटं बोलणारा आहे, त्यामुळे उघड उत्तर ‘हो’ या अर्थाचं म्हणजेच ‘सकच्छ’ असं असेल. याचा अर्थ दोन्ही काका तारांकित प्रश्नाला ‘सकच्छ’ असंच उत्तर देतील.

‘आता तक्ता उलट केला तर?’ रागिणी म्हणाली. ‘करूनच पाहते.’ आपल्या उजव्या तळपायाने तिने तक्त्यात खाडाखोड केली आणि दोन शब्द नव्याने लिहिले. तक्ता असा दिसू लागला:

शब्द	सकच्छ	विकच्छ
अर्थ	नाही	हो

‘अक्षर छान आहे गं माझं,’ रागिणी म्हणाली.

‘तक्ता बदलला आहे, पण परप्रश्न तोच आहे,’ सुशीला म्हणाली. ‘मी स्वत:ला पुन्हा मोहनदासकाका समजते. परप्रश्नाला माझं मनोमन उत्तर ‘हो’ असं असेल. पण मी खरं बोलणारा काका आहे, त्यामुळे उघड उत्तरही ‘हो’ याच अर्थाचं म्हणजे ‘विकच्छ’ असं असेल. तेव्हा तारांकित प्रश्नाला माझं उत्तर ‘नाही’ या अर्थाचं म्हणजेच ‘सकच्छ’ असं असेल.

‘आता मी स्वत:ला शकुनीकाका समजते. परप्रश्नाला माझं मनोमन उत्तर ‘हो’ असं असेल. पण मी खोटं बोलणारा आहे, त्यामुळे उघड उत्तर ‘नाही’ या अर्थाचं म्हणजेच ‘सकच्छ’ असं असेल. म्हणजे तारांकित प्रश्नाला माझं मनोमन उत्तर ‘हो’ असं असेल. पण मी खोटं बोलणारा आहे, त्यामुळे उघड उत्तर ‘नाही’ या अर्थाचं म्हणजेच ‘सकच्छ’ असं असेल.

‘गंमत आहे!’ रागिणी म्हणाली. याचा अर्थ तक्ता कसाही असला आणि काका कुणीही असला तरी

तारांकित प्रश्नाचं उत्तर 'सकच्छ' असंच येईल. 'मी प्रश्न बदलून बघते,' ती म्हणाली. तारांकित प्रश्नात स्थानिक खाडाखोड करून तिने नवा चंद्रांकित प्रश्न तयार केला:

'उंटाला उडता येतं का' असा प्रश्न जर मी तुम्हाला विचारला
तर तुम्ही 'सकच्छ' असं उत्तर द्याल का? (☾)

दोघी विचार करू लागल्या. 'गंमत आहे,' या खेपेस सुशीला म्हणाली. 'तक्ता कसाही असला आणि काका कुणीही असला तरी चंद्रांकित प्रश्नाचं उत्तर 'विकच्छ' असंच येतं आहे.

'मीही तोच हिशेब करत होते,' रागिणी म्हणाली. 'होतंय काय तर 'गरुडाला उडता येतं का' किंवा 'उंटाला उडता येतं का' ह्या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरं आपल्याला मिळताहेत. आपल्याला जे समजलं आहे ते नीट मांडूया.' दोन्ही तळपाय घासत नेत तिने पुळण कोरी करून टाकली. 'समज 'प्र' हा एक प्रश्न आहे. हो-नाही उत्तर यावं असा कुठलाही प्रश्न घेता येईल. तर आता मी 'प्र' ला शिंपल्यात ठेवते.' आणि तिने पुळणीवर नवं वाक्य लिहून त्यासमोरच्या कंसात एक तळपता सूर्य काढला:

'प्र' असा प्रश्न जर मी तुम्हाला विचारला
तर तुम्ही 'सकच्छ' असं उत्तर द्याल का? (☀)

'याला मी भास्करांकित प्रश्न म्हणेन. समज हा आपण मोहनदास किंवा शकुनीकाकाला विचारला. निष्कर्ष असा निघतो आहे की 'प्र' ह्या प्रश्नाचं प्रामाणिक उत्तर होकारार्थी असेल तर काकाकडून आपल्याला 'सकच्छ' असं उत्तर मिळेल, आणि जर नकारार्थी असेल तर 'विकच्छ' असं उत्तर मिळेल. मग काका कुठलाही असो, आणि तक्ता कसाही असो,' रागिणी आनंदून म्हणाली.

'सगळं उफराटंच आहे!' सुशीला म्हणाली. 'प्रश्न सरळ विचारला तर घोळाचं उत्तर मिळतं. आणि शिंपल्यात दडवून विचारला तर सरळ उत्तर मिळतं!'

‘आणखी एक गंमत! समज आपण हाच भास्करांकित प्रश्न चकोरकाकाला विचारला तरी बिघडणार नाही. खरं बोलायचं की खोटं बोलायचं हे तो भले नाणेफेक करून ठरवे ना का. एकदा ठरवल्यानंतर त्या खेपेपुरता तो एकतर मोहनदाससारखा नाहीतर शकुनीसारखाच वागेल. म्हणजे तोही प्रामाणिक उत्तरच देईल,’ रागिणी म्हणाली.

‘म्हणजे झालंच तर!’ सुशीला म्हणाली. ‘तात्पर्य काय की कुठलाही प्रश्न शिंपल्यात ठेवून कुणाही काकाला विचारला तर आपल्याला त्याचं प्रामाणिक उत्तर मिळेल.’

‘पण असं जर असेल तर कूटप्रश्न सुटला असं नाही का वाटत तुला?’ रागिणी म्हणाली.

‘मला वाटतं सुटला,’ सुशीला म्हणाली. ‘पण नेमका कसा सुटला याचा मी मनोमन रियाज करत होते. त्यात एकच एक कित्ता पुन्हा पुन्हा येतो आहे. तो कसा ते सांगते, बरोबर वाटतो का बघ. असं समज की अलबत्या आणि गलबत्या नावाचे दोन काका आहेत. त्यातला एक इथे आहे तर दुसरा तिथे आहे, पण कोणता कुठे आहे ते आपल्याला माहित नाही. म्हणजे दोन पर्याय आहेत:

इथे	तिथे
अलबत्याकाका	गलबत्याकाका

किंवा

इथे	तिथे
गलबत्याकाका	अलबत्याकाका

आता यातला कुठला पर्याय खरा आहे हे एकुलता एक प्रश्न विचारून आपल्याला शोधून काढता

येईल. आपण विचारायचं - म्हणजे अर्थात शिंपल्याआडून विचारायचं की 'अलबत्याकाका इथे आहे का?' जर होकारार्थी उत्तर मिळालं तर पहिला पर्याय, नाहीतर दुसरा.

'सोपं आहे,' रागिणी म्हणाली.

'तर याला मी कित्ता म्हणते. तो पुन्हा पुन्हा गिरवत राहायचा,' सुशीला म्हणाली. 'आपण करायचं काय तर तिन्ही काकांना ओळीने समोर बसवू. डावीकडच्याला विचारू की 'तू मोहनदास आहेस का?' इथे दोन शक्यता आहेत:

समज तो 'हो' म्हणाला. तर याचा अर्थ बाकीचे दोघे शकुनी आणि चकोर आहेत. त्यांतला कुणीतरी एक मध्ये आणि एक उजवीकडे आहे. आता कित्ता गिरवला की तिघेही कोण ते कळेल. म्हणजे एकूण दोनच प्रश्नांत भागेल आणि आपला एक जर्दाळू वाचेल.

'तो अख्खा तूच खाल्लास तरी माझी हरकत नाही,' रागिणी म्हणाली.

'सगळं ऐकून तर घे,' सुशीला म्हणाली. 'समज तो 'नाही' म्हणाला. तर याचा अर्थ डावीकडचा काका शकुनी किंवा चकोर आहे. मग त्याला आपण विचारायचं की तू शकुनी आहेस का? समज तो 'हो' म्हणाला, तर बाकीचे दोघे मोहनदास आणि चकोर आहेत हे कळेल, म्हणजे पुन्हा कित्ता आला. समज तो 'नाही' म्हणाला, तर तो स्वत: चकोर आहे आणि बाकीचे दोघे मोहनदास आणि शकुनी आहेत हे कळेल. म्हणजे पुन्हा कित्ता आला. एकूण काय तर काहीही झालं तरी तीन प्रश्नांत उरकता येईल.'

रागिणी उठून उभी राहिली आणि तिने शरीराला आळोखेपिळोखे दिले. 'चिंगे, मी तुझं अभिनंदन करते आणि तूही माझं कर,' ती म्हणाली. 'कूटप्रश्न सुटलेला आहे. चल आता.'

पण विचारांत गढलेली सुशीला तशीच बसून होती.

‘अगं, चल आता,’ रागिणी अधिरेपणाने म्हणाली. ‘जर्दाळू शिल्लक राहिला तर तो तुला द्यायचं मी कबूल केलं आहे. आणखी काय हवं? इतक्या हलक्या बौद्धिक कसरतीचं इतकं घसघशीत फळ पुरेसं नाही का झालं?’

सुशीला जागची हलली नाही. ‘ताई, तो कागद मला पुन्हा दाखव पाहू,’ ती म्हणाली.

*

कपाळावर लहानशी आठी पाडून रागिणीने ते पत्र सुशीलेच्या हाती दिलं. ‘कसं लिहिलंय ते नीट ऐकूया,’ सुशीला म्हणाली. ‘चकोर मात्र एकच एक नेम धरून बसणार नाही. मनातल्या मनात नाणेफेक करून तो ‘सकच्छ’ की ‘विकच्छ’ ते ठरवील.’

रागिणीच्या चेहऱ्यावर जाग दिसली नाही.

‘यात कुठेतरी मेख आहे,’ सुशीला म्हणाली.

‘एकच एक नेम म्हणजे खरं बोलायचा नेम किंवा खोटं बोलायचा नेम असं मी समजून चालले,’ रागिणी म्हणाली. ‘बाबा म्हणताहेत की असा एकच एक नेम चकोर धरून बसणार नाही. याचा अर्थ तो काही वेळा खरं बोलेल आणि काही वेळा खोटं बोलेल.’

‘मान्य,’ सुशीला म्हणाली. ‘पण मला वाटतं आपण गोंधळ केला. सकच्छ-विकच्छातला फरक, हो-नाहीतला फरक आणि खऱ्याखोट्यांतला फरक हे आपण गोळाबेरीज एकच समजून चाललो. आपल्याला वाटलं की चकोरकाका मनोमन नाणेफेक करून खरं बोलायचं की खोटं बोलायचं ते ठरवतो. पण तसं म्हटलेलं नाही. ‘सकच्छ’ म्हणायचं की ‘विकच्छ’ हे तो नाणेफेक करून ठरवतो. ती वेगळी गोष्ट आहे.’

रागिणीने हुंकार भरला. ‘मेख आहे खरी,’ ती म्हणाली. ‘म्हणजे पहिला फरक आणि दुसरा फरक यांत फरक नाही, पण पहिलादुसरा फरक आणि तिसरा फरक यांत फरक आहे! बरोबर म्हणाले ना मी?’

‘तसं का म्हणेनास?!’ सुशीला उद्गारली. ‘जिची जशी लकब असेल तसं ती म्हणेल. तुझं वेगळं अन् माझं वेगळं. आपण कुठे जुळ्या बहिणी आहोत?’

‘तेही खरंच आहे,’ रागिणी म्हणाली. ‘पण आता थोडं मागे जायला हवं. हे बघ, मी काय म्हणते की आधी तारांकित प्रश्न, नंतर चंद्रांकित प्रश्न आणि त्यातून पुढे भास्करांकित प्रश्न यावर आपली भिस्त होती. तेव्हा हे सगळं आपण पुन्हा तपासून बघूया. आपण असं म्हणत होतो की भास्करांकित प्रश्नाला मोहनदास आणि शकुनी ह्या दोन्ही काकांकडून प्रामाणिक उत्तर मिळेल. हे मला अजूनही बरोबर वाटतं. पण चकोरकाकाचा भरवसा नाही. मनोमन नाणेफेक करूनच जर तो उत्तर ठरवणार असेल तर त्याने प्रश्न ऐकला काय आणि नाही ऐकला काय.’

‘आपल्याला आधी वाटलं होतं की चकोरकाकाला खड्यासारखा वेगळा काढायला हवा,’ सुशीला म्हणाली. ‘नंतर वाटलं की तसं करण्याची गरज नाही. आत्ता लक्षात येतंय की आपला पहिलाच अजमास बरोबर होता. पण जमेची बाजू अशी की अमुक एक काका चकोर नाही अशी जर आपल्याला खात्री असेल तर प्रश्न शिंपल्यात ठेवण्याची युक्ती निदान त्या काकावर लागू पडेल.’

रागिणी विचारात गढून गेली. तिने स्वत:चा डावा तळहात डोळ्यांसमोर आणला. आधी अंगठा आणि मग तर्जनी मुडपून पाहिली. मग सगळी बोटं सरळ करून फक्त अंगठा मुडपून पाहिला, तसे तिचे डोळे चमकले. ती म्हणाली, ‘शिंपल्याची युक्ती फार छान आहे. तिचा वेगळा उपयोग करता येईल.’ आणि तिने पुन्हा दोन्ही तळपायांनी भास्करांकित प्रश्न पुसून टाकून नवा प्रश्न लिहिला. ती म्हणाली, ‘समज आपल्यासमोर दोन काका आहेत: एक इथे आहे आणि एक तिथे आहे. आता आपण तिथे असलेल्या काकाकडे बोट करून इथे असलेल्या काकाला विचारायचं:

‘तिथे असलेला काका चकोर आहे का’ असा प्रश्न जर मी तुम्हाला विचारला तर तुम्ही ‘सकच्छ’ असं उत्तर द्याल का? (†)

‘याला मी खड्गांकित प्रश्न म्हणते, कारण यानेही जर कूटप्रश्न सुटला नाही तर माझ्या हातून रक्तपात घडेल,’ रागिणी पुढे म्हणाली. ‘आता दोन शक्यता आहेत:

पहिली शक्यता: समज इथे असलेला काका ‘सकच्छ’ म्हणाला. तर याचे दोन अर्थ होऊ शकतात: एकतर इथे असलेला काका स्वत: चकोर आहे आणि मनोमन नाणेफेक करून उत्तर देतो आहे. किंवा तो चकोर नाही आणि प्रामाणिक उत्तर देतो आहे, म्हणजेच तिथला काका खरोखरीच चकोर आहे. दोहोंपैकी काही असलं तरी इथेही नाही आणि तिथेही नाही असा तिसरा पडद्याआडचा काका चकोर नाही हे नक्की. कारण चकोर एकच आहे.

दुसरी शक्यता: समज इथे असलेला काका ‘विकच्छ’ म्हणाला. तर याचे दोन अर्थ होऊ शकतात: एकतर इथे असलेला काका स्वत: चकोर आहे आणि मनोमन नाणेफेक करून उत्तर देतो आहे. किंवा तो चकोर नाही आणि प्रामाणिक उत्तर देतो आहे, म्हणजेच तिथला काका खरोखरीच चकोर नाही. दोहोंपैकी काही असलं तरी तिथला काका चकोर नाही हे नक्की.

एकूण काय तर कुठलीही शक्यता प्रत्यक्षात आली तरी एक बिनचकोर काका आपल्याला खात्रीने सापडेल. शिंपल्याची युक्ती वापरली तर त्याच्याकडून प्रामाणिक उत्तरं मिळतील, तेव्हा आता उरलेले दोन जर्दाळू त्याच्या डोंबलावर घालून आपल्याला तिन्ही काका ओळखून काढता येतील!’

‘शाबास, ताई!’ सुशीला म्हणाली. ‘आता मात्र आपला कूटप्रश्न खरोखरीच सुटला. निघूया?’

‘निघूया,’ रागिणी म्हणाली. वाळूत रुतलेला एक शिंपला उचलून तिने फुंकरीने स्वच्छ केला आणि थैलीत ठेवून दिला.

*

यापुढचं सगळं अपेक्षेप्रमाणे झालं. समुद्र पाठमोरा टाकून दोघी आत निघाल्या. पिवळसर शेंदरी पुळण आणि चिक्कट काळी वाळू यांमधली स्पष्ट सीमारेषा पुढ्यात येताच चपला पायांत सरकवून धीम्या गतीने व चौफेर नजर टाकीत त्या पुढे चालू लागल्या. एकमेकांपाशी बोलण्यासारखं काही नसल्यामुळे तिन्ही काका परस्परांपासून दूर विखुरलेले होते. आपापल्या नादांत असलेले एकाच मुशीतल्या चेहऱ्याचे हे तीन म्हातारे दोघींना एकेक करून दिसले. टाळ्या वाजवून आणि शुकशुक करून त्यांचं लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न सुशीला करू लागली. रागिणी तिला म्हणाली, 'अगं वेडे, त्यांना मराठी समजतं.' तिने सर्वांना एकत्र करून एका कातळावर रांगेने बसवलं.

सर्वांत डावीकडच्या म्हाताऱ्याला उद्देशून सुशीला म्हणाली, 'काका, तुमच्या डावीकडे बसलेला काका चकोर आहे का असं जर मी तुम्हाला विचारलं तर तुम्ही 'सकच्छ' असं उत्तर द्याल का?' यावर तो काही बोलला नाही. सुशीलेला आपली चूक उमगली. तिने पितळी डबीतला एक जर्दाळू काढला. इतका जुना जर्दाळू स्वच्छ करून द्यायला हवा होता का आणि स्वच्छ करायचा तर कसा करायचा ह्या विचारात ती असतानाच तिच्या बोटांतून काकाने तो अलगद उचलून घेतला आणि बराच वेळ मन लावून चावून खाल्ला. बी थुंकून देत काका म्हणाला, 'विकच्छ.' रागिणी म्हणाली, 'याचा अर्थ असा की एकतर डावीकडचा काका चकोर आहे, किंवा मधला काका चकोर नाही. म्हणजे मधला चकोर नाही इतकं नक्की. पुढचं मी विचारते.'

दुसरा जर्दाळू रागिणीने मधल्या काकाला दिला आणि विचारलं, 'काका, तुम्ही मोहनदास आहात का असं जर मी तुम्हाला विचारलं तर तुम्ही 'सकच्छ' असं उत्तर द्याल का?' यावर तो म्हणाला, 'विकच्छ.' रागिणी म्हणाली, 'याचा अर्थ मधला काका शकुनी आहे. बालकाच्या निरागस दृष्टीने जर परिस्थितीकडे पाहिलं तर खोट्टारडा असूनही त्याला दोन जर्दाळू मिळणार हे मनाला बरं वाटत नाही. पण तिघांना ओळखण्यासाठीच हा शोडषोपचार चालू आहे आणि यातून त्यांचं भलं होणार आहे ह्या दृष्टीने पाहिलं तर ते समर्थनीय आहे.' तिसरा जर्दाळू शकुनीकाकाला देऊन तिने विचारलं,

‘शकुनीकाका, तुमच्या डावीकडे बसलेला काका मोहनदास आहे का जर मी तुम्हाला विचारलं तर तुम्ही ‘सकच्छ’ असं उत्तर द्याल का?’ यावर शकुनीकाका म्हणाला, ‘सकच्छ.’ ‘झालं तर!’ सुशीला म्हणाली. ‘याचा अर्थ डावीकडचा चकोरकाका, मधला शकुनीकाका आणि उजवीकडचा मोहनदासकाका! बरोबर की नाही?’ तिन्ही काका साश्रू नयनांनी पण प्रमुदित चेहऱ्यांनी कातळावरून खाली उतरले. तिळयांचे सगळे हावभाव सारखे नसतात. त्यामुळे अश्रू ढाळण्याची व चेहऱ्यावर आनंद व्यक्त करण्याची प्रत्येकाची पद्धत वेगवेगळी होती.

‘काका, आता तरी सांगा. ‘सकच्छ’ चा अर्थ ‘हो’ असा होतो की ‘नाही’ असा होतो?’ रागिणीने विचारलं. हा प्रश्न कुणालाही विचारलेला चालणार होता. शकुनीकाका म्हणाला, ‘आम्ही तिघे इथे राहायला आल्यानंतर जसजशी वर्षं मागे पडत चालली तसतसा माझ्या मनातला गोंधळ वाढत चालला. तेव्हा मग एकदा काय तो निश्चित निर्णय करायचा म्हणून मी ‘सकच्छ’ म्हणजे ‘नाही’, आणि ‘विकच्छ’ म्हणजे ‘हो’ असा अर्थ मनाशी ठरवून टाकला.

विटाळ असतो का रे स्वच्छ?
प्रश्न मन्मनी ऐसा पुसुनी
लटिके मी बोलेन ‘विकच्छ’
असत्यवचनी ऐसा शकुनी

अशी एक छोटी कविता मी स्वत:पुरती रचून घेतली. ‘लटिके बोलणारा असत्यवचनी’ ही द्विरुक्ती त्यात मुद्दाम घातली होती. ही खूप जुनी वेदकालीन युक्ती आहे. तेच ते पुन्हा घोकत राहिलं की काळाच्या ओघात गायब होण्याची शक्यता कमी होते. ‘विटाळ’ आणि ‘विकच्छ’ हा अनुप्रासही मुद्दाम टाकला होता. ‘ऐसा’ हा शब्द दोनदा आला तो मात्र हेतुपुरस्सर नव्हे, तर जास्त चांगलं पद्य सुचलं नाही म्हणून.’

‘माझाही हाच गोंधळ झाला आणि मलाही असाच काहीतरी निश्चित निर्णय घ्यावा लागला,’ मोहनदासकाका म्हणाला. ‘पण मी ठरवलं की ‘सकच्छ’ म्हणजे ‘हो’, आणि ‘विकच्छ’ म्हणजे

'नाही'. माझा निर्णय शकुनीच्या उलट पडला हे मला आत्ता कळतं आहे.'

'अहो, निर्णय-निर्णय म्हणजे असा काय?!' चकोरकाका काहीशा कडवट सुरात उद्गारला. 'दोहोंपैकी कुठलातरी एक शब्द निवडायचा इतका फालतू निर्णय ना? तो फार सोपा आहे. पण मनोमन नाणेफेक किती अवघड असते हे करून बघितल्याखेरीज कळणार नाही.'

त्या रात्री तिन्ही काका अथक मराठी बोलत राहिले. सराव नसल्यामुळे कित्येक शब्द आणि कित्येक वाक्प्रचार त्यांनी चुकीच्या अर्थाने वापरले.

**

संदर्भ

(1) George Boolos, 'The hardest logic puzzle ever', *The Harvard Review of Philosophy*, vol. 6, pp. 62–65, 1996.

(2) Brian Rabern and Landon Rabern, 'A simple solution to the hardest logic puzzle ever', *Analysis*, vol. 68, no. 2, pp. 105–112, 2008.

***

चित्रश्रेय: मानसी

सर्वाक्षरी

इंग्रजीमधील (किंवा वास्तविक रोमन लिपीतील) pangram ही कल्पना (जे टंकलेखन शिकले आहेत अशा) वाचकांना अपरिचित नसावी. ज्या वाक्यात a पासून z पर्यंत प्रत्येक अक्षर एकदातरी येतं त्याला pangram असं म्हणतात. उदाहरणार्थ:

The quick brown fox jumps over the lazy dog.

वरील कल्पनेचं एक देवनागरी रूपांतर इथे देत आहे. देवनागरीची रचना रोमन लिपीपेक्षा जास्त गुंतागुंतीची असल्यामुळे हे रूपांतर करणं तितकंसं सरळसोट नाही.

खालील एकूण ४८ 'घटक' लक्षात घ्या:

अ आ इ ई उ ऊ ऋ ए ऐ ओ औ   विसर्गचिह्न (:)
क् ख् ग् घ् ङ
च् छ् ज् झ् ञ्
ट् ठ् ड् ढ् ण्
त् थ् द् ध् न्
प् फ् ब् भ् म्
य् र् ल् व् श् ष् स् ह् ळ् क्ष् ज्ञ्

उदाहरणार्थ, 'संग्राम' या शब्दात 'स्,ङ,ग्,र्,म्,अ,आ' हे घटक आलेले आहेत. 'अ' हा घटक दोनदा मोजण्याची गरज नाही. त्याचप्रमाणे 'व्यंजन' या शब्दात 'व्,य्,ञ्,ज्,न्,अ' हे घटक आलेले आहेत.
(टीप: 'क्ष्' हे वेगळं व्यंजन नाही इत्यादि शंका काढणे शक्य आहे, तरीही ते इथे वेगळं मानलेलं आहे. वाचकांनी हा खेळाचा नियम म्हणून स्वीकारावा, अशी लेखकाची भूमिका आहे.)

एवढी पूर्वतयारी झाल्यानंतर **'सर्वाक्षरी'** या वाक्यप्रकाराची व्याख्या अशी:

१. संपूर्ण वाक्यात मिळून प्रत्येक घटक एकदातरी आला पाहिजे.

२. वाक्य (डावीकडून उजवीकडे) वाचताना प्रत्येक शब्दात एकतरी घटक नव्याने आला पाहिजे.

उदाहरणार्थ ही सर्वाक्षरी पहा:

▪ हीच ती निष्ठुर हृदयाची राज्ञी की जिच्या आढ्यतेपायी असंख्य गलबते बुडाली, युरोपापासून आफ्रिकेपर्यंत युद्धांच्या नौबती झडल्या, शतशः साम्राज्ये दुभंगली, आणि रक्तलांछित पटांगणांत बुभुक्षित कावळ्यांनी थैमान घातले.

अट क्रमांक (१) पूर्ण झालेली आहे, हे पडताळून पाहणं सोपं आहे. अट क्र. (२) चा अर्थ असा: 'बुडाली' या शब्दात 'ड्' हा घटक नव्याने आला आहे, म्हणजे त्याच्या आधीच्या एकाही शब्दात 'ड्' नाही. त्याचप्रमाणे 'घातले' या शब्दाआधी कुठेही 'घ्' नाही. अट क्र. (२) चा हेतू वाक्यात फापटपसारा असू नये असा आहे. उदाहरणार्थ, जर कोण्या उत्साही माणसाने 'युद्धा' आधी 'घनघोर' हा शब्द घालण्याचा प्रयत्न केला, तर 'घातले' या शब्दात एकही नवीन घटक राहणार नाही आणि त्या वाक्याला सर्वाक्षरी म्हणता येणार नाही.

वरील नमुना, अधिक खालची आठ वाक्ये मिळून एकूण नऊ सर्वाक्षरी होतात. यांपैकी एकेका वाक्यात नवरसांपैकी एकेका रसाचा प्रत्यय यावा अशी अपेक्षा आहे.

▪ औषध समजून घृत भक्षण करणाऱ्या तज्ज्ञाने आपल्या वाङ्निश्चयात झांजा बडवून लोळावे, अशी पैठणीला फडक्याप्रमाणे कःपदार्थ लेखणाऱ्या ढालगज मुलीची खुळचट इच्छा आहे.

▪ मातकट छटेच्या झिंज्या असल्याने स्वतःला विशेष समजणाऱ्या कोल्ह्याने, ऋतुस्नात अवस्थेतल्या धनगराच्या पें गणाऱ्या कुत्रीला मौजेखातर कठड्यावरून बिनबोभाट ढकलल्याची दुर्दैवी घटना खलिफाला सूक्ष्मज्ञानाने कळली.

▪ घराण्याच्या दांभिक प्रथा झुगारणाऱ्या त्या स्वच्छंदी मुलीने यःकश्चित दीड लक्ष मोहरांसाठी ज्ञातिसंस्थेतील पंचांशी अब्रूचा अमंगळ सौदा करण्याऐवजी पेढ्यातून धोत्र्याच्या फुलाचे विष खाऊन मृत्यू कवटाळला.

▪ घटकंचुकीच्या डावात जिंकलेल्या छेलबटाऊ नवोढेच्या स्तनद्वयांवर क्रमशः थरथरता दृष्टिक्षेप फेकताच लैंगिक खेळामध्ये अनभिज्ञ असणाऱ्या सहचराचे पौरुष ताठर झाले.

▪ लिनीच्या मैदानावर, संज्ञा बधीर करणाऱ्या तोफांच्या भडीमारात, ठेंगण्या मूर्तीच्या पण अतृप्त

राज्याकांक्षेने पछाडलेल्या विजिगीषू सम्राटाच्या फौजेने बुखरच्या प्रायश: थकलेल्या घोडदळावर झंझावाती हल्ला चढवला.

▪ गोष्ट झाली अशी की, ऐनवेळी दिपोटींच्या धाकाने अंग थरथरून छोटूचा पाठ 'राम: रामौ' पुढे हलेना, आणि गुरुजींच्या भृकुटिकटाक्षासरशी तो पडत्या फळाची आज्ञा घेऊन खाली बसला.

▪ अठ्ठ्याहत्तर पावसाळे पाहिलेल्या, जीवनाच्या सायंकाळी 'नष्टो मोह: स्मृतिर्लब्धा' अशा निरपेक्ष भावनेने ऐहिक सुखांना तुच्छ मानणाऱ्या, चाफळच्या पुण्यमूर्ती गजाननशास्त्रींना आषाढ शुद्ध पंचमीच्या तिथीस उत्तररात्रौ वडिलोपार्जित घरी देवाज्ञा झाली.

▪ राक्षसाने प्रात:काळी उठून भंग्याच्या थुंकीने आंघोळ केली, आणि बैलाच्या कुजलेल्या यकृताचा झुणका, मधाच्या करंज्या व गणितज्ञाचे खललेले आंत्रपुच्छ अशा पौष्टिक न्याहारीचा फन्ना उडवून ढेकर दिला.

✠ ✠

अक्षरांचे संख्याशास्त्र आणि मराठीची तदानुषंगिक थट्टा

इंग्रजी लिखाणामध्ये e ह्या अक्षराचा वापर सर्वात जास्त होतो, हा शोध इतिहासात अनेकदा लागलेला आहे. आर्थर कॉनन डॉईलच्या 'The Adventure of the Dancing Men' या गोष्टीतून मला तो ठाऊक झाला. शिकागोमधल्या एक गुन्हेगारी टोळीच्या सदस्यांनी आपापसांत वापरण्यासाठी एक सांकेतिक लिपी तयार केलेली होती. वेगवेगळ्या अक्षरांसाठी वेगवेगळ्या आविर्भावांत नाचणाऱ्या माणसांची चित्रं, असा तक्ता तयार करून ती बनवलेली होती. उदाहरणार्थ, e ह्या अक्षरासाठी असा माणूस:



किंवा r साठी असा:



गोष्टीची नायिका एल्सी पॅट्रिक अमेरिकेतल्या तिच्या गतायुष्यात ह्या टोळीशी संबंधित होती, पण ते आता मागे सोडून देऊन इंग्लंडला येऊन ती लग्न करून राहिलेली होती. याच टोळीतल्या एब स्लेनी नावाच्या तिच्या वैफल्यग्रस्त प्रियकराला हे आवडलं नव्हतं. तिच्या मागोमाग तो इंग्लंडला आला, आणि ह्या लिपीतून तिला चिठ्ठ्या पाठवू लागला. एल्सीच्या नवऱ्याला हा प्रकार गूढाचा आणि धोक्याचा वाटल्यामुळे त्याने शेरलॉक्स होम्सची मदत घेतली. चिठ्ठ्यांचा अभ्यास करून होम्सने तर्क असा केला की त्यामध्ये जास्तीतजास्त वेळा येणारं चिन्ह e साठी असावं. एक अक्षर सापडल्यानंतर त्याच्या आधारे दुसरं, असं करत त्याने बाकीची चिन्हं शोधून काढली.

दरम्यान एके रात्री स्लेनी आणि एल्सीचा नवरा यांच्यात बाचाबाची होऊन गोळीबार झाला, नवरा ठार झाला आणि मध्ये सापडलेल्या एल्सीला मोठी जखम झाली. स्लेनी पळाला. होम्स घटनास्थळी गेला, त्याच लिपीमध्ये चिठ्ठी पाठवून त्याने स्लेनीला बोलावून घेतलं आणि रीतसर अटक केली. आपल्या टोळीबाहेरच्या कुणालाही ही लिपी माहित नसणार अशी खात्री असल्यामुळे त्याला संशय आला नव्हता. गोष्ट लक्षात राहण्यासारखी आहे. होम्सचा सुरवातीचा तर्क फसू नये म्हणून नायिकेचं नाव डॉईलने विचारपूर्वक Elsie असं ठेवलेलं आहे. ते Amanda किंवा Ursula ठेवणं हा खोडसाळपणा झाला असता.

❈

मराठी लिखाणात मात्र सर्वांत जास्त वेळा येणारं अक्षर कोणतं हे मला ठाऊक नव्हतं, तेव्हा स्टॅटिस्टिकल अनॅलिसिस करून ते शोधून काढण्याचा जो प्रयत्न मी केला त्याचा हा वृत्तान्त आहे.

इंटरनेटवरून मी मराठी लिखाणाची एकूण साठ सँपल्स गोळा केली. यामध्ये ऐसी अक्षरे, उपक्रम, मिसळपाव अशा साईट्सवरचे वेगवेगळ्या विषयांवरचे लेख आहेत, याशिवाय काही लेख ब्लॉग्सवरून उचललेले आहेत, तर काही वर्तमानपत्रांतली संपादकीयं आहेत (सकाळ, लोकसत्ता, दिव्य मराठी इत्यादि ठिकाणची). ही सँपल्स गोळा करताना काही पथ्यं मी पाळली: एका लेखकाचे दोनपेक्षा जास्त लेख घ्यायचे नाहीत, स्वतःचा एकही लेख घ्यायचा नाही, आणि पाचशे शब्दांपेक्षा लहान सँपल निवडायचं नाही. (तुलनेसाठी सांगायचं तर लोकसत्तेतलं संपादकीय अंदाजे नऊशे शब्दांचं असतं.) प्रत्येक लेखातले शब्द वेगळे करून, शब्दांतली अक्षरं वेगळी करून, क-ख-ग-घ पासून श-ष-स-ह-ळ पर्यंत कोणतं व्यंजन किती वेळा येतं, आणि कोणता स्वर किती वेळा येतो इत्यादीची मोजदाद करण्यासाठी मी एक कंप्यूटर प्रोग्रॅम लिहिला. (युनिकोड म्हणजे काय हे माहित असणाऱ्यांना हा प्रोग्रॅम कसा काम करतो याची सहज कल्पना करता येईल, पण इथे तो तपशील महत्त्वाचा नाही.)

डेटा मिळाल्यानंतर त्यातून स्पष्ट निष्कर्ष निघाला तो असा की मराठी लिखाणात 'त' हे व्यंजन सर्वांत जास्त प्रचलित आहे. दर शंभर अक्षरांमागे ते सरासरी अकरा वेळा येतं, इतकंच नव्हे तर कुठल्याही प्रकारचं लिखाण असलं तरी हे प्रमाण फारसं इकडेतिकडे होत नाही. म्हणजे समजा एका लेखामध्ये एकूण **अ** इतकी अक्षरं आहेत, आणि त्यामध्ये **त** इतक्या वेळा 'त' येतो. जर **त/अ** हे गुणोत्तर काढलं तर ते बहुतेक वेळा अकरा शतांशाच्या आसपास घोटाळतं. उदाहरणार्थ, सँपलमधले हे दोन लेख पाहा:

१. तीन म्हाताऱ्या, लेखिका: शहराजाद. (ऐसी अक्षरे दिवाळी अंक, २०१३)

२. बाळूगुप्ते, लेखक: राजेश घासकडवी. (ऐसी अक्षरे दिवाळी अंक, २०१२)

पहिल्या लेखामध्ये एकूण ५६६९ अक्षरं आहेत आणि ६१९ वेळा 'त' येतो, म्हणजे हे गुणोत्तर ६१९/५६६९ = १०.९१% इतकं आहे. दुसऱ्या लेखासाठी ते ११३९/१००६१=११.३२% इतकं आहे. याचा अर्थ असा की दोन्ही लेखांची प्रकृती वेगवेगळी असूनही आणि दर्जात तफावत असूनही ही गुणोत्तरं एकमेकांच्या जवळ आहेत.

अर्थात लिखाणाचा फार छोटा तुकडा घेतला (उदा. हायकू किंवा भिंतीवरची जाहिरात वगैरे) तर हा

अकरा टक्क्यांचा अंदाज चुकेल, पण बऱ्यापैकी मोठा तुकडा असेल तर तो बव्हंशी बरोबर येतो. एक मार्गदर्शनात्मक निष्कर्ष या शोधातून निघतो तो असा की 'The Adventure of the Dancing Men' चं मराठीकरण करायचं झाल्यास नायिकेचं नाव 'तिलोत्तमा' ठेवता येईल.

'त' ह्या व्यंजनामागोमाग 'र-य-क-ल-स' या व्यंजनांचा क्रम लागतो. त्यांची अंदाजी प्रमाणं अनुक्रमे ९%, ८%, ७%, ६%, ५% अशी आहेत, म्हणजेच उदाहरणार्थ दर शंभर अक्षरांमागे आठ वेळा 'य' येतो. इथे थोडा फरक आहे तो असा: सर्वसाधारणपणे कुठलाही मराठी लेख घेतला तर बहुतेक वेळा 'त' जिंकतो. तुमच्या डोळ्यांसमोरचा लेख याला अपवाद नाही. (माझ्या साठ सॅंपल्सपैकी ज्यांत 'त' पहिला आला नाही अशी फक्त सोळा सॅंपल्स निघाली, आणि तिथेदेखील तो दुसरातिसरा आलाच.) पण त्याच्या मागून येणाऱ्या व्यंजनांचा क्रम इतका काटेकोर नाही. म्हणजे 'र' सर्वसाधारणपणे 'य' च्या पुढे असतो खरा, पण हा क्रम कित्येकदा उलटा होतो. परीक्षेचा निकाल बघून आलेल्या आपल्या मित्रांना सी. डी. देशमुखांनी (की रॅंग्लर परांजप्यांनी?) विचारलेला 'दुसरं कोण आलं' हा सुप्रसिद्ध प्रश्न 'त' विचारू शकेल.

सरसकट सगळ्या व्यंजनांचा हिशेब काढला तर

त र य क ल स व ह च न

ही दहा व्यंजनं मिळून लिखाणातला जवळजवळ सत्तर टक्के भाग खातात. विषमता खूप आहे.

व्यंजनांचा त्यांच्या वर्गांनुसार हिशेब केला (उदाहरणार्थ, 'क'-वर्ग म्हणजे 'क-ख-ग-घ-ङ') तरीसुद्धा ही विभागणी उंचसखल आहे असं दिसतं:

'क'-वर्ग: १२% 'च'-वर्ग: ९%, 'ट'-वर्ग: ८%, 'त'-वर्ग: २२%, 'प'-वर्ग: १३%

उरलेले ३६% 'य-र-ल-व-श-ष-स-ह-ळ' मधून येतात.

❊

याच धर्तीवर स्वरांचाही हिशेब करता येतो. सर्वांत जास्त वेळा येणारा स्वर 'अ' असावा याचं विशेष आश्चर्य वाटू नये. एकूण ४२% टक्के अक्षरांत तो येतो. त्याच्या खालोखाल 'आ' हा स्वर २७% अक्षरांत

येतो. त्यानंतर इ-ई मिळून ११% वेळा येतात. इथपर्यंतचा हिशेब ८०% झाला; उरलेली २०% अक्षरं उ-ऊ-ए-ऐ इत्यादि बाकीच्या स्वरांत वाटली जातात.

अक्षरांच्या एकूण संख्येमधलं 'त' चं प्रमाण ११% पासून फारसं चळत नाही असा जो दावा मी मघाशी केला, तोच वर दिलेल्या इतर व्यंजनांसाठी आणि स्वरांसाठी पुष्कळसा खरा आहे. उदाहरणार्थ, शहराजाद यांच्या लेखामध्ये 'आ' हा स्वर २८.१०% अक्षरांत येतो, तर घासकडवींच्या लेखामध्ये तो २७.०६% अक्षरांत येतो, म्हणजे मोठा फरक नाही. सर्वसाधारण नियम असा की एखादा स्वर किंवा एखादं व्यंजन खूपदा येत असेल तर त्याचं प्रमाण बऱ्यापैकी स्थिर असतं, पण तुरळकपणे येणाऱ्यांचं प्रमाण चांगलंच वरखाली होऊ शकतं. उदाहरणार्थ, 'आ' किती वेळा येईल याबद्दलचा वर दिलेला अंदाज भरवशाचा असतो, पण 'औ' बद्दल तसा तो देता येत नाही.

जोडाक्षरांचा उल्लेख करून हा विषय संपवतो. एकूण अक्षरांपैकी अंदाजे बारा टक्के अक्षरं ही जोडाक्षरं असतात. अर्थात इथे व्याख्येवरून वाद होऊ शकतो; उदाहरणार्थ, 'पंचवीस' या शब्दातलं 'ञ + च' हे जोडाक्षर मानलं तर हे प्रमाण साडेपंधरा टक्क्यापर्यंत चढतं. एकच एक जोडाक्षर नेहमी इतरांपेक्षा जास्त वेळा येतं अशी परिस्थिती दिसत नाही, पण बहुतकरून

च्य, त्य, त्र, प्र, ल्य

ही पाच खूपदा येतात; आणि त्यातसुद्धा पहिली दोन जास्त वेळा येतात. 'प्र' आला तर शब्दाच्या सुरवातीला पुष्कळदा येतो.

सर्वसाधारण चित्र उमटतं ते असं की मोजकीच आठदहा व्यंजनं आणि दोनतीन स्वर नेमून दिलेल्या प्रमाणात येणं आणि उरलेल्यांना तुलनेने फार कमी वाव राहणं हा मराठीचा (किंवा निदान लिखित मराठीचा) स्थायीभाव आहे. एकटादुकटा लेखक याबाबतीत फारसं काही करू शकत नाही, किंबहुना आपल्या लिखाणाखाली असा काही रचनाबंध आहे हे त्याला जाणवतसुद्धा नाही. रक्तातल्या लाल पेशींचं आणि पांढऱ्या पेशींचं परस्परप्रमाण तुमच्या आणि माझ्या शरीरात बहुतेक सारखंच असावं. पण तुम्ही आणि मी संगनमत करून हे प्रमाण ठरवलेलं नसतं. आणि ते सारखं असणं हे तुमच्याविषयी माझ्या मनात आत्मीयता निर्माण व्हायला फारसं सबळ कारणही नसतं.

❋

मराठीत 'अ' आणि 'आ' हे दोन स्वर पुन्हापुन्हा येतात आणि त्यातदेखील 'अ' पुढे असतो, याची मला हा सगळा खटाटोप करण्याआधी पूर्वकल्पना होती. काही वर्षांपूर्वी असा प्रयोग मी करून पाहिला होता की 'अ' हा स्वर न वापरता गोष्ट लिहावी. 'एका निनावी प्राण्याचा मृत्यू' ही त्यावेळी लिहिलेली गोष्ट.

हे झाल्यानंतरची साहजिक पुढची पायरी म्हणजे 'आ' हा स्वर टाळून काही लिहून पाहणं. भालचंद्र नेमाड्यांना लघुकथा आवडत नाहीत हे सर्वज्ञात आहे. त्यांनी 'टीकास्वयंवर' मध्ये कुठेतरी म्हटल्याप्रमाणे, 'ऊन मी म्हणत होतं' अशी काहीतरी सुरुवात करून मासिकं चालवण्यासाठी लिहिला जाणारा तो प्रकार आहे. अशा प्रकारे पहिलं वाक्य आयतं मिळाल्यामुळे माझा हुरूप वाढला, आणि '**घरोघरची मंडळी भरपेट जेवून अंमळ कलंडली होती' असं पुढचं वाक्यही तयार झालं**, पण तरीदेखील ही कथा काही केल्या मला पुढे रेटता येईना. विशेषकरून 'आहे, नाही, आणि' हे शब्द वर्ज्य असल्यामुळे हालचाल करणं फार अवघड होऊन बसलं. सरतेशेवटी ही कथा जरी मला जमली नाही, तरीदेखील 'समष्टी व अभिव्यक्ती' या नावाने एक लहानसा वैचारिक लेख लिहिता आला. 'अ' पेक्षा 'आ' कमी वेळा येतो याचा अर्थ असा नव्हे की 'अ' पेक्षा 'आ' टाळणं जास्त सोपं आहे.

❋

श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या 'सुदाम्याचे पोहे' मधला एक प्रसंग असा की एका मराठी माणसाला कर्नाटकात जाण्याचा प्रसंग आला. त्याला कानडी येत नसल्यामुळे एका मडक्यात तो खडे भरून घेऊन गेला आणि जिथे जिथे बोलण्याचा प्रसंग येईल तिथे तिथे त्याने ते हलवून वाजवून दाखवलं. सगळयांना सगळं समजलं आणि त्याचं कुठे काही अडलं नाही.

एक अनुभव नेहमी येतो: मुळीच न समजणारी भाषा जर कानावर पडली तर ती कोणती आहे हे अनेकदा ओळखता येतं. स्वीडिश, फारसी आणि तामिळ कानाला फार वेगवेगळ्या लागतात. प्रत्येक भाषेत पुन्हापुन्हा येणारे काही विशिष्ट आवाज असतात आणि एखादा माणूस अपुऱ्या प्रकाशात त्याच्या चालीवरून ओळखता यावा तशी त्या आवाजांच्या आधारे भाषा ओळखता येते. पण याबाबतीत एक खेदाची गोष्ट अशी की भाषा जर समजत असेल तर तिचा अर्थ ऐकू आल्यामुळे आवाज ऐकू येईनासा होतो. यामुळे उदाहरणार्थ इटालियन भाषा इटालियन माणसं सोडून इतरांच्या कानाला गोड लागते.

वर जे स्टॅटिस्टिक्स शोधून काढलेलं आहे त्याचा आधार घेऊन मराठीचे आवाज तयार करण्याचा एक

प्रयत्न मी करून पाहिला. यासाठी मी लिहिलेला कंप्यूटर प्रोग्रॅम काही नियमांना धरून रँडम नंबर जनरेटर वापरून शब्द तयार करतो. हे शब्द निरर्थक असतात, पण मराठीचं स्टॅटिस्टिक्स पाळणारे असतात. यासाठी मी बसवलेले नियम त्रोटकपणे खाली देतो आहे; त्यांच्यामागचा उद्देश असा की उंच टोपी घालून, तोंडात चिरूट ठेवून, येसफेस आवाज काढून जशी सुधारकांची थट्टा करत असत तशी मराठीत पुन्हापुन्हा येणारे आवाज काढून तिची थट्टा करायची.

१. फक्त त-र-य-क-ल-स-व-ह-च-न हीच दहा व्यंजनं वापरता येतील. रँडम नंबर जनरेटर फाशासारखा काम करतो. दहा बाजू असलेला फासा आहे आणि त्याच्या प्रत्येक बाजूवर एकेक व्यंजन लिहिलेलं आहेत अशी कल्पना करा. फासा टाकला की प्रत्येक वेळी दहापैकी कोणतंतरी एक व्यंजन निवडलं जाईल. पण फासा ओबडधोबड आहे आणि त्याच्या बाजू कमीजास्त आहेत असं समजा. यामुळे सगळ्या व्यंजनांना समान संधी नसेल. 'त' येण्याची शक्यता 'र' पेक्षा थोडी जास्त असेल. अर्थात या शक्यतांचं परस्परप्रमाण स्टॅटिस्टिक्सने शोधून काढल्याप्रमाणे बसवलेलं आहे.

२. या दहा व्यंजनांव्यतिरिक्त च्य-त्य-त्र-प्र-ल्य ही जोडाक्षरं चालतील; इतर कुठलीही नाहीत.

३. फक्त अ-आ-इ-ई-उ-ऊ-ए हेच स्वर वापरता येतील, त्यातदेखील शब्दाच्या सुरवातीला 'ई' किंवा शेवटी 'इ' येऊ शकणार नाही. व्यंजन + स्वर मिळून अक्षर होत असल्यामुळे स्वरदेखील वरच्यासारखा फासा टाकून निवडला जाईल.

४. स्वत:चं मराठीचं ज्ञान कुठेही वापरायचं नाही. उदाहरणार्थ, 'ला, चे' वगैरे प्रत्यय उठसूठ कुठल्याही शब्दाला लावणं हा मराठीची चेष्टा करण्याचा एक स्वस्त मार्ग आहे. तसं करायचं नाही.

हे नियम वापरून माझ्या लॅपटॉपवर मी एक परिच्छेद तयार करून पाहिला; तो खाली दिलेला आहे. मोठ्याने म्हणून पाहायला हरकत नाही, पण यामध्ये अडचण अशी की शब्द निरर्थक असल्यामुळे वाचताना कुठे आणि किती थांबायचं हे ठरवणं अवघड जातं.

तातेय अरेविनच्यी आत्ययी कायारा यात्रले अलाहरकत प्राल हाच लप्रसचा न वेक कावताली याचीचा तिया सातला अतहचे नयीराय अत्य यत रचा अरलनी हसती कयनना तकनाते रायायव प्रिरार ल काचे सर ना लेतायावाते हनवय हचा रायवरेले आरचे केत्र प्रहे अयाहित्यत कावालेची कारलीह साय करेया व वयाचीयाव कानाकच्य नानली काच्य आवा हचत्यी किती हकिय कती आतक सुते आर तप्रनेसना प्रव सतेत सुता नातारातची यिरनना रिलेता अनलहची कुनेसेरीताच अतल्य रके प्रेनान किनके तेप्रल तच्ये सन

नात्यायय हाल्याहे कर सेसताला ताल सेयता हाच अले असहत आतरनाता अप्राचका यावारी साराली

प्रयोग यशस्वी झाला आहे का याचा निवाडा वाचणाऱ्यांवर सोपवतो असं मी प्रघातानुसार म्हणेनसुद्धा, पण खरी गोष्ट अशी की आपल्या सर्वांनाच मराठी येत असल्यामुळे या कामासाठी आपण तितकेसे लायक नाही. सुधारकाची नक्कल चांगली वठली आहे असा अभिप्राय आगरकरांनी कधी दिला नसणार.

❈

हा विषय इथून पुढे कुठे नेता येईल? काही जुजबी कल्पना मांडतो.

१. इंग्रजीतलं सर्वांत प्रचलित अक्षर e हे जरी असलं तरी व्यंजन t हे आहे. इंग्रजीत t आणि मराठीत 'त' हा योगायोग आहे की दोन्ही भाषांचं मूळ एकच असल्याचा तो अवशिष्ट परिणाम आहे? इतर इंडो-युरोपियन भाषांमध्ये याबाबतीत साधर्म्य आहे का? हे सगळं शोधून काढता येईल.

२. अर्वाचीन लिखित मराठीचा एक ठराविक 'स्टॅटिस्टिकल प्रोफाईल' आहे असं आपण पाहिलं. पण चक्रधरकालीन किंवा तुकारामकालीन मराठीचा प्रोफाईल तोच असेल अशी मुळीच खात्री नाही. उदाहरणार्थ, तुकारामाच्या वेळी 'ळ' खूप वापरला जात असे ('तीळ जाळिले तांदूळ, काम क्रोध तैसेचि खळ...') पण मोरोपंत येईपर्यंत तो हळूहळू मागे पडत गेला, हे संभाव्य जरी नसलं तरी अशक्यही नाही. तेव्हा हा प्रोफाईल काळानुसार बदलत गेला का (की मराठीच्या इतिहासात तो कधीच फारसा बदललेला नाही) याची शहानिशा करता येईल. अर्थात हाच अभ्यास याच्या काटकोनी दिशेनेही करता येईल. उदाहरणार्थ, बंगाली आणि गुजराती आपल्या कानांना फार वेगवेगळ्या लागतात, याचाच अर्थ त्यांचा प्रोफाईल वेगळा असला पाहिजे. हा फरक कशात आहे याचा नुसता ऐकून अंदाज न करता डेटा मिळवून आणखी खोलात शिरता येईल.

३. नेहमी येणारा एक मुद्दा इथेही येतो. माझी सगळी सँपल्स ही इंटरनेटवरची असल्यामुळे बहुतकरून प्रमाण लिखित भाषेची आहेत. मराठीच्या इतर बोलीभाषांचे प्रोफाईल्स यापेक्षा वेगळे असणं शक्य आहे, किंवा खरंतर असावेतच. कोणीतरी ते शोधून काढायला हवेत.

४. वेगवेगळ्या व्यंजनांचा वापर खूप कमीजास्त असणं (म्हणजे 'त','र' झिजून गुळगुळीत झालेले आणि 'ग','ख' अजून लखलखीत, अशी परिस्थिती असणं) हा बुचकळ्यात टाकणारा प्रकार आहे. यामागच्या

एका संभाव्य कारणाचा अंदाज थोडाफार करता येतो. उदाहरणार्थ, 'च' पेक्षा 'छ' म्हणायला जास्त कष्ट पडतात हे उघड आहे. तेव्हा चौदाव्या शतकातल्या कुठल्यातरी आळशी न्हाव्याने आपल्याकडे आलेल्या बामणाची छंपी करण्याऐवजी चंपी केली असेल, आणि बामणही भाषिक शुद्धतेचा फारसा भोक्ता नसल्यामुळे त्याने निमूटपणे मान तुकवली असेल हे शक्य आहे. असेच सरसकट बदल हजारो लोकांनी केल्यामुळे घाऊक प्रमाणात अनेक 'छ' चे 'च' आणि 'ख' चे 'क' इत्यादि झाले असावेत. पण इतकं कारण पुरेसं वाटत नाही. उदाहरणार्थ, 'त' वर्गाचा वापर 'च' वर्गाच्या अडीचपट असावा याची संगती यातून लागत नाही. ती शोधून काढायला हवी, पण 'माणसाच्या स्वरयंत्राची रचनाच तशी आहे' यापेक्षा नेमकं कारण देणं कदाचित इथे शक्यही नसेल.

करण्यासारखं पुष्कळ आहे.

❊ ❊

मेदिनी

व्रण हा रक्तवर्णी ज्या दक्षिणस्तनी
कृष्णमिलिंदकेंद्रबिंदू तिथे
विलसलसतो धवलासनी

पुष्कळे पुष्टरमणी चिंबनितंबवलये
अचपळमनमोहन गहनगंधप्रिये
अंगांगदंगसंभोगिनी मेदिनी

(१४ मार्च, अर्थात π-दिनाप्रीत्यर्थ)

❊

पीस

जेव्हा उंच मुजोर इमारती मावळत्या सूर्याबरोबर करतात कट
तेव्हा लाल कौलांच्या गालिचावर पसरतं ऊनसावलीचं कोड
पुळणीला डिवचण्यासाठी लोंबावते माडाची धीटस बट
आणि आठवणी येतात लांबून, काही कडू काही गोड

सट्ट्यात जिंकलो एकदा चार चव्वल, तेव्हा भांग प्यालो फार
अगदी बहिणाबाई सीक्वेन्स– डोकेदुखी आधी आणि नशा मग
स्वप्न पडलं फ्रॉइडियन, की मधमाशीवर झालोय स्वार
पंख तिचे टोचटोचून, ढुंगणाला लागलीय रग

'मूकसंकेत' नाटकात काम केलं, तो फलाणा इसवी सन
स्टेजवर मला छळणारी दातात अडकलेली पेरूची बी
प्रयोग फसलेला; थेटरामागच्या तळ्याकाठचं घनदाट वन
पुठ्ठ्याच्या उंच पेल्यातून दारू ढोसणारा निर्विकार मी

आठवणींच्या पिसांचे पोत अनेक, पण बोट कापणारं त्यातलं एक
दिवेलागणीला निघून गेलेली, माझी एकुलती लाडकी लेक

✣ ✣

Peace

The labyrinthine woods around me, have been cut
To mimic the conspiratorial erasure of a secret code
I dismount the horse with a tingling butt
Smoothen my locks, and caress the goad

No trace of my daughter, at least thus far
A sweet little sip, I steal from the mug
With one tremulous arm, read through 'Le Soir'
And a weary hour later, I stretch on the rug

The leucodermal sky betrays a listless sun
As I see her sprawled, stung dead by a bee
Much was promised, but Death has won
The deadly-night-rider has crushed me

I clutch my peace, like the unsprouted seed of a deadened ache
A year goes by, like the muffled whimper of a drying lake

✣ ✣

चवकुसाबाहेरगा

चवाज चलाम चल्मज चलादि चह्यामा चयनंमा चळक्याग चपटातखो चवकुसाबाहेरगा
चवापासूनचत चठपा चलंयझा चलाम चबकत्याठि चखाचंदु: चरपिरपि चऱ्हाणंगा
चळंतसा चलमुंडीखा चसपेन्शिलशि चसूनबीघा चल्डेप चहीतना चलाम चस्तीसप चक्केट
चरनका चच्यायलाति चमचेआ चमदेस चस्तरमा चच्चवर्नीयहु चडेतीनसा चक्केट
चनप चकोतचन चलाम चरालाम्हा चमचेतु चहे चमणीबा चबन्तल्य चनिआ चबन्ततु
चरनका चडलेलंस चरढो चनाऱ्यालाखा चईन्हा चडगो चगनारला चमचीतु चपरोटीतु
चकोचन चलाम चमचीतु चही चचमिडीगि चरवानवानीगि, चस्कृतीरक्षकसं चडव्यांनोभ
चरनका चमच्याआ चयुष्याचंआ चटकना चहीना चळनारक चमच्यातु चत्या चरतमुनीलाभ

चळंच्यासा च✘वर✘ चरलीमा चथला चनिआ चठलीगा चनचेऱ्ह्याचीबि चबईमुं
चठंकु चळमाटगु चवतंगा चका चहे चघनाराब चलोझा चबीमी चकए चगळामुं
चलाम चणावतोयखु चपस्टिकीलि चस्यानंहा चरबटलेलाब चरासफो चडरो
चथंजि चलतातचा चर्लज्जनि चदेसौ चह्याचमा चयाबहिणींचेआ चखठोकरो
चकतोफे चरचा चव्वलच चणिआ चकतवि चऊघे चहतोपा चमचलाऊका चमप्रे
चणिआ चहाळतन्या चहतोरा चत्रिकयां चभोगसं चरणारंक चझंचमा चवारशीबे चतप्रे
चत्रीच्यारा चर्तेतकि चरीतक चहतोरा चझ्यामा चझोट्यावां चवनांचाभा चल्गारए
चणिआ चपवूल चघतोब चया चरुक्षेत्रीकु चलाहलातको चझंमा चकलव्याचंए चकटेपणए

चज्यामा चपजाद्यास्नीबा चलेभ चकललंहा चसेलअ चवकुसाबाहेरगा चताड्यास्मृ चनूनंम
चणप चया चट्टकु चळोखीका चटकंतीमधेभ चलोयझा चमी चजआ चद्दपारह चझ्याचमा चनातूनम
चवातरीक चहाटेप चमोरासा चतोये चव्हलओ चदानावरचामै चबासाहेबांचाबा चतळापु
चव्हाते चच्यात्यां चश्वस्तआ चगडीद चहऱ्यातचे चलाम चसूदि चगतोला चझाचमा चनर्जन्मपु

❈

दोन शब्द

या लेखाचा विषय 'आत्मोल्लेखी' वाक्ये (self-referential sentences) असा आहे. डग्लस हॉफस्टॅटर (Douglas Hofstadter) च्या 'Metamagical Themas' या पुस्तकातल्या काही लेखांमुळे मला या विषयात रस निर्माण झाला. इथे आलेल्या काही कल्पना हॉफस्टॅटरच्या मूळ लेखांवर आधारित आहेत.

उदाहरणादाखल खालील वाक्ये पहा:

(१) या वाक्यात पाच शब्द आहेत.
(२) या वाक्यात बारा अक्षरे आहेत.
(३) हे वाक्य खोटे आहे.
(४) हे वाक्य इंग्रजीत आहे.

यांपैकी प्रत्येक वाक्यात स्वतःचाच उल्लेख येत असल्यामुळे त्यांना '**आत्मोल्लेखी**' वाक्ये म्हणू. याउलट
'भिंत पिवळी आहे' किंवा 'पुढच्या शनिवारी नियतीची लीला अगाध असेल' ही आत्मोल्लेखी वाक्ये नव्हेत.

क्रमांक (१),(२) ही वाक्ये अर्थात खरी आहेत, आणि क्र. (४) खोटं आहे. वाक्य क्र. (३) ला तर्कशास्त्रात 'एपिमेनिडीसचा विरोधाभास' (Epimenides paradox) असं म्हणतात, कारण ते खरं आहे की खोटं याचा सुसंगत निवाडा करता येत नाही. (वाचकांनी तसा प्रयत्न करून पहावा.) यामागची कथा अशी: ग्रीसमधील क्रीटी या बेटावर एपिमेनिडीस नावाचा एक तत्त्ववेत्ता रहात असे. एकदा तो म्हणाला की क्रीटीवर राहणारे लोक खोटारडे असतात.

❈

प्रत्येक वेळी हा 'आत्मोल्लेख' प्रत्यक्षच असला पाहिजे असं नाही. उदाहरणार्थ,

(५) साता तकारीच मंदारमाला, गुरू एक त्याच्याहि अंती वसे

यात ज्या वृत्ताची ओळख सांगितलेली आहे, त्याच वृत्तात ही ओळ रचलेली आहे. तेव्हा त्या अर्थाने हे वाक्य आत्मोल्लेखी आहे असं म्हणता येईल.

काही वेळा अप्रत्यक्ष आत्मोल्लेखामुळे विनोद निर्माण होऊ शकतो. एकदा मी अजय पोहनकरच्या गाण्याला गेलो होतो. त्याने जी चीज म्हटली तिचे बोल होते – 'तुमरे गुणन को कैसे गाऊ, रसना मूक भई'.

एकदा मुंबई लोकलमध्ये मला एक फिरता विक्रेता दिसला होता. तो जे पुस्तक विकत होता त्याचं नाव होतं – 'यह किताब खरीदना मना है'. मी त्याला किंमत विचारली नाही.

'अप्रत्यक्ष आत्मोल्लेख' याची काटेकोर व्याख्या करणं सोपं नाही, पण एक अगदी ढोबळ प्रयत्न करतो. लिखाण, मौखिक उच्चार, हावभाव इत्यादींना आपण 'आविष्कार' म्हणू. (उदाहरणार्थ, लिहिलेलं वाक्य, छापलेलं पान, मारलेली आरोळी, गाण्यातली तान हे सगळे आविष्कार झाले.) ह्या आविष्कारातून जे सांगितलं आहे त्याला त्याचा 'अर्थ' म्हणू. आता त्यामागच्या आविष्काराच्या स्रोताकडे किंवा रचनेकडे लक्ष वेधलं जावं असं जर काही ह्या अर्थामध्ये असेल, तर 'अप्रत्यक्ष आत्मोल्लेख' झाला असं मी म्हणेन. उदाहरणार्थ, 'माझी जीभ मुकी झालेली आहे' यातल्या अर्थामुळे हे वाक्य कुणीतरी **बोलतं** आहे याकडे आपलं लक्ष वेधलं जातं. काहींना या संकल्पनेसाठी 'आत्मोल्लेख' हा शब्द चपखल वाटणार नाही (मलाही तो तसा वाटत नाही); त्यांनी हवं तर दुसरा शब्द शोधून काढावा. आता आविष्कार आणि अर्थ हे एकमेकांपासून स्वच्छ वेगळे काढता येण्यासारखे नसतात ही गुंतागुंत आहेच, म्हणून तर हा प्रयत्न पुरेसा नव्हे. एकूण विषय पुष्कळ खोल आहे हे नि:संशय.

आणखी काही नमुने:

(६) आपण 'एपिमेनिडीसचा विरोधाभास' आहोत असा या वाक्याचा दावा आहे, पण तो खोटा आहे.

(७) .तंसअ लंगला वंचावा संअ रत तंसअ तषेभा सीरफा क्यवा हे

(८) अंगी आत्मोल्लेखाचा दोष असल्यामुळे जो अनुत्तरितच राहतो, असा प्रश्न कोणता?

(९) या वाक्यात तीन धातू मिसळले गेले आहेत.

(१०) या मराठी वाक्याचा आत्मोल्लेखी गुणधर्म नष्ट न करता त्याचं इंग्रजीत भाषांतर करा.

(११) धिस् सेन् टेन्स् हॅज् एट् सिल् लॅ बल्स्.

(१२) या वाक्याचा मुग्धा फातरफेकरशी काहीही संबंध नाही.

(१३) हे अशुभसूचक वाक्य इथून हलवलं पाहिजे.

(१४) માઝા મરાઠાચિ બોલુ કવતુકે

(१५) ਏਸੀ ਅਕ੍ਸ਼ਰੇ ਰਸਿਕੇ, ਮੇਲਵੀਨ.

(१६) हे वाक्य अर्धवट **กงเยต้** भाषेत लिहिल्यामुळे **เวน้อม** नाही, नाहीतर **เวนวอ้** असतं.

(१७)

शुद्धीपत्र

- या पानाचा मथळा 'शुद्धिपत्र' असा वाचावा.

❋

वाक्यं क्रमांक (१),(२) ही स्वतःच्या रचनेबद्दल तपशील पुरवणारी आहेत. अशा प्रकारच्या वाक्यांच्या अनेक तऱ्हा असू शकतात.

(१८) तुम्ही आता वाचताय ते वाक्य इतकं पाल्हाळिक आणि बेंगरूळपणे लिहिलेलं आहे, आणि मूळ मुद्यावर यायला त्याला इतका वेळ लागतो की त्यात नव्वद अक्षरं आहेत की आणखी किती

आहेत याची वाचकाला काहीही पर्वा रहात नाही.

(१९) या वाक्यात जर सव्वीस अक्षरं असती, तर ते सत्य ठरलं असतं. या वाक्यात जर अठ्ठावीस अक्षरं नसती, तर ते असत्य ठरलं असतं. या वाक्यात छत्तीस अक्षरं [redacted]सल्यामुळे, ते सत्य आहे की असत्य याचा निवाडा करता येत नाही.

(२०) या वाक्याच्या उत्तरार्धात तेरा अक्षरं आहेत व पूर्वार्धात सतरा अक्षरं आहेत.

(२१) या वाक्यात एकाक्षरी एक, द्वयक्षरी सात, त्रयक्षरी दोन, चतुराक्षरी चार आणि पंचाक्षरी एक शब्द आहेत.

❈

आता गणितात शिरू. समजा क्ष ही एक संख्या आहे. ती मराठीत उच्चारून देवनागरीत लिहिली तर जशी दिसेल तिला

लि(क्ष)

असं म्हणू; उदाहरणार्थ, लि(१५) = पंधरा. गणिती परिभाषेत लि(–) ला फलन म्हणतात.

आता आपल्याला असं एक आत्मोल्लेखी वाक्य बनवायचं आहे, की ज्याच्यात किती स्वर आहेत आणि किती व्यंजने आहेत याचा (खराखुरा) हिशोब तेच आपल्याला सांगेल. तर असा एक साचा तयार करू:

(*) या वाक्यात एकूण — स्वर आणि — व्यंजने आहेत.

हे वाक्य खरं ठरेल असं सांभाळून आपल्याला मोकळ्या जागा भरायच्या आहेत. यात पहिल्या मोकळ्या जागेची किंमत अ, आणि दुसरीची ब धरू, याचाच अर्थ

(**) या वाक्यात एकूण लि(अ) स्वर आणि लि(ब) व्यंजने आहेत.

असं वाक्य आपल्याला अपेक्षित आहे. समजा, क्ष हा एखादा आकडा घेतला तर लि(क्ष) मधे जितके स्वर असतील त्यांना स्व(क्ष) म्हणू, आणि व्यंजनांना व्य(क्ष) म्हणू. उदाहरणार्थ,

स्व(१५) = ३, (कारण 'अंअआ')   आणि   व्य(१५) = ४, (कारण 'प्,न्,ध्,र्').

पण स्व(२६) = २ आणि व्य(२६) = ४. कारण 'स + व्वीस्' हे दोन वाग्रेणू (syllables) होतात, आणि एका वाग्रेणूमध्ये एक स्वर असतो. तशीच 'स्' आणि 'व्' ही व्यंजने प्रत्येकी दोनदा येत असल्यामुळे एकूण चार मोजायची.

आता जर (मोकळ्या जागा हिशेबात न धरता) मोजदाद केली तर (*) मधे एकूण १३ स्वर आणि १८ व्यंजने सापडतात. तेव्हा जर (**) खरं व्हायचं असेल तर:

१३ + स्व(अ) + स्व(ब) = अ,   १८ + व्य(अ) + व्य(ब) = ब

ही दोन समीकरणं बरोबर यायला हवीत. इथे अ आणि ब कसे शोधून काढायचे असा प्रश्न आहे. प्रत्येक शब्दात एकतरी स्वर असायलाच हवा, त्यामुळे स्व(अ) आणि स्व(ब) ची किंमत प्रत्येकी कमीतकमी १ तरी असणारच, याचा अर्थ अ किमान १३ + १ + १ = १५ तरी असणारच. पण अ ची किंमत फार मोठी असणंही शक्य नाही. ती किती मोठी असू शकेल याचा अंदाज करू. स्व(अ) आणि स्व(ब) ची किंमत जास्तीतजास्त ४ असू शकेल असं समजायला हरकत नाही. (कारण ५ स्वर असलेले आकडे शंभराच्या खाली नाहीतच.) आणि तसं समजलं तर अ ची किंमत जास्तीत जास्त १३ + ४ + ४ = २१ असू शकेल.

आता १५ पासून २१ पर्यंत अ ची प्रत्येक किंमत दोन्ही समीकरणांत घालून बघू. उदाहरणार्थ, अ = १७ असेल तर स्व(अ) = ३, व्य(अ) = ३, आणि म्हणून

स्व(ब) = १,   २१ + व्य(ब) = ब.

याचा अर्थ असा की ब ही संख्या २१ पेक्षा मोठी हवी आणि एका वाग्रेणूमध्ये उच्चारता यायला

हवी. पण अशा दोन्ही शक्यता ताडून पाहिल्या (ब = ३० किंवा ६०) तर दुसरं समीकरण जमत नाही. याउलट समजा अ = १८ आणि ब = २३ असेल, तर

स्व(१८) = ३, स्व(२३) = २,   व्य(१८) = २, व्य(२३) = ३,

आणि हिरव्या समीकरणांत या किंमती बेचूक बसतात. अशा प्रकारे

(२२) या वाक्यात एकूण अठरा स्वर आणि तेवीस व्यंजने आहेत.

हे आपल्याला पाहिजे तसं वाक्य बनलं. असंच आणखी एखादं उत्तर आहे का? होही आणि नाहीही. समजा अ = १८, आणि ब = २५ घेतले. आता व्य(२५) = ५, याबाबतीत दुमत असू नये (कारण 'प्, ञ्, च्, व्, स्,'). पण स्व(२५) किती समजायचे? हे उच्चारावर अवलंबून आहे. जर तो 'पंच् + वीस्' असा केला तर २ होतात आणि हिरवी समीकरणं खरी ठरतात. जर 'पंचऽ वीस्' असा संस्कृतातल्यासारखा केला तर ३ होतात आणि त्यातलं पहिलं फसतं. गणिती विधानाचं खरंखोटेपण जिभेच्या संस्कारांवरून ठरावं, असं नेहमीच घडत नाही.

❈

प्रत्येक साच्यासाठी हे जमेलच असं नाही. उदाहरणार्थ,

या वाक्यामध्ये — स्वर, — व्यंजने आणि दहा शब्द आहेत.

असा साचा असेल तर त्याची समीकरणं

१७ + स्व(अ) + स्व(ब) = अ   २३ + व्य(अ) + व्य(ब) = ब.

अशी होतात. थोडा खटाटोप करून पाहिला तर या समीकरणांना उत्तर नसल्याचं लक्षात येतं.

❈

ढोबळमानाने प्रकार असा आहे: समजा आपण आत्मोल्लेखी वाक्याचा एक साचा तयार केला,

आणि त्यात म इतक्या मोकळ्या जागा आहेत. या जागांमध्ये

अ_१, अ_२, ..., अ_म

या संख्या भरायच्या आहेत असं ठरवलं तर आपल्याला या सगळ्या संख्यांना एकमेकांशी बांधणारा एक समीकरणसंग्रह मिळतो. (उदाहरणार्थ, हिरव्या संग्रहात दोन समीकरणं होती. तशी इथे एकूण म इतकी असतील.) या संग्रहाला उत्तर असेल किंवा नसेल, किंवा अनेक उत्तरं असू शकतील. परिस्थिती जशी असेल त्यानुसार आपल्याला तशा साच्यातलं आत्मोल्लेखी वाक्य मिळेल किंवा मिळणार नाही.

अशा समीकरणसंग्रहाला उत्तर आहे की नाही, किंवा असल्यास किती आहेत, हे शोधून काढण्याची काही नेमकी पद्धत नाही. (अर्थात सगळ्या शक्यता पडताळून बघणं ही एक आहे, पण फार कटकटीची आहे.) जिला अनुगतीकरण म्हणता येईल अशी एक पद्धत इथे वर्णन करून सांगतो. ही काहीवेळा उपयोगी पडते, पण नेहमी नाही. आता हा साचा पहा:

(&) या संपूर्ण वाक्यात एकूण — काने, — मात्रा, — उकार, — वेलांट्या, — अनुस्वार आणि — रफार आहेत.

आपण वरती लि(क्ष) वगैरे फलनांची व्याख्या केली, त्याच धर्तीवर

का(क्ष), मा(क्ष), उ(क्ष), वे(क्ष), अ(क्ष), र(क्ष)

यांचीही करता येईल. उदाहरणार्थ, अ(२५) = १ (कारण 'पंचवीस' मध्ये 'पं' एवढा एकच अनुस्वार आहे), मा(१२) = २ (कारण 'बारा' मध्ये २ मात्रा आहेत). जर मोकळ्या जागा वगळल्या तर (&) मध्ये १३ काने, ३ मात्रा, ३ उकार, १ वेलांटी, २ अनुस्वार आणि १ रफार आहेत. समजा

(क्ष_१,...., क्ष_६)

अशा कुठल्याही ६ संख्या घेतल्या तर

य_१ = का(क्ष_१) + ... + का(क्ष_६) + १३,
य_२ = मा(क्ष_१) + ... + मा(क्ष_६) + ३,

य_३ = उ(क्ष_१) + ... + उ(क्ष_६) + ३,

य_४ = वे(क्ष_१) + ... + वे(क्ष_६) + १,

य_५ = अ(क्ष_१) + ... + अ(क्ष_६) + २,

य_६ = र(क्ष_१) + ... + र(क्ष_६) + १,

अशा ६ नव्या संख्या आपण तयार करू शकतो. इथे (य_१,...,य_६) या षटकाला (क्ष_१,...,क्ष_६) चा अनुगत म्हणू. उदाहरणार्थ, (१,२,३,२,५,१) चा अनुगत (१६,५,३,२,२,१) असा आहे. आता समजा कुठल्यातरी एका षटकापासून सुरुवात करून आपण त्याचा अनुगत, मग अनुगताचा अनुगत

(क्ष_१,...,क्ष_६) ⇒ (य_१,...,य_६) ⇒ (ज्ञ_१,...,ज्ञ_६) ⇒

अशी साखळी तयार करत गेलो (हे अर्थात संगणक वापरून करणं सोयीचं आहे), आणि जर एका कडीला अशी परिस्थिती आली की षटक आणि त्याचा अनुगत हे तंतोतंत सारखेच आहेत, तर आपला प्रश्न सुटेल. याचं कारण असं, की समजा (च_१,च_२,...,च_६) या षटकापर्यंत तेव्हा आपण आलेलो आहोत. या षटकाचा अनुगत तोच असण्याचा अर्थ असा होतो की आकाशी समीकरणांमध्ये जर क्ष_१, य_१ या दोहोंचं मूल्य च_१ हेच ठेवलं (आणि असंच च_२, च_३ इत्यादिंच्या बाबतीतही केलं), तर

च_१ = का(च_१) + ... + का(च_६) + १३,

...

च_६ =   र(च_१) + ... + र(च_६) + १,

इत्यादि सहाही समीकरणं खरी ठरतील, आणि याचाच अर्थ (&) या वाक्यातल्या मोकळ्या जागा जर आपण लि(च_१),...,लि(च_६) अशा भरल्या तर ते खरं होईल.

आता अशी परिस्थिती कधीकाळी येईल की नाही, हे सुरवातीच्या षटकावर अवलंबून असेल. हा प्रयोग मी करून पाहिलेला आहे. समजा (१,२,३,२,१,२) पासून सुरुवात केली तर साखळी अशी होते:

(१,२,३,२,१,२) ⇒ (१६,६,३,२,२,१) ⇒ (१८,६,३,२,२,१) ⇒
(१७,५,३,२,२,१) ⇒ (१७,५,३,२,२,१) ⇒ यापुढे तेच ते...

आणि म्हणूनच (१७,५,३,२,२,१) हे आपल्या प्रश्नाचं एक उत्तर झालं, आणि

(२३) या संपूर्ण वाक्यात एकूण सतरा काने, पाच मात्रा, तीन उकार, दोन वेलांट्या, दोन अनुस्वार आणि एक रफार आहेत.

असं आत्मोल्लेखी वाक्य तयार झालं. आणखी एखादं उत्तर अस्तित्वात आहे का हे मला माहीत नाही.

दरवेळी उत्तर मिळेलच असं नाही. जर (३,५,३,५,३,५) पासून सुरुवात केली तर अशी गंमत होते:
(३,५,३,५,३,५) ⇒ (१६,३,३,४,२,१) ⇒
(१७,५,३,३,२,१) ⇒ (१६,४,३,३,२,१) ⇒ (१७,५,३,३,२,१) ⇒ (१६,४,३,३,२,१) ⇒ .....
आणि शेवटची दोन षटकं जगाच्या अंतापर्यंत आलटून पालटून येत राहतात.

❈

एक न संपणारं आत्मोल्लेखी वाक्य देऊन हा लेख संपवतो. त्याचा शेवट जर झाला असता तर तो कसा असता याची वाचकांनी कल्पना करावी.

(२४) या वाक्यातील पहिल्या, तिसऱ्या, आठव्या, अकराव्या, ...

❈ ❈

पथ्य

डग न्यूफरच्या 'Never Again' या कादंबरीची सुरुवात अशी होते:

When the racetrack closed forever I had to get a job. Want ads made wonderlands, founding systems barely imagined. Adventure's imperative ruled nothing could repeat. Redirections dictated rigorously, freely. Go anywhere new: telephone boiler-rooms, midnight grocery shooting galleries, prosthetic limb assembly plants, hazardous waste-removal sites; flower delivery, flour milling, million-dollar bunko schemes. Do anything once; then, best of all, never again.

यावरून असा अर्थबोध होतो की कादंबरीचा नायक रेसट्रॅकवर काम करत असे, पण आता तो बंद पडल्यामुळे त्याला नवी नोकरी शोधावी लागणार आहे. त्याने स्वत:वर असा निर्बंध घालून घेतलेला आहे की कसलंही काम चालेल, पण जे एकदा केलं ते पुन्हा करायचं नाही.

पुढे कादंबरीच्या आठव्या पानावर हा मजकूर येतो:

Feast-scale repast strews obliviously underneath capletters spelling offense:

FOOD/DRINK/SMOKE PROHIBITED

Compu-copiers interdict room-shared snacking, superinvoking pristine environeeds. Liberties main office's papermates indulge're denied tempstaff, foreman comprehends. Delight pollutes guilt. Deficient wage's squandering ennobles unselfishness.

Solidarity enhances morale, reinstigates saltmine spelunkering. "Harrumph!" toe-tapped designating.

Evidence condemns ex-post-facto: styrofoam beads, powdery fingerdust, fleshly smeared formica, breathable sweetened atmospherous particulata. Airblown contaminators doubtlessly windvade mechanisensors, altering delicate chemistries.
She's correct. Wienerking's hotdogging endangers operational sensitivities.

"Sorry."

"Xerox specifically warned, contami–"

"Mea culpa."

Abject groveling unsettles wrath.

यातून मला थोडंफार जे समजलं ते असं: नायक एका ऑफिसात टेंपररी काम करतो आहे. तिथल्या झेरॉक्स मशीनवर 'इथे काही खाऊपिऊ नये किंवा धूम्रपान करू नये' अशा अर्थाची सूचना आहे, पण तरीही तो आणि त्याचे मित्र जवळ उभे राहून पिठीसाखरेत घोळवलेले डोनट्स किंवा अशासारखं काहीतरी खातात. ऑफिसात कायम झालेल्या लोकांनी असं केलं तर काणाडोळा होतो, पण टेंपररी लोकांना ती सूट नाही. हवेतल्या गोड वासामुळे आणि फर्निचरवरच्या डागांमुळे हा प्रकार उघडकीला येतो, आणि ऑफिसातली सेक्रेटरी त्यांच्यावर खेकसते. खाण्याच्या पदार्थांचे बारीक कण मशीनमध्ये जाऊन ते बिघडू शकतं, तेव्हा तिचं म्हणणं बरोबर आहे. पण नायक एकदम चूक कबूलच करून टाकतो, आणि तो असा सपशेल शरण आल्यामुळे तिला आपल्या रागाचं काय करावं ते कळत नाही.

हा अर्थ शोधून काढणं इतकं त्रासाचं का आहे याचं उत्तर कादंबरीच्या शीर्षकात, आणि वर उद्धृत केलेल्या पहिल्या उताऱ्यात मिळतं: Adventure's imperative ruled nothing could repeat. . . . Do anything once; then, best of all, never again. कादंबरी लिहिताना लेखकाने स्वत:वर असा निर्बंध घालून घेतलेला आहे की एकदा वापरलेला शब्द पुन्हा वापरायचा

नाही. उदाहरणार्थ, 'job' हा शब्द एकदा येऊन गेल्यानंतर तसाच्या तसा पुन्हा कुठेही येऊ शकत नाही. (पण 'jobhunt, jobcaster, job-to-job, handjobber' अशा वेगळ्या स्वरूपांत तो वापरायला लेखकाने स्वत:ला मुभा दिलेली आहे. अर्थात हाच निर्बंध त्यांनाही लागू होतो; म्हणजे 'jobcaster' हा शब्द पान १९ वर एकदा येतो आणि नंतर नाही.)

लेखकाने संपूर्ण कादंबरी नायकाच्या तोंडी घातलेली आहे, आणि तिच्या पहिल्याच वाक्यात 'I' वापरून संपवल्याची जबरी किंमत मोजलेली आहे. 'मी अमुक केलं, किंवा करतो आहे, किंवा करेन, किंवा करू शकेन' असं यापुढे म्हणता येणार नसल्यामुळे 'आधी असं घडतं, मग तसं घडतं' अशी वाक्यरचना सरसकट करावी लागलेली आहे. मध्येमध्ये इंग्रजीव्यतिरिक्त इतर भाषेत ''I' ला समानार्थी शब्द आणलेला आहे. उदाहरणार्थ, आत्तापर्यंतच्या आपल्या आयुष्याबद्दल इतरांना काय सांगायचं याचा विचार करताना पान ११ वर नायक म्हणतो:

Ego cogitates autobio summation ...,

किंवा पान २५ वर, फसवणूक झालेला एकजण संतापून म्हणतो:

Ich bin gefiched.

पण ही क्लृप्ती फार वेळा लढवता येण्यासारखी नाही.

असं लिखाण दुर्बोध होणं साहजिक आहे. पान १५४ वर हा मजकूर येतो:

Terrified steward headmasters retaliate, backfiring rubberbanded presidents trustworthily minted, impeccably engraved. Trivial airloft diffractions subtract sum divisive multiples; horde-bound hornswoggled proletariat swipes bankdrafts contemptuously. High-handed cowering tossers enrage grabbers. Touchable fluff, denominatored numerically, computes worth’s expirability.

कागदी चलनाच्या संबंधाने काहीतरी सार्वत्रिक घोटाळा झाला, इतपत यातून कळतं (कारण 'rubberbanded presidents' म्हणजे अमेरिकन डॉलर्सच्या नोटांच्या थप्प्या), पण यापेक्षा नेमका

अर्थ लावणं निदान मला तरी शक्य झालं नाही. कादंबरी लिहिताना न्यूफरला खूप मजा आली असणार, पण वाचणाऱ्याचा अनुभव तसा नसू शकतो.

❊

एक विशिष्ट भाषिक निर्बंध हेतुपुरस्सर स्वीकारून लिहिणं, याला 'constrained writing' असं म्हणतात; मराठीत याला 'बद्धलेखन' म्हणता येईल. अशा प्रकारचं लिखाण अनेक भाषांत खूप पूर्वीपासून आहे. काही उदाहरणं नमूद करतो.

काही राजपुत्र आणि काही अमात्यपुत्र, असे एकूण दहाजण लहानपणापासून जंगलात एकत्र वाढलेले होते. तारुण्यात आल्यानंतर ते दिग्विजय करण्याकरिता एकत्र बाहेर पडले, पण त्यांची एकमेकांपासून ताटातूट झाली. कालांतराने ते पुन्हा भेटल्यानंतर, त्यांतल्या प्रत्येकाने, आपल्या वाट्याला कोणते प्रसंग आले आणि आपण कोणती साहसं केली याचा वृत्तान्त इतरांना सांगितला. या सगळ्या कथा मिळून दण्डीची 'दशकुमारचरितम्' ही संस्कृत कादंबरी होते. यांपैकी मंत्रगुप्त ह्या कुमाराने आदली रात्र आपल्या प्रेयसीबरोबर रतिक्रीडेत घालवलेली होती, तिने उत्साहाच्या भरात त्याच्या ओठांचे चावे घेतल्यामुळे ते भप्प सुजलेले होते, आणि एकमेकांवर टेकवले तर दुखत असत. त्यामुळे नाईलाज होऊन, मंत्रगुप्ताने आपला संपूर्ण वृत्तान्त निरोष्ठ्य भाषणातून, म्हणजेच प-फ-ब-भ-म हे ओष्ठ्य वर्ण न वापरता, सांगितलेला आहे.

ही कसरत किती अवघड आहे याचा संस्कृत येत नसल्यामुळे मला पक्का अंदाज नाही. (स्वतःचं नाव उच्चारता न येणं ही काही मोठी अडचण नाही.) असा एक विनोद मी ऐकलेला आहे, की प्रत्येक संस्कृत शब्दाचे पाच अर्थ होतात: नेहमीचा अर्थ, त्याचा विरुद्धार्थ, एका देवतेचं नाव, एका संभोगासनाचं नाव आणि हत्ती. यात जर तथ्य असेल, तर ओष्ठ्य वर्ण वापरायला मज्जाव असूनही जे म्हणायचं आहे ते म्हणणं फारसं अवघड होऊ नये.

❊

ठराविक अक्षरं किंवा अक्षरसमूह वगळणं ह्या प्रकारचा निर्बंध बद्धलेखनात पुष्कळदा वापरला जातो. अशा लेखनाला 'लिपोग्रॅम' म्हणतात (प्राचीन ग्रीकमध्ये λειπω = वगळणे, आणि γϱαμμα = अक्षर). मराठीत याला विनोबी लेखन म्हणता येईल, कारण विनोबा भाव्यांना नेहमीच्या जेवणातले अनेक पदार्थ चालत नसत. असं आणखी एक उदाहरण पाहा:

Gadsby and Lucy had much curiosity in watching what such crashing music would do to various animals. At first a spirit akin to worry had baboons, gorillas, and such, staring about, as still as so many posts; until, finding that no harm was coming from such sounds, soon took to climbing and swinging again. Stags, yaks and llamas did a bit of high-kicking at first; Gadsby figuring that drums, and not actual music, did it. But a lilting waltzing aria did not worry any part of this big zoo family; in fact, a fox, wolf and jackal, in a quandary at first actually lay down, as though music truly “hath charms to calm a wild bosom.”

At Gadsby’s big aquarium, visitors found not only fun, but opportunity for studying many a kind of fish not ordinarily found in frying pans; and, though in many lands, snails form a popular food, Lucy, Sarah and Virginia put on furious scowls at a group of boys who thought “Snails might go good, with a nut-pick handy.” (But boys always will say things to horrify girls, you know.) And upon coming to that big glass building, with its boa constrictors, alligators, lizards and so on, a boy grinningly “got a girl’s goat” by wanting to kiss a fifty-foot anaconda; causing Lucy to say, haughtily, that “No boy, wanting to kiss such horrid, wriggly things can kiss us Branton Hills girls.” (Good for you, Lucy! I’d pass up a sixty-foot anaconda, any day, for you.)

रोमन लिपीतल्या सव्वीस अक्षरांपैकी 'e' हे अक्षर इंग्रजीमध्ये सर्वांत जास्त वेळा वापरलं जातं. (हे प्रमाण अंदाजे १०-१२% आहे, याचा अर्थ सरासरी नऊ अक्षरांमागे एकदा 'e' येतो.) अर्नेस्ट राईट या लेखकाने एकदाही 'e' न वापरता लिहिलेल्या 'Gadsby' या कादंबरीतून हा उतारा घेतलेला आहे. मागचा संदर्भ असा, की ब्रँटन हिलस् (Branton Hills) नावाच्या एका लहान गावामध्ये तिथला महापौर जॉन गॅड्सबी आपल्या पुढाकाराने एक प्राणीसंग्रहालय सुरू करतो. त्याच्या उद्घाटनाच्या वेळी गावच्या बँडने मोठमोठ्याने गाणी वाजवून गोंगाट करताच प्राण्यांची प्रतिक्रिया काय होते हे इथे सांगितलेलं आहे.

एकूण परिस्थिती पाहता या प्राणीसंग्रहालयात काही त्रुटी राहून जाणार हे उघड आहे, कारण tiger, chimpanzee, elephant हे प्राणी तिथे कधीच आणता येणार नाहीत. पण याची भरपाई अन्यत्र झालेली आहे. एकतर ticket booth नसल्यामुळे प्रवेश विनामूल्य असणार. दुसरं असं, की अनाकोंडा या सापाची लांबी सर्वसाधारणपणे पंधरावीस फुटांपेक्षा जास्त नसते हे जरी खरं असलं, तरीसुद्धा या कादंबरीतल्या अनाकोंडाची लांबी मात्र seven ते twenty-nine या दरम्यान कुठेच असू शकणार नाही; तेंव्हा लेखकाने असा विचार केला असावा की कमीतकमी तीस फूट जर हवी, तर ताणून पन्नासच करायला काय हरकत आहे?

जर लेखकाने 'e' ऐवजी 'x' किंवा 'z' अशासारखं अक्षर वगळायचं ठरवलं असतं, तर ते इतकं आव्हानात्मक ठरलं नसतं. बद्धलेखन करणं हे कुत्र्याला फिरायला घेऊन जाण्यासारखं असतं. पॉमेरेनियनला हवं तिथे नेता येतं, पण अल्सेशियन तुम्हालाच घेऊन जातो.

❊

हा वगळलेला अक्षरसमूह बराच मोठा असू शकतो. क्रिस्तियन ब्योक या लेखकाच्या Eunoia या पुस्तकात, इंग्रजी लिखाणामधल्या A,E,I,O,U या पाच स्वरांना अनुसरून पाच भाग (chapters) आहेत, आणि 'Chapter §' मध्ये फक्त § हा एकच स्वर वापरलेला आहे. उदाहरणार्थ, Chapter I ची

सुरुवात अशी होते:

Writing is inhibiting. Sighting, I sit, scribbling in ink this pidgin script. I sing with nihilistic witticism, disciplining signs with trifling gimmicks – impish hijinks which highlight stick sigils. Isn't it glib? Isn't it chic? I fit childish insights within rigid limits, writing shtick which might instill priggish misgivings in critics blind with hindsight.

हे बद्धलेखन या विषयावरचं बद्धलेखन आहे.

दण्डी, राईट किंवा ब्योकने स्वीकारलेले निर्बंध अक्षरांच्या पातळीवर आहेत, तर न्यूफरचा निर्बंध शब्दांच्या पातळीवर आहे. निर्बंधाचं स्वरूप काय असावं याबद्दल काही निश्चित नियम अर्थातच नाहीत. 'मी शार्दूलविक्रीडितात सुभाषित रचीन', किंवा 'मी तळकोंकणाच्या पार्श्वभूमीवर कादंबरी लिहीन', किंवा 'मी हॅम्लेट मराठीत आणीन', अशासारखे निर्बंध अतिपरिचयामुळे उठून दिसत नसतील, पण तरीही ते अस्तित्वात असतातच. बद्ध नाही असं लेखन नाही.

❊

केवळ वारा

स्थळ: सह्याद्रीच्या कुशीतलं धुळसर खेडं. मुक्काम पोस्ट अगावे, तालुका नांदोली.

वेळ: दिवेलागणीची.

पात्रपरिचय: शिवारातले काबाडकष्ट उरकून गावदेवीच्या मंडपात विसावलेले पाचपंधरा घामट फाटके कुणबी. झगझगीत पांढऱ्या खळणी कपड्यांत फताड्या अनवाणी पावलांनी अवतीभोवती येरझाऱ्या घालणारे कुर्रेबाज कुलकर्णी गुरुजी.

अबोल वातावरण. मजूर काळजीपूर्वक तंबाखू चघळताहेत. मास्तरांच्या खाकरण्याने शांततेला तडा जातो. चालू भादवा सरताच पुढला महिना अश्विन; तेंव्हा नवरात्राची कायकाय तयारी करायची, खर्च केवढा येईल, दरडोई किती वर्गणी काढायची यावर सांगोपांग चर्चा घडवण्याची त्यांना खुमखुमी चढलेली दिसते. हा संभाषणविषय निघताच कष्टकरी वर्ग दचकतो. सर्वत्र अस्वस्थता पसरते.

"पैसेच नाहीत गाठीला," सुभान्या पुटपुटला. बाकीच्यांनी विशेष चिकित्सेत पडण्याऐवजी घुमेपणाने रुकार भरला.

"गाडग्यामडक्यांत साठवलेला खुर्दा बाहेर आणा!" शालाध्यापकांचा साळसूद सल्ला.

"छ्या! कसला चंदा?! इथं छापाकाट्याला ढब्बू सापडायची पंचाईत," बारकू उत्तरला.

"बचत शिल्लक टाकली तर चोरीची भीती वाटते. कमावलेलं उडवलं की जोखीम मिटली!" धनूने खुलासा मांडला.

"हात्तिच्या आयला!" सर गडगडले. "उधळे लेकाचे! सणासुदीसाठी चार चव्वल बाजूला ठेवायचं शहाणपण कुठून सुचणार तुम्हाला?! सतत कानीकपाळी बजावूनही पालथ्या घड्यावर पाणी! "

"होय! सगळं कबूल. पण आमचा नाईलाजच राहतो," लहानू म्हणाला. "ज्या माणसाला तुटपुंजं मिळतं तो समोरचं घशात कोंबणारच." साऱ्यांनी संमतीदर्शक गोलगोल माना डोलावल्या.

"इतकं हावरटपणाने वागून चालेल?" ग्रामशिक्षक उसळून बोलले. "शेतकरड्यांचं पूर्वीपासून व्यवच्छेदक लक्षणच अगदी! दूरदृष्टीच्या नावाने सरसकट बोंब! सरकारनं श्वेतपेशांकडून कर उकळायचा. बळीराजबड्यात कर्जं ढोसायची. वर्षभरात साल्यांच्या काखा वर! रांडीचे केक खाणारही, राखणारही!"

अवघडलेली सामसूम इतस्तत: दरवळली. "यंदा आषाढात पाऊसच कमी बरसला –" धीर धरून बजाबा उद्गारला.

"हॅं! शर्विलकाच्या उलट्या कंठाळ्या! सदानकदा अवर्षणाचा बहाणा! सोद्यांच्या सवयींच भिकारड्या! सुगी बाजारात पाठवल्यावर आठवडाभर पुख्खे झोडायचे! दारू प्यायची! नोटा मोडून नाणी घ्यायची! हळूहळू कडकी! फडताळांत ठणठणाट! मडक्यांत खडखडाट! पोटाला फाके! भांडी खरवडून जठर जपायचं! पातेलं वीक, डाग गहाण सोड असले विझोटे धंदे! शेवटी बुडत्याचा पाय खोलात! "

"खरी गोष्ट," जनाबाई किरकिरली. "आधी पीठ संपतं, नंतर मीठ. मग तांदूळ खलास. फक्त तेलमसाले बक्कळ उरून कोणता उपयोग? स्वयंपाकाचं पेकाटच कचकतं."

मंदिराच्या आवारातल्या तोतऱ्या नळाची टपटप धार सूचकपणे अडखळून थांबली.

"रांधण अर्धंमुर्धंच साधतं. डोळ्यांना खुपतं, चवीला विचित्र भासतं," विठूताईने व्यथा वर्णिली.

"अनैसर्गिक रचना," येश्वदाकाकीने तात्त्विक पुस्ती जोडली.

"रसना," गंगव्वाने सूक्ष्म दुरुस्ती सरकवली.

"तोंडची वाफच पळते जणू!" चिंधीने वाक्चातुर्य दाखवलं.

"निव्वळ फोडणी प्राशून जेवण असंभाव्य," शिवाने री ओढली. "निरुपाय उद्भवतो. भागवाभागवी अटळ ठरते. अमक्याऐवजी तमकं वापरणं क्रमप्राप्त. रव्याऐवजी खवा, पोफळीऐवजी जायफळ, उदकाऐवजी मादक. शेंगदाण्याअभावी काजूच्या चटणीबरोबर अश्रूंत भिजवून भाकरतुकडा गिळायचा."

"फ्रान्सच्या राणीचा उपदेश मानायचा. पावाऐवजी क्रीमरोल भक्षून उदरभरण उजवायचं," द्रुपदा स्थितप्रज्ञ वृत्तीने वदली.

"चिरगुटांच्या टंचाईपोटी जरतारी शालू नेसायचा!" आवडाक्काच्या मुखातून नवी उत्प्रेक्षा प्रगटली.

उपस्थित स्त्रीपुरुष पाव घटका श्वास रोखून नि:शब्द स्थिरावले. निरांजनातल्या तुपाची पातळी खालावताच देव्हाऱ्यातली ज्योत विझून सांकेतिक काळोख माजला. डोकं खाजवल्याचे आणि तांबूलसेवनाच्या अपेक्षेने रिकामी चंची चाचपडल्याचे आवाज. दोन हरहुन्नरी इसम परस्परांशी खाणाखुणांनी संवादताना आढळले.

पंतोजींची प्रश्नचिन्हांकित करारी नजर वर्तुळाकार फिरली. "आता तोडगा? दुर्गेच्या सेवेला नगदनारायण पाहिजेच!"

सभास्थानी चिंतितभावसंपृक्त सन्नाटा फैलावला.

"वचने च द्रव्ये इव दरिद्रता खलु!" किशीमावशी कुजबुजली.

"मोठी संस्कृत पाजळतेय! मराठीचं दिवाळं वाजलं?!" नामूची कुत्सित विचारणा.

"जवळजवळ!" तुक्याचा खवचट शेरा.

"अख्ख्या वस्तीला इंग्रजी शिकवा टीचर! ममईत नोकरी गावेल, जिभेचीही चणचण निवेल," किस्नाचा भाबडा प्रस्ताव.

"व्हॉट यूज? आफ्टर समटाईम एनीवे फिनिश, नो?" दगडूचा निराशावादी निर्वाळा.

प्रस्तुत मुद्द्यातील तथ्य जाणवून समग्र जनसमुदाय हताशला.

"अस्तु. भविष्यात धोरणीपणा राबवा," पिंगट बुबुळं चक्राकार हलली. "मी सांगितलेला सुविचार पक्का लक्षात बसवा. अंथरूण पाहून–?!"

समस्त हजर मंडळी गप्प ठाकली. "जखमेवर डाग चोळता?" श्रीपतीची मार्मिक पृच्छा.

धुवट धोतरातला अरेरावी ब्राह्मण वरमला. "ऐका – उद्या तिन्हीसांजेला वडाच्या पारावर भेटू. काटकसरीची संथा पढवतो. कागदपेन्सिलीनं रोजगारीच्या आवकजावकीचा तक्ता व्यवस्थित आखून दर्शवतो. कीर्दखतावणी –"

यच्चयावत पब्लिकसमूह वैतागला. "चूप खर्डेघाशा! तुझी बाष्कळ चर्पटपंजरी पुन्हा नको," गणूच्या नरड्यातून प्राणांतिक घायकुतीने शब्द फुटले, "एकदाच बास!"

❊

'एकदा वापरलेला शब्द पुन्हा वापरायचा नाही' हा निर्बंध स्वीकारून वरचा उतारा लिहून पाहण्याआधी मी असं ठरवलं होतं, की 'वापरलेला शब्द' याचा व्यापक अर्थ घ्यायचा. उदाहरणार्थ, 'करूया' आला, तर 'केल्यासारखं, करणे, करशील' इत्यादि शब्द त्यानंतर वर्ज्य मानायचे; किंवा 'मी' येऊन गेल्यानंतर 'मला, माझ्याविषयी, म्या' इत्यादि वर्ज्य मानायचे. अर्थात व्यापक म्हणजे किती व्यापक हे शास्त्रकाट्याची कसोटी लावून ठरवता येईल असा भाषेचा स्वभाव नसतो. 'दस्तुरखुद्द' नंतर 'हातोटी' चालेल की नाही? 'रेगेन्सबर्गची लज्जतदार लिंग्वीनी राजोपाध्ये मॅडमनी जिभल्या चाटत खाल्ली' असं लिहिलं तर चालेल की नाही?

❊ ❊

संदर्भ

• 'Never Again', by Doug Nufer, Black Square Editions, New York, 2004.
(हे पुस्तक 'http://www.ubu.com/contemp/nufer/' या वेबसाईटवर उपलब्ध आहे.)

• 'The Dasakumaracarita of Dandin', (with Various Readings, A Literal English Translation, Explanatory and Critical Notes, and an Exhaustive Introduction), by M.R. Kale, 4th edition, Motilal Banarsidass, Delhi, 1966.

• 'Gadsby' by Ernest Vincent Wright, 1939.
('http://spinelessbooks.com/gadsby' इथे उपलब्ध.)

• 'Eunoia', by Christian Bök, Coach House Books, 2001.
('http://archives.chbooks.com/online_books/eunoia/' इथे उपलब्ध.)

• 'Le Ton Beau de Marot', by Douglas Hofstadter, Basic Books, 1997.
(या पुस्तकाच्या Chapter 5 मध्ये बद्धलेखनावर फार सुरस चर्चा आहे.)

❊ ❊ ❊